म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. नं. ९८४७
१९४६



शिवाजी
(तंत्र आणि इतिहास)

REFBK-0006659



— रंगराव दिवाकर

किताब मीनार प्रकाशन. पुष्प ६ वें

सत्याग्रह

[तंत्र आणि इतिहास]



लेखक

रंगराव दिवाकर

REFBK-0006659

किंमत ५ रुपये.

प्रकाशक—
अ. न. साठे.
किताब मीनार प्रकाशन संस्था,
लक्ष्मी रोड, पुणें २.
* * * * *

[मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांचें आहे]

सन १९४५

मुद्रक—
लक्ष्मण नारायण चापेकर.
'आर्यसंस्कृति मुद्रणालय',
१९८ (१७) सदाशिव पेठ,
चिमणबाग, टिळक रस्ता, पुणें २.
* * * * *

अनुक्रमणिका

१	शब्द व त्याची व्याप्ति	३
२	सत्याग्रहाची पूर्वपीठिका	७
३	सत्याग्रहाची उत्पत्ति	१४
४	सत्याग्रहाची मौलिकता	२५
५	सत्याग्रहाचें अधिष्ठान	३०
६	सत्याग्रहीचा दृष्टिकोण	४०
७	जीवनपथ आणि सामाजिक शस्त्र	५५
८	सत्याग्रहाची व्याप्ति	६०
९	सत्याग्रहाचीं विविध स्वरूपें	६८
१०	हिंदुस्तानांतील सामुदायिक सत्याग्रह	७३
११	संघटना आणि शिक्षण	८१
१२	सत्याग्रहासाठीं शिस्त	९३
१३	सत्याग्रहतंत्र	९९
१४	युद्धाचा नैतिक पर्याय	११२
१५	सत्याग्रहाचें भवितव्य	१२९
१६	गांधीजींचे व्यक्तिगत व कौटुंबिक सत्याग्रह	१३८
१७	गांधीजींच्या सत्याग्रहचळवळी	१४४
१८	इतरांनीं केलेले सत्याग्रह	१७७
१९	इतिहासांतील कांहीं दाखले	१९५
२०	रौलट ॲक्ट सत्याग्रह	२०७
२१	अहिंसक असहकार	२१३
२२	स्वराज्यासाठीं सविनय कायदेभंग	२२२
२३	कायदेभंगाचें पुनरुत्थान	२३४
२४	वैयक्तिक सत्याग्रह	२४३
२५	"चले जाव" चळवळ	२४९
परिशिष्ट १	सत्याग्रहाश्रमांतील व्रतें	२५३
,, २	विधायक कार्यक्रम	२५७
,, ३	सत्याग्रहींसाठीं नियम	२५८
,, ४	कांहीं प्रतिज्ञा	२६२
,, ५	संदर्भग्रंथांची सूचि	२६६

किताब मीनार प्रकाशन. पुष्प ६ वें

सत्याग्रह

[तंत्र आणि इतिहास]



लेखक

रंगराव दिवाकर

REFBK-0006659

किंमत ५ रुपये.



प्रस्तावना

गेल्या जवळ जवळ चाळीस वर्षांत सत्याग्रहाचें नांव सर्वांच्या परिचयाचें झालें आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांतील सर्व अन्यायांचा प्रतिकार करण्याची ती एक पद्धत आहे. सत्य आणि प्रेम हीं त्याचें अधिष्ठान आहे. सत्याग्रह म्हणजे अनत्याचारी प्रत्यक्ष प्रतिकार होय. १९०६ मध्यें दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या लढ्याचे वेळीं त्याची प्रथम सुरवात झाली. त्या वेळीं देखील टॉलस्टॉयसारख्या मोठमोठ्या विचारवंतांचें लक्ष त्यानें वेधून घेतलें. हिंदुस्थानांत राष्ट्रव्यापी प्रमाणावर वारंवार झालेल्या त्याच्या उपयोगामुळें मानवामानवांतील झगडे शांततेच्या मार्गानें कसे मिटवतां येतील याचा विचार करणाऱ्या प्रत्येकाचेंच लक्ष त्याकडे लागून राहिलें आहे.

सत्याग्रहाचा प्रारंभ, इतिहास, त्याची तत्त्वप्रणाली व तंत्र यांचा थोडक्यांत वृत्तान्त देण्याचा हा एक अल्प प्रयत्न आहे. सत्याग्रहशास्त्राची सुरवात व त्याचा विकास याचें श्रेय गांधीजींकडे जात असल्यामुळें या वृत्तान्तांत त्यांचें स्थान साहजिकच प्रमुख आहे. सत्याग्रहाच्या इतिहासांतील गांधीजींचें स्थान अढळ आहे त्याचप्रमाणें जीवनतत्त्व म्हणून सत्याग्रहाचें सविस्तर वर्णन केल्याखेरीज हा वृत्तान्त सार्थ किंवा पूर्ण होणार नाहीं. त्या तत्त्वप्रणालीमधूनच ही सत्याग्रहपद्धति विकसित झाली आहे.

हें कबूल केलें पाहिजे कीं सत्याग्रह शास्त्र अजून प्रगत होत आहे. त्याचे प्रणेते अजून हयात असून त्याचा विकास करण्यास मदत करीत आहेत. अशा तऱ्हेनें प्रगतावस्थेंत असलेल्या कोणत्याहि शास्त्राचें विवेचन परिपूर्ण व निर्णायक ठरणार नाहीं. परंतु आज सत्याग्रहपद्धति अशा एका अवस्थेला पोहोचली आहे कीं तिचा वृत्तान्त लोकांची गरज भागवून त्यांना उपयुक्त होऊं शकेल.

मीं हा वृत्तान्त शक्य तेवढ्या संक्षेपानें देण्याचा प्रयत्न केला असून सत्याग्रहमोहीमांची हकीगत देतांना महत्त्वाच्या तेवढ्याच घटनांचा नाम-निर्देश केला आहे. म्हैसूर, त्रावणकोर व इतर कांहीं संस्थानांतील सत्या-ग्रहाची माहिती देण्याची माझी इच्छा होती परंतु त्यासंबंधींची जरूर तेवढी माहिती वेळेवर हातीं न आल्यामुळें मला ती कल्पना सोडून द्यावी लागली.

वेळोवेळीं मला ज्या मित्रांनीं योग्य सूचना देऊन माझ्या कामांत मदत केली त्यांचे आणि या विषयाचा अभ्यास करीत असतांना मीं परिशीलन केलेल्या ग्रंथांच्या लेखकांचे मला आभार मानले पाहिजेत.

प्रस्तुत लेखक स्वतः या विषयाचा सूक्ष्म निरीक्षक असून हिंदुस्थानांत व विशेषतः कर्नाटकांत झालेल्या अनेक सत्याग्रहांत त्यानें प्रत्यक्ष भाग घेतला आहे हे येथें नमूद करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

मुंबई

रंगनाथ दिवाकर



शब्द व त्याची व्याप्ति

१

सत्याग्रह हा मूळ संस्कृत शब्द आहे. सत्य व आग्रह यांच्यापासून तो सामासिक शब्द झाला असून त्याचा अर्थ सत्याला चिकटून राहणें, सत्याला धरून असणें, सत्याचा आग्रह धरणें असा होतो.

सत्य हें सत् या मूळ शब्दाचें रूप आहे. सत् म्हणजे असणें किंवा जें आहे तें. सत्य म्हणजे जें आहे त्याला धरून असलेलें. याप्रमाणें जें अस्तित्वांत आहे त्याला धरून असलेली गोष्ट, प्रत्यक्ष जी वस्तुस्थिति असेल तिचें यथार्थज्ञान, हें सत्य होय. सत्यानुरूप कृतीला– योग्य कृतीला– वेदांत एक स्वतंत्र शब्द आहे. तो म्हणजे ऋत्. सत्य म्हणजे वस्तुस्थितीचें ज्ञान आणि ऋत् म्हणजे सत्यानुरूप वर्तन. वैदिक ऋषी असें आग्रहानें प्रतिपादन करतात कीं सत्य आणि ऋत् हे एकत्रच असले पाहिजेत.

सत्याग्रह या छोट्याशा सामासिक शब्दाची उत्पत्ति मोठी मजेशीर आहे. १९०६ सालीं गांधीजींनीं दक्षिण आफ्रिकेंतील अन्याय्य कायद्याविरुद्ध चालवलेल्या हिंदी लोकांच्या चळवळीला सुरवातीला 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' (निःशस्त्र प्रतिकार) म्हणत असत. स्वतः गांधीजी देखील प्रथम प्रथम तोच शब्द वापरीत असत. परंतु नंतर आपल्या लोकांना सहज न समजण्यासारखा आणि चटकन वापरतां न येण्यासारखा इंग्रजी शब्द योजण्याची त्यांना लाज वाटू लागली. पण त्याहूनहि महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे त्यांना असें वाटलें कीं त्यांनीं सुरू केलेली चळवळ ही ज्याला सर्वसामान्यपणें 'निःशस्त्र प्रतिकार' असें म्हणतात त्यापेक्षां मुळांतच निराळी आहे. योग्य शब्द त्यांच्या ध्यानांत येईना म्हणून त्यांनीं 'इंडियन ओपीनियन'मधून असा शब्द सुचविणारास बक्षिस जाहीर केलें. त्याचा परिणाम म्हणून अनेकांच्याकडून सूचना आल्या. श्री. मगनलाल गांधी यांनीं 'सदाग्रह' असा शब्द सुचवला. सदाग्रह म्हणजे चांगल्या कार्यावरील निष्ठा किंवा अविचलता. गांधीजींचें त्यामुळें समाधान झालें नाहीं म्हणून त्यांना व्यक्त करावयाचा असलेला सगळा अर्थ त्यांत प्रतीत व्हावा या

हेतूनें त्यांनीं त्याचें 'सत्याग्रह' असें रूपान्तर केलें. त्याचा अर्थ म्हणजे सत्य- शक्ति अगर सत्य व प्रीति यांमधून निर्माण झालेली शक्ति किंवा अहिंसा. गांधीजींच्या मतें सत्य आणि अहिंसा किंवा प्रेम एकरूपच आहेत. सर्व धर्मांप्रमाणेंच हिंदुधर्मांतहि सत्य व प्रामाणिक आचरण यांना सर्वांत महत्त्वाचें स्थान आहे. सत्याची कास धरणें हा संस्कृत व इतर प्रांतिक वाङ्मयांतील अत्यंत परिचित असा विषय आहे. परंतु सत्याग्रह हा शब्द मात्र कोठेंहि वापरण्यांत आलेला आढळत नाहीं. सत्यव्रत, सत्यनिष्ठ, सत्यवन्त, सत्यसंध हे शब्द राम, धर्मराज व इतर महान् व्यक्तींना उद्देशून वारंवार वापरण्यांत आले आहेत. परंतु याहून व्यापक व विशेष अर्थगर्भ अशा ज्या कल्पनांसाठीं गांधीजी ओळखले जातात त्या व्यक्त करण्यासाठींच जणूं सत्याग्रह हा शब्द इतके दिवस राखून ठेवला गेला असावा.

शब्दांना देखील त्यांचें असें एक स्वतंत्र जीवन असतें. उंच डोंगरावर अगदीं लहान प्रमाणावर उगम पावलेल्या मोठ्या नद्यांप्रमाणें शब्दांचा अर्थ देखील ते जसजसे वापरांत येतात तसतसा विशाल व खोल बनत जातो. गांधीजी म्हणतात कीं दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाच्या वेळीं नुकत्याच जन्माला आलेल्या एखाद्या छोट्या निरागस बालकाप्रमाणें एक नवें तत्त्व उदयास येत आहे इतकेंच त्यांना माहीत होतें. परंतु लढा जसजसा वाढत गेला आणि गांधीजी सत्याग्रहाची पद्धत जसजशी परिणतीला नेत गेले तसतसा सत्याग्रह हा शब्द, त्यात समाविष्ट असलेला अर्थ व वैशिष्ट्य, या दृष्टीनें अधिकाधिक समृद्ध बनत गेला. एका छोट्याशा बीजापासून आज त्याचा प्रचंड वृक्ष झाला आहे. कामचलाऊ उपायापासून रामबाण औषधांत त्याचें रूपान्तर झालें आहे. सर्वांगीण जीवनाची अखंड तत्त्वधारा या अर्थानें आज त्याचा उपयोग केला जातो. शब्द तोच आहे पण गांधीजींच्या बुद्धिंगत होत जाणाऱ्या जीवनाबरोबर आणि त्यांनीं केलेल्या सत्याच्या अनेक निरनिराळ्या उपयुक्त प्रयोगांबरोबर त्याचा अर्थ विकास पावला आहे.

'निशःस्त्र प्रतिकार' या शब्दप्रयोगाचा पर्याय म्हणून सत्याग्रह या शब्दाची सुरवात झाली. निःशस्त्र प्रतिकार हा शब्दप्रयोग अजूनहि रूढ आहे परंतु सत्याग्रहापेक्षां फार निराळा अर्थ त्याला प्राप्त झाला आहे.

दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांनीं केलेल्या चळवळीचें तात्कालिक दर्शनी स्वरूप हें निःसंशय हिंसक सशस्त्र प्रतिकारापेक्षां निराळ्या अशा निःशस्त्र-प्रतिकारासारखें जवळ जवळ होतें. पण त्या ठिकाणीं त्या दोहोंतील साम्य संपतें. साध्या निःशस्त्रप्रतिकारापेक्षां गांधीजींचा मार्ग, तात्त्विक भूमिका आणि तंत्र हें सर्व निराळें होतें. आणि म्हणूनच गांधीजींना नव्या शब्दाची जरूर भासली. निःशस्त्रप्रतिकार देखील सत्याग्रहीच्या कोषांतून वगळण्यांत येत नाहीं. पण त्या ठिकाणीं सविनय कायदेभंग हा शब्दप्रयोग पसंत केला जातो आणि सविनयतेवर म्हणजेच अहिंसेवर भर देण्यांत येतो.

निःशस्त्र प्रतिकाराचा ऐतिहासिक दृष्ट्या पाश्चिमात्यांनीं लावलेला व आज आपण करीत असलेला अर्थ निःशक्तांचें, निःशस्त्र्याचें व असहायांचें हत्यार असा होतो. तत्त्व म्हणून त्यांतून हिंसा वगळली जात नाहीं तर केवळ शस्त्रें नसल्यामुळें आणि त्याखेरीज अन्य उपायच नाहीं म्हणून तीं टाळण्यांत येतात. शस्त्रें हाताशीं असतील, किंवा त्यांच्या योगानें यश येण्याचा पुरेसा संभव असेल, तर शस्त्रांचाहि अवलंब केला जाईल. निःशस्त्र प्रतिकार ही सशस्त्र प्रतिकाराची पूर्वतयारी असेल किंवा निःशस्त्र आणि सशस्त्र प्रतिकार यांचा एकसमयावच्छेदेंकरूनहि उपयोग केला जाईल. विशिष्ट कार्यासाठीं शत्रूला हैराण करणें आणि त्याच्यावर पुरेसें दडपण आणणें ही निःशस्त्र प्रतिकारामागील कल्पना आहे. त्यांत प्रेमाला कोठेंच स्थान नाहीं. तिरस्कार व गैरविश्वास यांवर त्याची उभारणी झालेली असल्यामुळें आपल्या निकटवर्तियांच्या विरुद्ध तो वापरतां येणें शक्य नाहीं. त्यांत विधायक कार्यप्रवृत्तीला स्थान नाहीं. निःशस्त्र प्रतिकार हा जीवनविषयक तत्त्वज्ञान म्हणून मानला जात नाहीं.

आदर्श सत्याग्रह याहून निराळा असतो. सत्याचा आग्रह ही सत्याग्रहाची बैठक आहे. कोणत्याहि अवस्थांत व स्वरूपांत तत्त्व म्हणून हिंसा त्यांतून संपूर्णपणें वगळली जाते. जीविताला किंवा वित्ताला कोणत्याहि तऱ्हेची इजा करणाऱ्या हिंसक कृतीशीं सत्याग्रह केव्हांही निगडित होऊं शकणार नाहीं. शत्रूचा निःपात करणें ही कल्पना सत्याग्रहामागें नाहीं, तर सहानुभूति, संयम आणि आत्मक्लेश यांच्या योगानें त्याचें मतपरिवर्तन करणें किंवा त्याला आपल्या बाजूला वळवणें ही

त्यांतील कल्पना आहे. सत्याग्रह सर्व प्रकारच्या अन्यायांचा तिरस्कार करीत असला आणि त्याबरोबर कसलीहि तडजोड करण्यास तयार नसला तरी अन्याय करणाऱ्याला वळवण्याचा त्याचा मार्ग प्रेम हाच असतो. मानवाच्या नैसर्गिक चागुलपणावर त्याचा गाढ विश्वास असतो. आपल्या अगदीं जवळच्या व प्रिय व्यक्तींच्या विरुद्ध देखील सत्याग्रह हत्यार म्हणून वापरतां येतें. सत्याग्रहाचा अवलंब प्रेमपूर्वकच केला जातो व ज्याच्या-बद्दल प्रेमभावना असते त्याच्याकरतां कमालीचे क्लेश सहन करण्याची सत्याग्रहीची तयारी असते. प्रत्यक्ष लढा चालू नसतांना सेवेच्या व त्यागाच्या भावनेनें सत्याग्रही स्वतःला विधायक कार्यक्रमांत गुंतवून घेईल.

गांधीजी व त्यांचे निकटवर्ती अनुयायी यांच्या जीवनक्रमाचा आधार बनलेली तत्त्वप्रणाली व नैतिक मूल्यें आणि व्यक्तिशः व सामुदायिकरीत्या अन्यायाविरुद्ध झगडण्याचा गांधीजींनीं प्रथम दक्षिण आफ्रिकेंत सुरू केलेला व नंतर हिंदुस्थानांत वाढवलेला झगड्याचा मार्ग या दोन्ही अर्थांनीं आज सत्याग्रह हा शब्द वापरला जातो. यांपैकीं पहिल्या प्रकारासाठीं अवश्य असलेल्या शिस्तीचें प्रमाण हें साहजिकच अधिक उच्च असतें. सत्याग्रहीची सत्याग्रहाच्या तत्त्वप्रणालीवर संपूर्ण निष्ठा असली पाहिजे. अन्यायाचा प्रतिकार करण्याचें शस्त्र म्हणून जे प्रसंगोप्रात सत्याग्रहाचा अवलंब करतात त्यांच्या बाबतींत अगदीं कमींत कमी अटी म्हटल्या म्हणजे सत्य त्यांच्या बाजूला असलें पाहिजे, धर्म म्हणून नाहीं तर धोरण म्हणून तरी निदान त्यानीं अहिंसेच्या सर्व मर्यादा पाळल्या पाहिजेत, इतर सर्व मार्ग चोखाळून झाले असले पाहिजेत, आणि जनमत त्यांनीं आपल्या बाजूचें केलें असलें पाहिजे. ज्या वेळीं सामुदायिक सत्याग्रह हातीं घेतला जातो त्या वेळीं समुदा-यांतील प्रत्येक व्यक्तीनें सत्याग्रहाच्या तत्त्वांतील सर्व अंगोपांगें आत्मसात् करण्याची जरूर आहे असें नाहीं. पुढारी सत्याग्रहाच्या आत्म्याशीं तदा-कार झाले असले, जनता पुढाऱ्यांचें ऐकत असली आणि जीवितावर किंवा वित्तावर आघात करणाऱ्या अत्याचारी कृत्यांपासून दूर राहण्या-इतका संयम त्यांच्याजवळ असला म्हणजे पुरे. पुष्कळदां या दुसऱ्या प्रकारात सत्याग्रह या व्यापक शब्दाऐवजीं 'सविनय प्रतिकार' हा शब्द-प्रयोग करणें अधिक सयुक्तिक असतें.

अशा प्रकारें हा एक जीवनपथ आहे. आणि सत्याची साधना करूं पाहणारा सर्वंकष प्रेमभावानें प्रत्येक क्षणीं त्याची कांस घरीत असतो तो प्रेमभाव सत्याग्रही अखंड निष्काम सेवेनें व्यक्त करतो आणि जरूर तर त्यासाठीं आनंदानें मरण देखील पत्करतो. परंतु ईश्वरानें जन्माला घातलेल्या कोणाहि व्यक्तीला तो कायावाचामनानें कधींहि दुखवणार नाहीं.

गांधीजींनीं प्रसृत केलेला अन्यायाविरुद्ध झगडण्याचा अहिंसात्मक प्रत्यक्ष प्रतिकार असाहि सत्याग्रहाचा एक अर्थ केला जातो. त्याचें स्पष्टीकरण पुढें येणार आहे.

सत्याग्रहाची पूर्वपीठिका : : २

सत्याग्रहाची पूर्वपीठिका सांगण्यापूर्वी हें पुस्तक लिहिण्यांतील प्रधान उद्देश सामाजिक शस्त्र म्हणून त्याची उपयुक्तता दाखवून देणें हा आहे हें वाचकांच्या नजरेला आणून दिलें पाहिजे. वैयक्तिक सत्याग्रही पुष्कळ होऊन गेले आहेत. पुराणें, आख्यानें व चरित्रें यांमधून त्यांचीं वर्णनें आलीं आहेत. अनेक आध्मात्मिक व धार्मिक उपदेशकांनीं धार्मिक जीवन व्यतीत करूं इच्छिणाऱ्या व्यक्तींचा किंवा छोट्या गटांचा जीवनमार्ग म्हणून, सत्याग्रहावर भर दिलेला आहे. परंतु फक्त अहिंसेच्या द्वाराच सत्याची साधना होऊं शकेल, आणि निरनिराळ्या गटांतील व राष्ट्रांतील विरोध मिटविण्यासाठीं या मार्गाचा अवलंब करतां येईल असें ठामपणानें सांगण्याचा मान गांधीजींनाच लाभलेला आहे. "द डॉन ऑफ इंडियन फ्रीडम" या पुस्तकाच्या लेखकांनीं अगदीं समर्पकपणें म्हटलें आहे कीं "केवळ एकट्यादुकट्या व्यक्तीनेंच नव्हे तर गटांनीं व सबंध राष्ट्रांनीं आंतरराष्ट्रीय वाद मिटविण्यासाठीं सत्याग्रह किंवा अहिंसक प्रतिकार हें शस्त्र म्हणून वापरण्याची कल्पना हीच बहुधा महात्मा गांधींनीं जगाच्या विचारसंपत्तींत टाकलेली सर्वांत महत्त्वाची भर होय." गतकालांत सामु-

दायिक प्रमाणावर झालेल्या सविनय प्रतिकाराचीं उदाहरणें देखील क्वचितच आढळतील. चुकूनमाकून असें एखादें उदाहरण कोठें आढळलेंच तरी तसल्या चळवळींत त्या मार्गाच्या मूलभूत तत्त्वाबद्दल गांधीजींच्या इतकी स्पष्ट व सुसंगत विचारसरणी कोणत्याच पुढाऱ्याची आढळत नाहीं. त्या मार्गाला शास्त्राचा आणि कलेचा दर्जा देण्याचाहि कोणीं प्रयत्न केलेला नाहीं. गांधीजींच्या तंत्रांत बसणारा उपवासाचा अवलंब तर अद्वितीय आहे. वातावरणांत वावरणाऱ्या निरनिराळ्या अत्यंत अस्पष्ट अशा सत्याग्रहाच्या कल्पनांना मूर्तस्वरूप देण्याचें कार्य त्यांच्यासाठीं जणूं राखून ठेवण्यांत आलें होतें. अहिंसक युद्धाचें अचूक तंत्र पुढें मांडण्याचें कार्य त्यांनींच केलें. मानवी घटनांच्या ढिगाऱ्यांतून त्यांनीं लोखंडाचा एक गंजका तुकडा उचलून त्यालाच चकचकणाऱ्या पोलादाचा उजळा दिला आणि आज त्या शस्त्रांत एवढी शक्ति सामावलेली आहे कीं अन्याय करणाराला इजा न करतां आणि वापरणाऱ्याचें व ज्याच्याविरुद्ध वापरावयाचें त्या दोघांचेंहि हित साधून तें शस्त्र अन्यायाचा प्रतिकार करूं शकतें.

सत्याग्रहाच्या पूर्वपीठिकेकडे वळण्यापूर्वी त्याचे प्रमुख सिद्धान्त थोडक्यांत सांगणें जरूर आहे.

सत्याग्रह हा प्रेमाचा– सर्वांठायीं प्रेमाचा– सिद्धान्त आहे. इतरांच्याकडे तो आत्मीयतेनें बघतो. हम करेसो कायद्याचें तें अगदीं दुसरें टोंक आहे. सत्याग्रहीचा अखिल जीव मात्र एकस्वरूप आहे. इतर सर्वांनाहि तो स्वतःसारखीच वागणूक देतो. इतरांच्यांत तो स्वतःचें व्यक्तित्व पहात असतो. प्रेम अथवा अहिंसा यांच्या द्वाराच फक्त सत्याग्रही सत्याची साधना करतो. सेवा व त्याग यांच्या योगानें तो सर्वांचें हित साधण्याचा प्रयत्न करतो. प्रेमावर अधिष्ठित झालेला तो त्याचा जीवनधर्मच होय. जर कोणी त्याचा मार्ग रोखून धरील किंवा त्याच्या कर्तव्याचरणांत त्याला अडथळा करील किंवा त्याच्याशीं विसंगत असें जीवन व्यतीत करूं पाहील तर त्याच्या प्रतिकारार्थ दुसऱ्याला क्लेश देण्याऐवजीं तो ते स्वतःवरच ओढवून घेईल. सत्यासाठीं तो स्वतःचे प्राण देखील पाखडील. चूक करणाऱ्या त्याच्या बांधवांच्या हट्टयामुळें त्याला मृत्यु आला तर

त्यांत तो आत्म्याचा शरिरावरील विजयच मानील. असत्यापुढें मान झुकवण्यापेक्षां तो शरीरत्याग करून आत्म्याला मुक्ति देईल. "राज्याच्या लाभासाठीं स्वतःचा आत्मा गमावल्यानें माणसाला काय लाभ होणार !" प्रेमाच्या मार्गानें सत्याची साधना करण्यासाठीं शरीर हें केवळ एक साधन आहे असें तो मानतो. सत्याच्या किंवा अहिंसेच्या मार्गावरून तो रेसमर देखील ढळत नाहीं. त्याला कितीहि यातना सोसाव्या लागल्या तरी तो विरोधकाविषयीं एवढ्याशा देखील कटुभावाला थारा देत नाहीं.

सत्याग्रही छळणूक करणाराबरोबर शरीरबलानें लढत नाहीं अगर विरोध करणार नाहीं, तर हसतमुखानें तो सारें सहन करील. इतकेंच नव्हे तर प्रसंगीं त्याच्या हातून मरण देखील पत्करील. ताकद असूनहि त्याला सूड घेण्याची इच्छा होणार नाहीं. केवळ आपल्या आत्मक्षेत्रानें विरोधकाचें अज्ञान, स्वार्थ व धैर्य लयाला जाईल या अंतिम निष्ठेवर तो विसंबून असतो. विरोधकाला त्याची चूक पटवून देण्याचा एकहि मार्ग तो शिल्लक ठेवणार नाहीं. पण त्याचबरोबर त्याचे अपमान व छळणूक सहन करणें चालूच असतें, व तसें करीत असतांना विरोधकाबद्दल त्याच्या मनांत कमालीचा सद्भाव वसत असतो.

सत्याग्रह ही जीवनाकडे आणि जगाकडे बघण्याची एक वृत्ति आहे. ती एखादी फुटकळ कृति किंवा कृतींची मालिका नाहीं. ती एक जीवनाची घडण आहे. जीवन धारणा करणारी, तें प्रगत करणारी आणि निरनिराळ्या उत्पादक कृति व निर्मिति यांच्या द्वारें आविष्कार पावणारी आणि विकसत शक्तीशीं सुसंगत असें आयुष्य व्यतीत करणारी ती एक प्रेरणा आहे. जीवनाकडे बघण्याची ही वृत्तीच सत्याग्रहीला सत्य प्रसृत व्हावें, न्याय अबाधित रहावा म्हणून झगडण्यास उद्युक्त करते. बुद्धिप्रामाण्य आणि नैतिक मूल्य हेच तेवढे त्याच्या जीवनाचे निकष असतात.

सत्याग्रही कोणाकडे शत्रुत्वाच्या भावनेनें पहात नाहीं. प्रत्येकजण त्याचा मित्र, जोडीदार आणि भाऊ असतो. मनुष्याच्या नैसर्गिक सत्प्रवृत्तीवर त्याचा अढळ विश्वास असतो. आणि तो असें मानतो कीं त्याच्या बांधवांची झालेली नीतिभ्रष्टता अक्षय टिकणारी नाहीं. सत्याग्रही अन्यायाशीं शारीरिक सामर्थ्यानें न झगडतां तो ते धीरानें व हसतमुखानें सहन करतो

आणि अशा तऱ्हेनें अन्याय करणाराच्या हृदयाला जाऊन भिडण्याचा प्रयत्न करतो. अन्याय व अन्याय करणारी व्यक्ति यांत तो भेद करतो. दुःखाचें उच्चाटन करण्याचा प्रयत्न करीत असताना अन्यायाची जाणीव करून देऊन अन्याय करणाऱ्या व्यक्तीला वांचविण्याची तो धडपड करतो. विरोधकांत आपल्या नैतिक बचावाची वृत्ति तो जागृत करतो. तो विरोधकाला असें वाटावयास लावतो कीं आपल्याबद्दल त्याच्या मनांत प्रेम व आदर आहे, व त्यास पीडा देतां कामा नये. अन्याय करणाराला इजा न करतां अन्यायाचा नायनाट कसा करावयाचा हा सत्याग्रहीपुढें मोठा प्रश्न असतो. स्वतः क्लेश भोगून विरोधकाला त्याच्या शारीरिक सुरक्षिततेची ग्वाही देण्यामुळें तो त्याला त्याच्या अन्याय्य वर्तनाचा विचार 'करावयास लावतो. या तऱ्हेनें त्याचा हल्ला विरोधकाच्या मनावर असतो. आणि अन्याय मुळांतच उखडून टाकण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

अनुभवी सत्याग्रहीचे हे मुख्य गुणधर्म होत. ही वर्तणूक सर्व क्षेत्रांत समुदायानें आचरणांत आणण्यास सुरवात केली म्हणजे सत्याग्रहाच्या वैयक्तिक गुणांचें रूपान्तर सामाजिक शक्तींत होतें. आपण गतकालाकडे जरा नजर टाकली तर साधुसंतांत वैयक्तिक सत्याग्रहींचीं पुष्कळ उदाहरणें आढळतात. परंतु संपूर्ण जाणिवेनें सामाजिक शक्ति म्हणून सत्याग्रहाचा अवलंब केल्याचीं उदाहरणें विरळाच. मोठमोठे साधुसंत व धर्मोपदेशक यांच्याकडून वैयक्तिक जीवनांत या प्रवृत्तीचा अवलंब केला गेला. परंतु धार्मिक अशी संज्ञा असलेल्या त्यांच्या जीवनाची सर्वसामान्य व्यक्तीच्या जीवनापासून फारकत झालेली असे. संपत्ति, सत्ता, महत्त्वाकांक्षा, मालकी-हक्क आणि शासन या व असल्या इतर गोष्टी समाविष्ट असलेल्या राजकारण, व्यापारउदीम यांपासून त्यांच्यापैकीं बहुतेकजण अलिप्त रहात व समाजापासून अलग असें जीवन व्यतीत करीत. यामुळें धर्म, राजकारण आणि वेदान्त व व्यवहार यांची फारकत झाली. यामुळेंच धार्मिक जीवनांत एक, तर रोजच्या व्यवहारांत दुसरेंच; व्यक्तिजीवनांत एक, तर राष्ट्रीय किंवा सामाजिक दुसरेंच; खाजगी जीवनांत एक, तर राजकीय जीवनाचें मलतेंच; अशीं दुटप्पी नैतिक मूल्यें समाजांत रूढ झालीं. जीवनाच्या एका क्षेत्रांत जो गुण तो दुसऱ्या क्षेत्रात दुर्गुण ठरूं लागला.

सत्याग्रहाची पूर्वपीठिका



वैयक्तिक व खाजगी जीवनांत सत्य हा गुण ठरला तर राजकारण व मुत्सद्देगिरी यांच्या बाबतींत ती तोट्याची बाब होऊन बसली. एकाद्याचा खून करणें हें खाजगी जीवनांत पाप मानलें गेलें तर लढाईत त्यालाच देशभक्ति म्हणून उदो उदो होऊं लागला. सभ्यता, चांगुलपणा, स्पष्टवक्तेपणा या खाजगी जीवनांतील गुणांवर राष्ट्राराष्ट्रातील किंवा गटांगटांतील परस्परांच्या वर्तणुकीच्या वेळीं नालायकीचा शिक्का बसूं लागला. हा त्याचा दुटप्पीपणा धुवून काढणें हें गांधीजींचें उद्दिष्ट आहे. राजकारण मला आध्यात्मिक बनवावयाचें आहे असें ते म्हणतात त्याचा अर्थ हाच आहे. सत्य या एकाच निकषावर सर्व गोष्टींचें मोल व्हावें व त्या सत्याची स्थापना आत्मक्लेशयुक्त प्रेमानें व्हावी अशी त्यांची इच्छा आहे.

निरनिराळ्या राष्ट्रांतील आख्यायिका व पौराणिक कथांतून सत्याग्रहींची अनेक उदाहरणें आढळतात. आत्मक्लेशाचा मार्ग अनुसरणाऱ्या व्यक्ति पूर्वी होऊन गेल्या आहेत व असल्या बहुतेक उदाहरणांत त्यांनीं आत्मरक्षणासाठीं सविनय प्रतिकार केल्याचे दाखले सांपडतात. त्यानीं आध्यात्मिक जीवनाचा अवलंब करून ऐहिक सुखाबद्दल औदासीन्य पत्करलेलें असतें. त्याच्यापैकीं बहुतेकांनीं जीवनाच्या इतर अंगाचा त्याग केलेला असतो. त्यांची छळणूक होत असतांना ते प्रतिकाराचा आपापला स्वतंत्र मार्ग अवलंबितांना आढळतात. याविषयींचीं अनेक गमतीदार उदाहरणें द्यावयाचीं म्हटलीं तर एक स्वतंत्र ग्रंथच होईल. परंतु ज्यांनीं गांधीजींच्या जीवनावर प्रत्यक्ष परिणाम केला आहे अशांपैकीं एक दोन उदाहरणें मी येथें देणार आहें.

प्रल्हाद आणि हरिश्चंद्र हीं दोन उदाहरणें घेऊं. या दोघांचाहि लहानपणीं गांधीजींच्या मनावर परिणाम घडून आला आहे. त्यांनीं आपल्या भाषणांतून प्रल्हादाचा वारंवार उल्लेख केला असून आपल्या आत्मचरित्रांत असें लिहिलें आहे की हरिश्चंद्र नाटकाचा त्यांच्यावर विलक्षण परिणाम झाला.

प्रल्हाद एक लहान देवभक्त मुलगा होता. त्याचा बाप नास्तिक होता. देवाचें अस्तित्व मानीत नसल्यामुळें त्यानें आपल्या मुलाला देवाचें नांव न घेण्याची ताकीद दिली. परंतु मुलानें आपला क्रम सोडला नाहीं. त्याच्या बापानें त्याचा छळ करण्यास सुरवात केली. मारपीट, जाच आणि इतर कित्येक

क्रूर प्रकार करून झाले परंतु मुलानें रतिमात्र माघार घेतली नाहीं. त्याचा जितका जास्त छळ होई, तितका तो ईश्वरनामाला जास्तच चिकटून बसे. आपल्या बापाला ईश्वराच्या अस्तित्वाची खात्री पटावी म्हणून तो सदैव ईश्वराचा धावा करी. अखेर त्याच्या बापाच्या पापाचा घडा भरल्यावर ईश्वरानें अवतार घेऊन त्या निर्दय बापाला शिक्षा करण्यास सुरवात केली. मुलानें मधें पडून बापाला सोडविलें. नंतर मुलाइतकाच बापहि एकनिष्ठ ईश्वर-भक्त बनला.

हरिश्चंद्र राजाची गोष्ट याहूनहि मनोवेधक आहे. स्वप्नांत एकदां त्यानें विश्वामित्राला आपलें राज्य दिलें. दुसऱ्या दिवशीं राजा आपल्या कांहीं मित्रांना ती हकीगत सांगत होता तोंच स्वप्नांत दिलेलें राज्य मागण्यासाठीं विश्वामित्र तेथें आला. राजा इतका प्रामाणिक होता कीं त्यानें आपलें राज्य त्याला देऊन टाकलें व फक्त अंगावरच्या कपड्यांनिशीं बायकोला व मुलाला बरोबर घेऊन तो राज्य सोडून निघाला. मूर्तिमंत औदार्य अस-लेल्या त्या राजाच्या दुःखाला व कसोटीला सुरवात झाली. विश्वामित्रानें राजाची परीक्षा पाहण्यासाठीं त्याच्याजवळ दक्षिणा मागितली. पण राजा-जवळ कांहींच उरलें नव्हतें त्यानें आपल्या बायकोला मोलकरीणीचें काम करण्यास सांगितलें व स्वतः काशी येथें राजाच्या पदरीं नौकरीस राहिला. त्यानंतर त्या राजकुटुंबानें हंसतमुखानें सोसलेल्या अनेक हालअपेष्टा व एकदां दिलेल्या शब्दाबद्दलची त्यांची आत्यंतिक निष्ठा दाखवणारे अनेक प्रसंग घडले. शेवटीं काशीराजाच्या आज्ञेवरून हरिश्चंद्र आपल्या बायकोचें डोकें उडवणार इतक्यांत विश्वामित्र प्रकट झाले. हरिश्चंद्राचा हात मागच्या-मागें धरून ते म्हणाले, "हे राजा, तिन्ही लोकांत तुझ्याइतका श्रेष्ठ कोणीहि नाहीं. सर्व मनुष्यमात्रांत तूंच सर्वांत प्रामाणिक आहेस." नाटक पाहिल्यानंतर गांधीजींना वाटलें सगळेजण हरिश्चंद्रासारखे प्रामाणिक कां असूं नयेत ?

आपण ऐतिहासिक कालाकडे वळलों म्हणजे आपणाला बुद्ध आणि महावीर या व्यक्ति आढळतात. त्या दोघांनींहि धर्मतत्त्व म्हणून अहिंसेची शिकवण दिली. नंतर आपण जीझस क्राइस्टकडे येतो. सॉक्रेटिसाचेंहि उदाहरण आहेच. हाफीज व सरमद या सुफीपंथीय महान् साधूंचीं नांवेंहि

आपण ऐकतों. नंदनार, तुकाराम, कनकदास हे आपल्या परिचयाचें आहेतच. यांपैकीं प्रत्येकाच्या आयुष्यांत सत्याग्रही वृत्तीचीं व्यक्तिगत उदाहरणें आढळतात. छळ करणाराबद्दल कसलीहि अप्रीति न बाळगतां सॉक्रेटिमानें विषाचा प्याला तोंडाला लावला. अथेन्सच्या तरुणांचीं मनें बिघडवण्याचा त्याच्यावर आरोप होता. तुकारामाचा त्याच्या आजूबाजूच्या लोकांनीं अनेकप्रकारें छळ केला. पण त्यानें त्याविरुद्ध ब्र देखील काढला नाहीं. दुसऱ्या एका साधूची अशी एक गोष्ट सांगतात कीं त्याच्या अंगावर वीस वेळा लोक थुंकले पण प्रत्येक वेळीं रागाचा एकहि शब्द न उच्चारतां तो परत नदीवर जाऊन स्नान करून येई. थुंकणारे नंतर थकून गेले आणि एकविसाव्या खेपेला त्याच्या कोणी वाटेस गेलें नाहीं. हलक्या जातीचा मनुष्य म्हणून कनकदासाला ज्या वेळीं दर्शनासाठीं उडपी देवालयाच्या गाभाऱ्यांत जाऊं दिलें नाहीं त्या वेळीं तो देवळाच्या एका बाजूला ईश्वराची प्रार्थना करीत बसला. असें सांगतात कीं, एक दिवस सकाळीं देवानें आपलें तोंड कनकदासाच्या दिशेला वळवलेलें पाहून पुजारी आश्चर्यानें स्तिमित होऊन गेले. नंतर त्या बाजूच्या भिंतीला एक खिडकी पाडण्यांत आली आणि आजहि ती 'कनकाची खिंड' म्हणून ओळखली जाते. जीझसचें बलिदान सर्वश्रुतच आहे. या सर्व उदाहरणांत शरीर हें केवळ अमर आत्म्याचें एक नश्वर साधन म्हणून मानण्यांत आलें आहे. आत्म्याचें व्यक्त स्वरूप असणाऱ्या सत्याच्या रक्षणापेक्षा दुसऱ्या कोणत्या कारणासाठीं शरीराचा उपयोग होणें शक्य आहे ? आणि सत्य म्हणजे तरी आपला हृदयस्थ जीव जें पहातो व ज्यावर अत्यंत निष्ठेनें व निश्चयानें विश्वास ठेवतो त्यापरतें दुसरें काय आहे ?

सर्व धर्मांनीं अहिंसा, जीवमात्राला इजा न करणें, निरुपद्रवीपणा, निष्कपटता किंवा प्रेम यांचा जोरानें पुरस्कार केला आहे. 'अहिंसा परमो धर्मः' म्हणजे अहिंसा हाच सर्वांत मोठा धर्म किंवा सर्वांत मोठें कर्तव्य होय हें जैन व बुद्ध धर्माचें मुख्य तत्त्व आहे. तें तसेंच अभंग ठेवून हिंदुधर्म पुढें म्हणतो, 'सत्यान्नास्ति परो धर्मः'। म्हणजे कोणताहि धर्म किंवा कर्तव्य सत्यापेक्षां श्रेष्ठ नाहीं. अशा तऱ्हेनें सत्य किंवा अहिंसा हीं हिंदु धर्माचीं मुख्य सूत्रें आहेत. प्रेम किंवा अहिंसा यांपेक्षां सत्याला जास्त महत्त्व

कां असा प्रश्न गांधीजींना एकदां विचारण्यांत आला असतां त्यांनीं असें निश्चित उत्तर दिलें कीं अखेर सत्य हें सर्वांहून श्रेष्ठ आहे. सत्यांत सर्व अंतर्भूत असून तें सर्वातीत आहे. इस्लाम याचा अर्थ देखील शांति असाच आहे. तो सर्वांभूतीं शांति वसावी असें प्रतिपादणारा धर्म आहे. प्रेमभाव असल्याखेरीज शांतता असणें शक्य नाहीं.

सॉक्रेटिसाच्या अखेरच्या कृत्याप्रमाणेंच क्राइस्टचें सुळीं जाणें हें देखील सत्यासाठीं केलेल्या बलिदानाचें दिव्य उदाहरण आहे. जीझसच्या आयुष्यांत सत्याग्रहतत्त्व जास्त निश्चित व सुस्पष्ट झाल्याचें दिसून येतें. 'सरमन ऑन द माउंट'मधील अन्यायाचा प्रतिकार (अन्यायानें) करूं नका हें व यासारखीं वाक्यें सत्याग्रहानें सूचित केल्या जाणाऱ्या जीवनक्रमावर प्रकाश पाडतात. आज सत्याग्रह या शब्दाला त्यापेक्षां फार व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे. शतकानुशतकें तो शब्द विकास पावत आला असून गांधीजींनीं त्याचें पूर्ण रूप प्रकट केलें. बुद्ध आणि क्राइस्ट या दोघांनींहि आपल्या आयुष्यांत अहिंसातत्त्वाचा अवलंब केला व लोकांनाहि त्याप्रमाणें वागण्याचा आदेश दिला. परंतु राजकीय किंवा आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठीं त्यांनीं सत्याग्रहाचा अवलंब केल्याचे दाखले उपलब्ध नाहींत.

सत्याग्रहाची उत्पत्ति : : ३

आतां आपणांस या जीवनपद्धतीच्या उगमाचा शोध करावयाचा असून कोणत्या कारणांमुळें व संस्कारांमुळें गांधीजींनीं त्याला सुधारणा घडवून आणणाऱ्या शस्त्राचें स्वरूप दिलें तें पहावयाचें आहे.

जीवनाकडे बघण्याच्या या वृत्तीचा उगम माया, प्रीति आणि सतत सहवास हीं बंधनें असलेल्या कौटुंबिक क्षेत्रांत शोधला पाहिजे. द्वेष, विनाश आणि भीति यांना कौटुंबिक जीवनांत स्थान नसतें. द्वेष हा सरसहा नाश

करीत जाणाऱ्या एखाद्या वादळाप्रमाणें आहे. ती एक अंधशक्ति आहे. तारतम्य नसलेली एखादी भडकती ज्वालाच जणूं ! प्रेम, परस्परप्रीति आणि आदर हे कौटुंबिक जीवनाचे आधारस्तंभ आहेत. प्रेम म्हणजे दुसऱ्याकडे आत्मदृष्टीनें पाहणें. आपलें आपणावर अत्यंत प्रेम असतें. आपण इतर सर्व व्यक्तींकडे आत्मभूतीनें पाहूं लागलों आणि स्वतःपेक्षां दुसऱ्यावर अधिक प्रेम करूं लागलों तर तो प्रेमाचा कळस होईल. सेवेच्या प्रत्यक्ष कार्याच्या रूपानें प्रेम व्यक्त झालें नाहीं तर तें फुकट आहे. प्रेमाचें साफल्य कृतींतच असूं शकतें. ज्यांच्याबद्दल प्रेम वाटतें त्यांच्यासाठीं सेवेनें आणि त्यागानें आत्मसमर्पण करणें यांतच प्रेमाची सफलता आहे.

आदर्श कौटुंबिक जीवनांत पाळलीं जाणारीं तत्वें सर्व मानवी संबंधांना लागू करणें हीच सत्याग्रहीची जीवनप्रवृत्ति होय. म्हणून लोकांनीं तुमच्याशीं जसें वागावें असें तुम्हांस वाटतें तसेच तुम्ही त्यांच्याशीं वागा कारण हाच धर्म असून प्रेषितांची शिकवणहि तीच आहे असें बायबलांत सांगितलें आहे. गांधीजींनीं म्हटलें आहे कीं कौटुंबिक जीवनांतच ते सत्याग्रहाचा धडा शिकले. ते जसजसे मोठे होत गेले तसतसे ते जगाकडे एक मोठें कुटुंब म्हणून पाहूं लागले आणि अखेरीस त्यांची वृत्ति 'वसुधैव कुटुंबकम्' झाली. वस्तुतः गांधीजी याहिपुढें जातात. केवळ मानवी प्राणीच नव्हे तर सर्व जीवमात्र त्यांना पवित्र वाटतो. आणि प्रत्येक जिवंत प्राणी ते आपला आत्मसंबंधी समजतात.

प्रेमावर आधारलेल्या या संबंधाची उत्पत्ति सर्व जीवनाशीं समरस होण्याचा उपजत व गूढ अनुभूतींत आढळते. गांधीजी म्हणतात, 'जो आपल्या विरोधकाशीं एकरूप होऊं शकतो त्यालाच काय ते त्याचे तडाखे पुष्पवृष्टीप्रमाणें झेलणें साधेल.' अशा तऱ्हेचा एकरूपतेची उत्कट अनुभूति झाल्याखेरीज खून करण्यासाठीं निघालेल्याला खून करीत असतांना साप चावला तर त्याच्या दंशांतील विष मी चोखून घेईन असें एखाद्याला कसें म्हणतां येईल ? या एकरूपतेच्या जाणिवेचा अनुभव आकलन न होण्यासारखा नाहीं. आज भौतिक विज्ञानेंहि या निर्णयाला आलीं आहेत कीं सर्व जड पदार्थांत एकच आदिशक्ति वास करीत असते व तीच विविधरूपांनीं नटलेली आढळते. अल्डुस हक्स्लेच्या शब्दांत सांगावयाचें तर

एकाच पदार्थाच्या भिन्न भिन्न स्वरूपांनीं जड विश्व बनलेलें आहे.” सर्व-साधारण जड वस्तूंच्या बाबतींत जर हा नियम लागू आहे तर सूक्ष्म गोष्टींना तो जास्तच लागू पडत असणार. सर्व जीवमात्र, सर्व चेतना, सर्व चित्‌शक्ति ही एकच आहे अशी प्रचीति ज्याला झालेली आहे त्याला ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट वाटते. आपल्या अनुभूतीकडे लोक कोणत्या नजरेनें पाहतात इकडे त्याचें लक्ष नसतें. या अनुभूतींतच आपणांस प्रेमाचा उगम सांपडतो. एकदा दुसऱ्याच्या ठिकाणीं आत्मीयता निर्माण झाली म्हणजे त्याच्याबद्दलचें प्रेम आलेंच; त्याखेरीज गति नाहीं. आपलें रक्तसंबंधी म्हणजेच काय ते आपलें कुटुंब असें सत्याग्रही समजत नाहीं. सबंध जग हें माझें कुटुंब आहे असें ज्या वेळीं गांधीजी म्हणतात त्या वेळीं ती नुसतीच अलंकारिक भाषा नसते. त्यांची ती खरीच भावना असते. व त्यांना तशी गाढ अनुभूति झालेली असते. ते त्या अनुभूतींतच वावरत असतात आणि त्यांच्या नसानसांतून ती उल्हसित भावना खेळत असते.

प्रेम आणि औदार्य या तत्त्वानुसार आचरण करणाऱ्या सगळ्या संतांची किंवा सत्याग्रहींची कोठल्याहि स्वरूपांतील विरोधाविषयींची व्यक्तिगत प्रतिक्रिया एकच होती. गांधीजींचें वैशिष्ट्य हें आहे कीं त्यांनीं हें कौटुंबिक हत्यार उचलून जीवनांतील सर्व समस्यांसाठीं त्यांचा अवलंब केला. ते एवढेंच म्हणतात, “थेट कौटुंबिक क्षेत्रासारखाच राजकीय क्षेत्रांतहि सत्याग्रहाचा उपयोग करतां येईल.” एवढेंच नव्हे तर ते पुढें जाऊन असेंहि म्हणतात कीं कौटुंबिक क्षेत्रांत जो अयशस्वी ठरला असेल त्यानें जर फक्त राजकीय व सामाजिक क्षेत्रांत त्याचा अवलंब करण्याचा प्रयत्न केला तर तो कधींहि यशस्वी होणार नाहीं. एका क्षेत्रांत आपल्या पदरीं पराभव आला तर दुसऱ्या क्षेत्रांत यश मिळणें केवळ असंभाव्य आहे.

आतां या महान् मार्गाचा प्रारंभ कसा झाला आणि सत्याग्रहाचा आदर्श समजल्या जाणाऱ्या गांधीजींच्या आयुष्यांत त्याची वाढ कशी होत गेली तें पाहूं.

गांधीजी सत्याग्रह हा एक जीवनपथ आहे असें मानतात. केवळ शस्त्र म्हणून ते त्याकडे बघत नाहींत. प्रेमाच्या द्वारा ते धरीत असलेला सत्याचा आग्रह वगळला तर त्यांचें आयुष्य निःसार भासेल. परंतु ज्यामुळें त्याला

सामाजिक शक्तीचें स्वरूप प्राप्त होतें तेवढ्याच सत्याग्रहाच्या पैलूवर मी या ठिकाणीं भर देणार आहें. अनेक महान् तत्त्वांच्या धाडसी आणि निर्भय आचरणामुळें गांधीजींचें आयुष्य असामान्य ठरलें आहे. ते श्रेष्ठ दर्जाचे कर्मयोगी आहेत आणि म्हणूनच सत्य, प्रेम व अहिंसा या दिव्य तत्त्वांचा त्यांनीं राजकीय, आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांच्या बाबतींत अंगीकार करण्याचा प्रयत्न केला आहे. अन्यथा हीं तत्त्वें फक्त कांहीं व्यक्तींच्याच उपयोगाचीं आहेत असें समजलें जात असे. त्यांच्या या अपूर्व प्रयत्नामुळें त्यांनीं सगळा दुटप्पीपणा आणि गुप्तता नाहींशी करून मूल्यांचा एकच निकष सगळीकडे रूढ व्हावा असा प्रयत्न चालविला आहे. त्यांच्या मार्गात कोठल्याहि प्रकारची उडवाउडवी किंवा दुटप्पीपणा यांना कसलेंहि स्थान नाहीं. त्यांच्या मतें जीवन अविभाज्य आहे. वैयक्तिक जीवन आणि सामाजिक जीवन, धर्म आणि राजकारण, वैयक्तिक गुण आणि सार्वजनिक सद्गुण यांकडे निरनिराळ्या दृष्टिकोणांतून पाहतां कामा नये. ईश्वराशीं जर खोटेपणा करावयाचा नसेल तर तो कोणाशींच करतां येणार नाहीं. अशा तऱ्हेनें त्यांनीं अनेक रूढ समजुतींना जोराचे धक्के देऊन समाजाला नवीन तऱ्हेनें विचार करावयास लावलें. सत्याबद्दलच्या त्यांच्या आग्रहामुळेंच ते हें करूं शकले. त्यांचें सबंध आयुष्य म्हणजे सत्यासाठीं घरलेल्या आग्रहाबद्दलचा एक प्रयोग आहे. व तो एकसारखा विकास पावत आहे. त्यांच्या सत्याबद्दल त्यांना अभिनिवेश नसतो. आपले प्रयोग नियमबद्ध केले जावेत, किंवा त्यांना सांप्रदायिकतेचें स्वरूप यावें असें त्यांना वाटत नाहीं. सत्य हें कांटेकोर स्वरूपांत जखडलें जात नाहीं. तें जीवनाबरोबर वहात असतें. आणि जीवन त्यावर तरंगत असतें. गांधीजींची इच्छा अशी आहे कीं प्रत्येक माणसानें आपलें सत्य हुडकून काढावें व कितीहि जबर किंमत द्यावी लागली तरी त्याचाच अवलंब करावा.

गांधीजींची सत्याबद्दलची उत्कटता नैसर्गिक आहे. खोटेपणाचा त्यांच्या बाबतींत प्रश्नच नव्हता. त्यामुळें ते अनेक अडचणींच्या प्रसंगांतून बचावले असून त्यांना सत्याग्रहाचा अतुलनीय मार्ग आढळला आहे. ते लिहितात, "एक तत्त्व माझ्या मनांत रुजलें आहे. तें म्हणजे नीतिमत्ता हा सर्व

गोष्टींचा पाया आहे. आणि सत्य हें नीतिमत्तेचें सार आहे. अशा तऱ्हेनें सत्य हें माझें एकमेव उद्दिष्ट बनलें आहे.” लवकरच त्यांना असें आढळून आलें कीं, सत्य हिंसा कधींहि मान्य करूं शकत नाहीं. सहानुभूति आणि सहनशीलता यांच्या योगानें विरोधकाला जिंकून घेतलें पाहिजे. सहनशीलता म्हटली कीं आत्मक्लेश आलेच.

लहानपणाच्या त्यांच्या सत्यावरील प्रेमानेंच त्यांना मांसाहारापासून परावृत्त केलें, व वडिलांजवळ चोरीची कबुली देण्यास भाग पाडलें. इंग्लंडांत दारू व परस्त्री यांच्यापासून सत्यावरील प्रेमानेंच त्यांचा बचाव केला. सत्याचरण करणें हीच त्यांची प्रतिज्ञा होती.

यालाच त्यांच्या प्रेमावरील निष्ठेची म्हणजेच अहिंसेची जोड मिळाली. गांधीजींचे अगदीं सुरवातीचे एक चरित्रकार श्री. जोसेफ डोक यांनीं या सुरवातीच्या काळांत देखील गांधीजींच्या मनोव्यापारांवर चांगला प्रकाश पाडला आहे. त्यांनीं गांधीजींना असा प्रश्न विचारला कीं, अनत्याचारी प्रतिकाराची कल्पना त्यांना कशी सुचली? त्या वेळीं गांधीजी म्हणाले, “(शामल भट यांच्या) गुजराथी कवितेंतील एक कडवें (जें मी लहान असतांना शाळेंत शिकलों) माझ्या मनांत कसें घर करून राहिलें याची मला आठवण होते. त्याचा थोडक्यांत सारांश असा: ‘जर तुम्हांला एखाद्यानें पिण्यासाठीं पाणी दिलें आणि तुम्हीं त्याची परतफेड पिण्याच्या पाण्यानेंच केलीत तर त्याला कांहींच महत्त्व नाहीं. अपकाराविरुद्ध उपकार करणें यांतच खरें सौंदर्य सामावलेलें आहे.’ मी लहान असतांना या कवितेनें माझ्यावर फार मोठा परिणाम केला आणि मी ती शिकवण आचरणांत आणण्यासाठीं झटूं लागलों. त्यानंतर ‘सरमन ऑन् द माउंट’ हा बायबलमंतील भाग माझ्या पहाण्यांत आला.

ते (श्री. डोक) म्हणाले, “परंतु भगवद्गीता त्या आधींची ना?”

“नाहीं.” गांधीजींनीं उत्तर दिलें. “अर्थात् संस्कृतमधून मला भगवद्गीता बऱ्याच चांगल्या तऱ्हेनें म्हणतां येत असे. परंतु तिच्यांतील शिकवणीचा मी त्या दृष्टीनें अभ्यास केलेला नव्हता. खरें पहातां नव्या करारामुळेंच मला अनत्याचारी प्रतिकाराची अचूकता व महत्त्व पटलें. ‘जो जुलमी असेल त्याचा प्रतिकार करूं नका. उलट जो तुमच्या उजव्या

गालावर मारील त्याच्यापुढें दुसराहि गाल करा.' आणि 'तुमच्या शत्रूवर प्रेम करा आणि तुमच्यावर प्रभूची कृपा व्हावी म्हणून तुमचा छळ करणाऱ्याचें कल्याण व्हावें अशी प्रार्थना करा.' अशांसारखीं वाक्यें त्या वेळीं मीं 'सरमन ऑन् द माउंट'मध्यें वाचलीं व मला विलक्षण आनंद झाला. आणि ज्या ठिकाणीं यत्किंचितहि अपेक्षा नव्हती अशा ठिकाणांहून माझ्या मतांना पुष्टि मिळाल्याचें मला आढळून आलें. हा परिणाम भगवद्गीतेनें दृढतर झाला आणि टॉलस्टॉयच्या 'तुमच्या अंतःकरणांतच ईश्वरी साम्राज्य वसत आहे' या पुस्तकानें त्याला कायमचें स्वरूप प्राप्त झालें." श्री. डोक पुढें लिहितात कीं, काउंट टॉलस्टॉयचा गांधीजींच्या मनावर निर्विवादपणें अत्यंत परिणाम घडला.

सत्याग्रहाच्या मार्गाकडे त्यांचें मन वळविण्याच्या बाबतींतील महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे कस्तुरबांची त्यांच्याबरोबरची वर्तणूक ही होय. गांधीजी म्हणतात, " मी माझ्या पत्नीकडून अहिंसेचा (सत्याग्रहाचा) धडा शिकलों. मीं तिला माझ्या इच्छेपुढें वाकविण्याचा प्रयत्न केला. एका बाजूला माझ्या इच्छेचा खंबीरपणानें तिनें केलेला प्रतिकार आणि दुसऱ्या बाजूला माझ्या मूर्खपणाकरतां तिनें सोसलेले मूक क्लेश यांमुळें अखेरीस माझी मलाच लाज वाटूं लागली आणि तिच्यावर सत्ता गाजविण्यासाठींच माझा जन्म आहे या माझ्या विचारसरणींतील वेडगळपणा माझ्या ध्यानांत आला. शेवटीं अहिंसेच्या बाबतींत ती माझी गुरु बनली आणि तिनें स्वतःच्या बाबतींत अजाणतां उपयोगांत आणलेल्या सत्याग्रहाच्या नियमांचा विस्तारच काय तो मीं दक्षिण आफ्रिकेंत केला."

एकदां गांधीजींच्या मनांत हें विचारबीज रुजल्याबरोबर त्याला अंकुर फुटूं लागले. दक्षिण आफ्रिकेंतील मॉरिट्सबर्ग, पार्डेबर्ग, जोहान्सबर्ग, प्रिटोरिया आणि दरबान या ठिकाणीं त्यांना आलेल्या वैयक्तिक अनुभवामुळें सत्याग्रहाच्या मार्गावर त्यांची प्रगति होत गेली आणि त्या देशांत सामुदायिक चळवळ चालवण्यास ते समर्थ बनले.

पार्डेबर्ग येथील १८९३ मधील प्रसंग अभ्यसनीय आहे. सत्याग्रहांतील विचारसरणींतील सर्व तत्त्वें त्यांत अंतर्भूत झालेलीं आहेत.

सत्य त्यांच्या बाजूला होतें. स्वतः शेवटपर्यंत क्लेश सहन करण्याचीं आणि विरोधकाला दुःख देण्याऐवजीं त्याचें मन वळविण्याची त्यांची तयारी होती. प्रेमभावानें त्याचा राग जिंकून घेण्याची त्यांची इच्छा होती. त्याचें वाईट चिंतण्याचा विचार देखील त्यांच्या मनांत आला नव्हता. आणि संधि व शक्यता असूनहि त्यांनीं त्याचा सूड घेतला नाहीं.

ते ज्या वेळीं १८९६ मध्यें हिंदुस्तानाहून दक्षिण आफ्रिकेस परत गेले त्या वेळीं बंदरावर त्यांना मारण्यासाठीं खवळलेल्या युरोपीयनांचा जमाव जमला होता. गांधीजी ज्या कूर्लेंड नांवाच्या जहाजांतून प्रवास करीत होते त्याच्या कप्तानानें त्यांना विचारलें, "आतां तुमच्या अहिंसेचें काय होणार?" त्यावर त्यांनीं लगेच उत्तर दिलें, "मला आशा आहे कीं ईश्वर मला धैर्य व क्षमा करण्याची बुद्धि देऊन त्याना कायद्यापुढें खेचण्यापासून मला परावृत्त करील. माझा त्यांच्यावर राग नाहीं; मला फक्त त्याच्या संकुचित वृत्तीबद्दल खेद होतो." हें उत्तर एखाद्या आदर्श सत्याग्रहीला साजेसें आहे. अन्यायाचा अनत्याचारानें प्रतिकार करणें एवढेंच गांधीजींचें ध्येय नाहीं, तर अपकाराची फेड उपकारानें करण्याच्या त्यांच्या दृढ व कार्यक्षम प्रवृत्तीची त्याला जोड मिळालेली आहे. श्री. डोक यांनीं आपल्या चरित्रांत गांधीजींचे उद्‌गार दिले आहेत: "मला 'निःशस्त्र प्रतिकार' हा शब्दप्रयोग पसंत नाहीं. माझ्या मनांतील सर्व अर्थ त्यानें व्यक्त होऊं शकत नाहीं. त्या शब्दानें त्या मार्गाचें वर्णन झालें तरी ज्या विचारप्रणालीचा तो केवळ एक भाग आहे, त्याची पूर्ण कल्पना त्या शब्दप्रयोगामुळें येत नाहीं. खरें सौंदर्य – आणि तेंच माझें ध्येय आहे – दुःख देणाराचें मलें करण्यांतच आहे. तरी देखील मी तोच शब्दप्रयोग वापरतों. (तोंपर्यंत गांधीजींनीं सत्याग्रह शब्द वापरण्यास सुरवात केली नव्हती.) कारण रूढ झाल्यामुळें तो सर्वांच्या परिचयाचा आहे. आणि आजच्या घटकेला माझ्या अनुयायांतील बहुतेकांना तेवढेंच आकलन करतां येईल. माझ्या स्वतःच्या मतें (शामल भट यांची) गुजराथी कविता आणि 'सरमन ऑन् द माउंट' यांतील मध्यवर्ती कल्पना सबंध जीवनांत क्रांति घडवून आणण्यास पुरेशी आहे."

परिस्थिति तशीच राहिली असती तर गांधीजी एक महान् संतच तेवढे

राहिले असते. पण नाहीं. त्यांनीं घाडसानें पावलें टाकलीं. सामुदायिक प्रमाणावर त्यांनीं सत्याग्रहाचा उपयोग केला. यापुढें तो केवळ अपवादात्मक व्यक्तीपुरताच मर्यादित राहिला नाहीं. ते म्हणाले कीं प्रत्येक स्त्री-पुरुषाजवळ आध्यात्मिक शक्तीचा सांठा असतो. प्रत्येकापाशीं असलेल्या संपत्तीची किल्ली त्यांनीं सर्वांना दाखवून दिली. माणूस म्हणजे कोणत्याहि वाटेवरच्या जुलमी अधिकाऱ्यांच्या आहारीं जाणारा संवेदनाक्षम असा नुसता मांसाचा गोळा नव्हे. त्याच्या शरीरांत आत्मा वास करीत असतो. "सत्याग्रहीच्या शरीरावर आणि भौतिक संपत्तीवर जुलमी अधिकारी सत्ता चालवूं शकेल पण त्याच्या आत्म्यावर तो कधींहि चालवितां येणार नाहीं. या मूलभूत सत्याच्या जाणीवेंतूनच सत्याग्रहशास्त्र उदित झालें आहे" असें गांधीजींनीं लिहिलें आहे. त्यांनीं असें जाहीर केलें कीं, प्रत्येक पुरुषाला, स्त्रीला आणि मुलाला सत्याग्रहाचा अवलंब करतां येईल. म्हातारे आणि तरुण, गरीब आणि श्रीमंत सारेच सत्याग्रही होऊं शकतील. त्यांनीं फक्त आपली मानसिक तयारी केली पाहिजे. स्वतःपाशीं असलेल्या शक्तीची जाणीव करून घेतली पाहिजे. त्यांनीं तसें करण्याचा अवकाश कीं ते प्रत्यक्ष सैतानाला देखील तोंड देऊं शकतील. ते नेहमीं म्हणतात, "जें मी करूं शकतों तें प्रत्येकाला करतां आलें पाहिजे. त्यांनीं लोकांना स्वतःच्या आंतरिक शक्तीची जाणीव दिली. लोक खिन्न आणि हताश झाले होते. सशस्त्र शक्तीपुढें त्यांना कमालीची असहायता वाटत होती. परंतु भेदक डोळ्यांचा मानवी स्वभावाचा अचूक अंदाज असलेला, ईश्वरावर विश्वास टाकणारा आणि दुर्दम्य इच्छाशक्ति असलेला एक किरकोळ दिसणारा माणूस पुढें येऊन म्हणाला, "तुम्ही दुर्बल नाहीं. निर्भयपणानें शत्रूला तोंड द्याल तर त्यांच्या संगिनी बोथट करून टाकाल. बंदुकांचे आवाज बंद पाडूं शकाल." आणि तसेंच घडून आलें.

अनत्याचारी प्रतिकाराविषयीं लिहितांना श्री. डोक म्हणतात, "अन्यायाचा प्रतिकार करण्याचें साधन म्हणून अनत्याचाराची कल्पना हिंदी तत्त्वज्ञानांत अनुस्यूतच आहे. पुरातनकाळीं त्याला धरणें धरून बसणें असें म्हणत. कांहीं वेळीं सबंध समाज राजाविरुद्ध त्या मार्गाचा अवलंब करी. पोरबंदरच्या इतिहासांत असाच प्रकार घडला आहे. त्या ठिकाणीं व्यापार

गोष्टींचा पाया आहे. आणि सत्य हें नीतिमत्तेचें सार आहे. अशा तऱ्हेनें सत्य हें माझें एकमेव उद्दिष्ट बनलें आहे.” लवकरच त्यांना असें आढळून आलें कीं, सत्य हिंसा कधींहि मान्य करूं शकत नाहीं. सहानुभूति आणि सहनशीलता यांच्या योगानें विरोधकाला जिंकून घेतलें पाहिजे. सहनशीलता म्हटली कीं आत्मक्लेश आलेच.

लहानपणाच्या त्यांच्या सत्यावरील प्रेमानेंच त्यांना मांसाहारापासून परावृत्त केलें, व वडिलांजवळ चोरीची कबुली देण्यास भाग पाडलें. इंग्लंडांत दारू व परस्त्री यांच्यापासून सत्यावरील प्रेमानेंच त्यांचा बचाव केला. सत्याचरण करणें हीच त्यांची प्रतिज्ञा होती.

यालाच त्यांच्या प्रेमावरील निष्ठेची म्हणजेच अहिंसेची जोड मिळाली. गांधीजींचे अगदीं सुरवातीचे एक चरित्रकार श्री. जोसेफ डोक यांनीं या सुरवातीच्या काळांत देखील गांधीजींच्या मनोव्यापारांवर चांगला प्रकाश पाडला आहे. त्यांनीं गांधीजींना असा प्रश्न विचारला कीं, अनत्याचारी प्रतिकाराची कल्पना त्यांना कशी सुचली? त्या वेळीं गांधीजी म्हणाले, “(शामल भट यांच्या) गुजराथी कवितेंतील एक कडवें (जें मी लहान असतांना शाळेंत शिकलों) माझ्या मनांत कसें घर करून राहिलें याची मला आठवण होते. त्याचा थोडक्यांत सारांश असा: ‘जर तुम्हांला एखाद्यानें पिण्यासाठीं पाणी दिलें आणि तुम्हीं त्याची परतफेड पिण्याच्या पाण्यानेंच केलीत तर त्याला कांहींच महत्त्व नाहीं. अपकाराविरुद्ध उपकार करणें यांतच खरें सौंदर्य सामावलेलें आहे.’ मी लहान असतांना या कवितेनें माझ्यावर फार मोठा परिणाम केला आणि मी ती शिकवण आचरणांत आणण्यासाठीं झटूं लागलों. त्यानंतर ‘सरमन ऑन् द माउंट’ हा बायबलमधील भाग माझ्या पहाण्यांत आला.

ते (श्री. डोक) म्हणाले, “परंतु भगवद्गीता त्या आधींची ना!”

“नाहीं.” गांधीजींनीं उत्तर दिलें. “अर्थात् संस्कृतमधून मला भगवद्गीता बऱ्याच चांगल्या तऱ्हेनें म्हणतां येत असे. परंतु तिच्यांतील शिकवणीचा मी त्या दृष्टीनें अभ्यास केलेला नव्हता. खरें पहातां नव्या करारामुळेंच मला अनत्याचारी प्रतिकाराची अचूकता व महत्त्व पटलें. ‘जो जुलमी असेल त्याचा प्रतिकार करूं नका. उलट जो तुमच्या उजव्या

गालावर मारील त्याच्यापुढें दुसराहि गाल करा.' आणि 'तुमच्या शत्रूवर प्रेम करा आणि तुमच्यावर प्रभूची कृपा व्हावी म्हणून तुमचा छळ करणाऱ्याचें कल्याण व्हावें अशी प्रार्थना करा.' अशांसारखीं वाक्यें त्या वेळीं मीं 'सरमन ऑन् द माउंट'मध्यें वाचलीं व मला विलक्षण आनंद झाला. आणि ज्या ठिकाणीं यत्किंचितहि अपेक्षा नव्हती अशा ठिकाणांहून माझ्या मतांना पुष्टि मिळाल्याचें मला आढळून आलें. हा परिणाम भगवद्गीतेनें दृढतर झाला आणि टॉलस्टॉयच्या 'तुमच्या अंतःकरणांतच ईश्वरी साम्राज्य वसत आहे' या पुस्तकानें त्याला कायमचें स्वरूप प्राप्त झालें." श्री. डोक पुढें लिहितात कीं, काउंट टॉलस्टॉयचा गांधीजींच्या मनावर निर्विवादपणें अत्यंत परिणाम घडला.

सत्याग्रहाच्या मार्गाकडे त्यांचें मन वळविण्याच्या बाबतींतील महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे कस्तुरबांची त्यांच्याबरोबरची वर्तणूक ही होय. गांधीजी म्हणतात, " मी माझ्या पत्नीकडून अहिंसेचा (सत्याग्रहाचा) धडा शिकलों. मीं तिला माझ्या इच्छेपुढें वाकविण्याचा प्रयत्न केला. एका बाजूला माझ्या इच्छेचा खंबीरपणानें तिनें केलेला प्रतिकार आणि दुसऱ्या बाजूला माझ्या मूर्खपणाकरतां तिनें सोसलेले मूक क्लेश यांमुळें अखेरीस माझी मलाच लाज वाटूं लागली आणि तिच्यावर सत्ता गाजविण्यासाठींच माझा जन्म आहे या माझ्या विचारसरणींतील वेडगळपणा माझ्या ध्यानांत आला. शेवटीं अहिंसेच्या बाबतींत ती माझी गुरु बनली आणि तिनें स्वतःच्या बाबतींत अजाणतां उपयोगांत आणलेल्या सत्याग्रहाच्या नियमांचा विस्तारच काय तो मीं दक्षिण आफ्रिकेंत केला."

एकदां गांधीजींच्या मनांत हें विचारबीज रुजल्याबरोबर त्याला अंकुर फुटूं लागले. दक्षिण आफ्रिकेंतील मॉरिट्सबर्ग, पार्डेबर्ग, जोहान्सबर्ग, प्रिटोरिया आणि दरबान या ठिकाणीं त्यांना आलेल्या वैयक्तिक अनुभवामुळें सत्याग्रहाच्या मार्गावर त्यांची प्रगति होत गेली आणि त्या देशांत सामुदायिक चळवळ चालवण्यास ते समर्थ बनले.

पार्डेबर्ग येथील १८९३ मधील प्रसंग अभ्यसनीय आहे. सत्याग्रहांतील विचारसरणींतील सर्व तत्त्वें त्यांत अंतर्भूत झालेलीं आहेत.

बंद पडला व अनत्याचारी प्रतिकाराच्या शक्तीपुढें राजसत्तेचा टिकाव लागला नाहीं."

"यासंबंधीं बिशप हेबर यानें बऱ्याच वर्षांपूर्वी आपल्या डायरींत लिहून ठेवलें आहे. धरणें धरून बसणें म्हणजे ज्याच्यापाशीं धरणें धरलें असेल तो आपली विनंति मान्य करीपर्यंत त्याच आसनांत हालचाल न करतां उपाशी उघड्यावर बसून रहावयाचें. आणि हिंदूंची अशी समजूत आहे कीं असें धरणें धरून बसलें असतांना जर कोणाला मरण आलें तर त्याचें भूत होऊन तें दुराग्रही प्रतिपक्षाला पछाडतें व त्याला त्रास देतें." परंतु श्री. डोक म्हणतात कीं हिंदी लोक या कल्पनेशीं परिचित असल्यामुळें ट्रान्सवालमध्यें त्यांनीं तिचा त्या मानानें बऱ्याच तत्परतेनें स्वीकार केला. श्री. गांधी या तत्त्वाची उत्पत्ति व वाढ यांचें स्पष्टीकरण अगदीं निराळ्याच तऱ्हेनें देतात.

सत्याग्रहासारखे जरी नाहींत तरी सविनय प्रतिकारासारखे दोन प्रघात हिंदुस्थानांत आहेत. धरणें (धृ – धरणें) म्हणजे धरून बसणें याचा अवलंब व्यक्ति किंवा छोटे गट करतात. मोठ्या समुदायाकडून त्याचा अवलंब कधींहि केला जात नाहीं. ऋणकोनें धनकोचें कर्ज नाकारलें म्हणजे धनको बहुधा हा मार्ग उपयोगांत आणतो. ऋणकोच्या दारासीं उपाशी बसून धनकोला असें दर्शवावयाचें असतें कीं त्याचें कर्ज खरें आहे. ऋणकोविषयीं अप्रीति न बाळगतां धनको क्लेश भोगण्यास तयार असतो. आपल्याला न्याय्य वाटणाऱ्या आणि दुसऱ्यास कोणत्याहि उपायांनीं मान्य न होणाऱ्या मागण्या कबूल करून घेण्यासाठीं नातेवाईकांकडून देखील हा मार्ग स्वीकारला जातो.

दुसरा प्रकार म्हणजे हरताळ. कसल्याहि प्रकारचें दुःख किंवा असमाधान यासाठीं हरताळाचा अवलंब करणें हें अगदीं नित्याचें आहे. राजानें स्वीकारलेला मार्ग अनिष्ट आहे किंवा केलेली कृति तिरस्करणीय आहे असें दर्शविण्यासाठीं निषेध किंवा निदर्शन म्हणूनच फार करून हरताळ पाळण्यांत येतो. सबंध व्यापारधंदा बंद पाडण्यापेक्षां राजाचें लक्ष वेधून घेणें हाच यामागील खरा उद्देश असतो. त्याला थोडक्या मुदतीचा संप

म्हणतां येईल. सार्वत्रिक संपासारख्या लांब मुदतीच्या हरताळाच्या उदाहरणांची नोंद इतिहासांत आढळत नाहीं.

राजाच्या जुलमापासून सोडवणूक करून घेण्याचा आणखीहि एक मार्ग होता. आणि तो म्हणजे सगळी चीजवस्त घेऊन देशत्याग करणें. देशत्याग म्हणजे संपूर्ण असहकार. तो प्रभावी ठरत असे असें म्हणतात.

परंतु गांधीजी सत्याग्रहाचा विकास करीत असतांना त्याची वाढ कशी झाली याचें बरोबर आकलन या सर्व विवेचनावरून होत नाहीं.

सत्याग्रहचळवळ करण्याची कल्पना कशी सुचली असा प्रश्न श्री. डोक यांनीं गांधीजींना विचारला असतां ते म्हणाले, " कांहीं वर्षांपूर्वी नाताळमध्यें मीं सार्वजनिक कार्यांत प्रत्यक्ष भाग घेण्यास नुकतीच सुरवात केली असतांना अर्जे विनंत्या निष्फळ ठरल्यानंतर या मार्गाचा अवलंब करणें सर्वोत्तम ठरेल असें माझ्या मनांत आलें. परंतु त्या वेळच्या आमच्या हिंदी लोकांच्या असंघटित स्थितींत तसा प्रयत्न करून पाहणें निरुपयोगी वाटलें. पुढें ज्या वेळीं एशियाटिक रजिस्ट्रेशन बिल मांडण्यांत आलें त्या वेळीं जोहान्सबर्गमधील हिंदी जमातींत इतकी प्रचंड खळबळ उडाली आणि त्याचा प्रतिकार करण्याच्या निर्धारानें ते सर्व इतके संघटित झाले कीं ती संधि मला योग्य वाटली. कांहीं तरी प्रत्यक्ष उपाय त्यांनीं योजलाच असता परंतु त्यांच्या कृत्याला दंग्याधोप्याचें स्वरूप न येतां सविनय प्रतिकाराचें स्वरूप आलें तर तें वसाहतीच्या दृष्टीनें सर्वोत्कृष्ठ ठरेल आणि एकंदरीनेंहि तेंच योग्य होईल असें मला वाटलें. हिंदी लोकांना पार्लमेंटमध्यें मताधिकार नव्हता. कांहीं सवलत मिळेल किंवा गाऱ्हाण्यांची कोणी दाद लावील अशी आशा नव्हती. खिश्चन चर्चें बेपर्वा होतीं. म्हणून मीं हा आत्मक्लेशाचा मार्ग सुचविला आणि बऱ्याच वादविवादानंतर तो मंजूर झाला. द० आफ्रिकेंतील सत्याग्रहाच्या प्रारंभाचें हें वर्णन ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचें आहे कारण तें सगळ्यांत जुनें, अत्यंत अधिकृत व तो प्रसंग घडला त्याच सुमाराचें आहे.

द० आफ्रिकेंतील सत्याग्रहाचा त्रोटक वृत्तान्त अन्यत्र दिला आहे. त्या प्रकारचा तो पहिलाच लढा असल्यामुळें सत्याग्रहाच्या इतिहासांतील तो सर्वांत महत्त्वाचा लढा होय. आणि गांधीजींनीं चालविलेला तो

पहिलाच लढा असला तरी त्या वेळींहि त्यांचा त्या साधनावर संपूर्ण विश्वास होता व परिणामीं यशाची त्यांना पूर्ण खात्री होती. ११-९-१९०६ रोजीं केलेल्या भाषणांत ते म्हणतात, "मी निर्भयपणें खात्रीपूर्वक असें जाहीर करूं शकतों कीं आपल्या प्रतिज्ञेशीं मूठभर तरी लोक जोंपर्यंत एकनिष्ठ आहेत तोंपर्यंत या लढ्याचा शेवट एकच होऊं शकतो. आणि तो म्हणजे विजय." 'सत्याग्रह इन् साउथ आफ्रिका' या आपल्या पुस्तकांत गांधीजी लिहितात, "सत्याग्रह म्हणून पुढें ओळखल्या जाणाऱ्या चळवळीची उत्पत्ति ही अशी होती."

अगदीं सुरवातीच्या काळांत देखील गांधीजींना सत्याग्रहाच्या संपूर्ण स्वरूपाचें स्पष्ट दर्शन झालेलें होतें. निःशस्त्र प्रतिकाराहून ती चळवळ वेगळी होती. चळवळीच्या सुरवातीला सहानुभूति दाखविणाऱ्या जर्मिस्टोन येथील कांहीं युरोपीयनांनीं गांधीजींचें भाषण ऐकण्याची इच्छा दर्शविली. त्याप्रमाणें एक सभा घेण्यांत आली. सभेचे अध्यक्ष श्री. होस्केन म्हणाले, " गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्याचे इतर सर्व मार्ग निष्फळ ठरल्यानंतरच ट्रान्सवालमधील हिंदी लोकांनीं निःशस्त्र प्रतिकाराचा अवलंब केला आहे. त्यांना मताधिकार नाहीं. संख्येनें ते अगदीं थोडे आहेत. ते कमकुवत असून त्यांच्याजवळ शस्त्रास्त्रें नाहींत. म्हणून त्यांनीं निःशस्त्र प्रतिकाराचा अवलंब केला. तें दुर्बलांचें हत्यार आहे. " या विधानामुळें गांधीजी आश्चर्यचकित झाले. श्री. होस्केन यांना खोडून काढतांना गांधीजींनीं आपल्या अनत्याचारी प्रतिकाराची व्याख्या ' आत्मिक बल ' अशी केली. त्यांनीं श्रोत्यांना सांगितलें कीं पाशवी शक्ति वापरण्याची शक्यता असली तरी देखील तिला अनत्याचारी प्रतिकारांत काडीइतकेंहि स्थान नाहीं. हिंदी लोकांच्याजवळ शस्त्रास्त्रें असतीं व त्यांना मताधिकार असता तरी देखील त्यांना फक्त आत्मिक बलाचाच अवलंब करण्याचा मीं सल्ला दिला असता. गांधीजी म्हणतात, द० आफ्रिकेंतील सत्याग्रहाची आंखणी करतांना लढ्याच्या कोणत्याहि अवस्थेंत शारीरिक शक्तीचा उपयोग करण्याचा पुसट देखील विचार कधीं त्यांच्या मनाला शिवला नाहीं.

अर्थात् लढा जसजसा बळावत गेला तसतसा निःशस्त्र प्रतिकार आणि सत्याग्रह यांतील फरक युरोपीयनांच्या देखील ध्यानांत येऊं लागला.

गांधीजींचें वर्तन प्रथमपासून शेवटपर्यंत अगदीं नमुनेदार होतें. जरूरीच्या वेळीं युरोपीयनांच्या मदतीला त्यांचें धावून जाणें, झुलू बंडाचे वेळीं त्यांनीं सरकारला केलेली मदत, आणि मुख्य म्हणजे युरोपीयन रेल्वे कामगारांच्या संपाचा फायदा घेण्यास त्यांनीं दिलेला नकार, या सर्वांवरून हेंच सिद्ध झालें कीं सत्याग्रहाचा पायाच निःशस्त्र प्रतिकारापेक्षां निराळा आहे.

द० आफ्रिकेंतील सत्याग्रहाचा मार्ग अंगीकारण्याचा त्यांचा निश्चय अचानक झाला. ते आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात कीं ब्रह्मचर्यपालनाच्या स्वरूपांतील आत्मशुद्धि त्यांना सत्याग्रहासाठीं समर्थ बनवीत होती. ते जोहान्सबर्गमधून फोनिक्स आश्रमांत परत आल्यानंतर सुमारें महिन्याभरानें फोनिक्स येथें घेतलेल्या शपथेनें सत्याग्रहाचा पाया घातला गेला. "ब्रह्मचर्याची शपथ अजाणतेपणानेंच जणूं कांहीं मला सत्याग्रहास उद्युक्त करीत होती." ते पुढें लिहितात, "सत्याग्रह ही आधीं आंखलेली योजना नव्हती, ती यदृच्छेनें सहज स्फूर्त झाली."

सत्याग्रहाची मौलिकता : : ४

सत्याग्रहपद्धतीचा विकास करण्याच्या बाबतींतील गांधीजींची मौलिकता निर्विवाद असून तिची वाढ करण्यासाठीं त्यांनीं केलेलें कार्य महत्त्वपूर्ण आहे. सत्याग्रहाचा अवलंब करण्याच्या कामांत गांधीजी अद्वितीय आहेत असा निर्वाळा देणारे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अनेक विख्यात लेखक सहज दाखवतां येतील. पूर्वी लढ्याचे अहिंसक मार्ग आजिबात नव्हतेच असें म्हणणें सत्याला सोडून होईल. कामगारांचे संप हा बहुतांशीं अहिंसक मार्गच आहे. आणि तो बराच जुनाहि आहे. पण अल्डुस हक्स्ले म्हणतात त्याप्रमाणें तो अधूनमधून व अव्यवस्थितपणानें वापरण्यांत आला आहे. स्वतंत्र तंत्र म्हणून त्याची वाढ कधींहि करण्यांत आलेली नाहीं. किंवा गांधीजींच्या प्रमाणें आणि त्यांच्याइतक्या व्यापक प्रमाणांत राजकीय व

इतर क्षेत्रांत त्याचा अवलंब झालेला नाहीं. दुसरें कांहींहि करतां येण्यासारखें नसल्यामुळें दुर्बलांचें हत्यार म्हणून त्याची कांस धरली जाते परंतु गांधीजी शक्तिशाली लोकांचें आणि अनंत पटीनें श्रेष्ठ असें हत्यार म्हणूनच त्याचा उपयोग करतात. शिवाय गांधीजींनीं त्याला तात्त्विक भूमिकेचें अधिष्ठान दिलें असून तें एक संपूर्ण शास्त्र बनविलें आहे. अन्यायाविरुद्ध झगडा करण्याच्या सत्याग्रहपद्धतीचीं हीं वैशिष्ट्यें तिच्या नाविन्यांत भर टाकतात.

गांधीजींच्या सत्याग्रहाचें वैशिष्ट्य नेमकें कशांत आहे ? महावीर, बुद्ध, जीझस, महंमद आणि नानक यांसारख्या असामान्य व्यक्ति, प्रेषित किंवा संत यांनीं आपल्या आयुष्यांत सत्याग्रहतत्त्वाचा अंगीकार केला आहे यात शंकाच नाहीं. त्यांनीं ही शिकवणहि दुसऱ्यांना यशस्वीपणें दिलेली आहे. स्वतः गांधीजींनीं जीझसविषयीं बोलतांना असे उद्‌गार काढले आहेत कीं तो तर अनत्याचारी प्रतिकाराचा प्रवक्ताच होता. त्यांनीं पुढें असें म्हटलें आहे कीं त्या अनत्याचारी प्रतिकारांत सत्याग्रहच अभिप्रेत असला पाहिजे. बुद्ध आणि खाइस्ट यांच्या प्रत्यक्ष प्रतिकारासंबंधानें त्यांनीं असें म्हटलें आहे कीं " बुद्धानें थेट शत्रूच्या दारापर्यंत लढा भिडवून उद्दाम भिक्षुकवर्गाला नमवलें. खाइस्टनें जेरुसलेमच्या मंदिरांतील दलालांना हुसकून लावलें आणि ढोंगी व फारिसी यांच्यावर ईश्वरी कोप ओढविला. प्रत्यक्ष प्रतिकाराला दोघेहि उत्कटत्वानें पाठिंबा देणारे होते. आणि मी केवळ त्यांच्या पावलावर पाऊल टाकीत आहें." प्रत्येक देशांतील सॉक्रेटिसासारख्या अनेक साधूंना त्यांच्या वैयक्तिक जीवनापुरतें सत्याग्रहीच म्हटलें पाहिजे. परंतु अगदीं अलिकडील काळापर्यंत सत्याग्रहहि व्यक्तिगत धार्मिक प्रवृत्तिच समजली जाई. गांधीजींचा उदय होईपर्यंत आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील अन्याय किंवा असहायता नाहींशी करण्याचें सामाजिक हत्यार म्हणून त्याचा पद्धतशीर उपयोग करण्याचा विचार कोणाच्याच मनांत आला नाहीं. " अहिंसाहि ऋषिमुनींसाठींच तेवढी नाहीं; सामान्य माणसांच्याहि ती तितकीच उपयोगी आहे " असें जाहीर करण्याची निर्भयता त्यांचे ठिकाणीं होती. श्री० मुनशी म्हणतात त्याप्रमाणें " गांधीजींचें जीवन म्हणजे सामाजिक शक्ति म्हणून सत्याग्रहाचा अवलंब

कसा करावा याचा एक प्रत्यक्ष घडाच आहे. ... मर्यादित किंवा प्राणांतिक उपवासासारख्या अहिंसक प्रतिकाराच्या उच्च स्वरूपांचा अंगीकार करून त्यांनीं अत्यंत समृद्ध असें तंत्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. अहिंसक सत्याग्रहाला सामाजिक शक्तीचें स्वरूप देऊन स्वातंत्र्य व स्वतःचे हक्क यांकरतां कराव्या लागणाऱ्या लढ्यासाठीं अभिनव व शक्तिशाली असें प्रतिकाराचें हत्यार त्यांनीं मानवतेला दाखवून दिलें आहे. गांधीयुगापूर्वी हिंसक लढाईखेरीज दुसरा पर्याय नव्हता. किंवा हिंसेचा अवलंब न करतां ज्यायोगें सामुदायिक प्रयत्न करतां येईल असा कोणताहि मार्ग उपलब्ध नव्हता."

बरेच दिवसांपूर्वी एकदां गांधीजींना इतिहासांत सामुदायिक सत्याग्रहाचीं उदाहरणें आढळत नाहींत असें सांगण्यांत आलें असतां ते म्हणाले कीं त्यामुळें आपलें धैर्य खचण्याचें कारण नाहीं. १९३२ च्या चळवळीच्या सुरवातीला गांधीजी मुंबई येथें भरलेल्या कर्नाटक प्रांतांतील कार्यकर्त्यांच्या बैठकीला हजर होते. त्या वेळीं एक कार्यकर्ता त्यांना म्हणाला कीं अहिंसेनें स्वराज्य संपादन केल्याचें इतिहासांत एकहि उदाहरण नाहीं. त्यावर गांधीजींनीं स्मित केलें आणि ते पुढें म्हणाले, "आपण इतिहासाचीं नवीं पानें लिहीत आहोंत." यावरून हें स्पष्ट होतें कीं सामुदायिक झगड्यासाठीं सत्याग्रहाचा अवलंब करणें येवढेंच गांधीजींचें वैशिष्ट्य आहे असें नाहीं तर त्यांचा मार्ग अगदीं अभिनव असल्याचीहि त्यांना पुरेपूर जाणीव आहे.

या दृष्टीनें गांधीजींनीं १९३० मध्यें लंडन येथील किंग्जवे हॉलमध्यें अमेरिकन लोकांसाठीं रेडिओवर केलेलें भाषण लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यांनीं हिंदुस्थानांतील लढ्याचा त्या वेळीं खालील शब्दांत उल्लेख केला. "सबंध जगाचें लक्ष वेधून घेणाऱ्या आमच्या लढ्याचें कारण आम्ही हिंदी लोक आमच्या स्वातंत्र्यासाठीं लढत आहोंत हें नसून त्यासाठीं आम्हीं ज्या मार्गाचा अंगीकार केला आहे तो मार्ग अजूनपर्यंत ज्ञात असलेल्या इतिहासांत कोणींहि वापरलेला नाहीं हें होय. रक्तपात, हिंसा किंवा अलीकडच्या काळांत ज्याला मुत्सद्देगिरी म्हणतात असें दुटप्पी वर्तन हे आमचे

मार्ग नाहींत. तर शुद्ध व स्पष्ट स्वरूपांतील सत्य आणि अहिंसा हे आमचे मार्ग आहेत.''

'वॉट् आय् ओ टु खाइस्ट्' या आपल्या पुस्तकांत दीनबंधु अँड्र्यूज यांनीं गांधीजींचा उल्लेख केलेला आहे. गांधीजी जगाला फारसे माहीत नव्हते अशा वेळीं सन १९१३ मध्यें द० आफ्रिकेंत दीनबंधूंची व त्यांची प्रथम गांठ पडली. त्या वेळीं तेथील मोहीम ऐन भरांत होती. या भेटी-संबंधीं श्री० अँड्र्यूज १९३१ सालीं लिहितात, ''प्रथमपासूनच सहज प्रेरणेनुसार मला असें वाटूं लागलें कीं त्यांच्या रूपानें स्त्री-पुरुषांना अलोट स्वार्थत्यागास प्रवृत्त करणारी अत्यंत श्रेष्ठ दर्जाची एक धार्मिक व्यक्तिच केवळ नव्हे तर आकाशांतील ताऱ्याइतकें किंवा चिरकालीन पर्वताइतकें सनातन पण नव्या जगाला अपरिचित असलेलें एक धार्मिक तत्त्वच जगांत उदय पावत आहे. त्यांचा एकच एक आदेश असा होता कीं दीर्घकालीन आत्मक्लेश आणि प्रेमाचा वर्षाव हेंच काय तें अजिंक्य आहे. ... दक्षिण आफ्रिकेंतील सबंध लढ्यांत मला याचाच निर्वाळा मिळाला.''

याप्रमाणें हें तत्त्व केवळ अपवादात्मक व्यक्तींच्याच उपयोगाचें आहे ही जुनी वृत्ति जाऊन त्याऐवजीं समुदायाकडून आणि जीवनाच्या दैनंदिन प्रश्नांच्या बाबतींत तें वापरलें जाऊं लागलें.

गांधीजींच्या स्वभावधर्माबद्दल लिहितांना रोमाँ रोलाँ म्हणतात, ''या अविश्रान्त योद्ध्याइतकी निष्क्रियतेची चीड दुसऱ्या कोणालाहि नसेल. प्रतिकार करणाऱ्या व्यक्तीचें गांधीजी अत्यंत उज्ज्वल प्रतीक आहेत. त्यांच्या चळवळीचा आत्मा प्रत्यक्ष प्रतिकार– हिंसेंतून व्यक्त होणारा नव्हे तर प्रेम, विश्वास आणि त्याग यांच्या कार्यप्रवण शक्तीवर आधारलेला प्रत्यक्ष प्रतिकार– हा आहे. 'कोणत्याहि भेकडाला त्यांच्या छत्राखालीं आसरा मिळणार नाहीं.' भित्रेपणापेक्षां हिंसा परवडली असें ते म्हणतात. 'भित्रेपणा किंवा हिंसा यांतून एकाची निवड करावयाची असेल तर मी हिंसा पसंत करण्याचा सल्ला येईन. ... दुसऱ्याला न मारतां आत्मबलि-दानाचें मूक धैर्य अंगीं बाणविण्याचा मी प्रयत्न करतों पण ज्याच्याजवळ हें धैर्य नसेल त्याला संकटापासून लज्जास्पद पळ काढण्यापेक्षां मी मरण्याचा आणि मारण्याचा सल्ला देईन. कारण जो पळ काढतो तो मानसिक हिंसा

करीत असतो. दुसऱ्याला मारीत असतांना स्वतः मरून जाण्याचें धैर्य नसल्यामुळेंच तो पळून जातो. पण हिंसेपेक्षां अहिंसा कितीतरी पटीनें श्रेष्ठ आहे आणि शिक्षेपेक्षां क्षमा जास्त वीरोचित आहे असा माझा विश्वास आहे' असें गांधीजींनीं १९२० सालींच लिहून ठेवलें आहे. सत्याग्रह आणि अन्याय अगदीं परस्परविरोधी आहेत असें गांधीजी म्हणतात. यावरून गांधीजींच्या मनांत आणि वृत्तींत प्रामुख्यानें जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे काय वाटेल तें करून प्रतिकार करणें ही होय. त्यांच्या मतें 'अन्यायाचा प्रतिकार करूं नका' याचा अर्थ अन्यायाचा प्रतिकार अन्यायानें करूं नका, तर अन्यायाचा प्रतिकार सत्प्रवृत्तीनें करा; पण काय वाटेल तें झालें तरी प्रतिकार केल्याखेरीज मात्र राहूं नका, भित्र्या निष्क्रीयतेपेक्षां प्रतिकार फार बरा, असा होतो.

त्याचप्रमाणें 'तुमच्या स्वतःसारखेंच तुमच्या शेजाऱ्यावर प्रेम करा' यांत ते अशी भर टाकतील कीं 'आणि प्रत्येक मनुष्यच केवळ नव्हे तर प्रत्येक प्राणिमात्र तुमचा शेजारी आहे.' अशा तऱ्हेनें प्रेम आणि औदार्य यांची व्याप्ति ते वाढवितील.

अन्याय आणि अन्याय करणारा यांत ते करीत असलेल्या फरक आणि अन्यायाशीं असहकार करण्याचें त्यांचें तत्त्व हीं अत्यंत उपयुक्त आहेत. पुन्हां रोमाँ रोलाँ यांच्या शब्दांत सांगावयाचें तर "मानवाला जीव निर्माण करण्याची शक्ति दिलेली नसल्यामुळें त्याला जिवंत असलेला क्षुद्र जंतु देखील मारण्याचा अधिकार पोहोंचत नाहीं. कोणाबद्दलहि– प्रत्यक्ष अन्याय करणाराबद्दलहि– द्वेष असतां कामा नये; पण त्याचा अर्थ असा नव्हे कीं अन्याय निमूटपणें सहन करावा. जनरल डायर आजारी पडला तर त्याची देखील गांधीजी सेवा करतील परंतु प्रत्यक्ष स्वतःचा मुलगा लज्जास्पद जीवन कंठीत असेल तर ते त्याला आश्रय देऊन मदत करणार नाहींत. उलट (गांधीजींच्याच शब्दांत) 'माझें त्याच्या-विपर्यीचें प्रेम मी त्याला देत असलेला आसरा काढून घ्यावयास लावील; मग त्यामुळें त्याला मृत्यु आला तरी पर्वा नाहीं.' शारीरिक शक्तीच्या जोरावर एखाद्याला सत्प्रवृत्त बनविण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं. (पुन्हा

त्यांच्याच शब्दांत) 'परंतु त्याच्याशीं असहकार करून– मग त्याचा परिणाम कांहींहि होवो– त्याचा प्रतिकार केलाच पाहिजे. आणि तो पश्चात्तापदग्ध झाल्यास त्याला हृदयाशीं धरलें पाहिजे.' ''

सत्याग्रहाचें अधिष्ठान : : ५

सत्याग्रह हा जीवनाकडे बघण्याचा जसा एक दृष्टिकोण आहे तसाच तो एक आचारधर्महि आहे. कोठल्याहि परिस्थितींत व केवढीहि जबर किंमत द्यावी लागली तरी सत्य, प्रेम अथवा अहिंसा यांच्या द्वारा सत्याची जाणीव, उपासना आणि तदनरूप आचार या तिन्ही संबंधींचा आग्रह हें सत्याग्रहाचें अधिष्ठान आहे.

सत्य हेंच सत्याग्रहीचें अंतिम ध्येय असून अहिंसा किंवा प्रेम हेंच त्याचें एकमेव साधन आहे. एकाच नाण्याच्या त्या दोन बाजू होत. गांधीजींना जर कोणीं असा प्रश्न केला कीं या दोहोंतील अधिक महत्त्व कशाला ? तर ते म्हणतील कीं अर्थात् सत्याला. सत्याचा नंबर पहिला. पण जर एखाद्याचा कधीं सत्यासंबंधानें गोंधळ उडाला तर त्याला अहिंसेचा, प्रेमाचा आणि आत्मक्लेशाचा मार्ग अनुसरूं द्या. त्या योगानें अखेर तो सत्याप्रत गेलाच पाहिजे.

पण सत्य हें सगळे धर्म, सगळीं तत्त्वज्ञानें आणि सर्व थोर विभूति यांचें ध्येय असतें येवढेंच नव्हे तर नेपोलियन, शिकंदर किंवा हिटलर यांच्यासारखे विजेते देखील असेंच म्हणतात कीं त्यांना आकलन झालेल्या सत्याचीच ते कांस धरीत आहेत. मग सत्याग्रहाचें वैशिष्ट्य तें कोणतें ? आपलें लक्ष त्यामुळें तिकडे वेधलें जातें असें कांहींतरी अभूतपूर्व वैशिष्ट्य त्यांत आहे. आणि तें म्हणजे 'प्रेमाच्या द्वारा सत्य' ही त्यांतील मेख होय. सत्याग्रह म्हणजे प्रेम, आत्मक्लेश आणि अहिंसा येवढ्याच साधनांनीं सत्याचा शोध. त्यांतच त्याचें वैशिष्ट्य सामावलेलें आहे. अहिंसेच्या

किंवा प्रेमाच्या मार्गानें सत्याप्रत पोहोंचण्याचा तो सिद्धान्त आहे. या ठिकाणीं अहिंसा आणि प्रेम दोन्ही समानार्थी आहेत. आपल्याला असें देखील यथार्थतेनें म्हणतां येईल कीं कार्यप्रवण अहिंसा म्हणजे प्रेम, व अव्यक्त प्रेम म्हणजे अहिंसा. दुसऱ्याचें भलें व्हावें, भलें करावें, म्हणून सत्याग्रही आनंदानें त्याग करील. कमींत कमी सुरुवातीला तो दुसऱ्यांना इजा तरी निदान करणार नाहीं. अहिंसेचा शब्दशः अर्थ केला तर तो या दुसऱ्या प्रकारचा होत असला तरी नेहमींच्या प्रघातांत आणि विशेषतः गांधीजींच्या लिखाणांत आत्मक्लेशाला आणि अंतिम त्यागाला तयार असलेलें संपूर्ण विकसित, कार्यप्रवृत्त व आक्रमक प्रेम अशी अहिंसा शब्दाची व्याख्या झालेली आहे.

आतां सत्याग्रह सिद्धान्ताचें गूढवादात्मक, तत्त्वज्ञानविषयक, नैतिक, विकसनशील, मानसिक आणि वास्तववादी अधिष्ठान यांकडे वळूं.

गूढवादाचा भिस्त सत्याच्या प्रत्यक्ष व स्फूर्त ज्ञानावर असते. केवळ बुद्धीनें आकलन झालेलें ज्ञान नव्हे तर आत्म्याला प्रतीत झालेलें सत्याचें अंतःप्रेरित ज्ञान हाच त्याचा आधार. प्रथम कांहीं वेळीं बुद्धीला तें पटणार नाहीं. परंतु नंतर त्याविषयीं बुद्धीची खात्री पटल्याखेरीज राहणार नाहीं. बुद्धि अवश्यतया विवरणात्मक असते. निरनिराळ्या छटांची छाननी करणें, त्या पृथक् करणें, त्यांत प्राविण्य मिळविणें आणि एकाच मार्गानें जाणें यांत बुद्धीला रस वाटतो. बुद्धीची ती सहजप्रवृत्तिच असते. परंतु अंतःप्रेरणा ही समन्वयी असते. व ती अविभाज्य व संपूर्ण अशा स्वरूपांत सत्य समजावून घेते. सर्व ठिकाणच्या व सर्व काळांतील गूढवाद्यांनीं आत्मा, जाणीव आणि जीवन यांची एकरूपता अनुभवलेली आहे. अनंताशीं एकरूप होऊन ती अनुभूति प्रत्यक्ष जीवनांत उतरविणें हें त्यांचें सर्वांत उच्च ध्येय असतें. या ऐक्यभावनेशीं सत्याग्रही पूर्णपणें सहमत असतो. परमोच्च अनुभवाचे वेळीं त्याला त्या एकरूपतेची जाणीव होते व तो तिच्याशीं समरस होतो. आपल्या दैनंदिन आयुष्यांत त्या एकरूपतेची अनुभूति प्राप्त करून घेण्यासाठीं त्याची अखंड धडपड चालू असते. जगांत 'परका' असा कोणी नाहींच. प्रेम म्हणजे तादात्म्य पावणें हा सत्याचा महत्त्वाचा गुणधर्म आहे. म्हणून असें म्हणतां येईल कीं

सर्वांशीं एकरूपतेचा अनुभव हा प्रेमाचा एक उपसिद्धान्त आहे. अल्डुस हक्स्लेनें असें म्हटलें आहे कीं "सर्व भूतमात्रांच्या ऐक्यावरच्या विश्वासाचें व्यवहार्य स्वरूप म्हणजे अहिंसा होय." 'दुसऱ्यानें आपल्याशीं जसें वागावें असें वाटत असेल तसेच दुसऱ्यांशीं वागा' असलीं वाक्यें म्हणजे ऐक्यपूर्ण जीवनाच्या दिव्य अनुभवाचे अस्पष्ट पडसाद होत. म्हणूनच गांधीजी म्हणतात, सर्व जीवमात्र पवित्र आहे. कोणत्याहि जिवाला इजा करणें म्हणजे स्वत:ला इजा करण्यासारखें आहे– म्हणजेच ईश्वराला इजा करण्यासारखें आहे.

ही अनुभूति हा सत्याग्रहाचा गूढवादी पाया होय. सत्याग्रह्याच्या दृष्टीला आकलन झालेल्या या सत्याची प्रचीति त्यानें आपल्या आचरणांतून मिळविण्याचा प्रयत्न करावा हें ओघानेंच आलें. ज्याच्या ज्याच्याशीं म्हणून संबंध येईल त्याच्या त्याच्याबद्दलची पृथकत्वाची भावना हळू हळू नाहींशी करून त्याच्याशीं एकरूप होण्याचा प्रयत्न केल्यानेंच हें साधतां येईल. भावनेच्या कक्षेंत तो सर्वांवर प्रेम करीत असला आणि सबंध विश्वाशीं एकरूप होत असला तरी प्रत्यक्ष आचरणाच्या बाबतींत त्याची सुरुवात अगदीं निकटवर्तियांपासूनच होणार. ती प्रेमाची प्रवृत्ति आहे. प्रेम आपल्याला सर्वस्वाचें दान करण्याची, ज्यांच्यावर आपण प्रेम करतों त्यांच्या बऱ्यासाठीं आत्मबलिदान करण्याची स्फूर्ति देतें. दुखापत, तिरस्कार, राग आणि मुख्य म्हणजे या सर्वांला कारणीभूत होणारी स्वार्थी इच्छा यांना प्रेमाच्या राज्यांत स्थान नाहीं. सत्याग्रहीचें जीवन म्हणजे सर्वांचें भलें करण्याची एक अखंड प्रवृत्ति होय. या त्यांच्या मार्गांत अडथळे आले असतां तो जरूर तर आत्मक्लेशाचा व आत्यंतिक त्यागाचा मार्ग पसंत करतो. एक तो प्रतिगामी शक्तींना परिवर्तित करण्याच्या किंवा त्यांना नमविण्याच्या कामीं यशस्वी तरी होतो अगर त्या प्रयत्नांत असतांना तो मृत्युमुखीं तरी पडतो. दोहोंच्या योगानें जीवैक्यांतील सत्याचें सारखेंच समर्थन होत असल्याकारणानें दोहोंपैकीं कांहींहि घडून आलें तरी तो त्यांत विजयच मानतो. आपल्या मुलाला वांचविण्याच्या प्रयत्नांत ज्या आईचे प्राण जातात ती जितकी सुखी, तितकीच जिचे प्राण खर्ची पडत नाहींत तीहि सुखी. तिला तिच्या जीविताची मातब्बरी वाटत नाहीं.

तिला कशाचें महत्त्व वाटत असेल तर तें तिचें प्रेम आणि मुलाला वांचविण्यासाठीं तिनें केलेला प्रयत्न यांचेंच. मुलाला वांचविण्याच्या प्रयत्नांत आपल्याला मृत्यु येत आहे असें तिला वाटलें तर ती सहास्यवदनानें आणि आपला विजय झाला अशा भावनेनें मृत्यूला मिठी मारते आणि मुलाचें जीवित बचावण्यांत ती यशस्वी झाली तरी तोदेखील तिचा तितकाच विजय असतो.

सत्यप्रचीतीसाठीं गूढवादाची मदार अंतःप्रेरणेवर असेल तर तत्त्व-ज्ञानाची मदार बुद्धि आणि तर्कशास्त्र यांवर असते. तादात्म्यता आणि चिंतन यांमुळें गूढज्ञान प्राप्त होतें तर तत्त्वविषयक ज्ञान निरीक्षण, तर्क व अनुमानपद्धति यांच्या योगानें साध्य होतें. एकच चित्शक्ति सर्व विश्व व्यापून राहिली आहे. भिन्न वस्तूंच्या मागें देखील तींच शक्ति वास करीत असते. या निर्णयावर तत्त्वज्ञ आले आहेत. आणि वैज्ञानिक जडवस्तूच्या बाबतींत देखील तोच सिद्धान्त मानूं लागले आहेत. वर वर पहाणाराला सृष्टींत भिन्नता दिसत असली तरी या भिन्नतेच्या मुळाशीं एकताच आहे. भिन्नता हा भ्रम नसून सापेक्ष सत्य आहे. जाणिवेच्या वरच्या पायरीवर याहून श्रेष्ठ असें सत्य वसत असतें; आणि भिन्नतेच्या व पृथक्पणाच्या पातळीवर रहावयाचें का ऐक्याच्या आणि एकरूपतेच्या पातळीवर रहावयाचें तें आपण ठरवावयाचें असतें. पहिला मार्ग पृथगता, भीति, तुटकपणा, अहंभाव, झगडा, तिरस्कार आणि विनाश यांकडे नेतो; दुसरा मार्ग एक-रूपता, प्रेम, त्याग, आनंद, ऐक्य, श्रेष्ठ ज्ञान, एकात्मजीवन व त्यांतील दिव्यता याकडे नेतो. असें असणें शक्य आहे कीं जोंपर्यंत मला शरीर व त्या शरीराची जाणीव आहे तोंपर्यंत मला आत्म्याच्या ऐक्याची संपूर्ण प्रचीति होणार नाहीं. परंतु पृथकतेऐवजीं एकरूपतेच्या, झगड्याऐवजीं मिलाफाच्या आणि द्वेषाऐवजीं प्रेमाच्या रस्त्याकडे मी खात्रीनें माझीं पावलें वळवूं शकेन. माणसाला येवढेंच करतां येणें शक्य आहे. आणि जर तो असें करणार नाहीं तर त्याला आपल्या मार्गांतील धोका टाळतां येणार नाहीं.



आतां आपण सत्याग्रहाच्या नैतिक बाजूकडे वळूं. ऐक्य, सुसंवादित्व आणि मानवी जीवनांतील सौख्य यांच्या परमोच्च बिंदूकडे नेणारा मार्ग हा केव्हांहि सर्वांच्या हिताचा आहे. तर त्याच्या बरोबर उलट दिशेला जाणारा मार्ग अहिताचा आहे. आपल्याला अर्थातच सत्पथाचा अवलंब करून कुपथाचा त्याग केला पाहिजे. सत्याग्रह व सत्याग्रही हा दृष्टिकोण यांचा नीतिशास्त्र नेहमींच पाठपुरावा करतें. व्यक्तीच्या बाबतींत एक व गटांच्या किंवा राष्ट्रांच्या बाबतींत वेगळी अशा आजकाल रूढ झालेल्या दुटप्पी नैतिक मूल्यांमुळेंच कावेबाजपणा, देशभक्तिप्रेरित हत्या, कारस्थान आणि फंदफितुरी यांना सद्‌गुणांची महती प्राप्त होते. नीतिशास्त्राचा दुटप्पीपणा मंजूर नाहीं म्हणून सत्याग्रहाला फार मौठा नैतिक आधार आहे. मानवी आचारांचें प्रेम व सत्य यांपेक्षां महत्तम अधिष्ठान कोणतें असूं शकेल ? त्यामुळेंच जर एका राष्ट्रांतील व्यक्तीचें अथवा कुटुंबाचें हित साधत असेल तर सबंध जगाला व मानवांमधील परस्परसंबंधालाहि तें हितकारक असलेंच पाहिजे. पण वस्तुस्थिति आज तशी दिसत नसली तर तो आपल्या दुबळेपणाचा व मूर्खपणाचा परिणाम आहे. आपण आपला हा कमकुवतपणा टाकून देण्याचा अवकाश कीं ते तेजस्वी गुण आपलें मार्ग-दर्शन करावयास सिद्ध आहेतच.

जगांतील अहिंसेच्या दिशेनें होणाऱ्या मानवी प्रगतीचा आढावा घेऊन गांधीजी म्हणतात (हरिजन ११–८–४०): "इतिहास जेथपासून ज्ञात आहे तेथपासून थेट आजपर्यंतच्या कालाकडे आपण नजर टाकली तर आपणाला असें आढळून येईल कीं मानवाची हळूहळू अहिंसेकडे प्रगति होत आहे. आपले प्राचीन पूर्वज नरमांसभक्षक होते. नंतर असा काळ आला कीं त्यांना नरमांसभक्षणाचा वीट येऊन ते शिकारीवर राहूं लागले. त्यानंतरच्या अवस्थेंत मानवाला आपल्या भटक्या शिकारी जीवनाची शरम वाटूं लागली म्हणून त्यानें शेतीकडे लक्ष दिलें व आपल्या अन्नासाठीं तो भूमातेवर विसंबून राहूं लागला. अशा तऱ्हेनें भटकें जीवन सोडून मानव खेडीं व शहरें यांवर आधारलेल्या सुसंस्कृत स्थिर जीवनांत स्थायी झाला. आणि जो एका कुटुंबाचा घटक होता त्याऐवजीं एका जमातीचा व राष्ट्राचा

घटक बनला. हे सगळे प्रगमनशील अहिंसेचे व हिंसा अस्तंगत होत असल्याचे दाखले आहेत. परंतु प्रकार याच्या उलट असता तर त्याप्रमाणें अनेक कनिष्ठ प्रकारच्या प्राण्यांच्या जाती नष्ट होऊन गेल्या त्याप्रमाणेंच मानवजातहि आज नाहींशी झाली असती."

मानवाचा विकास झाला तो हिंसा आणि विनाश यांना अनुसरून झालेला नाहीं. उलट आज मानवी विकासानें जी भरारी मारलेली आहे ती हिंसा आणि नाश यांना शक्य तेवढें टाळल्यामुळें किंवा त्यापासून अलग राहिल्यामुळेंच होय. सुरक्षितता, सहकार आणि परस्परसाहाय्य हीं सुसूत्र समाजाचीं गृहीत कृत्यें होत. जगांत अनेक भयंकर युद्धें झालेलीं आहेत, आणि दुर्दैवानें पुढेंहि अशीं आणखी किती तरी युद्धें अपरिहार्य आहेत असें आज दिसत आहे. परंतु मानवाची प्रगति अशा युद्धामुळें झालेली नसून जगांत अशीं युद्धें असूनहि ती झालेली आहे. जे थोडे लोक युद्धाचा पुरस्कार करतात ते देखील युद्धामुळें वीरोचित गुणांचा विकास होतो अशा तऱ्हेच्या त्यांच्या चुकीच्या समजुतीमुळेंच. युद्ध हें एक अटळ दुष्कर्म आहे अशा समजुतीनें कित्येक लोक नाखुषीनें युद्धांचा अवलंब करतात. अहिंसक मार्गांच्या कार्यक्षमतेबद्दल जर कोणीं त्यांची खात्री पटवून दिली तर सर्वांच्या आधीं ते तो मार्ग सोडून देतील. कुटुंब हाच साहजिकपणें मानवसमुच्चयांतील पहिला घटक बनला असला पाहिजे. आणि अहिंसा, प्रेम, परस्परांविषयीं वाटणारी माया आणि आदर यांवरच त्याची उभारणी झालेली असली पाहिजे. शारीरिक सामर्थ्यावर आधारलेल्या अनियंत्रित सत्तेपासून प्रारंभ होऊन न्याय आणि एकमेकांची गरज यांवर आधारलेल्या संपूर्ण समतेमध्यें कौटुंबिक जीवनाच्या आदर्शांचा विकास झालेला आहे. अशा तऱ्हेनें हिंसेमधून अहिंसा व प्रेम याचा होणारा विकास दर्शविला जातो. कायदा, न्यायसंस्था, समाजवटना आणि वेडे व गुन्हेगार यांना आज आपल्याकडून मिळणारी वर्तणूक या गोष्टी अहिंसेच्या व प्रेमाच्या सिद्धान्ताला उत्तरोत्तर मिळणाऱ्या मान्यतेचीच स्पष्ट जाणीव करून देतात. आज आपण गुन्हेगारांना तिरस्कारानें किंवा हीनभावानें कधींच वागवीत नाहीं. सहृदय व दयाशील वर्तणुकीनेंच वेडे आणि गुन्हेगार यांची सुधा-

रणा आपण करू शकूं हें आतां मान्य झालें आहे. मुलांविषयींच्या आपल्या वर्तणुकींतहि आतां खूपच पालट झालेला आहे. हे सर्व पालट हेंच सिद्ध करतात कीं आपण अहिंसामार्गानें आपला विकास करून घेत आहोंत. आणि हिंसा, तिरस्कार आणि जुलूम या मार्गांचा निश्चितपणें त्याग करीत आहोंत.

राष्ट्राराष्ट्रांतील किंवा राष्ट्रसमूहांतील आर्थिक, सामाजिक व राजकीय संबंधाबाबत या आशापूर्ण मार्गांची शक्याशक्यता अजमावण्याचा काल आज आलेला आहे. समंजसपणा आणि न्याय यांवर आपला विश्वास असेल तर आपल्याला याखेरीज अन्य मार्ग नाहीं. पाशवी सामर्थ्य म्हणजे न्याय नव्हे. न्यायान्यायाची चाड नसलेली पाशवी शक्ति निष्प्रभ करून टाकणारी संघटना करण्याची जबाबदारी ज्यांना ज्यांना म्हणून न्यायाचा विजय व्हावा असें वाटत असेल त्यांच्यावरच येऊन पडते. बळी तो कान पिळी असाच जर जगाचा न्याय असेल तर समंजसपणा, न्याय, मानव्य आणि अशा इतर महान् तत्त्वांवर आधारलेल्या नैतिक नियमांवर अखेरचा पडदा पडणार असेंच समजलें पाहिजे. तीं तत्त्वें म्हणजे केवळ मृगजळ अथवा कविकल्पनाच ठरतील. सामर्थ्याच्या तात्कालिक विजयानें सत्याग्रही हताश होत नाहीं. बळी तो कान पिळी हा न्याय तो कधींहि मंजूर करीत नाहीं. मानवाचा विकास प्रेम आणि अहिंसा यांवरच आधारलेला आहे असा सत्याग्रहाचा विश्वास असतो. अधिक बाहुबलाच्या जोरावर नव्हे तर आपल्या अंगभूत नैतिक सामर्थ्यामुळें आणि प्रेम व क्लेश या आपल्या साधनांच्याच द्वारा अखेर न्यायाचा विजय झाला पाहिजे असें सत्याग्रह मानतो. शांतता आणि सौख्य या दिशेनेंच मानवाचा विकास होत आहे हें उघड आहे. सत्याग्रहाची प्रकृति विधायक स्वरूपाची असल्यामुळें मानवी प्रगतीच्या मार्गांतील अज्ञान, आलस्य, भित्रेपणा, स्वामित्वाची भावना, आक्रमण आणि पिळवणूक करण्याची प्रवृत्ति, महत्त्वाकांक्षा, लालसा, सत्तालोभ आणि इतर अडथळे दूर करण्यासाठीं सत्याग्रहाची अविरत धडपड सुरू असते. मानवतेला उच्च दर्जाचें संवादित्व, श्रेष्ठ प्रकारची शांति व स्वर्गीय सौख्य यांकडे नेणाऱ्या विकासाच्या नैसर्गिक प्रेरणेचा

एक अविभाज्य घटक म्हणूनच सत्याग्रहाचें कार्य सुरू असतें.

मानवी मनाचा सूक्ष्म अभ्यास व त्याची नैसर्गिक प्रवृत्ति व प्रेरणा यांचें अवलोकन यांवर सत्याग्रहाची उभारणी झालेली आहे. अशा तऱ्हेनें सत्याग्रहाला एक मानसशास्त्रीय अधिष्ठान देखील प्राप्त झालेलें आहे. शांततेच्या वेळीं शांति, ज्ञान आणि सौख्य यांचा विकास व प्रगति व्हावी यासाठीं वापरावयाची स्नेह व वात्सल्यपूर्ण शक्ति या नात्यानें सत्याग्रहाचें कार्य चालू असतें. सत्य हा त्याचा आधार असून प्रेम हें स्फूर्तिनिधान असतें. पण विरोधी शक्तींशीं झगडा आला असतांना सत्याग्रह आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व हिंसेचा उपयोग करणारांना अपरिचित अशा मार्गांचा आणि डावपेचांचा अवलंब करतो. सत्याग्रही लढा आणि लष्करी युद्धतंत्र यांची विस्तृत तुलना रिचर्ड ग्रेग यांनीं लिहिलेल्या 'पॉवर ऑफ् नॉन्व्हॉयलन्स' या पुस्तकांत केली आहे. त्यांतील कांहीं प्रमुख मुद्यांचा परामर्श घेऊं.

शांततेच्या काळांतील व झगड्यांच्या कालांतील सत्याग्रहीचा उल्लेख वर आला आहे. सत्याग्रही हा सत्याचा उपासक असल्यामुळें आपल्या आयुष्यांतील प्रत्येक क्षण तो सत्याचा पाठलाग करण्यांत घालवतो. आणि त्याचें जीवन प्रेममय असल्यामुळें तो दुसऱ्याचें हित करण्यांत मग्न असतो. असें करणें हा त्याचा स्वभावधर्मच बनत जातो. त्यांत आपण कांहीं विशेष करीत आहोंत किंवा त्यास औदार्य दाखवीत आहोंत असें तो मानीत नाहीं. तो विनम्र, परोपकारी व मनमिळावू असतो. आणि ज्या समाजांत तो राहतो व ज्यांच्याशीं त्याचा संबंध येतो त्यांच्यासाठीं तो सतत झटत असतो. सत्ताभिलाषापासून तो अलिप्त असतो. दुसऱ्यावर ताबा चालविण्याची त्याची इच्छा नसते पण स्वतःवर मात्र त्याचा संपूर्ण ताबा असतो. तो ज्या लोकांच्यांत राहतो त्यांच्यावर त्याच्या आचारविचारांचा पगडा बसलेला असतो. आणि त्यामुळें त्यांचें हित करण्याची त्याची शक्ति वाढत असते. तो थेट लोकांच्या हृदयालाच हात घालतो आणि त्यांच्याशीं त्याचे संबंध अत्यंत निकट असे असतात. जेथें जेथें विरोध उत्पन्न होतात तेथें तेथें तो आत्मक्लेश आणि त्याग यांच्या योगानें ते मिटविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळें त्याची मोंवतालच्या माणसांवरील

पकड दृढ होते आणि दुसऱ्याला दुखविण्याची त्याला जरूर पडत नाहीं. अशा तऱ्हेनें तो उत्तरोत्तर समाजाचा अत्यंत उपयुक्त व सुधारणा घडवून आणणारा असा घटक बनत जातो.

ज्या वेळीं सत्याग्रही लढ्यांत गुंतलेला असतो, उदाहरणार्थ सरकारशीं, त्या वेळीं तो आपलें म्हणणें सत्य व नीतिपूर्ण आहे याबद्दल आधीं खात्री करून घेतो. प्रथम जनमत तयार करून मग प्रतिपक्षाला आव्हान देतो. तो स्वतःला दुर्बल कधींच समजत नाहीं. स्वतः क्लेश सोसून व विरोधकाला कोठल्याहि प्रकारची इजा करण्याचें मनांत न आणतां प्रतिपक्षाची बाजू लंगडी करून टाकतो. विरोधाच्या त्यानें शोधून काढलेल्या अभिनव पद्धतीनें शत्रु चकित होऊन जातो. सत्याग्रही यत्किंचितहि प्रतिकार करीत नाहीं असें पाहिल्यावर विरोधकाच्या रागाची धार बोथट होऊन जाते. अहिंसक लढ्यांत धाडस, शौर्य आणि अद्भुतरम्यता यांना पुरेसा वाव आहे. उदाहरणार्थ, प्राणान्तिक उपोषणाच्या वेळीं असीम शौर्य आवश्यक असतें. त्याचा सगळा प्रयत्न विरोधकाच्या हिंसक शक्ति निष्प्रभ करून त्याचें नीतिधैर्य खचीं करण्यासाठींच असतो. अशा तऱ्हेनें विरोधकाची खात्री होऊन चुकते कीं आपलें शारीरिक सामर्थ्य निरुपयोगी झालें असून नैतिक आधारहि ढासळला आहे. सत्याग्रही कोणत्याहि अनैतिक उद्दिष्टासाठीं, उदाहरणार्थ एखाद्या राष्ट्राचें स्वातंत्र्य हिरावून घेण्यासाठीं किंवा स्वार्थासाठीं, कधींहि लढूं शकत नाहीं हें उघड आहे. यावरून हें सिद्ध होतें कीं सत्याग्रहाची कल्पना आणि वाढ मानवी मनाच्या क्रिया आणि प्रतिक्रिया विचारांत घेऊनच करण्यांत आलेली आहे. तो नुसता गृहीत सिद्धान्त किंवा आडाखा नव्हे. सत्याग्रह शत्रूचा नैतिक पाया खचीं करतो, त्याची इभ्रत कमी करतो आणि आपल्या विलक्षण शत्रूपुढें आपण असहाय आहोंत असें त्यास वाटावयास लावतो. उलटपक्षीं तो आपलें स्वतःचें नैतिक अधिष्ठान बळकट करतो, पराभूत मनोवृत्तीला थारा देत नाहीं, अत्यंत उच्च गुण आणि सहनशीलता प्रकट करतो आणि आपल्या विजयाबद्दल आणि नैतिक श्रेष्ठतेबद्दल सदैव निःशंक असतो.

कोणत्याहि सिद्धान्ताचें महत्त्व त्याच्या आचरणावरूनच अजमाविलें

जातें. सिद्धान्त जर निष्क्रिय असेल तर त्याचा कांहींहि उपयोग नाहीं. कसोटीची वेळ आली असतांना तो जर सिद्धान्त उपयुक्त ठरणार नसेल तर त्याच्यावर अनेक ग्रंथ रचले गेले तरी ते कवडी किंमतीचेच ठरतील. अल्डुस हक्स्लेनें असें म्हटलें आहे कीं अहिंसेची 'व्यवहार्यता' सिद्ध झाली पाहिजे. आपल्या 'एण्ड्स अँड मीन्स' या पुस्तकांत मोठ्या जमावानें केलेल्या अहिंसक कृत्यांचे निरनिराळे प्रकार वर्णन करतांना तो म्हणतो, "अहिंसा म्हणजे बहुशः अव्यवहार्य किंवा फार तर केवळ अपवादात्मक व्यक्तींनाच तेवढा वापरतां येण्याजोगा मार्ग असें समजलें जातें. त्यामुळें हें दाखवून देणें आवश्यक होऊन बसलें आहे कीं अहिंसापद्धतीमधूनच केव्हां तरी व भोंगळपणानें वापरली जात असली (आजपर्यंत ती तशी वापरली जात आहे) तरी ती कार्यक्षम व परिणामकारक ठरली आहे." सुरवातीला ही पद्धती अव्यवहार्य समजण्यांत येत असली तरी गांधीजींनीं व इतरांनीं केलेल्या सत्याग्रहाच्या प्रयोगामुळें तिची व्यवहार्यता सिद्ध झालेली आहे. सत्याग्रह नुसताच व्यवहार्य आहे असें नव्हे तर हिंसा व द्वेष यांमुळें सर्व वातावरण निराशामय बनत चाललेलें असतांना तो एकच एक मार्ग बाकी आहे. सी. ई. एम्. जोड म्हणतात, "गांधीजी ही नैतिक क्षेत्रांतील असामान्य विभूति असून पुढील पिढीचें ते मार्गदर्शन करीत आहेत. भांडणें मिटविण्यासाठीं त्यांनीं असा एक मार्ग दाखवला आहे कीं जो हिंसामार्गाला मागें टाकील इतकेंच नव्हे तर मानवाचीं विनाशाचीं साधनें वाढत असतांना संस्कृति टिकावयाची असेल तर तो एकच मार्ग प्रभावी होऊं शकेल." अल्डुस हक्स्लेनें असें दाखवून दिलें आहे कीं पोलिसांच्या अत्यंत प्रभावी संघटनेनें सज्ज असलेल्या सरकारांविरुद्ध सामान्य नागरिकाला आपलें स्वातंत्र्य टिकवावयाचें असेल तर त्याला अहिंसक असहकाराखेरीज अन्य मार्ग नाहीं.

आतां सत्याग्रहीची जीवन आणि कर्तव्यकर्म यांकडे बघण्याची दृष्टि कोणती असतें हें पाहूं. मीं वर सांगितलेंच आहे कीं सत्याची पूर्ण प्रचीति आणि तादात्म्य हे सत्याग्रहीनें आपल्यापुढें ठेवलेले आदर्श असतात. प्रेमाच्या द्वारा होणाऱ्या सत्याच्या संपूर्ण प्रचीतीचा क्षण हाच त्याच्या अंतिम विजयाचा व अत्युच्च सौख्याचा क्षण होय. सर्व विश्व व्यापून टाकणाऱ्या सत्याची साधना करण्यासाठीं तें सत्य प्रत्यक्ष अनुभवण्यासाठीं, त्याचें चिंतन करण्यासाठीं, त्याच्याशीं तादात्म्य पावण्यासाठीं, तदनुरूप वर्तन करण्यासाठीं, आपलें सर्व जीवन त्याच्याशीं समरस करण्यासाठीं आणि आपल्या जीवनांत अंतरात्म्याचा सहजाविष्कार करण्यासाठीं त्याची अविरत धडपड चालू असते.

मात्र तो अध्यात्मवाद्याच्या अव्यक्त सत्याचा किंवा कल्पनाविहारी कवीप्रमाणें काव्यमय सत्याचा उपासक नसतो त्याची धडपड आयुष्यांतील संपूर्ण सत्याची कृतीच्या द्वारा प्रतीति व्हावी एवढ्यासाठीं असते. आध्यात्मिक त्याचप्रमाणें भौतिक जगाचें सत्य समजावून घेऊन त्याप्रमाणें वर्तन करण्याची त्याची इच्छा असते. ईशापास्योपनिषदांत उल्लेखिल्याप्रमाणें विद्या आणि अविद्या या दोहोंचें आकलन तर मुख्य म्हणजे त्या दोहोंचा समन्वय करणाऱ्या परमतत्त्वाचें आकलन करून घेण्यासाठीं तो झटत असतो. अशा तऱ्हेनें भौतिक जगासंबंधींच्या सत्याच्या जाणिवेनें तो रोग आणि मृत्यु यांच्या पार जाऊं पहातो तर आध्यात्मिक जगासंबंधींच्या प्रचीतीमुळें तो सर्वांसहित अमरत्वाच्या आनंदाचा उपभोग घेऊं इच्छितो.

केवळ सत्याचें चिंतन केल्यानें किंवा फक्त हृदयाच्या आंतल्या गाभ्यालाच तेवढें त्याचें ज्ञान झाल्यानें सत्याग्रहीचें समाधान होत नाहीं. त्याच्या बुद्धीला सत्याचा शोध लागला अथवा ती त्यांत रममाण होऊन गेली तेवढ्यानेंच तो सुखी होत नाहीं. त्याच्या भावना सत्यावर केंद्रित झाल्या

किंवा सत्यार्शी तन्मय झाल्या यांतच केवळ तो समाधान मानत नाहीं. आपल्या जीवनाच्या अणुरेणूंत सत्य भरून रहावें अशी त्याला उत्कंठा लागून राहिलेली असते. आणि सत्याचरण करण्याकरतां तो आपले प्राण वेंचण्यासाठीं तयार असतो. खऱ्या ज्ञानाला प्रत्यक्ष कृतीचें रूप देण्याची त्याला तळमळ लागून राहिलेली असते. त्याच्या दृष्टीनें आचारशून्य ज्ञान म्हणजे केवळ निरर्थक शोभा किंवा नुसता कागदी फुलोरा होय.

सत्याकडे जाण्याचा त्याचा मार्ग एखाद्या कर्मयोग्याप्रमाणें असतो. आपलें स्वतःचें शरीर, भोंवतालची परिस्थिति, आपले बांधव व त्यांचीं सुखदुःखें यापासून सुरवात करून तो त्यापलीकडे पोहोंचण्याचा यत्न करतो. रोगराई, दारिद्र्य, दुःख, माणसांनीं माणसांवर लादलेला किळसवाणा अन्याय, गुलामगिरी, विषमतेचे दुरंत दुष्परिणाम, आक्रमण आणि पिळवणूक या कटु सत्यांपासून तो पळ काढूं इच्छीत नाहीं तर उलट त्यांचा प्रतिकार करणें हें आपलें निकडीचें कर्तव्य समजतो. अनादि-अनंत अशा शाश्वत सत्याचें दर्शन होईपर्यंत तो या सापेक्ष सत्यांतच गुंतलेला असतो. एकदां ती दृष्टि आल्यानंतर आपल्या कार्यासाठीं लागणारें मार्गदर्शन व उत्तेजन यांसाठीं तो त्या दर्शनाचा उपयोग करून घेतो. वस्तुतः सापेक्षांतून आणि सापेक्षाच्या द्वारा पूर्ण सत्याचा शोध करणें हेंच त्याचें उद्दिष्ट असतें. सत्याग्रही म्हणजे कृत्रिम तितीक्षेनें आपल्या भावनात्मक प्रतिक्रिया मारून टाकणारा अस्तंगत होत चाललेल्या पंथांतील एखादा तपस्वी नव्हे. जगांतील प्रत्येक घटनेमुळें होणाऱ्या योग्य व नैसर्गिक प्रतिक्रियांच्या संवेदना तो खुलेपणानें मनावर होऊं देतो. वास्तवतेच्या पलीकडची प्रचीति तो आपल्या दैनंदिन अनुभवांतून प्राप्त करून घेतो. स्वर्गप्राप्तीची त्याला घाई झालेली नसते. उलट होईल तितका स्वर्ग या भूतलावर आणण्याचीच तो खटपट करतो.

त्याला व त्याच्या बांधवांना येणारे अनुभव वास्तवतेचा कांहीं आधार नसलेले निव्वळ दृष्टिभ्रम म्हणून तो झटकून टाकणार नाहीं. भुकेलेल्यांचे खोल गेलेले डोळे, पददलितांचे आणि दुःखितांचे अश्रुबिंदु, पिळल्या जाणाऱ्यांच्या तीव्र यातना यांची त्याला कटु जाणीव असून त्याच्या जागीं

वैपुल्य, समाधान, समता, सद्भाव आणि सौख्य यांची प्रस्थापना झाली पाहिजे असें तो मानतो. पिळवणूक करणाऱ्या उद्दामांचा अहंकार, पाशवी शक्तीमुळें स्वतःला सुरक्षित समजून जुलूम करणारांचा बेफामपणा, ही वास्तवता असून निर्भय आणि अहिंसक लढ्याच्या किंवा धर्मयुद्धाच्या व्यतिरिक्त त्यांतून मुक्त होण्याचा दुसरा मार्ग नाहीं हें तो ओळखून असतो. सत्याविषयींच्या त्याच्या या वृत्तींतूनच त्याच्यांतील मानव्याच्या सर्वंकष प्रेमभावनेची वाढ होते. इतर सर्व इच्छा, प्रेरणा आणि आकांक्षा यांचेंच तें दिव्य स्वरूप होय. त्याला त्याचाच एक ध्यास लागून राहतो. व त्यामुळेंच त्याच्या हातून आपल्या बांधवांच्यासाठीं सेवेचीं आणि त्यागाचीं कृत्यें घडत असतात. ही उत्कट भावनाच त्याला सर्व जीवमात्र हा ईश्वरांशच असल्यामुळें प्रत्येक प्राणिमात्राच्या सेवेंत रत होणें हेंच माझें समाधान आणि सौख्य आहे असें म्हणावयास लावते. अशा तऱ्हेनें तो सत्याचा अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा शोधकच केवळ नव्हे तर सत्याचरणीहि असतो.

परंतु सत्याग्रही ज्याला उपास्य दैवत मानतो तें हें सत्य आहे तरी काय? त्याचें आकलन करून घेणें, त्याचा शोध करणें, त्याची प्रचीति पाहणें, त्यानुसार आचरण करणें आणि त्यांत निमग्न राहणें हें इतकें सहजसाध्य आहे काय? तसें मुळींच म्हणतां येणार नाहीं. पण त्यासाठीं धडपड ही केलीच पाहिजे कारण सत्य हीच अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. आणि मग जर त्याच्याकरतां धडपड करावयाची नसेल तर ती करावयाची तरी कशासाठीं? आपल्या आचाराचें मार्गदर्शन दुसऱ्या कशानें होऊं शकेल? मग असत्याची कांस धरावयाची कीं काय? खोटेपणालाच महत्त्व द्यावयाचें कीं काय? सत्यासाठीं जें आयुष्य वाहिलें गेलेलें नाहीं तें कचऱ्यासारखें वाऱ्यावर फेकून दिलेलें आयुष्य म्हटलें पाहिजे. अर्थ समजावून न घेतां पुस्तकाचीं नुसतीं पानें उलटण्यासारखेंच तें आहे. किंवा प्रेमाच्या गोडीचा अनुभव नसलेल्या वैवाहिक जीवनाची त्याला उपमा देतां येईल. सत्याचें ज्ञानच फक्त आयुष्य जगण्यास लायक करील आणि केवळ सदाचरणानेंच आंतरिक समाधान प्राप्त होऊं शकेल. जें सत्य आहे तें शिव आणि सुंदरहि आहे. सत्यांतूनच अस्तित्वाची निर्मिति झालेली आहे.

अस्तित्व आणि निर्मिति यांचे उभे आडवे धागे सत्याभोंवतीं गुंफले गेलेले आहेत. अनंतांत संचरणाऱ्या भूमंडलांचें स्वरूप जरी सतत बदलत असलें तरी त्यांच्या मुळाशीं असलेलें सत्य मात्र शाश्वत आणि त्रिकाला-बाधित असतें. सर्व अस्तित्वाच्या मुळाशीं असलेले नियम म्हणजे सत्य. त्या सुवर्णमय तंतूंतच घटनांचे मोती गुंफले गेलेले असतात. सत्यपूर्ण जीवन म्हणजे अस्तित्वांच्या नियमांचें योग्य आणि संपूर्ण ज्ञान व त्यानुसार केलेली अचूक वर्तणूक होय. याखेरीज केलेली इतर सर्व धडपड म्हणजे भलत्या वाटेवर भटकणें, नीतिभ्रष्ट होणें, वास्तवतेपासून दूर जाणें किंवा मोती टाळून शिंपांच्या मागें लागण्यासारखें होय.

हें सत्य म्हणजे काय तें पाहण्याचा प्रयत्न करूं. ज्या वेळीं सत्य सांगत आहे असें मी म्हणतों त्या वेळीं कोणता अर्थ मला अभिप्रेत असतो ? याचा अर्थ असा कीं मला वस्तुस्थिति जशी दिसली तसेंच हुबेहूब वर्णन करणारें असें माझें भाषण आहे. ज्या वेळीं माझें भाषण ऐकणारा माझा मित्र म्हणतो कीं होय, हें सत्य आहे, त्या वेळीं त्याला असेंच म्हणावयाचें असतें कीं त्यालाहि वस्तुस्थितीचें जसें दर्शन घडलें तसेंच मी त्याचें वर्णन करीत आहें. ज्या वेळीं मी म्हणतों तें खरें असल्याचा अनेक जण निर्वाळा देतात त्या वेळीं त्या सर्वांना देखील वस्तुस्थितीचें दर्शन माझ्याचसारखें झालेलें असतें. एखाद्या विशिष्ट घटनेबद्दलची आमची दृष्टि व आम्हांला आलेला अनुभव सारखाच असतो. एखाद्या घटनेसंबंधींचें ज्ञान व त्याचें व्यक्तीकरण यांतील एकवाक्यता म्हणजे सत्य होय. वस्तुस्थिति, तिचें ज्ञान व त्या ज्ञानाचें व्यक्तीकरण या तीन्हीमधील एकवाक्यता म्हणजेच सत्य होय. मीं जर मला झालेल्या सत्यदर्शनाला अनुसरून आचरण केलें तर लोक मला सत्याचरणी म्हणतात. अशा रीतीनें वस्तुस्थिति त्याचें आपणांस झालेलें दर्शन, त्या दर्शनाचें अनुभवजन्य व्यक्तीकरण, आणि त्या दर्शनानुसार आचरण या सर्वांच्या योगानें सत्याच्या पूर्ण स्वरूपाचें दिग्दर्शन होतें. पण असेंहि असण्याचा संभव आहे कीं मला एखाद्या घटनेचें ज्ञान होऊनहि मी तें व्यक्त करणार नाहीं. तें ज्ञान मी माझ्यापाशींच ठेवीन. तरी देखील मला

सत्याचें दर्शन झालें आहे असें म्हटलें पाहिजे. कारण या ठिकाणीं वस्तुस्थितीचें तिच्या नैसर्गिक स्वरूपांत यथार्थ ज्ञान झालेलें आहे. पण येथें माझें सत्याचरण फक्त वैचारिकच आहे. मला वस्तुस्थितीचें ज्ञान होईल, मी तें व्यक्तहि करीन. परंतु माझें आचरण त्यानुसार घडणार नाहीं. त्या ठिकाणीं मी विचारांत आणि उच्चारांत सत्यवान् असलों तरी आचारांत तसा नाहीं असें होईल. पण मला ज्या वेळीं वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान होतें, झालेल्या ज्ञानानुसार मी वस्तुस्थिति व्यक्त करतों आणि त्याप्रमाणें आचरणहि करतों, त्या वेळीं असें म्हणतां येईल कीं मला सत्याचें दर्शन झालेलें आहे, मी सत्य व्यक्त करीत आहें आणि सत्याचरण करीत आहें. म्हणजेच मी सर्वस्वीं सत्यवान् आहें.

कांहीं वेळां असेंहि असूं शकेल कीं सत्य व्यक्त करणें किंवा त्याप्रमाणें वर्तन करणें हें माझें कर्तव्य नसेल. त्या ठिकाणीं सत्याचें ज्ञान मिळवून थांबलें तरी पुरेसें होईल. उदाहरणार्थ, अशी कल्पना करा कीं मी एक सूर्योदयाचा अप्रतिम देखावा पहात आहें. त्या ठिकाणीं मी त्या सौंदर्याचें फक्त ज्ञान प्राप्त करून घेतों आणि मला वाटल्यास माझ्या मित्रांजवळ तें व्यक्त करतों. परंतु निसर्गातील या सत्याच्या ज्ञानानुसार वागण्याच्या कर्तव्याची जबाबदारी माझ्यावर येत नाहीं. परंतु विशिष्ट परिस्थितींत सत्य व्यक्त करणें अगर त्याप्रमाणें आचरण करणें अवश्य असूनहि एखाद्यानें त्याप्रमाणें वर्तन केलें नाहीं तर आपल्या कर्तव्यांत चुकल्याबद्दल तो निश्चितपणें दोषी ठरेल. आपण आणखी एक उदाहरण घेऊं. समजा कीं मनुष्यवध हें पाप असून तें होऊं देतां कामा नये असें मी मानतों. याचा अर्थ असा कीं खून हें पाप आहे याची जाणीव मला झाली आहे. नंतर माझ्या डोळ्यांदेखत जर कोणाचा खून पडत असेल तर माझे प्राण संकटांत घालूनहि तो टाळण्याचा प्रयत्न करणें हें माझें कर्तव्य ठरतें. आणि ज्यांच्यावर समाजांतील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची जबाबदारी आहे त्यांना वस्तुस्थितीची सर्व माहिती देणें हें देखील माझें कर्तव्यच आहे. पण मीं यांपैकीं कांहींच केलें नाहीं तर असें म्हणावें लागेल कीं मीं सत्य भाषण केलें नाहीं व सत्य आचरणहि केलें नाहीं.

माझ्या हातून कर्तव्यपालनांत झालेली ती फार मोठी कसूर होय. म्हणून सत्याचें नुसतें ज्ञान असून भागणार नाहीं. अनुभूति आणि ज्ञान यांची सौंदर्यता न्याय्य किंवा सत्यपूर्ण भाषणांत आणि तसल्याच आचरणांत आहे. यथार्थ अनुभूति अथवा सत्य ज्ञान यांचा शेवट नुसताच निष्क्रिय चिंतनांत किंवा व्याख्यानबाजींत होतां कामा नये. तर ज्या ठिकाणीं कृति करणें आवश्यक असेल त्या ठिकाणीं अचूक व योग्य कृतींत तो झाला पाहिजे. अचूक आणि योग्य कृति– सत्याचें प्रत्यक्ष आचरण– ही आपली कसोटी आहे. जर आपण त्यांत मागें पडलों तर सगळीकडेच आपणांला मागें रहावें लागणार. जीवनाला परिपूर्णता आणण्याच्या दृष्टीनें किंवा जीवन सफल करण्याच्या दृष्टीनें आपण अयशस्वीच ठरूं.

आतां असें होणें शक्य आहे कीं मला वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञानच होणार नाहीं. माझें ज्ञान चुकीचें किंवा सदोष असणें शक्य आहे. अशा ठिकाणीं मला इतकेंच करतां येण्यासारखें आहे कीं शक्य तेवढें दक्ष, विकाररहित आणि निष्काम राहून ज्ञान मिळविण्याचीं साधनें जास्तींत जास्त शुद्ध करण्याची मीं शिकस्त केली पाहिजे. ज्या ज्या वेळीं मला ज्ञान करून घेण्याची संधि प्राप्त होईल त्या त्या वेळीं मला माझी चूक दुरुस्त करण्याची काळजी घेतां येईल. आणि मी घेत असलेली दक्षता पुन्हा पुन्हा पडताळून पाहून मीं एका सत्याचीच तेवढी अनुभूति मिळविण्याचा पराकोटीचा प्रयत्न केला आहे अशी स्वतःची खात्री करून घेतां येईल. कांहीं प्रसंगीं असेंहि घडून येईल कीं वस्तुस्थितीचें माझें ज्ञान पुरेसें विश्वासार्ह असून मीं केलेलें त्याचें व्यक्तीकरण मात्र यथार्थ नसेल. त्या ठिकाणीं देखील जागरूकता आणि अचूक शब्दांची निवड यांची अत्यंत जरूर आहे. त्याचप्रमाणें माझें ज्ञान आणि मीं केलेलें त्याचें व्यक्तीकरण निर्दोष असूनहि आचारांत निष्क्रियता येण्याचा संभव आहे. अशा वेळीं निर्भय परंतु विनम्र, स्पष्टवक्ता परंतु निरभिमानी आणि सर्वांत मुख्य म्हणजे कमालीचा प्रामाणिक कर्मयोगी बनण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन. या सर्वांचा आशय असा कीं सत्याबद्दल अत्यंत गाढ असा नैसर्गिक प्रेमभाव, आत्मशुद्धि आणि आत्मनिरीक्षण, आणि सदासर्व-

काळ सत्याच्या प्रखर प्रकाशांत राहण्याचा अविचल निश्चय हे गुण मी संपादन करण्याचा प्रयत्न करीन.

मनुष्य हा अपूर्ण असल्यामुळें 'अमकें हेंच तेवढें सत्य' असें छातीवर हात ठेवून कोणालाच कधीं सांगतां येणार नाहीं. परंतु सत्याचें दळुदळू ज्ञान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न सर्वांनाच करतां येईल, आणि आमच्या ज्ञानानुसार आणि शक्त्यनुसार आम्हांला सत्याची जी अनुभूति झाली ती ही असें म्हणतां येईल. आपल्या मर्यादांच्या या जाणिवेमुळेंच आपण विनम्र झालें पाहिजे, आपण अत्याग्रही होण्याचा हेका सोडला पाहिजे आणि आपलीं मतें दुसऱ्यावर लादण्याचा मोह आवरला पाहिजे. आणि नेमकें तेवढ्याचसाठीं दुसऱ्यावर क्लेश लादण्याऐवजीं ते स्वतःच सहन केले पाहिजेत.

अग्नि जाळतो, उजेड अंधार नाहींसा करतो, अन्न जीवनदायी आहे, भुकेलेल्याला खाऊं घातलें पाहिजे, दुःख नाहींसें केलें पाहिजे, पापाचा नायनाट झाला पाहिजे, अन्यायाचा प्रतिकार केला पाहिजे, अखेर सत्याचाच विजय होतो; हीं सर्व सत्यें आहेत. केव्हां ना केव्हां तरी अनुभवाला आलेल्या या नियमांची आपणांस जाणीव असून आपण त्यावर थोडाफार विश्वासहि ठेवतों. कांहींशा अंधुकपणें कां होईना पण सत्याचें आणि जीवनाच्या नियमांचें ज्ञान प्राप्त करून घेण्याची शक्ति आपणा सर्वांतच आहे. अन्यथा एक क्षणदेखील जगणें आपणाला अशक्य झालें असतें. अवास्तवतेवर कशाचीहि उभारणी होणें शक्य नाहीं परंतु सत्य पाहण्याचीहि शक्ति आपण तीक्ष्ण आणि अचूक केली पाहिजे. स्वच्छ आरशांतच वस्तूचें प्रतिबिंब हुबेहूब पडेल. शान्त आणि स्वच्छ पाण्यावरच वरचें आकाश जसेंच्या तसें पाहतां येईल. म्हणून सत्याची पूर्ण प्रचीति प्राप्त करून घेण्यासाठीं आपण आपलें मन स्वच्छ केलें पाहिजे आणि आत्मशुद्धि करून घेत राहिलें पाहिजे.

समान गुणधर्म चटकन एकमेकांजवळ येतात. त्याप्रमाणें सत्याला सत्याची व आत्म्याला आत्म्याची प्रचीति ताबडतोब येते. म्हणून आपण स्वतः आत्मस्वरूपी बनल्याखेरीज विश्वाला व्यापून टाकणाऱ्या आत्म्याचें

ज्ञान आपणांस होणार नाहीं. आणि त्याच्याशीं तदाकार होणें तर त्याहूनहि अशक्य होईल. जोंपर्यंत आपण स्वतःशीं सत्यनिष्ठ होत नाहीं तोंपर्यंत आपणाला सत्याचें ज्ञान प्राप्त होणार नाहीं. संपूर्ण सत्याची अनुभूति मिळविणें, तदनुसार वर्तन करणें आणि त्यांतच निमग्न राहणें हा खरा आदर्श आहे. आपल्या नश्वर जीवनांत त्याची परिपूर्ण अनुभूति कधीं झाली नाहीं तरी ती बहुंशानें होणें शक्य आहे. आपण करावयाचें तें इतकेंच कीं तो आदर्श गांठण्यासाठीं आपल्या आयुष्यांतील क्षणन् क्षण जिवापाड मेहनत घेण्यांत खर्ची घालावयाचा.

सत्याकडे जाण्याचें एकमेव साधन म्हटलें म्हणजे आपलें मन हेंच होय. साधन अपूर्ण व ओबडधोबड असलें तरी तें तितकेंच आश्चर्यजनकहि आहे. आपलीं पंचेंद्रियें हीं मनाचीं साधनें होत. तीं मोठीं उच्च प्रतीचीं आहेत असें नव्हे पण आपल्याला त्यावरच विसंबून राहिलें पाहिजे. पंचेंद्रियें व मन यांच्या आरशांतच आपल्याला सत्य पाहिलें पाहिजे. आणि सत्याचें प्रतिबिंब नीट उमटावें म्हणून तीं साधनें स्वच्छ ठेविलीं पाहिजेत. म्हणजेच शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही दृष्टींनीं आपलें जीवन शुद्ध व सुदृढ असलें पाहिजे. शिस्त, संयमन, अनासक्ति, स्वार्थत्याग, शांति, धैर्य आदि गुणांना सत्याग्रही जीवनांत महत्त्वाचें स्थान आहे तें याचसाठीं. वस्तुतः शुद्ध व खंबीर चारित्र्य या भांडवलावरच सत्याग्रही आपलें जीवन सुरू करतो.

पण केवळ सत्याचें आकलन झाल्यानें निम्में देखील काम भागणार नाहीं. सत्यानुसार आचरणामुळेंच प्राधान्येंकरून सत्याग्रहीला तो दर्जा प्राप्त होतो, विशेषतः जुलमी किंवा प्रतिगामी शक्तीकडून विरोध झाला असतांना आपलें कर्तव्य पार पाडण्याचे स्वतंत्र मार्ग अशाच वेळीं तो उपयोगांत आणतो. सदैव आणि निरपवादपणें तो सत्याचरण करतो व तें अप्रतिहतपणें अहिंसेनेंच करीत असतो.

सत्याग्रही फक्त प्रेमाच्याच द्वारा सत्यप्राप्ति करून घेण्यावर विश्वास ठेवतो. हा विश्वास हाच त्याचा मूलाधार होय. तो त्याचा धर्मच होय. त्यावर त्याची निर्विकल्प निष्ठा असते. त्याच्या या विश्वासाला तशीं कारणेंहि

आहेत. सत्य हाच वस्तुतः विश्वाचा आधार आहे. जें अस्तित्वांत आहे त्याला अनुसरून असणारें तें सत्य हा त्याचा मूळ अर्थ आहे तें शाश्वत, अविनाशी आहे. सत्यावर– विश्वाच्या कायद्यावर– विश्वास ठेवावयाचा नाहीं तर माणसानें विश्वास तरी दुसऱ्या कशावर ठेवावयाचा ? हजारों वर्षांपूर्वी हिंदी तत्त्वज्ञांनीं 'सत्यमेव जयते', 'सत्यान्नास्ति परो धर्मः' असा आदेश देऊन ठेवला आहे.

दक्षिण आफ्रिकेंतील आपल्या सत्याग्रहमोहीमेच्या पहिल्या अवस्थेच्याहि अगदीं सुरवातीलाच गांधीजींना असें स्पष्टपणें आढळून आलें कीं सत्याची साधना करणें हें द्वेष किंवा जीविताचा अथवा वित्ताचा नाश करणें याच्याशीं विसंगत आहे. प्रामाणिक व सत्यमय आयुष्यक्रमांत असत्य, द्वेष आणि अत्यंत क्षुद्र जीवांच्या बाबतींत देखील क्रौर्य किंवा इजा लव-मात्रहि असू शकणार नाहीं.

प्रेम हा मानवी जीवनाचा सिद्धान्त आहे. प्रेमावरच समाजाची रचना आधारलेली आहे. जर असें नसतें तर कोणताहि समाज अस्तित्वांत आला नसता. आणि मानवजात देखील एव्हांना नष्ट होऊन गेली असती. प्रेमाचें द्वेषावरील, अहिंसेचें हिंसेवरील आणि विधायक शक्तीचें विनाशक शक्ती-वरील प्रभुत्व यामुळेंच जीवन सुसह्य, भरभराटीचें आणि अखंड राहिलें आहे. खरें पाहतां जीवनाचा उदयच मुळीं प्रेमांत झाला आहे. जीवन प्रेमावरच जगतें आणि प्रेमामुळेंच त्याला परिपूर्णता प्राप्त होते. म्हणूनच प्रेमाचा मार्ग अनुसरल्यानेंच केवळ सत्याची अनुभूति होते. द्वेषाचा, हिंसेचा मार्ग हा केव्हांहि असत्याकडेच नेतो. हिंसा हा जंगली जीवनाचा कायदा झाला. अहिंसा किंवा प्रेम हा मानवी समाजाचा कायदा आहे. म्हणून सत्याग्रही सत्याची साधना करतो. आणि अहिंसेच्या द्वाराच करतो.

शिवाय आपणांसारख्या पापक्षम नश्वर जीवांना अहिंसा हा सर्वांत सुरक्षित पंथ होय. कारण आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं जें सत्य म्हणून पाहतों व त्या वेळेपुरती ज्याच्याबद्दल आपली खात्री पटते तें सत्य संपूर्ण नसण्याचाहि संभव आहे. आणि मध्यंतरीं जर आपण तें अर्धवट सत्य दुसऱ्यावर लादण्यासाठीं हिंसेचा उपयोग केला तर आपल्या हातून

एक घोर प्रमाद घडेल व दुसऱ्याला निष्कारण क्लेश दिल्यासारखें होईल. पण त्याच्या उलट जर आपण अहिंसेचा मार्ग पत्करला तर आपल्यालाच तेवढे क्लेश सहन करावे लागतील. सत्याचा अर्थ लावण्यांत आपल्या हातून चूक होत असेल असें सुरवातीलाच आपण कबूल करून टाकतों. आणि तेवढ्याचसाठीं दुसऱ्याला क्लेश देण्याऐवजीं आपण ते स्वतः भोगण्याला तयार होतों. अशा रीतीनें आपल्या मतासाठीं किंवा चुकांसाठीं भोगाव्या लागणाऱ्या क्लेशांतून इतरांची तरी सोडवणूक करूं शकूं आणि आपले क्लेशहि पण वाया जाणार नाहींत कारण त्यामुळें आपली आत्मशुद्धि होईल, आपल्या पदरीं थोरपणा येईल आणि इतरांच्यांत त्या योगानें समजूतदारपणा निर्माण होईल. जर सत्य आपल्या बाजूचें असेल, आपला त्याग पुरेसा शुद्ध असेल, तर त्यामुळें आपल्या विरोधकांचें मतपरिवर्तन होईल. ज्याप्रमाणें एखाद्याला दडपून टाकण्यापेक्षां त्याचें मतपरिवर्तन करणें चांगलें त्याचप्रमाणें जुलमापेक्षां मन वळवून घेणें हा केव्हांहि श्रेष्ठ व अधिक चांगला मार्ग आहे असा मानसशास्त्रीय सिद्धान्त आहे.

'जशास तसें' करण्यांत किंवा 'अपकाराची फेड अपकारानें'च करण्यांत मोठेपणा किंवा चांगुलपणा तो कसला ? त्यामुळें हिंसेचा पगडा मात्र चिरकालीन होईल. कोणत्याहि स्वरूपांत व कोणत्याहि कारणासाठीं जरी हिंसा केली तरी त्यामुळें मानवतेचा अधःपात हा होणारच. जो हिंसा करतो, आणि ज्याच्याविरुद्ध ती करण्यांत येते, तो– जर त्याची वृत्ति अहिंसामय नसेल तर– अशा दोघांचाहि त्यांत अधःपातच आहे. आपण आपल्या हिंसक शत्रूला हिंसेचा आश्रय करून मारलें तर त्याला मरण येईल हें खरें पण त्यामुळें खुद्द हिंसावृत्तीलाच जीवदान दिल्यासारखें होईल. योग्य व उदात्त मार्ग म्हणजे सत्प्रवृत्तीनें दुष्प्रवृत्तीवर, प्रेमानें द्वेषावर, अहिंसेनें हिंसेवर, शांतीनें रागावर, सत्यानें असत्यावर विजय मिळविणें हाच होय. जगांतून अन्याय घालविण्याचा अन्य मार्ग नाहीं. अशा तऱ्हेनें अहिंसा व आत्मक्लेश या साधनांचा अवलंब करून सत्याग्रही प्रथम स्वतःच्या मनांतील अन्यायाचें व द्वेषाचें ठाणें उठवून लावतो आणि जगांतून त्याचें उच्चाटन करण्याचा मार्ग सुलभ करतो.

या तऱ्हेनें वापरण्यांत आलेलें प्रेमसामर्थ्य अथवा आत्मिक सामर्थ्य हें पाशवी शक्तीपेक्षां संस्कृतिसंवर्धनाचें साधन म्हणून निश्चितपणें जास्त प्रभावी आणि श्रेष्ठ असें आहे. माणूस म्हणजे कांहीं नुसतें हलतेंबोलतें विनाशी शरीर नव्हे. अविनाशी असा आत्मा त्यांत वास करीत असतो हा विश्वास हेंच त्या सामर्थ्याचें मूळ होय. म्हणून सत्याग्रही जुल्मी अधिकाऱ्यांच्या पुढें निर्भयपणें छाती उघडी करून उभा राहतो कारण सत्यच अखेर विजयी होणार असा त्याचा गाढ विश्वास असतो.

माणसाच्या सत्प्रवृत्तीवर सत्याग्रहीची निःसीम निष्ठा असते. प्रेम, सेवा, आत्मक्लेश आणि त्याग त्यांना त्या सत्प्रवृत्तीकडून साथ मिळते असा त्याला विश्वास असतो. आपल्याला तो समजो वा न समजो आणि आपण तो मान्य करो वा न करो प्रेमाचा कायदा गुरुत्वाकर्षणाच्या कायद्याप्रमाणेंच अप्रतिहत आपलें काम बजावीत असतो. अविचारी साहस म्हणून नव्हे तर अशा प्रकारच्या विश्वासामुळेंच सत्याग्रही आणीबाणीच्या प्रसंगीं आपला जीव कुर्बान करण्यास तयार होतो. जर हा डाव साधला तर छानच झालें पण नाहीं साधला तरी हुतात्म्यांचें सांडलेलें रक्त हें पुढें होणाऱ्या वीरांचें बीज आहे ही त्याची श्रद्धा असते.

सत्याग्रहीचें जीवन म्हणजे आत्मशुद्धि, संयम, सेवा, स्वार्थत्याग, आत्मसमर्पण या गुणसमुच्चयाचा एक अखंड व आनंदमय असा क्रम आहे. सत्याचें स्पष्ट ज्ञान आणि परिणामकारक व्यक्त स्वरूप यासाठीं जास्तींत जास्त शुद्ध असें साधन बनावें म्हणून सत्याग्रही सतत प्रयत्न करीत असतो. त्याची वृत्ति अत्यंत विनम्र अशी असते आणि मोठ्या आदरानें तो सत्याची साधना करतो. तो सगळे स्वार्थी हेतु भिरकावून देतो आणि आसक्तीपासून स्वतःला मुक्त करून घेतो. तो एकसारखें आत्मनिरीक्षण करीत असतो आणि मनांतील गाळ काढून टाकण्याचा प्रयत्न करतो. सत्याग्रही म्हणजे मूर्तिमंत सविनयताच. आपल्या समजुतीप्रमाणें आणि शक्तीप्रमाणें तो स्वतःला विधायक कार्याला व आपल्या बांधवांच्या सेवेला वाहून घेतो. त्याच्या या सेवेचा त्याच्या बांधवांना शारीरिक, मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्यासाठीं अत्यंत उपयोग होतो.

दर्शन

त्याच्या कार्यांत अडथळा करणाऱ्या शक्ति अन्याय्य व प्रतिगामी असल्याची त्याची खात्री असेल तर तो आपलें धैर्य खचूं न देतां त्यांच्याबरोबर लढा देईल. आपल्या दौर्बल्यामुळें तो हिंसेचा त्याग करतो असें नव्हे तर ज्यांची आत्मशक्ति दुर्बल आहे अशांचेंच हिंसा हें शस्त्र आहे अशी त्याची खात्री असल्यानेंच तो हा मार्ग पसंत करीत नाहीं. स्वतःच्या कल्पनेनुसार सत्य आपल्या बाजूला आहे अशी तो प्रथम पक्की खात्री करून घेतो आणि मग तो जरी एकाकी पडला तरी देखील अन्यायाबरोबर लढा देण्यासाठीं पुढें सरसावतो. अन्याय करणाराबद्दल त्याच्या मनांत अप्रीति नसते. त्याच्याशीं सत्याग्रहीची वागणूक गाढ सहानुभूतीची व कमालीची सहनशील अशी असते. त्यासाठीं तो मरण पत्करण्यास देखील तयार होतो. त्याची अशी श्रद्धा असते कीं केवळ आत्मक्लेशच तो व त्याच्या विरोधकामधील अंतर भरून काढतील, व तो आपल्या विरोधकाच्या हृदयापर्यंत पोहोंचूं शकेल. विरोधकाला भीति दाखवून नव्हे तर त्याच्या सत्प्रवृत्तीला आळवून त्याला जिंकून घेण्याची सत्याग्रहीची इच्छा असते. तो ज्या कार्याचा पुरस्कार करीत असतो त्या कार्याला समंजस जनमताचा पाठिंबा मिळवून मग त्या जोरावर तो झगड्यास सुरुवात करतो. सत्याग्रह हा केव्हांहि वैयक्तिक स्वार्थासाठीं केला जात नाहीं तर नेहमीं दुसऱ्याच्या हिताकरितांच त्याचा उपयोग केला जातो.

सत्याग्रह्याच्या वांट्याला येणाऱ्या क्लेशांचें रूपान्तर आपल्या प्रेमनिधानाच्या शोधापासून त्याला मिळणाऱ्या आनंदांत होतें. जगांतील कोणतीहि शक्ति आपल्या आत्म्याला धक्का लावूं शकणार नाहीं किंवा कोणत्याहि शत्रूला त्यावर आपली सत्ता चालवितां येणार नाहीं याची त्याला जाणीव असते. आत्मक्लेश हा कोंडलेल्या आत्म्याला मुक्त करण्याचाच मार्ग होय. सत्याग्रही सर्वस्वी स्वतःवर अवलंबून असतो. आणि त्याची निष्ठा अपार असते. शुद्ध अंतःकरणानें आणि निःस्वार्थी हेतूनें केलेलें प्रत्येक कार्य हें त्याचें पारितोषिक असल्यामुळें तो फलाची फिकीर करीत नाहीं. त्याच्या दृष्टीनें साध्यावरून साधनांची इष्टानिष्टता ठरत नाहीं तर तो साधनांनाच अंतिम साध्यापेक्षा जास्त महत्त्व देतो. सत्यमय जीवन कंठण्याइतकें श्रेष्ठ

श्रेय तो दुसरें कोणतेंहि मानीत नाहीं.

तारेवरची कसरत करणारा जितक्या तन्मयतेनें काम करतो तितक्याच तन्मयतेनें सत्याग्रहीहि आपला मार्ग चोखाळीत असतो. अन्याय दृष्टि-पथांत येतांच तो आपल्या शक्तिसर्वस्वानिशीं त्यावर झडप घालतो. त्याच्या शब्दकोशांत पराभव हा शब्दच सांपडत नाहीं. कारण शत्रूला जिंकून घेण्याच्या प्रयत्नांत आलेलें मरण हा देखील आत्म्याचा शरीरावरील विजयच होय. आपल्या ध्येयपूर्तीकरतां खंबीरपणानें लढत असतांना देखील अपमान किंवा तत्त्वच्युति होणार नसेल तर शत्रूबरोबर तडजोड करण्याची त्याची सदैव तयारी असते. याचें कारण असें कीं सत्याच्या त्याच्या आकलना-बद्दल तो दुराग्रह धरत नाहीं आणि दुसरी बाजू विचारांत घेण्यास तो नेहमीं तयार असतो.

सर्व जीवमात्राकडे तो समदृष्टीनें पहात असल्यामुळें भयाचा त्याच्या-जवळ लवलेशहि नसतो. असें देखील म्हणतां येईल कीं त्याच्या बाबतींत निर्भयतेचा कांहींसा अतिरेकच होतो. सर्व विश्वांत त्याच्यापेक्षां वेगळें असें कोणीच नसल्यावर त्यानें भ्यावयाचें तरी कोणाला? उपनिषदांत असें म्हटलें आहे कीं जेथें द्वैत आहे तेथें भय आलेंच. जेथें अद्वैत आहे तेथें भयाला वाव नसतो. आणि मग द्वेष तरी कोठला? आणि द्वेषच अस्तित्वांत नसेल तर इजा करण्याची प्रवृत्तीहि नसणारच. मग तेथें हिंसा तरी कशी असेल? सत्याग्रहीला अखिल मानवजात ही कुटुंबासारखी असते आणि माणसांमाणसांतील आणि गटांगटांतील स्पर्धा आणि अप्रीति नाहींशी व्हावी म्हणून तो सतत झटत असतो. सत्याग्रही हा मूलतःच ऐक्य आणि सुसंवादित्व यांचा भोक्ता आहे. आणि त्याच्या विश्वप्रेमी वृत्तीमुळें तो तें आचरणांत आणण्याचा प्रयत्न करीत असतो.

सत्याग्रही स्वभावतःच शान्त वृत्तीचा माणूस असतो. परंतु त्याची शान्तताप्रियता म्हणजे सौख्यासक्ति, निष्क्रियता, झगडा टाळण्याची किंवा तो उद्भवलाच तर त्यापासून दूर राहण्याची प्रवृत्ति नव्हे. झगड्यासाठीं तो आसावलेला असतो असेंहि नाहीं. परंतु आदर्श योद्ध्याप्रमाणें त्याची त्यालाहि तयारी असते. प्राधान्येंकरून तो कर्मवीर असतो आणि अन्याया-

विरुद्ध अविश्रान्त झगडा करण्याचें त्यानें जणूं व्रतच घेतलेलें असतें. बाह्य अन्याय आपल्या आंतरिक अन्यायाचेंच प्रतिबिंब आहे असें तो मानतो. आणि आपल्या स्वतःच्याच अंगचा तो अन्याय आहे, अशा भावनेनें तो त्याचा निरास करूं पाहतो. तो स्वतःप्रमाणेंच आपल्या शत्रूच्या देखील भावनांचा सहानुभूतीनें विचार करतो. स्वतःची एखादी वाईट खोड सोडतांना तो ज्या तऱ्हेचें आचरण करील त्याच तऱ्हेचें आचरण तो अशा प्रसंगींहि करतो. एखादी वाईट खोड काढून टाकण्यासाठीं कांहीं तो स्वतःलाच मारून घेणार नाहीं. पायाला कमींत कमी वेदना देऊनच कांटा काढला पाहिजे. अन्याय किंवा अयोग्य वर्तन करणारा अगर विरोधक यांच्याकडे द्वेषबुद्धीनें अगर उपहासानें न बघतां तो सहानुभूतीनें आणि दयार्द्रतेनें बघतो.

एका महत्त्वाच्या बाबतींत मात्र सत्याग्रही अयोग्य वर्तन करणाराल स्वतःप्रमाणें लेखीत नाहीं. तो स्वतःला शासन करून घेईल किंवा मारून घेईल आणि आपले दोष काढून टाकण्याचा प्रयत्न करीत असतांना हवे तेवढे क्लेश सहन करील. सत्याग्रही अयोग्य वर्तन करणारालाहि अशाच तऱ्हेनें कां वागवत नाहीं? त्याच्या प्राणाला धक्का न लावतां फक्त शरीराला इजा होईल अशी शिक्षा कां करीत नाहीं? किंवा त्याची संपत्ति आणि त्याचे आप्तसंबंधी यांच्यावर हल्ला चढवून तो त्यांना हैराण कां करीत नाहीं? याचीं कारणें अगदीं स्पष्ट आणि उघड आहेत. तो स्वतःच्या बाबतींत जेवढें स्वातंत्र्य उपभोगूं शकतो तेवढें इतरांच्या बाबतींत त्याला उपभोगतां येणार नाहीं. आपण स्वतःला काय करून घेत आहोंत व त्याच्या प्रतिक्रिया काय होतील याचें वारंवार निरीक्षण करून त्याप्रमाणें त्याला साध्य व साधनें जुळवून घेतां येतात परंतु विरोधकानें केलेल्या अयोग्य वर्तनाचा अचूक व पुरता अंदाज त्याला लागूं शकत नाहीं. अशा परिस्थितींत विरोधकावर क्लेश लादण्याचा त्याला काय अधिकार? म्हणून विरोधकाच्या हातून आपण स्वतःच क्लेश भोगण्याचा मार्ग तो पत्करतो आणि त्याच्या हृदयाला आळवून त्याची विवेकबुद्धि जागृत करण्याचा तो प्रयत्न करतो. विरोधकाला स्वतःची सुधारणा करण्याची तो संधि देतो. शुद्धीचें व आत्मोन्नतीचें साधन आपण होऊन पत्करलेले क्लेश हें आहे;

दुसऱ्यानें लादलेले क्लेश हें नव्हे. विरोधकावर क्लेश न लादण्याचें आणखी एक कारण असें कीं त्या क्लेशांचा परिणाम समाधानकारक होण्याऐवजीं अपायकारक होण्याचाहि संभव असतो. विरोधकाची स्वतःची अशी एक विशिष्ट भूमिका ठरलेली असते व त्याच्यावर क्लेश लादल्यानें ती जास्तच दृढ बनत जाण्याची शक्यता असते. क्लेश लादल्यामुळें द्वेषबुद्धि जागृत होऊन त्यामुळें सूडाच्या भावनेची जोपासना तो करूं लागतो. त्याच्या आत्मप्रतिष्ठेला त्यामुळें धक्का बसतो आणि ती शुद्ध होण्याऐवजीं त्याची अधिकच अवनति होऊं लागते. बाहेरून लादलेल्या क्लेशामुळें भीरुता आणि त्याबरोबर येणारे क्रोध, द्वेष वगैरे सर्व दुर्गुण यांचें प्राबल्य त्याचे ठिकाणीं माजतें. या सर्व कारणांसाठीं सत्याग्रही स्वतः क्लेश भोगणें पसंत करून आत्मशुद्धि आणि विरोधकाच्या हृदयाचा पालट असा दुहेरी परिणाम घडवून आणण्याचा प्रयत्न करतो.

हिंसेनें हिंसा नाहींशी करण्याचा प्रयत्न करणें, मोठ्या भीतीनें छोटी भीति घालविणें किंवा अन्यायानें अन्यायाचा प्रतिकार करणें म्हणजे घाणीनें घाण काढण्यापैकींच प्रकार आहे. असें करणें म्हणजे आपली युक्ति व डावपेच अयोग्य व चुकीचे असून आपली योजना जास्त गोंधळ माजविणारी आहे हें सिद्ध करण्यासारखें होय. आत्मशुद्धीच्या मार्गानें सत्याग्रही या कामास हात घालतो. म्हणजे तेवढ्यापुरता तो अन्यायावर विजय मिळविण्यास प्रारंभ करतो. निःस्वार्थ सेवा, आनंदानें पत्करलेले आत्मक्लेश हीं त्याचीं आत्मशुद्धीचीं साधनें होत.

सत्याग्रही हा कर्मयोगी असतो. त्याचें जीवन अत्यंत खळबळीचें व अनेक समरप्रसंगानीं भरलेलें असतें. या जगांत ज्यांचा पुरस्कार केला पाहिजे अशीं कितीतरी चांगलीं तत्त्वें आहेत. त्याचबरोबर ज्यांच्याविरुद्ध झगडलें पाहिजे असे कितीतरी अन्याय जगांत पसरलेले आहेत. परंतु कोणताहि अन्याय त्याचा मार्ग अडवूं शकत नाहीं किंवा कोठलाहि तात्कालिक पराभव त्याला नमवीत नाहीं. अखेर सत्याचाच विजय होणार, आणि सर्वश्रेष्ठ अशा अहिंसामार्गानेंच तो होणार, या दृढविश्वासानें तो आपलें कार्य करीत असतो.

जीवनपथ आणि सामाजिक शास्त्र

ग्रंथ संग्रहालय, पुणे
अनुक्रमांक 9239
वर्ग क्रमांक: 294.7
नोंद दि. 30/7/44

सत्याग्रह हा एक जीवनपथ आहे. म्हणजेच सत्याग्रहाची संपूर्ण तत्त्वप्रणालि मान्य करून आयुष्यांत तो आदर्श आचरणांत आणण्यासाठीं अविरत परिश्रम करावयाचे. ही विचारसरणी पुरातन असली तरी गांधीजींच्या आयुष्यांत व्यक्त होतांना तिचें स्वरूप हिरव्यागार तृणांकुराइतकें ताजें आहे असें दिसतें. गांधीजींनींच सत्याग्रहाला जीवनपथ असा व्यापक अर्थ आणून दिला. तो व्यापक अर्थ आणून देण्याचें खरें श्रेय गांधीजींनीं आपल्या दीर्घ, व्यासंगी, मेहनती आणि अत्यंत जागरूक अशा आयुष्यांत एकामागून एक केलेल्या अनेक प्रयोगांना आहे. सत्याग्रह हा आतां वैयक्तिक शांति आणि मुक्ति मिळावी म्हणून संन्याशांनीं आचरणांत आणण्याचा मार्ग राहिलेला नाहीं. सत्याग्रहीचें जीवन साऱ्या मानवतेशींच समरस झालेलें असतें व आक्रमण आणि पिळवणूक यांच्याशीं सतत झगडण्यांतच तें खर्च होतें. कोणत्याहि स्वरूपांतील अन्याय आणि सत्याग्रह हे परस्परांशीं अगदीं विसंगत आहेत. जोपर्यंत जगांत अन्याय शिल्लक आहे तोपर्यंत सत्याग्रहीला शांति किंवा स्वास्थ्य मिळणें शक्य नाहीं. आपलें काम होईपर्यंत त्याला मरण्याला किंवा मुक्ति मिळविण्याला देखील फुरसद होणार नाहीं. निरनिराळ्या कारणांसाठीं अनेक क्षेत्रांत तो एकसारखा झगडतच राहील.

महावीर आणि बुद्ध, सॉक्रेटीस आणि खाईस्ट किंवा निरनिराळ्या धर्मांतील इतर प्रेषितांनीं आणि उपदेशकांनीं सत्याचा शोध केला. आणि तो देखील प्रेमाच्या द्वारा केला हें खरें. परंतु त्यांच्या शिकवणुकीचा जनमतावर जो परिणाम झालेला दिसतो तो असा कीं जणूं धर्म हा जीवनाच्या इतर घडामोडीपासून वेगळा करतां येण्यासारखा असून संतांची शिकवण हि फक्त धार्मिक बाबींपुरतीच आहे. त्यांच्या शिकवणुकीचा उपयोग ऐहिक जीवनाऐवजीं पारमार्थिक जीवनासाठींच आहे अशी जनतेची समजूत

झालेली होती. परंतु गांधीजींच्या शिकवणुकींत अशा तऱ्हेच्या चुकीच्या समजुतीला जागा नाहीं. ते असें जाहीर करतात कीं याच देहीं याच डोळां सत्याची व अहिंसेची प्रस्थापना करण्यासाठीं आयुष्य वेंचणें हेंच त्यांचें जीवनकार्य आहे. आपल्या मृत्यूनंतरच्या पारमार्थिक जीवनाची आज काळजी करण्याचें कारण नाहीं. केवळ योगायोग म्हणून नव्हे तर एका नव्या पापावर सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशानें त्यांनीं सामाजिक, आर्थिक, व्यापारविषयक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा सगळ्या क्षेत्रांत पदार्पण केलें आहे.

त्यांचें सगळ्यांत जास्त लक्ष आचरणात्मक सत्याकडे असतें. इतर उपदेशकांपेक्षां जीवनाशीं ते अधिक समरस झालेले आहेत. जीवन म्हणजे प्राणरूपी प्रेरणेच्या योगानें निरींद्रियशक्ति आत्मसात् करून व तिचा सांठा करणारी योग्य कृतीमार्फत तिचें व्यक्तीकरण करणारी आणि त्या व्यक्तीकरणामुळेंच प्रगत होत जाणारी अशी एक प्रक्रिया आहे. अशा तऱ्हेनें जीवन हें सर्वस्वीं कर्ममय आहे. जीवन म्हणजे केवळ विचार किंवा ध्यान किंवा कल्पना करत राहणें नव्हे. जीवन म्हणजे आपल्याला कार्यप्रवृत्त करणारी दुर्दम्य शक्ति होय. बुद्धि जीवनाचें स्पष्टीकरण करते व कृतीचे निरनिराळे पर्याय पुढें ठेवते. ध्यान एकाग्र बुद्धीनें जीवनाच्या रहस्याचा ठाव घेण्याचा प्रयत्न करतें तर कल्पना जीवनांतील निरनिराळ्या समस्या घरोघर रंगून जाते. परंतु जीवनक्रमाचा अखंड प्रवाह सुरूच असतो. आणि जो जास्तींत जास्त अचूक कर्म आचरतो तोच खरोखरी जीवनाच्या गतिशास्त्रांत मर टाकतो. जीवनांतील सत्यें, आपल्या नैसर्गिक प्रेरणा आणि जीवनांतील विधायक प्रकृति म्हणजेच प्रेम यांच्याशीं जास्तींत जास्त समरस होण्याची काळजी वाहणाऱ्या कर्मवीराच्या भूमिकेंतून गांधीजी जीवनाकडे बघत असतात. प्रेम आणि आत्मक्लेश सहन करण्याच्या आपल्या अभिनव मार्गानें जगांतील सर्व अन्याय आणि दुःख यांच्याविरुद्ध झगडा करण्याला सत्याग्रही बांधला गेला असतो. सत्याग्रही जीवनपथ आणि अन्यायाचा प्रतिकार करण्याचें सत्याग्रही हत्यार यांमधील दुवा येथेंच आहे. गांजलेल्या जगाला सत्याग्रही नवें सुसंस्कृत पण त्याचबरोबर तितकेंच प्रभावी हत्यार

दाखवून देतो. त्याचा नवीन जीवनक्रम सर्वांना ताबडतोब अंमलांत आणतां येणार नाहीं याची त्याला जाणीव असते. कांहीं तरी थातुरमातुर करून इतरांना आपल्या पंथांत ओढणें हें त्यांचें उद्दिष्ट नसतें. म्हणून ज्या वेळीं लोक कसल्या तरी अडचणींत सांपडलेले त्याला दिसतात त्या वेळीं त्यांना सत्याग्रहमार्गाचा अवलंब करण्याची विनंति करणें आणि स्वतः त्यांना मदत करण्यास तयार होणें यांतच तो समाधान मानतो. जर लोकांनीं त्याच्या विनंतीचा स्वीकार केला तर तो परिस्थितीचें निरीक्षण करून त्यांच्या या गाऱ्हाण्यांविरुद्ध झगडा देण्याचें तात्पुरतें हत्यार म्हणून सत्याग्रहाचा अवलंब करण्यासाठीं कांहीं एक शिस्त घालून देतो. परंतु एखादें विशिष्ट उद्दिष्ट साध्य करून घेण्यापुरताच जरी लोकांनीं सत्याग्रहाचा अवलंब केला असला तरी ठरलेली शिस्त बिनचूकपणें पाळणें अत्यावश्यक असतें. कमींत कमी येवढें शिस्तपालन तरी त्यांच्याकडून झालेंच पाहिजे. डॉक्टरचें औषध घेत असतांना रोग्यानेंहि सगळें पथ्य पाळणें जितकें आवश्यक आहे तितकेंच हें शिस्तपालनहि आवश्यक आहे. या ठिकाणीं देखील सत्याग्रहीनें आजन्म पाळावयाची शिस्त आणि विशिष्ट उद्दिष्टासाठींच केवळ सत्याग्रहाचा अवलंब करणारानें पाळावयाची शिस्त यांतील फरक लक्षांत घेतला पाहिजे. धोरण म्हणून स्वीकारलेल्या तत्त्वांचा देखील निदान त्या वेळेपुरता तरी कसोशीनें अवलंब केलाच पाहिजे. सत्याग्रहावर ज्यांची निष्ठा आहे अशांनींच सत्याग्रहाची सुरुवात करणें व त्याला चालना देणें हें जास्त उचित ठरतें. कारण अशा लोकांच्या हातीं चळवळीचें मार्गदर्शन व नेतृत्व असेल तरच कमींत कमी चुका होण्याचा आणि विजय मिळण्याचा बहुंशीं संभव असतो. १९१९, १९२१ व १९३० मध्यें स्वतः गांधीजींनीं महान् राष्ट्रीय लढ्यांचें नेतृत्व स्वीकारलें. १९३० सालीं १४ फेब्रुवारी रोजीं काँग्रेस वर्किंग कमिटीनें पास केलेल्या ठरावांत असें म्हटलें आहे कीं ज्यांची अहिंसेवर तत्त्व म्हणून श्रद्धा असेल त्यांनींच सविनय कायदेभंगाची सुरुवात करावी आणि इतरांनीं त्यांचें अनुकरण करावें. यामुळें चळवळ निश्चितपणें अधिक चांगल्या तऱ्हेनें चालविली जाईल.

मुख्य म्हणजे "अहिंसेचा सिद्धान्त व्यक्तीच्या उपयोगासाठीं पुरेसा

असला तरी बहुजनसमाजाच्या दृष्टीनें त्याचा उपयोग नाहीं अशी समजूत करून घेणें अत्यंत चुकीचें होईल.'' इतिहास अशी साक्ष देतो कीं अपवादात्मक व्यक्तीच तेवढ्या अहिंसेचा अवलंब करूं शकतील असें नाहीं तर सामान्य स्त्रीपुरुषाचे शिस्तबद्ध गट देखील ती आचरणांत आणूं शकतील. गांधीजी हरिजनमध्यें (७-१-१९३९) लिहितात, ''अहिंसा हा केवळ वैयक्तिक सद्गुण नाहीं. तर इतर गुणांप्रमाणें जोपासना करण्यासारखा तो एक सार्वजनिक गुणहि आहे. परस्परांशीं वागतांना वस्तुतः याच गुणामुळें समाजाचें नियमन होत असतें. माझी अपेक्षा इतकीच कीं राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रमाणावर तो लागू करण्यांत यावा.''

सत्याग्रहमार्गाचा शस्त्र म्हणून अवलंब करावयाची ज्याची इच्छा असेल त्यानें त्या मार्गावर ज्याला कामचलावू श्रद्धा म्हणतां येईल ती तरी बाळगली पाहिजे. इतर कोणत्याहि मार्गापेक्षां या मार्गांत एक मोठा फायदा आहे. शारीरिक दृष्ट्या प्रतिस्पर्धी कितीहि बलाढ्य असला आणि हिंसेचें त्याचें तंत्र कितीहि कार्यक्षम असलें तरीहि हा मार्ग अवलंबितां येतो. शारीरिक शक्तीच्या दृष्टीनें आपण अत्यंत कमकुवत असलों आणि हिंसेचा उपयोग कसा करावा याचें यत्किंचितहि ज्ञान नसलें तरीं देखील. आपण निर्भय असलों आणि इच्छाशक्ति जबर असली तर एकाकी असूनहि. जगांतल्या सर्वांत शक्तिशाली प्रतिस्पर्ध्यांबरोबर दोन हात करतां येतील. असल्या लढ्यांत संख्याबलाला महत्त्व नसतें विशेषेंकरून हें नैतिक हत्यार आहे. आणि त्याचा उपयोग करतांना आपल्या पाठीशीं संख्याबल आहे कीं नाहीं हें अजमावण्याची गरज नाहीं. आत्मशुद्धीनंतरच सत्याग्रहीला या मार्गाचें अवलंबन करतां येईल. प्रतिपक्षाला मनानें देखील न दुखविण्याइतकी तयारी झाली नसली तरी सत्याग्रहीनें त्याला आपल्या शब्दानें किंवा आचरणानें तरी निदान दुखवतां कामा नये. त्याचप्रमाणें त्यानें हातीं घेतलेल्या कार्यासाठीं जास्तींत जास्त त्याग करण्याची तयारी ठेवली पाहिजे. विरोधकाचें संपूर्ण परिवर्तन होईलच असा विश्वास त्यानें बाळगला नाहीं तरी आजपर्यंत झालेल्या सत्याग्रहमोहिमांतील विजयावरून त्याला एक गोष्ट शिकतां येण्यासारखी आहे कीं इतर कोठल्याहि

परिणामकारक मार्गाइतकीच या मार्गांतहि विरोधकाला नमविण्याची शक्ति आहे.

आपण घटकाभर असें धरून चालूं कीं एखाद्या मोहिमेंत मोठा जन-समुदाय गोंवला गेला आहे. अशा ठिकाणीं त्याच्याकडून कमींत कमी कोणत्या शिस्तीची आपण अपेक्षा करावी? पहिली गोष्ट म्हणजे ज्या गाऱ्हाण्यासाठीं लोक झगड्यास प्रवृत्त झाले आहेत तें नाहींसें व्हावें अशी त्यांना खरोखरच तळमळ असली पाहिजे. आपल्या पुढाऱ्यावर त्यांचा विश्वास असला पाहिजे. कांहीं झालें, चिथावण्याचा कितीहि प्रयत्न करण्यांत आला, तरी त्यांनीं आपली अहिंसा सोडतां कामा नये. त्यांच्यांत एकी असली पाहिजे आणि कार्यक्रमाबाबत सर्वांचें जवळ जवळ एकमत असलें पाहिजे. हंसतमुखानें आत्मक्लेश सहन करण्याची त्यांनीं तयारी ठेवली पाहिजे. आणि चळवळ चालविणारांवर आर्थिक मदतीकरतां अवलंबून राहतां कामा नये. अहिंसेचीं सर्व अंगोपांगें जनतेनें आत्मसात् केलींच पाहिजेत असें नाहीं. चालकांनीं तीं आत्मसात् केलीं असलीं आणि जनतेची त्यांच्यावर श्रद्धा असली तरी काम भागेल. त्यांनीं शेवटपर्यंत आपल्या पुढाऱ्यांच्या आज्ञेंत राहिलें पाहिजे. ज्याप्रमाणें सशस्त्र लढाईंत प्रत्येक सैनिकाला सेनापतीइतकें ज्ञान असलें पाहिजे अशी अपेक्षा आपण करीत नाहीं त्याचप्रमाणें या ठिकाणींहि आपल्याला चळवळ चालविणाऱ्याइतकी सर्वांगीण तयारीची अपेक्षा जनतेकडून करतां यावयाची नाहीं. लष्करांतील सैनिकाइतकी शिस्त आणि निष्ठा जनतेजवळ असली म्हणजे झालें. यासाठीं पूर्वशिक्षण आवश्यक असून तें विधायक कार्यक्रमाच्या द्वारा देण्यांत आलें पाहिजे. आणि सामान्यतः सत्याग्रहाच्या आधीं विधायक कार्य सुरू असलें पाहिजे.

एक हत्यार या दृष्टीनें सत्याग्रहाचींहि कांहीं महत्त्वाचीं अंगें आहेत. प्रबल पाशवी शक्तीच्या अंकित असलेल्या पददलित आणि निःशस्त्र लोकांना सहजासहजीं वापरतां येईल असें याखेरीज दुसरें एखादें साधन सांपडूं शकेल असें वाटत नाहीं. विख्यात विचारवंत लेखकांपैकीं टॉलस्टॉय, जोड आणि अल्डुस हक्स्ले यांच्या लेखनाचा निष्कर्ष हाच आहे.

सत्याग्रहाची व्याप्ति : : ८

ज्यानें जीवनपथ म्हणून सत्याग्रहाचा अवलंब केला आहे त्याला बचावाचें वा चढाईचें हत्यार म्हणून कराव्या लागणाऱ्या त्याच्या वापरांत नवीन असें कांहीं वाटत नाहीं. सत्याग्रहमार्गाच्या श्रेष्ठतेबद्दल आणि परिणामकारकतेबद्दल विश्वास वाटत असल्यानें दुसरा कोणताहि मार्ग तो तुच्छ मानतो. त्याचा प्रतिपक्षी एखादी व्यक्ति असो, जमात असो नाहीं तर प्रस्थापित सत्ता असो, त्याचें हत्यार हें एकच राहणार.

परंतु केवळ एक हत्यार म्हणूनच जे सत्याग्रहाकडे बघतात त्यांची गोष्ट निराळी असते. एक तर निरनिराळ्या मार्गांपैकीं प्राप्त परिस्थितींत सर्वांत सोईस्कर म्हणून ते या मार्गाचा अवलंब करतात किंवा त्यांची अशी खात्री पटलेली असते कीं या मार्गाखेरीज अन्य उपाय नाहीं. म्हणून परिणामतः त्यांना हाच मार्ग पत्करावा लागतो. पण एकदां या मार्गाचा अवलंब केल्यानंतर त्याबरहुकूम वर्तन करणें हें ओघानेंच येतें. हा मार्ग वापरणाराला त्याच्या कांहीं मर्यादाहि पत्कराव्या लागतात. सत्याग्रहांत अशा मर्यादा अंगभूतच आहेत. सत्याग्रह हें सत्यावर आधारलेलें नैतिक शस्त्र आहे म्हणून फक्त नैतिक व प्रामाणिक उद्दिष्टासाठींच तेवढें तें वापरतां येईल. अत्यंत शुद्ध आणि नीतिमान् अशा व्यक्तींनीं त्याचा उपयोग केला तरच तो जास्तींत जास्त परिणामकारक होऊं शकेल. आतां या साधनाची व्याप्ति काय आहे तें पाहूं.

कांहीं जण असें म्हणतात कीं सत्याग्रह हें फक्त दुर्बलांनीं वापरावयाचें साधन असून त्याचें क्षेत्र फारच मर्यादित आहे. गांधीजींनीं दक्षिण आफ्रिकेंत त्याचा प्रथम उपयोग केला त्या वेळीं देखील त्यांचेवर अशीच टीका करण्यांत आली. सत्याग्रह आणि निःशस्त्र प्रतिकार यांबाबत टीकाकारांचा गैरसमज झालेला होता. गांधीजींनीं त्या टीकेला विरोध करून असें दाखवून दिलें कीं त्यांच्या मार्गाला निःशस्त्र प्रतिकार म्हणणें

हा सत्याग्रह या शब्दाचा दुरुपयोग करण्यासारखें आहे. ते म्हणाले कीं भविष्यांत करावयाच्या हिंसेची तयारी किंवा हिंसा करणें शक्य नसल्यानें निःशस्त्र प्रतिकाराचा अवलंब होत असेल आणि हिंसा हें तथाकथित सबलांचें साधन मानलें जात असेल तर निःशस्त्र प्रतिकाराला दुर्बलांचें हत्यार असें म्हणतां येईल. त्यांनीं असें दाखवून दिलें कीं हिंसामार्गाचा विचारहि कधीं त्यांच्या मनांत आला नाहीं. आणि तो अवलंबितां येण्याजोगी परिस्थिति असती तरी देखील त्यांनीं त्याचा स्वीकार केला नसता. त्यांनीं असें जाहीर केलें कीं आत्मिकदृष्ट्या बलवान् असलेल्यांचा मार्ग म्हणूनच सविनय प्रतिकाराचा अवलंब केला असून तो कुठल्याहि परिस्थितींत आचरणांत आणतां येण्यासारखा आहे. शारीरिक दृष्ट्या ते आणि त्यांचे सहकारी दुर्बल असणें शक्य आहे पण त्याला फारसें महत्त्व नाहीं. गांधीजींनीं सविनय प्रतिकाराचा अंगीकार केला तो तें एक श्रेष्ठ शस्त्र व एकमेव साधन म्हणूनच. अशा तऱ्हेनें शक्य तर हिंसा वापरण्याची ज्याची तयारी असते त्यांच्या दृष्टीनें सत्याग्रह दुर्बल, निःशस्त्र व असहाय लोकांचें शस्त्र आहे. परंतु सत्याग्रही बलवन्ताचें शस्त्र म्हणूनच त्याकडे बघतो. कारण हिंसा ही भीतिच्याच पोटीं जन्माला येते आणि म्हणून तें आत्म्याच्या शक्तीचें लक्षण नसून दुर्बलतेचें लक्षण आहे असा सत्याग्रहीं विश्वास बाळगतो.

सत्याग्रहीच्या दृष्टीनें आपल्याकडे पुरेसें बाहुबल आहे किंवा नाहीं, आपल्या बाजूला संहारक शस्त्रें आहेत किंवा नाहींत हे मुद्दे गौण ठरतात. लढ्याची प्रेरणा प्रेमांतून निर्माण झाली आहे कीं तिरस्कार आणि भय यांतून ती उगम पावली आहे, आपण आत्मक्लेश सोसण्यास राजी आहोंत कीं दुसऱ्याला पीडा देण्याचा आपला इरादा आहे, विरोधकाला आपण नैतिक शक्तीनें वळवून घेणार किंवा नमवावयास लावणार कीं बाहुबलाच्या जोरावर त्याला वठणीवर आणणार, या गोष्टींनाच सत्याग्रहीच्या मतें सर्वांत जास्त महत्त्व आहे. त्याच्या दृष्टीनें भीति, द्वेष, हिंसा, गुप्तता आणि दुसऱ्यावर क्लेश लादण्याच्या सर्व प्रवृत्ति या नैतिक आणि आध्यात्मिक दुर्बलतेच्या द्योतक आहेत. म्हणून त्यांचें सर्वांना नेहमीं असें कळकळीचें

सांगणें असतें कीं आपण आत्मिक शक्ति कमावली पाहिजे, नैतिक आणि मानसिक क्षेत्रांत बलवान् झालें पाहिजे. आणि प्रेम व आत्मक्लेश यांच्या योगानें शत्रूला जिंकून घेतलें पाहिजे.

मूल्यमापनाच्या दृष्टीनें अहिंसक प्रतिकार आणि प्राणांतिक आत्मक्लेश यांना सत्याग्रही अत्युच्च स्थान देतो. तें जर शक्य नसेल तर त्याच्या खालोखाल तो हिंसक प्रतिकार मान्य करील. परंतु दुःख आणि अन्याय यांपुढें आळसटासारखें नमतें घेणें, भीतीनें माघार घेणें किंवा मेल्या मढ्या-प्रमाणें निष्क्रिय राहणें तो कधींहि सहन करणार नाहीं. 'अन्यायाचा अप्रतिकार' याचा अर्थ निष्क्रियता, अगतिकता किंवा भित्रेपणा असा होत असेल तर तो मनांतून काढून टाकला पाहिजे. कोणत्याहि निष्क्रिय किंवा भित्र्या माणसानें अहिंसा, अप्रतिकार किंवा सत्याग्रह या शब्दांच्या पाठीशीं दडतां कामा नये असें सत्याग्रहीला वाटतें व असला प्रकार तो कधींहि सहन करीत नाहीं. उलट तो म्हणतो, 'तुमच्यांत जर कांहीं माणुसकी असेल तर तुम्हाला प्रतिकार हा केलाच पाहिजे.' हिंसा आणि अहिंसा यांत जरी दोन ध्रुवांइतकें अंतर असलें तरी अन्यायाचा प्रतिकार करण्याच्या दृष्टीनें मित्रेपणा आणि निष्क्रियता यांपेक्षां या दोन्ही एक-मेकाच्या जवळ आहेत.

सत्याग्रहाच्या व्याप्तीसंबंधीं विचार करतां असें आढळून येईल कीं, हिंसामार्गापेक्षां या मार्गांत आणखी एक मोठा फायदा आहे. अगदीं अशक्तातला अशक्त देखील अहिंसेचा उपयोग करून शक्तिसम्राटाविरुद्ध विजय मिळविण्याची आशा करूं शकतो. पण हिंसेच्या बाबतींत तें कधींहि शक्य होणार नाहीं. 'काँग्रेस रेस्पॉन्सिबिलिटी टु डिस्टर्बन्सेस' या सरकारी चोपड्यास उत्तर देतांना (१५-७-४३ परिच्छेद क्र. ६३) गांधीजी म्हणतात, "अशा तऱ्हेनें हिंसेच्या मार्गांत इजा करण्यापासून तों आक्रमकाचा निःपात करण्यापर्यंत सगळ्याचा अंतर्भाव होतो. आणि हिंसा विरोधकापेक्षां जास्त सामर्थ्यवान् असेल तरच विजयी होऊ शकेल. परंतु अहिंसक मार्ग मात्र विरोधकाची हिंसाशक्ति केवढीहि जबरदस्त आणि संघटित असली तरी तिच्याविरुद्ध अंगीकारता येईल. दुर्बलानें प्रबलाविरुद्ध

वापरलेली हिंसा यशस्वी झाल्याचें एकहि उदाहरण सांपडणार नाहीं; उलट अगदीं दुर्बलांचा देखील अहिंसक प्रतिकार यशस्वी होतो हा नित्याचा अनुभव आहे." यावरून सत्याग्रहाचें क्षेत्र केवढें व्यापक आहे तें आढळून येईल.

सत्याग्रह कोणकोणत्या कारणांसाठीं आचरला जाऊं शकेल याची कल्पना वर दिलीच आहे. ज्या प्रमाणांत तो मार्ग वापरणारा सत्यवान्, निर्भय आणि कोठल्याहि नैतिक कलंकापासून अलिप्त असेल त्या प्रमाणांत या साधनाची परिणामकारकता वाढत जाईल. अन्याय केवढाहि मोठा अथवा लहान असला तरी त्याचा प्रतिकार करण्यासाठीं, कोणत्याहि संस्थेंत अथवा समाजांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं, एखादा अन्याय किंवा जाचक कायदा रद्द करून घेण्यासाठीं, कोणतेंहि गाऱ्हाणें दूर करून घेण्यासाठीं, जातीय दंगे थांबवण्यासाठीं, प्रस्थापित सरकारच्या राज्यपद्धतींत बदल घडवून आणण्यासाठीं, आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठीं, एका सरकाराऐवजीं दुसरें सरकार प्रस्थापित करण्यासाठीं या साधनाचा उपयोग करून घेतां येईल. यावरून हें लक्षांत येईल कीं सत्याग्रहाचें क्षेत्र खूप विस्तृत आहे. कदाचित् अद्यापपर्यंत त्याचा वरील सर्व क्षेत्रांत अवलंब केला गेला नसेल परंतु त्यामुळें त्याच्या शक्याशक्यतेचा विचार करण्यास कोणतीच अडचण पडणार नाहीं.

सत्याग्रहाचा उपयोग कोणकोणत्या क्षेत्रांत करतां येणें शक्य आहे या प्रश्नाचा आतां विचार केला पाहिजे. गांधीजींनीं 'हरिजन'मधील आपल्या 'प्रत्येक ब्रिटिशास' या लेखांत (६-७-४०) असें म्हटलें आहे कीं; " मीं अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतिनुसार गेलीं पन्नास वर्षें अविरतपणें अहिंसेचा उपयोग करीत आहें. कौटुंबिक, संस्थांविषयक, आर्थिक आणि राजकीय अशा प्रत्येक क्षेत्रांत तिचा अवलंब केलेला आहे." दुसऱ्या एका ठिकाणीं त्यांनीं म्हटलें आहे कीं प्रस्थापित सरकाराविरुद्ध अहिंसेचा उपयोग करतां येईल आणि हिंदुस्थानांत पुन्हां पुन्हां त्या तऱ्हेचे प्रयोग होत आहेत. साला अर्थातच राजकीय क्षेत्र असें म्हणतां येईल. परकीय उपटसुंभ सरकारच्या हातून आम जनतेच्या राजकीय हक्कांना मान्यता मिळविण्या-

साठीं व झगडा करून तें प्रस्थापित करण्यासाठीं हिंदी लोकांचा लढा चालू आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं असेंहि म्हटलें आहे कीं जातीय दंगे थांबविण्यासाठीं या मार्गाचा अवलंब करतां येईल. मात्र त्यासाठीं दोन्ही जमातींतील लोकांपुढें ज़ातांना आपलीं शिरकमळें तळहातावर घेऊनच गेलें पाहिजे आणि त्यांच्याशीं अत्यंत समजूतदारपणाची व विनम्र अशीच भाषा आपण वापरली पाहिजे. चालून येणाऱ्या सैन्यासमोर आत्मसमर्पण करण्यास तयार असलेलीं मृत्युपथकें जय्यत खडीं ठेवून परकीय आक्रमण देखील या मार्गानें थांबवतां येईल. मृत्युपथकांना न जुमानतां आक्रमण करून देशाचा ताबा घेणाऱ्या सैन्याशीं संपूर्ण असहकार करतां येईल. या विषयावरील खालील प्रश्न व गांधीजींनीं त्यांना दिलेलीं उत्तरें उद्‌बोधक आहेत.

प्रश्न पहिला:— सत्याग्रहानें संपूर्ण स्वातंत्र्य मिळवितां येईल असें मानलें तरी स्वतंत्र हिंदुस्तानांत तें सरकारी धोरणाचें सूत्र म्हणून राहण्याची कितपत शक्यता आहे ? किंवा निराळ्या शब्दांत बोलावयाचें तर शक्तिशाली स्वतंत्र हिंदुस्थान आत्मसंरक्षणासाठीं सत्याग्रहावर अवलंबून राहील कीं सत्याग्रह मागें पडून बचावासाठीं कां होईना पण जुन्यापुराण्या युद्धसंस्थेचाच आश्रय करील ? केवळ सैद्धांतिक दृष्टीनें प्रश्नाची मांडणी करावयाची झाल्यास ती अशी करतां येईल : ज्या ठिकाणीं बलिदानाचें तत्त्व संपूर्णपणें परिणामकारक ठरण्यासारखें असतें अशा बिकट लढ्यासाठींच फक्त सत्याग्रहाचा अवलंब केला जाईल कीं बलिदानाच्या तत्त्वानुसार वागण्याची गरज अथवा वाव नसलेल्या सार्वभौम सत्तेकडूनहि हत्यार म्हणून वापरला जाईल ?

प्रश्न दुसरा:— समजा स्वतंत्र हिंदुस्ताननें सरकारी धोरण म्हणून सत्याग्रहाचा स्वीकार केला आणि दुसऱ्या एखाद्या राष्ट्राकडून आक्रमण झालें तर त्याचा प्रतिकार कशा तऱ्हेनें करण्यांत येईल ? सैद्धांतिक स्वरूपांत हा प्रश्न मांडावयाचा झाल्यास : सरहद्दीवर चाल करून आलेल्या सैन्याला तोंड देण्यासाठीं सत्याग्रही कशा तऱ्हेचे पवित्रे टाकील ? हिंदी राष्ट्रवादी आणि ब्रिटिश सरकार यांच्यांत आज प्रतिकाराचें जसें एकच क्षेत्र निर्माण झालें आहे तसें झाल्याशिवाय विरोधकाचा प्रतिकार सरहद्दीवर कोणत्या तऱ्हेनें

करण्यांत येईल ? अथवा निरोधक देशाचा ताबा घेईपर्यंत सत्याग्रहीला प्रतिकार बंद ठेवावा लागेल ?

उत्तरः— प्रश्न सैद्धांतिक स्वरूपाचे आहेत यांत शंकाच नाहीं. अहिंसेचें पूर्ण तंत्र मीं अद्याप आत्मसात् केलेलें नसल्यानें हे प्रश्न आजच उत्पन्न करणें अकालीं आहे. माझा प्रयोग चालू आहे. अजून तो पुरेसा पुढें देखील गेलेला नाहीं. या प्रयोगाचें स्वरूप अशा प्रकारचें आहे कीं प्रत्येक वेळीं टाकलेल्या एकेका पावलावर समाधान मानणें भाग आहे. दूरच्या भविष्याकडे नजर लावणें हें आपलें काम नाहीं. म्हणून माझीं उत्तरें केवळ अंदाजात्मक अशींच असूं शकतील. खरें पाहतां मीं पूर्वी म्हटल्याप्रमाणें आज देखील स्वातंत्र्यसंपादनाच्या लढ्यांत आपण निर्भेळ अहिंसेचा अवलंब केलेला नाहीं.

पहिल्या प्रश्नाबाबत बोलावयाचें तर आज मला दिसतें त्यावरून सरकारी धोरण म्हणून अहिंसातत्त्वाचा अंगीकार केला जाण्याचा संभव अत्यल्प आहे अशी मला धास्ती वाटते. हिंदुस्ताननें स्वातंत्र्यसंपादनानंतर धोरण म्हणून अहिंसेचा स्वीकार केला नाहीं तर दुसरा प्रश्न अनावश्यक ठरतो.

परंतु अहिंसेच्या सुप्त शक्तीबद्दलचा माझा वैयक्तिक दृष्टिकोण मी सांगूं शकेन. राष्ट्रांतील बहुसंख्य लोक जर अहिंसक असतील तर अहिंसक पायावर सरकार चालवितां येईल असा माझा विश्वास आहे. माझ्या माहितीप्रमाणें हिंदुस्तान हाच एक देश असा आहे कीं जेथें अशा तऱ्हेचें सरकार अस्तित्वांत येण्याची शक्यता आहे. याच विश्वासानें मी माझे प्रयोग चालवीत आहें. म्हणून हिंदुस्ताननें आपलें स्वातंत्र्य शुद्ध अहिंसेनें प्राप्त करून घेतलें तर त्याच मार्गानें तें टिकवतां देखील येईल. अहिंसक व्यक्ति अथवा समाज बाहेरून आक्रमण येईल असें धरून चालत नाहीं किंवा आधींपासून त्याच्या प्रतिकाराची तयारी करीत नाहीं. उलट अशी व्यक्ति किंवा समाज असा दृढविश्वास बाळगतो कीं त्याला त्रास देण्यास कोणीहि उद्युक्त होणार नाहीं. परंतु जर अनिष्ट गोष्ट घडून आलीच तर अहिंसेपुढें दोन मार्ग असतील. आक्रमकाला ताबा घेऊं द्यावयाचा परंतु त्याच्याशीं असहकार करावयाचा.

म्हणजे एखादा आधुनिक नीरो हिंदुस्तानांत उतरला तर सरकारचे प्रतिनिधि त्याला येऊं देतील पण असें बजावतील कीं लोकांकडून त्याला कसलीहि मदत मिळणार नाहीं. त्याच्यापुढें मान वांकविण्याऐवजीं ते मरण पत्करतील. दुसरा मार्ग म्हणजे ज्यांना अहिंसामार्गाचें शिक्षण देण्यांत आलेलें आहे अशा लोकांनीं अहिंसक रीतीनें प्रतिकार करणें हा होय. स्वतः निःशस्त्र राहून ते आक्रमकाच्या तोफांपुढें उभे राहतील.

वरील दोन्ही मार्गांत हीच श्रद्धा वसत असते. नीरोला देखील हृदय आहे. आक्रमकापुढें मान तुकवण्यापेक्षां स्त्री-पुरुषांच्या पलटणीच्या पलटणी मरण्यास तयार झाल्याच्या अनपेक्षित दृश्यानें अखेरीस आक्रमकाच्या व त्याच्या सैन्याच्या हृदयाचा ठाव सुटल्याखेरीज राहणार नाहीं. व्यावहारिक दृष्टीनें बोलावयाचें तर सशस्त्र प्रतिकारामुळें जेवढीं माणसें खचीं पडलीं असतीं तेवढीं बहुधा यामुळें पडणार नाहींत. शस्त्रसामग्री किंवा तटबंदी यांचाहि खर्च त्यामुळें वांचेल. लोकांना मिळालेलें अहिंसेचें शिक्षण त्यांच्या नैतिक दर्जांत कल्पनेबाहेर वाढ करील. असें स्त्री पुरुष सशस्त्र युद्धांत सैनिक दाखवतात त्यापेक्षां किती तरी पटीनें श्रेष्ठ असें वैयक्तिक शौर्य गाजवतील. खरें शौर्य मरण्यांत असतें, मारण्यांत नव्हे, आणि अखेरीला अहिंसक प्रतिकारांत पराभव अशी कांहीं चीजच असूं शकत नाहीं. अशा तऱ्हेची घटना पूर्वीं कधीं घडून आलेली नाहीं हें कांहीं मी करीत असलेल्या अंदाजाचें खंडन होऊं शकत नाहीं. मीं एखादें अशक्य कोटींतील चित्र रंगवलेलें नाहीं. मीं उल्लेखिलेल्या वैयक्तिक अहिंसेच्या उदाहरणांनीं इतिहास भरलेला आहे. स्त्री-पुरुषांचे समूह अहिंसेचें पुरेसें शिक्षण मिळाल्यास समूह म्हणून किंवा राष्ट्र म्हणून अहिंसक वर्तन करणार नाहींत असें म्हणण्यास किंवा मनांत आणण्यास आधार नाहीं. मानवजातीच्या अनुभवाची एकंदर गोळाबेरीज अशी आहे कीं माणसें या ना त्या प्रकारें एकमेकांशीं जमवून घेत असतात त्यावरूनच मी असें प्रतिपादन करतों कीं प्रेमाचा कायदाच मानवावर आपलें अधिराज्य चालवीत आहे. हिंसा म्हणजेच जर द्वेष आपल्यावर सत्ता चालवीत असता तर आपण यापूर्वीच नष्ट होऊन गेलों असतों. आणि तरीहि दुर्दैवाची गोष्ट अशी कीं तथाकथित

सुसंस्कृत व्यक्ति आणि राष्ट्रं हिंसा हाच समाजाचा पाया होता असें समजून आचरण करीत आहेत. प्रेम जीवनाचा एकमेव आणि सर्वश्रेष्ठ कायदा आहे असें सिद्ध करून देणारे प्रयोग करण्यांत मला अनिर्वचनीय आनंद होतो. याविरुद्ध कितीहि पुरावा गोळा झाला तरी माझी श्रद्धा विचलित होणार नाहीं. हिंदुस्ताननें वापरलेली अपुरी अहिंसा देखील या विधानाला पोषक अशीच आहे. पण येवढ्यानें अश्रद्धांची खात्री पटणार नसली तरी सहृदय टीकाकारांचा दृष्टिकोण सहानुभूतिपूर्ण करण्यास तें पुरेसें आहे.

आतां पुढचा प्रश्न या मार्गाचा अवलंब कोणाकोणाला करता येईल. एक गोष्ट अगदीं स्पष्ट आहे कीं ज्याच्यापाशीं नैतिक आणि मानसिक शक्तीचा अभाव असेल त्याला या शस्त्राचा उपयोग करतां येणार नाहीं. आपली बाजू सत्याची असेल आणि त्यासाठीं कसलाहि असद्भाव न बाळगतां हंसत कष्ट सहन करण्याची तयारी असेल, आणि आपल्याजवळ पुरेसें नैतिक पाठबळ असेल तरच लढ्यांत आपली बाजू अभेद्य ठरेल. शारीरिक दौर्बल्य, किंवा म्हातारपण हें कांहीं या मार्गांतील दोष ठरूं शकत नाहींत. स्त्रियाहि या लढ्यांत सामील होऊं शकतात. सिद्धान्ताची बाजू माहीत नसतांना मुलें देखील या मार्गाचा अवलंब करतांना आढळतात. कोणत्याहि अन्यायाविरुद्ध एखादी व्यक्ति देखील या शस्त्राचा उपयोग करण्यास सुरुवात करूं शकेल. त्याचप्रमाणें लहान गट, कमेट्या, समाज आणि राष्ट्रं देखील हा मार्ग अवलंबूं शकतील.

या शस्त्राचा उपयोग कोणाविरुद्ध होऊं शकेल ? एखाद्या व्यक्तीविरुद्ध हत्यार म्हणून उपयोग केला जावा अशी सत्याग्रहाची मुळांतच कल्पना नाहीं. त्याचा रोख अन्यायाविरुद्ध असून तो नाहींसा करण्यासाठींच त्याचे प्रयत्न असतात. वस्तुतः सत्याग्रही आणि बाह्यतः ज्या व्यक्तीविरुद्ध हा मार्ग वापरण्यांत येतो ती व्यक्ति या दोहोंच्याहि बाबतींत अन्याय हा सारखाच शत्रु आहे. अन्यायाचें व्यक्तिकरण आणि अवलंबन व्यक्तींच्या किंवा गटांच्या मार्फत होत असतें. म्हणून सत्याग्रहाची योजना बाह्यतः व्यक्तीच्या विरुद्ध करावी लागते. परंतु वस्तुस्थिति अशी असते कीं सत्याग्रही त्या व्यक्तीवरहि प्रेम करीत असतो आणि अन्यायाचा केवढा तो तिरस्कार

करीत राहतो. आत्मक्लेशाच्या योगानें व्यक्तींना ते करीत असलेल्या अन्यायापासून परावृत्त करण्याची त्याची इच्छा असते. सत्याग्रही व्यक्तीव्यक्तींत उच्चनीचभाव पहात नाहीं. आणि तो सर्वांवर प्रेम करीत असल्यामुळें पक्षपातहि करीत नाहीं. परंतु जेथें जेथें अन्याय दिसेल तेथें तेथें तो ठेचून काढण्याची त्याची इच्छा असते. म्हणून गीतेंत आपल्याच आप्ताविरुद्ध हत्यार कसें उगारावें असा अर्जुनाला पडलेला संमोह अहिंसक लढ्याचे वेळीं निर्माण होत नाहीं. परकीयांच्या किंवा आपल्या कट्टया शत्रूच्याप्रमाणेंच अगदीं जवळच्या नातेवाईकांविरुद्ध देखील याचा अवलंब करतां येतो. तें प्रेमाचें हत्यार असून कोणाकडेहि तें परकेपणानें पहात नाहीं किंवा कोणालाहि इजा करण्याचें मनांत आणीत नाहीं. प्रेम स्वतःला जाळून घेतें, दुसऱ्याला कधींहि जाळीत नाहीं. जो कोणी अन्याय करीत असेल त्याच्यावर तेवढ्यापुरता सत्याग्रही हल्ला चढवील– मग ती एखादी व्यक्ति, जमात सबंध समाज, सरकार अथवा राष्ट्र कोणीहि असो. पण ही गोष्ट आपण विसरतां कामा नये कीं सत्याग्रह हल्ला चढवतो तो त्या अन्यायावर; अन्याय करणाऱ्या व्यक्तीवर नव्हे.

सत्याग्रहाचीं विविध स्वरूपें : : ९

सत्याग्रहाच्या सर्व स्वरूपांची येथें यादी देण्याचा इरादा नाहीं. त्यांचीं स्वरूपें ठरविण्याचें खरें गमक परिस्थिति हेंच आहे. येथें सत्याग्रहांत निषिद्ध काय मानलें जातें याचे सामान्य नियम तेवढे देतां येतील. त्याचप्रमाणें सत्याग्रहाला विहित काय आहे हें शोधण्याच्या दृष्टीनें कांहीं मुद्दे सूचित करतां येतील आणि त्यांच्या कांहीं स्वरूपांचें स्पष्ट वर्णन देतां येईल.

सत्याग्रह काय वाटेल तें झालें तरी व्यक्तिगत हिंसेचा विचार कालत्रयींहि मनांत आणणार नाहीं. प्रतिस्पर्ध्याला कसल्याहि प्रकारची इजा

किंवा धोका पोहोंचूं न देण्याचा किंवा तसा विचार देखील मनांत येऊं न देण्याचा निर्धार हा अहिंसक प्रतिकाराचा गाभा आहे. सामान्यपणें सर्व मालमत्तेबाबत देखील असेंच म्हणतां येईल. परंतु मालमत्ता ही जर मूलतः व संपूर्णपणानें समाजाला विघातक असेल तर या नियमाला अपवाद करावा लागेल. दारूगोळा आणि मादक पदार्थ हीं या अपवादाचीं उदाहरणें होऊं शकतील. 'कॉंग्रेस रेस्पॉन्सिबिलिटी' या चोपड्याला उत्तर देतांना (१५-७-४३) गांधीजी परिच्छेद क्र० ६३ मध्यें म्हणतात, "ब्रिटिश साम्राज्यशाहीचा हिंदुस्तानांतील राज्यकारभार चालविण्याची धुरा पत्करणाऱ्या व्यक्ति किंवा त्यांची मालमत्ता यांना धक्का लावण्याच्या विचाराइतकी दुसरी कोणतीहि गोष्ट माझ्या विचारसरणीपासून दूरावलेली नाहीं. माझी अहिंसा व्यक्ति आणि तिनें तयार केलेलें यंत्र किंवा बसविलेली पद्धति यांत मूलभूत फरक करते. कोठल्याहि तऱ्हेचा किंतु मनांत न आणतां धोका देणारें यंत्र मी निःशंकपणें नष्ट करीन. पण व्यक्तीला मात्र मी कधींहि हात लावणार नाहीं." विरोधकाला– विशेषतः तो संकटांत सांपडलेला असतांना– अडचणींत न टाकणें हा प्रेमाच्या तत्त्वाचा उपसिद्धान्त आहे. आत्मक्लेश आणि आत्मशुद्धि हीं सत्याग्रहांत अंतर्भूत आहेत. म्हणून सत्याग्रह जीं स्वरूपें धारण करील तीं क्लेश, शुद्धि, तपश्चर्या, सेवा आणि त्याग यांवर आधारलेलीं असतील. त्याचप्रमाणें सत्याग्रहीनें अन्यायांशीं असहकार केला पाहिजे अशी अपेक्षा बाळगली जाते. त्याचा असा दावा असतो कीं त्याची बाजू समंजसपणाची आहे म्हणून शान्तपणें विरोधकाच्या सदबुद्धीला आळविण्याचा त्याचा हक्क प्राप्त होतो. मात्र तसें करतांना त्यानें क्लेश सहन करावयाची तयारी ठेवली पाहिजे. स्वाभिमान, न्याय किंवा विवेक यांना विरोधी असणारे कायदे मोडण्यास तो बांधला गेला आहे. सत्याग्रह म्हणजे अहिंसक प्रत्यक्ष प्रतिकार. एखाद्या ठिकाणीं जाण्याचा किंवा कर न भरलेल्या मिठासारखी एखादी वस्तु ताब्यांत घेण्याचा आपला हक्क बजावतांना परिणाम भोगण्याची तयारी ठेवून शांततामय प्रत्यक्ष प्रतिकाराचा अंगीकार करण्यास तो मोकळा असतो. आपला स्वाभिमान टिकवून राहणें सत्याग्रहीला अशक्य झालें तर त्यानें

देशत्याग करावा. परंतु भीतीमुळें त्यानें केव्हांहि पळ काढतां कामा नये. प्राणांतिक उपोषणाचा मार्गहि सत्याग्रहीला खुला असतो. सत्याग्रहीच्या शस्त्रागारांतील तें ब्रह्मास्त्र होय असें म्हणतां येईल. परिस्थित्यनुरूप सत्याग्रहाचीं स्वरूपें कोणतीं राहतील त्याचें हें स्थूल वर्णन झालें. विधायक कार्य, सभा, मिरवणुकी, हरताळ, आत्मशुद्धीसाठीं उपवास, सामुदायिक प्रार्थना, करबंदीसकट असहकार, बहिष्कार, निरोधन, सविनय कायदेभंग, शांततामय मोर्चे, हिजरत किंवा देशत्याग आणि अखेरीस प्राणांतिक उपवास हीं सत्याग्रहाचीं कांहीं सर्वमान्य स्वरूपें होत.

सत्याग्रहाच्या तीन प्रमुख प्रकारांवरून विधायक, आत्मशुद्धीविषयक आणि आक्रमक अशी त्याची तीन स्वरूपांत वर्गवारी करतां येईल. गांधीजींच्या पंधरा कलमी विधायक कार्यक्रमासकट सर्व प्रकारचीं विधायक कार्यें हें सत्याग्रहाचें विधायक स्वरूप झालें. सत्याग्रह संघटना आणि तयारी या अवस्थेत असेल तर त्या वेळीं त्याचें स्वरूप अशा तऱ्हेचें राहतें. आणि त्या वेळीं प्रेमाला स्वार्थरहित सेवा आणि त्याग यांचें स्वरूप प्राप्त होतें. हरताळ, उपवास, प्रार्थना आणि अशाच दुसऱ्या त्यागपूर्ण स्वरूपांचा परिणाम आत्मशुद्धींत होतो. अन्यायाशीं आपण होऊन सहकार करण्याचें बंद करणें ही देखील एका अर्थानें आत्मशुद्धिच आहे. सत्याग्रहाचीं हीं स्वरूपें आचरणांत आणल्यानें सत्याग्रहीला पुढची पायरी गांठण्याचा अधिकार प्राप्त होतो. ज्या वेळीं सत्याग्रही बुद्धिपुरःसर एखादा कायदा मोडण्यासाठीं प्रत्यक्ष कृत्यानें अन्यायावर हल्ला चढविण्यास सुरुवात करतो त्या वेळीं त्याला सत्याग्रहाचें आक्रमक स्वरूप असें म्हणतात. त्या योगानें तो दडपशाही व क्लेश ओढवून घेतो. येवढेंच नाहीं तर अन्याय नाहींसा करण्याऱ्या प्रयत्नांत तो मरण्यास देखील तयार असतो.

यथार्थ कल्पना येण्यासाठीं सत्याग्रहाचे कांहीं प्रकार वर सांगितले. सत्याग्रहाच्या विधायक स्वरूपाविषयीं येथें तपशीलांत शिरण्याचें कारण नाहीं. याचें विवरण परिशिष्टांत आलें आहे. त्यानंतर सभा, मिरवणुका वगैरे सत्याग्रहाचे दुसरे प्रकार इतके साधे आहेत कीं त्यांचें स्पष्टीकरण करण्याची जरूर नाहीं. हरताळापासून सुरुवात करून शेवटीं प्राणांतिक

उपोषणाच्या प्रकाराचें वर्णन खालीं देण्यांत आलें आहे.

१. हरताळ म्हणजे सामान्यपणें चोवीस तासपर्यंत सारे व्यवहार बंद ठेवणें किंवा संप करणें. तो निषेधाचा एक प्रकार आहे. हरताळाचें कारण जर पुरेसें गंभीर असेल आणि अन्यायाचें स्वरूप उग्र असेल तर हरताळाची मुदत वाढविली जाते.

२. उपवास (आत्मशुद्धिस्तव) साधारणपणें चोवीस तासांचाच असतो. तो वेळ आत्मनिरीक्षण आणि चिंतन यांतच घालवावयाचा असतो.

३. प्रार्थना म्हणजे आत्मशुद्धि आणि बलिदान यांसाठीं उच्च आध्यात्मिक शक्तींचा केलेला धावा.

४. प्रतिज्ञा म्हणजे एखाद्या व्यक्तीनें विशिष्ट गोष्टी करण्यासाठीं किंवा न करण्यासाठीं ईश्वर किंवा सत्य यांस साक्ष ठेवून जाहीरपणें केलेली गंभीर घोषणा.

५. असहकार म्हणजे अन्यायाशीं आपण होऊन सहकार न करणें. उदाहरणार्थ जर एखादें सरकार सर्वस्वीं अन्यायी असेल तर त्याला आपला कोठल्याहि प्रकारचा शारीरिक वा नैतिक पाठिंबा न देणें. जर सरकार अन्यायपूर्ण अशी एखादी विशिष्ट गोष्ट करीत असेल तर त्या कृत्यांत सरकारला मदत न करणें. अन्यायाशीं असहकार करतांना जे लोक असहकार करीत असतील त्यांच्यांत सहकार्याची अपेक्षा केली जाते.

६. करबंदी ही असहकारांतील शेवटची पायरी होय. सनदशीर भाषेंत बोलावयाचें तर कायदेमंडळातील मतानें नव्हे तर प्रत्यक्ष कृतीनें सरकारी वसूल भरण्यास दिलेला नकार म्हणजे करबंदी. या ठिकाणीं जॉन हॅमडननें पहिल्या चार्ल्सला नौका कर देण्याचें नाकारलें तें उदाहरण घेतां येईल. १७७६ मध्यें झालेल्या स्वातंत्र्ययुद्धांत अमेरिकन लोकांनीं केलेल्या 'प्रतिनिधि नाहींत तर कर नाहीं' या घोषणेंत देखील हेंच तत्त्व अंतर्भूत झालेलें आहे. या ठिकाणीं असहकार करणारा स्वखुषीनें सरकारचा वसूल भरण्याचें नाकारतो व त्याचे परिणाम भोगण्यास तयार असतो.

७. निरोधन म्हणजे एखादी गोष्ट करण्याबद्दल अथवा न करण्याबद्दल केलेली शांततामय व सविनय विनंति. उदाहरणार्थ, दारूगुत्त्यावरील

निरोधन म्हणजे गुत्त्याशेजारीं बसून अथवा उभें राहून दारू घेऊं इच्छिणाऱ्या प्रत्येकाला ती न घेण्याची विनंति करणें, दुसऱ्याच्या हद्दींत बेकायदा प्रवेश करणें, जमाव करणें, शारीरिक अडथळा करणें किंवा जमिनींवर आडवें पडणें हे प्रकार यांत बसत नाहींत.

८. सविनय कायदेभंग किंवा सविनय प्रतिकार याला जर सविनय म्हणावयाचें असेल तर तो संपूर्णपणें अहिंसात्मक असला पाहिजे व कसल्याहि प्रकारच्या दुर्भावना त्यांत असतां कामा नयेत. सविनय कायदेभंग म्हणजे एखाद्या विशिष्ट कायद्याची केलेली उघड व अहिंसक अवज्ञा होय. जर नवीनच लादण्यांत आलेल्या एखाद्या चीड आणणाऱ्या कायद्याचा प्रतिकार करावयाचा असेल तर तो बचावात्मक सविनय कायदेभंग होईल. पण जर अहिंसक प्रतिकाराचे वेळीं प्रस्थापित सरकारविरुद्ध करावयाच्या बंडाचें प्रतीक म्हणून कांहीं कायदे मोडण्यांत आले तर त्याला आक्रमक सविनय कायदेभंग असें म्हणतां येईल.

९. अहिंसक हल्ले किंवा मोर्चे हे आक्रमक सविनय प्रतिकाराचे प्रकार होत. ते १९३० सालीं झालेल्या साणेकट्टा, धारासना, शिरोडा यांसारखे मिठागरांवरील किंवा १९४२ मधील कोंताई व तामलुक यांसारखे पोलिसठाण्यांवरील हल्ले असूं शकतील. ते संपूर्णपणें अहिंसक व उघड असले पाहिजे.

१०. हिजरत म्हणजे स्वखुषीनें सरकारी हद्द सोडणें किंवा आपल्या सर्व हितसंबंधांचा त्याग करून सरकारी हद्दींतून निघून जाणें.

११. प्राणांतिक उपवास म्हणजे मृत्यु येईपर्यंत स्वखुषीनें अन्न वर्ज करणें. प्राणांतिक उपोषण बिनशर्त कधींहि असूं शकणार नाहीं, तें सशर्थच असलें पाहिजे; नाहीं तर त्याला आत्महत्या म्हणावें लागेल. त्याचा अवलंब सहजासहजीं कधींहि करतां कामा नये. त्यांत जबरदस्तीचा लवलेशहि असतां कामा नये. जबरदस्तीनें दुसऱ्याचीं मतें बदलण्यासाठीं किंवा आपलीं स्वतःचीं मतें दुसऱ्यावर लादण्यासाठीं त्याचा कधींहि उपयोग करतां कामा नये. त्याचा उपयोग अगदीं अखेरचें शस्त्र म्हणून केला पाहिजे व तें हातीं घेण्यापूर्वी जीवन अगदीं असह्य झालेलें असलें पाहिजे.

प्राणांतिक उपोषणें हीं आत्मशुद्धीच्या उपवासापासून स्वतंत्र आहेत.

हिंदुस्तानांतील सामुदायिक सत्याग्रह : : १०

सत्याग्रह व्यक्तीला, गटाला किंवा समुदायाला करतां येईल. तो ज्या वेळीं समुदाय असा शब्द वापरतो त्या वेळीं स्त्रिया, मुलें, प्रत्यक्ष लढा करूं शकणारे अथवा न करूं शकणारे या सर्वांसकट सबंध जमात असा अर्थ त्यांत अभिप्रेत असतो. करबंदीची मोहीम हें सामुदायिक सत्याग्रहाचें उदाहरण म्हणून देतां येईल कारण करबंदीच्या क्षेत्रांत ज्यांना कर भरावा लागत नाहीं ते सोडून दिल्यास सर्वच्या सर्व लोक त्यांत गोंवले गेलेले असतात. दक्षिण आफ्रिकेंतील मोहीम देखील सामुदायिक सत्याग्रहाच्याच स्वरूपाची होती कारण तेथें राहणारी जवळ जवळ सर्व हिंदी जमात त्यात सामील झालेली होती.

आजच्या क्षणाला अशिक्षित आणि असंघटित अशा जनसमुदायाला इतकें अवघड आणि नैतिक असें हत्यार वापरतां येईल किंवा नाहीं असा प्रश्न विचारणें निरर्थक आहे. केवळ लहानशा गटाकडून आणि छोट्याशा आखीव क्षेत्रांतच नव्हे तर सबंध राष्ट्रांतील प्रचंड जनसमुदायाकडूनहि त्याचा अवलंब होणें आणि पुष्कळदां तो यशस्वी करून दाखवणें अगदीं शक्य आहे हें आतां सर्वपरिचित आणि इतिहासमान्य झालेलें आहे. दक्षिण आफ्रिकेंतील मोहीम किंवा बार्डोली आणि सिद्दापूर अथवा कौंताई आणि तामलुक येथील लढे व हिंदुस्तानांत झालेला राष्ट्रव्यापी सत्याग्रह मला या ठिकाणीं अभिप्रेत आहेत. यांव्यतिरिक्त जगांतील कोटली जनता हिंदुस्तानांतील जनतेइतकी दरिद्री, अशिक्षित, अशक्त, अर्धपोटी आणि लीन व लाचार आहे ? रीतिभाती किंवा पेहराव, भाषा, धर्म आणि उपासना यांत हिंदुस्तानांतील चाळीस कोटी लोकांच्यांत जितके प्रकार आहेत तितके जगांत दुसऱ्या एका तरी ठिकाणीं पहावयास मिळतील काय ? आणि तरीहि गेल्या पंचवीस वर्षांत हिंदुस्तानांत निरानिराळ्या प्रसंगीं सामुदायिक सत्याग्रह झालेला आहे. अभूतपूर्व प्रमाणावर या शस्त्राचा उपयोग करून घ-

प्यांत अलिला आहे. अशा लढ्यांतील निरानिराळ्या अवस्थांचा व अंगोपांगांचा अभ्यास करणें केव्हांहि फायद्याचें ठरेल. प्रत्येक वेळीं गांधीजी हेच मोहिमेचे प्रणेते होते आणि हृदयशून्य परकीय नोकरशाहीविरुद्धच दर वेळीं लढे द्यावे लागले. सामुदायिक सत्याग्रहानें आजहि फार मोठें कार्य साधलेलें असलें तरी भविष्यकाळांत याहून चांगल्या संघटनेला आणि महत्तर विजयाला अजून खूप वाव आहे.

हिंदुस्तानांतील सर्व अन्याय निवारण करण्यासाठीं म्हणून सत्याग्रहाचा अवलंब करतां येईल ही गोष्ट १९०८ सालींच गांधीजींनीं हेरली. रेव्हरंड डोक लिहितात, "सध्या (१९०८) हिंदुस्तानांत अगदीं स्पष्टपणें आढळणारा असंतोष लक्षांत घेतां मीं त्यांच्या मायदेशांतील तरुणांना या पुस्तकामार्फत संदेश पाठविण्याची विनंति केली. त्याला त्यांनीं धाडलेलें लेखी उत्तर माझ्यासमोर आहे ... ट्रान्सवालमधील झगडा हिंदुस्तानच्या दृष्टीनें अर्थपूर्ण आहे. ... तो उपाय (सत्याग्रह) सावकाशीचा असेल पण माझ्या मतें केवळ ट्रान्सवालमधील आमच्या अन्यायापुरताच नव्हे तर हिंदुस्तानांतील लोकांना सोसावे लागणारे राजकीय वा इतर अन्याय नाहींसे करण्याचा तो अगदीं रामबाण उपाय आहे."

ज्या वेळीं गांधीजींनीं शस्त्र म्हणून हिंदुस्तानला सत्याग्रहाचा मार्ग सुचविला त्या वेळीं ते म्हणाले कीं सशस्त्र बंडाचा तो पर्याय आहे. सत्याग्रहांतील सविनय प्रतिकाराच्या पैलूवर भर देऊन त्यांनीं तो देशापुढें ठेवण्याचें धाडस केलें. परंतु अजून ध्येय म्हणून अहिंसा स्वीकारण्याची देशाची तयारी झालेली नव्हती. धोरण किंवा तात्पुरतें ध्येय म्हणूनच देशानें सत्याग्रहाचा अंगीकार केला याबाबत गांधीजी लिहितात (यंग इंडिया ७-५-३१), "आपल्या अहिंसेचा प्रसार खूप झालेला असला आणि आपल्या उद्दिष्टांच्या दृष्टीनें ती इष्ट असली तरी तिला सशक्तांची किंवा जाणत्यांची अहिंसा असें म्हणतां येणार नाहीं. जिवंत निष्ठेंतून तिचा उगम झालेला नाहीं. पुन्हा १९४० मध्यें (हरिजन २०-४४०) त्यांनीं लिहिलें कीं, " आपण हिंदी लोकांनीं अहिंसेला जरूर तेवढा वाव कधींच दिलेला नाहीं. आश्चर्याची गोष्ट अशी कीं आपल्या अपुऱ्या अहिंसेनेंच आपण

यशाचा येवढा टप्पा गांठला आहे. ''

श्री. कृपलानी यांनीं अगदीं निर्भींडपणें म्हटल्याप्रमाणें या सर्वांचा अर्थ इतकाच होतो कीं हिंदी राष्ट्राकरतां कॉंग्रेसनें अंगीकारलेला सत्याग्रह हें आध्यात्मिक मुक्तीचें किंवा आत्मानुभूतीचें साधन नव्हे. राजकीय आणि आर्थिक अन्यायांचा परिहार करण्यासाठीं वापरण्यांत येणारा तो अहिंसक स्वरूपाचा प्रत्यक्ष प्रतिकार होय. या ठिकाणीं व्यवहार्यतेच्या मुद्यावर राजकारणांत हिंसा त्याज्य ठरविली जाते.

पण सुरुवातीला येवढें देखील पुरेसें आहे. गेलीं पंचवीस वर्षें हा प्रयोग चालू आहे. ता. ६ एप्रिल १९१९ या दिवशीं हिंदुस्तानांत राष्ट्रव्यापी प्रमाणावर सत्याग्रहाची सुरुवात झाली. स्थानिक प्रश्नासाठीं सुरू झालेले लहान लहान लढे सोडून दिले तर गेल्या पंचवीस वर्षांत कॉंग्रेसनें सहा अखिल भारतीय स्वरूपाच्या चळवळी केल्या. सर्व चळवळींचा एकंदर काल सहा वर्षें, आठ महिने आणि दोन दिवस इतका भरतो. मी या ठिकाणीं असें धरलें आहे कीं गांधीजींची सुटका झाल्यावर औपचारिक रीत्या ता. ६-५-४४ रोजीं शेवटच्या चळवळीची समाप्ति झाली. या काळापैकीं जोरदारपणें सतत चाललेल्या प्रतिकाराची मुदत चार वर्षें आणि अकरा महिने इतकी भरेल. यांपैकीं पहिली ६ एप्रिल १९१९ पासून १८ एप्रिल १९१९ पर्यंतची एक आणि १७ आक्टोबर १९४० ते ४ डिसेंबर १९४१ पर्यंतची दुसरी अशा दोन चळवळींत निवडक व्यक्तींनाच भाग घेण्याची परवानगी होती. उरलेल्या चारहि चळवळी सामुदायिक स्वरूपाच्या होत्या आणि लाखों स्त्री-पुरुषांनीं आणि मुलांनीं त्यांत भाग घेतला, अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं देखील अहिंसेची शिस्त पाळली आणि त्यांतील हजारोंनीं अपार क्लेश सहन केले. पोलिस आणि लष्कर यांनीं पाशवी अत्याचारांची कमाल करून सोडली कारण त्यांच्या पोतडींत तेवढें एकच हत्यार नेहमीं जय्यत असतें. शांततामय कायदेभंगासाठीं लोकांना तुरुंगांत घालण्याऐवजीं सरकारनें लाठीचा आणि बंदुकीचा अवलंब केला. झेंडा मिरविणाऱ्या किंवा बेकायदा मीट घेऊन जाणाऱ्या लोकाना पकडण्याचें सोडून पोलिसांनीं आणि सार्जेंटांनीं मुलांमुलींचे कोवळे नाजूक

हात झेंडा किंवा मीठ काढून घेण्यासाठीं पिरगळल्याचें अमानुष दृश्य अनेकांनीं पाहिलेलें आहे. शांततेनें मिरवणुकी अडवून त्यांच्यामोंवतीं पोलिसांचें कडें पडे आणि अखेर लाठीमार करून मिरवणूक मोडून काढण्यांत येई. अशा एकेका लाठीहल्ल्यांत कित्येक वेळीं शेंकडों लोक जखमी झालेले आहेत. आणि तरी देखील शेंकडा ९९ प्रसंगीं लोकांच्या मनांत प्रतिहल्ला करण्याची नुसती कल्पना देखील आली नाहीं. कांहीं तुरळक ठिकाणीं जनतेकडून हिंसेचे प्रकार झाले परंतु ज्या ठिकाणच्या कार्यकर्त्यांना आणि पुढाऱ्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव होती तेथें पूर्वनियोजित कार्यक्रम म्हणून हिंसक प्रकार कधींच घडले नाहींत. अत्यंत प्रक्षोमामुळें किंवा सरकारच्या अत्यंत चीड आणणाऱ्या कृत्यांमुळें कांहीं ठिकाणीं जमावाकडून हिंसेचीं कृत्यें झालीं. परंतु प्रत्येक वेळीं पुढाऱ्यांनीं त्यांचा निषेधच केलेला आहे आणि वेळींच परिस्थिति काबूंत आणून असल्या प्रकारांची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून जास्तींत जास्त दक्षता घेतलेली आहे. सत्ताधाऱ्यांना या प्रकारांचा बाऊ करून सबंध चळवळ झोडपून काढण्यासाठीं तें निमित्त पुढें करणें सोपें आहे किंवा जे अहिंसेचे नसते देव्हारे माजवतात त्यांना शुद्ध स्वरूपांत सामुदायिक सत्याग्रह करतां येण्याची शक्यता डावलण्यासाठीं हें कारण पुढें करतां येण्यासारखें आहे. परंतु सत्याग्रहाचा हेतु जनतेच्या हातून घडणाऱ्या हिंसेकडे दुर्लक्ष करण्याचा किंवा त्याला नसतें महत्त्व देण्याचा नाहीं. सत्याग्रही चटकन हिंसेच्या कारणांचें निरीक्षण करून ती नाहींशी करण्याचा व लोकांना अहिंसेचें शिक्षण देण्याचा यत्न करील. काहींशी गंभीर स्वरूपाची हिंसा घडल्याबरोबर गांधीजींनीं १९१९ आणि १९२२ सालीं सबंध चळवळ थांबवली पण त्याचबरोबर त्यांनीं हेंहि ठासून सांगितलें कीं त्या हिंसेला सत्याग्रह जबाबदार नसून उलट सत्याग्रहामुळें जनतेच्या हिंसेला पायबंद बसण्यासच मदत झाली आहे. जर देशांत सत्याग्रहाचें वातावरण नसतें तर खासच आणखी किती तरी हिंसा घडली असती. हिंसा ही निखालसपणें अपायकारक असल्यामुळें स्वपक्षांत घडो अथवा प्रतिपक्षांत घडो आपल्याला ती काबूंत टेवलीच पाहिजे याची जाणीव गांधीजींना पूर्वीच झालेली आहे.

विभाग ३९३१५
क्रमांक ४०-३
दि. ८-८-९२

ते आळवणी करतात ती शारीरिक सामर्थ्यापेक्षा नैतिक सामर्थ्य, हिंसेपेक्षां समजुतदारपणा, द्वेष आणि क्रोध यांच्या ऐवजीं प्रेम, रणक्षेत्राऐवजीं चर्चा आणि तलवारीऐवजीं लेखणी आणि वाणी यांचा अंगीकार करण्याची. पण ती आळवणी विफल झाली म्हणजे ते सत्याग्रह करण्याचा सल्ला देतात. "माझा नित्याचा अनुभव आहे कीं खरोखरीच्या आत्मक्लेशानें अगदीं पाषाणाचें हृदय देखील विरघळतें" असें गांधीजी म्हणतात. त्यांच्या दुसऱ्या एका उद्गारावरूनहि त्यांची ही श्रद्धा व्यक्त होते. ते म्हणतात, "सत्यासाठीं सोसलेले क्लेश इतर कशापेक्षांहि सत्याची प्रस्थापना होण्यास जास्त मदत करतात ही माझी श्रद्धा कधींहि विचलित होणार नाहीं." १९३१ सालीं गोलमेज परिषदेपुढें केलेल्या भाषणांत ते म्हणाले, "ज्या वेळीं तुमचीं हृदयें पाझरतील (हिंदुस्ताननें सोसलेल्या क्लेशांमुळें) त्याच वेळीं मानसिक दृष्ट्या तडजोडीला योग्य असा क्षण निर्माण होईल."

शांततामय साधनांपैकीं सत्याग्रह हें सर्वांत अखेरचें पण तितकेंच शक्तिशाली असें साधन होय. सनदशीर चळवळीसारखे इतर सर्व उपाय करून झाल्यानंतरच सत्याग्रहाचा अंगीकार करावयाचा असतो. त्याचें स्थान थेट हिंसक प्रत्यक्ष प्रतिकारासारखेंच असतें. पुढाऱ्यांना प्रतिकाराच्या आणि लढ्याच्या नेहमींच्या मार्गांचा अवलंब करावयाचा असल्यास सामान्यपणें ज्या वेळीं शस्त्रांची खणाखणी झाली असती त्याच अवस्थेंत सत्याग्रह करण्याचा प्रसंग येतो. असमाधान, संतापाची तीव्रता, निराशेचें प्रमाण आणि अखेरचा उपाय योजण्याची अपरिहार्यता या सर्व गोष्टी सत्याग्रहांत आणि हिंसामार्गांत सारख्याच असतात. गांधीजींचा असा दावा आहे कीं त्यांनीं जनतेच्या पराकोटीच्या क्रोधाचा रोख शत्रूपासून वळवला व स्वतःला क्लेश सहन करावे लागतील अशा कृत्यांच्या द्वारा त्याचें व्यक्तीकरण केलें. दक्षिण आफ्रिकेंत हें नवें शस्त्र उपयोगांत आणल्याबद्दल ज्या वेळीं दूषण देण्यांत आलें व त्यांच्यावर टीका करण्यांत आली त्या वेळीं त्यांनीं स्वतःचें समर्थन खालील शब्दांत केलें: "त्यांना वाटणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचा मार्ग म्हणून कोणत्याहि पेचप्रसंगाच्या वेळीं तद्देशीय लोक या साधनाचा अवलंब करतील तर त्याबद्दल आपण त्यांचें ऋणी राहिलें पाहिजे. कारण

त्याचा अर्थ असा होईल कीं बंदूक आणि असेगाय (एक आयुध) यांची जागा शांततामय मार्गानें पटकावली. ... लढ्याचा क्षण येतांच जर कत्तल, असेगाय आणि दारूगोळा या जुन्या साधनांऐवजीं तद्देशीय लोक जर निःशस्त्र प्रतिकाराचें धोरण स्वीकारतील तर बसाहतींच्या दृष्टीनें अत्यंत इष्ट असा फरक घडून येईल.'' रौलेट ॲक्ट चळवळीच्या दिवसांत गांधीजींना असें वाटलें कीं जर कांहीं निर्णायक सूचना दिल्या गेल्या नाहींत तर 'हिंसक प्रवृत्तींत चळवळ परिणत होईल.' ता. २० ३-१९१९ रोजीं त्यांनीं असे उद्‌गार काढले कीं ''त्या (क्रांतिकारक) पक्षाला हिंसेच्या आत्मघातकी मार्गापासून परावृत्त करण्याची आम्ही आशा करीत आहोंत. हंटर कमिटीला उद्देशून त्यांनीं असें म्हटलें आहे (यंग इंडिया ५-११-१९१९) कीं ''हिंसक साधनांऐवजीं अहिंसक साधनें वापरण्याचा या चळवळीचा उद्देश असून ती संपूर्णपणें सत्यावर आधारलेली आहे.'' प्रजेला दडपून टाकण्यासाठीं कायद्याचा आश्रय घेऊन अनिर्बंध बनलेल्या सरकारविरुद्ध वापरावयाच्या उपायासंबंधीं चर्चा करतांना गांधीजी म्हणतात (यंग इंडिया १७-११-१९२१) कीं अशा प्रसंगीं ''सविनय कायदे-भंग हें एक पवित्र कर्तव्य होऊन बसतें.... त्याला दुसराहि एक उपाय आहे खास. आणि तो म्हणजे सशस्त्र बंड. सविनय प्रतिकार हा परिपूर्ण, प्रभावी आणि रक्तविरहित असा प्रत्युपाय होय.'' तेव्हांपासून तो सशस्त्र बंडाचा परिणामकारक पर्याय असून त्याची मूळ कल्पना तीच आहे असें ते प्रतिपादीत आले आहेत (हरिजन १५-४-१९३३). अगदीं अलीकडे (१५-७-१९४३) 'कॉंग्रेस रेस्पॉन्सिबिलिटी' या चोपड्याला उत्तर देतांना गांधीजींनीं म्हटलें आहे कीं ''दक्षिण आफ्रिकेंतील पहिलीं आठ वर्षें धरून गेल्या अडतीस वर्षांच्या एकंदर अनुभवानें अहिंसेच्या अंगीकारांतच हिंदुस्तानचें आणि जगाचें भवितव्य सामावलेलें आहे अशी जबरदस्त आशा मला वाटते. मानवांतील पददलितांवर राजकीय व आर्थिक क्षेत्रांत होणाऱ्या अन्यायाला तोंड देण्याचा तो अत्यंत निरुपद्रवी पण त्याचबरोबर तितकाच परिणामकारक असा मार्ग आहे.''

गांधीजींचें नेतृत्व आणि मार्गदर्शन जर लाभलें नसतें तर खरोखरच

हिंदुस्तानांत पुरेशी जागृति झालेली असल्यामुळें परकीय सत्ताधाऱ्यांविरुद्ध सशस्त्र बंडाचें नेहमींचें साधन निश्चितपणें वापरलें गेलें असतें. त्या मार्गाचें स्वरूप रानटी आणि रक्तलांच्छित असेंच राहिलें असतें. आणि त्यासाठीं अफाट मनुष्यबळ आणि पैसा खर्च करावा लागला असता. तो मार्ग अत्यंत यातनामय असला तरी अपरिहार्यपणें त्याचा स्वीकार करावा लागला असता. कारण अत्यन्त तेजस्वी इतिहासाची परंपरा असणारा इतका विस्तीर्ण आणि शौर्यशाली देश आणि उज्ज्वल भवितव्याची आशा असतांना गुलामगिरी आणि निर्घृण व निर्लज्ज अशी पिळवणूक अमर्याद कालपर्यंत कशी सहन करील ! असा देश उठाव करून स्वातंत्र्यसंपादनाची शर्थ करणार हें ठरलेलेंच आहे. आणि नेमक्या अशाच अनुकूल मानसिक परिस्थितींत गांधीजींनीं हें अद्वितीय सत्याग्रहशस्त्र देशापुढें ठेवलें. पण या सात्त्विक मार्गाकडे देखील सत्ताधाऱ्यांनीं वक्रदृष्टीनेंच पाहिलें. गुलामांनीं केलेली कोणतीहि चळवळ– मग ती सैतानी असो वा सोज्ज्वल असो– कोणता हाडाचा जुलमी सत्ताधारी सहन करणार ? १९३१ च्या गोलमेज परिषदेपुढील भाषणांत गांधीजी म्हणतात, "या प्रसंगीं कॉंग्रेसनें राजकारणांत पदार्पण करून आजपर्यंतच्या इतिहासाला ज्ञात नसलेली अशी सविनय कायदेभंगाची नवीन पद्धति शोधून काढली. आजपर्यंत कॉंग्रेस याच पद्धतीचा अवलंब करीत आली आहे. परंतु आज पुन्हां तीच धोंड माझ्या आड आली असून मला असें सांगण्यांत येत आहे कीं जगांतील कोणत्याहि सरकारला ही पद्धत देखील खपणार नाहीं. सरकारला ती न खपणें अर्थातच संभवनीय आहे कारण आजपर्यंत कोठल्याहि सरकारनें उघड बंड सहन केलेलें नाहीं." पण तितक्याच विश्वासानें ते पुढें म्हणाले, "सरकारला सविनय कायदेभंग कदाचित् सहन होणार नसेल परंतु सरकारला या अहिंसक शक्तीपुढें देखील शरण येणेंच भाग आहे. ब्रिटिश सरकारनें यापूर्वी अशी शरणागति पत्करली आहे आणि महान् अशा डच सरकारला (दक्षिण आफ्रिका) देखील आठ वर्षांच्या दिव्यांतून गेल्यानंतर घटनाच्या अटळ परिणामापुढें मान तुकवावी लागलेली आहे. जनरल स्मट्स शूर सेनापति, थोर मुत्सद्दी आणि त्याचबरोबर अत्यंत करडे अंमलदारहि आहेत. परंतु

केवळ आपला स्वाभिमान टिकविण्यासाठीं झगडणाऱ्या निरपराध स्त्री-पुरुषांना गतप्राण करण्याचे विचार मनांत आणण्याची देखील त्यांना शिसारी वाटली. १९०८ सालीं जी गोष्ट कधींहि मान्य न करण्याची त्यांनीं प्रतिज्ञा केली तीच गोष्ट त्यांना या सविनय प्रतिकारकांची पुरेपूर कसोटी घेतल्यानंतर १९१४ सालीं जनरल बोथा त्यांच्या पाठीशीं असतां-नाहि मान्य करावी लागली. हिंदुस्तानांत लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनाहि तेंच करावें लागलें व बोरसद आणि बार्डोली यांच्या बाबतींत मुंबईच्या गव्हर्नर-साहेबांनाहि तोच अनुभव आला."

अशा तऱ्हेनें सामुदायिक सत्याग्रह ही कांहीं आतां नवीन गोष्ट राहि-लेली नाहीं किंवा तें शस्त्र लोकांना अजून अज्ञात आहे असेंहि नाहीं. सामुदायिक सत्याग्रह हा आतां नवख्या दर्यांत तारूं लोटण्यासारखा प्रकार राहिलेला नाहीं. १९१९ सालींच (यंग इंडिया ५-११-१९१९) गांधीजींनीं असें म्हटलें आहे कीं, "माझ्या मतें सत्याग्रहाचें सौंदर्य आणि परिणाम-कारकता इतकी विशाल आहे आणि त्याची तत्त्वप्रणालि इतकी साधी आहे कीं एखाद्या मुलाला देखील ती पटवून देतां येईल. सर्वसामान्यपणें (दक्षिण आफ्रिकेंत) करारावर आलेल्या हजारों हिंदी स्त्री-पुरुषांना व मुलांना मीं ती शिकवण दिलेली असून तो प्रयोग यशस्वी झालेला आहे." १९२० सालीं (यंग इंडिया १०-३-२०) ते लिहितात, "एखाद्यानें सत्याग्रहाची प्रतिज्ञा घेतलेली असो किंवा नसो सत्याग्रहाच्या कल्पनेनें जनतेची पकड घेतली आहे हें निश्चित." आणि गेलीं कमींत कमी पंन्नास वर्षें जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत सत्याग्रहाचा जो जागरूक शास्त्रशुद्ध आणि यशस्वी असा अवलंब करण्यांत आला त्या योगानें जनतेला शिस्तीचें वळण लागणें शक्य आहे आणि अत्यंत प्रभावीपणें जनता सत्याग्रहशस्त्र पेलूं शकेल या गांधीजींच्या मताला बळकटी आलेली आहे. गांधीजी असें प्रतिपादन करतात कीं, "लढाऊ सैन्य सामान्यपणें संघटित युद्धांत ज्या तऱ्हेची शिस्त पाळतें त्या तऱ्हेची शिस्त जनतेला योग्य वळण लावलें तर अहिंसेच्या लढ्याचे वेळीं पाळली जाणार नाहीं असें म्हणण्याचें मुळींच कारण नाहीं." जनतेनें जी कांहीं अहिंसा आत्मसात् केलेली आहे तेवढ्यावर गांधीजींचें पूर्ण समाधान

निश्चितच झालेलें नाहीं. परंतु त्याचा अर्थ इतकाच कीं जनतेची आणखी प्रगति होण्यास वाव असून त्या दिशेनें जनतेला शिक्षण देणें जरूर आहे. सामुदायिक सत्याग्रहाची व्यवहार्यता, उपयुक्तता आणि कार्यक्षमता यांबद्दल आतां संदेह राहिलेला नाहीं. केवळ स्थानिक गाऱ्हाणीं सोडविण्यासाठींच त्याचा उपयोग करतां येण्यासारखा आहे असें नव्हे तर अधःपात आणि गुलामगिरींतून सबंध राष्ट्राची मुक्तता करण्यासाठीं देखील त्याचा अवलंब करतां येईल हें स्पष्ट आहे. सशस्त्र बंडाचा अवलंब करावयाचा नसेल तर सामुदायिक सत्याग्रह हेंच एक शस्त्र आपल्या उपयोगी पडण्यासारखें आहे.

संघटना आणि शिक्षण : : ११

जीवनपथ या दृष्टीनें सत्याग्रहाची स्वतंत्र तत्त्वप्रणाली आहे. आत्मसंयम व निःस्वार्थ प्रेममय सेवा यांच्यावर आधारलेला सत्याग्रहाचा कडक असा आचारधर्महि आहे. सत्य आणि अहिंसा किंवा प्रेम हे सत्याग्रहीचे मार्गदर्शन करणारे तारे होत. शारीरिक, बौद्धिक, नैतिक आणि आध्यात्मिक शक्तींना शुचिता प्राप्त करून घेण्याची सत्याग्रही खटपट करीत असतो. आत्मसंयमनाच्या योगानें त्या शक्तींचा तो संग्रह करतो. सत्याचे ठायीं चित्त एकाग्र करून सर्वांना सुख आणि शांति मिळावी म्हणून प्रेममय सेवेच्या द्वारा वरील सर्व शक्तींचा तो उपयोग करतो. ही सत्याग्रहीची साधना होय. अशा तऱ्हेनें तो सदैव शिक्षण घेत घेतच तयारीहि करीत असतो. तसेंच तो शिस्तबद्ध आणि कोणत्याहि निकडीच्या प्रसंगासाठीं सिद्ध असला पाहिजे अशी त्याच्याकडून अपेक्षा केली जाते.

सैन्य, त्याचें शिक्षण, दारूगोळा व इतर साधनसामग्री यांच्याशिवाय

युद्धावर जाणें वेडगळपणाचें आहे. सैन्याची कवायत घेतली नाहीं, त्याच्या हातीं शस्त्रास्त्रें दिलीं नाहींत आणि युद्धकलेचें शिक्षण दिलें नाहीं तर त्या सैन्याचा कांहींहि उपयोग होणार नाहीं. प्राणार्पणाची तयारी ठेवणारीं माणसें बरोबर असल्याशिवाय सत्याग्रहमोहीम सुरू करणें देखील तितकेंच वेडगळपणाचें ठरेल. सत्याग्रहाचें शिक्षण न देतां किंवा संघटना न करतां जनतेकडून अचाट कामें करवून घेतां येतील असें समजणें म्हणजे शुद्ध मूर्खपणाच होय. तथापि सत्याग्रहांत एक फार मोठें वैशिष्ट्य आहे. त्यांत संख्याबलासाठीं अडून राहण्याचें कारण नाहीं. जर आपली बाजू न्याय्य असेल आणि प्रतिकारसाधनें शुद्ध असतील तर एकटी व्यक्ति देखील सत्याग्रहलढा सुरू करून तो चालू ठेवूं शकेल. दुसरें मोठें वैशिष्ट्य म्हणजे त्याला कसलीहि जड साधनसामग्री लागत नाहीं. जी तयारी करावयाची ती सर्व नैतिक आणि मानसिकच असते.

आपण सत्याग्रहाची शक्ति जसजशी वाढवीत जाऊं तसतशी त्यासाठीं कराव्या लागणाऱ्या खास तयारींची गरज कमी कमी होत जाईल. तयारी चालू असतां लढ्याचा प्रसंग आल्यास साहजिकच लढ्याचा एकमेव मार्ग म्हणून सत्याग्रहाचा अवलंब केला जातो. सत्याग्रहांत साध्य साधन यांतील संबंध अबाधित असल्यामुळें सत्याग्रहीला वेळप्रसंगीं हालअपेष्टांची तयारी ठेवूनहि आपल्या मार्गांला चिकटून राहण्याव्यतिरिक्त दुसरें कांहीं करावें लागत नाहीं. आणि हालअपेष्टा भोगण्यास तर तो नेहमींच खुषीनें तयार असतो. हिंसक मार्गाचा उपयोग करणाऱ्याला मात्र खास तयारी करावी लागते. कारण त्याच्या बाबतींत साध्यसाधनसंबंध परस्परांशीं विसंगत असतात. दुसरे करीत असलेला अन्याय नाहींसा करण्याचा प्रयत्न करीत असतांना त्याला स्वतःचा अन्याय मात्र चालू ठेवावयाचा असतो. स्वतः क्लेशापासून बचाव करण्याची धडपड करीत असतांना दुसऱ्यावर मात्र ते लादावयाचे असतात. सत्याग्रहीच्या बाबतींत मात्र तो जीं साधनें वापरतो तींच नेमकें त्याचें साध्यहि असतें. त्याच्या बाबतींत कसलाहि ज्ञात अथवा अज्ञात आंतरिक झगडा नसतो. गांधीजींनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें सत्याग्रह ही एक प्रकारची सैंद्रिय वाढच आहे; व ती एकजिनसी असते.

विशिष्ट उद्दिष्ट साधण्याच्या हेतूनें हाताशीं असलेल्या शक्ति शिस्तबद्ध स्वरूपांत खड्या करणें म्हणजेच संघटन. अत्यंत कुशल संघटक नवीन शक्ति देखील निर्माण करतो. अथवा हाताशीं असलेल्या शक्तींचा अपेक्षे-बाहेर फार मोठमोठ्या कार्यासाठीं उपयोग करून घेतो. परंतु प्रत्येक संघट-कानें त्याच्या हाताशीं असलेल्या साधनांच्या कुवतीचा अचूक अंदाज करून त्यांचा उपयोग अत्यंत काटकसरीनें व बेताबेतानें केला पाहिजे. जेथें एकानें काम भागण्यासारखें आहे तेथें त्यानें दोघांचा उपयोग करतां कामा नये. आणि जेथें कमी तयारी झालेल्या सत्याग्रहीच्या हातून काम होण्या-सारखें असेल तेथें पूर्वतयारी झालेला सत्याग्रही पाठवतां कामा नये.

मानवी जीवनांत आणि व्यवहारांत अंतःप्रेरणा व स्फूर्ति यांना मानाचें स्थान असलें तरी कोणतेंहि ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीनें संघटन आणि शिस्त यांची देखील तेवढीच आवश्यकता आहे. सर्व प्रकारचें काव्य व कला स्फूर्तीमुळें निर्माण होत असल्या तरी त्यांची परिपूर्णता व त्यांचा प्रभाव हीं सहेतुक प्रयत्न व शिस्त यांवरच अवलंबून असतात. गांधीजी महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठीं अंतःस्फूर्ति व आंतला आवाज यांची बरेचदा वाट पहात असले तरी त्याचबरोबर त्यांनीं आपलें जीवन अत्यंत कडकपणानें व दक्षतेनें संघटित करण्याची व त्याला शिस्त लावण्याची फार खबरदारी घेतली आहे. ते आपल्या आयुष्यांतील प्रत्येक क्षणन् क्षण मोलाचा समजतात व प्रत्येक गोष्ट घड्याळाच्या कांट्यांसारखी नियमित करतात. असें म्हणणें सत्याला धरून होईल कीं त्यांची स्फूर्ति देखील अगदीं वेळेवर येते व आणि-बाणीच्या वेळीं त्यांना कधींहि दगा देत नाहीं. शिवाय प्रत्यक्ष स्फूर्ति कांहीं संघटना आणि शिस्त तिरस्करणीय मानीत नाहीं. संघटना आणि शिस्त यांत्रिक व निर्जीव असेल तर ऐन वेळीं उपयोगी न पडणारी आणि परि-स्थितीशीं जुळतें न घेतां येणारी अशी ठरते. अशा परिस्थितींत मात्र स्फूर्ति तिचा उपहास करील. एका अर्थानें स्फूर्ति ही देखील संघटनाकुशल आहेच. कॉंग्रेस संस्थेनें 'चले जाव' मोहीमेच्या वेळीं गांधीजींचें अनुया-यित्व पत्करलें नाहीं तर गांधीजी काय करतील असा प्रश्न लुई फिशर यांनीं त्यांना विचारला असतां (वन् वीक वुइथ गांधीजी) गांधीजींनीं

दिलेलें उत्तर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्या वेळीं ते म्हणाले कीं स्फूर्तीनें भारलेला माणूस स्वतःच संघटक बनतो.

सत्याग्रहाच्या बाबतींत गांधीजींचें जर कोणतें सर्वांत महत्त्वाचें कार्य असेल तर तें त्यांचें संघटन. त्यांनीं त्याला व्यवस्थित अशा शास्त्राचें स्वरूप दिलें असून सत्याग्रहाच्या कांहीं अत्यंत महत्त्वपूर्ण बाजूपुरतें तरी त्याचें तंत्र त्यांनीं बऱ्याचशा प्रमाणांत पूर्णत्वास पोहोंचाविलें आहे. त्यांनीं आपल्या प्रयोगांनीं हें सिद्ध करून दिलें आहे कीं सत्याग्रह हें कांहीं न आचरतां येण्यासारखें दिव्य नव्हे. सत्याग्रह संघटित करतां येतो, त्यासाठीं जनतेला तयार करतां येतें आणि प्रभावी शस्त्र म्हणून त्याचा उपयोग करून घेण्यासाठीं लोकांना शिस्त लावतां येते.

शिस्तबद्ध आणि विशुद्ध अंतःकरणाच्या कार्यकर्त्यांचें दल निर्माण करणें ही सत्याग्रहाच्या संघटनेची आणि पूर्वतयारीची पहिली पायरी म्हटली तरी चालेल. त्या कार्यकर्त्यांचा सत्याग्रहावर कामचलावू तरी विश्वास असला पाहिजे. ज्या ठिकाणीं आपल्याला हिंसेचा अवलंब करून चढतां येणें शक्य नाहीं असें आढळून येतें त्या ठिकाणीं जे हताशपणें प्रतिपक्षाच्या हिंसेपुढें मान वाकवतात अशा भेकड वृत्तीच्या माणसांचा सत्याग्रहाला कांहींहि उपयोग होणार नाहीं. हिंसेव्यतिरिक्त प्रतिकाराचा दुसरा उपाय आहे. आणि तो लढ्याचा जास्त चांगला मार्ग असून त्याच्यासाठीं पाशवी शक्तीची किंवा इतर साधनांची जरूर लागत नाहीं असा विश्वास आणि निष्ठा असणारे कार्यकर्ते सत्याग्रहासाठीं हवे असतात. जास्तींत जास्त भीषण हिंसेला देखील अहिंसेनें टक्कर देतां येईल असें ज्यांना वाटतें त्यांचीच गरज असते. अशा लोकांनीं लढ्याचें नेतृत्व स्वीकारलें नाहीं तर जनता अहिंसक लढा सोडून हिंसेची कांस धरील अशी शक्यता आहे. म्हणून ज्यांचा सत्य आणि अहिंसा यांवर तत्त्व म्हणून विश्वास आहे अशांनींच नेहमीं पुढाकार घेणें सर्वोत्तम.

अहिंसक प्रतिकारकांना देण्यांत यावयाचें शिक्षण व समाजांतील त्यांचें कार्य याविषयीं अल्डुस हक्स्लेचें म्हणणें समजावून घेणें फायदेशीर आहे. आपल्या 'एंड्स ॲंड मीन्स' या पुस्तकांत ते म्हणतात कीं वैयक्तिक,

आर्थिक, गटांगटांतील व गट आणि सत्कार यांच्यांतील परस्परसंबंधांचे बाबतींत अहिंसक वर्तन घडावें म्हणून निष्ठावन्त व्यक्तींच्या संघाकडून पद्धतशीर प्रयत्न झाले पाहिजेत. या संघाची रचना अशा तऱ्हेनें करण्यांत यावी कीं कोणाला सत्ता मिळवण्याचा, दादागिरी गाजवण्याचा किंवा पिळवणूक करण्याचा मोहच होणार नाहीं. केवळ भीतिच नव्हे तर व्यक्तीच्या ठिकाणचा क्रोध आणि द्वेष नाहींसे करण्यासाठीं जास्त शिक्षणाची जरूर पडेल. हिंसेचा अवलंब न करतां आणि भीति अथवा कुरकुर यांना थारा न देतां संघाच्या सभासदांना हिंसेचा प्रतिकार करतां आला पाहिजे. पुढें ते म्हणतात, "भावना बलवत्तर असतांना जुलुमाचा प्रतिकार अहिंसेनें करणें हें त्यांतल्या त्यात सोपें आहे. परंतु इतर वेळीं तें फार अंवघड जातें. तें इतकें कठीण आहे कीं केवळ तेवढ्याचसाठीं ज्यांनीं पद्धतशीर शिक्षण घेतलें आहे त्यांच्या व्यतिरिक्त इतरांना तें साधणें जवळ जवळ अशक्यच आहे. उत्तम सैनिक तयार करण्यासाठीं साधारणपणें तीन ते चार वर्षें लागतात. प्रसंग कितीहि बांका आला तरी आपलीं तत्त्वें आचरणांत आणूं शकेल असा उत्तम अहिंसक प्रतिकारक तयार करण्यासहि बहुधा तितका तरी काळ लागणारच."

त्यांच्या संघाच्या कार्यासंबंधीं ते पुढें म्हणतात कीं श्रेष्ठ प्रतीच्या कार्याचा आदर्श होऊं शकेल असें स्वरूप संघाला आणून देण्याचा प्रघात केला पाहिजे. जेथें हिंसेचा उद्भव झाला असेल तेथें तिचें निर्मूलन करण्यासाठीं आणि कौटुंबिक क्षेत्रांतील अन्याय व आंतरराष्ट्रीय युद्धाची तयारी किंवा सुरवात याच्या अहिंसक प्रतिकारासाठीं आपल्या शक्ति उपयोगी पडणार असतील तर त्यांनीं पुढाकार घेतला पाहिजे.

याच अनुषंगानें अल्डुस हक्स्ले यांनीं आपल्या पुस्तकांत व्यक्त केलेले खालील विचारहि महत्त्वाचे आहेत.

" पूर्वीच्या मानानें अतुलनीय अशी कार्यक्षमता, अचुकता व दूरदृष्टि आज सर्वत्र पोलिसांच्या वर्तनांत आढळून येते. शिवाय सामान्य माणसाला न मिळणाऱ्या शास्त्रशुद्ध हत्यारांनीं ते सज्ज असतात. अशा तऱ्हेच्या सशस्त्र व संघटित सामर्थ्यापुढें सामान्य माणसाची हिंसा आणि हुशारी अयशस्वी

ठरत आहे. अद्यावत् पोलिस खातें पाठीशीं असलेल्या जुलमी राज्यकर्त्यांपासून स्वतःचें संरक्षण करण्याचें सामुदायिक असहकार आणि सविनय कायदेभंग यांसारखे अहिंसक मार्ग हेंच साधन होय. राज्यकर्त्यांविरुद्ध प्रजेच्या तिच्या संख्याधिकाचा फायदा मिळावयाचा असेल तर, किंवा शस्त्रास्त्रांतील उघड उघड दिसणारा तिचा कमकुवतपणा मरून काढावयाचा असेल तर, उपयोगी पडेल असें हें एकच साधन उपलब्ध आहे. या कारणासाठीं शक्य तेवढ्या लवकर आणि जास्तींत जास्त ठिकाणीं अहिंसा तत्त्वाचा प्रचार करणें अत्यंत महत्त्वाचें आहे. कारण चांगल्या आणि व्यापक संघटनेवर आधारलेल्या अहिंसेच्या साधनांच्या योगानेंच जगांतील जनतेला सरकारच्या गुलामगिरींतून मुक्त होण्याची आशा आहे. सरकारची गुलामगिरी ही आज कित्येक देशांत प्रत्यक्ष चालू असून युद्धाचें मय व प्रगत असें तंत्रशास्त्र यांच्या जोरावर इतर देशांतहि ती प्रस्थापित होऊं पहात आहे. आजच्या परिस्थितींत हिंसात्मक क्रान्तीची चळवळ ताबडतोब दडपून टाकली जाण्याचा संभव आहे. ज्या ठिकाणीं क्रांतिकारकांपाशीं आधुनिक शस्त्रास्त्रांची थोडीबहुत सुसज्जता असेल त्या ठिकाणीं स्पेनप्रमाणें चळवळीला दीर्घकालीन अशा घोर यादवी युद्धाचें स्वरूप प्राप्त होण्याचा संभव आहे. अशा यादवी युद्धांतून इष्ट असे बदल घडून येण्याची शक्यता अत्यल्पच असणार. हिंसेमुळें नेहमीं अनुभवाला येणारे हिंसक परिणामच घडून येतील. आणि देशांत अशा परिणामांनंतरची देशाची स्थिति पहिल्यापेक्षांहि वाईट असेल. असें असल्यामुळें जनतेच्या उद्धाराच्या आशेचा किरण जर कशांत असेल तर तो फक्त अहिंसेंतच. परंतु बहुसंख्य आणि कार्यक्षम पोलिसांच्या हल्ल्यांचा किंवा आक्रमण करणाऱ्या परकीय सैनिकांचा प्रतिकार करण्यासाठीं अहिंसक चळवळी चांगल्या संघटित केल्या पाहिजेत आणि त्यांचा खूप प्रसार केला पाहिजे. माणुसकीचा अधःपात हें आपल्या युगाचें वैशिष्ट्य असून त्यामुळें आजच्या सरकारच्या वर्तणुकीपेक्षांहि जास्त भयंकर व निष्ठुरपणाची वर्तणूक अहिंसक प्रतिकाराच्या बाबतींत पुढें मिळण्याचा संभव आहे. अशा तऱ्हेच्या निष्ठुरतेला तोंड देण्यास बहुसंख्य आणि अत्यंत निष्ठावान् असेच

लोक हवेत. सहकार न करण्याचा आणि तितक्याच जोरदारपणें हिंसेचा अवलंब न करण्याचा निर्धार केलेल्या जनतेशीं तोंड देण्याचा प्रसंग आला म्हणजे अगदीं निर्दयांतील निर्दय अशी हुकूमशाही देखील गोंधळून जाईल. शिवाय अत्यंत निर्दय अशा हुकूमशाहीलादेखील जनमताचा जो पाठिंबा अवश्य असावा लागतो तो मिळविण्याची आशा पद्धतशीरपणें अहिंसा अंगीं बाणलेल्या अनेक व्यक्तींना तुरुंगांत घालणारें अथवा त्यांची कत्तल करणारें कोणतेंहि सरकार करूं शकणार नाहीं. एकदां हुकुमशाही राजवट सुरू झाली म्हणजे जुलमाचा किंवा युद्धाचा अहिंसक प्रतिकार करण्याची संघटना उभारणें अत्यंत अवघड होऊन बसतें. ज्या देशांत अजून व्यक्तिस्वातंत्र्य व संघटनास्वातंत्र्य आहे व कांहीं अंशीं तरी लोकांच्या जीवनावरील सरकारी नियंत्रण कमी आहे असे देश हेच आज जगाचें आशास्थान उरले आहेत."

जनतेंत विधायक कार्य (यांत पंधरा कलमी कार्यक्रमाचा अंतर्भाव होतो) करणें हीच सत्याग्रहाची सर्वोत्तम तयारी होय. सत्य आणि अहिंसे-वर विश्वास असलेले चारित्र्यवान् कार्यकर्ते जर जनतेंत मिसळून निरलस सेवा करतील तर ते तिच्यांत निष्ठा आणि निर्भयता निश्चितपणें निर्माण करूं शकतील. यंग इंडियांत (९-१-३०) गांधीजी म्हणतात, "अखंडपणें चालविलेल्या विधायक कार्यक्रमांतून संपादन केलेला विश्वास आणिबाणीच्या प्रसंगीं अत्यंत उपयुक्त ठरतो. हिंसात्मक युद्धशास्त्रांत सैन्याच्या कवायतीला जें महत्त्व आहे तेंच अहिंसक सैन्याच्या बाबतींत विधायक कार्याला आहे. त्यामुळें विधायक कार्याचा जितका जास्त विकास होईल तेवढा सविनय कायदेभंग यशस्वी होण्याचा संभवहि वाढेल. लष्करी सैनिक व विधायक कार्यकर्ता यांची तुलना करतांना गांधीजी म्हणतात (हरिजन २९-१०-३३), "सैनिकाला मारण्याचें शिक्षण देण्यांत येतें. मारण्याला देखील कलेचें स्वरूप प्राप्त झालें आहे. सत्याग्रही नेहमीं मुकाट्यानें सेवा करीत राहण्याची संधि मिळावी अशी इच्छा करीत राहतो. त्याचा सर्व वेळ प्रेममय सेवेला वाहिलेला असतो. दुसऱ्याला मारण्याचें त्याच्या स्वप्नांतहि येत नाहीं. उलट दुसऱ्यासाठीं बलिदान

करण्याचीं स्वप्नें तो रंगवतो." ज्यांना सत्य आणि अहिंसा यांची साधना करावयाची आहे, परंतु विधायक कार्य मात्र आवडत नाहीं, त्यांची स्थिति ज्यांना रणक्षेत्रावर जाण्याची खुमखुमी आहे पण हातांत बंदूक घेणें मात्र जे तिरस्करणीय मानतात त्यांच्यासारखीच आहे. ज्यांना विधायक कार्य बेचव किंवा त्रासदायक वाटतें तें सत्याग्रहाला अजून लायक नाहींत किंवा स्वार्थरहित त्याग आणि सेवा यांमुळें निर्माण होणाऱ्या मूक शक्तीच्या सौंदर्याचें त्यांना आकलन झालेलें नाहीं असें म्हटलें पाहिजे.

विधायक कार्याच्या योगानें अनेक गोष्टी साध्य होतात. त्यामुळें सबंध राष्ट्रांत नवीन जोम निर्माण होऊं शकतो. परंतु येथें इतक्या खोलांत शिरण्याचें कारण नाहीं. सत्याग्रहाच्या दृष्टीनें विधायक कार्याचे फायदे दाखवून दिले तरी पुरेसें आहे. सत्य आणि अहिंसेवर विश्वास असलेली आणि या ना त्या क्षेत्रांत विधायक कार्य करीत असलेली सार्वजनिक कार्यकर्त्यांची सेवा सबंध जमातीचें स्वरूप बदलून तिच्यांत आत्मविश्वास, स्वाभिमान आणि हिंमत निर्माण करील. जमातीच्या प्रत्यक्ष गरजा लक्षांत घेऊनच त्यांनीं विधायक प्रवृत्ति शोधल्या पाहिजेत. त्यामुळें तेथील लोकांना उच्च जीवनाचा ते लाभ करून देतील. ते तेथील जनतेची सतत निरलसपणें सेवा करीत राहतील. पण त्या सेवेचा मार्ग असा असेल कीं ज्यामुळें लोक स्वावलंबी व स्वतंत्र होत जातील. तेथील लोकांशीं त्यांचे संबंध अगदीं यांत्रिक किंवा व्यापारी स्वरूपाचे राहणार नाहींत तर ते प्रेममय सेवेच्या रज्जूमुळें जिव्हाळ्याचे व उदात्त बनतील. त्यांच्या संबंधामुळें लोकांत आत्मविश्वास पैदा होईल आणि सत्याग्रही कार्यकर्त्यांबद्दलची त्यांची निष्ठा वाढत जाईल. मानवाच्या सेवेला वाहून घेतलेल्या निर्भय व चारित्र्यसंपन्न कार्यकर्त्यांचा आदर्श सतत जमातीच्या डोळ्यांपुढें राहील. विधायक कार्य जर संघटितपणें चालू राहिलें तर सत्याग्रहासाठीं लोकांची संघटना करण्याचा प्रश्न निर्माण होईल तेव्हां बरेंचसें कार्य झालेलें असल्याचें आढळून येईल. विधायक कार्यामुळें ज्याप्रमाणें जनतेचें राहणीचें मान आणि दर्जा वाढेल त्याप्रमाणेंच कार्याचे मार्ग आणि पद्धति व त्यामागील शुद्ध हेतु यांच्या योगानें जनतेंत परस्परसहकार्य, ऐक्यभाव, सत्यप्रीति व अन्यायाची

घृणा यांचीं बीजें पेरलीं जातील. जनतेंतील ही संघटना व जनतेला मिळणारें शिक्षण यांच्यामुळें सत्याग्रहपद्धतीनुसार द्याव्या लागणाऱ्या कोणत्याहि लढ्यासाठीं जनतेची पुष्कळशी तयारी होऊं शकेल किंवा गुलाम देशाप्रमाणें जर लढ्याचा प्रसंग आधींपासूनच निर्माण झालेला असेल तर या कार्यामुळें त्या लोकांना त्यांच्या दैन्यावस्थेची जाणीव अधिक तीव्रतेनें होईल व त्यांच्यांत प्रतिकाराची इच्छा आणि दास्य-विमोचन यांबद्दलची उत्कंठा बळावत जाईल. विधायक कार्याचें स्वरूप आणि प्रत्यक्ष विधायक प्रवृत्ति यांच्यांत फरक असूं शकेल परंतु तें आचरणांत आणण्याचा मार्ग व पद्धति, त्यामागील स्वार्थरहित सेवेचा मूळ उद्देश, सत्य व अहिंसा यांवरील दुर्दम्य विश्वास यांत रेसभरहि फरक पडतां कामा नये. सत्याग्रहाच्या इमारतीचा तोच तर खरा भक्कम पाया आहे.

ज्या क्षेत्रांतं करबंदी किंवा सविनय कायदेभंग यासारख्या तीव्र स्वरूपाचा सत्याग्रह करावयाचा असेल त्या क्षेत्रांत विधायक कार्याबद्दल गांधीजी येवढा आग्रह कां धरतात तें वरील विवेचनानंतर स्पष्टपणें ध्यानांत येईल.

१९२२ सालांतील बार्डोली येथील करबंदीच्या मोहिमेचें आपण उदाहरण घेऊं. प्रांतांत वैयक्तिक किंवा सामुदायिक स्वरूपाचा सविनय कायदेभंग सुरू करण्याबाबत अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीनें ता. ४·११·२१ रोजीं कांहीं अटी घालून ठेवल्या होत्या त्यांत असें नमूद करून ठेवण्यांत आलें होतें कीं वैयक्तिक सत्याग्रहाच्या बाबतींत सत्याग्रहीला सूतकताई आली पाहिजे, वैयक्तिक आचरणाच्या बाबतींत लागू होण्यासारखा सर्व कार्यक्रम तो अंमलांत आणीत असला पाहिजे, सर्व जातींच्या ऐक्यावर त्याचा विश्वास असला पाहिजे, त्याला अहिंसा हें लढ्यांतील आवश्यक तत्त्व आहे ही गोष्ट पटलेली असली पाहिजे आणि तो जर हिंदु असेल तर अस्पृश्यता हा राष्ट्रावरील कलंक आहे असें त्यानें आपल्या आचरणानें दाखवून दिलें पाहिजे. सामुदायिक सविनय कायदेभंगाच्या बाबतींत त्या क्षेत्रांतील बहुसंख्य जनतेनें स्वदेशीचा अंगीकार केला पाहिजे आणि असहकाराच्या इतर सर्व प्रकारांवर विश्वास ठेवून ते आचरणात आणले पाहिजे. त्यांत पुढें असेंहि नमूद करण्यांत आलें होतें कीं सत्याग्रहींनीं

किंवा त्यांच्या कुटुंबियांनीं निर्वाहासाठीं कॉंग्रेसच्या पैशावर अवलंबून राहतां कामा नये. या अटींची आवश्यकता लक्षांत घेऊन बार्डोली तालुक्याची तयारी कितपत झाली होती तें पाहूं. पांसष्टपैकीं एकावन्न शाळा राष्ट्रीय बनल्या होत्या. हिंदु-मुसलमानऐक्य कळसास पोहोंचलें होतें. अस्पृश्यता अजिबात नष्ट झाली नसली तरी त्या मार्गावर होती. खादीचा प्रसार झपाट्यानें होत होता. गांधीजी लिहितात (यंग इंडिया २-१-२२), "बार्डोलीनें अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. अखेरचा आणि मार्गें न घेतां येणारा मार्ग बार्डोलीनें पत्करला आहे. ... मी सभेंतील लोकांचा (सभेस ५०० स्त्रिया धरून ४००० खादीधारी श्रोते हजर होते) प्रत्येक अटीबाबत स्वतंत्रपणें मनोदय समजून घेतला आहे. हिंदु-मुसलमान-पार्शी-ख्रिस्ती ऐक्याचा अर्थ त्याच्या ध्यानांत आलेला आहे. अहिंसेची महत्ती आणि सत्यता त्यांना आकलन झालेली आहे. अस्पृश्यता नाहींशी करण्या-मागची भूमिका त्यांना समजलेली आहे. ... करबंदी किंवा सविनय कायदेभंगाच्या इतर प्रकारांचा अवलंब मीं सांगितल्या मार्गानें आत्मशुद्धि केल्याखेरीज ते करूं शकणार नाहींत याची त्यांना जाणीव आहे. ते जाणून आहेत कीं त्यांनीं उद्योगी बनलें पाहिजे, व स्वतः सूत कांतून स्वतःपुरती खादी विणली पाहिजे. आणि अखेर त्यांची कारावासाला आणि प्रसंगीं मरणाला देखील तयारी असून हें सर्व ते विनतक्रार करतील."

विधायक कार्यांत पुरेशी प्रगति केल्याखेरीज गांधीजींनीं बार्डोलीला करबंदीची परवानगी दिली नसती. विधायक कार्य आणि सत्याग्रह यांतील परस्परसंबंध हे असे अविभाज्य आहेत. संयुक्त प्रांतांतील चौरीचौऱ्या-सारख्या ठिकाणीं हिंसा घडल्यामुळें बार्डोलीचा सत्याग्रह त्या वेळीं सुरू करण्यात आला नाहीं हीं गोष्ट निराळी.

बार्डोलीबद्दल बोलत असतांनाच १९२८ सालीं करबंदीच्या स्वरूपांतील सत्याग्रहाची तयारी तेथें कशा तऱ्हेनें करण्यांत आली तें पाहूं. १९२२ सालीं करावयाची करबंदीची मोहीम जरी मागें घेण्यांत आली तरी त्याच तालुक्यांत १९२८ सालीं त्या मार्गाचा अवलंब करण्याचा प्रसंग आला. गांधीजींच्या नेतृत्वाखालीं व त्यांच्या प्रेरणेनें चालविण्यांत आलेल्या सत्या-

ग्रहांपैकीं अत्यंत यशस्वी व नमुनेदार सत्याग्रह म्हणून बार्डोलीचा उल्लेख केला जातो. १९२२ सालीं जरी बार्डोलींत करबंदीची मोहीम सुरू झाली नाहीं तरी तेथें एकदां सुरू झालेलें विधायक कार्य चालूच होतें. सुमारें एक लाख लोकवस्तीच्या त्या तालुक्याची विधायक कार्यासाठीं संघटना केली जात होती. खऱ्याखुऱ्या व भक्कम पायावर आधारलेल्या विधायक प्रवृत्तीसाठीं केलेली संघटना जमातीच्या अहिंसक प्रत्यक्ष प्रतिकाराच्या संघटनेसाठींहि उपयोगी पडते. त्या तालुक्यांत १९२१ पासून सतत गांधीवादी मार्गानें विधायक कार्य चालविणारीं चार केंद्रें आश्रमाच्या रूपानें काम करीत होतीं. त्याचप्रमाणें तेथें अनेक स्वार्थत्यागी कार्यकर्तेहि होते. करबंदीची मोहीम सुरू करण्याचें ठरतांक्षणींच सरदार पटेल यांच्या हातीं सर्व सूत्रें देण्यांत आलीं. त्यांची संघटनाशक्ति अप्रतिम आहे. त्यांनीं आणखी कांहीं सोयिस्कर केंद्रें आणि हुषार कसानांच्या नेतृत्वाखालीं खेडुत जनतेचीं स्वयंसेवकपथकें संघटित केलीं. हीं केंद्रें आणि स्वयंसेवकपथकें यांच्या तालुकाभर पसरलेल्या जाळ्याचा तालुक्याला रक्तवाहिन्यांसारखा उपयोग झाला. त्यामुळें प्रत्येक खेड्याच्या कानाकोपऱ्यांत घडणाऱ्या हकीगतीची साद्यन्त माहिती क्षणाक्षणाला सरदारांना मिळूं शके. त्याचप्रमाणें बुलेटिनची पद्धतहि सुरू केली होती. एक वेळ तर अशी होती कीं बुलेटिनच्या प्रती तालुक्यांत १०,००० आणि तालुक्याबाहेर ४,००० वांटल्या जात. त्यामुळें प्रत्येक खेड्याला माहिती आणि सूचना पुरविल्या जात. स्वतः सरदार प्रत्येक खेड्यांत आणि शिबिरांत जाऊन लोकांना साऱ्यांत झालेली वाढ न भरण्याची घेतलेली शपथ पाळण्याची स्फूर्ति देत, त्यांचें मार्गदर्शन करीत व त्यांना प्रोत्साहन देत. १२-२-२८ रोजीं बार्डोली येथें भरलेल्या विराट् परिषदेंत सत्याग्रहमोहिमेचा निर्णय घेण्यांत आला. त्यानंतर सरदारांनीं खेडुतांच्या अनेक सभांतून व्याख्यानें दिलीं. सबंध तालुक्यांत तेच एकमेव व्याख्याते असत. आणि शिस्त म्हणून दुसऱ्या कोणालाहि भाषण करतां येत नसे. गांधीजींनीं त्या तालुक्याला भेट दिली त्या वेळीं त्यांनीं देखील ती शिस्त पाळली. ज्या वेळीं सरकारी दडपशाही सुरू झाली आणि कार्यकर्ते भरामर गिरफदार होऊं लागले त्या वेळीं

त्यांची जागा भरून काढण्यासाठीं ताबडतोब दुसऱ्या कार्यकर्त्यांची त्या ठिकाणीं रवानगी करून संघटना शेवटपर्यंत अभंग राखण्यांत आली. स्थानिक कुळें पुढाकार घेऊं लागलीं, लोकगीतें व शौर्याच्या आणि क्लेशांच्या कथा यांच्या योगानें लोकांचें नीतिधैर्य आणि त्यांची अंतिम विजयावरील श्रद्धा टिकून राहण्यास मदत झाली. तालुक्यांत दळणवळण ठेवणें, तालुक्यांत आणि तालुक्याबाहेर प्रचार करणें, वेळोवेळीं सरकारनें योजलेल्या उपायांसंबंधीं अवश्य त्या सूचना देणें, शेतकऱ्यांचें नीतिधैर्य टिकवणें, ग्रामाधिकाऱ्यांचे राजीनामे मिळवणें, सरकारी लिलावांवर निरोधन करणें, सरकारी नोकरांबरोबरचा असहकार चालू ठेवणें वगैरे कामें मुख्यतः संघटनेमार्फत पार पाडावयाचीं होतीं. लष्करी मोहिमेंत कराव्या लागणाऱ्या धर्तीचींच हीं सारीं कामें असल्याचें आढळून येईल. तसेंच डावपेचांत आणि योजनांत चुका न करतां यशस्वी तऱ्हेनें सत्याग्रहमोहीम चालविण्यासाठीं लष्करी सेनापतीसारखेंच चातुर्य आणि प्रसंगावधान लागतें हें यावरून स्पष्ट होईल.

आतां आपण तयारीकडे वळूं. सत्याग्रहाची मुख्य तयारी करणें म्हणजे सत्य आणि त्याचा अंतिम विजय यांवरील निष्ठा लोकांच्या मनावर ठसवणें हें होय. वस्तुतः जें अस्तित्वांत असतें, कार्य करीत असतें आणि ज्याचा विजय होतो तें सत्य. सत्याग्रहमोहीमेशीं निगडित असलेल्या लोकांचा असा विश्वास असला पाहिजे कीं त्यांना झालेल्या ज्ञानानुसार सत्य त्यांच्या बाजूला आहे. तसें असेल तरच त्यासाठीं आपलें सारसर्वस्व पणाला लावण्याइतका खंबीरपणा आणि नीतिधैर्य त्यांच्यांत निर्माण होईल. त्यानंतरची पायरी म्हणजे प्रेम आणि अहिंसा यांच्या द्वारा सत्याचें अनुकरण करणें. आपल्याला लढा द्यावयाचा आहे तो अन्याय करणाराशीं नसून अन्याय आणि असत्य यांच्याविरुद्ध कारण अन्याय करणाऱ्या व्यक्ति वेगळ्या दिसल्या तरी तीं आपलींच स्वरूपें आहेत. तेवढ्यासाठींच सत्याग्रही दुसऱ्याला त्रास देण्याची कल्पना मनांत आणीत नाहीं.

विधायक कार्य चालू असेल आणि सत्याग्रहाचीं मूलतत्त्वें जनतेला शिकविलीं असतील तर त्यानंतरची तयारीची पायरी म्हणजे आत्मशुद्धि.

विधायक कार्यप्रमाणेंच आत्मशुद्धीचा क्रम देखील अखंड असला पाहिजे. लोकांनीं आपल्यामधील अन्याय व मद्यसेवनासारख्या सर्व वाईट संवयी काढून टाकल्या पाहिजेत. त्यांच्याभोंवतीं घडणाऱ्या अन्यायांशीं आपण होऊन सहकार करण्याचें त्यांनीं बंद केलें पाहिजे. त्यासाठीं जरूर तर उपोषणाचाहि ते अवलंब करूं शकतील. त्याचप्रमाणें प्रार्थना आणि तपश्चर्या या मार्गांचेंहि ते अनुसरण करूं शकतील. दुसऱ्या कशानेंहि बाढणार नाहीं इतकें भावी सत्याग्रहीचें सामर्थ्य यामुळें वाढेल. त्यानंतर आपली सर्व शक्ति पणाला लावून अन्यायाचा प्रतिकार करण्याची त्यानें प्रतिज्ञा केली पाहिजे.

दररोज द्यावयाच्या त्या प्रतिज्ञेचें स्वरूप साधारणपणें असें राहील:— "मी जगांत कशाचीहि भीति बाळगणार नाहीं. मी सत्य किंवा ईश्वर यांचेंच फक्त भय बाळगीन. कोणाच्याहिविरुद्ध मनांत दुर्भावना बाळगणार नाहीं. कोणत्याहि अन्यायापुढें मी मान वाकवणार नाहीं— मग तो कोठल्याहि स्वरूपांत आणि कोठूनहि होवो. मी असत्याला सत्यानें जिंकून घेईन. सत्यानें असत्य, प्रेमानें द्वेष, न्यायानें अन्याय जिंकून घेत असताना भोगावे लागणारे कष्ट मी मोठ्या आनंदानें आणि दुसऱ्याविषयीं सद्भावना बाळगून सहन करीन."

या प्रतिज्ञेचें कवच चढवून आणि आपली बाजू सत्याची आहे याबद्दल स्वतःची त्रिवार खात्री करून घेऊन सत्याग्रही कोणत्याहि लढ्याला हात घालूं शकेल.

सत्याग्रहासाठीं शिस्त : : १२

सत्याग्रहांत पराकाष्ठेच्या तयारीची तर जरूर आहेच पण त्याच्या दुप्पट जरूरी कडक शिस्तीची आहे. सत्याग्रहाच्या बाबतींत शिस्तभंगाबद्दल

कोणत्याहि तऱ्हेची शारीरिक किंवा हिंसक उपाययोजना अंमलांत आणली जात नाहीं. म्हणून तर कार्यकर्ते आणि जनता यांनीं आपलें आपणच शिस्तीचें आणि वरिष्ठांच्या आज्ञापालनाचें महत्त्व ओळखण्याची अधिकच आवश्यकता निर्माण होते. सत्याग्रहलढ्याचें आणखी एक वैशिष्ट्य असें आहे कीं त्यांत बहुधा पुढाऱ्यांचा बळी प्रथम पडतो. आणि ते फांसावर गेले नाहींत तरी बहुतेक वेळीं त्यांची तुरुंगांत रवानगी केली जाते. त्यानंतर मागें राहिलेल्या सामान्य सैनिकांनीं लढा चालवावयाचा असतो. त्यामुळें पुढाऱ्यांची उचलबांगडी झाल्यानंतर शिस्त अत्यंत आवश्यक होऊन बसते. पुष्कळ वेळीं नवीन कार्यक्रम शोधून तो जबाबदारीनें पार पाडावा लागतो. अशा वेळीं एका ध्येयावरील निष्ठा आणि शिस्त यांमुळेंच सत्याग्रहाचे सैनिक एकत्र राहूं शकतात. गांधीजींनीं सत्याग्रहींच्या सर्वसाधारण मार्गदर्शनाकरतां म्हणून घालून दिलेले नियम सर्वांनाच खात्रीपूर्वक उपयुक्त ठरतील. (परिशिष्ट पहा.)

शिस्तीचें महत्त्व व आवश्यकता यासंबंधीं गांधीजींनीं काढलेले उद्‌गार मननीय आहेत. ते म्हणतात, "त्याग, शिस्त आणि आत्मसंयमन यांच्याखेरीज उद्धाराला किंवा आशेला जागाच नाहीं. शिस्तीशिवाय नुसता त्याग असेल तर तो उपयोगी पडणार नाहीं." अहमदाबाद येथें शाळेंतील विद्यार्थ्यांच्या परिषदेपुढें भाषण करतांना गांधीजी म्हणाले, "आपल्यांतील शिस्त आणि आत्मसंयमन यांमुळेंच आपण पशूंपेक्षां निराळे समजले जातों." त्यांचें स्वतःचें जीवन म्हणजे अत्यंत कडक आणि कठोर शिस्तीचा एक नमुना आहे. महान् व्यक्तींच्या जीवनांत देखील इतकी शिस्त क्वचितच आढळून येईल. ते आजारी असोत किंवा बरे असोत, तुरुंगांत असोत किंवा बाहेर असोत, त्यांची सकाळची व सायंकाळची प्रार्थना, त्यांची सूतकताई आणि त्यांचें मौन कधींहि चुकत नाहीं. रात्रीं दोन वाजतां जरी ते निजले तरी पुन्हां ते चारला प्रार्थनेला उठणारच. आणि दिवसाचें ठरलेलें सूत पुरें केल्याखेरीज ते आपलें जेवण देखील घेत नाहींत.

तथापि शिस्तीची आवश्यकता आहे येवढें नुसतें म्हटल्यानें काम

मागणार नाहीं. शिस्त पाहिजे ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे. पण सत्याग्रहीनें कोणत्या तऱ्हेची शिस्त पाळली पाहिजे तें सांगणें जास्त महत्त्वाचें आहे. त्याचप्रमाणें अहिंसेच्या आणि हिंसेच्या शिस्तींत काय फरक असतो तेंहि आपण पाहिलें पाहिजे.

मूलतः शिस्त म्हणजे हुकूम पाळणें किंवा हुकुमाची अंमलबजावणी करणें. संघटनेंत शिस्त गृहीत धरलेलीच असते. शिस्तीखेरीज कसलीहि संघटना होणें अशक्य आहे. नेपोलियननें अगदीं यथार्थपणें म्हटलें आहे कीं युद्धांतील यशाचें पंचाहत्तर टक्के श्रेय शिस्तीकडेच असतें. फॉकच्या मतें शिस्त हीच सैन्याची मुख्य शक्ति होय.

आत्मोन्नतीसाठीं आपण होऊन पत्करलेली शिस्त हाहि शिस्तीचा एक प्रकार आहे. अशी शिस्त अंगीं बाणावी म्हणून चेतना किंवा सूचना मिळतांच विशिष्ट तऱ्हेची क्रिया करण्याची मनुष्य स्वतःला संवय लावून घेतो. त्या योगानें तो स्वतःच्या आयुष्याला एक प्रकारचें वळण लावतो आणि आपल्या शक्तीचें नियमन करतो. आत्मसंयमन आणि स्वतःच्या शक्तीचा जास्तींत जास्त उपयोग या दृष्टीनें या प्रकारच्या शिस्तीला फार महत्त्व आहे.

लष्करी शिस्तीनें जवळ जवळ यांत्रिक स्वरूपाची आज्ञाधारकपणाची संवय जडते. माणसें नुसतीं कळसूत्रीं बाहुलीं बनतात. 'कां असा प्रश्न विचारण्याचें काम तुमचें नव्हे. हुकुमाची अंमलबजावणी करणें आणि मरणें हेंच तुमचें काम.' हुकूम होतांच गोळी झाडण्याचें आणि मुडदा पाडण्याचें शिक्षण लाखों लोकांना दिलें जातें. लष्करांत शिस्त हा सर्वांत मोठा गुण मानला जातो आणि शिस्तभंग हा सर्वांत मोठा गुन्हा समजण्यांत येतो. त्या गुन्ह्यासाठीं तेथल्या तेथें ठार करण्याची देखील शिक्षा फर्मावण्यात येते.

हिंसक सैनिकाला लागणाऱ्या शिस्तीपेक्षां अहिंसक सैनिकाला अवश्य असणारी शिस्त ही साहजिकच निराळी आहे. एकाला मारावयाचें असतें तर दुसऱ्याला मरावयाचें असतें; एकाला द्वेष करावयाचा असतो तर दुसऱ्याला प्रेम करावयाचें असतें; एकाला रागवावयाचें असतें तर दुसऱ्याला शान्त रहावयाचें असतें; एकाला भीति निर्माण करावयाची असते

तर दुसऱ्याला प्रत्यक्ष मृत्यला देखील निर्भयपणें तोंड द्यावयाचें असतें; एकाला इतरांवर यातना लादावयाच्या असतात तर दुसऱ्याला त्या स्वतः बिनतक्रार सहन करावयाच्या असतात. अशा तऱ्हेनें हिंसक सैनिकाला मिळणाऱ्या शिक्षणाचे हेतु अहिंसक सैनिकाला मिळणाऱ्या शिक्षणापेक्षा अगदीं निराळे असल्यामुळें त्यांचें शिक्षणहि निरनिराळें असतें. परंतु दोन्ही बाबतींत शिक्षणाची पद्धत मात्र मानवी मन आणि त्याचे सिद्धान्त यांच्या निरीक्षणावरच आधारलेली असते.

आयरिश कवि जॉर्ज रसेल आणि विख्यात लष्करी लेखक लिडेल हार्ट यांच्यासारख्या सहानुभूतिपूर्वक विचार करणाऱ्याकडून देखील सत्याग्रहावर घेण्यांत येणारा सर्वांत महत्त्वाचा आक्षेप असा कीं अहिंसक प्रतिकारांत मानवी स्वभावाकडून फार मोठ्या अपेक्षा बाळगल्या जातात. परंतु ज्या वेळीं शिस्तबद्ध हिंसक सैन्य प्रथम रणांगणांत म्हणजे साक्षात् मृत्यूच्या जबड्यांत उतरविण्यांत आलें असेल त्या वेळीं देखील बहुधा निरीक्षकांनीं असाच आक्षेप घेतला असेल. परंतु संवय आणि शिक्षण यांमुळें माणसांच्या सुप्त शक्तींना प्रकट स्वरूप प्राप्त होऊं शकतें. म्हणून कोणत्याहि वेळीं अमुक एक काम करतां येणें अशक्य आहे असें म्हणणें उतावळेपणाचें होईल. धारासना येथें सत्याग्रहींनीं दाखविलेली मर्दुमकी प्रत्यक्ष पाहीपर्यंत त्यांच्या सहनशक्तीची कल्पना कोठें कोणाला आली होती? गुरूका बाग मधील हुतात्म्यांनीं प्रकट केलेल्या अचाट धैर्याचें भविष्य आधीं कोणाला सांगतां आलें असतें? म्हणून भविष्यावर अढळ विश्वास ठेवून बिनीचे वीर म्हणून कोठल्याहि क्षेत्रांत पाऊल टाकणें हें नेहमींचा शहाणपणाचें असतें.

या ठिकाणीं या विषयाचा अधिक विस्तार करण्याचें कारण नाहीं. रिचर्ड ग्रेग यानीं आपल्या 'पॉवर ऑफ् नॉन्व्हायोलन्स' आणि 'डिसिप्लीन् फॉर् नॉनव्हायोलन्स' या दोन्ही पुस्तकांतून याची शास्त्रीय चर्चा केली आहे. येथें येवढें सांगितलें म्हणजे पुरे कीं सैनिकासारखी शिस्त जरी बऱ्याचशा प्रमाणांत सत्याग्रहीच्या अंगीं बाणणें जरूर असलें तरी त्याची खरी भिस्त आंतरिक शिस्तीवरच असली पाहिजे. सर्वांवर प्रेम करणें, राग येऊं न देणें आणि

द्वेषभावनेशिवाय क्लेश सहन करणें या संवयी लावून घेणें हें कांहीं वस्तुतः इतकें सोपें नाहीं. चिंतन आणि प्रार्थना व जीवनमूल्यांची नवी मांडणी यांच्या योगानेंच माणसाला अशा तऱ्हेच्या जीवनाच्या नव्या दृष्टिकोणाचा पाया घालतां येईल. परंतु नवीन संस्कृति उदयास येण्याला त्यामुळें मदत होणार असल्यानें तो प्रयोग करण्यासारखा आहे यांत शंकाच नाहीं.

रिचर्ड ग्रेग यांनीं सार्थपणें असें प्रतिपादन केलें आहे कीं आज्ञाधारकपणा, स्वाभिमान, स्वावलंबन, आत्मसंयम, स्वार्थत्याग, निग्रह, इतरांशीं (विरोधकासकट) ऐक्यभाव, सहनशीलता, शिस्त आणि सहकार्याची भावना, उत्साह, धैर्य, शांत वृत्ति आणि समतोलपणा, शस्त्रांच्या नैतिक पर्यायांचा उपयोग करण्याची संवय या गोष्टी लष्करी शिक्षणाप्रमाणेंच सरावानें आणि सर्वांनीं मिळून ज्ञानपूर्वक केलेल्या शारीरिक श्रमानें देखील वाढवतां येतात. तथापि त्यांतील मुख्य फरक म्हटला म्हणजे लष्करी शिक्षणाच्या बाबतींत सैनिकाला बाह्य अधिकाऱ्यांची आज्ञा पाळण्याची संवय लावली जाते तर सत्याग्रहाच्या शिक्षणाच्या बाबतींत मुख्य आज्ञा कोणाच्या पाळावयाच्या असतील तर आपल्या स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीच्या होत.

आपल्या 'पॉवर् ऑफ् नॉन्व्हायोलन्स' या पुस्तकांतील आंतरिक शिस्त या प्रकरणाच्या अखेरीला लेखक म्हणतो, " सत्य, प्रेम, आध्यात्मिक ऐक्य, समता, सभ्यता, साधेपणा, आत्मशुद्धि व परिवर्तनाचें साधन म्हणून आत्मक्लेश हीं तत्त्वेंच आंतरिक शिस्तीच्या मुळाशीं आहेत. या तत्त्वांची सर्व ठिकाणीं आणि सर्व प्रकारें साधना केली पाहिजे. या कल्पनांशीं तुमचें तादात्म्य झालें पाहिजे. तुमची कल्पनाशक्ति त्यांत रंगून गेली पाहिजे. नियमितपणें आणि वारंवार त्यांचें चिंतन केलें पाहिजे. हीं तत्त्वें ठसवणारीं, त्यांच्या अर्थावर, आचरणावर आणि उपयुक्ततेवर प्रकाश पाडणारीं पुस्तकें, व्यक्ति आणि परिस्थिति यांच्या शोधांत असलें पाहिजे. त्यांचें रहस्य नीट समजण्याच्या दृष्टीनें तीं सतत आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या सर्वांमुळें वारंवार होणाऱ्या सौम्य चेतनांचा

परिणाम आणि चिकाटी व सहनशीलता यांची आवश्यकता नेहमी ध्यानांत बाळगली पाहिजे. ... बुद्ध, ख्राईस्ट, सेंट फ्रान्सिस ऑफ् असीसी, जॉर्ज फॉक्स, जॉन बुलमन, गांधी व या विचारप्रणालीचे इतर महान् प्रवर्तक यांचीं चरित्रें हेंच या शिस्तीचें सर्वोत्तम वर्णन होईल."

सत्याग्रहाच्या नमुनेदार सैनिकाचें थोडक्यांत वर्णन करून हें प्रकरण संपवूं. त्यामुळें आदर्श सत्याग्रहीला जरूर असणाऱ्या शिस्तीची व तयारीची चांगली कल्पना येईल.

आध्यात्मिक दृष्ट्या त्यानें सत्य व परमेश्वरी शक्ति यांवर विश्वास ठेवला पाहिजे. तसेंच त्याच्यांत नुसत्या शरीरापेक्षां जास्त कांहीं तरी असून अन्याय किंवा जुलूम करणाऱ्या पाशवी शक्तीच्या तो अतीत आहे अशी त्याची श्रद्धा असली पाहिजे. सर्व मानवजात आणि प्राणिमात्र यांच्याकडे त्यानें समदृष्टीनें पाहिलें पाहिजे. त्यानें सर्वांवर प्रेम केलें पाहिजे आणि विरोधकांबद्दल सुद्धां मनांत सद्भाव बाळगला पाहिजे. त्यानें सत्याच्या किंवा सर्वांना मार्ग दाखवणाऱ्या परमात्म्याच्या हातांतील केवळ एक साधन म्हणून स्वतःकडे पाहिलें पाहिजे व आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी ठेवली पाहिजे. त्यानें शुचिता अंगीं आणली पाहिजे आणि ओंगळ विचार मनांतून काढून टाकले पाहिजेत. वेळोवेळीं तो आचरीत असलेल्या सत्याचें दर्शन त्याला अगदीं स्पष्ट असलें पाहिजे.

नैतिक दृष्ट्या तो निर्भय, धैर्यवान्, विनयी, परोपकारी, सत्यशील, योग्यायोग्य व गुणावगुण पारखण्यात नेहमीं दक्ष व मोकळ्या मनाचा असला पाहिजे. केवढीहि जबरदस्त किंमत द्यावी लागली तरी त्यानें सत्य अनुसरलें पाहिजे आणि कोणत्याहि स्वरूपांतील हिंसा त्यानें टाळली पाहिजे. त्यानें नेहमीं आशावादी आणि आनंदी असलें पाहिजे.

बौद्धिक दृष्ट्या त्याला त्याच्या कार्याचें स्पष्ट आकलन झालें असलें पाहिजे. त्याची बाजू सत्याधिष्ठित आहे अशी त्याची खात्री असली पाहिजे आणि तो आचरीत असलेल्या मार्गांची त्याला संपूर्ण जाणीव असली पाहिजे. त्याच्या वर्तनाबद्दल आणि निष्ठेबद्दल त्याला इतरांची खात्री पटवून देतां आली पाहिजे.

शारीरिक दृष्ट्या तो आरोग्यसंपन्न आणि कांटक असला पाहिजे. त्याला शारीरिक श्रमांची संवय असली पाहिजे व यातना आणि कष्ट सहन करण्याची त्याची तयारी असली पाहिजे. साधें अन्न, जाडेंभरडें वस्त्र येवढ्याचरच त्यानें समाधान मानलें पाहिजे. आजारी पडल्यास त्यानें हातपाय गाळूं नयेत. त्यानें चलाख आणि कार्यप्रवण असलें पाहिजे आणि खेड्यांपाड्यांतून त्याला पायीं फिरतां आलें पाहिजे.

वर दिलेल्या कमींत कमी गोष्टी सत्याग्रहीनें आत्मसात् केल्याखेरीज त्याला जनतेची सत्याग्रहासाठीं तयारी करतां येणार नाहीं.

९०३७२ ग्रंथ
दि. ३१२
क्रमांक

सत्याग्रहतंत्र

एखादी गोष्ट करण्याचा शास्त्रशुद्ध व मान्यता पावलेला मार्ग म्हणजेच तंत्र. सामाजिक शस्त्र म्हणून सत्याग्रहाचा मार्ग फार 'जुना आहे' असें म्हणतां येणार नाहीं किंवा आज त्याला पूर्णावस्थेस पोहोंचलेल्या शास्त्राचें स्वरूपहि प्राप्त झालेलें नाहीं. सत्याग्रहतंत्र अजून प्रयोगावस्थेंत असून आणखी कित्येक वर्षेंहि तें तसेंच राहण्याचा संभव आहे. तथापि आतांपर्यंतच्या त्याच्या विकासाचें श्रेय गांधीजींच्याकडे असून त्यांनीं अंतःस्फूर्ति आणि अनुभव यांच्या जोरावर त्याची एक विशिष्ट पद्धत बसवली आहे. ही पद्धत हेंच त्याचें तंत्र होय. अजून सत्याग्रहशास्त्र प्रगतावस्थेंत असल्यामुळें त्याचें तंत्रहि अपूर्णावस्थेंतच आहे. परंतु सर्वसाधारणपणें नेहमींच्या उपयोगाच्या दृष्टीनें तें बऱ्याच दिवसांच्या व अनुभवाच्या कसोटीस उतरलें आहे.

कोणत्याहि परिस्थितींत सत्याग्रहांत असत्य, जीवित किंवा मालमत्ता यांच्याविरुद्ध होणारी हिंसा, गुप्तता, अन्याय, दुःख, फसवणूक, अप्रामाणिकपणा, कपट, आक्रमण किंवा पिळवणूक यांना कसलाहि वाव नाहीं. त्या-

मुळें एखादा सवाल पुढें आला असतांना वर दिलेल्यांपैकीं एकाहि गोष्टीला आपण कारणीभूत न होण्याबद्दल सत्याग्रहीनें खात्री करून घेतली पाहिजे.

१९१९ सालीं जमावाच्या हातून घडलेल्या हिंसेला उद्देशून गांधीजींनीं काढलेले उद्गार येथें उद्धृत करण्यासारखे आहेत. त्याबद्दलची आपली तीव्र नापसंती व्यक्त करून ते पुढें म्हणतात, "सत्याग्रहांत हिंसा, लूटमार ह्यांना यत्किंचितहि स्थान नाहीं. आणि तरी देखील आपण सत्याग्रहाच्या नांवावर इमारतींना आगी लावल्या, जबरदस्तीनें हत्यारें ताब्यांत घेतलीं, पैसे उकळले, आगगाड्या थांबवल्या, तारा तोडल्या, निरपराधी लोकांचे बळी घेतले आणि दुकानें व खाजगी घरें यांची लूटमार केली. असल्या कृत्यांमुळें जर माझी तुरुंगांतून किंवा फांसावरून मुक्तता होणार असेल तर तशा तऱ्हेची मुक्तता मला नको."

सत्याग्रहीनें सामाजिक, आर्थिक, राजकीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय यांपैकीं कोणतेंहि कार्यक्षेत्र वर्ज मानतां कामा नये. तो क्षेत्र पसंत करतांना जे अगदीं निकटवर्ती आहेत त्यांची सेवा करणें व ज्या लोकांत राहावयाचें त्यांचे निकडीचे प्रश्न हातीं घेणें ही दृष्टि ठेवील.

झगडा किंवा गाऱ्हाणें किंवा एखादा अन्याय उद्भवून वैयक्तिक अथवा सामुदायिक सत्याग्रहाच्या योगानें त्याचा परिहार करण्याची वेळ आली असतां सत्याग्रहीनें अन्यायाच्या खरेपणाविषयीं प्रथम स्वतःची पूर्ण खात्री करून घेतली पाहिजे.

काळजीपूर्वक निःपक्षपातीपणानें केलेल्या संपूर्ण चौकशीनंतर गाऱ्हाणें खरें असल्याबद्दल जर त्यांची खात्री पटली तर त्यानंतर त्यानें करावयाची गोष्ट म्हटली म्हणजे ज्या लोकांना त्या अन्यायाची झळ लागत असेल त्यांना त्यांतून पार पडण्याची तळमळ लागून राहिली आहे किंवा नाहीं हें पाहणें. सत्याग्रहीला गाऱ्हाण्याच्या गांभीर्याची जाणीव होतांच त्यानें त्याबद्दल जबाबदार असणाऱ्यांना शक्य तेवढ्या सभ्य भाषेंत गाऱ्हाण्याचें सत्य स्वरूप सांगून त्याची जबाबदारी त्यांच्यावर कशी पडते तें समजावून सांगितलें पाहिजे. त्यानंतर कोठल्याहि प्रकारची अतिशयोक्ति न करतां त्यानें वस्तुस्थितीची समग्र माहिती जाहीर करावी. वर्तमानपत्रें व सभा या

नेहमींच्या मार्गांनीं विवेक जागृत होऊं शकेल. अशा स्वरूपाचा प्रचार चालू ठेवावा. मात्र असें करतांना नेहमीं सत्य, संयम आणि विचार, उच्चार व आचार यांत नम्रता पाळण्याची काळजी घ्यावी. त्याचबरोबर जे अन्याय सहन करीत आहेत त्यांच्यांत त्यानें जास्तींत जास्त जागृति केली पाहिजे आणि ते हालअपेष्टांना तोंड देण्यास व सत्याग्रहाचा अवलंब करण्यास तयार आहेत किंवा नाहींत तें अजमावलें पाहिजे. जर पुरेसे बहुसंख्याक लोक सत्याग्रहाला तयार असतील तर त्यांचा तो निर्धार अधिक बळकट केला पाहिजे. बहुसंख्य लोक सत्याग्रहाला तयार नसतील तरी व्यक्तिशः सत्याग्रह करून अन्याय सहन करणारांच्यांत जागृति निर्माण करण्यास व त्याना उदाहरण घालून देण्यास कसलीच आठकाठी नाहीं. दरम्यान अन्यायाला जबाबदार असलेल्या व्यक्तीला परिस्थितीची सूचना देऊन तो अन्याय दूर करण्याची विनंति करण्यांत यावी. त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं तर लढ्याचा निर्णय घेण्यांत येऊन त्यासाठीं योग्य असें सत्याग्रहाचें स्वरूप निश्चित करण्यांत यावें. तें स्वरूप त्या परिस्थितीतूनच निर्माण झालेलें, सर्वांना पटण्यासारखें आणि ज्यांत जास्तींत जास्त लोक भाग घेऊं शकतील अशा प्रकारचें असावें. सत्याग्रह सुरू करण्यापूर्वी इतर सर्व साधनांचा उपयोग करून पाहण्यांत आलेला असावा. सत्याग्रह अहिंसक असला तरी तो युद्धाइतकाच गंभीर आणि निर्वाणीचा असतो. अन्याय करणाराला पुरेशी पूर्वसूचना देऊन पुरेशा संघटनेनिशीं आणि तयारीनिशीं सत्याग्रह सुरू करण्यांत यावा.

ज्या लोकांना सत्याग्रह करावयाचा असेल त्यांनीं नेहमीं प्रतिज्ञा आणि आत्मशुद्धि यांनीं सुरवात करावी. प्रतिज्ञेचें गांभीर्य किंवा लढ्याची भीषणता यामुळें लोकांनीं विनाकारण कसलेंहि भय बाळगतां कामा नये अथवा धीर सोडतां कामा नये. उलट त्यामुळें तर लोकांचा निर्धार अधिकच कणखर बनला पाहिजे. ते वापरीत असलेल्या शस्त्राच्या नैतिक श्रेष्ठतेबद्दल आणि ते अविचल राहिल्यास त्यांना मिळणाऱ्या यशाच्या निश्चितीबद्दल त्यांच्यांत विश्वास निर्माण झाला असला पाहिजे.

लढ्याला गंभीर स्वरूप प्राप्त होत असतांना मधून मधून त्यांत मंदी

येण्याचा किंवा निराशा पसरण्याचाहि संभव आहे. अशा वेळीं जनतेला श्रेष्ठ जीवनमूल्याची जाणीव करून देऊन परिस्थितीला तोंड दिलें पाहिजे. कोणत्याहि प्रसंगीं संघटनेंत ढिलाई निर्माण होतां कामा नये किंवा संघटकांचा आशावाद झाकोळून जातां कामा नये. आत्मिक शक्तीवर व आपल्या बाजूच्या न्यायीपणावर पुरेसा विश्वास असेल आणि दुसऱ्याबद्दल दुर्भावना न बाळगतां अखेरपर्यंत क्लेश सहन करण्याची तयारी असेल तर ऐनवेळीं जनता निश्चितपणें स्वतःचे पुढारी निर्माण करील, आणि लढ्याचा शेवट अंतीं विजयांतच होईल. आपण कधींहि कचरतां कामा नये; आपला झेंडा कधींहि खालीं आणतां कामा नये. परंतु ज्या वेळीं विरोधकाचें पुरेसें परिवर्तन झालेलें असेल किंवा त्याचा निरुपाय झालेला असेल अशा वेळीं तत्त्वहानि होणार नसलेल्या मुद्द्याबद्दल हट्ट न धरतां तडजोडीस तयार असलें पाहिजे.

ज्या वेळीं आपल्या मनोनिग्रहाचा व चिवटपणाचा विरोधकावर तीव्र स्वरूपाचा परिणाम होतो आणि आपण 'मोडूं पण वांकणार नाहीं' अशी त्याची खात्री होते व नैतिकदृष्ट्या चूक त्यांची आहे असें त्याला आढळून येतें त्या वेळीं तो आपली भूमिका सोडून खालीं येण्याची शक्यता असते. आणि कालान्तरानें तर तो तडजोडीला तयार होण्याची खात्रीच असते. विरोधकांतील हा पालट त्याच्या हृदयपरिवर्तनानें घडून येऊं शकतो. अर्थातच विरोधकाला त्याची चूक समजून येणें व तो तडजोडीला तयार होणें हींच सत्याग्रहमोहिमेची परिपूर्णता होय. नैतिक दडपणामुळें अथवा अयोग्य वर्तन असेंच चालू ठेवल्यामुळें आपणांस सर्वच गमवावें लागेल असें विरोधकास आढळून आलें तरी देखील त्याचा पालट घडून येईल. कांहींहि झालें तरी अखेर सत्याग्रहीचा विजय ठरलेलाच असतो.

सत्याग्रहमोहिमा पैशावर कमींत कमी विसंबून असल्या पाहिजेत आणि जो कांहीं थोडाफार पैसा त्यासाठीं लागेल तो तेथल्या तेथें उभा करणें व त्याचा विनियोग अत्यंत काटसरीनें होणें अगत्याचें आहे. जमा केलेल्या व खर्च झालेल्या पैन् पैचा हिशेब ठेवला पाहिजे. सत्याग्रहाची मुख्य शक्ति लोकांच्या नीतिधैर्यावर अधिष्ठित झालेली असली पाहिजे. ती कसल्याहि बाह्य उत्तेजनावर अथवा आर्थिक मदतीवर अवलंबून असतां कामा नये.

सत्याग्रहींची सत्य व ईश्वर यांवरील निष्ठा व त्यांचा आत्मविश्वास यांच्या योगानेंच त्यांचें मार्गदर्शन झालें पाहिजे.

सरकारी अधिकारी अटक करण्यास आले असतां लोकांनीं आपण होऊन स्वाधीन व्हावें. तुरुंगांत असतांना तेथील जे कायदे धर्माला किंवा स्वाभिमानाला धक्का न लावणारे असतील त्यांचें पालन करावें. तुरुंगांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं म्हणून लढा करावयाचा नसेल तोपर्यंत तुरुंगाच्या कायद्याचें उल्लंघन करूं नये. लोकांना अटक झाली तर त्यांत दुःख मानण्याचें कारण नाहीं. उलट ती गोष्ट अभिनंदनास्पद अशीच मानली पाहिजे. सैनिकांतील कोठलाहि शिस्तभंग सहन करतां कामा नये. आणि सत्याग्रहाचा शारीरिक शिक्षेवर विश्वास नसल्यामुळें अनुयायांमधील गैरवर्तन समूळ नष्ट करण्यासाठीं संघटकांनीं उपवास किंवा तत्सम मार्गाचा अवलंब केला पाहिजे.

आपण प्रथम वैयक्तिक सत्याग्रहाच्या तंत्राचा विचार करूं. हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं या ठिकाणीं अन्यायाविरुद्ध लढण्याचें एक हत्यार म्हणून सत्याग्रहाकडे बघण्यांत येत आहे. एखाद्याच्या नागरिक हक्कावर बंदी घालण्यांत आली असतां किंवा १९१९, १९३३ आणि १९४० प्रमाणें गटानें अथवा समुदायानें नव्हे तर वैयक्तिक रीत्या कायदेभंग करण्याचा निर्णय घेण्यांत आला असतां अथवा विशिष्ट परिस्थितींत तसें करणें आपलें कर्तव्य वाटूं लागलें असतां वैयक्तिक सत्याग्रहाचा प्रसंग प्राप्त होतो.

नागरिक हक्कावर बंदी घालण्यांत आली असतांना त्या हुकुमाचा भंग करण्यास तंत्राची फारशी जरूर लागत नाहीं. हुकूम मोडण्याचा आपला इरादा सत्याग्रहीनें आधीं जाहीर करून त्याबद्दल मिळणारें शासन भोगण्यास आनंदानें तयार राहिलें पाहिजे. या बाबतींत सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं त्यानें प्रथमपासून शेवटपर्यंत विनम्र असलें पाहिजे. विनम्र याचा अर्थ केवळ अदबीचे शब्द वापरणें येवढाच होत नाहीं तर अहिंसेंत ज्या ज्या गोष्टी मोडतात त्या सर्वांचा अंतर्भाव विनम्रतेंत होतो. गांधीजी म्हणतात (यंग इंडिया २४-३-२०), " सत्याग्रह निष्ठेनें, आदरपूर्वक, संयमी व विनम्र होऊन करण्यांत आला, आणि कोठल्या तरी नीट

आकलन झालेल्या मुद्द्यावर तो आधारलेला असला तरच त्याला 'सविनय' म्हणतां येईल. तो केवळ लहरीखातर नसावा. आणि मुख्य म्हणजे त्यामागें कसल्याहि प्रकारचा दुर्भाव किंवा द्वेष असतां कामा नये." कोठल्याहि विशिष्ट प्रसंगीं एखाद्याला व्यक्तिशः सविनय कायदेभंग करण्याची जरुरी निर्माण झाली आहे असें वाटल्यास त्यानें याच तंत्राचा अवलंब केला पाहिजे.

१९१९ सालीं रौलट ॲक्ट सत्याग्रहाच्या वेळीं अवलंबिण्यांत आलेलें तंत्र म्हणजे एक सत्याग्रह कमिटी नेमण्यांत आली, प्रतिज्ञापत्रक तयार करण्यांत आलें व ज्यांना सत्याग्रहांत भाग घ्यावयाचा होता त्यांच्याकडून तें भरून घेण्यांत आलें. त्यानंतर सत्याग्रह कमिटीनें आक्षिप्त वाङ्मय व वर्तमानपत्रनोंदणीचा कायदा या बाबतींत सविनय कायदेभंग करण्याचा सल्ला दिला. दि. ६ एप्रिलपासून पुढें प्रतिज्ञापत्रकावर सही केलेल्या सत्याग्रहींनीं सविनय कायदेभंग करावयाचा होता. हरताळ, उपवास, प्रार्थना आणि सभा हा कार्यक्रम सामान्य जनतेसाठीं देण्यांत आला होता. आम जनतेनें सविनय कायदेभंगांत भाग घ्यावयाचा नव्हता.

सत्याग्रह कमिटीनें आक्षिप्त वाङ्मयाची विक्री 'संघटित व नियमबद्ध करण्याच्या सूचना' दिल्या होत्या. त्यावरून या लढ्यांतील तंत्राची चांगली कल्पना येऊं शकेल. त्या सूचना खालीलप्रमाणें होत्याः— "शक्यतोंवर सत्याग्रहींनीं विक्रेते म्हणून स्वतःचें नांव आणि पत्ता लिहावा म्हणजे सरकारला खटला भरावयाचा झाल्यास त्यांचा चटकन् तपास लावतां येईल. अर्थातच अशा तऱ्हेचें वाङ्मय गुप्तपणें विकण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. त्याचप्रमाणें तें वाटण्यांत जादा हिरीरीहि दाखविली जाऊं नये. सत्याग्रही स्त्री-पुरुषांचे लहान गट बनवून त्यांच्यापुढें असल्या प्रकारच्या वाङ्मयाचें वाचन करण्यांत यावें. आक्षिप्त वाङ्मय निवडण्यामागचा हेतु त्या-संबंधींच्या कायद्याचा सविनय भंग करणें एवढाच नसून जनतेला उच्च नैतिक मूल्यें असलेलें उदात्त वाङ्मय पुरविणें हाहि आहे. शक्य आहे कीं सरकार असलें वाङ्मय जप्त करील. सत्याग्रहींनीं पैशावर कमींत कमी विसंबून राहिलें पाहिजे. म्हणून सत्याग्रहींना अशी विनंति करण्यांत येत आहे कीं

सरकारनें प्रती जप्त केल्याबरोबर त्यांनीं स्वतः किंवा...मदत करण्यास तयार असलेल्या आपल्या मित्रांच्या साहाय्यानें प्रती तयार करून त्या पुन्हां जप्त होईपर्यंत लोकांना वाचून दाखवाव्यात. अशा तऱ्हेच्या वाचनाचा उपयोग आक्षिप्त वाङ्मयाचा प्रसार करण्यांत होईल असा विश्वास आहे. प्रसार किंवा जप्ती यामुळें सर्व प्रती संपल्यावर सत्याग्रहींनीं मिळवतां येण्यासारख्या आक्षिप्त पुस्तकांतील उतारे लिहून काढून आणि ते लोकांच्यांत वांटून सविनय कायदेभंग चालू ठेवावा."

"वर्तमानपत्रें प्रसिद्ध करण्याबाबतच्या सरकारी कायद्याचा सविनय भंग करण्यासंबंधींची कल्पना अशी आहे कीं प्रत्येक सत्याग्रहकेंद्रांत हस्तलिखित वर्तमानपत्र नोंदणी न करतां प्रसिद्ध करण्यांत यावें. त्याचा आकार एका तावाहून मोठा असण्याची गरज नाहीं.... ज्या सत्याग्रहीला कायद्यांत सांगितलेल्या शिक्षेबद्दल कसलेंहि भय वाटत नसेल त्यानें नोंदणी न केलेल्या वर्तमानपत्रांत आपल्या सदसद्विवेकबुद्धीव्यतिरिक्त कशाचाहि मुलाहिजा न ठेवतां आपले विचार आणि मतें प्रकट करण्यास हरकत नाहीं. अशा तऱ्हेनें त्याचें वर्तमानपत्र जर अन्यथा व्यवस्थितपणें संपादित केलें गेलें असेल तर तें थोडक्यांत शुद्ध कल्पना प्रसृत करण्याचें एक प्रभावी साधन होऊं शकेल. आणि हस्तलिखित वर्तमानपत्राच्या बाबतींत त्याच्या प्रसाराच्या मार्गांत अडथळे येतील अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं कारण ज्याच्या हातीं पहिल्या प्रती पडतील त्यांनीं पुन्हां त्याच्या नव्या प्रती काढणें हें त्यांचें कर्तव्य ठरतें. आणि अशा रीतीनें त्याचा इतका प्रसार झाला पाहिजे कीं सबंध हिंदी जनतेपर्यंत तें पोहचूं शकेल. ही गोष्ट विसरतां कामा नये कीं हिंदुस्तानांत तोंडी शिक्षण देण्याची पद्धति चालत आली आहे."

अटक, बचाव वगैरे बाबतच्या सूचना पुढें दिल्याप्रमाणें आहेतः— "आतां आपण अशा परिस्थितींत आहोंत कीं कोणत्याहि क्षणीं पकडले जाऊं अशी अटकळ आहे. म्हणून हें लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं जर कोणाला अटक झाली तर त्यानें कोणतीहि अडचण निर्माण न करतां आपण होऊन स्वाधीन व्हावें आणि कोर्टांत हजर राहण्याचें समन्स

आल्यास तसें करावें. कसल्याहि प्रकारचा बचाव किंवा वकील देण्यांत देऊं नये. दंडाऐवजीं कैदेची शिक्षा देण्यांत आल्यास कैद भोगणें पसंत करावें. जर नुसताच दंड करण्यांत आला तर तो भरण्यांत येऊं नये पण मालमत्ता असल्यास सरकारला तिचा लिलाव करूं द्यावा. इतर सह-कार्‍यांना झालेल्या अटकेसाठीं आणि कारावासासाठीं बाहेर राहिलेल्यांनीं दुःखाचें किंवा कसलेंच प्रदर्शन करतां कामा नये. आणि आपल्या स्वतः-वर ज्या वेळीं ती पाळी येईल त्या वेळीं आपण त्याबद्दल कसलीहि तक्रार करतां कामा नये. एकदां तुरुंगांत घातल्यानंतर तुरुंगाचे सर्व कायदे पाळणें हें आपलें कर्तव्य ठरतें कारण या क्षणीं तुरुंगाची सुधारणा घडवून आणणें हा आपल्या चळवळीचा भाग नाहीं. सत्याग्रहीनें कसल्याहि वाम-मार्गांचा आश्रय घेतां कामा नये. सत्याग्रही जें जें करतील तें तें उघड असावें."

यानंतर आपण १९४०–४१ मधील वैयक्तिक सत्याग्रहमोहिमेचा विचार करूं. युद्धासंबंधींचें मतस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य याबद्दल सविनय कायदेभंग करण्याचें ठरविण्यांत आलें. गांधीजींनीं सर्व प्रांतांतून प्रतिज्ञा-बद्ध सत्याग्रहींची यादी मागविली. त्यांना सत्याग्रह करण्याची परवानगी देण्यापूर्वीं गांधीजींनीं त्यांची छाननी केली. नियमित कताई व अहिंसा यांच्या बाबतींत प्रतिज्ञा फार कडक होती. प्रतिज्ञा घेतलेल्या प्रत्येक सत्या-ग्रहीनें सर्व युद्धें अन्याय्य असून कोणीहि युद्धकार्यास मदत करूं नये, उलट सर्व युद्धांचा अहिंसेनें प्रतिकार करणें उत्तम, अशा अर्थाचें भाषण करण्याचा आपला हक्क तो कोठें व केव्हां बजावणार आहे याची लेखी सूचना जिल्हाधिकाऱ्यास पाठवावयाची होती व नंतर त्याप्रमाणें वर्तन करावयाचें होतें. सुरवातीला गांधीजींनीं भाषणें करण्याची मुभा ठेवली होती. कांहींना युद्ध कमिटीच्या सभासदांना युद्धप्रयत्नांत मदत करूं नका असें सांगणारीं पत्रें पाठवण्याची परवानगी देण्यांत आली होती. पण लवकरच वरील आशयाची सुमारें वीस शब्दांची एक घोषणा सत्याग्रह करतांना करावी असें ठरविण्यात आलें, आणि शेवटपर्यंत तोच क्रम पाळण्यांत आला. ज्यांना सत्याग्रह केल्यानंतरहि अटक करण्यांत आली

नाहीं त्यांना दिल्लीपर्यंत प्रचार करीत करीत पायीं जाण्यास सांगण्यांत आलें. ज्यांची शिक्षा संपल्यामुळें सुटका झाली त्यांना प्रकृति चांगली असेल तर पुन्हां सत्याग्रह करण्यास सांगण्यांत आलें.

१९३० सालचा महान् लढा सुरू करतांना गांधीजींनीं कोणत्या तंत्राचा अवलंब केला तें आतां थोडक्यांत पाहूं. त्याचा आपणांस उदाहरणादाखल उपयोग होऊं शकेल. सत्याग्रहतंत्राचीं सहा मुख्य तत्त्वें आहेत असें म्हणतां येईल. तीं म्हणजे:—

१. सत्याग्रहाचें कारण न्याय्य व खरें असलें पाहिजे.

२. इतर सर्व उपाय करून झाले असले पाहिजेत.

३. विरोधकाला आपली चूक सुधारण्याची जास्तींत जास्त संधि दिली गेली पाहिजे.

४. सत्य किंवा ईश्वर याचेवर अटळ भरवसा ठेवून क्लेश सोसाव्या लागणाऱ्या अहिंसक मार्गानें प्रतिकार करण्यांत आला पाहिजे.

५. आत्मक्लेश विनतक्रार, आनंदानें आणि जो क्लेश लादतो त्याच्याबद्दल देखील मनांत सद्भाव बाळगून सोसले पाहिजेत.

६. शेवटपर्यंत विनम्रता आणि आपलीं तत्त्वें न सोडतां तडजोड करण्याची तयारी असली पाहिजे.

आपण १९३० च्या सविनय कायदेभंगाकडे दृष्टि टाकली तर असें आढळून येईल कीं गांधीजींनीं वरील तंत्राचा तंतोतंत शास्त्रीय पद्धतीनें अवलंब केला होता. सत्य त्यांच्या बाजूचें असल्याबद्दल त्यांनीं स्वतःची खात्री करून घेतली होती. १९२४ सालीं 'यंग इंडिया'चें संपादन पुन्हां सुरू केलें त्या वेळीं त्यांनीं लिहिलें होतें, "मी हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यासाठीं जगतों आणि त्यासाठींच मी मरेन कारण तो सत्याचाच एक भाग आहे. खऱ्या ईश्वराची पूजा फक्त स्वतंत्र हिंदुस्तानच करूं शकेल." १९२९ च्या लाहोर येथील कॉंग्रेस अधिवेशनाचे पूर्वी व्हॉइसरॉयबरोबर गांधीजी व मोतीलालजी यांची मुलाखत झाली होती. त्या वेळीं वसाहतीचें स्वराज्य देणें हें गोलमेजपरिषदेचें मुख्य उद्दिष्ट राहील असें आश्वासन देतां येणार नाहीं असें सांगून व्हॉइसरॉयनें त्यांची निराशा केली. तडजोडीचा किंवा

चर्चेचा दरवाजा अजिबात बंद झाला. त्यानंतर गांधीजींनीं कॉंग्रेसचें ध्येय बदलून तें 'संपूर्ण स्वातंत्र्य' करण्यास संमति दिली व लढ्यासाठीं त्यांनीं कंबर कसली. त्यांनीं सविनय कायदेभंगाची तयारी सुरू केली त्याचबरोबर आपल्या सुप्रसिद्ध अकरा मुद्यांच्या रूपानें सरकारपुढें नवी मागणी मांडली. परंतु तिला देखील वाटाण्याच्या अक्षता लावण्यांत आल्या. त्यांनीं टाकलेल्या या पवित्र्यामुळें दर वेळीं सरकारची नैतिक बाजू अधिकाधिक ढासळत गेली आणि पुन्हां पुन्हां केलेल्या मागण्यांना मिळालेल्या नकारामुळें देशांत जरूर तें वातावरण निर्माण झालें. त्यानंतर कायदेभंगासाठीं त्यांनीं मिठाचा कायदा पसंत केला. त्यांत त्यांची कमालीची दूरदृष्टि दिसून आली. मिठावरील कर हा अत्यंत अन्याय्य करांपैकीं एक आहे. मिठाच्या किंमतीच्या मानानें कर किती तरी पटींनें अधिक आहे. गरीबांतल्या गरीबापासून तों श्रीमंतांतल्या श्रीमंतापर्यंत सर्वांनाच त्याची झळ लागते. त्यामुळें मिठाच्या कायद्यावर आधारलेल्या चळवळीनें साऱ्या जगाचें लक्ष वेधून घेतलें. नंतर प्रत्यक्ष कायदेभंग करण्यापूर्वी गांधीजींनीं व्हॉइसरॉयना एक पत्र लिहून तें रेजिनॉल्ड रेनॉल्डस् या नांवाच्या गृहस्थाबरोबर रवाना केलें व त्या योगानें साऱ्या प्रकाराला एक नाट्यपूर्ण स्वरूप प्राप्त करून दिलें. ज्या वेळीं त्या पत्राचें उत्तर निराशाजनक आलें आणि 'माकरीऐवजीं घोंडा पुढें करण्यांत आला' त्या वेळीं त्यांनीं दांडी मोर्चा सुरू केला. तो संघटनेचा व प्रचाराचा एक उत्कृष्ट नमुना होता. गांधीजी दांडीच्या जसजसे जवळ जाऊं लागले तसतसें देशांतील वातावरण अधिकाधिक जागृत होऊं लागलें. त्यांनीं जे जे पवित्रे टाकले ते ते जाणूनबुजून, उघडपणें, धैर्यानें, हंसतमुखानें, खिलाडूवृत्तीनें आणि सद्बुद्धिप्रेरित असेच होते.

दि. ६ एप्रिलपासून सबंध देशांत एकदम सविनय कायदेभंगाची लाट उसळली आणि हजारों लोकांना पकडून तुरुंगांत डांबण्यांत आलें. सरकारनें गांधीजींना अटक न करतां त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या योजना विफल ठरणें शक्यच नव्हतें. त्यांनीं धारासना मिठागरावर हल्ला करून सरकारी कर न देतां फक्त मिठाची किंमत तेवढी देऊन मीठ

आणण्याचा प्रयत्न करणार असल्याची नोटीस दिली. तें कृत्य चोरी किंवा दरोडेखोरींत मोडूं शकत नव्हतें. मिठाचा कायदा अन्याय्य आहे अशी खात्री असलेल्या नागरिकांचा नैतिक हक्क बजावण्याचा तो एक मार्ग होता. त्यानंतर त्यांना ५–५–३० रोजीं अटक करून येरवड्यास नेण्यांत आलें. अटक होण्यापूर्वी सुमारें महिनाभर त्यांनीं समुद्रकिनारीं असलेल्या आपल्या छावणींतून अखिल भारतीय मोहीम चालविली होती. त्यांनीं आपल्या अनुयायांना सूचना दिल्या व त्यांच्या मनांत कांहीं शंका निर्माण झाल्यास त्यांचें निराकरण केलें.

तुरुंगांतील दिवस त्यांनीं एखाद्या आदर्श कैद्यासारखे काढले. त्यांनीं ईश्वरावर अढळ श्रद्धा ठेवली. त्यांनीं बाहेर कसल्याहि प्रकारचें दळण-वळण ठेवलें नाहीं किंवा आंतून चळवळीचें मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला नाहीं. आपल्या मूलभूत तत्त्वांचा त्याग न करतां तडजोडीचीं बोलणीं करण्यास ते केव्हांहि तयार होते.

सत्याग्रह लढा चालविण्याबाबतचें तंत्र वर दिलेंच आहे. सत्याग्रह लढ्यांत मोडणाऱ्या निरनिराळ्या प्रकारांबाबत कार्यक्रमाबाबत एकच ठराविक तंत्र सांगतां येणार नाहीं. उदाहरणार्थ बंदी घातलेली परिषद् भरविणें व तिचें कामकाज चालविणें याबाबतचें तंत्र शांततामय निरोधन अथवा करबंदी-ची मोहीम यांच्या तंत्रापेक्षां भिन्न राहील. सत्याग्रहाच्या अनेकविध मार्गांच्या तंत्राचें सविस्तर विवेचन करणें येथें शक्य नाहीं. त्यासाठीं तज्ज्ञांच्या नेतृत्वाखालीं चालविण्यांत आलेल्या कार्यक्रमांचा विस्तृत वृत्तान्त वाचला पाहिजे.

१९३० च्या चळवळीचा शेवट तडजोडींत किंवा गांधी-आयर्विन-करार या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या तात्पुरत्या तहानें झाला. तडजोडीचीं बोलणीं आणि प्रत्यक्ष करार यांची माहिती समजून घेतल्यास सत्याग्रहीचें या बाबतींतील वर्तन कसें असलें पाहिजे याची यथार्थ कल्पना येऊं शकेल.

आतां सत्याग्रहांतील उपवासाचें स्थान व त्याचा अवलंब केव्हां व कसा करण्यांत य वा यासंबंधींचें थोडक्यांत विवेचन करून हें प्रकरण संपवूं.

उपवास म्हणजे शरीराचें अन्न स्वखुषीनें तोडणें होय. उपवास प्राणांतिक

असला तरी देखील मूलतः त्याचें स्वरूप आत्मशुद्धीचेंच असतें. परंतु या ठिकाणीं उपवासाचें तात्त्विक अधिष्ठान किंवा आत्मसंयमन वा पापाचें प्रायश्चित्त यासाठीं केलेला आत्मशुद्धीचा उपवास यासंबंधीं आपणांस चर्चा करावयाची नाहीं कारण असले उपवास अगदीं वैयक्तिक स्वरूपाचे असतात. येथें विरोधकांवर किंवा इतरांवर परिणाम घडवून आणण्यासाठीं करावयाच्या उपवासांचीच आपल्याला चर्चा करावयाची आहे. असल्या प्राणांतिक अथवा मर्यादित उपोषणांचें तंत्र काय असतें तें पाहूं.

उपवास आपले मित्र किंवा सहकारी यांच्या चुकांविरुद्ध आणि ठराविक मुदतीचे असले तरी देखील त्यांत एका विशिष्ट तंत्राचा अवलंब करण्यांत आला पाहिजे. ज्या व्यक्तीकरतां उपवास करावयाचा तिच्याशीं असलेले संबंध अत्यंत निकटचे असल्याखेरीज आणि चूक तितकीच मोठी असल्याखेरीज अशा तऱ्हेच्या उपवासाचा अवलंब करतां कामा नये व सारासार-विचार करून मगच त्याची मुदत ठरवली पाहिजे. उपवासाची सुरुवात रागारागानें किंवा अविचारानें होतां कामा नये. उपवासाच्या मुदतींत शरीराची आबाळ करतां कामा नये किंवा कसल्याहि प्रकारची हिंसा घडतां कामा नये. शरीर शुद्ध राखण्याचा हेतु मनांत ठेवून हळुवारपणाचें वर्तन केलें पाहिजे. ज्याच्यासाठीं उपवास करावयाचा त्याला आपला उद्देश सांगितला पाहिजे. पण या ठिकाणीं देखील उपवासाचा मार्ग अगदीं अखेरीलाच स्वीकारला पाहिजे. उपवासाच्या मुदतींत प्रार्थना, आत्म-निरीक्षण चिंतन अशा तऱ्हेच्या मनाला उदात्तता आणणाऱ्या गोष्टींतच बहुतेक वेळ घालविला पाहिजे. उपवास हें जालीम शस्त्र आणि महान् दिव्य असल्यामुळें त्या मार्गाचा अवलंब करण्यापूर्वी स्वतःच्या उद्दिष्टाची कसून तपासणी केली पाहिजे. त्यांत अशुद्धतेचा लवलेशहि असतां कामा नये. तें एक शास्त्र असल्यामुळें आपलें शरीर आणि मन त्या कसोटीला लावण्यापूर्वी त्याचा नीट अभ्यास केला पाहिजे. खरें पाहतां ज्यानें अहिंसेचा मार्ग समजावून घेतलेला नाहीं आणि उपवास कसा करावयाचा त्याचा अभ्यास केलेला नाहीं त्यानें एकदम त्या मार्गाकडे धाव घेतां कामा नये.

थम उपवास करण्याचा अधिकार प्राप्त करून घेतला पाहिजे. स्वार्थ,

क्रोध, चंचलता, गैरविश्वास किंवा उतावळेपणा यांना त्यांत स्थान असतां कामा नये.

प्राणांतिक उपोषण हा सत्याग्रहीनें टाकावयाचा अगदीं अखेरचा पवित्रा होय. हिंसक युद्धाच्या बाबतींत सैनिक अथवा त्यांचे गट टार करणें हें अंतिम कृत्य समजलें जातें व त्याच एका उद्देशानुसार त्यास शिक्षण दिलें जातें. विरोधकाला दाखविण्यांत येणारें हालअपेष्टांचें भय आणि मृत्यूची धास्ती यांच्या योगानेंच हिंसक युद्धांत विरोधकांवर दडपण आणलें जातें, तर अहिंसक युद्धांतील सामर्थ्य जरूर तर मरणप्राय यातना स्वतःवर ओढवून घेऊन विरोधकाची सदसद्विवेकबुद्धि जागृत करणें हेंच असतें. आत्मक्लेशाचा परमोच्च बिंदु म्हणजे प्राणांतिक उपोषण. सत्याग्रहाचे इतर सर्व मार्ग विफल ठरले आणि सभोंवतालचें सर्व वातावरण निराशेच्या गडद अंधारानें भरून गेलें तरी आपल्या अंतिम त्यागानें सत्याची प्रतिष्ठा राखली जाईल या विश्वासानें सत्याग्रहीनें उपवासाच्या मार्गाचा अवलंब करावा. पण हा अगदीं अखेरचा मार्ग आहे. त्यामुळें अत्यंत भीषण आणि कदाचित् प्राणघातक परिणाम घडून येण्याचाहि संभव असल्याकारणानें त्याविषयीं बेफिकीरीनें बोलतां कामा नये. अथवा तितकीच आंतरिक गरज भासल्याखेरीज त्याचा उपयोग करतां कामा नये. सामान्यपणें आपल्या सार्वजनिक उपवासासंबंधीं आणि त्यांतल्या त्यांत प्राणांतिक उपवासासंबंधीं बोलतांना गांधीजी म्हणतात कीं त्या सर्वांची स्फूर्ति त्यांना आंतल्या आवाजानें दिली. ईश्वरानें दिलेलें तें आवाहनच होतें. त्यांनीं केलेल्या सर्व साधनेनंतरहि राजकोटच्या उपवासात दोष निर्माण झाल्याचें त्यांना आढळून आलें. सुरुवातीला जरी उपवासाचें स्वरूप अगदीं शुद्ध होतें तरी त्यांनीं व्हॉइसरॉयच्या मध्यस्तीला ज्या वेळीं संमति दिली त्या वेळीं त्यांत अशुद्धता आणि स्वार्थ यांचा शिरकाव झाला. यावरून हें सिद्ध होतें कीं उपवासाचें शस्त्र वापरणें महाकठीण असून हें उपयोगांत आणण्यापूर्वीं प्रथम त्याचा कसून अभ्यास केला पाहिजे.

आजपर्यंत गांधीजींनीं या शस्त्राचा उपयोग सहजासहजीं करूं दिलेला नाहीं. त्यांत अजूनहि अशा कांहीं सुप्त शक्ति आहेत कीं ज्यांची कसोटी

घेण्यांत आलेली नाहीं. सामुदायिक उपोषणाचा परिणाम काय होईल तें आजच कोण सांगूं शकेल ? तें सर्व भविष्यकाळाच्या पडद्याआड दडलेलें आहे असें म्हणून स्वस्थ बसणें भाग आहे.

युद्धाचा नैतिक पर्याय : : १४

नेपोलियननें युद्धाचें वर्णन विनाशाचें शास्त्र असें केलें आहे. व तें यथार्थ आहे. आजच्या महायुद्धाच्या कोणत्याहि आघाडीवर नजर टाकली तरी त्याच्या म्हणण्याची प्रचीति येते. एक पक्ष दुसऱ्या बाजूची जितकी जास्त मनुष्यहानि आणि वित्तहानि करील तितका त्याला यश मिळण्याचा संभव अधिक. तरीहि युद्ध ही मानवी हिताची आणि प्रगतिकारक अशी संस्था आहे असें प्रतिपादन करणारे युद्धाचे कैवारी आजहि आहेत.

युद्ध हें एक अनिवार्य अरिष्ट आहे असें म्हणणें निराळें आणि मानवतेला मिळालेला तो एक वर आहे किंवा त्याखेरीज मानवाची प्रगति होणें शक्य नाहीं असा आग्रह धरणें निराळें. या लोकांचें म्हणणें असें कीं मधून मधून होणाऱ्या कत्तली व लूटमार मानवाची प्रगति होण्याच्या दृष्टीनें आवश्यक आहेत. पूर्वीच्या काळांत युद्धें कितीहि रम्य असलीं तरी आजच्या महाभयंकर स्फोटक द्रव्यांच्या शोधामुळें आणि सर्वांगीण युद्ध लढविण्याच्या नव्या संघटनेमुळें त्यांची विनाशक शक्ति अनंत पटींनें वाढली आहे. अशा परिस्थितींत युद्धाला संस्कृतीचा दूत असें म्हणणारा माणूस कमालीचा धाडशीच असला पाहिजे ! लक्षावधि लोकांचे कत्तलखाने उघडण्यासाठीं यंत्राची सज्जता करणें किंवा त्या लोकांना सरसहा पाशवी बनवणें म्हणजेच जर मानवाचा विकास असेल तर युद्धें खरोखरीचं प्रगतिशील आहेत असें म्हणावें लागेल !

एका महान् इंग्रज कवीनें निसर्गांत ओतप्रोत हिंसा भरली आहे असें

वर्णन केलें आहे. 'ओरिजिन् ऑफ् दि स्पेसिस्' या पुस्तकाचा लेखक डार्विन् यानें 'जीवनकलहा'चा सिद्धान्त जगापुढें मांडला. त्यामुळें शारीरिक दृष्ट्या जे समर्थ असतील त्यांनीं दुर्बलांना नाहींसें करावें हें साहजिक आहे. आणि या निसर्गाच्या नियमाविरुद्ध अशक्तांचा बचाव करण्याचा प्रयत्न करणें व्यर्थ आहे या मतप्रणालीस नवाच जोम आला. जी. तार्दे आणि जे. नोव्हिको यांच्यासारख्या पदार्थविज्ञान्यांनीं असें जाहीर केलें कीं अणुपरमाणु आणि अंतराळांत संचार करणारी ग्रहमाला यांत देखील जीवनकलह एकसारखा चालूच असतो. त्याचप्रमाणें जर्मनीसारख्या कांहीं लढाऊ राष्ट्रांतील तत्त्वज्ञांना युद्धसंस्थांत अनेक सद्गुण आढळून आले आणि त्यांनीं असें प्रतिपादन केलें कीं समाजाच्या प्रगतीसाठीं आणि प्रमुत्वासाठीं अवश्य असलेले मूलभूत गुण केवळ युद्धामुळेंच प्रकट झाले आहेत. इटलीचा फासिस्ट हुकूमशहा मुसोलिनी याचे उद्गार मोठे अन्वर्थक आहेत. तो म्हणतो, "युद्धामुळेंच केवळ सर्व मानवी शक्तीचा जास्तींत जास्त विकास होतो आणि जे युद्धाला तोंड देण्याइतके शौर्यवान् असतात त्यांचें श्रेष्ठत्व युद्धामुळें सिद्ध होतें. जीवन-मरणासारखे अत्यंत महत्त्वाचे निर्णय ज्या वेळीं व्यावयाचे असतात त्या वेळीं मनुष्याला युद्धाइतका दुसरा परिणामकारक उपाय उरत नाहीं."

मानवतेइतकीच युद्धसंस्था देखील पुरातन आहे ही गोष्ट खरी पण त्याचबरोबर मानव युद्ध टाळण्याचा प्रयत्न करीत आला आहे आणि आजहि केवळ निरुपाय म्हणून तो युद्धाचा अवलंब करतो ही गोष्ट देखील तितकीच खरी आहे. आपण युद्धाच्या इतिहासाचें निरीक्षण केलें तर असें आढळून येईल कीं युद्धसंस्था कितीहि जरी क्रूर असली तरी निरनिराळ्या वेळीं युद्धनीतीचे निरनिराळे नियम करून त्यांतहि थोडीफार माणुसकी आणण्याचा प्रयत्न समाज सतत करीत आला आहे. 'प्रेम आणि युद्ध यांत सर्व कांहीं समर्थनीय आहे' अशी म्हण जरी प्रचारांत असली तरी युद्धाचे आंतरराष्ट्रीय नियम निर्माण करून मानवतेनें त्यांत औदार्याचा आणि कांहीं प्रमाणांत रास्तपणा आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. युद्ध-

काळांत त्याग, धैर्य, कष्ट सहन करण्याची तयारी अशा कांहीं गुणांचा प्रकर्ष होतो हें खरें. त्यामुळेंच रस्किननें कांहींसे अतिशयोक्तिपूर्ण उद्‌गार काढले आहेत कीं "माणसाचा सर्व सदगुणांचा आणि कार्यशक्तीचा पाया युद्ध हा आहे." आणि त्याच आधारावर वुइल्यम जेम्स या तत्त्वज्ञानें म्हटलें आहे कीं "मानवी जीवनाचा आणि कणखरपणाचा आदर्श टिकवून धरण्याचें कार्य लष्करशाहीकडूनच झालें आहे. आणि कणखरपणाशिवाय मानवी जीवन तिरस्करणीयच ठरेल." परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं या मानवी गुणांना युद्धक्षेत्राबाहेर स्थान नाहीं. आणि परस्परांच्या सरसहा कत्तली आणि विनाश यांचीच हे गुण प्रकट होण्यासाठीं गरज आहे. निसर्गतः अशी आपत्ति आणि प्रसंग किती तरी ओढवतात कीं त्या वेळीं माणसांमधले अत्युत्तम गुण व्यक्त होतात. कदाचित् ते युद्धाप्रमाणें डोळ्यांत भरण्यासारखे नसतील इतकेंच. जर सद्‌गुणाचें प्रदर्शन दुर्गुण, पाप, अतिमानुषता आणि विनाश यांच्या धांगडधिंग्यांतच होणार असेल तर इतक्या महाग पडणाऱ्या या प्रदर्शनापासून चार पावलें दूर राहिलेलेंच बरें. युद्धाच्या वेळीं द्वेषामुळें भडकून गेलेल्या सबंध राष्ट्राचा चाललेला थयथयाट किंवा एकमेकांच्या विनाशांत लाखों लोक मानीत असलेला आनंद यांच्या पासंगालाहि हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या थोड्या लोकांनीं व्यक्त केलेले सद्गुण पुरणार नाहींत. समजूतदारपणा, न्याय, निःपक्षपात हे सद्‌गुण जर शस्त्रास्त्रांचा खणखणाट, प्रक्षुब्ध जनतेच्या आरोळ्या आणि मरणोन्मुखांच्या किंकाळ्या यांत पार बुडून जाणार असतील तर क्वचित् प्रसंगीं कांहीं लोकांना आपले गुण प्रकट करण्याची संधि मिळते यांत समाधानाला कितीशी जागा आहे ? असें म्हणणें मार्ग आहे कीं माणूस सुसंस्कृत बनला तो युद्ध आणि त्यामुळें प्रसंगीं होणारा विनाश किंवा लूट यांमुळें नव्हे तर युद्धें आणि विनाश यांना तोंड देऊन मानवामधील कांहीं दुरंत प्रवृत्ति त्याला पुन्हां पुन्हां या भयंकर विनाशाकडे खेचीत आहेत. पण त्याचा अर्थ असा नव्हे कीं झगड्यांतून मुक्त होण्यासाठीं स्वतःला सुज्ञ म्हणविणारा मनुष्य सदाचा त्या युद्धसंस्थेच्या तडाख्यांत सांपडावा असा कोणीं शाप देऊन ठेवला आहे.

शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक अशा सर्व क्षेत्रांत झगडा आहे हें नाकारतां येणार नाहीं. प्रश्न आहे तो येवढाच कीं या झगड्याचा निर्णय लावण्याचा एकमेव मार्ग ताकदीचा आणि अहिंसेचा अवलंब करणें हाच आहे कीं काय ? याहूनहि महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मनुष्य युद्धाकडे पहातो तें युद्ध अनिवार्य आहे म्हणून, अवश्य आहे म्हणून, कीं झगडे मिटविण्याचा तो एकच एक मार्ग आहे म्हणून ? आकर्षण आणि संसक्ति यांना प्राधान्य असेल तरच निसर्गाचें अस्तित्व टिकूं शकतें. तरी वादाकरतां क्षणभर आपण असें गृहीत धरूं या कीं निसर्गाचें अस्तित्व परस्परविकर्षणावरच आधारलेलें आहे व 'बळी तो कान पिळी' या न्यायानेंच सर्व प्राणिमात्र जगत आहेत. तरी देखील असा प्रश्न उरतोच कीं उच्च मानल्या गेलेल्या मनुष्य प्राण्यानें आपल्या श्रेष्ठ कार्यशक्तीचा उपयोग कशा तऱ्हेनें करावा. मानवी व्यवहारांत देखील पाशवी शक्तीचाच अखेर विजय व्हावयाचा काय ? संस्कृतीचा प्रवाह त्याच दिशेनें वाहात आला आहे काय ? मुळींच नाहीं. उदात्त प्रवृत्ति हें मानवाचें अधिष्ठान असून समजूतदारपणा, न्याय, शांतता, निःपक्षपात आणि प्रेम या श्रेष्ठ प्रवृत्तींच्या विशाल दर्शनानेंच मानवाच्या प्रगतीचें मोजमाप होत असतें.

गांधीजींनीं हे विचार आपल्या लेखांत (हरिजन २-३-२८) मांडले आहेत. ते म्हणतात, "माणूस परस्परविनाशानें जगूं शकत नाहीं. स्वतःवरील प्रेम त्याला दुसऱ्याविषयीं आदर दाखविण्यास भाग पाडतें. राष्ट्रें एकमेकांच्या नजीक येतात कारण राष्ट्रांराष्ट्रांतील नागरिकांत परस्परांबद्दल आदर वसत असतो. ज्याप्रमाणें आपण कौटुंबिक कायद्याचें क्षेत्र वाढवून सबंध राष्ट्र हें आपण एक मोठें कुटुंब समजूं लागलों त्याचप्रमाणें केव्हां ना केव्हां तरी आपल्याला ही राष्ट्रांतील कायद्यांची व्याप्ति आणखी वाढवून ती सर्व विश्वापर्यंत पोहोंचवावी लागेल."

पण युद्ध हा खरोखरीच तंटे मिटवण्याचा समाधानकारक मार्ग आहे किंवा काय याचा विचार केला पाहिजे. 'बळी तो कान पिळी' या न्यायाशीं आणि मानवी व्यवहारांत शारीरिक सामर्थ्यच निर्णायक मानलें पाहिजे. या वृत्तीशीं सहमत झाल्याखेरीज एखाद्याला युद्ध हाच समाधान-

कारक किंवा एकमेव मार्ग आहे असें म्हणतां येणार नाहीं. जर कोणाला तसें म्हणावयाचें असेल तर त्यानें नैतिक मूल्यें, न्याय, निःपक्षपात यांना कायमचा निरोप दिला पाहिजे. आपल्या डोळ्यांपुढें अखिल प्राणिमात्र नसून फक्त मानवी समाज आहे. वाघ हरिणांवर झडप घालतो किंवा लांडगा मेंढ्यांवर तुटून पडतो. माणसांसकट सर्व प्राणिमात्रांत याच कायद्याची अंमलबजावणी चालते असें एखाद्याला म्हणावयाचें असेल तर अत्यंत नम्रपणें आपण त्याच्याशीं सहमत नसल्याचें साफ सांगावें लागेल. समाजातील सर्व झगडे युद्धानें मिटतील असें ज्यांना वाटत असेल त्यांनीं प्रिन्स क्रोपोट्किन्चें 'म्यूचुअल एड' हें पुस्तक अवश्य वाचावें. प्रेम, सद्भाव, न्याय आणि निःपक्षपातीपणा यांवर आधारलेलीं नवीं मूल्यें प्रस्थापित करण्यासाठींच इतिहासाच्या सुरवातीपासून मानवाचे प्रयत्न चालू आहेत. आपलें सबंध कौटुंबिक जीवन, सामाजिक संस्था आणि आपल्या समाजाची रचना, बंधुभाव आणि न्याय यांवरच आधारलेल्या आहेत. आपल्यांतील क्षुद्र वृत्तींवर अजूनहि आपला पूर्ण ताबा मिळवला नसेल पण नियतीचीं पावलें निश्चितपणानें प्रेमावर आधारलेल्या आणि न्यायानुसर चालणाऱ्या समाजाकडेच पडत आहेत.

पाशवी शक्ति ही नेहमींच न्यायपक्षपाती असते असें नाहीं. निदान मानवी व्यवहारांत तरी सत्य व न्याय यांना वाव असला पाहिजे याविषयीं एकदां एकमत झालें म्हणजे मग अगदीं आदर्श परिस्थितींतहि जे हितसंबंधांतील झगडे अपरिहार्य असतात ते दूर करण्याकरतां युद्धाच्या मार्गाचा अवलंब करणें हें किती ओंगळ, रानटीपणाचें आणि असमाधानकारक आहे तें सहज ध्यानांत येईल. ज्यांच्या बाजूला न्याय असेल त्यांच्याजवळ तो प्रस्थापित करण्याचें बाहुबल असेलच असें नाहीं. तसेंच हिंसेच्या उपयोगानें द्वेष आणि सूडाची भावना निर्माण होते व त्यामुळें आपले प्रश्न न सुटतां आपलें लक्ष न्यायाच्या प्रस्थापनेकडे लागण्याऐवजीं उलट आळीपाळीनें हिंसा चिरस्थायी करण्यावरच खिळून राहतें. शिवाय युद्धामुळें अशी कांहीं भयंकर खळबळ आणि प्रक्षोभ माजतात कीं दोन्ही पक्षांचा तोल सुटतो आणि ज्या प्रश्नासाठीं येवढें वादळ निर्माण झालेलें

असतें त्यासंबंधीं शांतपणानें विचार करण्याच्या मनःस्थितींत कोणीच राहत नाहींत. ज्या हितसंबंधांच्या रक्षणासाठीं दोन पक्ष युद्धाला उभे राहतात त्या हितसंबंधांचीच लढाईमुळें राखरांगोळी होऊन जाण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें दोन्ही पक्षांचे अत्यंत कडवे आणि शूर लोक धारातीर्थीं पतन पावून दुय्यम दर्जाच्या माणसांवरच ते प्रश्न सोडविण्याची जबाबदारी येऊन पडण्याचा संभव असतो. आणि पुष्कळ वेळां असा प्रकार दृष्टीस पडतो कीं शूर कामीं येतात आणि विजयश्रीची माल भित्र्या लोकांच्या गळ्यांत पडते. 'वॉर्स आफ्टरमथ' या आपल्या पुस्तकांत डी. एस्. जॉर्डन आणि एन्. ई. जॉर्डन हे याच निर्णयावर आले आहेत. यादवी युद्धानंतर अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांपैकीं व्हर्जिनिया संस्थानांतील परिस्थितीचा त्यांनीं अभ्यास केला, आणि त्यांना असें आढळून आलें कीं संस्थानचें मनुष्यबळ कमी झालें असून श्रेष्ठ रक्त धारातीर्थीं सांडल्यामुळें दुय्यम दर्जाचे लोकच मागें उरले आहेत. हिंसेचा उद्देश दुसऱ्या पक्षावर जबरदस्ती करणें हा असतो. आणि ही जबरदस्ती केव्हांहि कायमची विजयी होत नाहीं. आणि त्या योगानें खरे हेतूहि कधीं सिद्धीस जात नाहींत. जरी विजय मिळाला तरी पुष्कळ वेळां तो नाममात्रच ठरतो.

अलीकडच्या लढ्यांत दोन्ही बाजूंकडील नासधूस इतक्या प्रचंड प्रमाणावर होते कीं त्यामुळें जेते आणि जित या दोघांचीहि स्थिति सारखीच केविलवाणी होऊन जाते. आर्थिक संबंध इतके परस्परावलंबी व गुंतागुंतीचे असतात कीं युद्ध संपतें न संपतें तोंच दोघांनाहि परस्परांच्या फायद्यासाठीं एकमेकांशीं सहकार्य करावें लागतें. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीच्या बाबतींत इंग्लंडनें केलें त्याप्रमाणें राष्ट्रांराष्ट्रांतील शक्तींमधील समतोलपणा कायम राखण्याकरतां जेत्यांनाच कित्येकदां जित राष्ट्रांना कांहीं सत्ता द्यावी लागते. पुष्कळ वेळां महान् युद्धें देखील, तीं ज्या कारणांसाठीं सुरू झालीं त्यांचा निर्णय न लागतांच, समाप्त होतात. पहिलें जागतिक युद्ध याचें उदाहरण म्हणून दाखवतां येईल. जवळ जवळ तेच प्रश्न सोडविण्यासाठीं दुसरें जागतिक युद्ध पुन्हां सुरू झालें.

अल्डुस हक्स्लेनें आपल्या सुप्रसिद्ध 'एंड्स ॲण्ड् मीन्स्' या पुस्तकांत

हिंसेच्या उपयोगांतील अनिर्णितता आणि अनिष्ट प्रतिक्रिया यांवर चांगला प्रकाश पाडला आहे. तो म्हणतो, " हिंसेला जर हिंसेनेंच प्रत्युत्तर मिळालें तर त्याची परिणति पाशवी झगड्यांत होते. आणि त्यामुळें त्यांत प्रत्यक्ष-पणेंच नव्हे तर अप्रत्यक्षपणें भाग घेणारांचे मनांत देखील द्वेष, भीति, राग आणि संताप या भावना जागृत होतात. झगड्याच्या आवेशात न्यायान्यायाची चाड पार झुगारून दिली जाते आणि पिढ्यान् पिढ्यांच्या सुसंस्कृत जीवनांत परिश्रमपूर्वक हळूहळू जोपासना केलेली माणुसकी विसरली जाते. उभयपक्षीं विजयाखेरीज कशाचेंच भान रहात नाहीं. या पाशवी झगड्यांचा अंतिम परिणाम म्हणून ज्या वेळीं दोहोंपैकीं एखादा पक्ष विजयी होतो त्या वेळीं योग्यायोग्यतेशीं किंवा न्यायान्यायाशीं त्यांचा कसलाहि संबंध रहात नाहीं किंवा त्यामुळें झगडा कायमचा मिटतो असेंहि नाहीं. "

तो पुढें सांगतो कीं कांहीं विवक्षित परिस्थितींत युद्धांतील विजय कमी-अधिक प्रमाणांत कायम स्वरूपाचा होऊं शकेल अशी कल्पना करतां येईल. उदाहरणार्थः— (अ) ज्या वेळीं एक पक्ष पार नष्ट केला जातो त्या वेळीं पण दाट लोकवस्तीचीं राष्ट्रें एकमेकांबरोबर लढाई करीत असतील तर हें अशक्य आहे. (ब) ज्या वेळीं दोन राष्ट्रांतील लढाऊ दलें अगदींच लहान असतात आणि त्यांचा नागरिकांवर शारीरिक अथवा मानसिक कसलाच परिणाम होत नाहीं त्या वेळीं. परंतु ती परिस्थिति देखील आजकाल असणें अशक्यच आहे कारण देशभक्तीच्या नांवाखालीं राष्ट्रांतील सारीच्या सारी जनता युद्धाच्या काहिलींत ढकलली जाते. (क) जेत्यांचा पक्ष जितांच्या देशांत स्थायिक होतो आणि कालान्तरानें त्यांच्यांत मिसळून जातो तेव्हां. हें देखील आज अशक्यच आहे. (ड) ज्या वेळीं जेते जितांचा स्नेह संपादन करण्याचा प्रयत्न करतात त्या वेळीं. पण असें करावयाचें असेल तर इतक्या प्रचंड हानीनंतर युद्ध थांबवण्यापेक्षां तें अजिबात टाळणेंच अधिक हितकर. यावरून एकंदरीनें प्रश्न कायमचे सोडविण्याच्या दृष्टीनें युद्ध आणि हिंसा किती असमाधानकारक आहेत तें उघड होतें.

अशा रीतीनें युद्धामुळें माणसातील कांहीं चांगले गुण पुढें येतात आणि

त्यांच्या शक्तीची कसोटी लागते असें जरी गृहीत धरलें तरी देखील हित-संबंधांतील विरोध समाधानकारकपणें किंवा कायमचे मिटविण्यासाठीं युद्धाचा मार्ग सुचविणें युक्त होणार नाहीं. निरनिराळ्या गटांतील हित-संबंधांत तडजोड घडवून आणण्यासाठीं दुसरे मार्ग शोधणें भाग आहे. युद्धाची तिरस्करणीय विनाशक बाजू घटकाभर बाजूस ठेवली तरी वर दिलेल्या कारणांकरतां देखील वुइल्यम जेम्स यानें १९१० सालींच युद्धाचा नैतिक पर्याय शोधून काढला पाहिजे अशी सूचना मांडली. झगड्यांचा निकाल लावण्याच्या दृष्टीनें युद्धापेक्षां जास्त समाधानकारक असा पर्याय त्याला हवा होता व त्याचबरोबर तो युद्धाइतकाच उत्तेजक, उत्साहवर्धक, युद्धासारखाच महान् गुण प्रकट करणाराहि असावा. त्यानें आपलें म्हणणें पुढीलप्रमाणें मांडलें आहे:— "आजपर्यंत जगांत एखाद्या सबंध जमातीला शिस्तबद्ध करणारी युद्ध ही एकच शक्ति अस्तित्वांत आहे आणि युद्धाला पर्यायी अशी दुसरी संघटना निर्माण होईपर्यंत युद्धाचें स्थान तसेंच राहणार अशी माझी दृढ समजूत आहे." परंतु त्याला हवा असलेला पर्याय मात्र तो सुचवूं शकला नाहीं. सत्याग्रह हा अशा तऱ्हेचा युद्धाचा नैतिक पर्याय होऊं शकणार नाहीं काय? मी तर म्हणेन कीं तो नुसता एक पर्याय नव्हे तर त्यापेक्षां कितीतरी पटीनें श्रेष्ठ असा उपाय आहे.

माणसांतील दोन गटांमध्यें हितविरोध किंवा मतमतांतर निर्माण होतें; चर्चा, वाटाघाट, लवाद हे सर्व उपाय विफळ ठरतात; एक पक्ष दुसऱ्या पक्षाला शरण येण्याबद्दल अंतिमोत्तर देतो (अलीकडे तेवढी देखील शालिनता क्वचितच दाखवली जाते), त्याचाहि कांहीं उपयोग होत नाहीं; मग सरळ सरळ आपल्या सामर्थ्याकडे धाव घेतली जाते आणि शक्य त्या सर्व उपायांनीं एक दुसऱ्याचा नायनाट करण्यास सुरुवात करतो. पण असें करीत असतांना पाळावयाचे कांहीं नियम आणि मार्ग ठरलेले असतात. आणि दोन्ही पक्ष ते पाळतातहि. त्यामुळें त्यांतील कटुता आणि दोन्ही बाजूंकडील दुःसह क्लेश अल्पांशानें थोडेफार कमी होतात पण विनाश कांहीं कमी होत नाहीं. शत्रूचा संपूर्ण निःपात करणें किंवा मृत्यूच्या अथवा हालअपेष्टांच्या भयानें त्यास निमूटपणें शरण येण्यास लावणें

यासाठींच सारी धडपड असते. याला म्हणावयाचें युद्ध ! शारीरिक सामर्थ्य किंवा जबरदस्ती याच्या जोरावर निर्णय लादण्याचा तो एक प्रयत्न असतो. वुइल्यम जेम्सचें म्हणणें असें कीं अशा तऱ्हेच्या शारीरिक सामर्थ्या-ऐवजीं नैतिक सामर्थ्याची कांस धरण्यांत यावी. अर्थातच हिंसेचा अवलंब करणें किंवा भीति अथवा धाकदपटशा दाखवणें यांत बसूं शकत नाहीं. पण मानवी प्रयत्नांची पराकाष्ठा होऊन इमानदारी, परस्परऐक्यभाव, चिकाटी, उदात्तता, शोधक बुद्धि, शारीरिक सुदृढता आणि जोम अशा मनुष्यस्वभावां-तील सर्वोत्तम गुणांचा विकास व्हावा अशी त्याची कल्पना.

दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें साध्य करतां येणें शक्य नसलेले हक्क जबरदस्तीनें मान्य करून घेण्याचा प्रयत्न म्हणजे युद्ध होय. पाशवी अतएव अनैतिक मार्गाचा, अहिंसक आणि त्याचबरोबर नैतिक व हृदयपरिवर्त-नाच्या द्वारें विचारपरिवर्तन घडवून आणणाऱ्या अशा सत्याग्रहमार्गा-व्यतिरिक्त दुसरा पर्याय कोणता असूं शकेल ? बाजू सत्य आणि न्याय्य असेल तर हितविरोध मिटविण्याचा सत्याग्रहाचा दावा असतो. सत्याग्रह हा युद्धाचा पर्याय अशा अर्थानें म्हटला जातो कीं कमीअधिक प्रमाणांत अखेरचा निर्णय लावण्याच्या बाबतींत तो युद्धाची जागा घेतो. आणि त्यांत शारीरिक शक्तीचा उपयोग होत नसल्यानें, हिंसेचा आश्रय केला जात नसल्यानें, सद्भावनांच्या द्वारा समंजसपणा बाणवण्याचा यत्न केला जात असल्यानें, आणि नैतिक दृष्टि जागृत केली जात असल्यामुळें या पर्यायाला नैतिक पर्याय म्हटलें जातें.

जगांतील सर्व भल्या माणसांना युद्धाचा वीट आला आहे यांत शंकाच नाहीं. शांततावादी, नैतिक, विरोधक, आंतरराष्ट्रीयवादी आणि सत्याग्रही हे सर्व युद्धविरोधक आहेत. पण केवळ युद्धाच्या विरुद्ध असून भागणार नाहीं. वॉल्टर लिपमन म्हणतो त्याप्रमाणें ".....झगड्यांचा निकाल हा लावलाच पाहिजे. आणि त्यासाठीं युद्धांव्यतिरिक्त दुसरा एखादा पर्याय शोधून काढला पाहिजे." मानवी स्वभाव अशा तऱ्हेनें विकसित होत जावा कीं झगडे कधीं निर्माणच होऊं नयेत. किंवा चुकून कधीं झालेच तरी चर्चा, वाटाघाट किंवा लवाद यांमार्फत त्यांचा निर्णय

लागावा हें इष्ट असलें तरी तसा सोन्याचा दिवस उगवेपर्यंत झगडे हे उद्भवणारच; आणि अशा परिस्थितींत मनुष्यानें पाशवी सामर्थ्याचा आश्रय घेण्याऐवजीं सत्याग्रहाची कांस धरली तर पुष्कळ मोठी मजल मारल्यासारखें होईल कारण त्यामुळें असत्य, अन्याय, पिळवणूक यांचें तरी समर्थन कोणी करणार नाहीं.

'युद्धाचा राजकीय पर्याय' या आपल्या लेखांत वॉल्टर लिपमन म्हणतो, "लष्करी गुणांपुरताच पर्याय सुचवून मागणार नाहीं. त्यापेक्षां देखील युद्धाचे मार्ग आणि उद्दिष्ट यांच्याबद्दल एखादा पर्याय प्रत्यक्ष कृतींत आणून दाखवणें हें जास्त महत्त्वाचें आहे. कारण युद्धसंस्था म्हणजे कांहीं केवळ क्षात्रवृत्ति प्रकट करण्याचें साधन नव्हे किंवा प्रकट होण्यासाठीं अधीर झालेल्या व्यक्तिनिष्ठ भावनांचा तो उद्रेकहि नव्हे. महान् प्रश्न निकालांत काढण्याचा तो एक मार्ग आहे. व माझ्या मतें तेंच युद्धाचें प्रधान अंग आहे. हें जर खरें असेल तर आजपर्यंत युद्धामुळें ज्यांचा निर्णय लावला जात होता ते प्रश्न सोडवण्याचा मार्ग शोधून तो संघटित करणें यावरच मुख्यतः युद्धसंस्था बंद पडणें अवलंबून आहे."

असें निश्चितपणानें म्हणतां येईल कीं हिंसक युद्धापेक्षां एका अर्थानें श्रेष्ठ असा सत्याग्रहाचा मार्ग महत्त्वाचे निर्णय घेण्याच्या कामीं खासच उपयोगी पडतो.

आतां आपल्याला युद्ध व सत्याग्रह यांमधील साम्य व भेद पाहिले पाहिजेत. आपण प्रथम त्यातील साम्याकडे वळूं. दोघांचाहि अवलंब निर्वाणीचा उपाय म्हणून केला जातो. दोन्हीहि प्रत्यक्ष प्रतिकाराच्या प्रकारांत मोडतात. गांधीजींनीं (यंग इंडिया १२-५-२०) लिहिलें आहे कीं, " या जगांत आजपर्यंत प्रत्यक्ष प्रतिकारानेंच (डायरेक्ट ॲक्शन) गोष्टी साध्य झाल्या आहेत. दक्षिण आफ्रिकेंतील प्रत्यक्ष प्रतिकारामुळेंच जनरल स्मट्सची बुद्धि ताळ्यावर आली.....चंपारणमधील शेंकडों वर्षांचीं गाऱ्हाणीं दूर झालीं तीं देखील प्रत्यक्ष प्रतिकारामुळेंच." मोहीम चालू ठेवण्यासाठीं युद्ध आणि सत्याग्रह या दोहोंतहि सारसर्वस्व पणाला लावावें लागतें. दोहोंतहि शौर्य, मर्दुमकी, धाडसी वृत्ति आणि रोमांचिकता,

सहनशीलता, संयम, स्वार्थत्याग, औदार्य, चपलता यांना वाव असतो. दोन्ही मोठाले झगडे भिटवण्याचे मार्ग असल्यामुळें दोहोंतहि निर्णायक शक्ति असते.

पाशवी शक्तीच्या जोरावर जुलूमजबरदस्ती करणें हा युद्धाचा हेतु असतो तर हृदयपरिवर्तनाच्या जोरावर दुसऱ्याला आपल्या बाजूस वळवणें हा सत्याग्रहाचा उद्देश असतो. पण तें जर साध्य झालें नाहीं तर नैतिक दडपणाचा उपयोग केला जातो. दोन्ही मार्ग आपापल्यापरीनें शत्रूचें नैतिक बळ खचीं करण्याची खटपट करतात. दुसऱ्यावर दुःख लादून त्याच्या मनांत भीति निर्माण करणें हा युद्धाचा मार्ग असतो तर आत्मक्लेशानें आपणच चूक आहोंत असें प्रतिपक्षास वाटावयास लावणें ही सत्याग्रहाची पद्धति असते. दोहोंतहि कडक शिस्त आणि खूप तयारी यांची जरूर जरूर असते. उच्च ध्येयासाठीं त्यागाची वृत्ति दोहोंमुळेंहि जागृत होते. आणि त्यामुळें कीर्तिसंपादनाचा मार्ग सुकर होतो. युद्ध पाशवी सामर्थ्याचा उपयोग करतें, सत्याग्रह नैतिक सामर्थ्यावर अवलंबून असतो. युद्ध हिंसा, जीवित आणि वित्त यांचा विनाश, आणि विरोधकाचा समूळ नायनाट किंवा त्याला अपमानास्पद रीतीनें वागवून शरण आणणें यांचा पुरस्कार करतें. जीवित अथवा वित्त यांस धक्का न लावणें, 'जगा व जगूं द्या' या तत्त्वाला पाठिंबा देणें आणि विरोधकाचा अपमान न करतां त्याला समान दर्जानें वागविणें अशी सत्याग्रहाची शिकवण असते. युद्ध दुसऱ्यावर जास्तींत जास्त क्लेश लादतें. सत्याग्रह पराकोटीचे क्लेश स्वतःवर ओढवून घेतो. युद्ध प्रतिपक्षाच्या सामर्थ्याला आव्हान देतें तर दुसऱ्याच्या समजुतदारपणाला जागृत करणें हा सत्याग्रहाचा आत्मा असतो. युद्धामुळें बहुधा महाभयंकर नुकसान सोसावें लागतें; त्या मानानें सत्याग्रहमोहीमांतील माणसांची आणि संपत्तीची हानि क्षुल्लक असते. "आपल्याला सत्याग्रहींचें छोटेंसें सैन्य पुरेल व त्याचा खर्चहि खूपच कमी येईल" असें गांधीजींनीं 'हरिजन'मध्यें (२२-११-३८) लिहिलें आहे. युद्धसंस्थेंत तडजोडीला स्थान नाहीं. तात्त्विक मुद्द्याव्यतिरिक्त इतर मुद्द्यांवर सत्याग्रह तडजोडीला नेहमीं तयार असतो. युद्धा-

मुळें अवश्यतया द्वेष, क्रोध आणि सूडाची भावना निर्माण होते तर सत्याग्रहामुळें प्रेम, दया, सहानुभूति या गुणांचा विकास होतो. युद्ध अन्याय्य बाजू उचलून धरणें शक्य आहे पण सत्याग्रह कालत्रयीं तसें करणार नाहीं. युद्धांत गुप्तता, अविश्वास, खोटेपणा, फितुरी आणि कावेबाजपणा क्षम्य आहेत; सत्याग्रह हा सत्यावर आधारलेला असून नेहमीं उघड आणि सरळ मार्गांचाच उपयोग करतो. युद्धामुळें राग आणि त्वेष या भावना उद्दीपित केल्या जातात; सत्याग्रह लोकांना शान्त, संयमी आणि कोणाबरोबरहि अप्रीति न बाळगतां सहनशीलता अंगीं बाणविण्याची विनंति करतो. युद्ध ही कांहीं झालें तरी रानटी पद्धत आहे पण सत्याग्रहाला सुसंस्कृत व 'खाईस्टची पद्धत' असें म्हणतां येईल. युद्धाची संघटना आणि सत्याग्रहाची संघटना यांचे समाजावर घडणारे परिणाम भिन्न भिन्न परंतु महत्त्वाचे असतात. युद्धासाठीं तयारी करणारें राष्ट्र आपला सर्व खजिना दारूगोळा तयार करण्यासाठीं रिता करतें व आपल्या नागरिकांना शेजाऱ्या राष्ट्रांतील बांधवांची कत्तल करण्यासाठीं तयार राहण्याची आज्ञा करतें तर सत्याग्रहाची तयारी करणारें राष्ट्र जास्तींत जास्त सद्भाव प्रसृत करतें आणि दुसऱ्याला मरणाच्या खाईंत ओढण्यापेक्षां आत्मक्लेश सोसण्यास तयार होतें.

युद्धामध्यें साधन-साध्य यांतील संबंधांत कोठल्याहि तऱ्हेचा सुसंगतपणा नसतो. पण सत्याग्रहांत साधन-साध्य-संबंध सुसंगत, स्थिर व अखंड असतात. जे युद्ध पुकारतात– आणि विशेषतः चढाईच्या स्वरूपाचें युद्ध पुकारतात– ते आपल्या बाजूबद्दल हटवादी असतात. उलट सत्याग्रही तसा हटवादी कधींहि असत नाहीं. तो नेहमीं असा विचार करतो कीं दुसऱ्याचीं मतेंहि बरोबर असण्याचा संभव आहे, आणि म्हणून दुसऱ्यावर हालअपेष्टा लादण्यास तो तयार होत नाहीं– उलट स्वतःच ते भोगण्याची त्याची तयारी असते. युद्ध आपल्यामागें क्रोध, कटुता, द्वेष आणि भावी युद्धाचीं बीजें यांचा वारसा ठेवून जातें तर सत्याग्रहाचा असा आग्रह असतो कीं अशा तऱ्हेची कोणतीहि दुःखद स्मृति मागें राहूं नये. सत्याग्रहीला असल्या गोष्टींचा कधींच उपयोग करून घ्यावयाचा

नसतो. १२ मे १९२० च्या 'यंग इंडियां'त गांधीजींनीं लिहिलें आहे कीं " आठ वर्षें प्रत्यक्ष लढा चालूनहि कसल्याहि तऱ्हेची कटुता मागें उरली नाहीं, इतकेंच नव्हे तर ज्या हिंदी लोकांनीं जनरल स्मट्सबरोबर इतक्या निकराचा लढा दिला तेच लोक १९१५ सालीं त्याच्या निशाणा-खालीं गोळा होऊन त्याच्या नेतृत्वाखालीं पूर्व आफ्रिकेंत लढले."

'डॉन् ऑफ फ्रीडम् इन् इंडिया' या पुस्तकाचे लेखक नैतिक पर्याय म्हणून सत्याग्रहाविषयीं काय म्हणतात तें त्यांच्याच शब्दांत पुढें दिलें आहे– " युद्धापेक्षां सत्याग्रहांतील सर्वांत ठळक फायदा म्हटला म्हणजे सत्याग्रहामुळें नुकसानीचें प्रमाण खूपच कमी होतें, असत्याची जागा सत्यानें घेतली जाते आणि श्रेष्ठ सामर्थ्याऐवजीं आपल्या बाजूच्या न्याय्य-पणाच्या जोरावर सत्याग्रह आपलें उद्दिष्ट साध्य करून घेण्याची अपेक्षा बाळगीत असतो. सत्याग्रहांत यांव्यतिरिक्त आणखीहि फायदे आहेत पण ते इतके ठळक नाहींत.

" युद्धाप्रमाणें सत्याग्रह सैनिकांचें नीतिधैर्य खच्ची करत नाहीं, उलट दोन्ही बाजूंना सत्याग्रहामुळें एक प्रकारचें दिव्यत्व प्राप्त होतें. माझा असा विश्वास आहे कीं ज्या पोलिसांनीं मुंबईंत लाठीहल्ला केला त्यांच्यांत एक वर्षापूर्वीपेक्षां इष्ट असा बदल पुष्कळच झालेला आहे. त्यांना बळी पडलेल्यांच्यांत तर तो खात्रीनेंच झालेला आहे. गुजराथमधील कांहीं 'युद्धछावण्यां'त मी राहिलों आहें. 'ऑल क्वाएट ऑन् द वेस्टर्न फ्रंट' या पुस्तकांत वर्णन केलेल्या युद्धछावण्यांशीं त्यांची तुलना केल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. एका बाजूला कमालीचा उन्माद तर दुसऱ्या बाजूला शान्त व उच्च वातावरण यांमधील ती तुलना होती. एकीकडे निशाबाजींतील शौर्य होतें तर दुसरीकडे शौर्यशाली संगम होता. एकी-कडे अश्लील भाषा व बीभत्स कल्पना होत्या तर दुसरीकडचें सर्व वाता-वरणच धार्मिक होते. युरोपांत मनुष्यांना पशुकोटींत लोटण्यांत येत होतें तर हिंदुस्थानांत मानवता जितक्या श्रेष्ठ दर्जाला जाऊं शकेल तितका सत्याग्रहींचा विकास करण्यांत येत होता.

" युद्धांतील सगळी रम्यता आणि सगळें धाडस सत्याग्रहांत देखील

अंतर्भूत असतेंच, त्यांतहि धोका असतो आणि अनेकांना बलिदानहि करावें लागतें. मला वाटतें कीं सत्याग्रहांतील शौर्यांत उदात्तता आहे. आत्मिक शौर्याची अपेक्षा सत्याग्रहींकडून केली जाते.

" सत्याग्रहाचा मार्ग कमी खर्चाचा आहे. शस्त्रास्त्रें, बराकी, पेन्शन असल्या अवाढव्य खर्चाच्या बाबी त्यांत येत नाहींत. ती तपस्व्यांची युद्धनीति आहे. आणि हिंदुस्ताननें अनेक तपस्व्यांना जन्म दिलेला असल्यामुळें या युद्धनीतीची सुरवात येथें व्हावी हें योग्यच आहे. लोकशाही वृत्तीचें सत्याग्रह हें व्यक्त स्वरूप होय. सत्याग्रहयुद्धांत कोणालाहि कसल्या बिरुदावल्या किंवा पदकें देण्यांत येत नाहींत. आणि सर्व प्रकारची वर्गभावना नाहींशी केली जाते. सत्याग्रहयोद्ध्यांची भरती सर्व क्षेत्रांतून केली जाते. स्त्रियांना त्यांत विशेषच वाव असून लहान लहान मुलें देखील त्यांत भाग घेऊं शकतात. सत्याग्रहाची शक्यता अमर्याद आहे. अशी एकहि परिस्थिति आढळणार नाहीं कीं जेथें सत्याग्रहाचा अवलंब करतां येणार नाहीं.

" सत्याग्रह हें एक सर्वंकष हत्यार आहे. केव्हांहि त्याचा उपयोग करतां येतो. तें जो वापरतो आणि ज्याच्याविरुद्ध तें वापरलें जातें त्या दोघांचेंहि तिच्या योगानें भलेंच होतें. रक्ताचा एक थेंबहि न सांडतां सत्याग्रहामुळें फार दूरगामी परिणाम घडवून आणतां येतात. सत्याग्रहशस्त्र हें असें हत्यार आहे कीं जें कधीं गंजून जात नाहीं किंवा चोरून नेतां येत नाहीं."

आतांपर्यंत सशस्त्र, परकीय आक्रमणाविरुद्ध जवळ जवळ सर्व क्षेत्रांत आणि सर्व प्रसंगीं सत्याग्रहाचा उपयोग करण्यांत आलेला आहे. आणि त्या सर्व क्षेत्रांत युद्धाची जागा त्यानें चांगल्या तऱ्हेनें भरून काढण्याचें सिद्ध झालें आहे. शस्त्रास्त्रांच्या बाबतींत अगदीं कडेकोट तयारी असलेल्या परकीय सरकारविरुद्ध हिंदुस्तान सत्याग्रहपद्धतीनें देत असलेला लढा हा एक महान् प्रयोग आहे. त्यांत यशाची पुष्कळ आशा असून त्या दिशेनें बराच मोठा टप्पा गांठला गेला आहे. आक्रमक सैन्याचा लोंढा अडवून चढाई करणाऱ्या शत्रूचा यशस्वीपणें प्रतिकार करण्यासाठीं फार मोठ्या-

प्रमाणावर तयारी असली पाहिजे आणि त्या तऱ्हेनें तयारी करण्याची मोकळीकहि मिळाली पाहिजे. परंतु युद्धाची जागा सत्याग्रहानें भरून काढतां येईल असा विश्वास असलेल्याला हें सत्याग्रहाच्या आवांक्याबाहेरचें आहे असें म्हणतां येणार नाहीं.

आतां सत्याग्रहाव्यतिरिक्त आणखी कोणत्या विचारप्रणाली युद्ध-संस्थेला विरोध करतात व त्यांच्यांत व सत्याग्रहांत कोणते फरक आहेत तें समजावून घेऊं. जे स्वतःला शांततावादी म्हणवितात ते देखील युद्धाला विरोध करतात. पण त्यांच्यापुढें स्वतःचा असा युद्धविरोधाचा दुसरा कोणताच मार्ग नसल्यामुळें आयत्या वेळीं ते एक निष्क्रिय तरी बनतात किंवा युद्धाला पाठिंबा तरी देऊं लागतात. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं बर्ट्रँड रसेलसारख्या विख्यात शांततावाद्याची गत अशीच झाली. कृति करण्याच्या प्रसंगीं निष्क्रियतेच्या उपदेशानें कधींहि काम भागणार नाहीं. युद्धाला नैतिक विरोध असणारे जे लोक आहेत त्यांचा त्या बाबतचा मार्ग व्यक्तिगत असतो; तेवढ्या वेळापुरतें त्यामुळें त्यांच्या बुद्धीचें समाधान होतें; परंतु त्यापुढें त्यांच्या मार्गाची मजल जात नाहीं. आतरराष्ट्रीयवाद्यांचा विश्वास या ना त्या स्वरूपांतील संयुक्त राज्यघटना आणि राष्ट्रसंघ यांवर असतो. पण त्या मार्गानें प्रयत्न झाले असून ते विफल ठरले आहेत. शिवाय त्यांची मदार देखील सरतेशेवटीं पाशवी सामर्थ्याच्या उपयोगावरच असते. त्यानंतर टप्प्याटप्प्यानें होत जाणारी सुधारणा आणि सनदशीर दडपण यांवर विश्वास ठेवणारी उदारमतवाद्यांची एक विचारप्रणाली आहे. त्यांच्याविषयीं लिहितांना टॉलस्टॉयनें असें म्हटलें आहे कीं हिंसा आणि उदारमतवाद हीं अयशस्वी ठरलीं असून त्यांनीं (रशियन) सरकारची सत्ता आणि बेजबाबदार वृत्ति उलट वाढवली आहे. स्वतः टॉलस्टॉय देखील युद्धाव्यतिरिक्त परंतु तितक्याच कार्यक्षम अशा प्रतिकारपद्धतीचा कसून शोध करीत होता. म्हणूनच त्यांनीं गांधीजींना १९१० सालीं लिहिलेल्या पत्रांत ट्रान्सवालमध्यें ते करीत असलेल्या प्रयत्नांची प्रशंसा केली आहे.

एका अर्थानें या सर्व विचारधारा उपयुक्त असून शांततेच्या पुरस्काराला

त्यांच्याकडून खात्रीनेंच हातभार लागलेला आहे. मानवतेला युद्ध-मार्गावरून परत फिरवून शांततेच्या मार्गावर नेण्याचा मार्ग त्यांच्याकडून खासच होत आहे. परंतु मुख्य मुद्दाच त्यांच्या दृष्टीआड झालेला आढळतो. अंतर्गत प्रश्नांच्या बाबतींत आजपर्यंत कोठल्याहि राज्यघटनेंत ती घटनाच नष्टप्राय करणारे मूलभूत फरक घडवून आणण्याची सोय नाहीं. म्हणून ज्या प्रसंगीं अशा प्रकारचा मूलभूत फरक घडवून आणणें आवश्यक होऊन बसतें त्या वेळीं हिंसक अथवा अहिंसक प्रत्यक्ष प्रतिकाराखेरीज इतर कोणतीहि मात्रा लागू पडत नाहीं. त्याचप्रमाणें ज्या वेळीं दोन राष्ट्रात झगडा निर्माण होतो त्या वेळीं हिंसक किंवा अहिंसक प्रत्यक्ष प्रतिकाराखेरीज दुसरें गत्यंतर उरत नाहीं. अशा रीतीनें प्रत्यक्ष प्रतिकार करणें व कायदा आपल्याच हातांत घेणें आवश्यक होऊन बसतें. प्रश्न असतो तो एवढाच कीं तें हिंसेच्या मार्गानें करावयाचें कीं अहिंसेच्या. समाज, सरकार किंवा राष्ट्राराष्ट्रांतील संबंधांत कोणताहि मूलगामी स्वरूपाचा फरक कायदेशीरपणा किंवा सनदशीरपणा याना हरताळ फासल्याखेरीज घडून येणेंच शक्य नाहीं. याची यथार्थ जाणीव गांधीजींना झालेली आहे. पण त्याचबरोबर फक्त अहिंसा मार्गाच्याच अंगीकाराविषयीं ते हिमाचलाइतके दृढ आहेत. लोकांना अत्यंत महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टी केवळ समजुतदारपणानेंच साध्य होत नाहींत तर त्यासाठीं हालअपेष्टांची जबर किंमत द्यावी लागते.... समजुतदारपणाचें आकलन बुद्धीला असतें पण क्लेश हृदयांत शिरकाव करून घेतात व त्यामुळें मनुष्याचा आंतरिक समंजसपणा जागृत होतो" असे उद्‌गार गांधीजींनीं ऑक्टोबर १९३१ मध्यें बकिंगहॅम येथें काढले आहेत. १९३२ च्या डिसेंबरमध्यें आपल्या उपवासासंबंधीं प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत ते म्हणतात कीं, "प्रचंड खळबळ निर्माण झाल्याशिवाय समाजांत मूलगामी फेरफार घडून येणें अशक्य आहे. आणि हिंसा किंवा अहिंसा या दोन मार्गांनींच तें साधणें शक्य आहे. परंतु हिंसामार्ग हा अधःपाताचा व निराशामय असल्यामुळें तो वगळलाच पाहिजे. अहिंसेचा मार्ग उदात्त असून तो ज्याच्याविरुद्ध वापरण्यांत येतो त्यांच्या नैतिक अधिष्ठानाला भिडणारा व तें जास्त बळकट

करणारा आहे."

अशा तऱ्हेनें युद्ध टाळण्याचा आणि सामाजिक झगडे मिटवूं शकेल असा खराखुरा मार्ग शोधावयाचा असेल तर समाजाची सत्याग्रहाच्या मार्गान्वयें संघटना केल्याखेरीज दुसरा उपाय नाहीं. अल्डुस हक्स्लेनें असे समर्पक उद्‌गार काढले आहेत कीं सर्वांना शांतता हवी असते पण ज्या योगानें शांतता प्रस्थापित होईल असें कांहीं करण्यास मात्र कोणीच तयार नसतें. युद्धासाठीं धडपड चालू ठेवून कांहीं शांतता प्रस्थापित होणार नाहीं किंवा शस्त्रास्त्रांची वाढ, आक्रमक राष्ट्रवाद आणि द्वेषमूलक देशभक्ति यांच्या योगानेंहि शांतता येणार नाहीं. त्याचप्रमाणें अप्रतिकाराचा सिद्धान्त वैयक्तिक रीत्या आत्मसात् करून व त्यासाठीं एकट्यापुरता मार्ग शोधूनहि शांतता नांदणार नाहीं. निःशस्त्र प्रतिकारानेंहि शांतता आणतां येणार नाहीं कारण एखादा ज्या वेळीं दुसऱ्यावर आक्रमण करील त्याच वेळीं फक्त तो उपाय अवलंबितां येतो. पण जर कशाची खरी जरूर असेल तर ती अन्यायावर चौफेर हल्ला चढविण्याची– आक्रमक, अहिंसक प्रत्यक्ष प्रतिकाराची. अंतिम उद्दिष्टाच्या दृष्टीनें तेंच सत्याग्रहाचें कार्य आहे. त्यांत अप्रतिकार आणि निःशस्त्र प्रतिकार तर अंतर्भूत आहेतच पण सत्याग्रहाची पायरी त्याहिपेक्षां खूप पुढची आहे. सर्व अन्यायांचें अस्तित्व समूळ उखडून टाकल्याखेरीज सत्याग्रह स्वस्थ राहणार नाहीं.

गांधीजी सतत असें म्हणत आले आहेत कीं त्यांची सत्याग्रहपद्धति हिंसामार्गाची जागा भरून काढूं शकेल. त्यांच्या लेखनांतील कांहीं वाक्यें पुढें उद्‌धृत केलीं आहेत. "सविनय कायदेभंग हा सशस्त्र क्रांतीचा संपूर्ण, प्रभावी आणि रक्तहीन असा पर्याय आहे" (१७-११-२१); "हिंसेचें दर्शनी प्रतीक जो शस्त्रसंभार त्यावर अहिंसेचें दर्शनी प्रतीक सत्याग्रह हा एकच उतारा आहे" (६-८-३१); "हिंसा किंवा सशस्त्र बंड याऐवजीं योजावयाचा सत्याग्रह हा तितकाच प्रभावी प्रत्युपाय होय" (१-६-३२); "हिंसेची जागा पूर्णपणें भरून काढण्यासाठींच ही (सत्याग्रहाची) कल्पना प्रतिपादन केली गेली" (१५-४-३३).

सत्याग्रह हा योग्य किंवा कांकणभर सरस असा युद्धाचा पर्याय आहे

असें फक्त गांधीजीच म्हणतात असें नाहीं; रवींद्रनाथ टागोर यांनीं देखील असे उद्‌गार काढले आहेत कीं "क्रांतीच्या इतिहासांत हिंदुस्ताननें एक नवें तंत्र निर्माण केलें आहे. हें तंत्र आपल्या देशाच्या आध्यात्मिक परंपरेला साजेसें असून त्याची शुद्धता जर अभंग ठेवली तर आपल्या लोकांनीं संस्कृतींत घातलेली ती फार मोठी भर ठरेल. गांधीजींवरील आपल्या पुस्तकांत श्री. स्प्रॅट म्हणतात, "तो (सत्याग्रह) क्रांतीचा नैतिक पर्याय आहे." हिंदुस्तानला स्वतःची मातृभूमि मानणाऱ्या सी. एफ्. अँड्रूज या आदर्श मिशनऱ्यानें असे उद्‌गार काढले आहेत कीं "गांधीजींच्या सत्याग्रहसाधनाच्या योगानें वुइल्यम जेम्स शोधीत असलेला नैतिक पर्याय उपलब्ध झालेला आहे." दक्षिण आफ्रिकेंतील लढ्यासंबंधानें (इंडियन प्रॉब्लेम्स पान ७४) ते म्हणतात, "दक्षिण आफ्रिकेंतील सविनय प्रतिकाराचा लढा हातहि वर न उचलतां जिंकण्यांत आला. मी माझ्या आयुष्यांत पाहिलेल्या घटनांपैकीं तींच खरोखरी सर्वांत 'ख्रिस्ती' घटना होय. मी ती कधींहि विसरणें शक्य नाहीं."

सत्याग्रहाचें भवितव्य : : १५

सत्याग्रहाच्या भवितव्यासंबंधीं बोलावयाचें म्हणजे वस्तुतः भविष्य वर्तवण्यासारखेंच आहे. पण तें फायदेशीरच ठरेल असें म्हणतां येणार नाहीं; मात्र त्याला अजिबातच कांहीं आधार नाहीं असें नव्हे. जे लोक मानवतेच्या भवितव्याचा विचार करतात ते मानवांमानवांतील झगड्यांचा निकाल लावण्याच्या मार्गाविषयीं देखील विचार करीत असतातच. आपल्याला झगडा नसलेल्या समाजाची कल्पना करतां येईल हें खरें परंतु ती जवळच्याच काय पण दूरच्या भविष्यकाळाबद्दलहि करतां येणार नाहीं.

असा समाज निर्माण होण्याला आणखी कित्येक शतकें उलटून जावीं लागतील आणि त्या वेळीं मानवी व्यवहार कदाचित् आजच्याइतके चित्त-वेधक राहणारहि नाहींत कारण झगड्यामुळेंच तर मानवतेला एवढा रंग भरला आहे.

महावीर, बुद्ध, जीझस आणि असले दुसरे संत आले आणि गेले. त्यांनीं प्रेमाची आणि अहिंसेची शिकवण दिली. लोकांपुढें थोर आदर्श ठेवण्याच्या दृष्टीनें मानवजातीवर त्यांनीं अतोनात छाप बसवली. दोन हजार वर्षें उलटून गेलीं आणि तरीहि आज आपल्याला काय आढळून येतें ? प्रेम आणि औदार्य असल्या उदात्त ध्येयानें भारलेल्या कांहीं तुरळक व्यक्ति क्वचित् आढळतात हे खरें परंतु त्यांच्या व्यक्तिगत जीवनापलीकडे सामाजिक किंवा सामूहिक आयुष्याला डोळ्यांत भरण्यासारखें बळण देण्याच्या दृष्टीनें ते बरेचसे असमर्थ ठरले आहेत. अजूनहि सामूहिक जीवनांतील आणि सामाजिक झगड्यांमागील निर्णायक शक्ति हिंसा हीच आहे. आणि म्हणून 'आडदांड न्याय' अजूनहि टिकून राहिलेला आहे. पुष्कळ वेळां वाटाघाटी किंवा लवाद यशस्वी झालेले दिसले तरी ते समजुतदारपणाच्या आणि शांततेच्या मार्गावरील भक्तीमुळें नव्हे तर युद्धाचा आणि विनाशाचा नंगानाच सुरू होईल या भीतीनेंच. ही एक प्रकारची दुटप्पी नीतिमत्ता आहे.

गांधीजी अत्यंत तळमळीनें हा दुटप्पीपणा घालविण्याची विनंति करीत आहेत. अगदीं अविचल निश्चयानें ते असें जाहीर करीत आहेत कीं सत्य आणि अहिंसा जर व्यक्तीच्या हिताची असेल तर समुदायाच्या देखील ती हिताचीच असली पाहिजे. ते ज्याला गुरुस्थानीं मानतात त्या टॉल-स्टॉयप्रमाणें ते नुसती ही शिकवण देऊनच थांबले नाहींत तर त्यांच्या दर्शनानुसार त्यांनीं आपल्या जीवनांत सरळ सत्याचे प्रयोग सुरू केले. त्यांना सत्याची अनुभूति झाली. त्यांनीं सत्याचाच विचार केला. सत्य तेवढेंच ते बोलले. सत्याचेंच आचरण केलें व त्याचा अनुभव घेतला. आणि आज ते सत्याचेच अध्वर्यू बनले आहेत. सत्य हेंच सदैव त्यांचें अत्युच्च प्रेमनिधान राहणार. सत्यालाच ते आपला देव मानतात. परंतु

अहिंसा व प्रेम यांखेरीज सत्याच्या साधनेचा दुसरा निर्वेध असा मार्ग त्यांना आढळला नाहीं. 'सर्व जीवमात्र एकच आहेत' आणि परस्परांतील संबंधांत प्रेमाइतकें नैसर्गिक आणि योग्य दुसरें कांहींहि नाहीं अशा तऱ्हेच्या त्यांना झालेल्या सत्याच्या दर्शनांतूनच त्या मार्गाचा उगम झालेला आहे. शिवाय ते असें म्हणतात कीं मनुष्य नश्वर आणि चुका करणारा असल्यामुळें त्याला झालेल्या सत्याच्या दर्शनाबद्दल त्यानें आग्रही असतां कामा नये. आपल्याला सत्य ज्या स्वरूपांत दिसेल त्याच स्वरूपांत जर तें इतरांनाहि आढळलें तर त्या योगानें निर्माण होणाऱ्या प्रेमभावामुळें त्यांच्या परस्परसंबंधांत कमालीचा गोडवा निर्माण होतो. पण जरी तसें घडून आलें नाहीं एवढेंच नव्हे तर एकमत झालें नाहीं तरी देखील सत्यप्रेमी माणूस जर प्रेमाचा आणि आत्मक्लेशाचाच मार्ग पत्करील आणि त्याला झालेलें सत्यदर्शन तो दुसऱ्यावर लादण्याच्या फंदांत पडणार नाहीं तर तो अखेरीस खासच विजयी होईल. सर्वांविषयीं सद्भाव ठेवून प्रेममय सेवा आणि आत्मक्लेश यांच्या द्वारा सत्याची साधना करण्यासाठींच सत्याग्रहीचें आयुष्य वाहिलेलें असतें.

गांधीजींच्या या जीवनक्रमांतून दुसऱ्यावर क्लेश लादण्याऐवजीं ते आपल्यावर ओढवून घेऊन त्यांच्या द्वारा सामाजिक झगडे मिटविण्याचें सत्याग्रहाचें तत्त्व उदित झालेलें आहे. ज्याला युरोपीय लेखक 'ख्रिस्ती नीतिमत्ता' म्हणतात त्याचा उपयोग सार्वजनिक व्यवहारांत आणि राजकीय झगडयांत गांधीजींनींच प्रथम केला. आफ्रिकेंतील आणि हिंदुस्तानांतील ख्रिस्तधर्मीय राज्यकर्त्यांना त्यांची थोरवी समजो वा न समजो ते अखेरपर्यंत आपल्या मार्गाला चिकटून राहिले आहेत. 'केस फॉर इंडिया' या आपल्या पुस्तकांत विल डुरांट म्हणतात, "हिंदी स्वातंत्र्यसंग्राम ख्रिस्ती विचारसरणीची व्यवहार्यता अजमावण्यासाठीं केलेले विशाल प्रयत्न दर्शवतो. जर हिंदुस्तान विजयी झाला तर ख्रिश्चन विचारसरणीला (त्याचाच अर्थ आपण ख्राइस्टचीं नैतिक ध्येयें असा करतों) सबंध जगांत मानाचें स्थान प्राप्त होईल. आणि सौजन्य व शान्ति यांची कीर्ति न भूतो न भविष्यति अशी गाजेल."

हिंदुस्तानने स्वराज्याचा आपल्या ताबडतोबीच्या ध्येयपथावर बरीच मोठी मजल मारलेली असली तरी अजून संपूर्ण यश संपादन केलेलें नाहीं. परंतु ठिकठिकाणच्या अत्यंत जुनाट आणि दुराग्रही अन्यायांचें परिमार्जन करण्याच्या बाबतींत सत्याग्रहानें अभूतपूर्व यश मिळविलें आहे. आक्रमणाच्या अथवा जातीय दंग्याच्या प्रतिकारार्थ अजूनपर्यंत या मार्गाचा उपयोग करण्यांत आलेला नाहीं. तें आणि त्यासारख्याच इतर कांहीं बाबतींतील तंत्र अद्याप विकसित व्हावयाचें आहे. सत्याग्रहाच्या शस्त्रागारांतील उपवास हें एक शस्त्र आहे. आजपर्यंत वैयक्तिक बाबतींत तें वापरण्यांत आलें असून त्या कसोटीलाहि उतरलें आहे. परंतु अजून सामुदायिक प्रमाणावर त्याचा उपयोग व्हावयाचा आहे. शस्त्र म्हणून उपवासाचा आणखी विकास व्हावयाचा असेल तर सामुदायिक प्रमाणावरील उपोषण हा त्यांतील एक टप्पा खासच असणार. इतर सर्व उपाय विफल झाले म्हणजेच मग सत्याग्रही आत्मसमर्पण करण्याला तयार होतो. आणि ईश्वराच्या हातीं परिणामाची जबाबदारी सोपवून ईश्वराशीं किंवा सत्याशीं संपूर्णपणें तन्मय होतो. उपवास करणारा ज्या समाजाचा तो घटक आहे त्या समाजाला जर त्याची गरज असेल तर त्याच्या उपवासानें कांहीं तरी मार्ग निघाला पाहिजे. आणि बहुधा तो तसा निघतोहि. आपणांस अत्यंत प्रिय वाटणाऱ्या आणि त्यासाठीं प्राणापेक्षांहि जास्त किंमत द्यावयास तयार असलेल्या एका विशिष्ट सत्यासाठीं जर जनता उपवास करूं लागेल तर त्याचा परिणाम देखील वरील वैयक्तिक उपवासासारखाच घडून येईल. लोक पवित्र मानीत असलेलें सत्य धोक्यांत असतांना जिवंत राहण्यांतहि त्यांना स्वारस्य वाटणार नाहीं. विशिष्ट अन्यायाला जबाबदार असलेल्या व्यक्तीवर व सर्वसाधारण जगावर अशा तऱ्हेच्या सामुदायिक उपवासाचा परिणाम ज्या तऱ्हेचा होईल त्यावर अशा उपायांच्या यशाचें मान अवलंबून राहील. त्याबरोबर उपवासामागील न्यायता, शुद्ध हेतु आणि त्याचा अवलंब करणाऱ्या व्यक्तीची विशुद्धता यांवरहि तें अवलंबून राहील. तुरुंगांतील कैद्यांचें उदाहरण सोडून दिलें तर विशिष्ट अन्यायाविरुद्ध लढा देण्याच्या हेतूनें मोठ्या संख्येनें अशा

तऱ्हेच्या उपवासाचा मार्ग पत्करल्याचें उदाहरण आजवर घडलेलें नाहीं.

सत्याग्रहाकडे जे साशंकतेनें बघतात त्यांना असें वाटतें कीं एकदां गांधीजी आपल्यांतून कायमचे निघून गेले म्हणजे सत्याग्रहाला फारच थोडें महत्त्व राहील. गांधीजींची गाढ श्रद्धा व त्याचें असामान्य व्यक्तित्व यांमुळेंच सत्याग्रहाची इतकी प्रगति होऊं शकली आहे असें ते म्हणतात. आज सत्याग्रह निर्विवादपणें गांधीजींच्या व्यक्तिमत्वावर आधारलेला आहे. परंतु त्याबरोबर हेंहि तितकेंच खरें आहे कीं त्यांच्या व्यक्तिमत्वाचें रहस्यच मुळीं ते कट्टर सत्याग्रही आहेत यांत सांठवलेलें आहे. गांधीजींमुळें सत्याग्रह पुढें आला नसून सत्याग्रहामुळें गांधीजी पुढें आले आहेत. त्यांचें व्यक्तित्व सत्याग्रहापासून अलग किंवा निराळें असें नाहीं. ते सत्याग्रहाचे पुरस्कर्ते असले तरी ते गेल्याबरोबर सत्याग्रह पोरका होणार आहे असें नाहीं. त्या दोहोंत कोणाचे कोणावर उपकार झाले आहेत असा प्रश्न निघाला तर गांधीजींचे सत्याग्रहावर उपकार झाले आहेत असें म्हणण्यापेक्षां सत्याग्रहाचे गांधीजींच्यावर झाले आहेत असेंच म्हणावें लागेल. सत्याग्रह आपल्या स्वतःच्या गुणांवर तरेल अथवा मरेल त्याची व्याप्ति, आचरण आणि लोकप्रियता हीं काय तीं वेळोवेळीं निरनिराळ्या व्यक्तींवर अवलंबून राहतील. मुख्य प्रश्न आहे तो हा कीं मानवांना उत्कटतेनें असणारी महत्त्वाची गरज त्यामुळें मरून निघते कीं नाहीं. ती जर मरून निघत असेल तर सत्याग्रह टिकून राहणें आणि त्याचा विकास होणें अपरिहार्य आहे. मग गांधीजी असोत किंवा नसोत. तत्त्व हें केव्हांहि त्याचा शोध लावणाऱ्या किंवा तें आचरणांत आणणाऱ्या व्यक्तीपेक्षां श्रेष्ठच असतें. अनेक गांधी किंवा ख्राईस्ट यांच्यापेक्षां सत्याग्रह श्रेष्ठ आहे. सत्याग्रह हा शाश्वत आहे. परंतु ज्या प्रमाणांत गांधीजींनीं सत्याग्रहाचें दर्शन घडवून तो आपल्या जीवनांत उतरविला असेल त्या मानानें तें शाश्वत आहे असें आपणांस म्हणतां येईल.

सत्याग्रहाविषयीं शंका घेणारे दुसरा एक मुद्दा उपस्थित करतात तो असा कीं सत्याग्रहाचा अवलंब फक्त असहाय आणि दुर्बल लोकच तेवढा करतात; जगांतील सामर्थ्यवान् लोक कधींच करीत नाहींत. त्यांचें

म्हणणें असें कीं सशक्त आणि सामर्थ्यवान् लोकांच्या दृष्टीनें सत्याग्रहाला भवितव्य नाहीं. त्यामुळें 'सत्याग्रह हें सशक्तांचें शस्त्र आहे' हें गांधीजींचें म्हणणें ते मान्य करीत नाहींत. त्यांचें म्हणणें .गृहीत धरून देखील दुर्बलांसाठीं कां होईना पण सत्याग्रहाला उज्ज्वल भवितव्य आहे असें ते मानीत असतील तरी ती सुद्धां कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं कारण पुष्कळ वेळीं दुर्बलांनाच अशा मार्गांची जरूर असते. जर आजपर्यंत त्यांना असहायता वाटत असेल आणि सत्याग्रहामुळें त्यांची परिस्थिति सुधारण्यासाठीं आणि त्यांचा स्वाभिमान वाढविण्यासाठीं ते कांहीं तरी करूं शकतील असें त्यांना वाटूं लागेल तर तें देखील एक महत्कृत्यच म्हटलें पाहिजे. क्षयरोगावरील उपाय सांपडण्याइतकेंच तें महत्त्वाचें आहे. असहायता हा माणसांना खच्ची करणारा एक मानसिक रोगच आहे. आणि आशा व विश्वास हीं दोन त्या रोगावरचीं शक्तिवर्धक औषधें आहेत. त्यांच्या भरीला असहायतेविरुद्ध झगडून तिच्या मगरमिठींतून सुटका करून घेण्याचें हत्यार जर त्यांच्या हातीं लागलें तर त्या हत्याराचें भवितव्य उज्ज्वलच असणार. तसेंच बेधडकपणें असेंहि म्हणतां येणार नाहीं कीं ज्या सशक्त किंवा सामर्थ्यवान् लोकांपाशीं शस्त्रें आहेत, आणि तीं पाजळण्याची ज्यांच्याजवळ ताकद आहे, ते या सत्याग्रहाचा कधींच अवलंब करणार नाहींत. शांत वृत्तीच्या हिंदूंनाच सत्याग्रहाचें आकर्षण वाटलें असतें तर गोष्ट वेगळी परंतु आपण हें पाहिलें आहे कीं रणशूर असे शीख देखील हें शस्त्र उत्तम प्रकारें वापरूं शकतात. तसेंच आपण हें देखील पाहिलेलें आहे कीं हिंदुस्तानच्या डोंगराळ सरहद्दीवरील सशक्त आणि कांटक मुसलमान पठाणांना देखील तें पसंत पडलें असून त्यांनीं तलवारीचा व सूडाच्या भावनेचा त्याग करून अहिंसेचा अंगीकार केलेला आहे. या दोन उदाहरणांवरून हें सिद्ध होतें कीं वरील विधानाला मोठे अपवाद नाहींत असें नाहीं. सत्याग्रहाचा अवलंब नेहमीं देहाच्या अथवा मनाच्या सामर्थ्यावर किंवा दौर्बल्यावरच फक्त विसंबून नसावा. आणि तो तसा नसतोहि. अंतिम सुपरिणाम, साध्य-साधनसंबंध, उच्च संस्कृति, मानवी विचारप्रवाह, व्यवहार्यता आणि नफानुकसान यांवरूनच त्याच्या

उपयोगाचा बरेवाईटपणा ठरवावयाचा असतो. पूर्ण विचारान्तीं जर एखाद्याला असें वाटलें कीं हिंसामार्गच अधिक चांगला आहे तर त्याचा अंगीकार करण्यास तो मोकळा आहे. इतकेंच नव्हे तर तें त्याचें कर्तव्य ठरेल. पण अहिंसामार्ग चांगला आहे अशी जर त्याची समजूत असेल तर तो सशक्त असो वा अशक्त असो, सशस्त्र असो वा निःशस्त्र असो, त्यानें त्यासाठीं स्वतःची तयारी केलीच पाहिजे, आणि काय वाटेल तें झालें तरी त्याचीच कांस धरली पाहिजे.

सत्याग्रहाची पार्श्वभूमि ही अशी आहे. आपणांस आतां त्याच्या भवितव्याकडे थोडीशी नजर टाकावयाची आहे. भवितव्याविषयीं बोलणें कठीण आहे यांत शंकाच नाहीं. सत्याग्रहाचा पूर्वेतिहास उज्ज्वळ आहे. त्याची आजची वाढ जोमदार आहे. त्याचें भवितव्य आशादायक आहे. पण तें कांहीं महत्त्वाचे प्रत्यक्ष घटनांवरच अवलंबून राहील.

जगाला युद्धाचा कंटाळा आल्याखेरीज, परस्पर कत्तलींच्या विफल परिणामांबद्दल लोकांना घृणा वाटूं लागल्याखेरीज आणि युद्धाबद्दल लोकांना वाटणारा मोह कमी झाल्याखेरीज त्यांना प्रेम आणि अहिंसा या तत्त्वांचें आकर्षण वाटणार नाहीं. परंतु शान्ति आणि शान्ततामय मार्ग यांविषयीं तळमळ लागल्याखेरीज हें आकर्षण विफल ठरण्याचा संभव आहे. मोठमोठे विचारवन्त तत्त्वज्ञानी आणि धर्मोपदेशक शान्ततामय मार्गाच्या प्रस्थापनेसाठीं धडपड करीत आहेत यांत संशय नाहीं. परंतु अजून त्यांचे परिश्रम भावनात्मक किंवा सुधारणावादी असेच आहेत. हिंसा शक्तीसमोर उभें राहण्याची अजून त्यांची तयारी नाहीं. आपल्या देशांत युद्धाला जबाबदार असणारांविरुद्ध संघटना करण्याचा त्यांचा प्रयत्न अगदीं तोकडा असा आहे. परंतु युद्धाला विरोध करणारांची संख्या वाढत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. अशा लोकांनीं आपली संघटना करून प्रत्यक्ष प्रतिकाराची तयारी दाखवल्याखेरीज आज जे सत्ताधारी आहेत त्यांना बाजूस सारणें शक्य होणार नाहीं.

एकदां शांततामय प्रत्यक्ष प्रतिकाराची खरीखुरी मागणी पुढें आली

म्हणजे त्या तत्त्वाचा प्रसार होणें कठीण नाहीं. आज या नव्या मार्गाचीं पुरेशीं निदर्शनें झालेलीं आहेत. आणि अधिक प्रसाराची आवश्यकता असली तरी हीं निदर्शनें जगाला आतां परिचयाचीं नाहींत असें नाहीं. साधारण बुद्धीच्या माणसाला होऊं शकेल इतका त्या तंत्राचा विकास झालेला आहे. सत्याग्रहाचे प्रणेते, प्रयोजक आणि त्यांतील तज्ज्ञ जे गांधीजी ते त्याविषयींच्या शंकांचें निरसन करण्यास, चुका सुधारण्यास व त्यासंबंधींच्या गैरसमजुतीचें निराकरण करण्यास सुदैवानें आज हयात आहेत. अजूनहि त्यांचे प्रयोग चालू असून ते त्यांत आणखीहि महत्त्वाची भर घालणें संभवनीय आहे.

पाश्चात्य देशांतील जीवन अधिक जोमदार व प्रवृत्तिपर असल्यानें सत्याग्रहशास्त्राची वाढ जेथें त्याची मूळ सुरवात झाली त्या हिंदुस्तानापेक्षां तेथें अधिक झपाट्यानें होणें शक्य आहे. हिंदुस्तानची अध्यात्मिक परंपरा आणि पुरातन संस्कृति यांच्यामुळें या महान् तत्त्वांचा उदय होण्यास व त्याला आकार येण्यास ही भूमि सोयिस्कर असूं शकेल. परंतु एकदां पद्धत रूढ झाल्यानंतर ज्यांना ज्यांना म्हणून त्या मार्गानें जाण्याची इच्छा आहे ते सर्वच लोक त्याचा उपयोग करूं शकतील. आणि इतरांनाहि त्याचा अवलंब करण्याच्या कामांत अडथळा येण्यासारखें कांहीं नाहीं कारण मानवी मनोरचनेवर सत्याग्रहाची उभारणी झालेली आहे व मानवी मन सर्व ठिकाणीं जवळ जवळ सारखेंच असतें.

मानवाच्या आणि त्यानें निर्माण केलेल्या संस्थांच्या विकासाकडे दृष्टि टाकली तर असें आढळून येतें कीं मानवी प्रवृत्ति हिंसेच्या विरुद्ध असून मानव हळू हळू अहिंसेप्रत जात आहे. जर तोच क्रम चालू राहिला तर भविष्यकाळीं मानवी झगडे मिटविणाऱ्या संस्थांत सत्याग्रहाला जास्त मानाचें स्थान प्राप्त होण्यास कांहीं अडचण पडेल असें वाटत नाहीं. अनेक शतकांपासून जीवनक्रम म्हणून सत्याग्रहास मानवी जीवनांत शाश्वत व प्रभावी असें स्थान प्राप्त झालें आहे. पण या टिकाणीं आपल्या दृष्टीनें जर कोणती महत्त्वाची गोष्ट असेल तर ती म्हणजे सामाजिक हत्यार म्हणून सत्याग्रहाचा होणारा उपयोग ही होय. राष्ट्रांतर्गत सामाजिक झगडे

मिटविण्याचें हत्यार म्हणून पाश्चिमात्य समाजांत जर सत्याग्रहानें स्थान मिळविलें तर तो यशोमार्गावरील फार मोठा टप्पा ठरेल. नांव घेण्यासारखी कोणतीहि हिंसक संघटना प्रस्थापित सरकार फार काळ सहन करणार नाहीं. त्यामुळें सर्व सनदशीर मार्ग अयशस्वी ठरल्यानंतर सुधारणावाद्यांना मनांतल्या मनांत चरफडत, हात चोळीत बसण्याखेरीज दुसरें कांहीं करतां नाहीं. परंतु सुधारणावादी जर योग्य तयारीनंतर हा अहिंसक प्रत्यक्ष प्रतिकाराचा मार्ग स्वीकारतील तर कोणत्याहि मानवसमुच्चयावर, संस्थेवर किंवा सरकारवर त्यांचें पुरेसें नैतिक दडपण पडल्याखेरीज राहणार नाहीं.

रोमाँ रोलाँ, ऐनस्टाइन, जोड, अल्डुस हक्स्ले, जेराल्ड हर्ड यांच्यासारखे थोर विचारवन्त अहिंसक प्रतिकाराच्या दिशेनें विचार करूं लागले आहेत ही गोष्ट समाधानकारक अशीच आहे. अल्डुस हक्स्लेच्या 'एन्डस् ॲड् मीन्स्' या पुस्तकाचीं पानेंच्या पानें गांधीवादी सत्याग्रहपद्धतीचें स्पष्टीकरण करण्यासाठीं खर्ची पडलीं आहेत. रिचर्ड ग्रेग यांचें 'पॉवर ऑफ् नॉन्व्हायोलन्स' म्हणजे तर सत्याग्रह, त्याची व्याप्ति, तंत्र आणि शिस्त यांवरील एक प्रबंधच आहे. अशा पुस्तकांवरून हें स्पष्ट होतें कीं पाश्चात्य विचारवन्त या महत्त्वपूर्ण विषयाच्या अभ्यासाकडे लक्ष देऊं लागले आहेत. परंतु येवढ्यानेंच फार आशावादी बनतां कामा नये. या पद्धतीच्या हिंदुस्तानांत होणाऱ्या संपूर्ण विजयावरच अंतिम भिस्त ठेवली पाहिजे. अशा विजयामुळेंच सर्व निष्ठावन्त सुधारक, अविश्रान्त क्रांतिकारक आणि उदात्त तत्त्वांसाठीं स्वयंस्फूर्तीनें लढा देण्यास तयार असणारे लोक सत्याग्रहाचा प्रभावी व कार्यक्षम हत्यार म्हणून स्वीकार करतील.



गांधीजींचे व्यक्तिगत व कौटुंबिक सत्याग्रह : १६

सत्याग्रहाचें शास्त्र अजून प्रगत होत आहे आणि सत्याग्रहप्रवक्त्याच्या मतानुसार तें अजून प्रयोगावस्थेंतच आहे. त्यामुळें सत्याग्रहाचीं सर्व उदाहरणें अद्याप प्रयोगात्मकच ठरतात. आतांपर्यंत सत्याग्रहामागील तत्त्वप्रणाली व तिचे वेगवेगळे पैलू यांचें विवेचन झालें. यानंतरच्या प्रकरणांत निरनिराळ्या परिस्थितींत करण्यांत आलेल्या सत्याग्रहलढयांची माहिती देण्यांत आली आहे. सामुदायिक प्रमाणावर व निरनिराळ्या गटांनीं केलेल्या सत्याग्रहांना महत्त्वाचें स्थान असल्यामुळें अभ्यासाच्या दृष्टीनें सोयिस्कर पडावें म्हणून निरनिराळ्या प्रकारचे सत्याग्रह निरनिराळ्या स्वतंत्र प्रकरणांत दिले आहेत.

गांधीजी सत्याग्रह हा जीवनधर्म मानतात व तो निःशस्त्र प्रतिकाराहून अगदीं स्वतंत्र असून जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आणि आपल्या अगदीं निकटच्या व प्रिय व्यक्तींच्या विरुद्ध देखील अवलंबितां येईल असें प्रतिपादन करतात. वस्तुतः सत्याग्रहाचें तें खास वैशिष्ट्य होय. ज्यानें कौटुंबिक क्षेत्रांत त्याचा उपयोग केलेला नाहीं किंवा जो त्यात अयशस्वी ठरला आहे त्याला दुसऱ्या क्षेत्रांत त्याचा उपयोग करणें कठीण जाईल.

मोहनदास अवघे पंधरा वर्षांचे असतांना विद्यार्थिदशेंत कुसंगतीमुळें त्यांना धूम्रपान व चोरी यांची संवय जडली. त्यांच्या भावाला तर कर्ज-देखील झालें होतें. छोट्या मोहनदास गांधींनीं आपल्या भावाच्या सोन्याच्या कड्याचा एक तुकडा चोरून भावाचें कर्ज फेडलें. पण त्यांच्या अंतःकरणाला त्या चोरीची कमालीची कांचणी लागून राहिली. तथापि सत्यप्रियतेमुळें लवकरच त्यांचे डोळे उघडले आणि सर्व आरोपांची त्यांनीं वडलांना लेखी कबुली दिली. त्या कबुलीजबाबांत आपल्या चुकीचें संपूर्ण प्रायश्चित्त भोगण्याची जबाबदारी त्यांनीं स्वतःकडे घेतली. या पत्रानें त्यांच्या आजारी पित्याला गहिंवरून आलें. गांधीजी लिहितात,

"ह्या प्रेमपूर्ण अश्रुबिंदूंनीं माझें पाप साफ धुवून निघालें." प्रेमळ पित्यानें त्यांचा अपराध सर्वस्वीं पोटांत घातला.

* * *

बॅरिस्टरीची परीक्षा पास होऊन १८९१ च्या जुलै महिन्यांत ज्या वेळीं गांधीजी हिंदुस्तानांत परत आले तेव्हां त्यांच्या जातीनें त्यांना वाळींत टाकलें. आपल्या जातीच्या विरोधाची पर्वा न करतां विलायतेस जाण्याचें धाडस त्यांनीं केलें होतें. ज्ञातिनियमाप्रमाणें त्यांना आपल्या मेव्हण्यांच्या किंवा वहिनींच्या देखील घरीं पाणी पिण्याची सुद्धां परवानगी नव्हती. त्यांनीं या नियमाचें अत्यंत कसोशीनें पालन केलें. आणि नातेवाईकांनीं आग्रह केला असतांहि चोरून देखील त्याचा भंग केला नाहीं. इतका त्रास सहन करूनहि जातींतील वडील मंडळींबद्दलचा आपला त्यांचा सद्भाव कायम राखला. त्यामुळें लोकांच्या रागाची धार बोथट होत गेली आणि ज्ञातीनें जरी त्यांच्यावरचे निर्बंध कधीं दूर केले नाहींत– आणि गांधीजींनींहि कधीं तशी मागणी केली नाहीं– तरी त्यांच्या इतर अनेक जोखमीच्या अंगीकृत कार्यांत त्यांस मदत मिळत गेली.

* * *

यानंतरचें उदाहरण १९१३ सालीं दक्षिण आफ्रिकेंत असतांना फोनिक्स पार्क येथें त्यांनीं आपल्या सहकाऱ्यांच्या नैतिक अधःपाताच्या प्रायश्चित्तादाखल केलेल्या उपवासाचें होय. तेथील दोन आश्रमीयांच्या हातून अपराध घडले. त्या वेळीं गांधीजींना ती हकीगत समजली त्या वेळीं त्यांनीं असा विचार केला कीं ज्या अर्थीं त्यांच्या आश्रमांत हा प्रकार घडला त्या अर्थीं ते स्वतः त्याला अंशतः जबाबदार आहेत. त्यांनीं आत्म-शुद्धीसाठीं आणि प्रायश्चित्त म्हणून पांच दिवसांचा उपवास केला. पण ते इतरांना अशा तऱ्हेच्या उपवासाविरुद्ध इशारा देतात व सर्वांना तो उपाय सुचवीत नाहींत. जर उपवास करणाऱ्या व्यक्तीच्या अंतःकरणाला तीव्र संवेदना झाल्या असतील, ज्याच्या हातून चूक घडली त्याच्याबरोबरचे संबंध अत्यंत निकटचे असतील आणि उपवास करणाऱ्या व्यक्तीबद्दल ज्याच्यासाठीं उपवास करावयाचा त्याच्या मनांत नितान्त आदर

असेल तरच अशा तऱ्हेचे उपवास समर्थनीय ठरतील असें ते म्हणतात. अर्थातच गांधींजींच्या उपवासाचा परिणाम म्हणून फोनिक्स पार्क मधील सर्व वातावरण निवळलें हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

* * *

१९०९ सालीं ऑपरेशननंतरहि कस्तुरबा ज्या वेळीं रक्तस्राव इत्यादिमुळें आजारी होत्या त्या वेळीं ज्याला कौटुंबिक सत्याग्रह म्हणतां येईल त्याचें उदाहरण घडलें. गांधीजींनीं त्यांना जलचिकित्सापद्धतीनुसार उपचार करण्यास सुरवात केली. त्यांनीं अशी सूचना केली कीं कांहीं दिवसपर्यंत कस्तुरबांनीं मीठ व डाळी अजिबात वर्ज्य कराव्यात. कस्तुरबांचा गांधींच्या वैद्यकीय ज्ञानावर फारसा विश्वास नव्हता. म्हणून गांधीजींनीं फार आग्रह धरला असतां त्यांनीं त्यांना स्पष्ट नकार दिला. ज्या वेळीं गांधीजी फारच आग्रह करूं लागले तेव्हां कस्तुरबा वैतागानें म्हणाल्या, "डॉक्टरनें मीठ सोडण्यास सांगितलें तर तुम्ही देखील तें सोडणार नाहीं." गांधीजींना हें आव्हानच होतें. त्यांनीं त्याचा स्वीकार केला व सांगितलें कीं, "पुढचें सबंध वर्षभर मीठ व डाळी यांस मी स्पर्श करणार नाहीं." कस्तुरबांना हा मोठा आघातच वाटला व त्यांनीं क्षमेची याचना केली. या जिनसा सोडण्यास आपण तयार असल्याचें त्यांनीं गांधीजींना सांगितलें. मात्र गांधीजींनीं त्या वर्ज्य करूं नयेत असें कळकळीनें विनवलें. पण छे ! गांधीजी आपल्या शब्दाला चिकटून राहिले आणि तेहि दहा वर्षें ! अर्थातच कस्तुरबांनींहि त्यांच्या पावलावर पाऊल ठेवलें. त्यांच्या प्रकृतीवर त्याचा इष्ट असाच परिणाम घडला. गांधीजींनाहि त्यापासून कसलाच त्रास झाला नाहीं.

आयुष्यांतील एक अत्यंत मनोरम स्मृति म्हणून गांधीजी या प्रसंगाचा उल्लेख करतात.

---

* * *

परक्यांच्या किंवा अधिकाऱ्यांच्या विरुद्ध गांधीजींनीं केलेल्या व्यक्तिगत सत्याग्रहाचीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत.

१८९३ सालीं दक्षिण आफ्रिकेंत दरबान येथें पोहोंचल्यानंतर आठ-

वड्याच्या आंतच त्यांना प्रिटोरिया येथें जाण्याचा प्रसंग आला. त्यांच्या-- जवळ पहिल्या वर्गाचें तिकीट होतें. परंतु रेल्वेच्या अधिकाऱ्यांनीं मॉरिट्झबर्ग येथें त्याना त्यांचा डबा सोडून तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत जाण्यास फर्मावलें. गांधीजींनीं तसें करण्याचें नाकारलें. परंतु पोलिसाकरवीं बाडबिछान्यासह त्यांना बाहेर काढण्यांत आलें. गाडी निघून गेली. त्यांनीं ती सबंध रात्र दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या परिस्थितीचें चिंतन करीत तेथेंच कुडकुडत काढली.

* * *

त्याच प्रवासांत त्यांना आणखी एक कटु अनुभव आला. कांहीं प्रवास चौचाकींतून चौघांनीं मिळून करावयाचा होता. पण त्यांच्याबरोबर इतर गोरे लोक असल्यामुळें त्यांना चौचाकींत जागा देण्यांत आली नाहीं. गाडीवानाच्या शेजारीं असलेल्या एका पेटीवर त्यांनीं आपलें आसन ठोकलें. त्यांचा हा प्रवास सुरू असतांना कंडक्टरला धूम्रपानाची लहर आल्यामुळें त्यानें त्यांना ती जागा खालीं करून त्याच्या पायाशीं बसण्यास सांगितलें. गांधीजींनीं शांतपणें पण तितक्याच निश्चयानें नाहीं असें उत्तर दिलें. यामुळें कंडक्टरनें रागावून त्यांच्या श्रीमुखांत लगावली. पण ते तसेच कठड्याला घट्ट धरून राहिले. दुसऱ्या तडाख्यानें त्यांना जवळ जवळ खालींच पाडलें. तरी देखील या वेळीं इतर उतारू मधें पडले व त्या कंडक्टरला त्यांनीं रोखलें. अशा रीतीनें गांधीजींना आपली जागा सोडण्याचा प्रसंग आला नाहीं. कंडक्टरच्या या आडदांड वर्तनामुळें देखील त्यांच्या मनांत अहितबुद्धि निर्माण झाली नाहीं किंवा त्याचेवर कायदेशीर इलाज करण्याच्या कल्पनेला त्यांनीं थारा दिला नाहीं.

* * *

यापुढील प्रसंग १८९४ सालीं प्रिटोरिया येथें प्रेसिडेंट क्रूगर यांच्या बंगल्यासमोर फूटपाथवर त्यांना ढकलून देण्यांत आलें त्या वेळीं घडला. पहाऱ्यावरच्या शिपायानें त्यांना ढकलून दिलें कारण त्या फूटपाथवरून कोणत्याहि काळ्या आदमीनें जावयाचें नाहीं अशी प्रथा होती. त्याच रस्त्यानें घोड्यावरून जात असलेले गांधीजींचे एक युरोपीय मित्र श्री. कोट्स

यांनीं तो सर्व प्रकार पाहिला. गांधीजींना त्यांनीं प्रयोगादाखल खटला भरण्यास सांगितलें व स्वतः साक्ष देण्याचीहि तयारी दर्शवली; परंतु गांधीजींनीं बदला घेण्याचें नाकारलें. श्री. कोट्स यांनीं कानउघाडणी केल्यावर त्या पहारेकऱ्याला वाईट वाटलें.

* * *

पुढील प्रकार म्हणजे एक आडदांड न्यायाचा मासलाच होय. हिंदुस्तानांतील तात्पुरता मुक्काम संपवून गांधीजी १८९४ मध्यें दरबानला परत गेले. त्यांच्यावर दक्षिण आफ्रिकेंतील युरोपियांच्या विरुद्ध हिंदुस्तानांत अपप्रचार केल्याचा आरोप करण्यांत आला. त्याचप्रमाणें दक्षिण आफ्रिका हिंदी लोकांनीं मरवून टाकण्याचा त्यांचा कट चालू असल्याचाहि आरोप त्यांच्यावर लादण्यांत आला. दोनहि आरोप असत्य होते. परंतु लोकसमुदायाला काय ? गांधीजींनीं किनाऱ्यावर पाऊल ठेवल्याबरोबर जमावानें आपल्याच हातांत कायदा घेऊन अत्याचारास सुरुवात केली. तेथें सर्व पेशांच्या ३००० हून अधिक युरोपीयांचा जमाव जमला होता. तथापि दरबान येथील पोलीस सुपरिंटेंडेंटच्या पत्नी सौ. अलेक्झांडर यांच्या हिंमती वर्तनामुळें गांधीजी बचावलें. तथापि कोणावरहि कायदेशीर इलाज करण्याचें त्यांनीं नाकारले. ते म्हणाले कीं लोकांच्या मनांत कोणींतरी चुकीची माहिती भरवून दिली आहे परंतु यथासमयीं त्यांना सत्याची जाणीव झाल्याशिवाय राहणार नाहीं.

* * *

एकदां त्यांना स्वतःच्या अनुयायांच्या हातूनच त्रास सोसावा लागला. १९०६ मधील दक्षिण आफ्रिकेंतील पहिल्या सत्याग्रहाच्या अखेरीस जनरल स्मट्स यांनीं कांहीं आश्वासनें दिलीं. गांधीजींनीं जनरल स्मट्स यांच्या शब्दावर विश्वास टेवून सत्याग्रह तहकूब करण्याचें मान्य केलें व आपखुषीनें बोटांचे ठसे दिले. परंतु मीर अलीम व इतर पठाण मित्रांच्या मतें हा विश्वासघात होता. त्यामुळें ज्या वेळीं गांधीजी ठसे देण्यासाठीं निघाले त्या वेळीं मीर अलीमनें त्यांना अडाविलें व बेदम मारलें. पण गांधीजींनीं त्याच्याविरुद्ध कायदेशीर इलाज करण्याचें नाकारलें, व ज्या वेळीं त्याच्यावर

सरकारकडून स्वतंत्रपणें खटला भरला गेला त्या वेळीं त्याच्याविरुद्ध साक्ष देण्यासहि ते गेले नाहींत. त्यानंतर मीर अलीम हे त्यांचे एक निस्सीम चहाते व कडवे अनुयायी बनले हें निराळें सांगणें नकोच.

* * *

त्यांच्यावर कोर्टाची बदनामी केल्याचा खटला झाला (१२-३-१९२०). सत्याग्रहप्रतिज्ञेवर सह्या केल्या म्हणून तीन वकिलांच्या सनदा रद्द करण्याबद्दलची परवानगी मागणारें पत्र अहमदाबादच्या डिस्ट्रिक्ट जज्जनें हायकोर्टाला लिहिलें होतें. त्यावर गांधीजींनीं टीका केली. या कारणाकरतां मुंबई हायकोर्टानें त्यांना माफी मागण्यास सांगितलें. पण गांधीजींनीं तसें करण्याचें नाकारलें आणि अशी कैफियत दिली कीं आपण केलेलें वर्तन (कोर्टापुढें चालू असलेल्या खटल्यावर टीका करणें) हें राजकारणी किंवा सार्वजनिक लेखक म्हणून आपलें कर्तव्य आहे व त्यासाठीं शासन भोगण्यास आपली तयारी आहे. हायकोर्टानें त्यांना दोषी धरलें. तथापि त्यांनीं कोर्टाची अवज्ञा केली असूनहि त्यांस त्यांच्या वर्तनाबद्दल शासन केलें नाहीं.

* * *

चंपारणमधील मोतिहारी येथील मॅजिस्ट्रेटनें त्यांना जिल्हा सोडून जाण्याची आज्ञा केली असतांना गांधीजींनीं केलेल्या अत्यंत महत्त्वाच्या वैयक्तिक सत्याग्रहाकडे आपण वळून त्या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या वर्षानुवर्षें चाललेल्या गाऱ्हाण्यांची चौकशी करण्यासाठीं ते त्या ठिकाणीं गेले होते. ही गोष्ट १७ एप्रिल १९१७ रोजीं ते मोतिहारीला पोहोंचले त्या वेळची आहे. त्यांच्या वास्तव्यानें सार्वजनिक शांततेला धोका निर्माण होऊन गंभीर स्वरूपाचे बखेडे माजण्याचा संभव आहे या सबबीवर त्यांना ताबडतोब परत जाण्यास सांगण्यांत आलें. त्या वेळचें गांधीजींचें उत्तर वैशिष्ट्यपूर्ण असें होतें. त्यांनीं सांगितलें कीं प्रत्यक्ष वस्तुस्थितीचें ज्ञान करून घेण्यासाठीं आपण येथें आलों आहों. जिल्हा सोडून जाण्यास त्यांनीं नकार दिला. अधिकाऱ्यांच्या आज्ञाभंगाबद्दल शासन भोगण्याची त्यांनीं आपली तयारी दाखविली. त्यांच्यावर खटला भरण्यांत आला. पण त्यांना शिक्षा लागली नाहीं व अखेरीला तो हुकूम मागें घेण्यांत आला.

गांधीजींच्या आयुष्यांत असले प्रसंग सर्वत्र विखुरलेले असल्यानें आणखीहि कांहीं उदाहरणें देतां येतील पण येथें फक्त कांहीं निवडक तेवढींच उदाहरणें देण्यांत आलीं आहेत.

गांधीजींच्या सत्याग्रहचळवळी : : १७

दक्षिण आफ्रिका व हिंदुस्तान या दोनहि ठिकाणच्या कांहीं महत्त्वाच्या सत्याग्रहमोहिमांच्या वर्णनाकडे आतां वळूंया. यांपैकीं पहिली व सर्वांत महत्त्वाची सत्याग्रहमोहीम म्हटली म्हणजे जवळ जवळ आठ वर्षेंपर्यंत चाललेली दक्षिण आफ्रिकेंतील होय. त्यामुळें फक्त ब्रिटिश साम्राज्याचेंच नव्हे तर सबंध जगाचें लक्ष सत्याग्रहाकडे वेधलें गेलें. या मोहिमेची प्रेरणा गांधीजींची असल्यानें व शेवटपर्यंत त्यांच्याच नेतृत्वाखालीं ती चालल्यामुळें, तसेंच या सत्याग्रहमोहिमेंतच त्यांनीं आपली सत्याग्रहपद्धति जवळ जवळ पूर्ण विकसित केल्यामुळें, त्याचा सूक्ष्मपणें अभ्यास करणें जरूर आहे.

परंतु कोठल्याहि मोहिमेची साद्यंत हकीगत देण्याचें हें स्थळहि नव्हे व हा प्रसंगहि नव्हे. तथापि तेथें विवेचिलेल्या प्रत्येक मोहिमेंतील महत्त्वाचीं अंगें देण्याचा इरादा आहे. उदाहरणार्थ, सत्याग्रहाचा काल व स्थल, त्याच्याशीं संबंध असलेले पक्ष किंवा त्याच्या मुळाशीं असलेल्या तक्रारी किंवा अन्याय, त्याच्याशीं निगडित झालेले सवाल, सत्याग्रहाचें स्वरूप व सत्याग्रहींनीं योजलेले उपाय, प्रतिपक्षाच्या प्रतिक्रिया आणि शेवटीं सत्याग्रहाचे झालेले परिणाम व त्यासंबंधीं जरूर तर टीका इतक्या गोष्टी देण्यांत येतील.

साहजिकच दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रह मी जरा जास्त विस्तारानें देत आहें.

गांधीजींनीं चालविलेला पहिला सामुदायिक सत्याग्रह दक्षिण आफ्रिकेंतील

ब्रिटिशांच्या वसाहतींत झाला. १८९४ पासून सर्वसामान्यपणें आशियांतील लोकांच्या व विशेषतः हिंदी लोकांच्या तक्रारींबाबत पद्धतशीर चळवळ सुरू झाली. आशियांतील लोकांना ते आशियांतील आहेत म्हणूनच केवळ मतदानाचा अधिकार नाकारणारा एक कायदा नाताळ विधिमंडळापुढें आला होता. त्याचा निषेध करणाऱ्या प्रचंड सामुदायिक अर्जावर दहा हजारांवर लोकांनीं सह्या करून तो वसाहतमंत्र्यांना सादर करण्यांत आला होता. नाताळ कायदेमंडळांत ठराव संमत झाला परंतु त्याला वसाहतमंत्र्याची संमति मिळाली नाहीं म्हणून त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें नाहीं. ज्यांनीं चळवळ केली त्यांना हें समाधान कांहीं थोडेंथोडकें नव्हतें.

पण त्याव्यतिरिक्त दुसरींहि कित्येक सामाजिक व कायदेविषयक गाऱ्हाणीं होतींच. त्यांपैकीं बहुतेक जातिद्वेष, वर्णद्वेष किंवा युरोपीयन वसाहतवाल्यांना वाटणारी असूया यांवर आधारलेलीं होतीं. स्वतःला अरब म्हणवून घेणाऱ्या मुसलमानांखेरीज सर्व हिंदी लोकांना कुली किंवा हमाल म्हणून संबोधण्यांत येई. कारण करारानें आणण्यांत आलेले कामगार हेच तेथें युरोपीयनांना आढळलेले पहिले हिंदी लोक होत. प्रत्यक्ष गांधीजींना देखील कुली बॅरिस्टर म्हणून संबोधलें जात असे. वस्तुतः नाताळ लॉ सोसायटीनें त्यांच्या वर्णामुळें त्यांना बॅरिस्टर म्हणून नोंदवून घेण्यास देखील विरोध केला होता! तथापि तें म्हणणें मान्य झालें नाहीं. हिंदी लोकांना रेल्वे स्टेशनांवर मुख्य दारानें प्रवेश करण्यास बंदी होती. त्यांना वरच्या वर्गाचीं तिकिटें मिळण्यासहि त्रास पडे. जर त्यांना तिकिटें मिळालीं तर वरच्या वर्गाच्या डब्यांत जागा मिळणें मुष्कील होई कारण त्यांना आपल्या बरोबरीचे प्रवासी म्हणवून घेण्यास फारच थोडे युरोपियन तयार होत. कोटल्याहि क्षणीं त्यांना डब्याबाहेर घालविलें जाण्याचा किंवा खालच्या वर्गाच्या डब्यांत जाण्यास सांगण्यांत येण्याचा संभव फार असे. त्यांनीं वरच्या वर्गाचें भाडें भरलें आहे ही गोष्ट विचारांत घेतली जात नसे. १८९३ मध्यें खुद्द गांधीजींना मॉरिट्झबर्ग येथें तसा अनुभव

आला. त्याच प्रवासांत पार्डेबर्ग येथें जागा न सोडल्याबद्दल एका डच कंडक्टरकडून त्यांना मार खावा लागला. त्या वेळचा त्यांचा अनुभव याहूनहि कटु होता. गांधीजी एकदां जोहान्सबर्गमधील ग्रँड नॅशनल हॉटेलमध्यें उतरण्यासाठीं गेले असतांना त्यांना त्यांच्या काळ्या कातडीमुळें प्रवेश नाकारण्यांत आला. प्रिटोरिया येथें असतांना प्रेसिडेंट क्रूगर यांच्या घरासमोरील फूटपाथवरून जात असतां तेथील पहारेकऱ्यानें गांधीजींना लाथेनें खालीं पाडलें कारण कोणत्याहि काळ्या आदमीनें त्या फुटपाथचा उपयोग करावयाचा नव्हता. १३-१-१८९७ रोजीं गांधीजी हिंदुस्तानाहून दरबानला परत गेले असतांना त्यांना युरोपीयन जमावानें बेदम मारलें. दक्षिण आफ्रिकेंतील युरोपियनांची हिंदुस्तानांत बदनामी केल्याचा व दक्षिण आफ्रिका हिंदी लोकांनीं भरून काढण्याचा प्रयत्न केल्याचा आळ त्यांच्यावर घेण्यांत आला होता. योगायोग असा कीं बंदरांत नांगरून पडलेल्या 'कोर्लंड' व 'नादेरी' बोटींवरील सुमारें ८०० हिंदी लोक त्याच दिवशीं बंदरावर उतरावयाचे होते.

दूषित ग्रह आणि जातीय वैमनस्य यांशिवाय पक्षपाती काळे कायदेहि अस्तित्वांत होते. एका काळीं करारानें आणलेल्या जुन्या हिंदी कामगाराला जर स्थायिक व्हावयाची इच्छा असेल तर तीन पौंड डोईपट्टी भरावी लागे. त्याचप्रमाणें त्याच्या बायकोसाठीं व सोळा वर्षांवरील प्रत्येक मुलासाठींहि हा कर त्याला द्यावा लागे. कोणालाहि परवान्याखेरीज व्यापार करतां येत नसे. वस्तुस्थिति अशी असे कीं युरोपीयनांनीं शब्द टाकतांच त्यांस परवाना मिळे पण हिंदी लोकांच्या मार्गांत मात्र नित्य अडथळे येत. तसाच शिक्षणचांचणी कायदाहि तेथें होताच. त्या कायद्यान्वयें वसाहत करूं इच्छिणारास एखाद्या युरोपीय भाषेमधून परीक्षा पास व्हावी लागे. तीन वर्षें आधीं स्थायिक झालेल्यांच्या बाबतींत हा कायदा लागू केला जात नसे. १९०६ सालची एशिअॅटिक एमिग्रेशन अॅक्टविरोधी चळवळ ऐन भरांत असतांनाच १९०७ सालीं 'ट्रॅन्स्वाल एमिग्रेशन अॅक्ट' पास करण्यांत आला. त्यामुळें कोणत्याहि नव्या स्थायिक होणाऱ्या हिंदी इसमास भाषाविषयक परीक्षा पास होऊनहि तेथें प्रवेश

मिळणें जवळ जवळ बंदच झालें.

एकीकडे १८९४ सालीं स्थापन झालेल्या नाताळ काँग्रेसमार्फत आणि ट्रान्सवाल व केपटाऊन येथील तशाच स्वरूपाच्या संस्था व 'इंडियन ओपीनियन' नांवाचें वर्तमानपत्र यांच्या द्वारा चळवळ चालू होती. त्याचबरोबर गांधीजींचें हिंदी जमातीच्या अंतर्गत सुधारणेच्या कार्यक्रमाकडेहि दुर्लक्ष झालेलें नव्हतें. तो त्यांचा त्या काळांतील विधायक कार्यक्रम होता. घरगुती आरोग्य, राहण्यासाठीं व दुकानें, शिक्षण वगैरेसाठीं स्वतंत्र इमारती वगैरे गोष्टींचा या कार्यक्रमांत अंतर्भाव झाला होता. त्याचबरोबर खाजगी व सार्वजनिक जीवनांत अत्यंत उच्च नैतिक आदर्शांचा अवलंब केल्यामुळें गांधीजींचें व्यक्तिमत्व सर्वांच्या प्रेमास व कौतुकास पात्र झालें होतें.

आपलें काम झाल्याबरोबर लगेच हिंदुस्तानला परत येण्याऐवजीं गांधीजी तसेच दक्षिण आफ्रिकेंत राहिले. ब्रिटिश वसाहतींतील हिंदी लोकांना सोसावी लागणारी मानखंडना त्यांनीं स्वतः अनुभविली होती, सर्व अपमानांना त्यांनीं धीमेपणानें तोंड दिलें होतें आणि सर्व शारीरिक कष्ट व त्रास त्यांनीं सहन केले होते. तरीहि तेथें राहणाऱ्या युरोपीयनांविरुद्ध कोणत्याहि तऱ्हेचा वैरभाव त्यांच्या मनांत नव्हता. तेथील राजकीय, सामाजिक वगैरे पद्धतीबद्दल त्यांना तिरस्कार वाटत असला तरी त्या पद्धतीस जबाबदार असणाऱ्यांबद्दल त्यांच्या मनांत प्रेमच होतें. खुद्द त्या युरोपीयनांपैकींच किती तरी जणांना ते आपले सच्चे मित्र मानीत. एव्हांना ते हिंदी लोकांच्या प्रश्नांशीं समरस झाले होते आणि स्वतःच्या निःस्वार्थ सेवेनें व त्यागानें त्यांनीं विरोधकांचा आदर संपादन केला होता. तेथील अन्यायांचा निःपात करण्याचा त्यांचा निश्चय झाला होता, परंतु त्याची सुरवात कशी करावी याची स्पष्ट कल्पना त्यांना नव्हती.

अखेर 'एशिॲटिक लॉ अमेंडमेंट ऑर्डिनन्स'च्या प्रश्नावर वादळ उसळलें. प्रथम ता. २२-८-१९०६ च्या ट्रान्सवाल सरकारच्या खास गॅझेटमध्यें गांधीजींना तो ऑर्डिनन्स वाचावयास मिळाला. यासंबंधीं गांधीजींचे अगदीं सुरवातीचे एक चरित्रकार आणि जोहान्सबर्ग येथील बॅरिस्टर मिशनरी जोसेफ जे. डोक् या प्रसंगाविषयीं लिहितात, "स्वभावतः

राजनिष्ठ व न्यायनिष्ठ अशा ट्रान्सवालमधील सुमारें दहा हजार एशिअन लोकांचा सरकारविरोधी उठाव जवळ जवळ अठरा महिनेपर्यंत चालू आहे. एशिअन लोकांनीं परवान्यांचा लबाडीनें भरमसाट व्यापार चालविला आहे व म्हणून ती गुन्हेगार जात आहे. गुन्हेगार म्हणून त्यांच्याविरुद्ध कायदे करणें भाग आहे अशा तऱ्हेच्या विचारसरणीवर आधारलेल्या 'एशिॲटिक लॉ अमेंडमेंट काय्द्या'मुळें एशिअन लोकांमध्यें तीव्र संताप निर्माण झाला. त्यांनीं हा आरोप सिद्ध करून देण्याची जोराची मागणी केली पण ती नाकारण्यांत आली. सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधिशाकडून वरील आरोपांची चौकशी व्हावी या त्यांच्या विनंतीकडेहि दुर्लक्ष करण्यांत आलें. त्यांना कायदेमंडळाच्या निवडणुकांत मताधिकार नव्हता किंवा पार्लमेंटमध्यें त्यांचा कोणी प्रतिनिधीहि नव्हता. त्यामुळें हाताचे ठसे देऊन स्वतःवर गुन्हेगार असा छाप तरी मारून घेणें किंवा त्या काय्द्याचा प्रतिकार करणें याखेरीज गत्यंतरच नव्हतें. त्यांनीं प्रतिकार करण्याचा निश्चय केला. सुदैवानें त्यांचा नेता सुसंस्कृत, सभ्य, उदार व टॉल्सटॉयचा शिष्य होता. आणि त्यामुळें त्यांच्या प्रतिकाराला अनत्याचारी प्रतिकाराचें स्वरूप प्राप्त झालें.... मी काल त्यांना म्हणालों, 'दोस्त, लढा फार काळ चालण्याचा संभव आहे. इंग्लंड याबाबत निष्काळजी दिसतें आणि येथील सरकार यत्किंचितहि नमण्यास तयार नाहीं.' त्यांनीं उत्तर दिलें, 'कांहीं चिंता नाहीं. जर कसोटी दीर्घकालीन असेल तर त्या योगानें माझ्या बांधवांची शुद्धि होईल आणि यश येणार हें तर ठरलेलेंच आहे.'"

या काय्द्यासंबंधीं खुद्द गांधीजींनीं खालील टीका केली आहे—"जगातील कोठल्याहि भागांत स्वतंत्र मनुष्याविरुद्ध केलेला अशा तऱ्हेचा कायदा माझ्या आढळांत नाहीं.... हिंदुस्तानांतील (तथाकथित) गुन्हेगार जातींविरुद्ध अशा तऱ्हेचे कांहीं कडक कायदे आहेत त्यांच्याशीं या वटहुकमाची सहज तुलना होऊं शकेल.... काय्द्यानें फक्त गुन्हेगारांच्या बोटांचे ठसे घेतां येतात, त्यामुळें ठशाबाबतची सक्ती पाहून मी थक्कच झालों."

बऱ्याच कडाक्याच्या चर्चेनंतर जोहान्सबर्ग येथें ता. ११-९-१९०६ रोजीं भरलेल्या तीन हजार प्रतिनिधींच्या बैठकींत या अपमानकारक

वटहुकुमाचा प्रतिकार करण्याचा निर्णय घेण्यांत आला. कांहीं झालें तरी या कायद्याचा प्रतिकार करावयाचाच अशी शपथ प्रत्येक प्रतिनिधीकडून घेवविण्यांत आली. शेट हबीब नांवाच्या सच्च्या लढवय्याच्या सूचनेवरून ही शपथ घेण्यांत आली.

प्रत्यक्ष प्रतिकारापूर्वी अर्ज, शिष्टमंडळें, मुलाखती, पत्रव्यवहार हे नेहमींचे सर्व प्रकार झाले. पण वसाहतमंत्री श्री. डंकन यांनीं स्पष्टपणें सांगितलें कीं युरोपियनांच्या तेथील अस्तित्वासाठीं सरकारला वटहुकूम असणें अवश्य वाटतें.

अशा रीतीनें सत्याग्रहाची पार्श्वभूमि तयार झाली. नांवें नोंदवून घेणें बोटांचे ठसे देणें आणि परवाने काढणें या तिहींस नकार देणें हें सत्याग्रहाचें स्वरूप राहणार होतें. नोंदणी नाकारल्याबद्दल भोगावे लागणारे परिणाम सोसण्याची सत्याग्रहींनीं तयारी ठेवावयाची होती.

नव्या वटहुकमान्वयें सरकारी परवाना कचेरी ता. १ जुलै १९०७ रोजीं उघडण्यांत आली. गांधीजींच्या प्रेरणेनुसार कचेरीवर शांततामय निरोधन करण्यांत आलें. बारा वर्षांच्या मुलांनीं देखील निरोधक म्हणून आपलीं नांवें नोंदविलीं इतका त्या वेळीं उत्साह ओसंडत होता. परंतु निरोधन आणि तीव्र जनमत यांना न जुमानतां सुमारें पांचशें लोकांनीं नोंदणी करून परवाने घेतले. पण सरकारला आपलें काम पुढें रेटतां येईना आणि म्हणून कार्यकर्त्यांना गिरफदार करण्याचें ठरवण्यांत आलें.

१९०७ च्या डिसेंबरमध्यें जमातींतल्या प्रमुख इसमांवर कोर्टात हजर राहून अजून त्यांनीं नोंदणी कां करून घेतली नाहीं त्याचीं कारणें दाखविण्यासंबंधीं नोटिसा निघाल्या त्या वेळीं पेचप्रसंग उत्पन्न झाला. नियमभंगाबद्दल गांधीजींसहित इतर अनेकांना निरनिराळ्या मुदतीच्या शिक्षा फर्मावण्यांत आल्या. परंतु ३० जानेवारी १९०८ रोजीं जनरल स्मट्स यांच्याकडून आश्वासन मिळालें आणि गांधीजी व जनरल स्मट्स यांच्यांत झालेल्या करारानुसार गांधीजींची मुक्तता झाली. दुसऱ्या दिवशीं इतर प्रमुख लोकांचीहि सुटका करण्यांत आली. परंतु नंतर जनरल स्मट्स यांनीं दिलेला शब्द मोडला. असें अनेक प्रसंगीं घडून येतें कीं पेचप्रसंग

नाहींसा झालेला दिसतांक्षणीं अधिकारी दिलेलीं आश्वासनें झुगारून देतात. जनरल स्मट्स यांनीं असें आश्वासन दिलें होतें कीं वटहुकूम मागें घेण्यांत येईल आणि हिंदी लोकांनीं स्वखुषीनें करून घेतलेली नोंदणी कायदेशीर मानण्यांत येईल. हिंदी लोकांनीं आपलें कर्तव्य बजावलें. अनुयायांचा गैरसमज होण्याचा धोका पत्करूनहि पुढाऱ्यांनीं नोंदणी करून घेतली. ही गोष्ट पसंत नसलेल्या मीर आलीम यांच्या तडाख्यानें गांधीजी घायाळ झाले असतांना देखील त्यांनीं ठसे दिले. परंतु जनरल स्मट्स यांनीं मात्र खिलाडू वृत्ति दाखवली नाहीं. वटहुकूम मागें घेण्यांत आला नाहीं येवढेंच नव्हे तर त्यांनीं गांधीजींच्या पत्रांना समाधानकारक उत्तरें देखील दिलीं नाहींत. उलट हिंदी लोकांच्या प्रवेशास प्रभावीपणानें बंदी करणारें आणखी एक बिल पुढें आलें व त्याच बिलाचें पुढें कायद्यांत रूपांतर झालें.

लढा पुन्हां सुरू करणें अपरिहार्य होतें. १६-९-१९०८ रोजीं जोहान्सबर्ग येथें प्रतिनिधींची एक मोठी बैठक बोलावण्यांत आली. त्या ठिकाणीं करारानुसार स्वखुषीनें घेतलेल्या परवान्यांची जंगी होळी करून दोन हजार दाखले जाळण्यांत आले.

तेथून दंड, कैद, छळणूक, अपमान, फटके येवढेंच नव्हे तर गोळीबार इत्यादि हालअपेष्टांनीं युक्त अशा दीर्घकालीन व दुर्घट लढ्यास सुरुवात झाली. त्यांत मरतीओहोटीच्या अनेक लाटा येऊन गेल्या. परंतु सत्याग्रहींचें लढा हेंच सारसर्वस्व होतें आणि अंतिम परिणामाची त्यांना तमा नव्हती. मध्यंतरीं वातावरण कंटाळवाणें झाल्यावर एकदम कांहीं तरी मडका उडे आणि पुन्हां अपयश व जिवन्तपणा निर्माण होई. १९१३ सालीं (१३-३-१९१३) हायकोर्टाच्या एका निकालानें सर्व हिंदी लग्नें स्थानिक कायद्याबरहुकूम नाहींत या कारणास्तव रद्द ठरवलीं गेलीं. हिंदी स्त्रियांवर याची चांगलीच प्रतिक्रिया झाली व त्या या लढ्यांत सामील झाल्या. फोनिक्स पार्क आश्रमांतील सोळा लोकांच्या तुकडीनें ट्रान्सवालच्या हद्दींत प्रवेश केला. त्या सर्वांस शिक्षा लागल्या. ज्यांना अटक झाली नव्हती अशा कांहीं तामीळ स्त्रिया खाणी मागांत गेल्या व त्यांनीं तेथील कामगारांना त्यांना भराव्या लागणाऱ्या तीन पौंडांच्या अन्याय्य करावरुद्ध जागृत

केलें. या सर्व आंदोलनाची परिणति अखेर २०३७ पुरुष, १२७ स्त्रिया व ५७ मुलें येवढ्यांच्या ट्रान्सवाल सरहद्दीवरील ता. ६-११-१९१३ च्या सकाळीं निघालेल्या प्रचंड मोर्चांत झाली. त्यानंतर गांधीजी, पोलक वगैरेंना पकड-ण्यांत आलें. ट्रान्सवालवर नंतर 'आक्रमण' करणाऱ्या सर्वांना गिरफदार करण्यांत येऊन खाणींत काम करावयास लावलें. मध्यंतरीं इतर खाणी-पर्यंत संपाची साथ पसरली व सत्याग्रहींना अपरिमित कष्ट सोसावे लागले.

अखेर युनिअन सरकारला परिस्थिति असह्य होऊन त्यांनीं हिंदी जमातीला सवलती देण्याच्या हेतूनें एका कमिशनच्या नेमणुकीची घोषणा केली. गांधीजी, कालेन्बाक व पोलक यांची ता. १८-१२-१९१३ रोजीं मुक्तता झाली. पुढें थोड्याच दिवसांत इतर कैद्यांनाहि सोडण्यांत आलें. जुलै १९१४ च्या अखेरीस 'इंडियन रिलीफ बिल' पास झालें. त्या-अन्वयें 'तीन पौंडांचा कर' रद्द करण्यांत आला, हिंदु व मुसलमान धर्म-विधीनें झालेलीं लग्नें कायदेशीर समजलीं गेलीं; फक्त एकपत्नीत्वच कायद्यानें मान्य करण्यांत आलें. तसेंच स्थायिकत्वाचा दाखला हा पुरेसा पुरावा समजण्यांत येऊं लागला.

हकीगत अगदीं थोडक्यांत द्यावयाची म्हटली तरी सत्याग्रहींनीं लढा चालू असतांना केलेल्या औदार्यपूर्ण कृत्यांचें वर्णन केल्याखेरीज ती संपवितां येणार नाहीं. गांधीजी म्हणतात, "प्रत्येक पाऊल टाकतांना सत्याग्रहीनें आपल्या प्रतिस्पर्ध्याची परिस्थिति विचारांत घेतली पाहिजे." अधिक ताणून धरण्याच्या दृष्टीनें शत्रूची अडचणीची परिस्थिति ही सत्या-ग्रहीची संधि कधींच होऊं शकत नाहीं. तर वस्तुस्थिति बरोबर त्याच्या उलट असली पाहिजे. आणि सत्याग्रहीनें आपल्या वाटेवेगळें जाऊनहि शत्रूला त्याच्या अडचणींत मदत केली पाहिजे. खालीं त्यासंबंधीं कांहीं उदाहरणें दिलीं आहेत.

नॉर्थ कोस्टमधील कामगार संपावर गेले त्या वेळीं कापून ठेवलेला ऊस कारखान्यांत आणून त्याचा रस काढला नसता तर मौंट एजकोंब येथील मळेवाल्यांचें अपरिमित नुकसान झालें असतें. म्हणून १२०० हिंदी कामगार केवळ तेवढें काम करण्यापुरते कामाला लागले आणि तें संपल्या-

बरोबर पुन्हां संपावर गेले.

दुसऱ्या एका प्रसंगीं डरबान म्युनिसिपालिटींतील नोकर ज्या वेळीं संपावर गेले त्या वेळीं जे म्युनिसिपालिटीच्या आरोग्यविषयक कामावर किंवा हॉस्पिटलमधील रोग्यांच्या शुश्रुषेच्या कामावर होते त्यांना शहरांत साथीचा प्रसार किंवा रोग्यांची गैरसोय होऊं नये म्हणून परत कामावर धाडण्यांत आलें.

अशा तऱ्हेच्या दिलदार वर्तनापैकीं सर्वांत संस्मरणीय उदाहरण यूनियन रेल्वेवरच्या यूरोपीय नोकराच्या वेळीं घडलें. त्या वेळीं सरकार खरोखरीच मोठ्या अडचणींत सांपडलें होतें. सरकारवर अगदीं निर्णायक असा प्रहार करण्याची हीच संधि आहे असें गांधीजींना सुचविण्यांत आलें. परंतु त्यांनीं त्याला नकार दिला. त्यांनीं असें सांगितलें कीं असें करणें सत्याग्रहधर्माला सोडून होईल. या निर्णयाची चहूंकडे फार प्रशंसा झाली. जनरल स्मट्स यांच्या चिटणिसांपैकीं एकजण गांधीजींना म्हणाला, "मला तुमचीं माणसें आवडत नाहींत आणि त्यांना मदत करण्याची मी कधींच फिकीर करीत नाहीं. पण मी तरी काय करणार ? तुम्ही आमच्या निकडीच्या वेळीं आम्हांला मदत करतां. आम्हीं तुमच्यावर हात कसा टाकावा ? मला पुष्कळ वेळीं असें वाटतें कीं तुम्ही इंग्रज संपवाल्यांप्रमाणें हिंसेचा अवलंब करावा म्हणजे तुमचा नायनाट करण्याचा मार्ग आम्हांला मोकळा होईल. पण तुम्ही तर शत्रूला देखील इजा करीत नाहीं. तुम्ही केवळ आत्म-क्लेशानें विजय मिळविण्याची इच्छा करतां आणि विनय व दाक्षिण्य याच्या आपण होऊन लादून घेतलेल्या मर्यादांचें कधींच अतिक्रमण करीत नाहीं. आणि त्यामुळेंच तर आम्ही अगदीं असहाय बनून जातों."

शत्रूवर होणाऱ्या सत्याग्रहाच्या मानसिक परिणामाचें याहून चांगलें उदाहरण सांपडणार नाहीं.

दुर्बलांचें निःसंदिग्ध हत्यार जें अनत्याचारी प्रतिकार तें व प्रत्यक्ष सत्याग्रह यांतील महत्त्वाचे फरकहि दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहानें स्पष्ट होतात.

दुर्बलांचें हत्यार म्हणून गांधीजींनीं सत्याग्रहाचा अवलंब केला नाहीं; त्यांचा दावा अशा होता कीं शारीरिक दृष्ट्या दुर्बल असलें तरी आत्मिक

बल असेल अशांचेंच तें शस्त्र होऊं शकतें. कोणत्याहि अवस्थेंत हिंसेचा विचार त्यांच्या. मनांत आला नाहीं. त्यांना त्यांच्या विरोधकांच्या अडचणींचा फायदा घ्यावयाचा नव्हता. विरोधकाबद्दल त्यांच्या मनांत अत्यंत उच्च प्रतीची कल्याणबुद्धि वसत होती आणि स्वतःच्या त्यागानें त्यांना जिंकून घेण्यावर त्यांचा कटाक्ष होता. सत्य व न्याय त्यांच्या बाजूला होते व आत्मक्लेशांनीं आपण त्यांची प्रस्थापना करूं असें तें प्रतिपादीत. शत्रूला हैराण करण्याचा विचारहि त्यांच्या मनांत कधीं आला नाहीं. पण केवळ निःशस्त्र प्रतिकारी यापेक्षां अगदीं निराळ्या प्रकारें वागला असता.

आठ वर्षें (१९०६ ते १९१४) चाललेल्या या दीर्घकालीन लढ्याचा अशा तऱ्हेनें शेवट झाला. सामाजिक अन्यायाविरुद्ध झगडण्याच्या पद्धतींत क्रांति घडवून आणून एक नवा इतिहास या लढ्यामुळें लिहिला गेला.

सत्याग्रहाची भाषा

विरमगांव येथील कस्टम खात्यांतील दंडेली हा कांहींसा स्थानिक स्वरूपाचा प्रश्न होता. ती दंडेली म्हणजे मूर्तिमंत अन्यायाचा नमुनाच होता. ती अन्याय्य प्रथा व त्याबरोबर येणाऱ्या इतर अडचणी दूर होण्यास सत्याग्रहाची नुसती भाषा मुख्यत्वें कारणीभूत झाली. १९१५ सालीं गांधीजी काठेवाडास जात असतांना वढवाण येथील भाई मोतिलाल नांवाच्या शिंपी जातींतील एका सार्वजनिक कार्यकर्त्याकडून ती त्यांनीं हकिकत ऐकली. त्यांच्या कळकळीचा गांधीजींच्या मनावर परिणाम झाला व त्यांनीं लोकांची तुरुंगांत जाण्याची तयारी आहे का असा प्रश्न केला. तत्क्षणीं 'आम्ही फांसावर चढण्यास देखील तयार आहोंत' असें त्यांना उत्तर मिळालें.

राजकोटला पोहोंचल्यावर गांधीजींनीं त्यासंबंधींची जरूर ती सर्व माहिती गोळा केली व त्या मार्गानें जाणाऱ्या रेल्वेच्या उतारूंच्या हालअपेष्टांची कहाणी समजावून घेतली. एका बाजूला लोक व दुसऱ्या बाजूला कस्टम अधिकारी आणि हिंदुस्थान सरकार असा तो झगडा होता. अर्थशून्य कस्टम पद्धत रद्द करणें हा वादाचा मुद्दा होता. प्रचार, आदरपूर्वक तक्रार सादर करणें व सत्याग्रहाच्या पार्श्वभूमीवर जनतेकडून करण्यांत आलेली

मागणी ह्या क्रमानें चळवळ करण्यांत आली. काठेवाडांतील बागस्त्रा व इतर ठिकाणीं गांधीजींनीं केलेल्या भाषणांतून लोकांनीं सत्याग्रहासाठीं तयार रहावें अशा स्पष्ट सूचना दिल्या. शेवटीं त्या वेळचे व्हॉईसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांच्याबरोबर गांधीजींचें बोलणें झालें. त्यांनीं तो प्रकार बंद करण्याचें आश्वासन दिलें व आपला शब्द खरा केला.

या ठिकाणीं कोणत्याहि स्वरूपाचा प्रत्यक्ष सत्याग्रह झाला नाहीं किंवा त्यासाठीं कोणत्या प्रकारची तयारीहि केली गेली नाहीं. गांधीजींनीं आपल्या भाषणांतून त्याचा निःसंदिग्धपणें फक्त उल्लेख केला होता. असें म्हणतां येईल कीं ही न लढतांच त्यागाशिवाय जिंकलेली लढाई होय.

यासंबंधीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं मुंबई सरकारच्या चिटणिसांची गांधीजींशीं खडाजंगी उडाली. त्या वेळीं लॉर्ड विलिंग्डन हे मुंबईचे गव्हर्नर होते. गांधीजींनीं आपल्या भाषणांत सत्याग्रहाचा उल्लेख केला याचा सेक्रेटरीसाहेबांना राग आला. त्यांनीं त्याचा अर्थ धमकी असा केला. गांधीजींनीं अत्यंत नम्रपणें कळवलें कीं धमकीचा मुळीं सवालच निर्माण होत नाहीं. त्यानंतर सेक्रेटरीसाहेबांनीं गांधीजींना ताकीद दिली कीं अशा प्रकारचा कोठलाहि विरोध दडपून टाकण्यास सरकार समर्थ आहे. अत्यत सौम्यपणें पण तितक्याच खंबीरपणें दिलेल्या उत्तरांत गांधीजी म्हणतात, "ब्रिटिश सरकार शक्तिमान् आहे याबद्दल मला शंका नाहीं पण सत्याग्रहाचा उपाय सर्वश्रेष्ठ आहे याबद्दलहि माझी तितकीच खात्री आहे."

सत्याग्रहाची तयारी

आणखी एका उदाहरणामध्यें केवळ सत्याग्रहाची तयारी ठेवल्यामुळें यश पदरांत पडलें. त्याचबरोबर जनतेंत चळवळहि खूप झाली. मॉरिशस, ब्रिटिश गिनिया, त्रिनिदाद, जमेका, ग्रेनडा यांसारख्या दूरदूरच्या वसाहतीच्या देशांत हिंदी मजुरांची रवानगी होऊन त्यांना जवळ जवळ रानटी गुलामांप्रमाणें तेथें मिळणाऱ्या वर्तणुकीस मुदतबंदीचे कामगार असें नांव देण्यांत येई. सर डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर नांवाच्या इतिहासकारानें जवळ जवळ गुलामगिरी असें या पद्धतीचें वर्णन केलें आहे.

१८६१ पासूनच या पद्धतीस सुरवात झाली होती. ती बंद करण्यांत यावी अशी मागणी आतां केली जात होती. आणि मुंबईस भरलेल्या प्रचंड सभेंत ही दुष्ट पद्धत बंद करण्याची शेवटची मुदत म्हणून ३१-५-१९१७ ही तारीख ठरविण्यांत आली. स्त्रियांचें एक शिष्टमंडळ देखील व्हॉईसरॉयना भेटलें. कामगारांना घेऊन जाणाऱ्या जहाजावर निरोधन करण्याची गांधीजींनीं तयारी केली. विरमगांव येथील कस्टमपेक्षां हा प्रश्न केव्हांहि अधिक महत्त्वाचा होता. अखेर ही पद्धत बंद करण्यांत आली आणि गोऱ्या मांडवलदारांसाठीं होणारी हिंदी लोकांची पिळवणूक व त्यांना असहायपणें सोसावी लागणारी मानखंडना एकदांची थांबली.

चंपारण

हिंदुस्तानांतील सत्याग्रहाच्या इतिहासांत चंपारण हें नांव कायमचें रूढ झालें आहे. गांधीजींनीं या प्रसंगीं पहिल्यांदांच अधिकाऱ्यांचा आज्ञाभंग केला व सांगितलें कीं स्वतःच्या देशांत तरी असले वाटेल ते हुकूम आपण लादूं देणार नाहीं. त्यांच्या लढ्याच्या अभिनव पद्धतीची ती सुरवात होती. त्या वेळीं त्यांनीं कोर्टांत दिलेली कैफियत आजहि योग्य ठरत असून पुढें देखील ती स्फूर्तिदायक म्हणून चिरस्थायी होईल. गांधीजी म्हणतात, "तो दिवस साऱ्या आयुष्यांत मी कधींहि विसरणार नाहीं. माझ्या आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीनें तो सुवर्णदिन होय." हिंदुस्थाननें गिरवलेला सविनय कायदेभंगाचा तो पहिला प्रत्यक्ष पाठ होता.

१९१६ सालच्या लखनौ कॉंग्रेसला गांधीजी गेले होते. तेथें बिहार-मधील किशोरबाबू नांवाच्या एका गृहस्थानें त्यांना चंपारण्याला भेट देऊन तेथील शेतकऱ्यांचीं फार वर्षांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याची विनंति केली. पुढें केव्हां तरी येईन असें आश्वासन गांधीजींनीं दिलें. एप्रिल १९१७ मध्यें ते कलकत्त्याहून बिहारमध्यें गेले. ज्या देशावर महान् जनक राजाचें राज्य चालत होतें असें मानलें जातें त्यांत चंपारण्याचा समावेश होतो. आज तो बिहारच्या वायव्य कोपऱ्यांतील एक जिल्हा आहे. जवळ जवळ एक शतकपर्यंत निळीच्या युरोपियन मळेवाल्यांकडून तेथील साध्या-भोळ्या शेतकऱ्यांची पिळवणूक व गांजणूक होत होती. तेथील मळे-

वाल्यांची कायद्यानें व रूढीनें एक प्रकारची असामान्य सरकारी सत्ता प्रस्थापित झाली होती. त्यांतून ते मळेवाले पडले राज्यकर्त्यांचे जातभाई. स्थानिक पुढाऱ्यांनीं सर्व कायदेशीर इलाज करून पाहिले परंतु अधिकारी व सरकार दोघेहि मळेवाल्यांचे पक्षपाती असल्यामुळें कोणताच उपाय चालेना. बंगाल टेनन्सी ॲक्ट आणि शेतकऱ्यांना सहज पिळून काढतां येईल अशा अनेक कायदेकानूंचा मळेवाल्यांनीं आश्रय घेतला होता. आणि कित्येक बेकायदेशीर करांचे बाबतींत कायद्यानें दगा दिला तर ते रूढी व वहिवाट यांचा आसरा घेत. आणि या दोहोंचाहि उपयोग न झाल्यास ते सरळ पाशवी शक्तीचा अवलंब करीत. स्वतःच्या ईस्टेटीवरील त्यांचें वर्तन थेट एखाद्या निरंकुश सत्ताधीशाप्रमाणें असे.

मुख्य आणि ताबडतोबीचें आर्थिक गाऱ्हाणें 'तिनकठिया' करारामुळें निर्माण झालें. 'तिनकठिया' म्हणजे विसांपैकीं तीन काठ्या. याचाच अर्थ असा कीं जमिनीच्या प्रत्येक बिघ्याचा तीनविसाश. प्रत्येक शेतकऱ्यावर त्याच्या जमिनीपैकीं तीनविसांश जागेंत निळीची लागवड करण्याची सक्ती होती. मग तें त्याला परवडो किंवा न परवडो. कांहीं वेळेला ही मर्यादा $\frac{५}{२०}$ इतकीहि असे. बेंगॉल टेनन्सी कायद्यान्वयें मळेवाल्यांचा हा हक्क मान्य करण्यांत आला होता. नंतर ज्या वेळीं बाजारांत कृत्रिम नीळ येऊं लागली त्या वेळीं मळेवाल्यांना असें आढळून आलें कीं निळीच्या धंद्यांत कांहीं फायदा सुटत नाहीं. तेव्हां कुळांबरोबर जर ते अधिक खंड देण्यास तयार असतील तर निळीच्या लागवडींतून त्यांस मुक्त करण्याचे नवे करार मळेवाले करूं लागले. या बाबतींतहि टेनन्सी कायद्यांतील कांहीं कलमांचा फायदा त्यांना मिळाला. अशा तऱ्हेनें निळीच्या व्यापारांत मळेवाल्यांना सोसावें लागणारें सर्व नुकसान शेतकऱ्यांच्या डोक्यांवर लादलें गेलें. ज्या ठिकाणीं मळेवाल्यांकडे कायम मक्त्याच्या जमिनी होत्या त्या ठिकाणीं त्यांचें वर्तन हें असें होतें परंतु खेड्यांतून ज्या ठिकाणीं त्यांचे छोट्या मुदतीचे मक्ते होते आणि खंडामधील वाढीचा फायदा मक्तेबंदीची मुदत संपल्यानंतर वरच्या किंवा कायम मालकाला मिळण्यासारखा होता त्या ठिकाणीं मळेवाल्यांनीं कुळांना

'तीनकाठी' करारांतून मुक्त करण्यासाठीं रोखीनें वसूल घेण्याची पद्धत अंगीकारिली. मात्र तात्पुरत्या मक्त्यांच्या बाबतींत अशा खेड्यांतून त्या करारांला कायद्याचा वस्तुतः आधार नव्हता. अशा तऱ्हेनें त्यांनीं सुमारें बारा लाख रुपये वसूल केले असें म्हणतात.

मळेवाल्यांचें सरकारदरबारीं इतकें जबरदस्त वजन होतें कीं आपल्या जीविताला किंवा मालमत्तेला धोका पोहोंचेल या भीतीनें खंडकरी सरकारी अधिकाऱ्यांपर्यंत जाण्याचें धाडसच करीत नसत. उच्चवर्गीयांची देखील मारपीट एवढेंच नव्हे तर तात्पुरत्या तुरुंगांत त्यांना डांबणें, गुरेंढोरें कोंडवाड्यांत घालणें आणि घरादारांची लूट करणें, चांभार, धोबी, न्हावी वगैरे बंद करणें, फार काय स्वतःच्या घरांतून बाहेर पडण्यास मनाई करणें आणि त्यांचे दाराशीं बसवण्यासाठीं अस्पृश्य जमा करणें, या व असल्या हजारों मार्गांनीं होणारी छळवणूक हा नित्याचा प्रकार होता. निरनिराळ्या प्रसंगीं अनेक बेकायदेशीर पट्ट्याहि मळेवाले वसूल करीत. लग्नावर, प्रत्येक घरावर व तेलाच्या घाणीवर पट्टी असे. 'साहेब मजकूर' थंड हवेच्या ठिकाणीं निघाले म्हणजे 'पपाऱ्ही' नांवाचा एक खास कर प्रत्येक कुळाला द्यावा लागे. त्यांना घोडा, हत्ती किंवा मोटारगाडी हवी असली तरी कुळांनाच जादा कर द्यावा लागे. याव्यतिरिक्त कोठल्याहि साहेबाविरुद्ध एखादा गुन्हा घडल्यास जबर कर लादले जात.

या गाऱ्हाण्यांचें निवारण आणि त्यांचेवर होणाऱ्या अन्यायांचें संपूर्ण परिमार्जन व्हावें म्हणून बिचारे खंडकरी मोठया आशेनें डोळे लावून बसले होते.

वजनदार सार्वजनिक व्यक्तींनीं केलेल्या स्थानिक प्रयत्नांचा काडीइतका देखील उपयोग झाला नव्हता. पाषाणहृदयी मळेवाल्यांकडून कायदेशीर, सामाजिक किंवा नैतिक कसलीच सूट मिळण्यासारखी नव्हती अशा परिस्थितींत गांधीजींना चंपारण्यास येण्याचें निमंत्रण देण्यांत आलें.

ता. १७ एप्रिल १९१७ रोजीं ते मोतिहारी या जिल्ह्याच्या गांवीं पोहोंचले. त्यांनीं केलेली चौकशी हा सत्याग्रह पद्धतींतील एक नमुनेदार धडा आहे. तेथें पोहोंचल्याबरोबर ते सरळ अधिकाऱ्यांच्याकडे गेले व

काय करण्याचा त्यांचा इरादा आहे तें त्यांनीं अधिकाऱ्यांना सांगितलें. मळेवाल्यांच्या संघाच्या चिटणीसाचीहि त्यांनीं मुलाखत घेतली. त्या दोघांचेंहि वर्तन अर्थातच सहानुभूतिशून्य असेंच होतें. तथापि गांधीजींच्या निर्भीच्या शिरस्त्याप्रमाणें त्यांना प्रत्यक्ष त्या ठिकाणीं राहून त्या अन्यायाचें सूक्ष्म अवलोकन करावयाचें होतें. खेडुतांच्या तक्रारी, त्यांच्यावर होणारा अन्याय आणि मळेवाल्यांवर करण्यांत येणारे आरोप यांच्या सत्यतेविषयीं गांधीजींना स्वतःची खात्री करून द्यावयाची होती. तेवढ्यासाठीं ते एका खेड्याला निघाले असतांना त्यांच्यावर क्रि० प्रो० को० च्या १४४ कलमान्वयें जिल्हा सोडून जाण्याची नोटीस बजावण्यांत आली.

'स्वतःच्या देशांत माझ्यावर असला हुकूम बजावणारा हा मॅजिस्ट्रेट कोण!' असा प्रश्न गांधीजींनीं स्वतःला विचारला आणि त्या हुकमाची यत्किंचितहि पर्वा न करतां पुढें जाण्याचें ठरवलें. परंतु ते शांत व संयमी होते. त्यांनीं अत्यंत विनम्रभावानें मॅजिस्ट्रेटला आपला विचार कळवला. परिस्थिति समजावून घेण्यासाठीं आपण आलों आहों व गरीब शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करण्याचा आपला मानस असून तें काम पूर्ण झाल्याशिवाय जिल्हा सोडून जाण्याचा आपला इरादा नाहीं असें त्यांनीं मॅजिस्ट्रेटला कळवलें. त्यांना कोर्टांत खेचण्यांत आलें असतांना आज्ञाभंगाचा गुन्हा आपण केला असल्याची कैफियत त्यांनीं सादर केली. ते म्हणाले कीं आपण श्रेष्ठतर अशा आंतरिक आज्ञेनुसार वागत आहों. त्यांच्या खटल्याचा निकाल कधींच सांगण्यांत आला नाहीं कारण कालांतरानें त्यांच्यावरील खटला काढून घेण्यांत आला.

त्यानंतर त्यांना चौकशीचें काम पुढें चालवूं दिलें. कित्येकदां जाबजबाब घेण्याच्या वेळीं सी. आय्. डी. अधिकारीहि तेथें हजर रहात. वीस हजार जबाब घेण्यांत येऊन त्या आधारावर प्रकरण उभारण्यांत आलें. शेतकऱ्यांच्या मागण्या तयार करण्यांत आल्या. नंतर त्या प्रांताच्या गव्हर्नरनें त्या सर्व प्रकरणांत लक्ष घालून सरकारतर्फे एक चौकशी कमिटी नेमली व त्यांत शेतकऱ्यांचे प्रतिनिधि म्हणून गांधीजींचा समावेश केला. तिनकठिया करार व बेकायदेशीर करपट्ट्या रद्द कराव्यात व खंडकऱ्यां-

कडून वसूल करण्यांत आलेल्या रकमांपैकीं कांहीं माग त्यांस परत मिळावा असा चौकशी कमिटीनें एकमतानें निर्णय दिला.

चौकशीच्या सुरवातीला मळेवाले उघड उघड विरोधी होते व सरकारचा त्यांस पाठिंबा होता. परंतु गांधीजींनीं मॅजिस्ट्रेटचा हुकूमभंग करण्याची दाखविलेली तयारी आणि स्वतःच्या मार्गानें जाण्याचा त्यांनीं धरलेला आग्रह याचें मळेवाल्यांना फार आश्चर्य वाटलें व त्यांचा बराच गोंधळ उडून गेला. शेतकऱ्यांना सत्याग्रहाचा अवलंब करण्याचा प्रसंगच आला नाहीं.

एकट्या गांधीजींचा सत्याग्रह तेथील विषमतेविरुद्ध हिंदुस्तानचें जनमत जागृत करण्यास व प्रांतिक सरकारचे डोळे उघडण्यास पुरेसा झाला. शेतकऱ्यांनीं देखील संयम दाखवला. पुरावा देण्यासाठीं धैर्यानें ते पुढें आले. आणि मुख्य म्हणजे गांधीजी नेतील तिकडे जाण्याची मानसिक तयारी त्यांनीं दाखवली.

पहिली गोष्ट म्हणजे गांधीजींनीं मागण्या तरी अशा काय केल्या होत्या? त्यांनीं चंपारण्यांतील आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करण्याच्या साध्या हक्काचा आग्रह धरला होता. सरकारला हा अगदीं साधा हक्क दडपूनहि टाकतां येईना आणि एकदां चौकशी सुरू झाल्यानंतर तिकडे दुर्लक्षहि करतां येईना. सरकारला गाऱ्हाण्यांची जाणीव कितीतरी आधींपासून होतीच परंतु मळेवाल्यांना मिळणाऱ्या आर्थिक नफ्याबद्दल त्यांना ममत्व वाटत असल्यामुळें त्यांनीं तो प्रकार तसाच चालूं दिला होता. गांधीजींनीं दिलेली भेट आणि बेधडकपणें केलेली चौकशी यांमुळें सरकारी शैथिल्याच्या चिंधड्या उडाल्या.

या प्रकरणीं गांधीजींनीं कशा तऱ्हेनें वर्तन केलें तें लक्षांत ठेवलें पाहिजे. सुरवातीपासून त्यांनीं अत्यंत सावधगिरी बाळगली. प्रथम तेथें जाण्यास त्यांनीं एकाएकीं संमति दिली नाहीं परंतु एकदां जाण्याचें निश्चित केल्यानंतर मग मागेंपुढें पाहिलें नाहीं. आणि सुरवातीपासूनच त्यांनीं स्वतःच्या स्वातंत्र्यावर गदा आली तर त्यास तोंड देण्याची तयारी ठेवली. ज्या वेळीं कांहीं लोकांनीं मळेवाल्यांवर कायदेशीर इलाज

करण्याची सूचना केली. त्या वेळीं कोर्टाकडे धाव घेऊन या परिस्थितींत कांहींहि निष्पन्न होणार नाहीं असें म्हणून त्यांनीं ती सूचना ताबडतोब अमान्य केली. मळेवाल्यांपासून दूर राहण्याऐवजीं ते सरळ मळेवाल्यांच्या संघाच्या चिटणिसालाच भेटले व त्याला आपल्या उद्देशाची त्यांनीं माहिती करून दिली. नम्रतापूर्वक मॅजिस्ट्रेटचा हुकूम झुगारून ते जणूं कांहीं झालेंच नाहीं अशा भावनेनें त्यांनीं आपलें काम सुरू ठेवलें. ज्या वेळीं त्यांना परिस्थितीची जाणीव झाली व आपल्याला बराच काल त्या कामासाठीं द्यावा लागणार असें समजून चुकलें त्या वेळीं त्यांनीं त्या भागांत सुमारें सहा प्राथमिक शाळा सुरू करविल्या व वैद्यकीय मदत मिळण्याची व्यवस्था केली. लोकांना अधिक चांगल्या तऱ्हेनें व आरोग्यपूर्ण जीवन घालविण्याची शिकवण त्यांना द्यावयाची होती. स्थानिक शिक्षक आणि वैद्य न मिळाल्यानें ते बाहेरून आणवून त्यांनीं विधायक कार्याचा व निरपेक्ष ग्रामसेवेचा पाया घातला. परंतु त्यांनीं डॉक्टर व शिक्षक यांना आर्थिक किंवा राजकीय प्रश्नांत लक्ष न घालण्याविषयीं बजावलें. शिक्षकांच्या बौद्धिक दर्जापेक्षां त्यांच्या नैतिक मूल्यांना त्यांनीं महत्त्व दिलें. उदाहरणार्थ त्यांनीं कस्तुरबांची एक स्त्रीशिक्षक म्हणून भरती केली. ज्या वेळीं कस्तुरबांनीं मला शिकवितां येणार नाहीं म्हणून सांगितलें त्या वेळीं लेखन, वाचन किंवा गणित यांऐवजीं स्वच्छता व चांगली चालरीत शिकविण्याचा गांधीजींनीं त्यांच्याजवळ आग्रह धरला. त्यांच्या मतें लेखन, वाचन किंवा गणित हे सर्वांत महत्त्वाचे विषय नव्हते. त्यांची खात्री होऊन चुकली होती कीं ग्रामशिक्षणाखेरीज कायम स्वरूपाचें कार्य होणें अशक्य आहे.

खेडा सत्याग्रह

विरमगांव कस्टम आणि मुदतबंदी मजूर यांच्या बाबतींत नुसतें सत्याग्रहाच्या मापेनें काम भागलें आणि चंपारण्याच्या बाबतींत फक्त एका गांधीनाच सविनय कायदेभंग करावा लागला. पण खेडा जिल्ह्यांत अनेकांना हालअपेष्टा व त्रास सहन करावा लागला. १९१८ सालच्या सुरुवातीस गुजराथ प्रांतांतील खेडा किंवा कैरा जिल्ह्याला सत्याग्रहभूमीचें स्वरूप

प्राप्त झालें. त्या ठिकाणीं करबंदी हें सत्याग्रहाचें स्वरूप होतें. पीक न आल्यामुळें जिल्ह्यांत जवळ जवळ दुष्काळाची परिस्थिति निर्माण झाली आणि शेतकऱ्यांना सारा भरणें अशक्य झालें. त्यांनीं कायद्यानुसार तहकुबी मिळावी अशी विनंति केली. परंतु सरकारनें त्याचा विचार करण्याचें नाकारलें.

लँड रेव्हेन्यू कोडांत असें म्हटलें आहे कीं "आणेवारीप्रमाणें पीक ज्या वेळीं रुपायांत चार आण्यांखालीं असेल त्या वेळीं सरकारनें त्या वर्षाचा सारा तहकूब करावा." परंतु हिंदुस्तानांतील नेहमीच्या रिवाजाप्रमाणें सरकारनें पिकें चार आण्यांपेक्षां जास्त आलीं आहेत आणि शेतकऱ्यांनीं सारा भरला पाहिजे असा हेका धरला. कांहीं काळ हा झगडा चालू होता. अर्ज-विनंत्या आणि प्रांतिक कौन्सिलांतील ठराव यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

त्यानंतर गांधीजींनीं त्यांत लक्ष घातलें. त्यांनीं सर्व प्रकरणाचा अभ्यास करून लोकांना सारा भरण्याचें तहकूब करण्याचा सल्ला दिला. लोकांनीं अशी शपथ घेतली कीं आम्ही गैरवाजवी कर भरण्यापेक्षां स्वतःच्या जमिनी देखील गमावूं. ज्यांना कर भरणें शक्य होतें अशा धनिक शेतकऱ्यांनीं एक वर्षपर्यंत सारातहकुबी मिळण्याचा हक्क असूनहि ज्यांना सारा भरतां येणें शक्य नाहीं अशा गरीब रयतांवर कर भरण्याची सक्ति होत असल्यामुळें आम्ही कर भरणार नाहीं अशी शपथ घेतली.

गांधीजींनीं जनता व सरकार या दोघांच्याहिपुढें न्याय्य बाजू मांडली. त्यांनीं जिल्ह्यांत प्रचारकार्य करण्यासाठीं स्वयंसेवक आणवले आणि त्या योगानें शेतकऱ्यांचें नैतिक धैर्य कायम राखलें. त्या वेळचे अहमदाबाद येथील उदयोन्मुख बॅरिस्टर श्री. वल्लभभाई पटेल त्यांना येऊन मिळाले. नंतर खेडा येथील शेतकऱ्यांच्या शिक्षणास सुरवात झाली. त्यांना अशी शिकवण देण्यांत आली कीं अधिकारी हे मालक नसून वस्तुतः त्यांचे नोकर आहेत; म्हणून सर्व भीति सोडून त्यांच्यासमोर ताठ उभें राहिलें पाहिजे आणि जुलूमजबरदस्तीच्या धमकावणीचा प्रतिकार

काय करण्याचा त्यांचा इरादा आहे तें त्यांनीं अधिकाऱ्यांना सांगितलें. मळेवाल्यांच्या संघाच्या चिटणीसाचीहि त्यांनीं मुलाखत घेतली. त्या दोघांचेंहि वर्तन अर्थातच सहानुभूतिशून्य असेंच होतें. तथापि गांधीजींच्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें त्यांना प्रत्यक्ष त्या ठिकाणीं राहून त्या अन्यायाचें सूक्ष्म अवलोकन करावयाचें होतें. खेडुतांच्या तक्रारी, त्यांच्यावर होणारा अन्याय आणि मळेवाल्यांवर करण्यांत येणारे आरोप यांच्या सत्यतेविषयीं गांधीजींना स्वतःची खात्री करून घ्यावयाची होती. तेवढ्यासाठीं ते एका खेड्याला निघाले असतांना त्यांच्यावर क्रि० प्रो० को० च्या १४४ कलमान्वयें जिल्हा सोडून जाण्याची नोटीस बजावण्यांत आली.

'स्वतःच्या देशांत माझ्यावर असला हुकूम बजावणारा हा मॅजिस्ट्रेट कोण!' असा प्रश्न गांधीजींनीं स्वतःला विचारला आणि त्या हुकमाची यत्किंचितहि पर्वा न करतां पुढें जाण्याचें ठरवलें. परंतु ते शांत व संयमी होते. त्यांनीं अत्यंत विनम्रभावानें मॅजिस्ट्रेटला आपला विचार कळवला. परिस्थिति समजावून घेण्यासाठीं आपण आलों आहों व गरीब शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करण्याचा आपला मानस असून तें काम पूर्ण झाल्याशिवाय जिल्हा सोडून जाण्याचा आपला इरादा नाहीं असें त्यांनीं मॅजिस्ट्रेटला कळवलें. त्यांना कोर्टांत खेचण्यांत आलें असतांना आज्ञाभंगाचा गुन्हा आपण केला असल्याची कैफियत त्यांनीं सादर केली. ते म्हणाले कीं आपण श्रेष्ठतर अशा आंतरिक आज्ञेनुसार वागत आहों. त्यांच्या खटल्याचा निकाल कधींच सांगण्यांत आला नाहीं कारण कालांतरानें त्यांच्यावरील खटला काढून घेण्यांत आला.

त्यानंतर त्यांना चौकशीचें काम पुढें चालवूं दिलें. कित्येकदां जाबजबाब घेण्याच्या वेळीं सी. आय्. डी. अधिकारीहि तेथें हजर रहात. वीस हजार जबाब घेण्यांत येऊन त्या आधारावर प्रकरण उभारण्यांत आलें. शेतकऱ्यांच्या मागण्या तयार करण्यांत आल्या. नंतर त्या प्रांताच्या गव्हर्नरनें त्या सर्व प्रकरणांत लक्ष घालून सरकारतर्फे एक चौकशी कमिटी नेमली व त्यांत शेतकऱ्यांचे प्रतिनिधि म्हणून गांधीजींचा समावेश केला. तिनकठिया करार व बेकायदेशीर करपट्टया रद्द कराव्यात व खंडकऱ्यां-

कडून वसूल करण्यांत आलेल्या रकमांपैकीं कांहीं माग त्यांस परत मिळावा असा चौकशी कमिटीनें एकमतानें निर्णय दिला.

चौकशीच्या सुरवातीला मळेवाले उघड उघड विरोधी होते व सरकारचा त्यांस पाठिंबा होता. परंतु गांधीजींनीं मॅजिस्ट्रेटचा हुकूमभंग करण्याची दाखविलेली तयारी आणि स्वतःच्या मार्गानें जाण्याचा त्यांनीं धरलेला आग्रह याचें मळेवाल्यांना फार आश्चर्य वाटलें व त्यांचा बराच गोंधळ उडून गेला. शेतकऱ्यांना सत्याग्रहाचा अवलंब करण्याचा प्रसंगच आला नाहीं.

एकट्या गांधीजींचा सत्याग्रह तेथील विषमतेविरुद्ध हिंदुस्तानचें जनमत जागृत करण्यास व प्रांतिक सरकारचे डोळे उघडण्यास पुरेसा झाला. शेतकऱ्यांनीं देखील संयम दाखवला. पुरावा देण्यासाठीं धैर्यानें ते पुढें आले. आणि मुख्य म्हणजे गांधीजी नेतील तिकडे जाण्याची मानसिक तयारी त्यांनीं दाखवली.

पहिली गोष्ट म्हणजे गांधीजींनीं मागण्या तरी अशा काय केल्या होत्या? त्यांनीं चंपारण्यांतील आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करण्याच्या साध्या हक्काचा आग्रह धरला होता. सरकारला हा अगदीं साधा हक्क दडपूनहि टाकतां येईना आणि एकदां चौकशी सुरू झाल्यानंतर तिकडे दुर्लक्षहि करतां येईना. सरकारला गाऱ्हाण्यांची जाणीव कितीतरी आधींपासून होतीच परंतु मळेवाल्यांना मिळणाऱ्या आर्थिक नफ्याबद्दल त्यांना ममत्व वाटत असल्यामुळें त्यांनीं तो प्रकार तसाच चालूं दिला होता. गांधीजींनीं दिलेली भेट आणि बेधडकपणें केलेली चौकशी यांमुळें सरकारी शैथिल्याच्या चिंधड्या उडाल्या.

या प्रकरणीं गांधीजींनीं कशा तऱ्हेनें वर्तन केलें तें लक्षांत ठेवलें पाहिजे. सुरवातीपासून त्यांनीं अत्यंत सावधगिरी बाळगली. प्रथम तेथें जाण्यास त्यांनीं एकाएकीं संमति दिलीं नाहीं परंतु एकदां जाण्याचें निश्चित केल्यानंतर मग मागेंपुढें पाहिलें नाहीं. आणि सुरवातीपासूनच त्यांनीं स्वतःच्या स्वातंत्र्यावर गदा आली तर त्यास तोंड देण्याची तयारी ठेवली. ज्या वेळीं कांहीं लोकांनीं मळेवाल्यांवर कायदेशीर इलाज

केला पाहिजे. मात्र कोणीं कितीहि चिथावलें तरी त्यांनीं आपली शांति कधींहि ढळूं देतां कामा नये. त्यांच्या जमिनी दंडादाखल सरकारजमा करण्याबाबतच्या नोटिसा किंवा जप्तीहुकूम त्यांच्यावर बजावण्यांत आले असतांना त्यास शांतपणें तोंड देण्याची शिकवण देण्यांत आली. शेतकऱ्यांनीं धैर्य अंगीं बाणवून पुढाऱ्यांच्या सूचनांप्रमाणें वागण्याचें ठरवलें. अनेक जप्त्या आल्या आणि जमिनी सरकारजमा करण्यासंबंधींच्या नोटिसाहि काढण्यांत आल्या. पण शेतकऱ्यांनीं त्यांचें हंसतमुखानें स्वागत केलें.

त्यानंतर त्या ठिकाणीं सविनय कायदेभंगाचा प्रसंग आला. सरकारनें कांद्याची लागवड केलेलें एक शेत ताब्यांत घेतलें. कायदेशीर दृष्ट्या ताबेकबजांत चूक होती म्हणून गांधीजींनीं मोहनलाल पंड्या आणि त्यांच्या सात-आठ अनुयायांना शेतांत जाऊन सरळ कापणी करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें त्यांनीं तसें केलें आणि त्यांना अटक होऊन शिक्षा ठोठावण्यांत आल्या. यामुळें लोकांचें नीतिधैर्य अधिकच वाढलें आणि तुरुंगाची सारी भीति नाहींशी झाली.

ज्या वेळीं सरकारनें लोक ऐकत नाहींत असें पाहिलें त्या वेळीं कोठल्याहि प्रकारची घोषणा किंवा शेतकऱ्यांशीं अगर त्यांच्या प्रतिनिधींशीं कसलीहि वाटाघाट न करतां मरामर माघार घेण्यास सुरवात केली. ज्यांना कर देणें शक्य नव्हतें त्यांच्यामागें वसुलाकरतां निकड लावायाचें थांबवलें. जप्त्या आणि नोटिसा बंद झाल्या. अशा तऱ्हेनें कर भरणें शक्य नसलेल्यांना तहकुबी मिळावी हें लोकांचें म्हणणें सरकारनें कृतीनें मान्य केलें. पण लोकांचा हा हक्क स्पष्ट शब्दांत मान्य केला गेला नाहीं. त्यामुळें उशिरां व कुरकुरत मान्य केलेल्या लोकांच्या हक्काचा फायदा फारच थोड्यांना मिळाला. तत्त्वतः सत्याग्रह यशस्वी झाला परंतु संपूर्ण विजयाच्या दृष्टीनें त्यांत मोठ्या उणिवा राहिल्या. सरकारनें अयोग्य वर्तन केलें. लोकांना विजय मिळूनहि फारसा उत्साह वाढला नाहीं किंवा त्याचें पुरेसें मापहि त्यांच्या पदरांत पडलें नाहीं. या सत्याग्रहासंबंधीं गांधीजींनीं म्हटलें आहे कीं ज्या वेळीं "सत्याग्रहीनें सुरवातीपेक्षां लढ्यांच्या अखेरीला अधिक ताकद व उत्साह संपादन केला तरच सत्याग्रहाचें

सार्थक झालें असें म्हणतां येईल.” त्यांना असें आढळून आलें कीं लोक निराश व विमनस्क झाले आहेत आणि अधिकाऱ्यांबरोबरचें त्यांचें वर्तन पुरेसें विनयशील नाही. शिवाय सारा वसूल करण्याबाबत पक्षपात करून लोकांच्यांत फाटाफूट करण्यांत सरकार यशस्वी झालें होतें. सत्याग्रहींची दखलहि न घेऊन त्यांचे प्रयत्न अगदीं निष्फळ करणें चालूच होतें.

परंतु याचे जे अप्रत्यक्ष परिणाम घडून आले ते महत्त्वपूर्ण होते. गुजरात प्रांतांतील सबंध शेतकरीवर्गांत प्रचंड जागृति झाली व त्यामुळें सबंध शेतकरीजीवनावर फार मोठा परिणाम झाला. ते स्वावलंबनाचा धडा शिकले व त्यांच्यांत आत्मविश्वास निर्माण झाला. आपल्याला कांहीं हक्क आहेत आणि सामुदायिक प्रयत्नांनीं ते आपण मिळवूं शकतों याची त्यांना प्रथमच जाणीव झाली.

आपल्या आत्मचरित्रांत गांधीजींनीं या मोहिमेसंबंधीं पुढील उद्‌गार काढले आहेत– “आपलें दास्यविमोचन आपल्या स्वतःवरच आणि कष्ट व त्याग सहन करण्याच्या आपल्या शक्तीवरच अवलंबून आहे ही गोष्ट जनमतावर पक्की कोरली गेली– खेडा चळवळीनें सत्याग्रहाचीं पाळेंमुळें गुजरातेंत खोल रुजलीं गेलीं.”

चळवळीनंतर रयतेला सत्याग्रहाचें शिक्षण देण्यासाठीं स्वयंसेवक तयार करणें अवश्य असल्याची जाणीव गांधीजींना झाली; परंतु त्यांना असें आढळून आलें कीं सत्याग्रहाची विधायक बाजू किंवा शांततामय अंग याचें लोकांना अजून आकर्षण वाटत नाहीं. त्या तऱ्हेचें काम करण्यासाठीं त्यांना ताबडतोब पुरेशीं माणसें मिळालीं नाहींत. चंपारण्यांतदेखील त्यांच्या मुक्कामांत त्यांनीं सुरू केलेलें विधायक कार्य पुढें चालविण्याची त्यांची तीव्र मनीषा होती परंतु कार्यकर्त्यांची उणीव व त्यांचीं इतर कामें त्या वेळीं आड आलीं.

हिंदुस्थानांतील सामान्य जनतेला सत्याग्रहप्रणालीनुसार त्याग व कष्ट सहन करण्यासाठीं आवाहन करण्याचा आणि त्यांना तें शिक्षण देण्याचा गांधीजींनीं खेडा जिल्ह्यांतील मोहिमेचे वेळीं प्रथम प्रयोग केला आणि लोकांनीं त्यांत चांगलेंच यश मिळवलें.

कामगारांचा सत्याग्रह

गांधीजी खेडा जिल्ह्यांतील प्रश्नांत गुंतले असतांनाच अहमदाबादच्या कापड गिरण्यांचे मालक व कामगार यांच्यामधील भांडणास सुरवात झाली. १९१८ च्या फेब्रुवारीच्या सुरवातीला श्री० अंबालाल साराभाई गिरणीमालकांच्या वतीनें गांधीजींच्याकडे गेले तर त्यांच्या भगिनी अनसूयाबेन यांनीं कामगारांच्या वतीनें त्यांची भेट घेतली. सत्याग्रहीकडे बहुधा संधि आपोआप चालून येते असा गांधीजींचा विश्वास आहे. कार्यक्षम अनत्याचार आणि अन्याय परस्परविरोधी असल्यामुळें गांधीजी कोणत्याहि अन्यायाकडे दुर्लक्ष करून स्वस्थ बसूं शकत नाहींत. या प्रकरणीं गांधीजींचा कार्यक्षम अनत्याचार म्हणजेच अहमदाबादचा कामगारांच्या गाऱ्हाण्यांबद्दलचें त्यांचें प्रेम इतकें गाढ होतें कीं त्यासाठीं त्यांनीं स्वतःचे प्राण देखील धोक्यांत घातले. सुमारें पंधरा दिवसांच्या झगड्यानंतर त्यांनीं उपवासास सुरवात केली आणि अशा तऱ्हेनें कामगारांचें नीतिधैर्य सावरून धरलें व तडजोड लवकर घडवून आणली. डॅनिश विदुषी कु० फेरिंग यांनीं त्या प्रसंगीं गांधीजींना पुढील आशयाची तार केली. 'आपल्या बांधवांसाठीं स्वतःचे प्राण खर्ची घालण्यापेक्षां खऱ्या प्रेमाचा दुसरा कोणता पुरावा असूं शकेल ?'

त्याच वेळीं लढा संपल्यानंतर गांधीजींनीं असें म्हटलें कीं या लढ्यात द्वेष किंवा वैरभाव यांना थारा देखील नव्हता. आणि ते स्वतः जितके कामगारांचे सेवक होते तितकेच गिरणीमालकाचे देखील होते. 'धर्मयुद्ध' नांवाच्या या लढ्यासंबधीं लिहिलेल्या छोट्या गुजराथी पुस्तकात महादेवभाईनीं या संपाचें वर्णन अत्यंत शुद्ध साधनांनीं, खंबीर निश्चयाच्या जोरावर आणि दोन्ही बाजूंकडे यत्किंचितहि कटुता निर्माण न होतां चालविला गेलेला एक लढा म्हणून केलें आहे. लढ्याचा परिणामहि दोन्ही बाजूंना फायदेशीर असाच झाला.

लढ्यांत गोंवल्या गेलेल्या पक्षांचे मतभेद जरी सुरुवातीला बोनसच्या प्रमाणावरून सुरू झाले तरी शेवटीं महागाईभत्त्याच्या प्रमाणाविषयींचा सवाल निर्माण झाला. ज्या वेळीं दोन्ही बाजू गांधीजींकडे गेल्या त्या

वेळीं त्यांनीं सबंध प्रकरणाचा अभ्यास करून लवादाचा निर्णय मान्य करण्याकरतां त्यांचें मन वळविलें. तें झाल्यानंतर थोड्याच दिवसांत दुर्दैवानें कांहीं गिरणीकामगारांचा गैरसमज होऊन ते संपावर गेले. करार मोडण्यासाठीं निमित्तच शोधीत असलेले मालक यामुळें बिथरले. दि. २२-२-१८ रोजीं त्यांनीं टाळेबंदी जाहीर केली. गांधीजींनीं दोघांनाहि सांगून पाहिलें पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांना एकंदरीनें कामगारांची बाजू बरोबर असल्याचें आढळून आलें. ज्या वेळीं टाळेबंदी निश्चितपणें होणारच अशी त्यांची खात्री झाली त्या वेळीं त्यांनीं कामगारांना ३५ टक्के वाढीच्या मागणीला चिकटून राहण्याचा सल्ला दिला. त्यांची अशी खात्री होती कीं ती मागणी न्याय्य होती. परंतु गिरणीमालकांनी २० टक्क्यांवर जायचें नाहीं असें ठरविलें होतें. तेथून दि. २६ फेब्रूवारी १९१८ पासून हजारों कामगारांच्या रीतसर संपास सुरुवात झाली.

त्या प्रसंगीं कामगारांनीं घेतलेली शपथ अगदीं साधी असून तींत खालील मजकूर होता:—'आम्ही जुलै महिन्याच्या पगारावर ३५ टक्के वाढ मिळाल्याशिवाय गिरणींत कामावर जाणार नाहीं, टाळेबंदीच्या मुदतींत कोठल्याहि तऱ्हेचा बखेडा निर्माण करणार नाहीं आणि संपूर्ण अहिंसेचें पालन करूं. कोठल्याहि प्रकारचा दंगा किंवा लूटमार करणार नाहीं. गिरणीमालकांच्या संपत्तीचें कसलेंहि नुकसान करणार नाहीं. आमच्या तोंडावाटे कुठलाहि असभ्य शब्द जाऊं देणार नाहीं व कमालीची शांतता पाळूं.'

टाळेबंदीच्या दिवसांत गांधीजी आणि त्यांचे सहकारी एकसारखे कार्यमग्न होते. त्यांच्या सहकाऱ्यांनीं कामगारांच्या चाळींत जाऊन त्यांना स्वच्छ व आरोग्यपूर्ण जीवनाचे धडे दिले. जरूर ती वैद्यकीय व इतर मदत दिली जात होती. कामगारांत वांटण्यासाठीं प्रत्येक दिवशीं शिक्षणात्मक बुलेटिन्स काढलीं जात. त्याचप्रमाणें दररोज सभा घेऊन त्यांत दैनंदिन प्रश्न सोडविण्यांत येत.

आर्थिक साहाय्याच्या बाबतींत मात्र गांधीजींनीं कडक धोरण

स्वीकारलें होतें. पैशाच्या बळावर चालविलेल्या चळवळीवर त्यांचा विश्वास नाहीं. प्रत्येकानें आपलें आपण काम शोधून निढळाच्या घामावर जगलें पाहिजे असा उपदेश ते करीत. अनेकांना त्या वेळीं चालू असलेल्या आश्रमाच्या बांधकामावर तात्पुरतें लावून घेण्यांत आलें. त्याचबरोबर कामगारांना ते रोज असें आश्वासन देत कीं उपासमारीचाच प्रसंग आला तर पहिली पाळी त्यांची स्वतःची येईल, कामगारांची नाहीं.

पंधरवडाभर कामगारांचें नैतिक धैर्य अगदीं छान होतें. परंतु कांहीं गिरणीमालक आपल्या कल्पना योजीतच होते. गांधीजींच्या विरुद्ध अनेक कंड्या पसरविल्या जात. कसेंहि असो, पंधरवड्यांनंतर कामगारांचा धीर खचल्यारखा दिसूं लागला. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण आणि तितक्याच अभिनव अशा अनपेक्षित निर्णयांपैकीं एक निर्णय गांधीजींनीं या प्रसंगीं घेतला. त्यांनीं असें जाहीर केलें कीं या सर्वांची तड लागेपर्यंत ते अन्न घेणार नाहींत किंवा मोटार वापरणार नाहींत.

त्यांचेच शब्द द्यावयाचे तर, "पांच ते दहा हजार प्रफुल्लित व कणखर निश्चयाच्या तेजानें चमकणाऱ्या चेहऱ्यांऐवजीं थकलेले व उद्विग्न झालेले असे हजार दोन हजारच चेहरे माझ्या नजरेला पडले..... मी असें म्हणणाऱ्यांपैकीं एक आहें कीं कोणत्याहि परिस्थितींत माणसानें आपली प्रतिज्ञा पाळलीच पाहिजे. तुम्हीं घेतलेल्या गंभीर प्रतिज्ञेचा भंग करावात ही कल्पना मी क्षणभर देखील सहन करूं शकत नाहीं. तुम्हां सर्वांना तुमची ३५ टक्के वाढ मिळेपर्यंत किंवा तुमच्या कार्यांत तुमचा सर्वांचा संपूर्ण पराभव होईपर्यंत मी अन्नाला स्पर्श करणार नाहीं किंवा मोटारींत बसणार नाहीं."

यामुळें सगळें पारडें फिरलें. कामगार पुन्हां खंबीर बनले. गिरणीमालकांवर देखील त्यामुळें अप्रत्यक्ष दाबच आणला गेला. गांधीजींनीं त्याबाबत असें म्हटलें आहे कीं तेवढ्या प्रमाणांत त्यांच्या उपवासांत जबरदस्तीचा अंश होता. परंतु कामगारांचा अधःपात टाळण्यासाठीं हा एकच उपाय त्यांना योजतां येण्यासारखा असल्यामुळें त्याला त्यांचा नाइलाज झाला.

शेवटीं असें ठरलें कीं प्रो० ध्रुव यांनीं एकमेव लवाद म्हणून काम

करावें. तीन महिन्यांनंतर प्रो० ध्रुवांनीं असा निकाल दिला कीं कामगारांना त्यांच्या जुलै महिन्याच्या पगारावर ३५ टक्के वाढ मिळावी.

अशा तऱ्हेनें अहमदाबादच्या कामगारांत सुरू झालेलें कार्य तेथपासून अखंडपणें चालत आलें आहे आणि अहमदाबादची टेक्स्टाईल लेबर यूनिअन ही देशांतील एक अत्यंत संघटित अशी संस्था बनली आहे. गांधीजींनीं घालून दिलेल्या मार्गानुसार तिचें कामकाज चालतें.

व्हायकोम सत्याग्रह

या हकीगतींत तापदायक व त्याचबरोबर अपमानास्पद असा सामाजिक अन्याय दूर करण्यासाठीं केलेल्या सत्याग्रहाचें उदाहरण पहावयास मिळतें.

व्हायकोम हें एक प्रसिद्ध देवस्थानाचें ठिकाण आहे. तें पाश्चिम किनाऱ्यावर मलबार किंवा केरळ प्रांतांतील त्रावणकोर संस्थानच्या हद्दींत मोडतें. शंकराच्या प्राचीन मंदिरामुळें या खेड्याला महत्त्व प्राप्त झालें असून देऊळ खेड्याच्या मध्यभागीं आहे. सनातन्यांचें तें एक आगर आहे. १९२४ च्या सुरवातीला हा सत्याग्रह सुरू झाला. माधवन्, कृष्णस्वामी आणि केलप्पन् यांनीं त्याची सुरवात केली. ब्राह्मणवस्तीवरून त्याचप्रमाणें देवळावरून पलीकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावरून कांहीं अस्पृश्यांना घेऊन जाण्याचा त्यांनीं एक दिवस प्रयत्न केला. भिक्षुक व ब्राह्मण यांनीं शतकानुशतकें त्या रस्त्यावरून अस्पृश्यांना जाऊं दिलें नव्हतें. आपल्या बांधवांवरील हा जुलमी निर्बंध नाहींसा करण्याचें ठरवून सत्याग्रहाच्या मार्गानें सर्व मानवप्राण्यांना तो रस्ता खुला करण्याकडे वरील तिघांनीं आपलें लक्ष लावलें.

गांधीजी नुक्तेच तुरुंगातून सुटून आले असले तरी त्यांची प्रकृति अजून पहिल्यासारखी चांगली नव्हती. अपेंडिसायटिसच्या शस्त्रक्रियेमुळें होणारा त्रास अजूनहि त्यांना होतच होता. कार्यकर्त्यांनीं त्यांचा सल्ला घेतला. गांधीजींनीं त्यांना आपले आशीर्वाद दिले आणि वेळोवेळीं त्यांच्या मार्गदर्शनाचाहि त्यांना फायदा मिळाला.

त्रावणकोर सरकारनें सनातन्यांची बाजू घेतली व रस्त्याचें संरक्षण

करण्यासाठीं पोलिसांची मदत पाठवली. सार्वजनिक रस्त्याचा उपभोग करण्याचा प्रत्येक नागरिकाचा हक्क असला पाहिजे हा साधा सवाल त्या सत्याग्रहाच्या मुळाशीं होता.

ज्या वेळीं पहिल्या तुकडीनें त्या रस्त्यावरून जाण्याचा प्रयत्न केला त्या वेळीं ब्राह्मण व पुजारी लोकांकडून त्यांना सपाटून मार बसला. तुकडींतील एकाला गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या. तुकडींत कांहीं सुधारक व कांहीं अस्पृश्य मिसळलेले होते. परंतु त्यांना बसलेल्या मारानें सुधारकांचा निश्चय बदलला नाहीं. कसल्याहि प्रकारची कुरकूर न करतां आणि सूडाची किंवा हिंसेची कल्पनाहि मनांत न आणतां त्यांनीं प्रत्येक दिवशीं आपला कार्यक्रम तसाच चालू ठेवला. त्यांच्यापैकीं कित्येक जणांना बेकायदेशीर आक्रमण केल्याबद्दल अटक करून शिक्षा ठोठावण्यांत आल्या.

या सत्याग्रहाच्या कल्पनेची जनमतानें चांगलीच पकड घेतली आणि अटक झालेल्यांची जागा घेण्यासाठीं दूरदूरच्या प्रांतांतून स्वयंसेवकांचा लोंढा त्या खेड्याकडे वळला. त्यानंतर सरकारनें सत्याग्रहींना अटक करणें बंद केलें. रस्त्यावर अडथळे उभे करून पोलिसांना त्यांच्या मोंवतीं कडें करण्याचा हुकूम देण्यांत आला. गांधीजींनीं स्वयंसेवकांना अडथळे उघळून लावण्याऐवजीं त्यांसमोर विनम्रभावानें व प्रार्थनापूर्वक रात्रंदिवस उभें राहण्याची सूचना दिली. स्वयंसेवकांनीं शेजारींच एक छोटीशी झोपडी उभारली व सहा सहा तासांच्या पाळ्या करून अगदीं धार्मिक भावनेनें आपलें कार्य सुरू ठेवलें. मोकळ्या वेळांत ते सूत कांतीत. अशा तऱ्हेनें सर्व गोष्टी सुरळीत चालल्या होत्या. रस्त्यावर उभारण्यांत आलेले अडथळे तेथें पहाऱ्यावर असलेले पोलिस किंवा सरकारी अधिकारी किंवा ब्राह्मण अगर भिक्षुकवर्ग यांच्याविरुद्ध हिंसेचा अवलंब करण्याचा विचार स्वयंसेवकांच्या मनांत कधींहि आला नाहीं.

पुष्कळ काळपर्यंत प्रकरण अशा तऱ्हेनें चालू होतें. नंतर पावसाळा सुरू झाला. रस्त्याचा तो भाग फार सखल असल्यामुळें तेथें पाणीच पाणी झालें. तरी स्वयंसेवक डगमगले नाहींत. कित्येक प्रसंगीं ते खांद्याइतक्या

पाण्यांत उभे रहात. त्यांनीं तीन तीन तासांच्या पाळ्या केल्या पण आपला जागता पहारा मात्र चालूच ठेवला. पोलिसांना छोट्या पडावासारख्या होड्यांचें कडें करावें लागलें.

सत्याग्रहाचें अखंडत्व आणि स्वयंसेवकांचे मूक क्लेश यांमुळें या प्रश्नाला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झालें. सर्वत्र त्याचा बोलबाला झाला व त्यावर अनेक लेख लिहिले गेले. १९२५ च्या एप्रिलमध्यें स्वतः गांधीजी त्या ठिकाणीं गेले. त्रावणकोरच्या अधिकाऱ्यांबरोबर त्यांचें कांहीं बोलणें झालें. केवळ पाशवी सत्तेच्या जोरावर सनातनी परंपरा उचलून न धरण्याचा आग्रह गांधीजींनीं त्यांच्याजवळ धरला. सरतेशेवटीं रस्त्यावरचे अडथळे व पोलिसपहारा काढून घेण्याबाबत अधिकाऱ्यांचें मन वळवण्यांत आलें. सत्याग्रह सुरू झाल्यापासून एक वर्ष व चार महिन्यांनीं १९२५ च्या पावसाळ्यांत रस्ता मोकळा करण्यांत आला आणि ब्राह्मणांचा विरोध मोडून पडला. जर सरकारी अधिकारी पुजाऱ्यांच्या मदतीला धावले नसते तर कदाचित् हा प्रश्न आधींच सुटला असता.

नंतर १९३७ मध्यें राजाज्ञा काढून त्रावणकोरच्या महाराजांनीं संस्थानच्या मालकीचीं सर्व देवळें जात, पंथ असा भेदभाव न बाळगतां अखिल हिंदुमात्रांना खुलीं केलीं. त्या प्रसंगीं गांधीजींनीं व्हायकोमला भेट दिली. तेथें केलेल्या भाषणांत (१८-१-१९३७) या सत्याग्रहाचा उल्लेख करून ते म्हणतात, 'अवर्ण हिंदूंना या रस्त्यावरून जाण्याची परवानगी मिळावी म्हणून थोड्याच वर्षांपूर्वी बिकट लढा द्यावा लागला. पण आतां प्रत्यक्ष ठेवळेंच सर्वांना खुलीं करण्यांत आलीं आहेत.'

नील पुतळ्याचा सत्याग्रह

१९२७ चे अखेरीस ऑगस्ट ते डिसेंबर मध्यें हा सत्याग्रह घडून आला. गेल्या शतकाच्या मध्याला मद्रासमध्यें नीलच्या स्मरणार्थ हा पुतळा उभारण्यांत आला होता. १८५७ च्या हिंदी स्वातंत्र्ययुद्धांत लखनौ येथें वेढल्या गेलेल्या सरकारी फौजांना सोडविण्यासाठीं बाहेरून जी कुमक आली त्यांत हा नील होता व त्याच ठिकाणीं तो मारला गेला. तो एक अत्यंत क्रूर शिपाई होता आणि अनेक अत्याचारांची जबाबदारी

त्याच्याकडे असल्याचें अगदीं ब्रिटिशांच्याच पुराव्यानें निर्विवादपणें सिद्ध झालेलें आहे. त्याच्या सन्मानार्थ उभारलेल्या पुतळ्यामुळें त्या लोकांवर त्यानें लादलेल्या अनंत अवहेलनांचें व अपमानांचें पुन्हां स्मरण करून दिलें जात असे. अशा तऱ्हेच्या दुःखपूर्ण स्मृतीचें प्रतीक नाहींसें व्हावें म्हणून चळवळ सुरू व्हावी हें साहजिकच होतें.

त्यामुळें अनेक लोक हातांत छिनी व हातोडा घेऊन सत्याग्रह करण्यासाठीं त्या पुतळ्याकडे गेले. पोलिसांनीं पुतळ्यावर पहारा ठेवला व जे सत्याग्रही त्याच्याजवळ जातील त्यांना अटक करण्यास सुरुवात केली. गांधीजींनीं या चळवळीला आपले आशीर्वाद दिले व आपल्या साप्ताहिक 'यंग इंडिया'त त्यावर स्वयंसेवकांना सूचना देणारे कांहीं लेखहि लिहिले. त्यांपैकीं एका लेखांत ते म्हणतात, "स्वयंसेवकांनीं उतावीळ असतां कामा नये. अधीरता ही हिंसेचीच एक अवस्था आहे. सत्याग्रहीला यशाशीं कांहींहि कर्तव्य नाहीं. तें त्याला मिळणार यांत शंका नाहीं पण त्याचें यश त्याला ईश्वराकडून मिळणार आहे याची जाणीव त्यानें बाळगली पाहिजे. क्लेश सहन करीत राहणें येवढेंच त्याचें कर्तव्य ठरतें." स्वयंसेवकांनीं काढलेल्या कांहीं पत्रकांतील हिंसक प्रवृत्तीवर त्यांनीं टीका केली आहे. ते म्हणतात, "रागीट किंवा द्वेषपूर्ण भाषेला यांत वाव नाहीं. ज्या तत्त्वासाठीं तो पुतळा खडा आहे तें तत्त्व आपल्याला नामशेष करावयाचें आहे. कोणत्याहि व्यक्तीला इजा करण्याचा आपला इरादा नाहीं."

कित्येक स्वयंसेवकांना शिक्षा झाल्या. पण तो सत्याग्रह फार काळ टिकला नाहीं. आणि असें म्हणावें लागेल कीं सत्याग्रहाच्या तात्कालिक उद्दिष्टांच्या दृष्टीनें तो अपेशीच ठरला. नंतर कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यावर पंतप्रधान श्री० राजाजी यांनीं तांतडीनें केलेल्या गोष्टींपैकीं प्रमुख गोष्ट केली ती ही कीं त्या सन्माननीय जागेवरून तो पुतळा हालविण्यांत येऊन ज्या ठिकाणीं तो लोकांचें लक्ष वेधलें जाणार नाहीं अशा एका कोपऱ्यांत तो बंदोबस्तानें ठेवण्यांत आला.

बार्डोली सत्याग्रह

बार्डोलीच्या महान् लढ्याचे वेळीं शेतकऱ्यांना ज्या अग्निदिव्यांतून जावें

लागलें त्या मानानें वर वर्णन केलेले हिंदुस्तानांतील सत्याग्रह लहानच होते. बाडोंलीच्या लढ्यांत अंतर्भूत झालेले सवाल सबंध रयतवारी पद्धतीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचे असे होते. सरकारनें देखील चळवळ चिरडून टाकण्यासाठीं आपलें शक्तिसर्वस्व वेंचिलें आणि ज्या वेळीं लोकांना चिरडून टाकणें अशक्य आहे असें आढळून आलें त्याच वेळीं सरकारनें नमतें घेतलें.

१९२२ सालीं असहकार चळवळीच्या वेळीं जर सर्व गोष्टी सुरळितपणें घडल्या असत्या तर त्याच वेळीं बाडोंली तालुक्यांत अत्यंत प्रखर असा लढा झाला असता आणि तेथें असहकाराच्या कार्यक्रमांतील सर्व कलमें अंमलांत आलीं असतीं. परंतु चौरीचौऱ्याला झालेल्या हिंसेच्या शोचनीय प्रकारामुळें बाडोंलीला तो मान मिळाला नाहीं. करबंदीची चळवळ ताबडतोब बेमुदत तहकूब करण्यांत आली. परंतु नंतर १९२८ सालीं त्याच तालुक्यानें १९२२ मध्यें घडलें असतें त्यापेक्षां अधिक व्यापक प्रमाणांत आपल्या वांट्याला आलेलें कार्य करून दाखवलें. त्या ऐतिहासिक लढ्याच्या अखेरीला श्री० सरोजनींनीं गांधीजींना लिहिलें कीं, "बाडोंलींत आदर्श सत्याग्रह घडवून आणणें हें तुमचें एक स्वप्न होतें. आपल्या विशिष्ट मार्गानें त्याचा अर्थ लावून व त्याला पूर्णत्वास नेऊन बाडोंलीनें तुमचें स्वप्न खरें करून दाखवलें आहे."

दर तीस वर्षांनीं मुंबई सरकार प्रत्येक तालुक्यांतील जमिनीच्या आकारणीची फेरतपासणी करतें. आणि फेरतपासणीच्या वेळीं त्यांत वाढ करायची असा प्रघातच पडून गेला आहे. बाडोंली आणि चोरासी तालुक्यांत सरकारनें ३० टक्के वाढ केली. त्याबाबत झालेल्या किरकोळ निषेधामुळें ती २२ टक्क्यांवर आणण्यांत आली. पुन्हां शेतकऱ्यांनीं सरकारी निर्णयावर आक्षेप घेऊन साऱ्यांत वाढ होण्यापूर्वी खुली चौकशी झाली पाहिजे अशी मागणी केली. परंतु या विरोधाकडे सरकारनें कोठल्याहि प्रकारें लक्ष दिलें नाहीं.

त्यानंतर मात्र शांतपणें खूप विचार करून शेतकऱ्यांनीं निर्वाणीचा निर्णय घेतला. परिषदा भरवून त्यांनीं निषेधाचे ठराव पास केले व सरकारनें आपला हेका चालू ठेवला तर पट्टी न भरण्याचा आपला मनोदय

जाहीर केला.

तेथील एकंदर लोकसंख्या सुमारें ८८,००० होती आणि नवीन आकारणीप्रमाणें ६,२७,००० रुपये इतका सारा भरावयाचा होता. गांधीजींनीं त्या प्रकरणाचा अभ्यास करून लढ्याला पाठिंबा दिला. बार्डोलीच्या शेतकऱ्यांच्या विनंतीनुसार वल्लभभाईंनीं लढ्याचें नेतृत्व स्वीकारलें. शेतकऱ्यांचा शेवटपर्यंत त्याग करण्याचा निश्चय वल्लभभाईंच्यामुळें बळकट झाला. मोठ्या हिरीरीनें लढ्याला सुरुवात झाली.

"स्टोरी ऑफ बार्डोली" या आपल्या पुस्तकांत कै. महादेव देसाई यांनीं या लढ्याचा साद्यन्त वृत्तान्त दिला आहे. साधारण कल्पना येण्यासाठीं या टिकाणीं मी त्यांतील कांहीं महत्त्वाच्या घटनांचा नामनिर्देश करतों.

सरदार वल्लभभाईंनीं तालुका अत्यंत पद्धतशीरपणें संघटित केला. कित्येक वर्षांपासून त्या तालुक्याच्या निरनिराळ्या भागांत मिळून चार किंवा पांच समाजसेवेचीं केंद्रें चालविलीं जात होतीं. सोयिस्कर ठिकाणीं या लढ्याच्या प्रसंगानें सोळा शिबिरें घेण्यांत आलीं. सुमारें २५० स्वयंसेवकांची तेथें सोय केली होती. प्रत्येकाला ठराविक कामें नेमून देण्यांत आलीं होतीं. तालुक्याचें सारें वातावरण बदलून त्याला एखाद्या लष्करी छावणीचें स्वरूप प्राप्त झालें. झगडा, त्याग, निर्भयता, प्रतिकार हे शब्द प्रत्येकाच्या जिभेवर नाचत होते. प्रत्येक दिवशीं बातमी व सूचना देणारीं अशी दोन्ही प्रकारचीं बुलेटिन्स निघूं लागलीं.

अनत्याचारी राहण्याची, पराकोटीचे क्लेश सहन करण्याची व हंसतमुखानें सर्वस्व गमावण्याची तयारी ठेवण्याची कडक प्रतिज्ञा शेतकऱ्यांनीं घेतली. बार्डोली येथें एक प्रातिनिधिक स्वरूपाची परिषद् भरवून अखेरचा निर्णय घेण्यांत आला. त्या ठिकाणीं असें ठरविण्यांत आलें कीं सरकारनें केलेली फेरआकारणी ही लहरी, अन्याय्य व जुलमी अशी आहे. त्या परिषदेंत सरकार शेतकऱ्यांच्या मागील सर्व बाकीसकट जुन्या आकारणीप्रमाणें वसूल घेण्यास तयार होईपर्यंत किंवा प्रत्यक्ष जागेवर जाऊन फेरआकारणीचा प्रश्न निकालांत काढण्यासाठीं निःपक्षपाती अशी चौकशीसमिति नेमीपर्यंत वसूल भरण्याचें नाकारण्याचा आदेश सर्व शेतकऱ्यांना

देण्यांत आला. ही परिषद् १२ फेब्रुवारी १९२८ रोजीं भरली होती.

सरदारांनीं भरविलेल्या सभांना कोणत्याहि प्रसंगाला तयार असलेले पुरुष, स्त्रिया व मुलें यांची अलोट गर्दी लोटत असे. अगदीं थोडक्या दिवसांत सबंध तालुक्यांत जणूं विद्युत्संचार झाला आणि जुन्या १९२२ च्या जमान्यांतच आपण वावरत आहोंत असा भास होऊं लागला.

वसूल भरण्याची सक्ती करण्याचा सरकारनें कमालीचा प्रयत्न केला. काय करावयाचें सरकारनें बाकी ठेवलें ? खुशामत, लांचलुचपत, धमक्या, दंड, कैद, जमिनी सरकारजमा करणें, लाठीमार या सर्व उपयांचा सरकारनें अवलंब केला. जातीजातींत फूट पाडण्याचे प्रयत्न झाले. मोठमोठ्या इस्टेटी जप्त करून त्या विकत घेण्यासाठीं स्थानिक लोक पुढें न आल्यानें त्या मातीमोलानें फुंकून टाकण्यांत आल्या. जवळ जवळ १४०० एकर जमिनी ताब्यांत घेऊन त्या लिलावानें विकण्यांत आल्या. लोकांना दमदाटी देण्यासाठीं आणि एक प्रकारचें भीतीचें वातावरण निर्माण करण्यासाठीं म्हणून चाळीस पठाणांची नेमणूक करण्यांत आली. पण या सर्वांचा परिणाम इतकाच घडून आला कीं सबंध तालुका अधिकच संघटित झाला. जातीजातींच्या संस्था बळकट झाल्या, सर्व सरकारी नोकरांविरुद्ध आणि जप्त मालमत्ता लिलावांत घेणाऱ्यांविरुद्ध कडक सामाजिक बहिष्कार घालण्यांत आला. मात्र विरोधकांच्या शारीरिक गरजांपुरती सवलत ठेवण्यात आली होती.

सबंध हिंदुस्थाननें या लढ्याला सहानुभूति दाखवली आणि बार्डोलीच्या स्त्रीपुरुष लढवय्यांचें फार कौतुक केलें कारण स्त्रियांनीं देखील पुरुषांच्या बरोबरीनें लढ्याची धुरा उचलली होती. सरकारी दडपशाहीच्या निषेधासाठीं म्हणून असेंब्लीच्या कित्येक सभासदांनीं राजिनामे दिले. पार्लमेंटात देखील या प्रकरणाची चर्चा झाली. शेतकरी अगदीं खंबीर आणि अनत्याचारी होते. साडेपाच महिन्यांच्या लढ्यानंतर सरकार नमलें. गव्हर्नरनें चौकशी कमिटी नेमली. जप्त करण्यांत आलेली सगळी मालमत्ता परत करण्यांत आली. ज्या गांवकामगारांनीं राजिनामे दिले होते त्यांना परत कामावर घेण्यांत आलें. कमिटीनें बहुतांशानें शेतकऱ्यांच्या तक्रारी

मान्य केल्या आणि २२ टक्क्यांऐवजीं फक्त ६$\frac{1}{4}$ इतकी टक्के वाढ करण्याची शिफारस केली.

यामुळें बार्डोलीच्या शेतकऱ्यांचें म्हणणें पूर्णपणें खरें ठरलें. सत्याग्रह-शस्त्राची कार्यक्षमता निर्विवादपणें सिद्ध झाली. त्यांचें गाऱ्हाणें न्यायाचें होतें. त्यांचें म्हणणें अविवाद्य होतें. आणि त्यांची कार्यपद्धति अनत्याचारी होती.

सिरशी, सिद्दापूर आणि हिरेकेरूर येथील करबंदी

कर्नाटक प्रांतांतील या तीन तालुक्यांना ज्या परिस्थितींत १९३१ सालीं करबंदी करावी लागली ती परिस्थिति व १९१८ मधील खेडा जिल्ह्याची परिस्थिति अगदीं सारखी होती. फरक इतकाच कीं ही मोहीम १९३०-३१ च्या गांधी-आयर्विन करारानुसार थांबविण्यांत आलेल्या सविनय कायदेभंगाच्या प्रचंड चळवळीबरोबरच थांबवावी लागली. पण सविनय कायदेभंग व ती चळवळ एकाच वेळीं झाल्यामुळें रयतेचा त्यांत तोटा झाला कारण अधिकाऱ्यांनीं तिच्याबद्दल आपलें मन आधींच दूषित करून घेतलें होतें आणि तेथील कार्यकर्त्यांवर अधिकाऱ्यांकडून राजकीय हेतु लादण्यांत आले.

१९३१ च्या सुरवातीला हे तीन तालुके अर्धवट दुष्काळी परिस्थितींत सांपडले. पिकें अगदींच भिकार आलीं. सिरशी व सिद्दापूर या दोन तालुक्यांचें जें मुख्य व्यापारी पीक सुपारी तिच्या किंमती भरमसाट घसरल्या. आणेवारीप्रमाणें पिकें चार आण्यांच्याहि खालीं होतीं. त्यामुळें शेतकऱ्यांनीं त्या वर्षापुरती फक्त तहकुबी मागितली. सभा, परिषदा, शिष्ट-मंडळें, विनंत्या यांचा कांहींहि उपयोग झाला नाहीं. सरकारनें या आर्थिक चळवळींची उत्तर कारवार जिल्ह्यांतील अंकोला तालुक्यांत राजकीय स्वरूपाची करबंदीची चळवळ सुरू झाली होती तिच्याशीं सांगड घाल-ण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट खरी कीं प्रमुख राजकीय कार्यकर्तेच ही चळवळ चालवीत होते. पण तेथील आर्थिक गाऱ्हाणीं अगदीं खरीं होतीं आणि शेतकऱ्यांना सूट मिळणें अगत्याचें होतें.

सिरशी व सिद्दापूर हे उत्तर कारवार जिल्ह्यांतील घाटमाथ्यावरचे तालुके

आहेत तर हिरेकेरूर हा तालुका धारवाड जिल्ह्यांत आहे. यां तीनहि तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं सनदशीरपणें हळू हळू जाण्याची खास दक्षता घेतली होती. राजकीय झगड्यांत गुरफटून जाण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यांनीं अर्ज केले, परिपदा मरवल्या, ठराव पास केले, जिल्ह्याच्या वसुली-अधिकाऱ्यांच्या भेटीगांठी घेतल्या. त्यांच्या अडचणींशीं संबंध असलेल्या सर्वांना आपलें गाऱ्हाणें समजावें म्हणून जें जें करणें शक्य होतें तें सर्व त्यांनीं करून पाहिलें. सिरशीच्या मामलेदारानें तहकुबी मिळावी अशी खाजगीरीत्या शिफारस केल्याचें सांगितलें जातें. त्याचा या ठिकाणीं उल्लेख करणें अस्थानीं होणार नाहीं. असें म्हणतात कीं त्याला ती शिफारस मागें घेण्याबद्दल सांगण्यांत आलें. आणि त्यानें तसें करण्याचें नाकारतांच तारेनें त्याची दुसऱ्या तालुक्याला बदली करण्यांत आली. तें कसेंहि असो. प्रकरण चिघळत गेलें आणि प्रत्यक्ष करबंदीची मोहीम सुरू झाली. प्रश्नाच्या योग्यायोग्यतेचा विचार करण्याचें नाकारून सरकारनें रयतेचें पेकाट मोडण्याचाच विचार केला. सिरशी व सिद्दापूर या तालुक्यांतील शेतकऱ्यांची बाजू जास्तच बळकट होती कारण १९२३ सालींच श्री० कॉलिन्स नांवाच्या वसुलीखात्यांतील एका वरिष्ठ अंमलदारानें त्या दोन तालुक्यांची कसून पाहणी करून तेथील आकारणींत कायमची सूट मिळावी अशी शिफारस केली होती. परंतु या सर्व गोष्टींकडे पाठ फिरवून सरकारनें या मोहिमेच्या बुडाशीं राजकीय हेतु आहेत असा पुकारा करण्यास सुरवात केली.

तीनहि तालुक्यांतील शेतकरी आपापल्या तत्त्वांना चिकटून राहिले आणि हजारों जप्त्या व इतर अनेक प्रकारच्या जुलमांना त्यांनीं तोंड दिलें. जमिनी सरकारजमा करण्याबाबतच्या नोटिसा त्यांनीं शांतपणें व धैर्यानें स्वीकारल्या. कांहीं जप्त केलेली मालमत्ता विकण्यांत आली व कांहीं जमिनींचे लिलावहि करण्यांत आले. मात्र त्यांपैकीं कशालाच स्थानिक गिऱ्हाइक पुढें आलें नाहीं.

तीन तालुक्यांत मिळून सुमारें ७००-८०० जप्त्या झालेल्या असतांना आणि जमिनी सरकारजमा करण्याबाबतच्या सुमारें २०० नोटिसा

मान्य केल्या आणि २२ टक्क्यांऐवजीं फक्त ६$\frac{१}{४}$ इतकी टक्के वाढ करण्याची शिफारस केली.

यामुळें बार्डोलीच्या शेतकऱ्यांचें म्हणणें पूर्णपणें खरें ठरलें. सत्याग्रह-शस्त्राची कार्यक्षमता निर्विवादपणें सिद्ध झाली. त्यांचें गाऱ्हाणें न्यायाचें होतें. त्यांचें म्हणणें अविवाद्य होतें. आणि त्यांची कार्यपद्धति अनत्याचारी होती.

सिरशी, सिद्दापूर आणि हिरेकेरूर येथील करबंदी

कर्नाटक प्रांतांतील या तीन तालुक्यांना ज्या परिस्थितींत १९३१ सालीं करबंदी करावी लागली ती परिस्थिति व १९१८ मधील खेडा जिल्ह्याची परिस्थिति अगदीं सारखी होती. फरक इतकाच कीं ही मोहीम १९३०-३१ च्या गांधी-आयर्विन करारानुसार थांबविण्यांत आलेल्या सविनय कायदेभंगाच्या प्रचंड चळवळीबरोबरच थांबवावी लागली. पण सविनय कायदेभंग व ती चळवळ एकाच वेळीं झाल्यामुळें रयतेचा त्यांत तोटा झाला कारण अधिकाऱ्यांनीं तिच्याबद्दल आपलें मन आधींच दूषित करून घेतलें होतें आणि तेथील कार्यकर्त्यांवर अधिकाऱ्यांकडून राजकीय हेतु लादण्यांत आले.

१९३१ च्या सुरवातीला हे तीन तालुके अर्धवट दुष्काळी परिस्थितींत सांपडले. पिकें अगदींच भिकार आलीं. सिरशी व सिद्दापूर या दोन तालुक्यांचें जें मुख्य व्यापारी पीक सुपारी तिच्या किंमती भरमसाट घसरल्या. आणेवारीप्रमाणें पिकें चार आण्यांच्याहि खालीं होतीं. त्यामुळें शेतकऱ्यांनीं त्या वर्षापुरती फक्त तहकुबी मागितली. सभा, परिषदा, शिष्ट-मंडळें, विनंत्या यांचा कांहींहि उपयोग झाला नाहीं. सरकारनें या आर्थिक चळवळीची उत्तर कारवार जिल्ह्यांतील अंकोला तालुक्यांत राजकीय स्वरूपाची करबंदीची चळवळ सुरू झाली होती तिच्याशीं सांगड घाल-ण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट खरी कीं प्रमुख राजकीय कार्यकर्तेच ही चळवळ चालवीत होते. पण तेथील आर्थिक गाऱ्हाणीं अगदीं खरीं होतीं आणि शेतकऱ्यांना सूट मिळणें अगत्याचें होतें.

सिरशी व सिद्दापूर हे उत्तर कारवार जिल्ह्यांतील घाटमाथ्यावरचे तालुके

आहेत तर हिरेकेरूर हा तालुका धारवाड जिल्ह्यांत आहे. या तीनहि तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं सनदशीरपणें हळू हळू जाण्याची खास दक्षता घेतली होती. राजकीय झगड्यांत गुरफटून जाण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यांनीं अर्ज केले, परिपदा मरवल्या, ठराव पास केले, जिल्ह्याच्या वसुली-अधिकाऱ्यांच्या भेटीगांठी घेतल्या. त्यांच्या अडचणींशीं संबंध असलेल्या सर्वांना आपलें गाऱ्हाणें समजावें म्हणून जें जें करणें शक्य होतें तें सर्व त्यांनीं करून पाहिलें. सिरशीच्या मामलेदारानें तहकुबी मिळावी अशी खाजगीरीत्या शिफारस केल्याचें सांगितलें जातें. त्याचा या ठिकाणीं उल्लेख करणें अस्थानीं होणार नाहीं. असें म्हणतात कीं त्याला ती शिफारस मागें घेण्याबद्दल सांगण्यांत आलें. आणि त्यानें तसें करण्याचें नाकारतांच तारेनें त्याची दुसऱ्या तालुक्याला बदली करण्यांत आली. तें कसेंहि असो. प्रकरण चिघळत गेलें आणि प्रत्यक्ष करबंदीची मोहीम सुरू झाली. प्रश्नाच्या योग्यायोग्यतेचा विचार करण्याचें नाकारून सरकारनें रयतेचें पेकाट मोडण्याचाच विचार केला. सिरशी व सिद्दापूर या तालुक्यांतील शेतकऱ्यांची बाजू जास्तच बळकट होती कारण १९२३ सालींच श्री० कॉलिन्स नांवाच्या वसुलीखात्यांतील एका वरिष्ठ अंमलदारानें त्या दोन तालुक्यांची कसून पाहणी करून तेथील आकारणींत कायमची सूट मिळावी अशी शिफारस केली होती. परंतु या सर्व गोष्टींकडे पाठ फिरवून सरकारनें या मोहिमेच्या बुडाशीं राजकीय हेतु आहेत असा पुकारा करण्यास सुरवात केली.

तीनहि तालुक्यांतील शेतकरी आपापल्या तत्त्वांना चिकटून राहिले आणि हजारों जप्त्या व इतर अनेक प्रकारच्या जुलमांना त्यांनीं तोंड दिलें. जमिनी सरकारजमा करण्याबाबतच्या नोटिसा त्यांनीं शांतपणें व धैर्यानें स्वीकारल्या. कांहीं जप्त केलेली मालमत्ता विकण्यांत आली व कांहीं जमिनींचे लिलावहि करण्यांत आले. मात्र त्यांपैकीं कशालाच स्थानिक गिऱ्हाइक पुढें आलें नाहीं.

तीन तालुक्यांत मिळून सुमारें ७००-८०० जप्त्या झालेल्या असतांना आणि जमिनी सरकारजमा करण्याबाबतच्या सुमारें २०० नोटिसा

निघालेल्या असतांना दि. ४-३-१९३१ रोजीं गांधी-आयर्विन कराराची बातमी येऊन थडकली.

साहजिकच ज़ानेवारी १९३१ पासून अंकोला तालुक्यांत सुरू असलेली राजकीय स्वरूपाची करबंदीची चळवळ ताबडतोब मागें घेण्यांत येऊन शेतकऱ्यांना वसूल भरण्यास सांगण्यांत आलें व त्याप्रमाणें त्यांनीं तो भरला परंतु आर्थिक कारणासाठीं सुरू झालेली दुसऱ्या तीन तालुक्यांतील करबंदी सुरू ठेवणें भाग होतें. गांधीजींना सारी हकीगत समजावून देण्यांत आली व त्यांनीं लढा चालू ठेवण्यास आपली परवानगी दिली.

मध्यंतरीं लिलावाच्या जागीं निरोधन करण्याबद्दल या चळवळीशीं निगडित असलेल्या अशाच इतर कारणांबद्दल अनेक स्वयंसेवकांना शिक्षा लागल्या होत्या व त्यांच्यापैकीं कांहींजणांवर ते तालुके सोडून जाण्याच्या नोटिसा बजावण्यांत आल्या होत्या. धारवाड व बेळगांव या ठिकाणीं अनेक झडत्या घेण्यांत येऊन त्यांच्या आधारावर जे लोक प्रामुख्यानें या चळवळीचीं सूत्रें हालवीत होते असें मानण्यांत येई त्यांच्यावर कटाचा खटला भरण्याचा विचार पोलिस अधिकारी करीत होते. परंतु अखेर अधिकाऱ्यांची खात्री होऊन चुकली कीं हा लढा खरोखरीच्या आर्थिक गाऱ्हाण्यांवरच उभारला गेला आहे. असें सांगितलें जातें कीं स्थानिक अधिकाऱ्यानीं ही रास्त भूमिका स्वीकारण्यापूर्वीं गांधीजींना या संबंधानें लॉर्ड आयर्विनबरोबर बोलणें करावें लागलें. त्यानंतर १९३१ च्या मे महिन्यांत रेव्हेन्यू कमिशनर व कार्यकर्ते यांच्यामध्यें तडजोड घडून आली. हिरेकेरूर तालुक्यांतील रयतेला बरीचशी सूट मिळाली. त्यांना एक वर्षपर्यंत सारातहकुबी देण्यांत आली. सिरशी व सिद्दापूर तालुक्यांत जर व्यक्तिशः शेतकऱ्यानीं अर्ज केलें तर त्याची वसुली तहकूब करण्याचें सरकारनें कबूल केलें. परंतु नेहमींप्रमाणें स्थानिक अधिकाऱ्यांनीं या कलमाचा अर्थ व्यापकपणें लावला नाहीं आणि गरीब रयतेला पुन्हां फार कष्ट सहन करावे लागले. तडजोडीनंतर ज्यांना शिक्षा लागल्या होत्या त्यांची मुक्तता करण्यात आली आणि चालू असलेले खटले आणि नोटिसा मागें घेण्यांत आल्या. अर्थातच चळवळहि लगेच तहकूब करण्यांत आली हें सांगण्याची

आवश्यकता नाहींच.

नंतर १९३१ च्या नोव्हेंबरमध्यें श्री० कॉलिन्स यांनीं १९२३ सालीं केलेल्या शिफारशीपैकीं कांहीं सवलती सरकारनें सिरशी व सिद्दापूर या तालुक्यांना लागू केल्या. यांपैकीं एक म्हणजे जमीनमहसुलांत दरवर्षीं जवळ जवळ रु. १७००० ची कायमची सूट ही होय. उशिरां कां होईना पण त्यामुळें रयतेला जरा हायसें वाटलें. अधिकाऱ्यांची इच्छा जनतेला आपल्या चळवळीमुळें या सवलती मिळाल्या असें न वाटतां सरकारच्या औदार्यामुळें त्यांचा लाभ घडला अशी भावना व्हावी ही होती हें उघडच आहे.

गांधीजींच्या गैरहजेरींत झालेल्या आणि त्यांना आपले आशीर्वाद देण्याचा प्रसंग अथवा संधि प्राप्त न झालेल्या अशा सत्याग्रहचळवळीकडे आतां वळूं या.

डोंगरी जातींतील लोकांचा सत्याग्रह

हिमालयांत सिमल्याच्या उत्तरेस कोटगिरी किंवा कोटगड म्हणून एक डोंगराळ जिल्हा आहे. तो हिंदुस्तानांतून तिबेटकडे जाणाऱ्या हमरस्त्यावर आहे. तेथें बिगार किंवा सक्तीच्या श्रमांची जुलमी पद्धत प्रचलित होती. सरकारी अधिकारीच केवळ नव्हे तर शिकारीसाठीं किंवा चैनीसाठीं म्हणून जाणारा प्रत्येक यूरोपीय इसमहि त्या इक्काच्या नांवावर तेथील खेडुतांची छळणूक करी. बिगार म्हणजे कोणत्याहि वेळीं सक्तीनें अत्यंत कमी दरानें काम करवून घेण्याची पद्धति. त्यामुळें पुष्कळ वेळीं गरीब शेतकऱ्यांना त्यांच्या शेतावरून अगदीं तोकड्या मजुरीवर घाम गाळण्यासाठीं बोलाव-

ण्यांत येई. आणि अशा तऱ्हेच्या अडथळ्यामुळें त्यांच्या शेतीचें मोठें नुकसान होई. साहेबांच्या बंगल्यावर आपल्या गाई नेऊन त्यांना स्वस्त दरानें दूध देखील विकावें लागे.

ही प्रथा फार पुरातन काळापासून चालत आली होती. परंतु अलीकडे त्या गरीब खेडुतांत कांहीं जागृति झाल्यामुळें त्यांनीं या पद्धतीचा निषेध करून अधिकाऱ्यांकडे दाद मागितली. पण कांहीं सवलती मिळण्याऐवजीं उलट कपूरसिंग नांवाच्या स्थानिक पुढाऱ्याला तुरुंगांत डांबण्यांत आलें. लोकांवर दडपशाहीचा वरवंटा फिरूं लागला. सिमल्याहून पोलिस बोलावण्यांत आले. इतर अनेकांना पकडण्यांत आलें किंवा मशीनगन, काळें-पाणी, जन्मठेप असली भापा वापरून व धाकदपटशा दाखवून घाबरवून सोडण्यांत आलें. असल्याच परिस्थितींत कपूरसिंगाविरुद्ध पुरावा गोळा करण्यांत येऊन त्याला शिक्षा ठोठावण्यांत आली. सबंध हिंदुस्तान असहकारानें निनादत असतांना १९२१ च्या सुरवातीला हा प्रकार घडला.

कांहीं काळानंतर तेथें स्थायिक होऊन बागायत करणाऱ्या श्री० एस्. ई. स्टोक्स नांवाच्या एका युरोपियन गृहस्थानें हा प्रश्न हातीं घेतला व या जुनाट अन्यायाविरुद्ध कडवा प्रतिकार करण्यासाठीं संघटना उभारली. त्यानें एक कमिटी स्थापन केली. कमिटीच्या आज्ञा तंतोतंत पाळण्याची आणि कमिटीतर्फेंच बोलणें करण्याची शपथ घेण्यास लोकांना सांगण्यांत आलें.

नंतर अगदीं तोलून मापून वापरलेल्या शब्दांत मागण्यांचा एक मसुदा तयार करून तो जिल्हा कमिशनरकडे पाठवण्यांत आला. त्यानें त्याची दखलच घेतली नाहीं. इतर अधिकाऱ्यांच्याहि भेटी घेण्यांत आल्या. पण त्यांचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. ती प्रथा चालूच राहिली. तेथील ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या चैनी, मौजा, ऐषआराम ही पद्धत चालू राहण्यावरच अवलंबून होत्या. त्यामुळें या प्रश्नाकडे लक्ष देण्यास ते नाखूष होते. त्यानंतर पंचायतीनें असें जाहीर केलें कीं जर दिलेल्या ठराविक मुदतींत बिगार बंद झाली नाहीं तर कांहीं हजारांची वस्ती असलेला हा सबंध जिल्हा कोणत्याहि प्रकारच्या कामाची विनंति करण्यांत आली तरी तीं

नाकारील.

या योगानें सिमल्याच्या कमिशनरला तेथपर्यंत यावें लागलें. खेड्या-खेड्यांत व जनतेंत फूट पाडण्याचे नेहमींचे मार्ग त्यानें वापरून पाहिले. कडक अंमलबजावणी करण्याचा धाक देऊन पाहिला. अनेक लोकांना त्यानें बोलावून घेतलें. परंतु स्वतंत्रपणें त्याच्याशीं बोलण्यास कोणीहि तयार झालें नाहीं. त्या सर्वांनीं कमिटीकडे बोट दाखवलें. लोकांनीं वातावरण संपूर्णपणें अनत्याचारी राखलें. कोठल्याहि सरकारी अधिकाऱ्याला किंवा रस्त्याच्या त्या भागांत प्रवास करणाऱ्या कोणत्याहि युरोपीयनाला त्यांनीं धान्य देण्याचें अगर त्याचे कसलेंहि काम करण्याचें नाकारलें. ते म्हणाले, 'पहिल्या प्रथम ही अन्याय्य पद्धत बंद झाली पाहिजे.' कांहीं महिनेपर्यंत लढा चालू होता. कमिशनर येऊन गेल्यानंतर थोड्याच दिवसांत खेडुतांच्या मागण्या मान्य करण्यांत आल्या. रस्त्यावर सर्व प्रमुख जागीं सरकारी छापील परिपत्रें चिकटवण्यांत आलीं. मागणी करतां येण्यासारखीं कामें खूप मर्यादित करण्यांत आलीं आणि रास्त प्रमाणांत त्या कामाचा रोजमुरा निश्चित करण्यांत आला. अशा तऱ्हेनें खेडुतांनीं त्यांची सहन-शीलता, एकी, त्यागाची तयारी आणि मुख्य म्हणजे त्यांची अनत्याचारी वृत्ति यांच्या जोरावर विजय मिळविला.

२१-७-१९२१ च्या 'यंग इंडियां'त गांधीजींनीं या लढ्यासंबंधीं एक लेख लिहिला. त्यांत ते म्हणतात, "सरकारविरुद्ध आज दुसरा कोणताहि हिंदी गृहस्थ श्री० स्टोक्स यांच्याप्रमाणें लढा देतांना आढळत नाहीं. त्या डोंगरी लोकांचे ते खरोखर मार्गदर्शक, तत्त्वज्ञ आणि मित्र बनले आहेत. चाचकांनीं हें लक्षांत ठेवावें कीं बिगार ही सिमल्याच्या छायेंत, व्हॉइस-रॉयच्या प्रत्यक्ष नजरेसमोर चालू आहे ... लोकांनीं दुर्बल न बनतां अधिकाऱ्यांचा राग एकनिष्ठपणें स्वतःच्या माथ्यावर झेलून त्याच्याप्रमाणें (कपूरसिंग) तुरुंगवास पत्करला पाहिजे."

शिरशींतील गाडीबंदी चळवळ

कोटागिरींतील चळवळीच्या धर्तीवर झालेल्या कर्नाटकांत कारवार जिल्ह्यांत झालेल्या चळवळीमुळें अशीच स्वरूपाचा अन्याय बंद पडला.

ते दिवस देखील धामधुमीचे होते. असहकाराच्या मंत्रानें सारें वातावरण भरून गेलें होतें. मुंबई इलाख्याच्या दक्षिण भागाचे त्या वेळचे रेव्हेन्यू कमिशनर श्री० कॅडेल यांचा १९२१ च्या सुरवातीला शिरशी येथें मुक्काम पडला होता. सरकारी अधिकाऱ्यांच्या उपयोगासाठीं गाडीवानांची गरज किंवा सोयगैरसोय न पहातां आणि वर पुन्हां अगदीं कमी दरांत सक्तीनें गाड्या वेठीला धरण्याची पद्धत सर्व जिल्हाभर प्रचलित होती. अनेकदा कित्येक दिवसपर्यंत गाड्या नेल्या जात आणि शेतीच्या कामाचें फार नुकसान होई. गाडी म्हटली कीं गाडी, बैलांची जोडी आणि गाडीवान आलाच. सबंध कारवार जिल्हा जंगलमय असल्यामुळें आणि दोन-तृतीयांशाहून अधिक भाग डोंगराळ असल्यामुळें त्यांतच तेथें एक मैलभर देखील आगगाडीचा रस्ता नसल्यामुळें वहातुकीचा सर्व भार इतर कोणत्याहि साधनापेक्षां बैलगाडीवरच असतो. १९२१ सालीं मोटारी किंवा लॉऱ्या नसल्यामुळें तर बैलगाड्यांवरच भिस्त असे.

अशा परिस्थितींत एका खेडुतानें कमिशनरच्या मंडळींना आपल्या गाड्या देण्याचें नाकारलें. त्याचें मन वळविण्यासाठीं साहेबांच्या पट्टेवाल्यानें धाकदपटशा आणि तत्सम उपायांचा अवलंब करून पाहिला. पण तो नमला नाहीं. ओडलमने नांवाचा एक व्यापारी धाडसानें पुढें आला आणि मी धाकदपटशा चालूं देणार नाहीं असें म्हणाला. तो व गांवांतील कांहीं प्रतिष्ठित मंडळी ही तक्रार कमिशनरसाहेबांपुढें मांडण्यासाठीं डाक बंगल्यावर गेले. साहेबानें तक्रार ऐकून घेतली नाहींच उलट त्याचा आपल्या मनावरील तोल सुटून त्यानें व्यापाऱ्याला गचांडी देऊन बाहेर घालवलें. अर्थात् त्यानें तें सर्व धैर्यानें सहन केलें. मंडळी सर्व संतापून परत फिरली. ही बातमी वणव्याप्रमाणें सर्वत्र पसरली आणि शेतकरी नरम येण्याच्या ऐवजीं ते अधिकच धीट बनले. केवळ शिरशीच नव्हे तर सबंध जिल्ह्यांत यामुळें चांगलेंच वादळ निर्माण झालें. आधीं फारशी संघटना नसतांहि सरकारी नोकरांना गाड्या न देण्याची सांथ सबंध जिल्हाभर पसरली व काय करावें तेंच सरकारला समजेनासें झालें. कमिशनरबरोबरच्या सर्व मंडळीवर संपूर्ण बहिष्कार पुकारण्यांत आला. असें सांगतात कीं बहिष्कार

त्या जिल्ह्यापुरताच राहिला नाहीं तर रत्नागिरीसारख्या इतर जिल्ह्यांतहि बहिष्कारानें कमिशनरचा पाठलाग केला.

सुमारें महिनाभराच्या चळवळीनंतर स्थानिक पुढाऱ्यांबरोबर सरकारनें वाटाघाट करून वेठीची पद्धत बंद केली व त्या जागीं सरकारी अधिकारी दौऱ्यावर असतांना त्यांच्या उपयोगी पडाव्यात म्हणून प्रत्येक वस्तींतील कांहीं गाड्यांना रोजमुरा देण्याची पद्धत सुरू केली. लढा अगदीं छोटा आणि त्वरित असा होऊन त्याचा शेवटहि शांततापूर्ण व समाधानकारक असा झाला. नंतर कायदेकौन्सिलांतील प्रश्नोत्तरांचे वेळीं कमिशनरनें त्याच्या मनावरचा ताबा सुटल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली असें ऐकिवांत आहे. अशा तऱ्हेनें खेडुतांना तंग करणारें एक कारण नाहींसें झालें.

मुळशी पेटा सत्याग्रह

सुमारें ५१ खेडीं पाण्याखालीं घेऊन हायड्रोइलेट्रिक पद्धतीनुसार शहरें, आगगाड्या व मुंबईतील गिरण्यांना विजेचा पुरवठा करण्याच्या योजनेविरुद्ध हा सत्याग्रह उभारला गेला होता.

पुणें शहरापासून सुमारें तीस मैलांवर मुळशी पेटा नांवाचा डोंगराळ भाग आहे. १९२० मध्यें टाटा वीज कंपनीनें त्या भागांत पाण्यावर धरण बांधण्याची योजना हातीं घेतली. या योजनेनुसार सुमारें ५१ गांवें पाण्याखालीं जाऊन जवळ जवळ ११००० माणसें आपल्या घरादारांना मुकणार होतीं. अर्थात् त्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची कंपनीची तयारी होती. वाडवडिलांपासून चालत आलेल्या आपल्या घरादारांशीं निगडित झालेल्या हजारों लोकांना देशोधडीस लावल्यानंतर कितीहि नुकसानभरपाई दिली तरी ती कितीशी पुरी पडणार ? त्या भागांत वस्ती करून राहणारे मावळे हे कांटक शेतकरी असून शिवाजीच्या जमान्यांत यांच्यामधूनच चांगल्या शूर शिपायांचा भरणा होई.

मावळे साहजिकच अस्वस्थ झाले व त्यांनीं पुण्यांतील कॉंग्रेस पुढाऱ्यांशीं मसलत केली. ते दिवसहि पुन्हां असहकाराच्या ऐन भराचेच होते. मावळ्यांची सर्व परिणाम भोगण्याची तयारी असेल तर सत्याग्रह सुरू करण्याचें कॉंग्रेस नेत्यांनीं निश्चित केलें. एक जमीन तरी स्वतःच्या ताब्यांत ठेवूं,

नाहीं तर त्यासाठीं जान तरी कुर्बान करूं अशा अर्थाच्या प्रतिज्ञेवर १२०० मावळ्यांनीं सह्या केल्या. या प्रश्नावर सबंध महाराष्ट्रांत जागृति करण्यांत आली. १६-४-१९२१ रोजीं रामनवमीच्या दिवशीं औपचारिकपणें लढ्यास सुरुवात झाली. पुरुष, स्त्रिया व मुलें मिळून १२०० मावळे आणि महाराष्ट्रांतील कांहीं प्रमुख पुढारी धरण बांधण्यांत येत होतें त्या ठिकाणीं जाऊन बसून राहिले. धरणावर ५००० कामगार खपत होते. त्या सर्वांनीं काम थांबवलें. महिनाभर हें असें चालू होतें. सर्व कांहीं अगदीं अनत्याचारी मार्गानें चाललें होतें. कंपनीनें त्या वेळेपुरतें तरी काम बंद केल्यानें लढ्याचें तात्कालिक उद्दिष्ट साध्य झालें. त्यानंतर पावसाची धार सुरू झाली. हिंदुस्तानांतील इतर ठिकाणच्या शेतकऱ्यांप्रमाणेंच मावळेहि सावकारी कर्जाच्या ओझ्याखालीं पिचत होते. सावकारांना असें वाटूं लागलें कीं जर सत्याग्रह असाच चालू राहिला तर सरकार मध्यें पडेल आणि त्यांना नुकसानभरपाई कमी मिळेल. म्हणून सत्याग्रहींना न कळवतां सावकारांनीं कंपनीचे एंजिनिअर व मॅनेजर यांच्याबरोबर बोलणें सुरू केलें. पुन्हां सत्याग्रहाचा त्रास होणार नसेल तर मुबलक नुकसानभरपाई देण्याचें कंपनीच्या मॅनेजरनें कबूल केलें. सावकारांनीं मनधरणी करण्याचा प्रयत्न केला असतांहि आपल्या जमिनी न सोडण्याच्या मागणीला मावळे चिकटून राहिले. लढा जवळ जवळ अडीच वर्षें चालला होता. अखेर सरकारनें लँड ॲक्विझिशन कायद्यानें जमिनी आपल्या ताब्यांत घेतल्या. आतां शेतकऱ्यांवर कंपनी, सावकार व सरकार असा तिघांचा राग ओढवला. त्यांतच त्यांच्या अडचणीला भर म्हणून त्यांच्यांत कांहीं सूर्याजी पिसाळ होतेच. शिवाय महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांतहि असल्या लढ्याला अवश्य असलेलें एकमत नव्हतें.

१९२१ च्या डिसेंबर महिन्यांत या मोहिमेंतील दुसऱ्या लढ्याला तोंड लागलें. अटका, शिक्षा, धमक्या, जुलूम हें सर्व यथेश्च चालू होतें. महाराष्ट्रांतील बहुतेक प्रमुख पुढाऱ्यांनीं कारावास पत्करला. सर्व मिळून एकंदर १२५ मावळे, ५०० स्वयंसेवक, कित्येक पुढारी व अनेक स्त्रिया यांनीं शिक्षा भोगल्या. बहुतेक सर्व प्रमुख पुढारी तुरुंगांत डांबले गेले आहेत

असें पाहून सावकारांनीं संधि साधली. आणि पुढाऱ्यांतील मतभेदाचा फायदा घेऊन बऱ्याचशा मावळ्यांना वाढवलेली नुकसानभरपाई स्वीकारण्यास प्रवृत्त केलें. यामुळें सबंध लढा खचीं झाला आणि ज्यांच्या हितासाठीं व फायद्यासाठीं लढा चालू होता त्यानींच माघार घेतल्यामुळें लढा सोडून देणें भाग पडलें.

या सर्वांचा परिणाम म्हणून नुकसानभरपाई मात्र खूप मोठ्या प्रमाणावर देण्यांत आली. परंतु ज्या सावकारांच्या कर्जाच्या पाशांत शेतकरी अडकलेले होते त्यांच्याच पदरांत या नुकसानभरपाईचा मोठा वांटा पडल्यामुळें शेतकऱ्यांना समाधानाला जवळ जवळ कांहींच जागा राहिली नाहीं.

बोरसद सत्याग्रह

सबंध तालुक्यावर दंडादाखल लादण्यांत आलेल्या कराविरुद्ध हा सत्याग्रह झाला व अखेरीला लोकांच्यापेक्षांहि पोलिसच्च तालुक्यांतील नाठाळपणाला जबाबदार होते असें सिद्ध झालें.

गुजराथ प्रांतांतील सुरत जिल्ह्यांत बोरसद तालुका आहे. १९२२ मध्यें गांधीजींना शिक्षा झाल्यानंतर मार्चच्या मध्याला कांहींशा विचित्र परिस्थितींत त्या तालुक्यांतील सत्याग्रहाचा हा छोटासा लढा चालवण्यासाठीं सरदार वल्लभभाई पटेल यांना बोलावण्यांत आलें. देवरबाबा नांवाच्या दरवडेखोराच्या लुटींत गुप्तपणें सामील असल्याच्या खोट्या आरोपावरून बोरसद तालुक्यांतील रहिवाश्यांवर सरकारनें अन्यायानें शिक्षा म्हणून जबर कर लादला. शासन करण्यासाठीं म्हणून बडोदा संस्थान व ब्रिटिश हद्द अशा दोन्ही ठिकाणांहून जादा पोलीस तालुक्यांत बसवण्यांत आले व त्यांचा खर्चहि तालुक्यांतील बिचाऱ्या निरपराध शेतकऱ्यांवरच लादण्यांत आला.

कांहीं काळ देवरबाबानें दरोडे घालणें, श्रीमंत लोकांना पळवून त्याबद्दल त्यांच्याकडून जबर रकमा वसूल करणें यांचा नुसता धडाका लावला होता. असले प्रकार जवळ जवळ महिनाभर चालले होते. नंतर एक प्रतिस्पर्धी मुसलमान दरोडेखोर पुढें आला व त्यानें त्याच तालुक्यांत त्याच वेळेला तसलेच प्रकार सुरू केले. त्या दोघांच्याहि विरुद्ध पोलिसांचा पाड लागेना. बोरसद तालुका बडोद्याच्या हद्दीला लागून असल्यानें तेथील पोलिसांचेंहि

या प्रकरणांत तितकेंच लक्ष होतें. परंतु दोघांचे संयुक्त प्रयत्नहि निष्फळ ठरले.

नंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना न कळवतां गुप्तपणानें पोलीस व रेव्हेन्यू खात्यांतील अधिकाऱ्यांनीं, त्यांच्या शब्दांत सांगायचें तर, कांट्यानें कांटा काढण्याचा डाव रचला. देवरबाबाला पकडण्यासाठीं त्या मुसलमान दरवडेखोराचें साहाय्य घेण्यांत आलें. अधिक शस्त्रें पुरवण्यांत आलीं आणि हाताखालीं कांहीं थोडे पोलीस शिपाई देण्यांत आले तर जरूर तें साहाय्य करण्याचें त्यानें कबूल केलें.

योजना तर मोठी आकर्षक होती. परंतु पोलीसांबरोबर झालेल्या बनावानुसार मिळणाऱ्या कांहींशा सवलतीचा व संरक्षणाचा फायदा घेऊन त्या चतुर दरवडेखोरानें पकडला जाईपर्यंत स्वतःचीच पोळी पिकवून घेतली. पोलिसांना त्यानें चांगलेंच फसवलें. गुन्ह्यांचें प्रमाण वाढलें. अशा परिस्थितींत खेडुतच दरवडेखोरांना मदत करीत आहेत असा सरकारनें उलट खेडुतांवरच आरोप केला आणि त्या कारणावरून तालुक्यांत जादा पोलिस बसविण्यांत आले.

मध्यंतरीं पोलिस व मुसलमान दरवडेखोर यांच्यांत झालेल्या संगनमताचा सुगावा सरदार वल्लभभाईंना लागला. त्यांनीं सर्व गोष्टींचें निरीक्षण करून लोकांना जादा कर न भरण्याचा आदेश दिला. खेडेगांवांतून रात्रंदिवस गस्त घालण्यासाठीं त्यांनीं दोनशें स्वयंसेवकांचा जथा संघटित केला. लोकांनीं निर्भय बनून आपलीं दारें उघडीं ठेवण्यासाठीं त्यांचीं मनें वळविण्यांत त्यांनीं यश मिळवलें. नाहीं तर दरवडेखोरांच्या भीतीनें बिचारे रात्रंदिवस स्वतःला कड्याकुलपांत कोंडून घेत असत.

नंतर तालुक्यांत नेमलेले पोलीसच दरवडेखोरांच्या भीतीनें दिवसा देखील स्वतःच्या घरादारांना आंतून बाहेरून कुलपें ठोकीत असल्याचा पुरावा फोटोच्या साहाय्यानें जमा करण्यांत आला. त्याचप्रमाणें गोळीबाराला बळी पडलेल्या एकाच्या अंगांत घुसलेल्या गोळ्या पोलिसांच्याच असल्याचें आढळून आलें. यावरून ही गोष्ट निर्विवादपणें सिद्ध झाली कीं दरवडेखोर आपल्या कामासाठीं पोलिसांच्या दारूगोळ्याचाच उपयोग

करीत होते. या गोष्टी उजेडांत आल्यामुळें बडोद्याच्या पोलिसांनीं तात्काळ आपलें अंग काढून घेतलें. परंतु लोकांच्या प्रतिकाराला न जुमानतां ब्रिटिश पोलिसांनीं मात्र जादा कर वसूल करणें आणि त्यासाठीं मालमत्ता जप्त करणें चालूच ठेवलें.

मुंबईचे त्या वेळचे नवे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन यांनीं ज्या वेळीं बोरसद येथील हा लोकप्रवाद ऐकला त्या वेळीं त्यांनीं स्थानिक चौकशी करण्यासाठीं गृहमंत्र्यांना पाठवलें. खरा प्रकार त्यांच्या ध्यानांत आल्याबरोबर लगेच त्यांनीं जादा पोलीस काढून घेऊन तो करहि रद्द केला.

मध्यंतरींच्या काळांत अर्थातच सरदार पटेलांच्या दोनशें स्वयंसेवकांमुळें देवरबाबानेंहि पळ काढला होता.

'गुरु का बाग' सत्याग्रह

शीख हे शूर व लष्करी जातीचे लोक असून त्यांची वस्ती पंजाबांत आहे. हिंदुस्तानच्या आधुनिक इतिहासांतील कितीतरी पानें त्यांच्या शौर्यपूर्ण कृत्यांनीं भरलेलीं आहेत. आज त्यांची संख्या साठ लाखावर आहे. त्याचा धर्मपंथ सोळाव्या शतकांत गुरु नानकानें स्थापन केला. ज्या वेळीं मुसलमानांकडून त्यांचा छळ होऊं लागला त्या वेळीं गुरु गोविंदसिंग नांवाच्या त्यांच्या गुरूनें कडव्या युद्धप्रेमी जमातींत त्यांचें रूपान्तर केलें. ब्रिटिश अमदानीपूर्वी कांहीं वर्षें ते पंजाबवर राज्य करीत होते.

शिखांत उदासी, अकाली असे निरनिराळे गट असून त्यांतला अकाली पंथ सुधारक म्हणून ओळखला जातो. ते सच्चे, शूर व स्वार्थत्यागी लोक आहेत. सामाजिक व धार्मिक सुधारणांसाठीं त्यांच्या सनातनी बांधवांबरोबर ते अनेक अनत्याचारी लढे देत आले आहेत.

ज्या ठिकाणीं ग्रंथसाहेब नांवाचा त्यांचा पवित्र ग्रंथ ठेवून त्याची पूजा केली जाते अशा गुरुद्वारांवर, म्हणजे शीखांच्या मंदिरांवर, सार्वजनिक मालकी असावी हा एक महत्त्वाचा वादग्रस्त मुद्दा होता. बहुतेक ठिकाणीं गुरुद्वारांवर महंताचा ताबा असे आणि जवळ जवळ त्यांची ती खाजगी मालमत्ताच होऊन बसली होती. शिवाय अनेक महंत आचारभ्रष्टहि बनले होते. अकाली पंथाच्या शिरोमणि गुरुद्वारप्रबंधक कमिटीनें हीं मंदिरें सार्व-

जनिक विश्वस्तांच्या हातांत देवविण्याची खटपट चालविली होती. कायदा व रूढी महंतांच्या बाजूला होती. आणि सरकारनेंहि त्यांनाच पाठिंबा दिला. ज्या वेळीं कायद्याचे व मत वळविण्याचे प्रयत्न फसले त्या वेळीं सत्याग्रह व जनमताचें दडपण यांच्या योगानें अकाली दलानें देवळांचा ताबा घेण्याचें ठरवलें. नमुनेदार सत्याग्रहींनीं केलेल्या एका अत्यंत शौर्यशाली लढ्याचें वर्णन खालीं दिलें आहे.

'गुरु का बाग' याचा शब्दशः अर्थ गुरूची बाग. या ठिकाणीं असें घडून आलें कीं तेथील महंत मंदिर आणि सभोंवतालची बाग या सर्वांवरच आपला संपूर्ण ताबा सांगू लागला. त्यानें कायद्याची मदत घेतली व पोलीससंरक्षण मिळविलें. सर्व अकाली लोकाविरुद्ध मनाई हुकूम बजावण्यांत आला. तेथून प्रतिदिवशीं अकाली लोकांच्या बलिदानाला सुरवात झाली. ही ऑगस्ट १९२२ मधील हकीगत आहे. त्यांच्यापैकीं सुमारें हजार लोकांनीं देवळाजवळच छावणी ठोकून तळ दिला व सुमारें चार हजार लोकांनीं तेथून दहा मैलांवर असलेल्या अमृतसर मंदिराच्या आवारांत मुक्काम केला. मनाई हुकूम व पोलीसपहारे यांना न जुमानतां अकाल्यांच्या तुकड्या गुरु का बागेकडे निघाल्या. त्यांना अत्यंत क्रूर, निर्दय व पाशवी तऱ्हेनें वागविण्यांत आलें. अकाली संपूर्णपणें अनत्याचारी राहिले आणि बेशुद्ध पडेपर्यंत त्यांच्यावर होणारे आघात त्यांनीं कसलीहि तक्रार न करतां सहन केले.

दर दिवशीं अमृतसरच्या सुवर्णमंदिरांत राहिलेल्यांपैकीं शंभर जण व छावणींतील पंचवीस जण वाटेल तीं संकटें ओढवलीं तरी 'गुरु का बाग' गांठावयाचा अशा घोर निर्धारानें गंभीरपणें रुबाबशीर मोर्चा काढीत. त्यांच्यापैकीं प्रत्येकाच्या काळ्या साफ्यामोंवतीं पांढऱ्या शुभ्र फुलांची माळ असे. प्रत्येक जण अहिंसेची शपथ घेई. नंतर सबंध तुकडी बागेजवळच्या पुलापर्यंत जाई. पुलावर लोखंडाच्या शेंड्या लावलेल्या काठ्या घेतलेल्या युरोपियन व इतर पोलिसांचा पहारा असे. सत्याग्रह्यांच्या तुकड्या शांतपणें येऊन पोलिस पहाऱ्यापासून एका यार्डाच्या अंतरावर उभ्या रहात आणि निश्चलपणें मूक प्रार्थना करूं लागत. नंतर 'सत् श्री

अकाल ' अशी भेदक आवाजांत घोषणा करून ते मोठ्या धैर्यानें पुढें पाऊल टाकीत. त्या वेळीं तेथें विलक्षण रोमांचकारी प्रकार घडे. सत्याग्रहींच्या कोमल शरीरावर काळ्या कुट्ट लोखंडाचे सपासप आघात होत व ते बेशुद्ध होऊन पडेपर्यंत लाल घमक गरम रक्ताच्या चिळकांड्या उडत. त्यांना तशा अवस्थेंत शिबिरांत उचलून नेण्यांत येई आणि मग त्या दिवसापुरता दोन्ही बाजूंकडील कार्यक्रम समाप्त होई.

तो प्रकार दीनबंधु सी. एफ्. अँड्रूज यांनीं स्वतःच्या डोळ्यांनीं बघितल्यानंतर असे उद्‌गार काढले कीं ढूं कां चूं न करतां किंवा डोळा देखील वर करून न पाहतां दुःखाच्या प्रत्यक्ष खाईंत शांतपणें जाणाऱ्या त्या अनत्याचारी लढवय्यांना बघून मी प्रत्यक्ष क्रूसाचें दृश्य पहात आहें असा मला भास झाला. हजारांहून जास्त स्वयंसेवकांची रवानगी इस्पितळांत होईतोंपर्यंत कित्येक दिवस दररोज हा क्रम चालू होता. त्या वेळचे पोलिस सुपरिंटेंडेंट श्री० मॅकफरसन् यांनीं नंतर लाठीमार या विषयावर लिहिलेल्या पुस्तकांत यासंबंधीं खालील कबुली दिली आहे:—

" हाडें मोडण्यासारख्या दुखापती झाल्या असणें अगदीं संभवनीय आहे. संपूर्ण अनत्याचारी असल्यामुळें जथ्यांतील लोकांनीं पोलिसांना केव्हांहि प्रतिकार किंवा उलट प्रहार केला नाहीं. हें शक्य आहे कीं कांहीं जखमी लोक बेशुद्ध झाले असतील. ९५३ जखमी रोग्यांचा वर्गवारी करण्यात आली असून ती खालील प्रमाणें आहे— २६९ कमरेच्या वर, ३०० शरीराच्या पुढच्या बाजूस, ७९ मेंदूच्या, ६० जननेंद्रियाच्या, १९ गुह्यभागाच्या, ७ दांतांच्या, १५८ मुक्या माराच्या, ८ तीक्ष्ण जखमा, २ रुंदट जखमा, ४० मूत्रपिंड अथवा मूत्राशयाच्या, ९ हाडाच्या दुखापतीच्या, २ साधे निखळलेल्या अशा जखमा होत्या."

ही विरुद्ध बाजूकडची साक्ष असून मालकी हक्क आणि कायदा व सुव्यवस्था यांच्या नावावर अनत्याचारी अकालींना किती पाशवी रीतीनें वागविण्यांत आलें त्याची कल्पना यामुळें येऊं शकते.

त्यानंतर पाशवी शक्तीच्या जोरावर स्वयंसेवकांना हुसकावून लावण्याची निंद्य पद्धत जाऊन त्याची जागा धरपकडीनें घेतली. सुमारें २१० लोकांना

पकडल्याचें सांगण्यांत आलें. एकाच ऑनररी मॅजिस्ट्रेटनें चार बैठकींत मिळून रु. १,२७,००० इतक्या रकमेच्या दंडाच्या शिक्षा लोकांना फर्मावल्या. कैद्यांची संख्या नंतर जवळ जवळ हजारापर्यंत गेली.

या सगळ्याचा शेवट अखेर तडजोडींत झाला. नोव्हेंबरमध्यें सर गंगाराम यांनीं ज्याच्यासाठीं झगडा चालला होता ती जमीन करारानें घेतली व बागेंतील झाडें तोडण्यास त्यांनीं कसलीहि हरकत घेतली नाहीं. परंतु मार्च १९२३ पर्यंत कैद्यांना तुरुंगांतच खितपत पडावें लागलें. त्यानंतर जनमताच्या दडपणामुळें व पंजाब कायदेमंडळांत पास झालेल्या ठरावामुळें त्यांची तुकड्यांतुकड्यांनीं मुक्तता झाली.

पुढें गुरुद्वार कायदा पास होऊन गुरुद्वारांवरील ताब्याचा प्रश्न कायमचा मिटेपर्यंत कांहीं वर्षें अकालींना दम काढावा लागला.

झेंडा सत्याग्रह

राष्ट्राच्या इभ्रतीचें प्रतीक नसेल आणि केव्हां ना केव्हां तरी त्याला जे लोक मान देतात त्यांनीं आपल्या हालअपेष्टांनीं व त्यागानें त्याला पावित्र्याचें तेज चढविलें नसेल तर निशाणाची किंमत एखाद्या पटकुराहून जास्त होणार नाहीं. तिरंगी राष्ट्रध्वजानें आपल्या इभ्रतीच्या रक्षणासाठीं हिंदभूच्या सुपुत्रांना अनेक वेळां साद घातली आहे आणि ती हांक हिंदपुत्रांनीं खालीं पडूं दिलेली नाहीं. म्हणूनच हिंदी लोकांच्या अत्युच्च भावना आणि अपार त्याग यांचे धागे आपल्या निशाणाभोंवतीं गुंफले गेले आहेत.

नागपूर झेंडा सत्याग्रहाच्या निमित्तानें परकी सरकारनें ज्या वेळीं निशाणावर लहरी व उद्दाम निर्बंध लादले त्या वेळीं राष्ट्रध्वजाची इभ्रत संभाळण्याचा प्रसंग आला. नागपूर झेंडा सत्याग्रह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रसंगाला कांहीं आकस्मिक घटना कारणीभूत झाल्या. नागपूर या मध्यप्रांताच्या राजधानीच्या शहरांत काँग्रेसचा तिरंगी ध्वज घेतलेली मिरवणूक सिव्हिल लाइन्सकडे जात होती. पोलिसांनीं त्या मिरवणुकीला हरकत घेतली आणि जिल्हा मॅजिस्ट्रेटनें १।५।१९२३ रोजीं १४४ कलम लागू केलें.

मिरवणुकीची जबाबदारी स्वीकारणाऱ्या कार्यकर्त्यांनीं झेंडा घेऊन

पुढें जाण्याचा आग्रह धरला. त्यांना पकडण्यांत येऊन निरनिराळ्या मुदतीच्या शिक्षा देण्यांत आल्या. यामुळें सबंध हिंदुस्तानचें लक्ष तिकडे वेधलें. राष्ट्रध्वजाची इभ्रत राखण्यासाठीं नागपूरकडे स्वयंसेवकांची रीघ लागली. 'नागपूर सत्याग्रह समिति' या नांवाची एक समिति स्थापन करण्यांत येऊन लढा चालवण्यांत आला. प्रत्येक दिवशीं छोट्या छोट्या तुकड्या अटक करून घेण्यासाठीं पाठवण्यांत येऊं लागल्या. कांहीं दिवसपर्यंत कॉंग्रेस वार्किंग कमिटीचे एक सभासद शेठ जमनालाल बजाज यांच्याकडे हातीं लढ्याचीं सूत्रें होतीं. वार्किंग कमिटीनें लढ्याला पाठिंबा देऊन त्यासाठीं हालअपेष्टा सोसणारांचें अभिनंदन केलें. नागपूर येथें जुलैच्या ८,९,१० या तारखांना भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत लढ्याला पाठिंबा देण्यांत आला. जमनालालजींच्या अटकेनंतर लढ्याचें नेतृत्व सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडे सुपूर्द करण्यांत आलें. १८ जुलै हा दिवस सर्व हिंदुस्तानभर झेंडादिन म्हणून पाळण्यांत यावा असें जाहीर करण्यांत आलें. सर्व प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांनीं त्या दिवशीं आपापल्या प्रांतांतील सर्व प्रमुख शहरांतून झेंड्याच्या मिरवणुका काढावयाच्या होत्या. तसेंच त्यांनीं नागपूरला कांहीं स्वयंसेवक पाठवावेत अशीहि अपेक्षा करण्यांत आली. तो वेळपर्यंत हजारावर स्वयंसेवकांनीं आधींच नागपूरला जाऊन सत्याग्रह केला होता व ते प्रांतांतील निरनिराळ्या तुरुंगांत हालअपेष्टा भोगीत होते.

इतर ठिकाणांप्रमाणेंच नागपूरलाहि १८ जुलैच्या मिरवणुकीचा जंगी कार्यक्रम आंखण्यांत आला होता. मिरवणुकीला अटकाव करणारा हुकूम चालूच होता. पण तरी देखील दि. १८ च्या मिरवणुकीला पोलिसांनीं अडथळा केला नाहीं अगर मिरवणूक काढणारांविरुद्ध कोणतेहि उपाय योजले नाहींत. कोठल्याहि तऱ्हेची परवानगी काढलेली नसतांना देखील त्यांनीं मिरवणूक जाऊं दिली. हमरस्त्यावरून झेंडा घेऊन जाण्यासाठीं हजारों लोकांना अटकेंत ठेवण्यांतील मूर्खपणा सरकारच्या ध्यानांत आला.

सप्टेंबर १९२३ मध्यें दिल्ली येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या जादा अधिवेशनांत आपल्या दिव्य त्यागानें राष्ट्रीय झेंड्याचा मान राखल्याबद्दल या स्वयं-

सेवकांचें अभिनंदन करण्यांत आलें.

सामाजिक अन्याय

गांधीजी हे नेहमीं असे आग्रहानें प्रतिपादीत आले आहेत कीं सत्याग्रह हें असें शस्त्र आहे कीं तें जीवनाच्या कोठल्याहि क्षेत्रांत व मित्र आणि शत्रु, नात्याचा आणि परका, एक आणि अनेक, व्यक्ति आणि संस्था या सर्वांविरुद्ध वापरतां येईल. सबंध जातींतील सुधारकांनीं अन्याय्य रूढी-विरुद्ध केलेल्या लढ्याचें 'गुरु का बाग सत्याग्रह' हें जसें उदाहरण आहे त्याप्रमाणें जमातींतील लहानशा गटानें त्यापेक्षां किरकोळ कारणासाठीं केलेल्या सत्याग्रहांचींहि उदाहरणें आहेत.

गुजराथेंतील खेडा जिल्ह्यांत धर्मज म्हणून एक खेडेगांव आहे. तेथें कांहीं तरुण मंडळींनीं अशा तऱ्हेचा सत्याग्रह करून दाखवला. त्या खेड्यांतील एका प्रमुख नागरिकानें आपल्या आईच्या बाराव्याला खर्चिक असें जातिभोजन घालण्याचें ठरवलें. त्या जातींतील तरुणांना या जुन्या प्रघाताला आळा घालावयाचा होता. त्यांनीं त्या गृहस्थाची मनधरणी करून पाहिली पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. नंतर त्यांनीं त्या प्रसंगीं वाढण्यांत येणाऱ्या पदार्थांला स्पर्श करावयाचा नाहीं, त्या समारंभांत भाग घ्यावयाचा नाहीं, निषेध म्हणून त्या दिवशीं उपवास करावयाचा आणि वडीलधाऱ्या मंडळींनीं या वर्तनाबद्दल कितीहि कडक शिक्षा दिली किंवा वाईट तऱ्हेनें वागविलें तरी तें आनंदानें सहन करावयाचें अशी शपथ घेतली.

त्यामुळें त्या दिवशीं जवळ जवळ २८५ विद्यार्थ्यांनीं व छोट्या छोट्या मुलांनींहि उपवास केला. वडीलधारी मंडळी खूप रागावली. पण आपल्या तत्त्वाकरतां आनंदानें कष्ट सहन करावयास तयार झालेल्या स्वतःच्या पोटच्या गोळ्यांविरुद्ध ते तरी बिचारे काय करणार? गांधीजींनीं त्या तरुणाना पत्र पाठवून त्यांच्या त्यागाच्या तयारीचें कौतुक केलें आणि त्यांना उत्तेजन देऊन पुढें लिहिलें कीं जर त्यांनीं अशीच चिकाटी ठेवली व शुद्ध आणि सुंदर असें प्रेममय हत्यार उपयोगांत आणलें तर समाजांतील सर्व दुष्ट चाली नष्ट होतील.

विचित्र साफल्य

बंगालमधील मुनशीगंज येथील कालीच्या देवळासमोर हरिजनांनीं केलेल्या सत्याग्रहाची सफलता विचित्र तऱ्हेनें झाली. इतर सर्व हिंदु उपासकांप्रमाणें आपल्यालाहि मंदिरांत प्रवेश मिळावा म्हणून त्यांनीं नऊ महिन्यांहून अधिक काळपर्यंत सत्याग्रह चालू ठेवला. शेवटीं कांहीं जणांनीं उपवास सुरू केला. इतकें झाल्यावर मात्र तेथील उच्चवर्णीय हिंदु स्त्रियांना तें सहन होईना. त्यांच्यापैकीं दोनशें बायांनीं हातांत करवती, कुऱ्हाडी व हातोडे घेऊन देवळावर हल्ला चढवला, वाटेंतील अडथळे मोडून टाकले आणि देवीच्या दर्शनासाठीं भुकेनें तडफडणाऱ्या त्यांच्या हरिजनबांधवांना देऊळ मोकळें करून दिलें. पुरुष मंडळींनीं मग अर्थातच तिकडे दुर्लक्ष केलें.

तुरुंगांतील सत्याग्रह

१९२५ च्या सुरुवातीच्या काळांत एक दिवस येरवडा तुरुंगांतील १६०० कैद्यांनीं अन्न घेण्याचें नाकारलें. तुरुंगाच्या सुपरिंटेंडेंटनें कांहीं फुलझाडें व तुळशीचीं रोपें उपटलीं आणि त्या झाडांकरतां आणि शंकर, गणपति व मारुति या सर्व हिंदूंना पवित्र वाटणाऱ्या देवांच्या लहान लहान मूर्तींसाठीं केलेले ओटे खणून काढले म्हणून हा अन्नत्याग करण्यात आला होता. तेथील कैद्यापैकीं कित्येक हिंदु दररोज आंघोळीनंतर त्या झाडांना पाणी घालीत व मूर्तींची पूजा करीत, आणि ती पूजा आटोपल्याखेरीज अन्न न घेण्याचा त्यांचा नियम असे. परंतु निष्ठुरपणानें तीं झाडें, देवांच्या मूर्ति व त्यांचे ओटे उध्वस्त करून टाकल्याचें आढळतांच त्यांच्या भावनांना धक्का बसला व त्यांनीं उपवासास सुरवात केली. त्यांनीं कामाचा इन्कार न करतां अन्न तेवढें वर्ज केलें.

आपल्या कृत्यामुळें कैद्यांच्या भावना इतक्या दुखावल्या जातील याची बहुधा त्या युरोपीय सुपरिंटेंडेंटला कल्पना नसावी. पण इतका प्रकार झाल्यावर तिकडे डोळेझांक करण्यास तो धजला नाहीं. त्यानें कांहीं थोडींच झाडें व ओटे उखडले होते. परंतु हा प्रक्षोभ बघितल्यानंतर माघार घेणेंच त्याला शहाणपणाचें वाटलें. कैद्यांच्या पुढाऱ्याला त्यानें

देवांच्या मूर्ति परत देण्याचें व पुन्हा ओटे बांधण्याचें आश्वासन दिलें. त्याच्या या आश्वासनामुळें चोवीस तासांनंतर कैद्यांनीं आपला उपवास सोडला आणि ज्या वेळीं त्यांच्या मूर्ति त्यांना परत मिळाल्या व ओटे पुन्हां तयार झाले त्या वेळीं त्यांना अत्यंत आनंद झाला.

या बाबतींत सुपरिंटेंडेंटचें म्हणणें असें होतें कीं तेथें असलीं झाडें, ओटे आणि मूर्ति भरामरा निर्माण होत होत्या. कोणाच्याहि ध्यानात न येतां त्यांत एकसारखी वाढ होत होती. दुसऱ्या धर्माचे लोक त्यांच्या त्यांच्या मूर्ति सगळीकडे आणून बसवूं लागतील आणि मग त्याला कांहीं अंतच राहणार नाहीं. ही गोष्ट खरी कीं जवळ जवळ तो तुरुंग उघडल्या-पासून तुळशीची लागवड किंवा ओटे बांधून निरनिराळ्या मूर्ति बसवण्याचे प्रकार काहींसे गैरशिस्तीनेंच चालले होते. परंतु मुसलमान, ख्रिस्ती किंवा शीखहि तसेंच कांहीं करतील ही सुपरिंटेंडेंटची भीति मात्र निराधार होती.

हा सारा प्रकार सुपरिंटेंडेंटला रुचला नाहीं. आणि या ना त्या मार्गानें त्या मूर्ति नाहींशा करण्याचें त्याच्या मतानें घेतलें. कांहीं आठवडे तसेच गेले. नंतर अचानकपणें तुरुंगांतील निरनिराळ्या आवारांतील हवाल-दारांना सगळे ओटे, मूर्ति आणि तीं झाडें चोवीस तासांच्या आंत नाहींशीं करण्याचा हुकूम सुपरिंटेंडेंटनें फर्मावला. त्याबरोबर त्या बिचाऱ्या मूर्ति उध्वस्त करण्याचें काम सुरू झालें. मध्यंतरीं लोटलेला कांहीं आठव-ड्यांचा काळ किंवा कैद्यांना मिळालेला तात्पुरता विजय यांमुळें त्यांचा भावनावेग कमी झालेला नव्हता. त्यांना ही बातमी समजतांच त्यांनीं तुरुंगांतल्या प्रत्येक भागांत ती फैलावली आणि आजपर्यंत कधींहि अनु-भवास न आलेलें असें गांभीर्य आणि उदासीनता साऱ्या तुरुंगभर पसरली. शेंकडों कैद्यांनीं त्यांच्या मूर्तींची पुन्हां स्थापना होईपर्यंत अन्नाला स्पर्श न करण्याचा निश्चय केला. त्यांनीं आपली वर्दी चालू ठेवली परंतु तुरुंगाधि-काऱ्यांशीं बोलण्याचें किंवा अन्न घेण्याचें मात्र नाकारलें.

जवळ जवळ अठ्ठेचाळीस तास उपोषण सुरू होतें. साऱ्या तुरुंगभर एक प्रकारची खिन्नता पसरली होती. 'सेपरेट' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या तुरुंगाच्या एका भागांत ज्या वेळीं कुदळ घेऊन हवालदार आला व त्यानें

महार कैद्यांना ओटे मोडून टाकायला सांगितलें. त्या वेळीं तेथील एका प्रमुख हिंदु कैद्यानें आपल्याच दुसऱ्या हिंदुबांधवांना जी गोष्ट पवित्र वाटते ती उध्वस्त न करणें हें तुमचें कर्तव्य आहे अशी त्या महार कैद्यांची समजूत घातली. त्याचा त्यांच्या मनावर परिणाम होऊन त्यांनीं ओटे उखडण्याचें नाकारलें. नंतर हवालदारानें स्वतःच तें काम करण्याचें ठरविलें. पण त्या कैद्यानें त्यालाहि तशीच विनंति केली, 'तुझ्या धर्मभावनांच्या सर्वस्वीं विरुद्ध अशीं कामें करण्यासाठीं कांहीं तुला सरकारकडून पगार मिळत नाहीं. समज उद्यां सुपरिंटेंडेटनें तुला तुझ्या मुलांना मारून टाकण्याचा हुकूम दिला तर महिन्याकाठीं मिळणाऱ्या सव्वीस रुपडयांसाठीं तो तूं पाळशील ? मी जर तुझ्या जागीं असतों तर मीं उपासमार सहन केली असती, भीक मागितली असती, काय वाटेल तें केलें असतें, पण सबंध दिवसभर उपवास करीत असलेल्या आणि स्वतःचे प्राण देखील गमवावयास तयार असलेल्या शेकडों बांधवांच्या धर्मभावना कधींहि दुखावल्या नसत्या.' हे उद्‌गार ऐकून हवालदाराचें मन चलबिचल झालें. परंतु तरीदेखील कुदळ बाजूस ठेवण्यास तो तयार होईना. तें पाहून तोच कैदी पुन्हां म्हणाला, 'माझें म्हणणें जर तुला पटत नसेल तर हा बघ मी तुझ्या आणि ओट्यांच्या मधें उभा राहतों. तुझ्या कुदळीचा पहिला घाव माझ्या मानेवर पडूं दे. माझें प्रेत उचलून बाजूला टाकल्यानंतर मगच तुला हें हीन कृत्य पार पाडतां येईल.' याचा मात्र हवालदारावर अतिशयच परिणाम झाला. हा सगळा प्रकार दहा बारा कैदी पहात होते. अखेर हवालदार तें काम सोडून निघून गेला.

तिसरा दिवस उजाडला. वर्दी पुरी करीत असतांना श्रमांमुळें बेशुद्ध पडल्यानें कित्येक कैद्यांना दवाखान्यांत न्यावें लागलें. कोणीं एक शब्द उच्चारला नाहीं कीं कांकूं केली नाहीं कीं कसली तक्रार केली नाहीं. ठराविक वेळीं त्यांना अन्न देण्यांत येई व ते त्याचा इन्कार करीत. अन्नत्याग करणारांची संख्या 'अकराशें ते बाराशेंच्या दरम्यान होती. ते आपापल्या बराकीच्या पुढाऱ्यांमार्फतच तेवढें जें काय बोलायचें तें बोलत.

दिवस वर येऊं लागला त्या वेळीं सेपरेटमधील ज्या कैद्यांनीं हवालदाराचें मन वळविलें होतें त्यानें सुपरिंटेंडेंटला पाटी पाठवून कळवलें कीं मी-देखील इतर हिंदु कैद्यांना सहानुभूति दाखविण्यासाठीं म्हणून उपवास करीत आहें. परंतु हें प्रकरण मिटवून शांतता प्रस्थापित करण्याची संधि मिळाल्यास मला आनंद होईल. सकाळीं सुमारें दहा वाजतां सुपरिंटेंडेंट त्या कैद्याकडे गेला व त्याला सर्व परिस्थिति समजावून सांगण्याचा त्यानें प्रयत्न केला. सुपरिंटेंडेंटनें सांगितलें कीं आंघोळीच्या प्रत्येक हौदापाशीं २′×२′ आकाराचे नवे ओटे बांधण्याचा हुकूम त्यानें दिला आहे. आणि त्यावर मूर्ति ठेवण्याची किंवा तुळशीचीं झाडें लावण्याची कैद्यांना मुभा राहील. त्या कैद्याला बरोबर नेऊन कांहीं ओटे बांधण्यांत येत होते ते सुपरिंटेंडेंटनें समक्ष दाखवले. आणि नंतर अशा तऱ्हेची नवी व्यवस्था होत असतांना आतां उपवास सोडावयास काय हरकत आहे असा प्रश्न त्याला विचारला. त्यावर त्या कैद्यानें सांगितलें कीं कांहीं आठवड्यांपूर्वी सुपरिंटेंडेंटनें दिलेलें आश्वासन मोडलें असल्यामुळें जी नवी व्यवस्था होत आहे ती कायम राहील अशा तऱ्हेचा लेखी हुकूम दिल्याखेरीज उपवास सोडण्यास सांगणें बरोबर होणार नाहीं.

ओटे बांधण्याचें काम चालूच होतें. दुपारीं सुमारें दोन वाजतां लेखी हुकूमहि फिरवण्यांत आला. इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स अहमदाबादला गेला होता तो घाईघाईनें परत आला व सायंकाळीं पांचच्या सुमारास त्यानें तुरुंगाला भेट दिली. ओटे तयार होऊन त्यावर मूर्तींची स्थापना झाल्याखेरीज आणि फुलें, धूप, केळीं, नारळ वगैरेंनीं त्यांची यथासांग पूजा झाल्याखेरीज कोणींहि उपवास सोडूं नये असें सर्वांना कळविण्यांत आलें होतें. त्यामुळें आय्. जी. पी. नें त्यांच्याजवळ चौकशी करतांच त्यांनीं त्याला तसेंच सांगून टाकलें.

आणि शेवटीं कैद्यांच्या मताप्रमाणें घडून आलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं सुमारें अकरा वाजतां जे कैदी नियमितपणें पूजा करीत असत त्यांनीं स्नान करून नेहमींप्रमाणें देवांची पूजा केली. बहुतेक सर्व ठिकाणचे ओटे तयार झाले होते आणि मूर्ति व झाडें यांची पुन्हां स्थापना झली

होती. प्राणप्रतिष्ठा करण्यासाठीं बाहेरून मटजी बोलावण्यांत आले होते. अर्धा दिवस कैद्यांना सुट्टी देण्यांत आली. आणि अशा तऱ्हेनें कैद्यांच्या गाऱ्हाण्यांचा संपूर्ण विजय होऊन हें प्रकरण मिटलें.

नंतर कांहीं दिवसांनीं तुरुंगांतील एक जेलर असें म्हणाला कीं त्यानें बघितलेल्या किंवा ऐकलेल्या शिस्तशीर सत्याग्रहाचें हें एक अगदीं शुद्ध व नमुनेदार असें उदाहरण होतें.

इतिहासांतील कांहीं दाखले : : १९

श्री० रिचर्ड ग्रेग म्हणतात, " इतिहासकारांचा भर राजकारण आणि लढाया यांकडेच जास्त झुकत असल्यामुळें या दुसऱ्या घटनांकडे (अनत्याचारी प्रतिकार) त्यांनीं फारच थोडें लक्ष दिलें आहे. आणि त्यांपैकीं कित्येक प्रसंगांची नांवनिशाणीहि बुजून गेली आहे." याच संदर्भानें गांधीजींना आत्मशक्तीसंबंधीं ऐतिहासिक उदाहरणें आहेत का असें विचारण्यांत आलें होतें. त्यांनीं ' हिंद स्वराज्य ' नांवाच्या आपल्या पुस्तकांतील ' अनत्याचारी प्रतिकार ' या प्रकरणांत यावर असें लिहिलें आहे कीं " ठायीं ठायीं तिच्या (आत्मिक शक्ति) कार्यप्रवृत्तीचा पुरावा आपल्याजवळ उपलब्ध आहे. पण इतिहासाचा अर्थ केवळ राजे आणि महाराजे यांचीं कृत्यें येवढाच असेल तर तसल्या इतिहासांत मात्र आत्मिक शक्ति अथवा अनत्याचारी प्रतिकार आढळणार नाहीं..... इतिहास ही वस्तुतः प्रेमाच्या किंवा आत्मिक शक्तीच्या अविरत कार्यांत आलेल्या अडचणींची नोंद होय. "

असें असून देखील अनत्याचारी दृष्टिकोणांतून सभोंवार नजर टाकून अशा प्रकारच्या प्रतिकाराच्या कार्यपद्धतींचा अभ्यास करतां येण्याजोगीं उदाहरणें शोधून काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एखाद्या विशिष्ट

अनत्याचारी प्रतिकाराला यश आलें किंवा नाहीं याला कांहीं येवढें विशेष महत्त्व नाहीं. हिंसक प्रतिकार देखील अयशस्वी होतो; आणि अयशस्वी होतो इतकेंच नाहीं तर बहुतेक वेळीं तो संपूर्णपणें अयशस्वी ठरतो आणि दोहीं बाजूकडील रक्तपात व विध्वंस तेवढा शिल्लक उरतो. विशिष्ट परिस्थितींत अनत्याचारी प्रतिकार कशा तऱ्हेनें संघटित केला गेला आणि त्याची अंमलबजावणी कशी झाली याचा आपणांस अभ्यास करावयाचा आहे. ही गोष्ट खरी कीं गांधीजींचा उदय होईपर्यंत अनत्याचारी प्रतिकाराचें शास्त्र व कला यांना आकार आला नव्हता आणि तोपर्यंत हेतु-पुरस्सर योजनेनुसार वापरण्यांत आलेल्या तंत्राशिवाय आणि तात्त्विक अधिष्ठानाखेरीज व भोंगळपणानें तें शास्त्र वापरलें जात असे तरी देखील वरीलपैकीं कांहीं गोष्टी त्यांत अंतर्भूत झालेल्याच असत. मात्र त्या त्या वेळच्या परिस्थितींतूनच त्या निर्माण होत.

अल्डुस हक्स्ले अनत्याचारी क्रांतीच्या पद्धतीला पाठिंबा देतो कारण त्याचा असा विश्वास आहे कीं ज्या योगानें उद्दिष्ट खरोखरी साध्य होऊं शकेल असा तो एकच एक मार्ग आहे. प्रथम दक्षिण आफ्रिकेंतील १९०६ ते १९१४ च्या लढ्याचा उल्लेख करून तो म्हणतो, "याचें वर्णन संपूर्णपणें यशस्वी असें करतां येईल." त्यानंतर तो हिंदुस्तानांतील स्वातंत्र्यासाठीं झालेल्या झगड्यांकडे न वळतां एकदम संपूर्णपणें किंवा अंशतः यशस्वी झालेल्या इतर अनत्याचारी चळवळींपैकीं खालीं दिलेल्यांचा नामनिर्देश करतो.

फिनलंड— १९०१ पासून १९०५ पर्यंत फिनलंडच्या लोकांनीं रशियन अधिकाऱ्यांविरुद्ध अनत्याचारी प्रतिकार चालविला. तो संपूर्णपणें यशस्वी होऊन फिनलंडवर लादण्यांत आलेला सक्तीच्या लष्करभरतीचा कायदा मागें घेण्यांत आला.

जर्मनी— त्यानें असा उल्लेख केला आहे कीं जर्मनींत बिस्मार्कविरुद्ध अनत्याचारी प्रतिकाराच्या दोन मोहिमा यशस्वी करून दाखवण्यात आल्याः— कॅथॉलिकांची कुल्टुर काम्फ (संस्कृतीसाठीं लढा) आणि १८७१ नंतरची सोशल डेमोक्रॅटिक पक्षाला मान्यता मिळावी यासाठीं कामगारांनीं

केलेली मोहीम.

इंग्लंड—ब्रिटिश कामगारांनीं अनत्याचारी असहकाराचा धाक दाखवल्यामुळें इंग्लंड व रशियामधील युद्ध टळल्याचा दाखला त्यानें दिला आहे. ही गोष्ट १९२० मध्यें घडून आली. ९ ऑगस्ट १९२० रोजीं नेमण्यांत आलेल्या कौन्सिल ऑफ ॲक्शननें सरकारला असा इषारा दिला कीं रशियन लोकांवर हल्ला चढविण्यासाठीं पोलंडला ब्रिटिश सैन्य पाठवण्याच्या आपल्या योजनेचा सरकार हेका धरील तर सार्वत्रिक संप पुकारण्यांत येईल, कामगार सैनिकांची अगर शस्त्रास्त्रांची वाहतुक बंद पाडतील आणि त्या युद्धावर कडकडीत बहिष्कार घातला जाईल. कामगारांनीं दिलेल्या या अंतिमोत्तरामुळें लॉईड जॉर्जच्या मंत्रिमंडळानें रशियावर चढाई करण्याचा आपला बेत सोडून दिला. अल्डुस हक्स्ले यानें निर्देशलेल्या वरील उदाहरणांव्यतिरिक्त इतर कांहीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत.

हंगेरी—सबंध राष्ट्रानें एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला केलेल्या सामुदायिक अनत्याचारी प्रतिकाराचें उदाहरण हंगेरींत घडून आलें. या प्रतिकाराच्या लढ्याचे दोन भाग पाडतां येतील. पहिला भाग १८३३ पासून १८४८ पर्यंतचा व दुसरा भाग १८४८ पासून १८६७ पर्यंतचा.

१७२० सालीं किंवा त्या सुमारास ऑस्ट्रिया व हंगेरी यांनीं संयुक्त प्रयत्नांनीं आपले स्वतःचे प्रदेश परकीयांपासून स्वतंत्र केले. त्यांनीं एकाच राजसत्तेखालीं 'स्वतंत्र परंतु समान दर्जाचीं' राष्ट्रें म्हणून एकत्र येण्याचें ठरवलें. राजदरबार व्हिएन्ना येथें भरूं लागला आणि हंगेरियन सरदारवर्गाची राष्ट्रीय भावना हळू हळू खच्ची करण्यांत आली. परंतु हंगेरी हें एक राष्ट्र असल्याची जाणीव कांहीं कट्टर निष्ठावंत जीव हृदयाशीं बाळगून होते. १८२८ च्या सुमारास ज्या वेळीं ऑस्ट्रियाच्या राजानें हंगेरींत सैन्यभरतीचा हुकूम सोडला त्या वेळीं हंगेरींतील लोकांनीं सैन्यांत दाखल होण्याचें नाकारलें. त्यांनीं असें सांगितलें कीं हंगेरीच्या पार्लमेंटलाच काय तो सैन्यभरती करण्याचा अधिकार आहे. पांच वर्षांच्या झगड्यानंतर १८३३ मध्यें हंगेरीच्या पार्लमेंटची बैठक बोलावण्यांत आली आणि त्या वेळीं पहिल्या खेपेलाच हंगेरियन भाषेंत पार्लमेंटमध्यें भाषण करून कौंट

झेचेनी यानें सर्वांना आश्चर्यचकित करून सोडलें. कांहींना तर त्यामुळें चांगला धक्काच बसला. नंतर आपण असहाय आहोंत म्हणून ऑस्ट्रिया-पुढें नमतें घेण्याची शिकवण देणाऱ्या मवाळ लोकांना उद्देशून फ्रॅन्सिस डीक या नांवाचा अत्यंत तळमळीचा व कडवा पुढारी म्हणाला, "तुमचे कायदे पायांखालीं तुडवले जात आहेत आणि तरी देखील तुमच्या तोंडाला खीळ बसली आहे ! स्वतःच्या हक्कावर घाला पडला असतांना जें राष्ट्र त्याचा निषेध करीत नाहीं त्याचा धिक्कार असो. असल्या मुग्धतेनें आपण आपल्या हातांनीं आपल्या गुलामगिरीचे पाश घट्ट करीत आहोंत. जें राष्ट्र अन्याय आणि जुलूम मुकाट्यानें सहन करतें त्या राष्ट्राचा विनाश ठरलेला आहे."

१८४८ मध्यें हंगेरींत लोकांना जबाबदार असलेलें स्वतंत्र सरकार स्थापन होईपर्यंत झगडा चालू होता. त्या नव्या सरकारांत स्वतः डीक न्यायखात्याचा मंत्री झाला. परंतु हा विजय अल्पकालच टिकला. हंगेरीला आपल्या पंजाखालीं ओढण्याचे मनसुबे ऑस्ट्रिया एकसारखा रचीत होता. योग्य संधि येतांच ऑस्ट्रियाच्या सैन्यानें हंगेरीचा प्रदेश व्यापून टाकला; हंगेरीशीं राज्यघटना धुडकावून लावण्यांत आली; पार्लमेंट दडपून टाकण्यांत आलें; राष्ट्रीय संस्था बरबाद करण्यांत आल्या; हंगेरियन भाषेची मुस्कटदाबी करण्यांत आली; कौंटि कौन्सिल्स (स्थानिक संस्था) बरखास्त करण्यांत आल्या आणि देशाचे लष्करी दृष्टीनें तुकडे पाडण्यांत येऊन ते ऑस्ट्रियाच्या हातीं देण्यांत आले. कांहीं काल आशेला कोठेंहि जागा उरली नाहीं.

युरोपांतील मुत्सद्यांनीं असे उद्‌गार काढले कीं हंगेरी खलास झाला. परंतु 'रीसरेक्शन ऑफ् हंगेरी' या आपल्या पुस्तकांत आर्थर ग्रिफिथ्स् यानें लिहून ठेवलें आहे कीं, "फ्रॅन्सिस डीक अजून जिवंत होता आणि त्याच्या जीवनांतच हंगेरीचें सारें जीवन समावलेलें होतें."

तेथून हंगेरीच्या स्वातंत्र्ययुद्धाचा दुसरा कालखंड सुरू झाला. राजकीय आघाडीवर हालचाल करतां येणें शक्य नसल्यामुळें डीकनें शिक्षण व उद्योगधंद्यांसंबंधींच्या राष्ट्रीय स्वरूपाच्या योजना जोरानें पुढें रेटल्या.

१८५७ च्या सुमारास हंगेरीनें केलेली प्रगति हा व्हिएन्ना दरबारांत मोठ्या भीतीचा विषय होऊन बसला होता. ऑस्ट्रियाच्या राजानें हंगेरीचें मन वळविण्याचे निरनिराळे उपाय योजून पाहिले. लांचलुचपत, अधिकार, धमकी सारें कांहीं झालें परंतु डीक अविचल राहिला. हंगेरीचें पार्लमेंट स्वतंत्र सहकार म्हणून मान्य होईपर्यंत ऑस्ट्रियानें सुरू केलेल्या कोणत्याहि गोष्टींशीं सरकार न करण्याचा डीकनें लोकांना आदेश दिला. ऑस्ट्रियाच्या राजानें हंगेरीला दिलेल्या भेटीवर बहिष्कार घालण्यांत आला. तसाच ऑस्ट्रियन मालावरहि बहिष्कार पुकारण्यांत आला.

"कोठल्याहि तऱ्हेच्या हिंसामय कृत्यांनीं वाहवून जाऊं नका किंवा कायद्याची मर्यादा सोडूं नका. आपण निःशस्त्र असूनहि सशस्त्र शक्ती-विरुद्ध टिकाव धरूं शकूं अशी हीच एक सुरक्षित आघाडी आहे. हाल-अपेष्टा सोसावयाच्या झाल्या तरी त्या देखील मोठ्या धीरानें सोसा." हीं डीकनें केलेल्या उपदेशांतील मुख्य सूत्रें होतीं. 'अत्याचार सोडून सर्व मार्गांनीं प्रतिकार' अशी त्यानें घोषणा केली.

हंगेरींतील लोकांनीं ऑस्ट्रियाच्या लोकांना कर देण्याचें साफ नाकारलें. ऑस्ट्रियन अधिकाऱ्यांनीं मालमत्ता ताब्यांत घेतली. परंतु त्याची खरेदी-विक्री करावयास एकहि हंगेरियन तयार झाला नाहीं. कराच्या किंमती-पेक्षांहि मालमत्ता जप्त करणें अधिक खर्चाचें असल्याचें सरकारला आढळून आलें. नंतर कांहीं काल ऑस्ट्रियाच्या सैनिकांची हंगेरींतील घरात राहण्याची सोय करण्यांत आली. लोकांनीं शारीरिक प्रतिकार केला नाहीं परंतु असहकाराचें धोरण स्वीकारलें. कोठल्याहि तऱ्हेची मदत करण्याचें जनतेनें शांतपणें नाकारल्यामुळें ऑस्ट्रियन सैनिकांना परिस्थिति असह्य होऊन गेली. ऑस्ट्रियन मालावरील बहिष्कार सरकारनें बेकायदा ठरवला. परंतु हंगेरियनांनीं आपलें पाऊल मागें घेतलें नाहीं. सारे तुरंग भरून गेले. ऑस्ट्रियाच्या पार्लमेंटांत एकहि प्रतिनिधि धाडण्याचें हंगेरीनें नाकारलें. कौंटि कौन्सिलांनीं देखील ऑस्ट्रियाच्या देखरेखीखालीं काम करण्याचा इन्कार केला. त्यानंतर फ्रान्सिस जोसेफनें तडजोड घडवून आणण्याची खटपट केली. कैद्यांची मुक्तता करण्यांत येऊन थोडीफार स्वायत्तता

देण्यांत आली. परंतु हंगेरियनांनीं संपूर्ण हक्क मिळाले पाहिजेत असा आग्रह धरला. रागारागानें राजानें सक्तीच्या लष्करभरतीचें फर्मान सोडलें. परंतु जनतेनें तें फर्मान मानण्याचें नाकारलें.

अखेर ऑस्ट्रियाला नमतें घ्यावें लागलें. १८-२-१८६७ रोजीं हंगेरीला राज्यघटनेचे सर्व अधिकार मिळाले.

इंग्लंडमधील सार्वत्रिक संप

कोळशाच्या खाणींतील कामगारांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठीं १९२६ सालच्या मे महिन्यांत ग्रेट ब्रिटनमध्यें झालेला महान् सार्वत्रिक संप सदोष पुढारीपण व इतर कारणें यांमुळें जरी अयशस्वी झाला असला तरी सामुदायिक अनत्याचारी प्रतिकाराचें एक उत्तम उदाहरण म्हणून त्याकडे बोट दाखवितां येईल. सरकारनें अत्याचाला चिथावणी दिली असतांहि संपावर गेलेल्या सामान्य कामगारांनीं जवळ जवळ निरपवादपणें संपाचे नऊहि दिवस आपल्या भाषणांत आणि कृतींत अनत्याचार व शिस्त पाळली. आणि त्यांची वृत्ति आश्चर्य वाटण्याइतकी खिलाडू, एकनिष्ठ, संघटित आणि कडवी होती. संपांत जवळ जवळ तीस लाख कामगार गोवले गेले होते. १९२५ च्या जुलैमध्येंच ब्रिटिश ट्रेड युनियन कॉंग्रेसनें संपास मान्यता दिली होती. लेबर कॉंग्रेसच्या जनरल कौन्सिलकडे संपाचे सर्व अधिकार देण्यांत आले होते. परंतु असें म्हणतां येईल कीं त्यामुळें उद्भवणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्याची पुरेशी तयारी करण्यांत आली नाहीं. उलट संप टाळण्याचीच कौन्सिल खटपट करीत होतें. पुढाऱ्यांची ही वृत्तिच अखेर संप अयशस्वी होण्यास कारणीभूत झाली.

उलटपक्षीं सरकारनें सर्व सिद्धता केली होती आणि सुरुवातीपासूनच या संपाच्या उभारणीमागें आर्थिक गाऱ्हाणीं नसून ब्रिटनची राज्यघटना व सरकार उलथून पाडण्याचा क्रांतिकारी प्रयत्न आहे अशी हाकाटी करण्यास सुरवात केली. सरकारनें आगगाड्या व वहातुकीचीं इतर साधनें चालविण्यासाठीं पुरेसे मध्यमवर्गीय लोक जमा केले. वस्तुतः तो संप क्रांतीचा प्रयत्न होता या आरोपांत काहींहि तथ्य नव्हतें.

संपाच्या तिसऱ्या दिवशीं हाऊस ऑफ कॉमन्समध्यें केलेल्या भाषणांत

सर जॉन सायमन यांनीं असें जाहीर केलें कीं हा सार्वत्रिक संप बेकायदा आहे आणि संपांत भाग घेणाऱ्या कामगारसंघांचे पैसे जप्त होऊं शकतील. संपावर गेलेल्या प्रत्येक कामगारानें नोकरीचा करार मोडला असून त्याबद्दल त्याच्याकडून नुकसानभरपाईहि वसूल करतां येईल. पांच दिवसांनंतर न्या० ॲशबरी यांनीं दिलेल्या निकालपत्रांत सर सायमन् यांचें मत ग्राह्य धरलें.

पूर्वतयारी, परस्परसहकार्य व केंद्रीकरण यांचा या संपाचे वेळीं अभाव होता. त्यांतच वरील निकालपत्रानें कामगारांवर झालेल्या मानसिक परिणामाचीहि भर पडली. जनरल कौन्सिलच्या तोंडचें पाणी पळालें. दुसऱ्या दिवशीं ज्यांना पाठिंबा देण्यासाठीं संप सुरू करण्यांत आला होता ते खाणीकामगार किंवा संपावर गेलेले इतर कामगार यांच्याबरोबर विचारविनिमय न करतां जनरल कौन्सिलनें मुख्य प्रधानांची गांठ घेऊन बिनशर्त शरणागति दिली व संप मागें घेतला. या अचानकपणें झालेल्या विश्वासघातामुळें कामगार गोंधळून गेले. त्यांची त्रेधा उडाली व ते पक्षुब्धहि झाले. त्यानंतर बऱ्याच कामगारांची छळणूकहि सुरू झाली. कामगारसंघ देखील आपली इभ्रत, कांहीं कायदेशीर हक्क व मुख्य म्हणजे आत्मविश्वास गमावून बसले.

'दि पॉवर ऑफ् नॉन्व्हायोलन्स्' या आपल्या पुस्तकांत श्री० ग्रेग संपाच्या पराभवाच्या कारणाचें विवेचन खालीलप्रमाणें करतात:—

"सामान्य कामगारांच्या दृष्टीनें पहातां सार्वत्रिक संप जवळ जवळ संपूर्णपणें अनत्याचारी असला तरी पुढाऱ्यांची वर्तणूक खऱ्या अर्थानें अनत्याचारी प्रतिकाराची नव्हती. ते एकदिल झाले नव्हते अगर त्यांचा निर्धारहि पक्का नव्हता बहुधा आपल्या वैयक्तिक सुखाचा त्याग करण्याची त्याची तयारी नसावी किंवा संप करण्याच्या हक्कासाठीं तुरुंगांत जाण्यास ते तयार नसावेत. कामगारसंघांनीं वर्तमानपत्रांचें प्रकाशन चालू ठेवण्याची मागणी नाकारली. सत्याचा प्रसार करण्याच्या कामीं त्यामुळें मोठाच अडथळा आला व संपाचे विरोधक किंवा सामान्य जनता यांच्याविषयीं जो आदर व्यक्त करण्यास हवा होता तो त्यामुळें व्यक्त केला गेला नाहीं.

तसेंच बहुतेक सामान्य कामगारांनाहि अंधारांत ठेवल्यासारखें झालें. त्यामुळें कामगारांच्या बाजूनें मध्यमवर्गाचा संघटित पाठिंबा मिळवतां आला नाहीं. खाणीकामगारांच्या एका पुढाऱ्यानें आपल्या एका भाषणांत चुकीचीं विधानें केलीं व कांहीं प्रसंगोचित घटनांची माहिती दाबून ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांची अंतःप्रवृत्ति प्रक्षोभ, तिरस्कार व हिंसा यांनीं भरून गेली असल्याचेंहि त्यांच्या भाषणावरून दिसून आलें. जनरल कौन्सिलनें केलेल्या विधानांतहि शेवटीं शेवटीं कांहीं सत्य गोष्टी दडवून ठेवण्यांत आल्या होत्या. जनरल कौन्सिलनें केलेला प्रतिकार मनापासूनचा नव्हता तर नाखुषीनें केलेली ती नुसती दमबाजी होती. खरा अनत्याचाराचा गाभा त्यांत प्रतीत झाला नव्हता."

हें विवेचन बरोबर असेल तर खरा अनत्याचारी प्रतिकार म्हणजे नेमकें काय असलें पाहिजे व काय नसलें पाहिजे याचें उत्कृष्ट स्पष्टीकरण आहे. खराखुरा अनत्याचार तेथें पाळला गेला असता आणि संप यशस्वी झाला असता तर किती चांगलें झालें असतें असेंच कोणालाहि झालें तरी वाटेल. त्यामुळें अनत्याचाराच्या गतिशास्त्राचें दर्शन स्पष्टपणें झालें असतें.

पेक्स येथील खाणीकामगार

१९२६ मधील इंग्लंडचा सार्वत्रिक संप अनत्याचारी प्रतिकारांत– विशेषतः पुढाऱ्यांत– मूलभूत उणिवा राहिल्यामुळें अयशस्वी झाला पण हंगेरींतील पेक्स येथें झालेल्या संपानें व अखेरीला त्यांत मिळालेल्या यशानें एक गोष्ट सिद्ध करून दाखवली तीही कीं कांहीं मोजक्या निश्चयी लोकांनीं अचूक भूमिका स्वीकारून शेवटपर्यंत तिची कांस धरली तर ते काय पाहिजे तें करून दाखवूं शकतात.

या लढ्यामागील सवाल सरळ सरळ आर्थिक होता. जादा काम आणि आठवड्याला सुमारें चवदा शिलिंग इतका पगार या मागण्यांसाठीं पेक्स येथील बाराशें खाणीकामगार १९३४ सालीं संपावर गेले. मंदीमुळें त्याना आठवड्यांतून फक्त तीन दिवस काम असे. मजुरी अत्यंत अपुरी मिळत असे. त्यांतच त्यांच्या पगारांत आठ टक्के कपात करण्यांत आली.

कामगार खाणीच्या तळाशीं असतांनाच संप पुकारण्यांत आला. ते

तेथेंच बसून राहिले आणि त्यांच्या मागण्या मान्य झाल्याखेरीज वर येण्याचें त्यांनीं नाकारलें. दोन दिवसांनंतर त्यांच्यापैकीं चव्वेचाळीस जणांना प्रकृति बिघडल्यामुळें वर नेण्यांत आलें. भूक, तहान आणि थकवा यांनीं ते व्याकूळ झाले होते. त्यांच्यापैकीं कांहीं जण बेशुद्ध स्थितींत होते. कित्येक जण बरळत होते आणि कांहीं अगदीं मरणाच्या पंथाला लागले होते. हंगेरियन सरकारनें पेक्सभोंवतालच्या क्षेत्रांत धोका निर्माण झाला आहे असें जाहीर करून त्या ठिकाणीं लष्कर बसविलें. खाणीकामगारांबरोबर झालेल्या वाटाघाटींतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं.

कामगारांनीं खालूनच निरोप पाठवला कीं "आमच्या सर्व मागण्या मान्य करण्यांत येतील असें वचन तुम्ही आतांच्या आतां दिल्याखेरीज पुढें बोलणीं करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. बाहेर येऊन उपासमारीनें मरण-यातना भोगण्यापेक्षां आम्ही येथेंच गुदमरून प्राणत्याग करतों. ... आम्ही स्वतःला हंगेरियन म्हणवतों आणि हंगेरियन म्हणून आम्ही खाणीच्या तळांतून हृदय पिळवटून मारलेल्या करुण किंकाळ्या आमच्या देशबांधवांच्या कानांपर्यंत जातील अशी आम्हांला आशा आहे. ... आम्ही लढाईतील सैनिक होतों त्या वेळीं आम्हांला संरक्षण मिळालें होतें; आज आम्ही उत्पादनांतील सैनिक बनलों आहोंत आणि तशाच तऱ्हेचें संरक्षण आम्हांला मिळावें असा आमचा दावा आहे." नंतर त्यांनीं ३४५ शवपेट्या पाठवून देण्याची विनंति केली आणि असा निरोप धाडला कीं "मरण पत्करण्याचा आमचा निर्धार झाला आहे. आमची आठवण विसरून जा. मुलांबाळांना आमचे अखेरचे आशीर्वाद."

तिसऱ्या दिवशीं खाणीमालकांनीं दुसऱ्या ३,००० कामगारांनिरुद्ध टाळेबंदी पुकारली. त्यामुळें खाणीभागांतील ४०,००० लोकांत आणखीच कटुता निर्माण झाली. रस्त्यावर लष्कराची गस्त सुरू झाली. संपाविषयीं सहानुभूति बाळगणारे व हा प्रकार समक्ष बघितलेले दोन साक्षीदार तडजोडीचा प्रयत्न करण्यासाठीं कामगारांकडे गेले. सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा पार्लमेंटचा सभासद चार्लस् पेअर म्हणतो, "मीं अनेक जहाल संप बघितले आहेत परंतु पेक्स संपांत आढळून आलेल्या

घोर निर्धाराची बरोबरी कशाशींच होऊं शकणार नाहीं.” त्याचप्रमाणें जनरल जेमॉस ईस्टर गेलोज या हंगेरियन पार्लमेंटच्या डेमोक्रॅटिक् सोशॅलिस्ट् सभासदानें खाणीच्या तळाशीं कोणीं आत्महत्या करूं नये म्हणून कामगारांना त्यांच्या मित्रांनीं खांबाशीं बांधून ठेवलेलें पाहिलें. त्याला तेथें मूर्तिमंत भूक, थकवा, सामुदायिक उन्माद पहावयास मिळाला. ‘माझ्या आयुष्यांतील एक भयंकर दृष्य’ असें त्यानें या घटनेचें वर्णन केलें आहे. तो पुढें म्हणतो, “कमालीचे श्रान्त होऊन त्या उकाड्याच्या काहिलींत खाणीच्या तळाशीं दमट जमिनीवर कोळशाच्या भल्या मोठ्या चिपा उशाला घेऊन ते दाटीवाटीनें पडले आहेत.”

चार दिवसांनंतर तडजोड मान्य करण्यासाठीं त्यांचें मन वळवण्यांत आलें. सरकारी आगगाड्यांनीं कंपनीकडून जास्त कोळसा खरीदण्याचें कबूल केलें. सरकारनें पगारकपातीबाबत चौकशी करण्याचें जाहीर केलें. कंपनीनें कोणत्याहि कामगाराला संपाबद्दल त्रास देण्यांत येणार नाहीं असें अभिवचन दिलें व थोडासा बोनसहि दिला.

परंतु संपवाले बरे झाले त्या वेळीं त्यांना समाधानाला कोठेंच जागा दिसली नाहीं. त्यांचें म्हणणें असें कीं त्यांनीं त्या अटी कबूल केल्या त्या वेळीं त्यांचीं मनें अत्यंत दुर्बल झालीं होतीं व ते काय करीत होते याची त्यांना पुरेशी जाणीव नव्हती. चार दिवस खाणींत राहिल्यामुळें ते इतके थकले होते कीं त्यांचा स्वतःच्या मनावर ताबा उरला नव्हता.

साडेतीन महिन्यांनंतर पेक्स येथील ६९८ खाणीकामगारांनीं दहा टक्के पगारवाढीसाठीं पुन्हां संप पुकारला. टाळेबंदी व लष्करी सत्तेचें प्रदर्शन हे नेहमींचे प्रकार झालेच परंतु एकोणतीस तासांतच व्यवस्थापकानीं त्यांची मागणी मान्य केली आणि कामगारांना संपाबद्दल त्रास न देण्याचेंहि कबूल केलें.

या संपासंबंधीं श्री० ग्रेग यांनीं पुढील उद्गार काढले आहेत:—“संपांतील कांहीं कृत्यें आणि त्यांतल्या कांहीं कामगारांची अंतःप्रवृत्ति हिंसक असली तरी त्यांची तीव्र निराशा, त्यांनीं स्वतःवर लादून घेतलेल्या हालअपेष्टा, त्यांची एकजूट आणि सहनशीलता, त्यांच्यावरील अन्यायामागील स्पष्ट-

पणा हें सारें इतकें विलक्षण होतें कीं त्यामुळें जगाचीं बेपर्वाई आणि अज्ञान कोठच्या कोठें नाहींसें झालें. दुसऱ्या संपानंतर मालकांना कामगारांच्या सर्वच्या सर्व मागण्या मान्य करणें भाग पडलें.

दुखोबार—दुखोबार ही कॉकेशसमधील शेतकऱ्यांची एक ख्रिस्ती जमात होती. दुखोबार याचा बरोबर अर्थ आत्मशक्तीनें झगडणारे असा होतो. पीटर व्हेरिजिन् नांवाच्या त्यांच्या पुढाऱ्याला ते देवाप्रमाणें मानीत. त्याच्या सांगण्यावरून १८९६ मध्यें त्यांनीं लष्करांत नोकऱ्या करण्याचें नाकारलें. त्यांच्यावर कोझॅक सैन्य चालून गेलें व त्यांना निर्दयपणें फटके मारण्यांत आले. १८९६ च्या ऑगस्टमध्यें कैद्यांच्या तुकडींतील त्या जमातीचा एक माणूस मारपिटीला बळी पडल्यानें पहिला हुतात्मा ठरला. आणि त्यानंतर शेंकडों लोक थंडीवारा, उपासमार आणि जेथें काम मिळणें शक्य नाहीं अशा वाईट हवेच्या ठिकाणीं त्यांची झालेली हद्दपारी यामुळें प्राणास मुकले.

त्या सत्प्रवृत्त व कामसू शेतकऱ्यांची नंतर गांजणूक करण्यांत आली आणि लष्करी नोकऱ्या नाकारण्याबद्दल त्यांच्यावर खटले भरण्यांत आले.

१८९६ च्या डिसेंबरमध्यें 'धावा' असा मथळा असलेला एक लेख ब्रिरुकोव्ह, ट्रेगुबोव्ह, चर्टकोव्ह यांनीं प्रसिद्ध केला. आणि टॉलस्टॉयनें त्याला पुस्ती जोडली. त्यांपैकीं पहिल्या दोघांना हद्दपारी झाली आणि दुसऱ्याला देशत्याग करावयास सांगण्यांत आलें.

१८९८ च्या सुमारास दुखोबारांना देशत्यागाची परवानगी मिळाली आणि १ ऑक्टोबर १८९८ रोजीं खिलकोव्ह व आयमरमोड यानें त्यांच्यांतील पहिलीं दोन कुटुंबें कॅनडास नेलीं. तेथें लष्करभरतीला त्यांनीं दाखवलेला विरोध मान्य करण्यांत आला. अन्यथा शान्त नागरिक म्हणून ते ओळखले जाऊं लागले. रशियामधून कॅनडांत प्रयाण करण्यासाठीं ७३६३ दुखोबरांना सवलती देण्यांत आल्या.

त्यांच्या स्वतःच्या काहीं रूढ धर्मभोळ्या समजुती होत्या. त्यामुळें ते कॅनडांतील लोकांशीं समरस होऊं शकले नाहींत आणि कोठल्याहि प्रकारच्या सरकारी नियंत्रणाबाबत त्यांच्या मनांत अढी होती त्यामुळें जन्म-

मृत्यूची नोंद करण्याचें देखील त्यांनीं नाकारलें.

कसबी, शेतकरी व बागवान म्हणून त्यांनीं लौकिक मिळवला. व्हेरिजिन देखील त्यांच्याबरोबर कॅनडांत स्थायिक झाला.

कारवारांतील अनत्याचारी प्रतिकार

ब्रिटिश आक्रमणाच्या सुरवातीच्या काळांत कारवार जिल्ह्यांतील लोकांनीं ब्रिटिशांचा प्रतिकार कसा केला त्याचें उदाहरण खालीं दिलें आहे.

आज कर्नाटक प्रांतांत उत्तर कानडा व दक्षिण कानडा असे दोन जिल्हे असले तरी १८६२ पूर्वीं त्या दोहोंचा मिळून एकच जिल्हा होता व तो मद्रास इलाख्यांत मोडत असे. १८६२ मध्यें त्याचे दोन भाग पाडण्यांत येऊन उत्तर कानडा मुंबई इलाख्याला व दक्षिण कानडा मद्रास इलाख्याला जोडण्यांत आला. ब्रिटिश अमदानीपूर्वी कानडा जिल्हा म्हैसूरच्या राज्यांत अंतर्भूत असे. १७९९ मध्यें इंग्रजांनीं म्हैसूरच्या लढाईंत टिपू सुलतानाचा पराभव करून त्याचें सगळें राज्य खालसा केलें व त्याच वेळीं सर टॉमस् मन्रो यानें कानडा जिल्ह्याचा ताबा घेतला.

नव्या राजसत्तेपुढें कानडामधील लोकांनीं सहजासहजीं मान तुकवली नाहीं. सर टॉमस् मन्रोनें जिल्ह्यांत प्रवेश केल्याबरोबर तेथील लोकांनीं त्याच्याविरुद्ध कडव्या प्रतीचा अनत्याचारी प्रतिकार केला. सर टॉमस् मन्रोनें लिहिलेल्या पत्रावरून आपल्याला त्याची चांगली कल्पना येते.

पूर्ण असहकार, राजकीय व सामाजिक बहिष्कार आणि जरूर त्या वेळीं गांवेंच्या गावें सोडून जाणें हे त्यांनीं अवलंबिलेले मार्ग होत. लोकांना जमीन-महसुलाची नवी पद्धति मान्य करण्यास भाग पाडून ब्रिटिश राजवट रुजविण्याचा सर मन्रोचा इरादा होता. परंतु जमीनमालकांनीं जुने हिशेब दाखविण्याचें मुळीं साफ नाकारलें. तशीच वेळ आल्यास ते बहुतेक कागदपत्र जाळूनहि टाकीत असत असें म्हणतात. नंतर सर मन्रोनें मनास आली तशी केवळ जुलमानें जमिनीची फाळणी करण्याचा चंग बांधला. जमीनदार व खंडकरी यांच्या विरोधी हितसंबंधाचा फायदा घेऊन त्यानें त्यांच्यांत फूट पाडली. अशा रीतीनें कारवाया व जुल्म यांच्या जोरावर कांहीं वर्षांनीं त्यानें कानडावर आपला पगडा बसवला.

मन्रोच्या पत्रांतील खालीं दिलेले उतारे याची चांगली साक्ष देतातः—

२० डिसेंबर १७९९ रोजीं हळर्दापूर (उत्तर कानडा) येथून सर टॉमस् मन्रो यानें लिहिलेल्या पत्रांतील उताराः—

"येथील रयत ही उच्छृंखल आणि शिरजोर आहे....माझ्या उद्देशांचा सुगावा लागतांच त्यांनीं मला पेचांत आणण्यासाठीं कारवाया सुरू केल्या....त्यांनीं कचेरींत यावयाचें नाकारलें....मीं पाठवलेल्या कांहीं अंमलदारांना विस्तव किंवा पाणीदेखील मिळूं न देऊन त्यांना जनळ जवळ उपासमार घडविली. मी एखाद्या खेड्यांत जातांच तेथील लोक दुसरीकडे निघून जात. त्यामुळें कित्येक आठवडेपर्यंत मला या जिल्ह्यांत जाईन तेथें एकहि माणूस आढळत नसे. जर त्यांनीं फ्रेंच लोकांप्रमाणें उठाव न करता किंवा आपल्या हक्कांचे खलिते न धाडता आपला वेळ कचेरींत येऊन निरनिराळ्या खेड्यांतील पीकपाण्याची चर्चा करण्यांत घालविला असता तर आज आहे त्यापेक्षां जमिनीची आकारणी अधिक बिनचूक झाली असती. भरणा करण्याच्या दृष्टीनें त्यांना व वसूल करण्याच्या दृष्टीनें मला असें दोघांनाहि तें सोयीचें पडलें असतें ... जमनिमालक धीट व दणकट लोक आहेत आणि त्यांना मधल्या दलालांवर अवलंबून ठेवण्याचा तुमचा प्रयत्न ते धुडकावून लावतील."

२५ ऑगस्ट १८०० रोजीं कुंदापूर (दक्षिण कानडा) येथून मन्रो यानें लिहिलेल्या पत्रांतील उताराः—

"कारवारचा सत्ताधीश होण्यापेक्षां मी चांगल्या हवेच्या प्रदेशांत एखाद्या साध्या शिपायाच्या पगारावर देखील दिवस काढणें पसंत करीत."

रौलट ॲक्ट सत्याग्रह : : २०

यापुढील प्रकरणांत गांधीजींनीं राष्ट्रव्यापी प्रमाणावर सुरू केलेल्या सत्याग्रहमोहिमांचा त्रोटक वृत्तान्त येणार आहे. या सर्व मोहिमा अत्यंत

महत्त्वाच्या असून प्रत्येक मोहिमेची हकीकत स्वतंत्र प्रकरणांत दिली आहे. एप्रिल १९१९ मधील रौलट ॲक्ट सत्याग्रह ही यांपैकीं पहिली मोहीम होय.

चंपारण (१९१७) व खेडा (१९१८) येथील छोट्या प्रयोगांनंतर रौलट बिलावर कायद्याचें शिक्कामोर्तब झालें (३-३-१९१९) त्या वेळीं गांधीजींना राष्ट्रव्यापी प्रमाणावर चळवळ सुरू करण्याची संधि आयतीच चालून आली.

पहिल्या जागतिक महायुद्धाचा शेवट नोव्हेंबर १९१८ मध्यें होऊन दोस्त राष्ट्रांचे गळ्यांत विजयश्रीची माळ पडली. या युद्धांत हिंदुस्ताननें आपला योग्य वांटा उचलला होता, विजयसंपादनाच्या कार्यांत आढेवेढे न घेतां आपलें रक्त सांडलें होतें व आपली तिजोरी रिती केली होती. साहजिकच पूर्ण स्वराज्य नाहीं तर निदान स्वराज्याचा पुष्कळसा हिस्सा तरी पदरीं पडेल अशी हिंदुस्तानची अपेक्षा होती. पण भुकेलेल्या हिंदुस्तानच्या तोंडावर फेकण्यांत आलेल्या क्षुल्लक राजकीय हक्कांचें दर्शन होण्यापूर्वीच हिंदी लोकांच्या नागरिकहक्कावर वरवंटा फिरवणारा रौलट कायदा जाहीर करण्यांत आला. राजद्रोहाची यत्किंच नांवनिशाणीहि राहूं न देण्याचें सरकारनें ठरवलें व भारतरक्षण कायदा किंवा वटहुकुमांचा अंमल यांना साजेसे संक्षेपानें चौकशी करण्याचे अधिकार सरकारनें या कायद्यान्वयें आपल्या हातीं घेतले.

हिंदुस्तानांतील क्रांतिकारक गुन्हे व राजद्रोह यांबद्दलचा रौलट रिपोर्ट १९-१-१९१९ रोजीं प्रसिद्ध करण्यांत आला. ६-२-१९१९ रोजीं वरिष्ठ कायदेमंडळांत रौलट बिलें मांडण्यांत आलीं. या बिलांना कायद्याचें स्वरूप प्राप्त झाल्यास आपण त्याविरुद्ध सत्याग्रहाची मोहीम सुरू करूं असें गांधीजींनीं २४-२-१९१९ रोजीं जाहीर केलें. दुसरें बिल गाळण्यांत आलें पण 'इंडियन क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट' या नांवानें पहिलें बिल ३-३-१९१९ रोजीं पसार झालें. या बिलावर कायदेमंडळांत चर्चा चालू असतांनाच गांधीजींनीं त्याविरुद्ध पत्रकें काढलीं व सर्व देशभर दौरा केला. दक्षिण हिंदुस्तानांत तर त्याना विशेष उत्साह आढळून आला. १८ मार्च १९१९ रोजीं त्यांनीं सत्याग्रहासाठीं एक प्रतिज्ञापत्रक प्रसिद्ध

केलें. नवीन स्थापन झालेल्या सत्याग्रहसमितीच्या नांवानेंच हें सर्व करण्यांत आलें. मार्चची ३० तारीख हा सत्याग्रहाचा पाहिला दिवस म्हणून पाळला जावा अशा तऱ्हेच्या सूचना त्यांनीं मद्रासहूनच सर्वत्र पाठविल्या होत्या. पण नंतर ती तारीख ६ एप्रिलपर्यंत पुढें ढकलण्यांत आली. ही नवी सूचना दिल्ली व इतरत्र कांहीं ठिकाणीं पोंहोंचूं न शकल्यानें तेथें ३० मार्च हाच सत्याग्रहदिन म्हणून पाळला गेला.

'जुलमी, स्वातंत्र्य व न्याय यांची होळी करणारें, सबंध हिंदुस्तानचीच नव्हे तर खुद्द सरकारचीहि सुरक्षितता अवलंबून असलेल्या जनतेच्या नागरी हक्कावर गदा आणणारें' असें वर उल्लेखिलेल्या प्रतिज्ञेंत रौलट बिलाचें वर्णन करण्यांत आलें आहे.

२८-२-१९१९ रोजीं काढलेल्या जाहीरनाम्यांत गांधीजी म्हणतात, "(आज आपण) टाकींत असलेलें पाऊल हिंदुस्तानच्या इतिहासांत बहुधा सर्वांत महत्त्वाचें असें ठरणार आहे. ...आत्यंतिक कष्ट सोसण्याचा निर्धार करून, सरकाराविषयीं कोठल्याहि प्रकारचा द्वेषभाव मनांत न बाळगतां प्रतिज्ञाबद्ध सत्याग्रही सरकारला निर्वाणीची विनंति करीत आहेत. आपल्या गाऱ्हाण्यांचें निवारण करण्याचें साधन म्हणून हिंसेच्या कार्यक्षमतेवर जे श्रद्धा ठेवतात अशांना हे सत्याग्रही एक अमोघ उपाय सुचवीत आहेत. शिवाय हा उपाय जो यांचा अवलंब करतो व ज्याच्याविरुद्ध तो केला जातो त्या दोघांनाहि कल्याणप्रद असा आहे.... या अन्यायाचें स्वरूप फार भयंकर असून सर्व सौम्य उपाय पुरतेपणीं फसले असल्याबद्दल सत्याग्रहींनीं स्वतःची खात्री करून घेतलेली आहे."

अखिल हिंदुस्तानांत सत्याग्रहदिन कशा तऱ्हेनें पाळला जावा यासंबंधीं गांधीजींनीं २३ मार्च रोजीं काढलेल्या पत्रकांत ते म्हणतात, "सत्याग्रह ही मुख्यतः एक धार्मिक चळवळ आहे. तपस्या व आत्मशुद्धीचाच तो एक मार्ग होय. आत्मक्लेशानें अन्यायाचें निराकरण करण्याचा किंवा सुधारणा घडवून आणण्याचा सत्याग्रहाचा प्रयत्न असतो. आपल्या मानखंडनेचा व त्यासाठीं करावयाच्या प्रार्थनेचा दिवस म्हणून एप्रिल

सहा तारीख पाळली जावी. (त्या वेळेपर्यंत व्हॉइसरॉयनें या कायद्याला आपली संमति दिलेली असेल.)" सत्याग्रहदिनासाठीं त्यांनीं खालील कार्यक्रम सुचविला:— (१) चोवीस तास उपोषण करावें; मात्र हें उपोषण सरकारवर दडपण आणण्यासाठीं एक संप म्हणून न करतां सविनय कायदेभंगासाठीं सत्याग्रही लायक बनण्यास त्याच्या अंगीं अवश्य शिस्त बाणावी म्हणून पाळण्यांत यावें. ज्यांनीं सत्याग्रहाची प्रतिज्ञा घेतली नसेल त्यांनींहि आपल्या दुखावलेल्या भावनांच्या तीव्रतेचें प्रतीक म्हणून उपोषण करावें. (२) सर्वत्र हरताळ पाळण्यांत यावा. (३) जाहीर सभा भरवून रौलट कायदा मागें घेण्याबद्दल ठराव पास करण्यांत यावेत.

आम जनतेसाठीं हा कार्यक्रम होता. परंतु प्रतिज्ञाबद्ध सत्याग्रहींसाठीं खास कार्यक्रम देण्यांत आला होता. एकट्या मुंबईंतच प्रतिज्ञाबद्ध सत्याग्रहींची संख्या सहाशें होती. आक्षित वाङ्मय व वृत्तपत्रनोंदणी या-संबंधींचे कायदे सविनय मोडण्याची सूचना सत्याग्रहसमितीकडून त्यांना देण्यांत आली होती. इतर गोष्टींबरोबरच शिक्षा, दंड, जप्ती इत्यादींना कोर्टांत बचाव न देतां निर्भयपणें तोंड कसें द्यावें याबद्दल तपशीलवार सूचना देण्यांत आल्या होत्या.

सबंध हिंदुस्तानांतून या चळवळीला चांगला पाठिंबा मिळाला. बहुतेक ठिकाणीं शांततापूर्वक हरताळ, उपोषण, प्रार्थना व प्रचंड जाहीर सभा इत्यादि कार्यक्रम केले गेले. लक्षावधि लोकांनीं त्यांत भाग घेतला. पण दुर्दैवानें कांहीं ठिकाणीं जनतेनें फाजील उत्साह दाखविला. पोलिसांनींहि परिस्थिति सहानुभूतिपूर्वक व चतुराईनें आटोक्यांत आणण्याचा प्रयत्न केला नाहीं. दिल्लींत ३० एप्रिललाच हा दिवस साजरा केला गेला. तेथें पोलिसांनीं गोळीबाराचा अवलंब केला. त्यांत पांच लोक मृत्युमुखीं पडले व कित्येक जखमी झाले. इतरत्रहि सरकारनें आपली दंडुकेशाही गाजविलीच. डॉ० किचलू व डॉ० सत्यपाल आगामी कॉंग्रेसच्या अधिवेशनाची तयारी करण्यासाठीं अमृतसरला गेले असतांना त्यांना पकडून अज्ञात स्थळीं नेण्यांत आलें. सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रक्षोभजनक वर्तनामुळें गुजरानवाला व कसूर येथील लोकांनीं अत्याचाराचा अवलंब केला. अशा तऱ्हेनें

पंजाबमधील परिस्थिति फारच गंभीर बनली. गांधीजींना तातडीनें बोलावण्यांत आलें. ते त्याप्रमाणें जाण्यासहि निघाले परंतु पंजाब सरकारनें त्यांना वाटेंतच अडवून पोलिसपहाऱ्यांत मुंबईस परत पोहोंचतें केलें. या गोष्टीमुळें अमदाबाद व विरमगांव येथील लोकहि फार बिथरले. प्रक्षुब्ध जनसमुदायानें अत्याचारी मार्गाचा अवलंब करून जीवित व मालमत्ता यांवर हल्ले चढवले. नंतर जालियनवाला बाग येथें तर दुर्दैवी घटनांचा कळसच झाला. सरकारी रिपोर्टाप्रमाणें जनरल डायरनें केलेल्या गोळीबारास चारशें निःशस्त्र व असहाय लोक बळी पडले व सुमारें एक हजार लोक जखमी झाले. त्याबरोबरच लष्करी कायदा जारी केला जाऊन मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांनीं प्रजेवर अनन्वित अत्याचार केले. जाहीर रीत्या फटके मारणें, रांगेत जावयास लावणें, झटपट खटले चालवून शिक्षा ठोठावणें इत्यादि गोष्टी चालूच होत्या. कित्येक महिनेपर्यंत पंजाबवर सैतानी अंमलाची कृष्णछाया पसरली होती. ब्रिटिश राजवटीवरील हा कधींहि पुसला न जाणारा काळाकुट्ट कलंक आहे. हें पुरेसें न वाटूनच की काय एकट्या पंजाबमध्यें एकावन्न लोकांना फांशीची सजा दिली गेली व सुमारें दोनशें लोकांना लांब मुदतीचा कारावास भोगावा लागला. अनेकांवर हद्दपारीचे हुकूम बजावण्यांत आले. यांपैकीं कांहीं घटनांचा गांधीजींच्या मनावर फारच परिणाम झाला. सत्याग्रहाच्या नांवाला कलंक फासण्यास कोणाला संधि मिळूं नये म्हणून १८ एप्रिल १९१९ रोजीं गांधीजींनीं चळवळ स्थगित केली. कारण कांहीं कां असेना परंतु लोक सामुदायिक अत्याचारास प्रवृत्त होतात हें त्यांना कळून चुकलें. जनतेकडून होणाऱ्या अत्याचाराची सबब पुढें करून सरकारनें चालवलेली निर्घृण दडपशाहीहि त्यांना थांबवावयाची होती. त्या वेळीं काढलेल्या पत्रकांत गांधीजी म्हणतात, "पूर्वीपेक्षां आज माझी सत्याग्रहावरील श्रद्धा दृढ झाली आहे. सत्याग्रहशास्त्राचें माझें दर्शनच मला ही चळवळ मागें घेण्यास भाग पाडीत आहे.....हिंसक प्रवृत्तीच्या अस्तित्वाची मला जाणीव आहे. ..... अहमदाबाद व विरमगांव येथें झालेल्या अत्याचारा-चा सत्याग्रहाशीं काडीचाहि संबंध नाहीं. त्या अत्याचारांचा सत्याग्रहाशीं

कोठल्याहि प्रकारचा कार्यकारणभाव नाहीं; कांहीं असलॉच तर सत्याग्रहानें तो काबूंत ठेवण्यासच मदत केली आहे..... पंजाबातील घटनांचा सत्याग्रहाशीं संबंध जोडतां येणार नाहीं..... गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा बसून शांतता प्रस्थापित करण्यास सरकारला शक्य त्या सर्व मार्गांनीं अविरत मदत करणें हेंच सत्याग्रही या नात्यानें आजचें आपलें कर्तव्य ठरतें. आपण निर्भयपणें सत्य व अहिंसा या तत्त्वांचा पुरस्कार करीत राहिलें पाहिजे. असें होईल तेव्हांच सामुदायिक सत्याग्रहाचा मार्ग चोखाळण्यास आपण पात्र ठरूं.

२१-७-१९१९ रोजीं गांधीजींनीं एक पत्रक काढून सरकारी धोरणांत इष्ट असा बदल घडून येण्याचीं चिन्हें दिसूं लागल्यामुळें अनेक मित्रांच्या व हितचिंतकांच्या सल्ल्यानुसार आपण सविनय कायदेभंगाचा सध्या अंगीकार करणार नसल्याचें व सरकारला अडचणींत आणण्याचा आपला मानस नसल्याचें स्पष्ट केलें. शुद्ध स्वदेशी व हिंदु-मुसलमान-ऐक्य यांचा प्रचार करण्याचा सर्व सत्याग्रहींना त्यांनीं आदेश दिला.

कांहीं असो, जो रौलट कायदा मागें घेतला जावा म्हणून सत्याग्रहाचा लढा सुरू झाला त्याचें भविष्य ठरूनच गेलें होतें. एकाहि बिलास कायद्याचें स्वरूप कधीं मिळालेंच नाहीं व ज्याला कायद्याचा शिक्का बसला त्याची अंमलबजावणी कधींच केली गेली नाहीं. तो कायदा फक्त कागदोपत्रींच राहिला.

राष्ट्रव्यापी प्रमाणावर झालेला हा सत्याग्रहाचा पहिला लढा होय. अखिल हिंदुस्थान ही या लढ्याची समरभूमि होती. फार काळपर्यंत हा सत्याग्रह चालू राहिला नाहीं ६ एप्रिल ते १८ एप्रिलपर्यंतच फक्त ही चळवळ चालली. एका बाजूस हिंदुस्थान सरकार व दुसऱ्या बाजूस आम जनता असा हा संग्राम होता. नागरी स्वातंत्र्यावर घाला घालणारे अन्याय्य व प्रक्षोभक कायदे जनतेवर लादले गेल्यानें या लढ्यास सुरवात झाली. सत्याग्रहसमितीनें निवडलेल्या कांहीं गैरवाजवी कायद्यांचा सविनय भंग करणें हें या सत्याग्रहाचें स्वरूप होतें. शांततामय हरताळ, उपोषण, प्रार्थना व जाहीर सभा हा कार्यक्रम आम जनतेपुढें ठेवण्यांत आला होता.

दुर्दैवानें अनेक ठिकाणीं सामुदायिक अत्याचारांस सुरवात झाली व सरकारनेंहि अत्यंत निर्घृणपणें दडपशाही करण्यास प्रारंभ केला. अखेरीस रौलट कायदा निष्प्रभावी करून टाकण्याचा सत्याग्रहाचा मूळ हेतु सिद्धीस गेला.

अहिंसक असहकार : : २१

रौलट कायद्यासारख्या एका विशिष्ट अन्यायाविरुद्ध निवडक सत्याग्रहींनीं केलेला विशिष्ट कायद्याचा सविनय भंग हें पहिल्या राष्ट्रव्यापी सत्याग्रहाचें मुख्य लक्षण होतें असें मानलें तर प्राधान्येंकरून पंजाब व खिलाफत प्रकरणाविरुद्ध व तदनुषंगानें स्वराज्यप्रस्थापनेसाठीं सर्व सरकारी राज्यतंत्राशीं अहिंसक असहकार हें दुसऱ्या राष्ट्रव्यापी सत्याग्रहाचें प्रमुख महत्त्वपूर्ण अंग होय असें मानावें लागेल.

२१-७-१९१९ रोजीं आपण पुन्हां ताबडतोब सत्याग्रहमोहीम करणार नाहीं असें गांधीजींनीं जाहीर केलें. याचा अर्थ असा नव्हे कीं सर्व गोष्टी सुरळीत चालल्या होत्या. हिंसक प्रवृत्तीचा पुरता अंदाज न आल्यानें चळवळ सुरू करण्यांत आपल्या हातून हिमालयाएवढी चूक झाली हें गांधीजींनीं नंतर कबूल केलें. पण प्रजेंतील आत्यंतिक असंतोषाचीं कारणें अजूनहि नाहींशीं झालेलीं नव्हतीं व जनता प्रक्षुब्ध होईल अशीं नवीं नवीं कृत्यें सरकार करीतच होतें.

सरकारी दडपणामुळें व हिंदुस्तानला राजकीय सुधारणांचा हप्ता न देण्यांत सरकारनें दाखवलेल्या निगरगट्ट धोरणामुळें दुसऱ्या राष्ट्रव्यापी सत्याग्रहाबद्दल जनतेंत अधिकाधिक उत्साह निर्माण होत होता. पंजाबांतील जालियनवाला बाग व इतर ठिकाणच्या कृष्णकृत्यांबद्दल जबाबदार असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांनीं गोळीबार करण्यांत तारतम्य वापरलें

नाहीं हें मान्य करूनहि सरकारनें त्यांना प्रामाणिकपणाबद्दल प्रशस्तिपत्रें दिलीं व त्यांनीं केलेल्या अपराधांवर पांघरूणहि घातलें. युरोपियन जमातीनें जनरल डायरला विभूतिपदास चढवून २०,००० पौंड किंमतीची तलवार त्याला अर्पण केली. पंजाबांतील अत्याचारांची चौकशी करण्यासाठीं सरकारनें हंटर कमिटी नेमली. पण तिचे कार्य फक्त तेथील कृष्णकृत्यांवर रंगसफेती चढविण्यापुरतेंच होतें. महत्त्वाच्या राजबंद्यांना कमिटीपुढें साक्ष देण्याची परवानगी नाकारली गेल्यामुळें काँग्रेसनें या कमिटीशीं असहकार पुकारला. कमिटीवरील हिंदी सभासदांनींहि आपलें भिन्न मत नमूद केलें. परंतु सरकारनें त्याची पर्वा न बाळगतां मे १९२० च्या अखेरीस कमिटीवरील बहुसंख्याकांचा अहवाल स्वीकृत केला. दरम्यान काँग्रेसनें आपली बिनसरकारी समिति स्थापिली व तिनें २५-३-१९२० रोजीं आपला अहवाल प्रसिद्ध केला. परंतु लगेच सरकारनें तो जप्त केला.

या सर्व अन्यायांच्या जोडीलाच खिलापतीसंबंधीं झालेल्या अन्यायाचीहि भर पडल्यामुळें हिंदुस्तानांतील सबंध मुसलमानसमाज प्रक्षुब्ध झाला. युद्धकालांत ब्रिटिश मुख्य प्रधानानें तुर्कस्तानला सहानुभूतिपूर्ण तहाच्या अटी देण्याचें अभिवचन दिलें होतें. त्याअन्वयें अरबस्तान व मध्यपूर्वेंतील मुसलमानी प्रदेश बिगरमुसलमानांच्या सत्तेखालीं जाऊं न देण्याचें व खिलापतीला धक्का न लावण्याचें कबूल केलें होतें. तुर्की अंमलाखालीं असणाऱ्या बिगर मुसलमानी जनतेला आवश्यक तें संरक्षण देण्याचें मान्य करून तुर्कस्तानमध्यें खलिपाची सत्ता अबाधित चालावी व अरबांची इच्छा असल्यास त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा न येईल अशा तऱ्हेनें अरबस्तान व इतर पवित्र क्षेत्रें यांवर खिलापतीची हुकूमत रहावी अशी मागणी मुसलमानांच्यातर्फे केली गेली. पण १४-५-१९२० रोजीं तुर्कस्तानवर लादलेल्या तहाच्या अटी प्रसिद्ध करण्यांत आल्या त्या वेळीं पूर्वी दिलेलीं सर्व वचनें साफ धुळीस मिळवलीं गेलीं आहेत असें दिसून आलें. पण हिंदी मुसलमानांनीं आतां गोष्टी उगाळीत बसूं नये अशी एक पत्रक काढून व्हॉइसरॉयनीं विनंति केली. परंतु मुसलमानी जनतेंतील असंतोष दिवसेंदिवस वाढतच होता. ब्रिटिश सरकारपाशीं याचना करणें व्यर्थ

आहे हें जेव्हां मुसलमानपुढाऱ्यांना कळून चुकलें तेव्हां सशस्त्र बंडा-व्यतिरिक्त अवलंबावितां येण्यासारखा एकमेव मार्ग जो असहकार त्याचा गांधीजींच्या नेतृत्वाखालीं स्वीकार करण्याचें त्यांनीं ठरवलें.

अशा तऱ्हेनें पंजाबांतील अत्याचार, खिलापतीबाबत झालेला अन्याय यांच्या जोडीला सत्तात्यागाबद्दलची सरकारची अनिच्छा या सर्व गोष्टींमुळें लोकांचा असंतोष वाढत होता व तो त्यांना उठावणी करण्यास प्रवृत्त करीत होता.

याचबरोबर जनतेच्या मनावरील गांधीजींचा पगडा वाढतच होता. त्यांच्यावरील हद्दपारीचा हुकूम रद्द केल्यानें ते १७ ऑक्टोबर १९१९ रोजीं पंजाबला गेले. भयभीत झालेल्या पंजाबी जनतेस त्यांच्या आगमनानें बराच धीर आला. त्यानंतर अमृतसर येथें कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें. तेथें गांधीजींनीं सौम्य धोरण व प्रतियोगी सहकाराचा मार्ग जनतेपुढें मांडला. त्या वेळीं ते आजच्याइतके जहाल नव्हते. त्यांचें म्हणणें कॉंग्रेसनें बहुतांशीं मान्य केलें. त्यांनीं सरकारी अत्याचारांइतकीच जनतेंतील हिंसावृत्तीबद्दलची आपली तीव्र नापसंती दर्शविली. ते म्हणाले, "उन्मत्तपणाचा प्रतिकार उन्मत्तपणानें न करतां विवेकानें केल्यास तुम्ही परिस्थितीवर मात कराल."

१० मार्च १९२० पर्यंत खिलापतीबाबतच्या सरकारी धोरणाबद्दल गांधीजी पूर्ण निराश झाले होते. त्या दिवशीं त्यांनीं काढलेल्या जाहीर-नाम्यांत असहकार सूचित केल्याचें स्पष्ट दिसत होतें. "आपल्या मागण्या मान्य न झाल्यास काय करावयाचें तें थोडक्यांत पाहूं. गुप्तपणानें अथवा उघडपणानें कशाहि तऱ्हेनें केलेली सशस्त्र लढाई हा रानटीपणाचाच मार्ग होय. केवळ आज तो अव्यवहार्य आहे या कारणामुळें कां होईना सध्या त्याचा विचार आपण सोडून दिला पाहिजे.... त्यामुळें असहकार हा एकच मार्ग शिल्लक उरतो. जर आपण हिंसेपासून संपूर्णपणें अलिप्त राहूं तर हा मार्ग जसा अत्यंत विशुद्ध तसाच अत्यंत परिणामकारकहि आहे. सरकारी राज्ययंत्राशीं स्वेच्छेनें केलेला असहकार हीच एक जनतेंतील असंतोष दर्शवणारी कसोटी आहे.

६ एप्रिल ते १३ एप्रिलपर्यंत अखिल हिंदुस्तानांत राष्ट्रीय सप्ताह

पाळण्यांत आला. सप्ताहाची सुरुवात उपोषण व प्रार्थना यांनीं झाली. रौलट कायदा मागें घेण्याची विनंति करण्यासाठीं, पंजाबांतील अत्याचारांची दाद लावून घेण्यासाठीं व खिलापतीबाबत झालेल्या अन्यायाची भरपाई करून घेण्यासाठीं अशा एकंदर तीन सभा या सप्ताहांत भरवावयाच्या होत्या. हरताळ पाळण्यांत येऊं नये अशा सूचना देण्यांत आल्या होत्या. सत्य व अहिंसा यांचें यथार्थ आकलन करून घेऊन पुढील संग्रामासाठीं स्वतःची तयारी करण्याचा आदेश जनतेला देण्यांत आला.

दरम्यान गांधीजी अखिल भारतीय होमरूल लीगचे अध्यक्ष झाले होते. लीगचें नांव बदलून तें 'स्वराज्यसभा' असें करण्यांत आलें. या सभेतर्फे विधायक कार्यक्रमाची चतुःसूत्री जनतेंत प्रसृत केली गेली. हिंदु-मुसलमान-ऐक्य, चरख्यासह स्वदेशीचा प्रसार, राष्ट्रभाषा म्हणून हिंदुस्तानीचा प्रसार व भाषावार प्रांतरचना ही ती चतुःसूत्री होय.

या सुमारासच त्यांनीं निर्भयपणें जाहीर केलें कीं "देशाच्या राजकीय जीवनांत निर्भेळ सत्य व प्रामाणिकपणा आणणें अगदीं शक्य आहे याबद्दल मला तिळमात्रहि शंका नाहीं." राष्ट्रांतील सर्व चळवळींचें अधिष्ठान सत्य व अहिंसा हें रहावें म्हणून आपण रक्ताचा शेवटचा थेंब असेतोंपर्यंत प्रयत्न करीत राहणार असल्याचेंहि त्यांनीं सांगितलें.

इंग्लंडचे त्या वेळचे मुख्य प्रधान लॉइड जॉर्ज यांचेकडे गेलेलें मुसलमानांचें शिष्टमंडळ पुरता भ्रमनिरास होऊन परत आले. गांधीप्रणीत अहिंसक असहकारासारख्या कडक मार्गाचा अवलंब केला पाहिजे या गोष्टीवर जोर देण्यास त्यांनीं सुरवात केली. १४ मे १९२० रोजीं तुर्कस्तानवर लादलेल्या निराशादायक तहाच्या अटी प्रसिद्ध झाल्या व २८ मे १९२० रोजीं खिलाफतसमितीची बैठक भरून तींत असहकाराचा अवलंब करण्याचें ठरविण्यांत आलें.

पंजाबांतील अत्याचाराची सरकारसारख करणारा हंटर कमिटीचा अहवाल मेच्या २८ तारखेस प्रसिद्ध झाला. त्याच महिन्याच्या ३० तारखेस अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीची बैठक भरून सप्टेंबरमध्यें कॉंग्रेसचें खास अधिवेशन भरवण्यांत यावें असें ठरलें.

१ ऑगस्ट १९२० रोजीं अहिंसक असहकाराची मोहीम सुरू करण्यांत येणार असल्याचें गांधीजींनीं जाहीर केलें. खिलाफतसमितीनें यासंबंधीं जूनमध्येंच ठराव केला होता. दुसऱ्या राष्ट्रव्यापी सत्याग्रहमोहिमेबद्दल गांधीजी 'यंग इंडियां'त (२८-७-१९२०) लिहितात, "गेल्या वर्षींचा ६ एप्रिलचा दिवस जितका महत्त्वाचा ठरला तितकाच १ ऑगस्ट हा दिवसहि इतिहासांत महत्त्वाचा ठरणार आहे. ६ एप्रिल रोजीं रौलट कायद्याला मूठमाती देण्याची मुहूर्तमेढ रोंवली गेली....सत्तात्यागाला नाखूष असलेल्या सरकारकडून न्याय मिळवूं शकेल अशी जर कोणती शक्ति असेल तर ती सत्याग्रह हीच होय; मग त्या सत्याग्रहाला सविनय कायदे-भंग अथवा असहकार कांहींहि म्हटलें जावो. ... पूर्वीप्रमाणेंच उपोषण व प्रार्थना यांनीं या मोहिमेला सुरुवात केली जाईल.... सार्वत्रिक हरताळ पाळण्यांत यावा च तहाच्या अटींचा फेरविचाराची मागणी, पंजाबांतील अन्यायाची दाद मागणें व न्याय मिळेपर्यंत असहकार करण्याची शिकवण अंगीं बाणवून घेणें यासाठीं जाहीर सभा भरवाव्यात....या दिवशीं सरकारी पदव्यांचा त्याग करण्यास प्रारंभ केला जावा.... पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जनतेंत शिस्त व व्यवस्थितपणा संघटित केला जावा." त्याचबरोबर त्यांनीं संपूर्ण अहिंसेची आवश्यकता जोरानें प्रतिपादन केली.

४ सप्टेंबर १९२० रोजीं कलकत्ता येथें भरलेल्या काँग्रेसच्या खास अधिवेशनांत १८८६ विरुद्ध ८८४ मतांनीं असहकाराचा ठराव पास झाला. पंजाबांतील अत्याचार व खिलापतीबाबत झालेल्या अन्यायाची दाद लावून घेणें व स्वराज्याची प्रस्थापना करणें हे या ठरावामागील उद्देश होते. डिसेंबर १९२० मध्यें नागपूर येथें काँग्रेसचें प्रचंड अधिवेशन भरलें. तेथें १४५८२ प्रतिनिधि हजर होते. त्यांपैकीं १०५० मुसलमान व १६९ स्त्रिया होत्या. अलोट उत्साहाच्या वातावरणांत काँग्रेसनें असहकाराचा ठराव पास केला. कलकत्त्यास ठरावाविरुद्ध मतें देणारांचें या वेळीं पूर्ण मतपरि-वर्तन झालें होतें. देशबंधु दास यांनीं हा ठराव मांडला व श्री. लाला लजपतराय यांनीं त्याला दुजोरा दिला.

या चळवळीस 'प्रगमनशील अहिंसक असहकार' असें नांव पडलें.

पदव्या व बिरुदें, निवडणुकी व विधिमंडळें, शाळा व कॉलेजें, कोर्ट-कचेऱ्या आणि विदेशी कापड असा पंचविध बहिष्कार हा पहिला कार्यक्रम होता. त्याचप्रमाणें याच्या जोडीला विधायक कार्यक्रमहि देण्यांत आला होता. राष्ट्रीय शाळा व कॉलेजें स्थापणें, लवादमंडळें व ग्रामपंचायती निर्माण करणें आणि चरक्याच्या द्वारें स्वदेशीचा प्रसार करणें हा तो कार्यक्रम होय. तसेंच दरबार अगर इतर सरकारी वा निमसरकारी समारंभांवर बहिष्कार घालावयाचा होता व शांततामय निरोधन करून दारू व इतर मादक पदार्थांची विक्री बंद पाडण्याचाहि प्रयत्न करावयाचा होता. मुलकी वा लष्करी सरकारी नोकरींत कोणींहि भरती होऊं नये असेंहि जनतेला सांगण्यांत आलें.

१९२१-२२ च्या प्रचंड घडामोडींच्या काळांत हिंदुस्तानांत अभूतपूर्व जागृति, उत्साह, एकी व निर्धार दृष्टोत्पत्तीस आला. हिंदु व मुसलमान-समाज जणूं पुरतेपणीं एकरूप होऊन गेला. हरताळ, प्रार्थना व उपोषण या कार्यक्रमानें सुरवात झालेली ही चळवळ वणव्यासारखी चहूंकडे पसरली. जनतेनें स्वयंस्फूर्तीनें मद्यपानबंदीचा कार्यक्रम हातीं घेतला. क्वचित् प्रसंगीं कांहीं ठिकाणीं जमावानें अत्याचाराचा अवलंब केला हें खरें पण एकंदरीनें पहातां ही चळवळ जशी जोरदार व परिणामकारक तशीच अहिंसक झाली असें म्हणावें लागेल. या मुदतींत शेंकडों राष्ट्रीय शाळा स्थापल्या गेल्या. अ० भा० कॉं० क० च्या बेझवाडा येथील बैठकींत कॉंग्रेससभासदसंख्या ५०,००,००० पर्यंत नेण्याचा संकल्प केला गेला. टिळक स्वराज्य फंड ठरलेल्या रकमेपेक्षांहि जास्त जमा झाला व त्याचा आंकडा १ कोटि १५ लाखापर्यंत गेला. हिंदुस्तानांत सुमारें वीस लाख चरखे फिरूं लागले.

बऱ्याच मोठ्या प्रमाणावर देशांत धरपकडहि चालू होती. त्यांतून प्रमुख कार्यकर्ते वगळले गेले नाहींत. ज्या लोकांनीं चळवळीच्या मूळ संघटकांच्या आदेशाच्याहि पुढें जाऊन आपल्या भाषणानें किंवा लिखाणानें जनतेस अत्याचाराची चिथावणी दिली असेल आणि लष्कर व पोलीस यांच्यांत बेदिली माजवण्याचा प्रयत्न केला असेल अशाच लोकांच्यावर खटले भरण्याच्या सूचना प्रांतिक सरकारांना दिल्या गेल्या आहेत असें

हिंदुस्तान सरकारनें १९२० च्या नोव्हेंबर महिन्यांत जाहीर केलें.

परंतु प्रांतिक सरकारांनीं हें तारतम्य वापरल्याचें दिसत नाहीं. नाहीं तर धारवाड वगैरे ठिकाणीं गोळीबाराचे प्रसंग घडले नसते. धारवाड येथील सामुदायिक धरपकड व बनावट खटले हेहि मध्यवर्ती सरकारच्या सूचनांशीं विसंगत असेच होते. बहुतेक सर्व प्रांतांतून प्रमुख काँग्रेसकार्यकर्त्यांना शिक्षा लागल्या होत्या व अनेकांच्या नागरिकस्वातंत्र्यावर बंधनें घालण्यांत आलीं होतीं. बेझवाडा येथें आंखण्यांत आलेल्या कार्यक्रमाची पूर्तता, प्रिन्स ऑफ वेल्सच्या दौऱ्यावरील यशस्वी बहिष्कार वगैरे अनेक कारणांमुळें सरकारचें पित्त खवळून गेलें. खटले भरण्यांत आलेल्या बहुतेक सर्व काँग्रेस-कार्यकर्त्यांनीं कोर्टांत बचाव देण्याचें नाकारल्यामुळें त्या वर्षाच्या अखेरी-पर्यंत बहुतेकांना तुरुंगांत जाऊन बसावें लागलें. डिसेंबरच्या सुमारास क्रिमिनल अमेंडमेंट कायदा जारी करण्यांत आल्यामुळें कोणाहि काँग्रेस-कार्यकर्त्याला सरकारला पकडता येऊं लागलें. संयुक्तप्रांत व बंगालमधील स्वयंसेवकसंघटना सरकारनें बेकायदा ठरवल्या. त्यामुळें काँग्रेसच्या आतां-पर्यंतच्या सर्वसामान्य कार्यक्रमांत अंतर्भूत न झालेला असा सविनय कायदे-भंगाचा परिणामकारक कार्यक्रम हातीं घेण्याची संधि आयतीच चालून आली. सरकारनें आपल्या दडपशाहीमुळें हा मार्ग दाखवून दिला. राज-बंद्यांची संख्या फुगत फुगत डिसेंबरअखेरपर्यंत ३०,००० पर्यंत गेली. सरकारचें लाठीराज्य मात्र त्या वेळीं फारसें कोठें सुरू झालें नव्हतें.

अहमदाबाद येथें फार प्रक्षुब्ध वातावरणांत काँग्रेसचें अधिवेशन भरलें. त्या ठिकाणीं जहाल कार्यक्रमाची मागणी पुढें मांडण्यांत आली. नागपूर काँग्रेसच्या पुढें एक पाऊल जाऊन या अधिवेशनांत जेथें जेथें वातावरण अनुकूल असेल तेथें तेथें सामुदायिक व त्याचप्रमाणें वैयक्तिक सविनय कायदेभंग करण्याचा जनतेला आदेश देण्यांत आला. सरकारनें स्वयंसेवकां-वर भरलेल्या सामुदायिक खटल्यांना उत्तर म्हणून अहिंसेची शपथ घेतलेले ५०,००० स्वयंसेवक नोंदविण्याचें काँग्रेसनें ठरवलें.

सामुदायिक कायदेभंग सुरू करण्याच्या काँग्रेसच्या ठरावानुसार गांधीजींनीं सुरत जिल्ह्यांतील बार्डोली तालुक्यांत करबंदीची प्रचंड चळवळ

सुरू करण्याची योजना आंखली. ३१-१-२२ रोजीं बार्डोली तालुक्यांत भरलेल्या परिषदेनें करबंदीची मोहिम सुरू करण्याची तालुक्याची तयारी असून अ० भा० कॉं० क० नें त्यास परवानगी द्यावी अशा आशयाचा ठराव पास केला. गाऱ्हाणीं निवारण करून घेण्याचे इतर सर्व उपाय निरर्थक ठरल्यानें बार्डोली तालुक्यांत करबंदीची मोहीम आपण सुरू करणार असल्याबद्दलचें सविस्तर पत्र गांधीजींनीं १-२-१९२२ रोजीं व्हॉइसरॉय-कडे धाडलें. उत्तरादाखल सरकारनें आपल्या दडपशाहीच्या धोरणाचें समर्थन करणारें पत्र गांधीजींना पाठवून त्यांत सदर करबंदीमोहीम हातीं न घेण्याबद्दल बजावलें.

पंतु खेदाची गोष्ट अशी कीं दैवाचे फासे कॉंग्रेसच्या विरुद्ध पडत होते. संयुक्तप्रांतांतील गोरखपूर जिल्ह्याच्या एका कोपऱ्यांतील चौरीचौरा नांवाच्या गांवीं कांहीं कॉंग्रेसस्वयंसेवक क्रोधानें बेभान झाले व त्यांच्या हातून वीस शिपाई व एक सब्इन्स्पेक्टर मारले गेले. या घटनेमुळें गांधीजींचें सर्वच वेळापत्रक फिसकटलें. १९२१च्या नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यांत मुंबईंत जातीय दंग्याचे जे प्रकार घडले तसेच पण छोट्या प्रमाणावरील प्रकार प्रिन्स ऑफ वेल्स मद्रास येथें गेला असतांना १३ जानेवारी १९२२ रोजीं घडून आले. अशा तऱ्हेच्या हिंसामय वातावरणांत सविनय कायदेभंगाची चळवळ चालू ठेवणें गांधीजींना योग्य वाटलें नाहीं. म्हणून वर्किंग कमिटीची प्रथम तशी तयारी नसतांनाहि सामुदायिक कायदेभंग मार्गे घेण्याबद्दल गांधीजींनीं कमिटीचें मन वळवलें. कायदेभंगा-ऐवजीं वर्किंग कमिटीनें विधायक कार्यक्रमाची एक विस्तृत योजना आंखली. दिल्ली येथें त्याच महिन्याच्या २४ तारखेला अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीची बैठक भरून वर्किंग कमिटीनें घेतलेल्या निर्णयाला मंजुरी दिली गेली. मात्र आवश्यकतेनुसार वैयक्तिक सत्याग्रह करण्याची मुभा ठेवण्यांत आली.

१० मार्च रोजीं गांधीजींना अटक करून १८ मार्चला त्यांना सहा वर्षांची सजा ठोठावण्यांत आली. कॉंग्रेसच्या सविनय कायदेभंग कमिटीनें नोव्हेंबर १९२२ मध्यें प्रसिद्ध केलेल्या अहवालांत सविनय कायदेभंग

आज देशांत चालू ठेवणें व्यवहार्य होणार नाहीं असा अभिप्राय व्यक्त केला. कौन्सिलप्रवेशाच्या कार्यक्रमाचे वारे त्या वेळींहि वाहूं लागले होते. परंतु 'आंत घुसून असहकार' अशी घोषणा कौन्सिलवादी मंडळी करीत असूनहि त्यांना एक वर्षपर्यंत काँग्रेसचा अधिकृत पाठिंबा मिळाला नाहीं. परंतु सविनय कायदेभंगाची मोहीम मात्र तो वेळपर्यंत थंडावली होती. तसाच अहिंसक असहकारहि मागें पडत चालला होता.

सत्याग्रहाचा दुसरा लढा १ ऑगस्ट १९२० रोजीं खिलाफतसमिती-तर्फे सुरू केला गेला. ४ सप्टेंबर १९२० रोजीं कलकत्ता येथील काँग्रेसच्या जादा अधिवेशनांत त्याला पाठिंबा देण्यांत येऊन तो विस्तृत करण्यांत आला. डिसेंबर १९२० मध्यें नागपूर काँग्रेसनें त्याला आपली संपूर्ण मान्यता देऊन अखिल हिंदुस्तानभर मोहीम सुरू केली. डिसेंबर १९२१ च्या अहमदाबाद अधिवेशनानंतर सविनय कायदेभंग, करबंदी आणि क्रिमिनल लॉ अमेंडमेंट कायद्याचा प्रतिकार या गोष्टी कार्यक्रमांत दाखल केल्या गेल्या. परंतु १२-२-१९२२ रोजीं वर्किंग कमिटीनें सविनय कायदे-भंगाची मोहीम अधिकृतपणें मागें घेतली. थोडक्यांत म्हणजे १ ऑगस्ट १९२० पासून १२ फेब्रुवारी १९२२ पर्यंत ही सत्याग्रहमोहीम ऐन भरांत होती असें म्हणतां येईल.

या मोहिमेमुळें सबंध देशाला चांगलाच हादरा बसला. सर्व जाती-जमातींनीं यांत भाग घेतला. विद्यार्थिवर्गानें या वेळीं फार महत्त्वाची कामगिरी बजावली. त्यांच्यांतील जागृति अपूर्व होती.

अनेक काँग्रेसस्वयंसेवकांच्या हातून अहिंसेशीं विसंगत अशीं कृत्यें अनपेक्षितपणें घडल्यामुळें व सर्वसामान्यपणें वातावरण लढ्याला अनुकूल असें न राहिल्यामुळें ही चळवळ मागें घ्यावी लागली. त्यामुळें चळवळीचें तात्कालिक उद्दिष्ट साध्य होऊं शकलें नाहीं. परंतु अप्रत्यक्षपणें अनेक महत्त्वाचे फायदे घडून आले. सप्टेंबर १९२२ च्या सुमारास येरवडा तुरुंगांत या चळवळीच्या निष्पत्तीविषयीं गांधीजींना कांहीं काँग्रेसकार्य-कर्त्यांनीं प्रश्न विचारले असतां त्यांनीं छातीठोकपणें असें सांगितलें कीं "देश या चळवळीमुळें कमींत कमी तीस वर्षें तरी पुढें गेला आहे."

जवळ जवळ यशोमंदिराच्या उंबरठ्यापर्यंत ही चळवळ जाऊन पोहोंचली होती असा अभिप्राय त्या वेळच्या मुंबईच्या गव्हर्नरनें व्यक्त केल्याचें सांगितलें जातें.

स्वराज्यासाठीं सविनय कायदेभंग : : २२

गांधीजींनीं व्हाईसरॉयला ४-३-१९३० रोजीं पाठविलेल्या पत्रांत ध्वनित केलेल्या कायदेभंगाच्या मोहिमेचें उद्दिष्ट हिंदुस्तानला 'पूर्ण स्वराज्य' प्राप्त करून देणें हें होतें.

प्रत्यक्ष मोहिमेच्या हकीकतीकडे वळण्यापूर्वी तिची पार्श्वभूमि थोडक्यांत समजावून घेऊं. मार्च १९२२ मध्यें गांधीजींना अटक झाल्यानंतर काँग्रेसच्या सविनय कायदेभंग कमिटीनें देशभर दौरा काढला व कांहीं सूचना केल्या. नोव्हेंबर १९२२ च्या शेवटच्या आठवड्यांत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनें त्या सूचनांना जवळ जवळ संपूर्णपणें मान्यता दिली. सामुदायिक कायदेभंगाची चळवळ तहकूब करण्यांत आली. कौन्सिलप्रवेशाचा कार्यक्रम या बैठकीपुढें आला होता. त्या वेळीं जरी तो पुढें ढकलण्यांत आला तरी त्या विचारसरणीला अनुकूल असें मत देशांत हळू हळू बळावत होतें. अपेंडिसायटीसच्या शस्त्रक्रियेच्या कारणावरून गांधीजी ५ फेब्रुवारी १९२२ रोजीं तुरुंगाबाहेर आले. तेव्हां स्वराज्य-पक्षाची स्थापना झालेली होती. एवढेंच नव्हे तर काँग्रेसच्या अनुमतीनें त्यांचें कामकाजहि चालू झालें होतें. गांधीजींना स्वराज्यपक्ष दडपून टाकण्याचा प्रयत्न करणें योग्य वाटलें नाहीं. त्याऐवजीं त्यांना आपल्या मार्गानें जाण्याची गांधीजींनीं अनुमति दिली व स्वतःचें कार्यक्षेत्र मर्यादित करून फक्त अत्यंत विस्तृत प्रमाणावर विधायक कार्यक्रम यशस्वी करून दाखविण्याचें निश्चित केलें. थोडक्यांत म्हणजे १९२४ पासून १९२९

पर्यंतचा काळ म्हणजे विधायक कार्यक्रम व कौन्सिलांतील कार्य अशा दुहेरी कार्यक्रमाचा जमाना होता.

काँग्रेसमधील अधीर वृत्तीचे लोक स्वस्थ बसलें नव्हते. १९२७ च्या सुमारास संपूर्ण स्वातंत्र्याच्या कल्पनेनें हिंदुस्तानांतील लोकांचीं, विशेषतः हिंदी युवकांचीं, मनें मारून गेलीं होतीं. वसाहतीच्या स्वराज्याच्या मागणीचा व त्यामुळें मिळणाऱ्या फायद्यांचा जो बोलबाला केला जात होता त्याचा त्यांना वीट आला होता. पं० जवाहरलाल, सुभाषचंद्र बोस, श्रीनिवास अय्यंगार, सांबमूर्ति वगैरे कांहीं लोकांनीं या नव्या कल्पनेला उचलून धरलें. डिसेंबर १९२७ मध्यें भरलेल्या मद्रास येथील काँग्रेस अधिवेशनांत 'हिंदी जनतेचें उद्दिष्ट संपूर्ण स्वराज्य प्राप्त करून घेणें हें आहे' असा ठराव पास झाला. १९२९ च्या लाहोर अधिवेशनांत काँग्रेसच्या ध्येयपत्रिकेंतहि ही कल्पना समाविष्ट केली गेली. दुसऱ्या एका महत्त्वाच्या घटनेमुळें, वाटल्यास ब्रिटिश सरकारच्या घोडचुकीमुळें म्हणा, १९२१ नंतर कधीं दिसली नव्हती इतकी ऐक्यभावना या वेळीं हिंदी लोकांत दिसून आली. ती घटना म्हणजे हिंदी राजकीय सुधारणांची चौकशी करण्यासाठीं नेमण्यांत आलेलें केवळ गोऱ्या लोकांचें सायमन कमिशन ही होय. हें कमिशन ३-२-१९२८ रोजीं मुंबईत येऊन दाखल झालें. देशव्यापी हरताळ व निषेधप्रदर्शक जाहीर सभा यांनीं त्याचें स्वागत झालें. कमिशनचा निषेध करण्याबाबत हिंदुस्तानांतील सर्व पक्षांचें जवळ जवळ संपूर्ण एकमत होतें. एवढेंच नव्हे तर सर्वांनीं त्याच्याशीं असहकार पुकारला होता. १४-४-१९२९ रोजीं लोकांच्या बहिष्कारामुळें एकाकीपणें करावें लागलेलें आपलें काम संपवून कमिशन विलायतेस परत गेलें. येथील मुक्कामांत त्यानें हिंदुस्तानांतील अनेक मोठमोठ्या शहरांना भेटी दिल्या. जवळ जवळ सर्व ठिकाणीं निषेधार्थी प्रचंड जाहीर निदर्शनें केलीं गेलीं. मद्रास, लाहोर, कलकत्ता वगैरे ठिकाणीं निदर्शकांवर लाठीमार केला गेला. क्वचित् प्रसंगीं पोलिसांनीं गोळीबाराचाहि अवलंब केला.

हिंदी जनमताबद्दल ब्रिटिश सरकारचें किती औदासीन्य होतें हें या

कमिशनच्या नेमणुकीनें दाखवून दिलें. हिंदी राजकीय आकांक्षांबाबत ब्रिटिश सरकारची इतकी उदासीन वृत्ति दिसून आल्यानंतर कॉंग्रेसनें प्रत्यक्ष कृतीचा कार्यक्रम हातीं घेण्याचें ठरवलें. दरम्यान हिंदुस्तानसाठीं वसाहतीच्या स्वराज्याच्या धर्तीवर एखादी राज्यघटना तयार करण्यासाठीं कॉंग्रेसनें पं० मोतिलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालीं एक समिति नेमली होती. सप्रू व जयकर यांसारखे विख्यात प्रागतिक पुढारीहि या समितीवर होते. १९२८ च्या अखेरीस लखनौ येथें भरलेल्या सर्वपक्षपरिषदेंत या समितीनें तयार केलेली घटना मंजूर करण्यांत आली. त्याच वर्षी कलकत्ता येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत सर्वपक्षपरिषदेनें मंजूर केलेली ही घटना ब्रिटिश पार्लमेंटनें ३१ डिसेंबर १९३१ चे आंत जशीच्या तशी मान्य केल्यास ती राबवून घेण्याचें अभिवचन देण्यांत आलें. पण त्याबरोबरच पार्लमेंटनें ही घटना नामंजूर केल्यास असहकाराची मोहीम सुरू करण्यास, येवढेंच नव्हे तर करबंदीची देखील चळवळ हातीं घेण्यास किंवा अन्य मार्गानें सविनय कायदेभंग सुरू करण्यास, कॉंग्रेसला मुभा राहील असें जाहीर करण्यांत आलें. १९३० सालीं सुरू होणाऱ्या चळवळीचीं बीजें अशा तऱ्हेनें रोवलीं गेलीं.

सरकारनें या टरावाकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. याच वर्षी सायमन कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला. ब्रिटिश सरकारनें आपलेंच घोरण पुढें चालू ठेवलें होतें. २३-२-१९२९ रोजीं, म्हणजे लाहोर तेथील कॉंग्रेस अधिवेशनापूर्वी एक आठवडा, व्हाइसरायनें गांधीजी व मोतीलाल नेहरू यांस मुलाखतीस बोलावलें होतें. या मुलाखतींत वसाहतीच्या स्वराज्याच्या प्रश्नाचा सोक्षमोक्ष करून घेण्याची गांधीजींची इच्छा होती. हिंदुस्तानला निश्चितपणें वसाहतीचें स्वराज्य ताबडतोब देण्याचा आगामी गोलमेज परिषदेचा हेतु आहे काय असा खडा सवाल गांधीजींनीं व्हाइसरॉयला विचारला. परंतु व्हॉइसरॉय कोणत्याहि प्रकारचें अभिवचन गांधीजींस देऊं शकला नाहीं. याबाबत सरकारनें पूर्वी केलेल्या गुळमुळीत घोषणेपलीकडे व्हॉइसरॉय जाऊं शकला नाहीं. ब्रिटिश मुत्सद्दी या प्रश्नाची टोलवाटोलव करीत होते हें यामुळें स्पष्ट झालें. त्यामुळें साहजिकच लाहोर

अधिवेशनांतील मुख्य ठराव संपूर्ण स्वातंत्र्यावरच केंद्रित झाला होता. ३१ डिसेंबर १९२९ रोजीं कॉंग्रेसच्या ध्येयांत 'स्वराज्य' याऐवजीं 'संपूर्ण स्वराज्य' असा बदल करण्यांत आला. स्वातंत्र्याच्या मोहिमेची पूर्वतयारी करण्यासाठीं म्हणून विधिमंडळांतील कॉंग्रेससभासदांना आपल्या सभासदत्वाचे राजिनामे देण्यास सांगण्यांत आलें आणि लोकांनीं निवडणुकींत भाग घेऊं नये असा आदेश देण्यांत आला. त्याच ठरावांत पुढें असें म्हटलें आहे कीं " कॉंग्रेसचा विधायक कार्यक्रम जनतेनें निष्ठापूर्वक पार पाडावा अशी विनंति ही कॉंग्रेस करीत असून योग्य वाटेल त्या वेळीं करबंदीसकट सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा अधिकार अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीकडे देण्यांत येत आहे. ..." १९३० च्या कायदेभंगाची औपचारिक सुरवात अशा तऱ्हेनें झाली.

नव्या वर्किंग कमिटीची बैठक २-१-१९३० रोजीं भरली. मध्यवर्ती विधिमंडळांतील एकवीस सभासदांनीं, मध्यवर्ती कौन्सिलांतील नऊ सभासदांनीं व निरनिराळ्या प्रांतिक कौन्सिलांतील १७२ सभासदांनीं आपापले राजीनामे देऊन टाकले. हा पाठिंबा समाधानकारक होता. वर्किंग कमिटीनें २६ जानेवारी १९३० हा दिवस देशभर स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्यांत यावा असें ठरविलें. त्या दिवशीं घ्यावयाची प्रतिज्ञा तयार करण्यांत येऊन तिच्या प्रती सर्वत्र वांटण्यांत आल्या.

२५-१-१९३० रोजीं मध्यवर्ती विधिमंडळांत केलेल्या भाषणांत व्हॉइसरॉयनें पुष्कळ मुद्यांचें स्पष्टीकरण केलें. वसाहतीचें स्वराज्य हें हिंदुस्तानचें अंतिम ध्येय म्हणून जाहीर करण्यांत आलें असलें तरी तें आजच अंमलांत आणण्याचा सरकारचा इरादा नाहीं असें त्यानें जाहीर केलें. त्यामुळें कॉंग्रेसनें स्वीकारलेलें धोरण जास्तच समर्थनीय ठरलें. उलटपक्षीं स्वातंत्र्याचें सार म्हणून ओळखला जाणारा आपला अकराकलमी मसुदा गांधीजींनीं प्रसिद्ध केला व या अकरा मागण्या मान्य केल्या गेल्यास कायदेभंगाचा प्रश्नच उत्पन्न होणार नाहीं असें ते म्हणाले. परंतु या साध्या पण महत्त्वाच्या मागण्या जर मान्य झाल्या नाहींत तर कॉंग्रेसला

कायदेभंगाचा मार्ग अनुसरावा लागेल हेंहि त्यांनीं स्पष्ट केलें. इतर राष्ट्रांना दुसरे निरानिराळे मार्ग असूं शकतील परंतु हिंदुस्तानपुढें अहिंसक असहकार हा एकच एक मार्ग मोकळा आहे असें त्यांनीं जाहीर केलें.

अपार उत्साहाच्या वातावरणांत सर्व हिंदुस्तानभर स्वातंत्र्यदिन साजरा करण्यांत आला. यामुळें देशांतील अमर्याद सुप्त शक्तीची कल्पना गांधीजींना आली. १४-२-१९३० रोजीं साबरमती येथें सुरू झालेल्या वर्किंग कमिटीच्या बैठकींत इष्ट वाटेल तेव्हां योग्य त्या मार्गानें सत्याग्रहमोहीम सुरू करण्याचे अधिकार गांधीजींना देण्यांत आले. वर्किंग कमिटीनें या वेळीं एक महत्त्वाचें तत्त्व पुढें मांडलें. अहिंसा ही ज्यांची जीवननिष्ठा आहे अशांच्याच हातीं पूर्ण स्वराज्यासाठीं कराव्या लागणाऱ्या चळवळीचीं सूत्रें असावींत असें ठरविण्यांत आलें. थोड्याच दिवसांनंतर मार्च १९३० मध्यें अहमदाबाद येथें अ० भा० कॉं० क० ची बैठक भरून कायदेभंगाच्या मोहिमेचा ठराव प्रसृत करण्यांत आला. या वेळपावेतों निवडक आश्रमवासी-यांच्या समवेत गांधीजी दांडीच्या अर्ध्या रस्त्यावर पोहोंचले देखील होते.

फेब्रुवारींत वर्किंग कमिटीची बैठक चालू असतांनाच देशाला काळिमा आणणारे मिठाचे कायदे मोडण्याबद्दलचे विचार गांधीजींच्या मनांत घोळत होते. २ मार्च रोजीं गांधीजींनीं आपलें ऐतिहासिक पत्र व्हाइसरॉय-कडे रवाना केलें. त्यांत त्यांनीं हिंदी स्वराज्याची बाजू संपूर्णपणें मांडून आपल्या आगामी मोहिमेची पार्श्वभूमि विशद केली होती. व्हॉइसरॉय-कडून गांधीजींना ताबडतोब उत्तर आलें. परंतु त्यांत त्यानें गांधीजींच्या मार्गाबद्दल नापसंती व्यक्त केली होती. पण तें ठरल्यासारखेंच होतें. निवडक ७९ अनुयायी घेऊन सुरत जिल्ह्यांतील दांडी येथें जाण्यासाठीं साबरमतीहून गांधीजी १२-३-१९३० रोजीं पायीं निघाले. साबरमतीपासून दांडीपर्यंतचें अंतर दोनशें मैल असून ६ एप्रिलपूर्वीं मोर्चा तेथें पोहोंचाव-याचा असल्यानें अवघ्या चोवीस दिवसांत तें कांटावयाचें होतें. ६ एप्रिल रोजीं गांधीजी निदर्शन करून मिठाचा कायदा मोडणार होते. त्या दिवसापूर्वीं तो कोणींहि मोडावयाचा नव्हता. पण त्यानंतर मात्र तो प्रत्येकानें मोडावा अशी अपेक्षा होती.

गांधीजी प्रतिदिनीं त्यांच्या मुक्कामाच्या जसजसे जवळ जवळ जाऊं लागले तसतशी देशांतील जागृति वाढूं लागली आणि हजारों लोकांनीं लवकरच सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांची व त्यागाची तयारी केली. ५ एप्रिल १९३० रोजीं गांधीजी दांडी येथें पोहोंचले. दुसऱ्या दिवशीं कर न भरलेलें चिमूटभर मीठ घेऊन त्यांनीं मिठाचा कायदा मोडला. लगोलग हिंदुस्तानांतील लाखों लोकांनीं त्या दिवसापासून तो कायदा मोडण्यास सुरवात केली व त्यासाठीं झालेल्या शिक्षांना हंसतमुखानें तोंड दिलें. दडपशाही आधींच सुरू झाली होती. आतां फक्त लाठीराज्य व वटहुकूम तेवढे सुरू व्हायचे होते. मार्चच्या पहिल्या आठवड्यांत सरदार वल्लभभाईंना अटक होऊन त्यांना तीन महिन्यांची सजा देण्यांत आली. गांधीजी दांडीला पोहोंचण्यापूर्वी बंगालच्या सेनगुप्तांना पकडण्यांत आलें. अनेक दिवस रेंगाळत असलेला मीरतचा खटला चालूच होता. राजद्रोही भाषणां-बद्दल आणि लेखांबद्दल आणखी कित्येक जणांना पकडण्यांत आलें. स्वतः गांधीजी देखील कोणत्याहि क्षणीं पकडले जाण्याची अपेक्षा करीत होते व त्यांच्या नेहमींच्या पद्धतीनुसार 'मला पकडण्यांत आलें तर' या नांवाचा लेख लिहून त्यांनीं सूंचनाहि देऊन ठेवल्या होत्या. त्यांनीं लोकांना सविनय कायदेभंगाचा कार्यक्रम तसाच पुढें चालू ठेवण्याची पण त्याच-बरोबर काय वाटेल तें झालें तरी अहिंसा न सोडण्याची विनंति केली होती. त्यांचा मोर्चा चालू असतांना खेडेगांवच्या सुमारें दोनशें पाटलांनीं राजिनामे दिले होते.

सरकारचा तोल सुटायला सुरवात झालीच होती. राष्ट्रीय आठवड्यांत पेशावर, मद्रास आणि इतर कांहीं ठिकाणीं गोळीबार झाला. रत्नागिरी, पाटणा, शिरोडा, कलकत्ता, सोलापूर व आणखी कित्येक ठिकाणीं पोलिसांनीं पाशवी वर्तन केलें. मद्रास इलाख्यांत त्यांनीं लोकांना सरळ सरळ झोडपून काढलें. त्याचा अर्थच असा होता कीं कायदा खुशाल झुगारून देण्यास हवीं तीं पाशवी कृत्यें, लाठीमार करण्यास आणि कायद्याचा कोठलाहि आधार नसतांना लोकांना हव्या तशा इजा करण्यास सरकार मागेंपुढें पहाणार नव्हतें. २३-४-३० रोजीं बंगाल ऑर्डिनन्सची

फेरअंमलबजावणी सुरू झाली. १९१० सालच्या प्रेस ॲक्टचा अंमल पुन्हां प्रेस ऑर्डिनन्स काढून सुरू करण्यांत आला. गांधीजींच्या 'यंग इंडिया'चें प्रकाशन सायक्लोस्टाइलवर छापण्यांत आलेल्या मजकुरांत होऊं लागलें. गांधीजींनीं लिहिलें कीं सबंध हिंदुस्तानांत आज एक प्रकारचा लष्करी कायदाच सुरू असून सबंध देश म्हणजे एक मोठा तुरुंग होऊन गेला आहे.

काय असेल तें असो पण गांधीजींना बराच काळपर्यंत अटक झाली नाहीं. म्हणून कराडी येथें छावणी करून त्यांनीं खेड्यापाड्यांतून उघड-पणानें मिठाचा कायदा मोडण्याचा प्रचार सुरू ठेवला. नंतर व्हॉइसरॉयला पत्र पाठवून धारासना मिठागरावर हल्ला करून आपण त्याचा ताबा घेणार असल्याचें त्यांना कळवलें. त्याबाबत त्यांचें म्हणणें असें होतें कीं ती जनतेची मालमत्ता असून सरकारला मिठावर कर लादण्याचा कसलाहि हक्क पोहोंचत नाहीं. त्यांच्या मतें लोकांना मीठ फुकट मिळालें पाहिजे. ताडीचीं झाडें तोडण्यासहि त्यांनीं परवानगी दिली आणि स्वतःच ताडीच्या झाडावर कुऱ्हाडीचा पहिला प्रहार केला. हा कार्यक्रम लोकांना खूपच आकर्षक वाटला. कर्नाटकासारख्या कांहीं भागांत तर पुढें तो अगदीं नित्याचा झाला.

नंतर ४ मे १९३० रोजीं भर मध्यरात्रीं त्यांना अचानकपणें येरवड्यास नेण्यांत आलें. ५ मे ला ते येरवड्याच्या आवारांत सुखरूपपणें पोहोंचे-पर्यंत ही वार्ता फारच थोड्यांना समजली. जातां जातां त्यांनीं असा संदेश दिला कीं 'दुसऱ्याला न मारतां मरा.' तोच त्यांचा कराडीचा शेवटचा संदेश.

पूर्वयोजनेनुसार अब्बास तय्यबजी यांनीं लढ्याचें नेतृत्व स्वीकारून कार्य पुढें चालू ठेवलें. पण १२ मे रोजीं त्यांना पकडण्यांत आलें. त्यांची जागा सरोजनीदेवींनीं घेतली.

गुजराथ, मुंबई, महाराष्ट्र आणि कर्नाटक येथील अनुक्रमें धारासना, वडाळा, शिरोडा, साणीकट्टा या मिठागरांवरील हल्ले चालूच होते. विशेषतः धारासना येथील हल्ले परदेशांतील अनेक वार्ताहर व हिंदुस्तानांतील

निःपक्षपाती निरीक्षकांनीं प्रत्यक्ष अवलोकन केले. तेथील स्वयंसेवकांनीं आपल्या रक्तानें इतिहासाचें नवें पान लिहिलें. धारासना आणि वडाळा येथील अहिंसक हल्ल्यांत स्वयंसेवकांनीं दाखविलेली अद्वितीय सहनशक्ति आणि शिस्त यांची श्री० ब्रेल्सफोर्ड आणि श्री० स्लोकोंब यांच्यासारख्या विख्यात परदेशीयांनीं अमर्याद स्तुति केली. २१ मे रोजीं २५०० स्वयंसेवकांनीं धारासना मिठागरावर हल्ला चढवला. तेथील लाठीमारांत २९० जणांना जखमा झाल्या. त्यांतील दोघेजण पुढें मृत्यु पावले. स्वयंसेवक व इतर लोक मिळून १५,००० लोकांनीं वडाळ्यावर हल्ला केला. त्यांत सुमारें १५० जणांना लाठीमारामुळें दुखापती झाल्या. साणीकट्टा येथें दहा ते पंधरा हजारांच्या जमावानें मिठागरावर हल्ला चढवून शेंकडों मण मीठ ताब्यांत घेतलें. परंतु सत्याग्रही हल्ल्यांत वस्तु किती प्रमाणांत ताब्यांत घेतली याला महत्त्व नसतें तर जननेनें हिंसा किंवा प्रतिहिंसा न वापरतां, सहन कराव्या लागणाऱ्या हालअपेष्टांची व आपल्या हक्काच्या प्रस्थापनेची योग्य जाणीव ठेवून, निर्भयपणें आणि उघड उघड केलेल्या प्रतिकारास खरें महत्त्व असतें.

'न्यू फ्रीमन' पत्राचे श्री० वेब मिलर यांनीं धारासनाबाबत खालील-प्रमाणें मजकूर लिहिला आहे. "वार्ताहराच्या माझ्या अठरा वर्षांच्या व्यवसायांत ... मीं धारासनासारखा हृदयाला घरें पाडणारा प्रसंग कधींहि पाहिला नाहीं. कित्येक वेळेला तर ते प्रसंग इतके दुःखदायक असत कीं कांहीं वेळ मला त्याकडे पाठ करावी लागे. त्या सर्व प्रकारांतील आश्चर्यकारक वैशिष्ट्य म्हणजे स्वयंसेवकांनीं पाळलेली शिस्त. श्री० गांधींचें अहिंसा तत्त्व त्यांच्या रोमरोमांत पुरतेपणीं भरून राहिल्याचें आढळून आलें." कोणीं प्रत्याघात केल्याचा किंवा प्रतिहिंसा केल्याचा, फार काय कोणीं शिव्याशाप दिल्याचा देखील, एकहि प्रकार तेथें घडला नाहीं. आणि असें कित्येक दिवसपर्यंत सतत चालू होतें.

लोकांनीं जरी अशा तऱ्हेचा नमुनेदार संयम दाखवला आणि संपूर्ण अहिंसेचें आचरण केलें तरी त्यागास आणि मातृभूमीसाठीं स्वतःचें रक्त सांडण्यास तयार असलेल्या हजारों निःशस्त्र लोकांबरोबर पोलिस आणि

लष्कर यांनीं मात्र अत्यंत पाशवी वर्तन केलें. कित्येक वेळीं निरपराध प्रेक्षकांनाहि जबरदस्त मार बसे व शेंकडों लोक जखमी होत. यावरून सरकारी यंत्र कसें ठोकळेबाज आहे, पोलिस आणि लष्कर कसें पाशवी आहे, आपल्याच हाडामांसाच्या लोकांची कत्तल सरकार किती निष्ठुरपणानें करूं शकतें, आणि श्री० स्लोकोंब याचे शब्द वापरायचे तर 'हास्यास्पद आणि गोंधळाच्या वर्तनां'त तें किती निर्दयपणानें मग्न होऊं शकतें तें अगदीं स्पष्ट होतें. त्याशिवाय सरकारनें दहा बारा वटहुकूम जारी केले आणि त्या वर्षाच्या अखेरीला शेंकडों कॉंग्रेस कमिट्या बेकायदा ठरविल्या. अशा तऱ्हेनें ब्रिटिश राज्य चाललें होतें. १९३० च्या चळवळीच्या सुरुवातीपासून लाठीमार हें नवेंच शस्त्र सरकारनें वापरण्यास सुरुवात केली. सविनयपणें कायदेभंग करणाराला कायद्यानें जर कोणतें शासन करतां येण्यासारखें असेल तर तें म्हणजे त्याला तुरुंगांत घालणें. परंतु कायदा मोडणारांच्या अफाट संख्येमुळें सरकारला त्या मार्गाचा अवलंब करणें अव्यवहार्य असल्याचें आढळून आलें. म्हणून दुसऱ्या बाजूनें पाशवी सामर्थ्याची चुणूक देखील दाखवली जात नसतांना सरकारनें मात्र कमींत कमी सामर्थ्याचा उपयोग यॉं नांवाखालीं लाठी शोधून काढली. परंतु गंमत अशी कीं या 'कमींत कमी' उपयोगानेंच दरखेपेला शेंकडों लोक जखमी केले जात आणि कित्येक वेळीं तर त्यांतील अनेकांना इतक्या गंभीर स्वरूपाच्या दुखापती होत कीं ते बेशुद्ध पडत. चळवळींत प्रत्येक ठिकाणीं लाठीमार हा पोलिसांचा अगदीं नित्याचाच क्रम होऊन बसल्यामुळें सगळ्या लाठीमारांची नोंद ठेवणेंहि अशक्य होऊन गेलें.

जमावावर गोळीबारहि सरसहा करण्यांत आला. दोन महिन्यांत झालेल्या गोळीबाराचे आणि त्यांत दगावलेल्यांचे खुद्द सरकारी आंकडेच खालीं दिले आहेत. मध्यवर्ती असेंब्लींत श्री० एस्. सी. मित्र यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना ना० एच्. जी. हेग यांनीं एक तक्ता सादर केला (ले० अ० डिबेट १४-७-३० व्हॉ० ४ नं० ६ पान २३७). त्यांत असें सांगण्यांत आलें कीं फक्त एप्रिल आणि मे या दोन महिन्यांत एकोणीस ठिकाणीं गोळीबार करण्यांत आला. आणि त्यांत १११ लोक मारले गेले व ४२२

जखमी झाले. यावरून संपूर्णपणें अहिंसक चळवळ दडपून टाकण्यासाठीं कोणत्या तऱ्हेचे मार्ग उपयोगांत आणले गेले त्याची वाचकांना कल्पना येऊं शकेल.

त्रयस्थ पक्षांनीं तडजोडीच्या केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख केल्याशिवाय या कायदेभंगाची हकीगत संपवितां येणार नाहीं. श्री० स्लोकोंब यांनीं केलेला प्रयत्न अजिबातच फसला. त्यांना गांधीजींना भेटण्याची परवानगी मिळाली व ते गांधीजींच्याकडून कांहीं मसुदा घेऊन व्हॉइसरॉयकडे गेले. परंतु व्हॉइसरॉय यांच्या वृत्तीमुळें श्री० स्लोकोंब यांची फार निराशा झाली. त्यानंतर सप्रू व जयकर यांनीं जून, जुलै आणि ऑगस्ट या महिन्यात तडजोडीचे प्रयत्न केले. त्यांचे प्रयत्न बराच कालपर्यंत चालू होते. नेहरू पितापुत्र व वर्किंग कमिटीचे दुसरे कांहीं सभासद यांना गांधीजींशीं विचारविनिमय करण्याकरतां येरवड्यास आणण्यांत आलें. पण त्या सर्वांतून कांहींहि बाहेर पडलें नाहीं. सप्रूंना लिहिलेल्या २३ ३-३० च्या शेवटच्या पत्रांत व्हॉइसरॉय म्हणतात, " मला स्पष्टपणें असें म्हटलें पाहिजे कीं (काँग्रेस पुढाऱ्यांच्या) पत्रांतील सूचनांच्या भूमिकेवर चर्चा करणें मला अशक्य वाटतें. " त्यानंतर थोड्याच दिवसांनीं श्री० होरेस अलेक्झांडर यांनींहि व्हॉइसरॉय व गांधीजी या दोघांची भेट घेतली. पण त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं.

परंतु गोलमेज परिषदेची योजना जोरानें प्रसृत करण्यांत आली होती. पहिली बैठक १२-११-३० रोजीं लंडन येथें भरविण्यांत आली. ५७ सरकारनियुक्त, १६ हिंदी संस्थानिकांनीं नियुक्त केलेले आणि १३ इंग्लंड-मधील निरनिराळ्या पक्षांचे प्रतिनिधि एवढ्यांनीं एकत्र जमून प्राथमिक स्वरूपाची चर्चा केली. ही चर्चा जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत चालू होती. गोलमेज परिषदेचें तें अधिवेशन समाप्त झाल्यानंतर एका आठवड्याच्या आंत गांधीजी व त्यांचे सुमारें सव्वीस सहकारी यांना २६ जानेवारी रोजीं अचानक मुक्त करण्यांत आलें. नंतर वाटाघाटीला सुरवात होऊन त्याची परिणति अखेर ५-३-३१ रोजीं गांधी-आयर्विन-करारांत झाली.

गांधीजींची सुटका होण्याच्या थोड्याच दिवस आधीं बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखालीं वर्किंग कमिटीची बैठक अलाहाबाद येथें भरून तींत 'अप्रकट ठराव' पास करण्यांत आला. त्यांत इतर गोष्टींबरोबरच सरकारनें चालविलेल्या लाठीराज्याचें वर्णन थोडक्यांत खालीलप्रमाणें करण्यांत आलें होतें. "...सुमारें ७५००० निरपधाध स्त्री-पुरुषांना अटक, सारासारविचार न करतां करण्यांत आलेले अनेक अमानुष लाठीहल्ले, पकडल्यानंतर पोलिसकोठडींत देखील योजण्यांत आलेले छळाचे अनंत प्रकार, गोळीबारामुळें शेंकडों लोकांना आलेला मृत्यु आणि अपंगत्व, मालमत्तेची लुटालूट, घरादारांची जाळपोळ, सशस्त्र पोलिस आणि घोडेस्वार ब्रिटिश सैनिकांची खेड्यापाड्यांतून रपेट, सभा-मिरवणुकींना बंदी करून काँग्रेस व तत्सम इतर संस्था बेकायदा ठरवून व त्यांची जंगम मालमत्ता जप्त करून आणि त्यांच्या कचेऱ्यांचा व घरांचा ताबा घेऊन जनतेच्या भाषणस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य या हक्कांची करण्यांत आलेली गळचेपी असा छळणुकीचा अहवाल देतां देईल." ही चळवळ चालू असतांना इंग्लंड-मध्यें मजूरपक्ष अधिकारारूढ होता आणि श्री० रॅम्से मॅक्डॉनल्ड हे मुख्य प्रधान होते ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

गांधी-आयर्विन-करारासंबंधीं बोलायचें तर असें म्हणतां येईल कीं लॉर्ड आयर्विन आणि गांधीजी यांच्यांतील परस्परप्रेममावामुळेंच वाटाघाटी यशस्वी झाल्या यांत संशय नाहीं. परंतु नंतर हें स्पष्ट झालें कीं ब्रिटिश मुत्सद्यांना हिंदुस्तानवर आणखी कष्ट लादल्याखेरीज गोष्टी सुरळीत-पणें घडून यावयास नको होत्या. कोणताहि पक्ष अधिकारारूढ असला तरी ब्रिटिश सरकारला खरी सत्ता सोडण्याची इच्छा नव्हती. गांधी-आयर्विन-करार हा काँग्रेस आणि तिचें अहिंसा तत्त्व यांचा नैतिक विजय होता. त्यामुळें मिटाचा कायदा व काँग्रेसचें देशांतील स्थान यांबाबतहि कांहीं कायदे झाले. परंतु त्याव्यतिरिक्त हिंदुस्थानला राजकीय क्षेत्रांत कसलाहि फायदा मिळूं देण्यांत आला नाहीं; उलट जास्त प्रतिकूल परिस्थितींत हिंदु-स्तानवर लवकरच आणखी एक लढा लादण्यांत आला.

सर्व परिस्थितीचा आढावा घेतां आपल्याला असें आढळून येतें कीं

चळवळ ४-३-१९३० पासून ४-३-१९३१ पर्यंत बरोबर एक वर्षभर सुरू होती. अखिल हिंदुस्ताननें हा घोर लढा चालू ठेवला आणि सूडाची किंवा प्रतिहिंसेची कल्पना स्वप्नांत देखील न आणतां अलोट हालअपेष्टा व नुकसान यांस हंसतमुखानें तोंड दिलें. उलट बाजूला आधुनिक शस्त्रास्त्रांची कडेकोट तयारी असलेल्या ब्रिटिश सरकारनें मात्र वटहुकूम, लाठीमार, आणि दडपशाहीच्या इतर अनेक मार्गांच्या साहाय्यानें हिंदुस्तानची सारी हिंमतच मुळांत चिरडून टाकण्याचा चंग बांधला होता. कित्येक प्रसंगीं पोलिस आणि लष्करी शिपायी साध्या सौजन्याला देखील पारखे झाले होते. मग औदार्याचें तर नांवच नको. या चळवळींत प्रथमच स्त्रियांनीं अत्यंत निर्भयपणानें आणि मोकळ्या मनानें भाग घेतला. त्यांत हजारोंना पकडण्यांत आलें, लाठीमार सहन करावा लागला आणि इतर अनेक तऱ्हेच्या कठोर वर्तणुकीला तोंड द्यावें लागलें. त्यांच्यांतील कांहींना वेळीं अवेळीं जंगलांत नेऊन सोडून देण्यांत आलें. मिठाचा सविनय कायदेभंग, मिठागरांवरील अहिंसक हल्ले, वटहुकुमांचें उल्लंघन, हिंदुस्तानांतील कांहीं भागांत झालेली करबंदीची मोहीम, मुद्रणकायद्याचा सविनय भंग, परदेशी कापड व इतर वस्तु यांवरील बहिष्कार– त्यांतल्या त्यांत ब्रिटिश कापड व इतर माल यांवरील बहिष्कार, सरकारबरोबर सर्वसाधारण असहकार, कायदेमंडळांवरील बहिष्कार हीं या लढ्यांत रूढ झालेलीं सत्याग्रहाचीं मुख्य स्वरूपें होत. याबाबत झालेल्या सरकारच्या व सरकारनें वापरलेल्या दडपशाहीच्या साधनांच्या प्रतिक्रिया कसकशा घडल्या तें वर दिलेंच आहे. या सर्वांची परिणति नैतिक विजयांत होऊन त्यामुळें लोकांच्यांत स्वतःबद्दल आणि सत्याग्रह-शस्त्राबद्दल विश्वास निर्माण झाला. चळवळीच्या अखेरीला घडून आलेल्या करारामुळें कॉंग्रेसला गोलमेज परिषदेंत भाग घेण्याचा मार्ग खुला झाला.

कायदेभंगाचें पुनरुत्थान : : २३

हा जरी अखिल भारतीय स्वरूपाचा चवथा सत्याग्रह असला तरी खरें पहातां याला नऊ महिन्यांच्या शांततेनंतर पुन्हां सुरू झालेला तिसरा सत्याग्रह असेंच म्हटलें पाहिजे.

५-३-३१ रोजीं झालेला गांधी-आयर्विन करार येथें हिंदुस्तान सरकारच्या 'पोलादी चवकटी'नें आणि लंडनमध्यें ब्रिटिश मुत्सद्यांनीं मनापासून उचलून धरला असता तर केवळ हिंदुस्तानच्या इतिहासांतच नव्हे तर सत्याग्रहाच्या इतिहासांत देखील त्याला फार महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें असतें. पण दुर्दैवानें तसें घडून यावयाचें नव्हतें. कराराची पुरती शाई-देखील वाळली नसेल तोंच तो मोडण्यास सुरवात झाली.

१७-४-३१ रोजीं लॉर्ड विलिंग्डन व्हाइसरॉय म्हणून हिंदुस्थानांत आले व १८-४-३१ रोजीं लॉर्ड आयर्विन हिंदुस्थानांतून परत गेले. आणि त्यानंतर जवळ जवळ ताबडतोबच दोन्ही बाजूंकडून कुरकुरीला सुरवात झाली. ज्या ठिकाणीं सरकारी अधिकाऱ्यांनीं कराराचा भंग केल्याचें आढळून आलें त्या ठिकाणीं कॉंग्रेसकार्यकर्ते वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांकडे आणि कॉंग्रेसश्रेष्ठींच्याकडे तक्रारी नेत. कांहीं वेळीं थोडीफार दाद लागे. परंतु ज्या ठिकाणीं कॉंग्रेसकार्यकर्त्यांकडून कराराचा भंग झाला आहे असें स्थानिक अधिकाऱ्यांना वाटे तेथें मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जाण्याऐवजीं किंवा कॉंग्रेसच्या अधिकारी मंडळींकडे तक्रार करण्याऐवजीं ते सरळ कायद्याचा अवलंब करीत. कॉंग्रेसनें सविनय कायदेभंगाचें आपलें हत्यार म्यान केलें होतें तरी सरकारनें मात्र कॉंग्रेसशीं झालेल्या कराराची दखलहि न घेतां सरळ कायद्याची अंमलबजावणी करण्याचा हक्क सोडला नव्हता. गुंतूर व वेदपल्ली आणि वडापली या ठिकाणीं लाठीमार आणि गोळीबार असले प्रकारदेखील चालूच होते. बंडाची किंवा हिंसेची चिथावणी नसतांनादेखील भाषणांबद्दल अथवा लेखाबद्दल मधून मधून मरण्यांत येणारे खटले

मुळींच थांबले नव्हते.

हे सर्व प्रकार घडत असतांनाहि व्हाइसरॉयशीं झालेल्या अखेरच्या बोलण्यांत ५-३-३१ नंतर बार्डोली येथें पोलिसांच्या मदतीनें कांहींसा जादा कर घेण्यांत आला असल्याच्या आरोपाची चौकशी करण्याचें आश्वासन मिळवून काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधि म्हणून २९-८-३१ रोजीं गोलमेज परिषदेस हजर रहाण्यासाठीं गांधीजी इंग्लंडला निघाले. परंतु बार्डोली-व्यतिरिक्त इतर कसल्याहि गाऱ्हाण्यांची चौकशी करण्याचें व्हाइसरॉयनें नाकारलें. वस्तुतः गांधीजींनीं वेळोवेळीं उपस्थित होणाऱ्या मुद्यांसाठीं आणि कराराचा अर्थ लावण्यासाठीं लवादमंडळ नेमण्यांत यावें अशी सूचना केली होती. त्यांनीं असें प्रतिपादन केलें कीं गांधी आयर्विन-तह हा एक करार आहे. तो करणाऱ्या दोन पक्षांत जर त्यांच्यांतील कांहीं कलमांचा अर्थ लावण्याबद्दल मतभेद निर्माण झाले किंवा कराराचा कोठें भंग झाला तर दोघांनाहि मान्य असलेल्या लवादाकडे तो प्रश्न सोपवणें एवढा एकच मार्ग शिल्लक रहातो. परंतु सरकारनें ही भूमिका मान्य केली नाहीं. काँग्रेसला सरकारइतका समान दर्जा देण्यास सरकार तयार नव्हतें आणि जनता आणि सरकार यांच्यामधील काँग्रेस हा दुवा आहे हें मान्य करण्याचीहि सरकारची इच्छा नव्हती. सर्व प्रश्नाची खरी मख्खी तीच होती. लवादाचें कलम मूळच्या करारांतच अंतर्भूत झालें असतें तर किती बरें झालें असतें !

जी चौकशी करण्याचें आश्वासन देण्यांत आलें होतें ती देखील शेवटास गेली नाहीं कारण १३-११-३१ पासून सरदार वल्लभभाईना त्यांतून आपलें अंग काढून घ्यावें लागलें. चौकशी करण्यासाठीं ज्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आली होती त्यानें त्यासंबंधींचे जरूर ते कागदपत्र मागवण्याचें नाकारलें. त्यामुळें त्या चौकशींतून अंग काढून घेण्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता. व भुलाभाई देसाई व सरदार पटेल यांनीं तेंच केलें.

काँग्रेसच्या दृष्टीनें गोलमेज परिषद् संपूर्णपणें अयशस्वी झाली. परिषदेंत स्वातंत्र्याची मागणी मान्य करण्यांत आली नाहीं किंवा सबंध राष्ट्राच्या वतीनें बोलण्याचा काँग्रेसचा हक्कहि मान्य करण्यांत आला नाहीं. त्याच-

प्रमाणें गांधीजींना जातीय प्रश्नहि सोडवतां आला नाहीं. आणि जोंपर्यंत कॉंग्रेसपेक्षां कांहीं तरी जास्त देण्याचें आमिष दाखवावयास सरकार तयार होतें तोंपर्यंत गांधी तरी काय करूं शकणार ? २८-१२-३१ रोजीं गांधीजी निराश होऊन हिंदुस्तानला परत आले.

हिंदुस्तानांतहि नैराश्याचेंच ताट त्यांच्यासाठीं वाढून ठेवलें होतें. बंगालमध्यें पुन्हां वटहुकुमांचें राज्य सुरू झालें होतें. २४ डिसेंबर १९३१ रोजीं संयुक्तप्रांत व सरहद्दप्रांत येथें वटहुकूम जारी करण्यांत आले. जणूं ती नाताळची भेटच ! पंडित जवाहरलाल आणि खान अबदुल गफार-खान यांना पकडण्यांत आलें होतें. निरानिराळ्या प्रांतिक सरकारनीं योज-लेल्या अनेक दडपशाही मार्गांचा उल्लेख न करावा हेंच बरें.

गांधीजींनीं हिंदुस्तानांत पाय ठेवला त्याच दिवशीं वर्किंग कमिटीची बैठक सुरू होऊन ती ३ जानेवारी १९३२ पर्यंत चालू होती. गांधीजींनीं २९-१२-३१ रोजीं व्हाइसरॉयला तार करून त्याची भेट घेऊन सल्ला विचारण्याची परवानगी देण्याबद्दल थोडक्यांत विनंति केली. त्यांच्या तारेला आलेलें उत्तर फारसें आशादायक नव्हतें. ३१-१२-३१ रोजीं व्हाइसरॉयनें धाडलेल्या उत्तराचा आशय असा होता कीं वटहुकूम सुरू करण्यांत आल्याच्या प्रश्नावर पडदा पडला आहे असें समजण्यांत यावें पण इतर बाबींसाठीं गांधीजींना व्हाइसरॉयची भेट घेण्यास परवानगी देण्यांत आली. १ जानेवारी १९३२ रोजीं गांधीजींनीं व्हाइसरॉयला पुन्हां तार करून असें कळवलें कीं हिंदुस्तान सरकारच्या आजच्या प्रत्यक्ष अेरावी कृत्यांमुळें घटनाविषयक प्रश्नाला गौण स्थान प्राप्त होत आहे. त्या तारेंत त्यांनीं असेंहि बजावलें कीं व्हॉईसरॉयनें आपल्या तारेचा फेरविचार करून वटहुकुमाच्या कांहीं कृत्यांच्या बाबतींत योग्य ती सवलत देण्याची तयारी दर्शवली नाहीं आणि पुढील वाटाघाटीच्या वेळीं कॉंग्रेसला आपली संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी पुढें मांडण्यास पुरेसा वाव देण्यांत आला नाहीं, तसेंच संपूर्ण स्वातंत्र्य मिळेपर्यंत देशाचा राज्यकारभार लोकप्रतिनिधींच्या सल्ल्यानें चालविण्यांत आला नाहीं, तर आपल्याला देशाला पुन्हां कायदेभंग सुरू करण्याचा सल्ला द्यावा लागेल.

२१-१२-३१ रोजीं रात्रीं कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक मरून वरील आशयाचा ठराव पास करण्यांत आला व सरकारनें कॉंग्रेसच्या मागण्यांस जरूर ती मंजुरी न दिल्यास करबंदीसकट इतर स्वरूपाचा सविनय कायदेभंग करण्याचा राष्ट्राला आदेश दिला. अहिंसेवर फार जोराचा भर देण्यांत आला होता. त्यासंबंधींचे ठरावांतील प्रत्यक्ष शब्द खालीलप्रमाणें आहेत:— "लढ्याच्या अहिंसक स्वरूपाची यथार्थ व्याप्ति जनतेला नीट आकलन झाल्याशिवाय आणि जीवित अथवा वित्त यांची हानि व इतर कोटल्याहि प्रकारच्या हालअपेष्टा सोसण्याची जनतेची तयारी असल्याखेरीज कोणत्याहि प्रांताला, जिल्ह्याला, तालुक्याला अथवा खेड्याला सविनय कायदेभंग करतां येणार नाहीं. आपली मोहीम सूड घेण्यासाठीं अथवा आपल्यावर जुलूम करणाराला पीडा देण्यासाठीं नसून आत्मक्लेशानें व आत्मशुद्धीनें त्याचें परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशानें सुरू झालेली आहे याची जाणीव ठेवून सरकारकडून किती जरी चिथावण्याचा प्रयत्न करण्यांत आला तरी कायावाचामनानें अहिंसेचें पालन करण्यांत आलें पाहिजे. सरकारी अधिकारी, पोलिस किंवा अराष्ट्रीय लोक यांना त्रास देण्याच्या हेतूनें त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार घालण्यांत येऊं नये; तसें करणें अहिंसेच्या कल्पनेशीं सर्वस्वीं विसंगत असें आहे."

२ जानेवारी १९३२ रोजीं व्हॉइसरॉयनें त्याचें उत्तर पाठवून गांधीजींवर कायदेभंगाची धमकी दाखविल्याचा आरोप केला. गांधीजींनी पुन्हा ३ जानेवारीला पाठवलेल्या उत्तरांत लिहिलें कीं प्रामाणिक मतप्रदर्शनाला धमकी कधींहि म्हणतां येणार नाहीं. सविनय कायदेभंगाची मोहीम प्रत्यक्ष सुरू असतांनाच दिल्लीच्या वाटाघाटी सुरू झाल्या आणि करार झाल्यानंतर मग सविनय कायदेभंग तहकूब करण्यांत आला. पण तो संपूर्णपणें कधींच मागें घेण्यांत आला नव्हता. त्यानीं असें आग्रहानें प्रतिपादन केलें कीं आपल्या प्रयाणाच्या वेळींच आपण अशी स्पष्ट जाणीव दिली होती कीं विशिष्ट परिस्थितींत कायदेभंग पुन्हां सुरू करावा लागेल आणि तरीहि कसल्याहि प्रकारची आडकाटी न घेतां त्यांना इंग्लंडला जाण्याची परवानगी देण्यांत

आली होती.

परंतु गांधीजींची ही भूमिका मान्य करण्यांत आली नाहीं. बहुधा दिल्ली येथें आधींच सर्व शिजवून तयार ठेवण्यांत आलें असावें आणि ४ जानेवारीला सकाळीं गांधीजी आणि सरदार वल्लभभाई यांना अटक करण्यांत आली. शेंकडों कॉंग्रेसकमिट्या, राष्ट्रीय पाठशाळा, किसान-कमिट्या, सेवादलें आणि तत्सम इतर संस्था बेकायदा ठरवण्यांत आल्या, त्यांचा ताबा घेण्यांत आला, त्यांच्या मालकीची चीजवस्त व मालमत्ता जप्त करण्यांत आली आणि नंतर विकून टाकण्यांत आली. असा अंदाज आहे कीं उभ्या हिंदुस्तानांतून सुमारें १५,००० कॉंग्रेसजनांना उचलून स्थानबद्ध करण्यांत आलें. अनेक वटहुकूम जारी करण्यांत आले. पुन्हां पूर्वीचाच लाठीमाराचा आणि बेकायदा कायद्याचा म्हणजे वटहुकमांचा प्रकार सुरू झाला. आणि थोड्याच अवकाशांत देशांतील तुरुंग काठोकांठ भरून गेले. लाखाहून जास्त लोक पकडले गेले. त्याच्या तिप्पट किंवा चौपट तरी लोकांना लाठीचा आणि दंडुक्याचा प्रसाद मिळाला असला पाहिजे. अशा तऱ्हेनें अहिंसेचा आणि संघटित प्रतिकाराचा प्रयत्न मोडून काढण्याची शिकस्त करण्यांत आली. १९३०–३१ मधील प्रसंगाचीच १९३२–३३ मध्यें पुनरावृत्ति झाली. फरक येवढाच कीं या वेळचा लढा जास्त तीव्र आणि खंबीर असा होता. लढ्यांतील परमोच्च बिंदूहि जास्त लवकर गांठला गेला. गुजराथमधील रास आणि कर्नाटकमधील अंकोला व सिद्दापूर या करबंदीची मोहीम झालेल्या भागाला अपार हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. या खेपेची दडपशाही देखील १९३०–३१ पेक्षां जास्त निर्घृण व पद्धतशीर होती.

एका अर्थानें १९३२–३४ ची चळवळ हा १९३०–३१ च्याच चळवळीचा एक भाग असल्यानें कितीतरी गोष्टी दोन्ही चळवळींत समान होत्या.

देशांतील परिस्थितीला नवीन कलाटणी देणाऱ्या गांधीजींच्या सप्टेंबर १९३२ मधील उपवासाकडे वळण्यापूर्वी १९३० आणि १९३२ सालच्या चळवळी कशा तऱ्हेनें चालविण्यांत आल्या आणि सत्याग्रहाच्या कोणकोणत्या

स्वरूपाचा अवलंब करण्यांत आला होता तें पहाणें उद्‌बोधक होईल.

गांधीजींनीं अब्बास तय्यबजी यांच्याकडे लढ्याचीं सूत्रें सोपवून १९३० सालीं आपण पकडले गेल्यास पुढील सूत्रचालक नेमण्याची सुरू केलेली पद्धत शेवटपर्यंत चालू राहिली. वर्किंग कमिटीच्या सभासदांनीं देखील आपल्याला अटक झाल्यानंतर आपली जागा कोणीं घ्यावयाची तें नेमून द्यावें असें ठरविण्यांत आलें. अशा तऱ्हेनें गांधी-आयर्विन-तहापर्यंत तीन खेपेच्या वर्किंग कमिटीच्या सभासदांना अटक करण्यांत आली होती. कमिट्या बेकायदा ठरवून, महत्त्वाचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांना गिरफदार करून, कॉंग्रेसचे पैसे आणि प्रांत, जिल्हे इतकेंच नव्हे तर खेड्यापाड्यांतील देखील कॉंग्रेसकमिटीच्या कचेऱ्या आणि इमारती ताब्यांत घेऊन कॉंग्रेसचें संघटित स्वरूप नष्ट वा खिळखिळें करण्याचा साहजिकच सरकारनें प्रयत्न करून पाहिला. वर्किंग कमिटीनें घालून दिलेला धडा सगळीकडे गिरवण्यांत आला. जिकडे तिकडे सर्वाधिकाऱ्यांचे नंबर आधींपासून लागलेले असत व एकाला अटक झाल्याबरोबर त्याच्या मागचा ती जागा घेण्यासाठीं पुढें सरसावे. कित्येक शहरांतून सर्वाधिकाऱ्यांचा आंकडा नव्वदपर्यंत पोहोंचला.

पण एक गोष्ट स्पष्ट होती कीं नवीन येणारांना कॉंग्रेसचें धोरण बदलण्याचा हक्क नव्हता. त्यांनीं फक्त चळवळ पुढें चालवावयाची होती. धोरण ठरविण्याचा किंवा वाटाघाटी करण्याचा अधिकार फक्त मूळच्या वर्किंग कमिटीकडे होता.

सर्वाधिकारी नेमण्याबाबतची सर्वसाधारण पद्धती ही अशी होती. परंतु तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशा तऱ्हेनें होत होती ? कचेऱ्यांच्या जागा अशा नसतच. त्यामुळें कित्येक वेळीं कॉंग्रेस-कचेरीचें सबंध दप्तर एखाद्या व्यक्तीच्या खिशांतच असे व तें पोलिसांच्या हातीं लागत नसे. अधिकृत बातमी जाहीर करण्यांत येई आणि धोका पत्करण्यास तयार असलेल्या छापखान्यामार्फत किंवा फार करून सायक्लोस्टाइलच्या साहाय्यानें सूचना प्रसिद्ध करण्यांत येत. पत्रें व तारा यांवर पोलिसांची नजर असल्यामुळें समक्ष निरोप धाडण्याची पद्धत जास्त पसंत केली जाई. अर्थात् अनेक

छापखाने, सायक्लोस्टाइल व निरोपे खर्चीं घालावेत लागत. पण तें अपरिहार्य असे.

गांधीजींना पकडण्यांत आल्यानंतर मे १९३० मध्यें वार्किंग कमिटीची बैठक भरून चळवळीचें क्षेत्र अधिक विस्तृत करण्यांत आलें. परदेशी कापडावरील बहिष्कार संपूर्णपणें यशस्वी करण्याचा आदेश जनतेला देण्यात आला. त्याचप्रमाणें करबंदीचा व चौकीदारी कर न भरण्याचाहि आदेश देण्यांत आला. जंगलाच्या आसपास राहणाऱ्या लोकांच्या हिताच्या दृष्टीनें जंगल कायदे मोडण्यांत यावे असें ठरविण्यांत आलें. ब्रिटिश बँका, नौकानयन, विमा कंपन्या यांच्या व्यवहारावरील बहिष्कार परिणामकारक करण्याच्या सूचना देण्यांत आल्या. २७-६-१९३० रोजीं अलाहाबाद येथें भरलेल्या वर्किंग कमिटीनें जनतेला सरकारी अधिकारी व राष्ट्रीय चळवळ दाबून टाकण्याच्या कामीं उघडपणें सरकारला मदत करणाराच्यावर कडक सामाजिक बहिष्कार पुकारण्याचा आदेश दिला. परंतु नंतर याबद्दल गांधीजींनीं आपली नापसंती दर्शविली. सरकारी रोखे विकूं नयेत अथवा नवे स्वीकारूं नयेत असें जनतेस सांगण्यांत आलें. त्याचप्रमाणें कागदी नोटा किंवा चांदीचें चलन न स्वीकारतां शक्य त्या ठिकाणीं सुवर्णचलनाचा आग्रह धरण्यासहि सांगण्यांत आलें. जनतेविरुद्ध वापरण्यांत येणाऱ्या जुलमी धोरणांत सरकारला मदत न करणें हें पोलिसांचें व सैनिकांचें कर्तव्य आहे असें कमिटीनें जाहीर केलें.

त्यानंतर वर्किंग कमिटीनें १९३२-३४ च्या सत्याग्रहाचा आदेश देणारा जो ठराव ३१-१२-३१ रोजीं पास केला त्याकडे नजर टाकूं. त्यात अहिंसेवर पूर्वी कधींहि दिला नव्हता इतका भर देण्यांत आला होता. परदेशी कापडावरील बहिष्कार बंधनकारक समजण्यांत येऊन दारू व इतर अंमली पदार्थांवरील बहिष्कारावर जोर देण्यांत आला होता. विशेषेंकरून स्त्रियांनीं निरोधनाच्या योगानें तो यशस्वी करून दाखवावयाचा होता. भिरकणुर्कीना अथवा समांना बंदी झाल्यास ज्यांची लाठ्या किंवा गोळ्या खाण्याची तयारी असेल त्यांनींच फक्त त्यांत घ्यावा असें सांगण्यांत आलें. जुलमी कायदे आणि बटहुकुमांखालील अन्याय्य आज्ञा

मोडण्याचा सल्ला देण्यांत आला.

या ठरावानुसार मागें दिल्याप्रमाणें शेंकडों तऱ्हेनें मिठाचा कायदा मोडण्यात आला. उघडपणें सर्व वटहुकुमांचा भंग करण्यांत येऊन त्यासाठीं देण्यांत आलेल्या शिक्षा आनंदानें सहन केल्या गेल्या. क्रि० प्रो० कोडच्या १४४ व्या कलमासारखे स्थानिक अधिकाऱ्यांनीं लादलेले निर्बंध मोडण्यांत आले. कांहीं भागांत करबंदी व खंडबंदी मोहीम सुरू करण्यांत आली. कांहीं ठिकाणीं चौकीदारी कर भरण्याचें नाकारण्यांत आलें व दंडादाखल लादण्यांत आलेले कर मानण्यांत आले नाहींत. मोठमोठ्या जमावानें जंगलकायदे मोडण्यांत आले. हजारों ताडीचीं झाडें पाडण्यांत आलीं. झेंडादिन, गांधीदिन, मोतीलालदिन, हुतात्मादिन, सोलापूरदिन, स्वातंत्र्यदिन, सरहद्ददिन, गढवालदिन हे व असले इतर दिन समामिरवणुकींवर घालण्यांत आलेले निर्बंध मोडून पाळण्यांत आले. मिठागरें व सरकारनें ताब्यांत घेतलेलीं कॉंग्रेसभवनें यांवर हल्ले चढविण्यांत आले. बंदी घालण्यांत आली असूनहि एप्रिल १९३२ मध्यें दिल्ली येथें व एप्रिल १९३३ मध्यें कलकत्ता येथें अशीं दोन कॉंग्रेस अधिवेशनें भरविण्यांत आलीं.

चळवळीच्या हकीगतींचें सूत्र आतां पुन्हां हातीं घेऊं. १२-९-३२ रोजीं अचानकपणें गांधीजी जातीय निवाड्याच्या प्रश्नावर प्राणांतिक उपोषण करणार असल्याची बातमी देशभर पसरली. या जातीय निवाड्यानुसार १७।८।३२ रोजीं हरिजनांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याचें जाहीर करण्यांत आलें होतें. या बातमीनें अर्थातच देशांतील घडामोडींना एक निराळी दिशा लागली. २०-९-३२ रोजीं उपवास सुरू झाला आणि पुणें करारावर सह्या होऊन हरिजनांना पुन्हां संयुक्त मतदारसंघांत सामील करून घेण्यांत आल्यावर २६ रोजीं तो समाप्त झाला.

सविनय कायदेभंग चालूच होता. पण त्याचबरोबर अस्पृश्यतानिवारणाकडे कॉंग्रेसवाल्यांचें लक्ष अधिकाधिक लागूं लागलें. ६-४-३३ रोजीं कॉंग्रेसचे तात्पुरते अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद यांना त्यांनीं काढलेल्या पत्रकाबद्दल अटक करण्यांत आली. त्या पत्रकांत त्यांनीं जनतेला लढा सुरू ठेवण्यास सांगितलें

होतें. त्यानंतर बरेच दिवसपर्यंत श्री. अणे अध्यक्ष म्हणून काम पहात होते.

त्यानंतर मे महिन्यांत पुन्हां गांधीजींचा एकवीस दिवसांचा आत्म-शुद्धीसाठीं उपवास सुरू झाला. त्याच काळांत सरकारनें त्यांची मुक्तता केली. ताबडतोब सहा आठवडेपर्यंत चळवळ तहकूब करण्यांत आली. नंतर ती मुदत पुन्हां तीन आठवडे वाढविण्यांत आली. अखेर १२-७-३३ रोजीं पुण्यास प्रमुख कॉंग्रेसकार्यकर्त्यांची बैठक मरून सामुदायिक सविनय कायदेभंग तहकूब करण्यांत आला व वैयक्तिक कायदेभंग तेवढाच सुरू ठेवावा असें ठरलें.

जास्तींत जास्त त्यागाचें प्रतीक म्हणून गांधीजींनीं आपला आश्रम सोडला व वैयक्तिक सत्याग्रह करण्यासाठीं म्हणून चौतीस निवडक आश्रम-वासी बरोबर घेऊन रास या खेडेगांवाकडे कूच करण्याचा आपला मनोदय त्यांनीं जाहीर केला. त्यांना अटक करण्यांत आली व तें गांव सोडण्याची अट घालून त्यांस मुक्त करण्यांत आलें. त्यांनीं ती अट पाळण्याचें नाकार-तांच त्यांस पुन्हां पकडण्यांत येऊन एक वर्षाची सजा देण्यांत आली. तुरुंगांतून हरिजनकार्य चालविण्याच्या कांहीं सवलती नाकारण्यांत आल्यामुळें त्यांनीं उपवासास सुरवात केली. त्यामुळें ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यांत त्यांची मुक्तता करण्यांत आली. ते जरी तुरुंगाच्या बाहेर आले तरी शिक्षेच्या उरलेल्या मुदतींत राजकारणांत भाग न घेण्याचें त्यांनीं आपण होऊन निश्चित केलें व नोव्हेंबरपासून हरिजनकार्यासाठीं हिंदुस्तानचा दौरा केला.

अखेर ७ एप्रिल १९३४ रोजीं गांधीजींनीं वैयक्तिक सविनय कायदेभंगहि तहकूब करण्याचा निर्णय जाहीर केला. तो हक्क त्यांनीं फक्त स्वतःकडे राखून ठेवला. त्या वेळेपर्यंत जनतेंत कोठल्याहि प्रकारच्या सविनय कायदेभंगाचा उत्साह राहिलेला नव्हता. १८ मे १९३४ रोजीं पाटणा येथें भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत गांधीजींनीं घेतलेल्या निर्णयाला मान्यता देण्यांत आली. त्याच वेळीं स्वराज्यपक्षाची पुनर्घटना करण्यांत येऊन मध्यवर्ती असेंब्लीच्या निवडणुका लढवण्याचें निश्चित करण्यांत आलें. अशा तऱ्हेनें पुन्हां १९४० सालीं सविनय कायदेभंगाची पुढची चळवळ सुरू होईपर्यंत कॉंग्रेसची शक्ति

विधायक कार्यक्रम व कायदेमंडळांतील कामकाज यांवर केंद्रित झाली.

वैयक्तिक सत्याग्रह : : २४

आतांपर्यंत आपण हें पाहिलें कीं पहिल्या चार सत्याग्रहांचें उद्दिष्ट जास्त जास्त व्यापक बनत गेलें. त्याचप्रमाणें त्या त्या प्रसंगानुसार व काळानुसार सत्याग्रहाच्या स्वरूपांतहि फरक घडून आले. १९१९ च्या सत्याग्रहाचें उद्दिष्ट एक विशिष्ट अपमानकारक कायदा रद्द करून घेणें हें होतें तर पंजाब व खिलाफत प्रकरणांत झालेला अन्याय दूर करून घेणें हा दुसऱ्या चळवळीचा उद्देश होता. तिसऱ्या आणि चवथ्या सत्याग्रहाचें— चवथा सत्याग्रह हा तिसऱ्याचाच एक भाग होता— प्रत्यक्ष ध्येय संपूर्ण स्वराज्य प्राप्त करून घेणें हें होतें. ज्याला 'गुणविशिष्ट सत्याग्रह' असें म्हणतां येईल त्या वैयक्तिक सत्याग्रहाचें स्वरूप मात्र अगदीं स्वतंत्र असें होतें. इंग्लंडचा जीवनमरणाचा लढा आणि कॉंग्रेसनें स्वीकारलेलें सरकारला अडचणींत न टाकण्याचें सर्वसामान्य धोरण या सत्याग्रहाचें स्वरूप कोणतें असावें तें ठरविण्यास कारणीभूत झालें. याला वैयक्तिक सत्याग्रह असें म्हणतात. कारण केवळ वैयक्तिक जबाबदारीवर सत्याग्रहाचें प्रत्येक कृत्य करण्यात आलें. विशिष्ट गुण असलेल्या शेलक्या लोकांचींच सत्याग्रहासाठीं निवड करण्यांत येऊन बाकीच्यांना सत्याग्रहांतून वगळण्यांत आल्यामुळें याला 'गुणविशिष्ट सत्याग्रह' असेंहि म्हणतां येईल. लोकांच्या सर्व प्रतिनिधींना— मग ते कायदेमंडळांतील असोत, स्थानिक संस्थांतील असोत, कॉंग्रेस कमिटींतील असोत— सत्याग्रह करण्यास सांगण्यांत आल्यामुळें आणि त्याप्रमाणें त्यांनीं तो केल्यामुळें त्यास 'प्रातिनिधिक सत्याग्रह' असेंहि म्हणतां येईल.

१५-९-१९४० रोजीं भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटींत

चळवळ सुरू करण्यासंबंधीं पास झालेल्या ठरावांतील यासंबंधींचे शब्द खालीलप्रमाणें आहेतः— "काँग्रेसजनांच्या मनांत ब्रिटिशांविरुद्ध दुर्भाव असतां कामा नये. सत्याग्रहाच्या मुळाशीं असलेली कल्पना ब्रिटिशांना अडचणींत आणणारी कोणतीहि गोष्ट करण्यापासून काँग्रेसला परावृत्त करते. परंतु स्वतः होऊन लादून घेतलेलें हें बंधन शेवटीं आत्मघातकी होईल इतक्या मर्यादेपर्यंत नेतां येणार नाहीं. अहिंसेवर आधारलेल्या आपल्या धोरणाचा पुरस्कार करण्याच्या संपूर्ण स्वातंत्र्याबद्दल काँग्रेसनें आग्रह धरला पाहिजे. तथापि प्रतिकाराची जरूर पडली तरी जनतेच्या नागरी हक्कांच्या संरक्षणासाठीं अवश्य असेल त्याहून अहिंसक प्रतिकाराची व्याप्ति वाढविण्याची काँग्रेसला आजच्या परिस्थितींत इच्छा नाहीं."

असा एक प्रश्न नेहमीं विचारण्यांत येतो कीं गांधीजी ब्रिटनला अजिबात अडचणींत टाकूं नये असें म्हणणारे असतांना ज्या ठरावामुळें ब्रिटिशांची थोडीफार तरी अडवणूक होणारच्च असा ठराव गांधीजींनीं प्रसृत तरी कसा केला ? या प्रश्नाचें उत्तर गांधीजींनीं मुंबईच्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकींत केलेल्या भाषणांत देऊन ठेवलें आहे. ते म्हणतात कीं वाट पहाण्याच्या गुणालाच दुर्गुणाचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें आहे. ब्रिटिश सरकारला निरनिराळे मार्ग सुचविण्यांत आले; हिंदुस्तानचें स्वातंत्र्य जाहीर करण्याची विनंति करण्यांत आली; परंतु सरकारनें त्या प्रश्नाची टाळाटाळ केली. घटनापरिषदेनें तयार केलेली घटना हिंदुस्तानला लागू करण्यात यावी असें सांगून पहाण्यांत आलें. पण त्या कल्पनेचा उपहास करण्यांत आला. हिंदुस्तानचें स्वातंत्र्य मान्य करण्यांत आल्यास पुणें येथें संपूर्ण सशस्त्र सहकार्य करण्याची तयारी दर्शविण्यांत आली होती. पुणें ठराव करून काँग्रेसनें स्वतःवर आणि आजपर्यंत कसोटीस उतरलेल्या तिच्या धोरणावर जवळ जवळ तिलांजलीच सोडली पण ती मागणी देखील नाकारण्यांत आली. वस्तुतः आजपर्यंत सरकारनें कशाचीच दखल घेतली नाहीं. संयमाचा अवलंब चांगला खरा परंतु ज्याच्या योगानें तो संयम अंमलांत आणतां येतो त्या आत्मशक्तीवरच जर तो संयम आघात करूं लागला तर तो सद्गुण न राहतां त्याला दुर्गुणाचें स्वरूप प्राप्त होतें.

गांधीजींनीं आपल्या भाषणांत पुढें सांगितलें, "मी केवळ कॉंग्रेसच्याच वतीनें बोलत नसून ज्यांना ज्यांना निर्भेळ राष्ट्रीय स्वातंत्र्य हवें आहे त्या सर्वांच्या वतीनें मीं बोलत आहें. आज जर मी 'ब्रिटिशांना अडचणींत टाकूं नका' असें म्हणत बसलों तर त्या सर्वांशीं मीं प्रतारणा केल्यासारखें होईल.... आणि म्हणून आजच्या आणीबाणीच्या प्रसंगीं मीं स्वतःवर अशी बंधनें लादून घेणें आत्मघातकी ठरेल."

येवढ्याचसाठीं या प्रसंगीं सरकारकडे चवथी मागणी करण्यांत आली तींत असें म्हटलें होतें कीं " हिंदुस्तानला अहिंसेनें व उघडपणानें युद्ध-विरोधी धोरणाचा पुरस्कार करण्याचें स्वातंत्र्य आहे व सरकारी युद्ध-प्रयत्नांत असहकार करण्याची शिकवण देण्यास हिंदुस्तान स्वतंत्र आहे असें सरकारनें जरी नुसतें जाहीर केलें तरी आम्ही सविनय कायदेभंग करणार नाहीं." पण कॉंग्रेसची ही मागणीहि धुडकावून लावण्यांत आल्या-मुळें कॉंग्रेसला पाऊल उचलल्याखेरीज गत्यंतरच नव्हतें.

हिंसेची चिथावणी दिल्याबद्दल नव्हे तर रामगड कॉंग्रेसचा (१९४०) युद्धविषयक ठराव जनतेला विशद करून सांगितल्याबद्दल सर्व हिंदुस्थानभर अनेकांवर खटले भरण्यांत येत होते. गांधीजींनीं असे उद्गार काढले कीं, "आपणांला निमूट बसतां येणार नाहीं. आपला भाषणस्वातंत्र्याचा हक्क बजावणाऱ्यांची तुरुंगाकडे एकसारखी रवानगी होत असतांना आपण स्वस्थ बघत बसणें हा सत्याग्रह नव्हे. आपण जर असेच बघत बसलों तर कॉंग्रेस नष्ट होईल आणि तिच्याबरोबर राष्ट्राची हिम्मतहि नामशेष होऊन जाईल."

मतस्वातंत्र्याच्या हक्कासाठीं झालेल्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या चळ-वळीची उत्पत्ति ही अशी होती. जर अहिंसेनें स्वराज्य मिळवून तें टिक-वावयाचें असेल तर नागरिक स्वातंत्र्य हा त्याचा मूलाधार मानला पाहिजे. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीपुढें केलेल्या आपल्या भाषणांत गांधीजी म्हण-तात, "सरकारला हें खासच करतां येण्यासारखें आहे. त्या हक्कासाठीं झगडा करणें हें आपलें कर्तव्य आहे. या हक्काला सरकारकडून विरोध करण्यांत आल्यामुळें आपल्याला लढा द्यावा लागला व त्या योगानें सरकार अडचणींत सांपडलें तर ती अडचण त्यांनीं आपण होऊन ओढवून घेतल्यासारखें होईल."

वर उल्लेखिलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या ठरावाच्या आधारावर २७ व ३० सप्टेंबर रोजीं गांधीजींनीं व्हॉईसरॉयची मुलाखत घेतली. परंतु गांधीजींनीं मागितलेला भाषणस्वातंत्र्याचा हक्क मान्य करण्यास व्हॉईसरॉय तयार झाला नाहीं. गांधीजींची मागणी अगदीं साधी आणि स्पष्ट होती. कॉंग्रेसच्या युद्धधोरणाचा संपूर्णपणें अहिंसक मार्गानें प्रचार करण्याची आणि सर्व युद्धें स्वरूपतः अन्याय्य आणि विनाशी असल्यामुळें युद्धप्रयत्नांत मदत न करण्याची जनतेला शिकवण देण्याची मुभा गांधीजींनीं मागितली होती. व्हॉईसरॉय कांहीं मर्यादेपर्यंत कॉंग्रेसची मागणी मान्य करण्यास तयार होता परंतु कॉंग्रेसनें पुढें ठेवलेली सर्वच्या-सर्व मागणी मान्य करण्याचें त्यानें नाकारलें.

इंग्लंडमध्यें नैतिक युद्धविरोधकांना लढाईच्या कामांत भाग न घेण्याची सवलत मिळते इतकेंच नव्हे तर जाहीरपणानें त्यांचीं मनें व्यक्त करण्यासहि त्यांस मुभा असते. युद्धाला असलेला पाठिंबा काढून घेण्यास किंवा युद्ध-प्रयत्न थांबविण्यास इतरांना प्रवृत्त करण्याइतकी सवलत मात्र त्यांना देण्यात येत नाहीं. व्हॉइसरॉयनें असें सांगितलें कीं त्याहून जास्त सवलत हिंदु-स्थानांत देतां येणार नाहीं. परंतु हिंदुस्तान म्हणजे इंग्लंड नव्हे ही गोष्ट तो विसरला. हिंदुस्तानच्या परिस्थितींत तेवढ्यानें भागणार नाहीं असें गांधीजींनीं त्याला स्पष्टपणें बजावलें. ते असेंहि म्हणाले कीं कॉंग्रेस जर नाहींशीच व्हावयाची असेल तर स्वतःची निष्ठा जाहीर करण्याच्या कार्यांत तिला मरण आलेलें चांगलें.

त्यानंतर सत्याग्रहमोहिमेस सुरुवात झाली. गांधीजींनीं सत्याग्रहासाठीं अत्यंत कडक असे नियम घालून दिले व एक प्रतिज्ञा तयार केली. या खेपेला त्यांचा भर सत्याग्रहींच्या विशिष्ट 'गुणा'वर होता. त्यांनीं आपण स्वतः सत्याग्रह करणार नसल्याचें जाहीर केलें कारण त्यामुळें सरकार जास्त अडचणींत येण्याचा संभव होता. श्री० विनोबा भावे यांची त्यांनीं पहिले सत्याग्रही म्हणून निवड केली. सत्याग्रहाची तारीख आणि जागा निश्चित करण्यांत आली. १७-१०-४० रोजीं पवनार येथें तो सत्याग्रह व्हावयाचा होता. त्या ठिकाणीं विनोबा जाहीर भाषण करून युद्धें अनैतिक व अनिष्ट

असल्यामुळें लोकांना युद्धप्रयत्नांत मदत न करण्याची विनंति करणार होते. चार दिवस भाषणें केल्यानंतर त्यांना पकडण्यांत येऊन तीन महिन्यांची सजा देण्यांत आली. तसेंच गांधीजींनीं कांहीं कॉंग्रेसकार्यकर्त्यांना कॉंग्रेसच्या युद्धविषयक धोरणावर व्याख्यानें देत दिल्लीकडे पायीं जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें शेंकडों लोक दिल्लीकडे निघाले होते. परंतु वाटेंत त्यांच्या त्यांच्या प्रांतांतच त्यांना पकडण्यांत येऊन शिक्षा देण्यांत आल्या.

पहिले सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड करतांना ते आदर्श सत्याग्रही असल्याचें गांधीजींनीं सांगितलें. त्यांचें वर्णन करतांना गांधीजींनीं लिहिलें कीं कताईच्या सर्व क्षेत्रांत त्यांनीं प्रावीण्य मिळविलें आहे; ते रहात असलेल्या खेड्यांतून त्यांनीं अस्पृश्यतेचें उच्चाटन केलेलें आहे; हिंदु-मुसलमान-ऐक्यावर त्यांचा अढळ विश्वास आहे; अनेक अनुयायी आणि कार्यकर्ते त्यांनीं निर्माण केले आहेत, आणि राष्ट्राला स्वातंत्र्याची आवश्यकता आहे हें ते मानतात. त्याचप्रमाणें खादीला प्राधान्य असलेल्या विधायक कार्यक्रमानें स्वातंत्र्य मिळवितां येण्याच्या शक्यतेवर त्यांचा विश्वास आहे. शिवाय त्यांचा असाहि विश्वास आहे कीं राजकीय कार्यक्रमांची गर्दी करून सोडण्यापेक्षां विधायक कार्यक्रम व सविनय कायदेभंग हा जोडकार्यक्रम अधिक प्रभावी आहे. आणि सर्वांत महत्त्वाचें म्हणजे ते युद्धविरोधक आहेत.

" मला निर्दोष असा लढा द्यावयाचा आहे. संख्याबलाऐवजीं मला उच्चतम अशा गुणांची जरूर आहे " अशा अर्थाची महत्त्वपूर्ण सूचना गांधीजींनीं देऊन ठेवली होती. नंतर गांधीजींनीं सत्याग्रह करणारांनीं भाषणें देण्याऐवजीं अथवा पत्रकें काढण्याऐवजीं ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नांत पैशाची अथवा माणसांची मदत करणें चूक आहे व अहिंसा हाच सर्व युद्धांचा प्रतिकार करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे अशा अर्थाच्या घोषणाच फक्त उच्चारून पकडून द्यावें असें जाहीर केलें.

या प्रश्नावर सुमारें ३०,००० लोकांनीं तुरुंगवास पत्करला आणि सहा लाख रुपये दंडादाखल वसूल करण्यांत आले. सत्याग्रही स्थानिक मॅजिस्ट्रेटला सत्याग्रहाची वेळ, जागा व स्वरूप यांसंबंधीं रीतसर नोटीस देत. सुरुवातीला कांहीं लोकांनीं युद्धकमिटीच्या सभासदांना राजिनामे देण्याची

विनंति करणारीं पत्रें लिहिलीं. कांहींनीं भाषणें केलीं. परंतु नंतर युद्धविरोधी घोषणा करणें एवढें एकच स्वरूप निश्चित करण्यांत आलें.

प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळें, लोकल बोर्डें व म्युनिसिपालिट्या, काँग्रेसकमिट्या आणि इतर सार्वजनिक क्षेत्रांतील लोकांचे बहुतेक प्रतिनिधि या चळवळींत तुरुंगांत गेले हें विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे. याबाबतची आंकडेवारी पुढीलप्रमाणें आहेः—११ काँग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद, १७६ अ० भा० काँ० क० चे सभासद, २९ माजी मंत्री, २२ मध्यवर्ती विधिमंडळाचे सभासद आणि ४०० प्रांतिक विधिमंडळांचे सभासद. त्या दृष्टीनें पहातां हा सत्याग्रह सर्वांत जास्त प्रातिनिधिक स्वरूपाचा होता असें म्हणतां येईल.

१९४१ ४२ मध्यें कांहीं सत्याग्रहींची मुक्तता झाल्यानंतर गांधीजींनीं त्यांना चळवळ चालू असेपर्यंत पुनःपुन्हां सत्याग्रह करण्यास सांगितलें. मध्यप्रांतांतील एक आमदार श्री० जकातदार यांचें उदाहरण असें आहे कीं नंतर नंतर सरकारनें त्यांना तुरुंगांत न पाठवतां दंड करण्यास सुरवात केली. तरी देखील त्यांनीं पांच वेळ सत्याग्रह केला. त्यांना झालेल्या दंडाची एकंदर रक्कम जवळ जवळ दहा हजार रुपये झाली. दोनदां सत्याग्रह करणारे तर शेंकडोंजण निघाले.

तथापि या सत्याग्रहाच्या वेळीं पोलिसांनीं अथवा सरकारनें फारसें अयोग्य वर्तन केलेलें आढळत नाहीं. अर्थात् सरकारला परिस्थिति अगदीं 'सुरक्षित' आहे असा अजमास आला हेंच त्याचें कारण होय. या चळवळीमुळें आपली सत्ता कसल्याहि प्रकारें धोक्यांत येणार नाहीं याबद्दल सरकारची खात्री होती. आगाऊ जाहीर करण्यांत आलेले सत्याग्रही हंसतमुखानें व्यासपीठावर चढून ठरलेल्या घोषणा करीत आणि लगेच त्यांना पकडण्यांत येई. शेंकडों लोक त्यांच्याभोंवतीं जमून जणूं ते हवा बदलण्यासाठींच जात आहेत अशा भावनेनें त्यांस थाटाचा निरोप देत. भीति, दहशत किंवा कटुता यांचा कोठें लवलेशहि नसे.

१९४१ अखेरपर्यंत हा क्रम सुरू होता. त्या वेळेपर्यंत जनतेंतील उत्साह कमी झाला. मध्यंतरीं व्हॉइसरॉयचे कार्यकारी मंडळांत वाढ करण्यांत

येऊन जास्त हिंदी लोकांचा त्यांत समावेश करण्यांत आला होता. काँग्रेसनें आपण होऊन कोटल्याहि प्रकारचें पाऊल न टाकतांच इतर पक्षांच्या व जनमताच्या दडपणामुळें सरकारनें सत्याग्रहींना सोडून देण्याचें ठरविलें. कांहींहि कारण नसतांना सरकारनें यापुढें काँग्रेस देखील युद्धप्रयत्नांत सहकार्य करील असें गृहीत धरलें. इतकेंच नव्हे तर तसा उल्लेखहि सरकारी पत्रकांत करण्यांत आला. सर्व कैद्यांना सोडून देण्यांत यावयाच्या घोरणानुसार ४ डिसेंबर १९४१ रोजीं सर्व सत्याग्रहींची एकदम सुटका झाली.

जानेवारी १९४२ मध्यें वर्धा येथें भरलेल्या व० क० च्या व अ० भा० काँ० क० च्या बैठकींत पुन्हां लढा सुरू करण्याचा आदेश देण्यांत आला नाहीं परंतु हिंदुस्तानवर होणाऱ्या संभाव्य जपानी स्वारीचा धोका लक्षांत घेऊन स्वयंपूर्णता व स्वसंरक्षण यांवर भर देण्यांत आला.

यानंतर ८ ऑगस्ट १९४२ च्या मुंबई येथें भरलेल्या अ० भा० काँ० क० च्या ठरावाची परिणति ज्या विराट लढ्यांत झाली त्याकडे वळूं.

"चले जाव" चळवळ : : २५

आजपर्यंत झालेल्या अखिल भारतीय स्वरूपाच्या अहिंसक चळवळींपैकीं ही शेवटची चळवळ होय. या चळवळीचा त्रोटक देखील वृत्तान्त आजच्या परिस्थितींत देतां येणार नाहीं परंतु ज्या घटना या लढ्याला कारणीभूत झाल्या तेवढी हकीगत या ठिकाणीं देण्यांत येत आहे.

१९४१ च्या डिसेंबरमध्यें पूर्वेकडे घडलेली सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जपाननें दोस्तांबरोबर पुकारलेलें युद्ध हें होय. त्यानंतरची १९४२ च्या सुरुवातीची महत्त्वाची गोष्ट म्हणजे इंग्लंड-अमेरिकेविरुद्ध नाविक व जमिनीवरील युद्धांत जपानला मिळत गेलेले शीघ्र विजय. यामुळें जनतेच्या नीतिधैर्याला हादरा बसला आणि ब्रिटिशांचें पूर्वेकडील साम्राज्य संपुष्टांत

आलें असें वाटूं लागलें. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं तर २३-३-४२ रोजीं सर स्टॅफर्ड क्रिप्स कांहीं योजना घेऊन हिंदुस्तानांत आले.

त्याबाबत लुई फिशर यांनीं असें लिहिलें आहे कीं गांधीजींनीं त्या योजनेकडे दृष्टिक्षेप टाकतांच इंग्लंडला जाण्यासाठीं पहिलेंच विमान तुम्हीं कां पकडीत नाहीं असें क्रिप्सना विचारलें. गांधीजींना ती योजना अत्यंत निराशाजनक अशी वाटली व 'मुदतीची हुंडी' असें त्यांनीं तिचें वर्णन केलें. त्यांचें म्हणणें असें होतें कीं आतां या क्षणीं हिंदुस्तान भुकेनें व्याकुळ झाला आहे. अशा परिस्थितींत ताबडतोब त्याला घासभर अन्न आणि घोटभर पाणी न देतां पुढें केव्हां तरी पंचपक्वान्नाचें ताट तुमच्यापुढें वाढून ठेवूं असें आश्वासन देण्यांत काय हंशील आहे? क्रिप्सशीं शिष्टाई करण्याकरतां कॉंग्रेसतर्फें राष्ट्रपति मौलाना अब्दुल कलम आझाद व पंडित जवाहरलाल नेहरू यांना प्रतिनिधि म्हणून पाठविण्यांत आलें. त्यांनीं बरेच दिवसपर्यंत बोलणीं केलीं. तरी अखेरीला त्यांच्या पदरींहि निराशाच आली. असें म्हणतात कीं सुरुवातीला क्रिप्सनें इंग्लंडच्या प्रधानमंडळाच्या धर्तीचें सरकार देऊं केलें होतें परंतु नंतर त्यांनीं आपले शब्द फिरवले व व्हॉइसरॉयच्या जादा अधिकारावर नसता भर दिला. त्यामुळें मौलानासाहेब कांहींसे क्षुब्ध झाले आणि त्यांनीं असें जाहीर केलें कीं जनतेच्या हातांत जर ताबडतोब खरीखुरी सत्ता जाणार नसेल तर त्या योजनेचा विचार करण्याचेंहि कारण नाहीं.

जवळ जवळ प्रक्षुब्ध मनस्थितींतच सर क्रिप्स यांनीं एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यांत हिंदुस्तानचा किनारा सोडला. फक्त कॉंग्रेसनेंच क्रिप्स योजना झिडकारली असें नाहीं तर देशांतील एकाहि पक्षानें तिचा स्वीकार केला नाहीं. गांधीजी म्हणतात, क्रिप्सच्या प्रयाणानंतर थोड्याच दिवसांनीं 'चले जाव' मोहिमेच्या कल्पनेनें ते भारले गेले. ब्रिटिशांनीं येथील सर्व राजकीय सत्ता सोडल्याखेरीज हिंदुस्तानचें कसलेंहि हित साधणें शक्य नाहीं असें त्यांना आढळून आलें. दोस्त सैन्यें युद्धकाळांत हिंदुस्तानांत राहिलीं आणि युद्धतळ म्हणून त्यांनीं हिंदुस्तानचा उपयोग करून घेतला तरी त्यास गांधीजींची हरकत नव्हती. परंतु त्यांचा आग्रह असा होता कीं.

तें स्वतंत्र हिंदुस्तानच्या संमतीनें घडून आलें पाहिजे. त्यांनीं असेंहि सांगितलें कीं ब्रिटिश सत्ता हिंदुस्तानांतून नष्ट झाल्याशिवाय हिंदु-मुसलमानांत ऐक्य प्रस्थापित होणें अशक्य आहे. ते पुढें असेंहि म्हणाले कीं त्यांना हिंदुस्तान ताब्डतोब स्वतंत्र व्हावयास हवा आहे कारण रशियाला व चीनला मदत करण्याचा तोच एकमेव मार्ग आहे. गुलामींत खितपत पडलेल्या हिंदुस्तानला स्वतःचेंहि संरक्षण करतां यावयाचें नाहीं आणि दुसऱ्या राष्ट्रांनाहि मदत करतां यावयाची नाहीं.

त्यानंतर तुफानी प्रचार सुरू झाला व त्याची परिणति १४-७-४२ चा वर्धा ठराव पास होण्यांत झाली. त्या ठरावान्वयें ब्रिटिशांना हिंदुस्तान सोडण्याची विनंति करण्यांत आली. त्यांत असें म्हटलें होतें कीं जर ही विनंति अमान्य करण्यात आली तर काँग्रेसला नाइलाजानें महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं हिंदुस्तानचें स्वातंत्र्य व राजकीय हक्क प्रस्थापित करण्यासाठीं आपली सर्व अहिंसक शक्ति वापरावी लागेल. या निर्णयाचें स्वरूप अत्यंत गंभीर असल्यामुळें तो मुंबई येथें ७ व ८ ऑगस्टला भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीपुढें ठेवण्यांत आला.

मुंबईच्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ठरावानें सर्व गोष्टी स्पष्ट झाल्या. त्यासंबंधींचें ठरावांतील अवतरण खालीं देत आहे:— "म्हणून हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याचा जन्मसिद्ध हक्क प्रस्थापित करण्यासाठीं गेल्या बावीस वर्षांच्या शांततामय लढ्यांत कमावलेली सर्व अहिंसक शक्ति उपयोगांत आणतां येईल अशा तऱ्हेचा जास्तींत जास्त व्यापक प्रमाणावरील अहिंसक सामुदायिक लढा सुरू करण्यास मंजुरी देण्याचा ठराव ही सभा करीत आहे. अशा तऱ्हेचा लढा अर्थातच गांधीजींच्या नेतृत्वाखालीं झाला पाहिजे."

गांधीजींनीं आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं ते लढ्याची घाई न करतां व्हाईसरॉयची मुलाखत घेऊन त्यांच्याशीं वाटाघाट करण्याचा प्रयत्न करतील. परंतु दुसऱ्या दिवशीं उजाडण्यापूर्वीच गांधीजींना व वर्किंग कमिटीच्या सर्व सभासदांना पकडण्यांत आलें. पुढील आठवड्याच्या आंत ज्यांना ज्यांना म्हणून काँग्रेसमध्यें थोडें फार स्थान होतें अशा—

सर्वांना अटक करून विनाचौकशी तुरुंगांत डांबण्यांत आलें. त्यानंतर वटहुकूम, लाठीमार, गोळीबार आणि विमानांतून केलेली बॉंबफेक यांची राजवट सुरू झाली. या क्षोभजनक प्रकारानें कांहीं ठिकाणीं लोक चवताळून गेले आणि त्यांनीं रेल्वे, पोलिसठाणीं वगैरेंवर हल्ले चढवले. अंदाजें २,००० हून अधिक लोकांना गोळ्या घालण्यांत आल्या आणि सुमारें ६,००० लोकांना पोलिस व लष्कर यांच्या गोळीबारानें जखमी केलें. लाठीमारामुळें तर हजारों लोकांना दुखापती झाल्या. सुमारें १,५०,००० लोकांना तुरुंगांत टाकण्यांत आलें आणि जवळ जवळ १५,००,००० रुपयांचा सामुदायिक दंड बसवण्यांत आला. पोलिस व लष्कर यांनीं केलेले अनन्वित जुलूम, घरादारांची जाळपोळ व लुटालूट आणि इतर अत्याचार यांना तर सीमाच नाहीं.

ऑगस्ट चळवळीविषयीं आजच जास्त कांहीं बोलूं नये अथवा त्यावर कोणतेंहि मत देऊं नये हें बरें परंतु यासंबंधीं आपणांस येवढें मात्र खास म्हणतां येईल कीं सबंध हिंदुस्तानांत प्रत्ययास आलेली जनताजागृति व तिनें केलेले उठाव आणि लढ्याच्या वेळीं जनतेनें प्रामुख्यानें केलेलें अहिंसक वर्तन हें सबंध इतिहासांत अभूतपूर्व आणि अतुलनीय असें ठरेल. गांधीजींच्या हातीं सूत्रें राहिलीं असतीं तर चळवळीला कोणतें वळण लागलें असतें हा प्रश्न स्वतंत्र आहे परंतु गांधीजींच्या किंवा इतर कोणत्याहि प्रमुख पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं जनतेनें लढा कशा तऱ्हेनें चालविला याचें समाजशास्त्राच्या दृष्टिकोणांतून निरीक्षण करण्यासारखें आहे. ज्यांना मान्यता देण्यांत आली नव्हती किंवा तीं सत्याग्रहाच्या परंपरेला सोडून होतीं अशीं जमावाच्या किंवा गटाच्या हातून घडलेलीं कांहीं तुरळक हिंसामय कृत्यें सोडून दिलीं तरी सरकारच्या आत्यंतिक पाशवी स्वरूपाच्या संघटित हिंसेला तोंड देणारें लढ्याचें प्राधान्यैंकरून स्वरूप आणि अहिंसक शौर्याचीं आणि उदात्ततेचीं अनेक कृत्यें यांमुळें या चळवळीचा सत्याग्रहाच्या इतिहासांतील एक महत्त्वपूर्ण प्रकरण म्हणून सदैव उल्लेख केला जाईल.

परिशिष्टें

परिशिष्ट १

सत्याग्रहाश्रमांतील व्रतें

अहमदाबादजवळ १९१५ सालीं गांधीजींनीं आपला आश्रम स्थापिला. या 'आश्रमा'चा उद्देश 'मातृभूमीची सेवा करण्याचें शिक्षण घेऊन तें कृतींत उतरविणें' हा होता.

तेथील नियम व शिस्त ज्यांनीं जीवनपथ म्हणून सत्याग्रहाचा अंगीकार केला आहे त्यांना उपयोगी पडावी या दृष्टीनें आंखण्यांत आली होती.

शक्यतोंवर मुळांतील शब्द जसेच्या तसे टेवून आश्रमांत घेण्यांत येणाऱ्या शपथा थोडक्यांत देत आहें.

प्रधान आणि गौण असे प्रतिज्ञांचे दोन भाग पाडण्यांत आले आहेत.

प्रधान व्रतें

१ सत्य :— सामान्यपणें एखाद्यानें असत्याचा अवलंब न करण एवढें पुरेसें होणार नाहीं. देशाच्या हितासाठीं देखील कसल्याहि प्रकारची फसवणूक करतां कामा नये आणि सत्यासाठीं प्रसंगीं मातापितरांना अथवा वडील मंडळींनाहि विरोध करावा लागेल याची प्रत्येकानें जाणीव ठेवली पाहिजे. त्या बाबतींत प्रल्हादाचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवावें.

२ अहिंसा :— अहिंसा याचा अर्थ दुसऱ्याचा जीव न घेणें एवढाच नव्हे; अहिंसेची प्रतिज्ञा घेणारानें त्याच्या मतें अन्यायी असणाराना देखील इजा करतां कामा नये, त्यांच्यावर न रागावतां प्रेम केलें पाहिजे, अशा तऱ्हेनें त्यानें जुलमाचा प्रतिकार केला पाहिजे– मग तो जुलूम मातापितरांनीं केलेला असो, सरकारनें केलेला असो अथवा दुसऱ्या कोणीं केलेला असो. पण तसें करतांना त्यानें जुलूम करणाराला दुखवतां कामा नये. सत्य आणि अहिंसा यांचा साधक अन्याय करणाराला प्रेमानें जिंकून घेईल. तो त्याच्या इच्छा जुमानणार नाहीं. परंतु स्वतः जुलूम

करणाराच जिंकला जाईपर्यंत त्याच्या इच्छा मोडण्यासाठीं प्राणांतिक देखील शासन सहन करील.

३ ब्रह्मचर्य:— ब्रह्मचर्याचें पालन केल्याखेरीज वरील दोन प्रतिज्ञा आचरणांत आणणें अशक्यप्राय आहे. परस्त्रीविषयीं अभिलाषा न धरणें येवढ्यानें या शपथेची पूर्ति होणार नाहीं; तर त्यानें आपल्या पाशवी विकारांवर असा कांहीं ताबा मिळविला पाहिजे कीं त्याचा वैचारिक देखील अधःपात होणार नाहीं. तो विवाहित असेल तर त्याला आपल्या पत्नी-विषयीं विषयासक्ति वाटणार नाहीं परंतु तिच्याकडे आपल्या जन्माची जोडीदारीण या दृष्टीनें पाहून तो तिच्याशीं अत्यंत शुद्धस्वरूपाचे संबंध ठेवील.

४ अस्वाद:— जिभेवर ताबा मिळविल्याखेरीज वर दिलेलीं आणि त्यांतल्या त्यांत ब्रह्मचर्याचें व्रत पाळतां येणें कठीण आहे. म्हणून जिभे-वरील ताबा हें एक स्वतंत्र व्रत मानण्यांत आलें आहे. ज्याला आपल्या देशाची सेवा करावयाची आहे त्यानें अशी श्रद्धा बाळगली पाहिजे कीं अन्नसेवनाची आवश्यकता शरीर टिकविण्यापुरतीच आहे. म्हणून त्यानें आपला रोजचा आहार नियमित व शुद्ध असा ठेवावा आणि पाशवी विकारांना उत्तेजन देणारें अथवा अनवश्यक असलेलें अन्न आपल्या शक्त्यनुसार हळूहळू अथवा ताबडतोब वर्ज करावें.

५ अस्तेय:— सामान्यपणें ज्याला दुसऱ्याची मालमत्ता म्हणतात तिचा अपहार न करणें एवढें अस्तेयपालनास पुरेसें होत नाहीं; ज्याची आप-ल्याला खरोखरी गरज नाहीं अशी वस्तु आपण वापरली तर ती चोरीच आहे. निसर्ग रोजच्या रोज आपल्याला पुरेल तेवढ्याचाच पुरवटा करतो.

६ अपरिग्रह:— एखादी अनवश्यक वस्तु जवळ न बाळगणें किंवा ती जास्त प्रमाणांत ठेवून न घेणें ऐवढ्यानें भागणार नाहीं तर आपल्या शरीराला ज्याची निकडीची गरज भासत नाहीं अशा कोठल्याहि गोष्टीचा संग्रह न करणें आवश्यक आहे. अशा रीतीनें जर एखाद्याचें खुर्चीशिवाय चालणार असेल तर त्यानें खुर्ची वापरतां कामा नये. म्हणून या प्रतिज्ञेच्या उपासकानें त्याचें सतत चिंतन करून आपली राहणी साधी बनवली पाहिजे.

गौण व्रतें

७ स्वदेशी :— ज्या वस्तूंच्या बाबतींत अथवा त्यांच्या कारागिरांच्या बाबतींत कोठल्याहि अवस्थेंत फसवणुकीला वाव असेल अशा वस्तु वापरणें सत्याशीं विसंगत आहे. तेवढ्यासाठीं सत्याचा उपासक मँचेस्टर, जर्मनी अथवा हिंदुस्तान येथील गिरण्यांत तयार झालेला माल वापरणार नाहीं कारण त्याच्या बुडाशीं कांहीं फसवणूक नसेलच अशी त्याची खात्री नसते. शिवाय कामगारांना गिरण्यांत फार त्रास सहन करावा लागतो. गिरण्यांत वापरण्यांत येणाऱ्या विस्तवामुळें कामगारांची आयुर्मर्यादा तर कमी होतेच पण त्यामुळें इतर जीवजंतूंचा नाश होतो. म्हणून विदेशी किंवा गुंतागुंतीच्या यंत्रसामग्रीनें तयार करण्यांत आलेल्या वस्तु अहिंसेच्या उपासकाला वर्ज होत. यासंबंधीं जास्त विचार केला असतां असें आढळून येईल कीं असल्या वस्तूंच्या उपयोगामुळें असंग्रह आणि अपरिग्रह या प्रतिज्ञांचा भंग होतो. आपल्या स्वतःच्या हातमागावर बनवलेल्या साध्या कपड्याऐवजीं आपण परदेशी कपडा वापरतों कारण तो अधिक सुंदर मानण्याची प्रथा पडलेली असते. शरीराला कृत्रिम तऱ्हेनें नटवणें हा ब्रह्मचर्याच्या मार्गातील अडथळा आहे. म्हणून अगदीं साध्या तेवढ्याच गोष्टी तो वापरील. याच कारणासाठीं स्वदेशीची प्रतिज्ञा घेणारानें साधे आणि अगदीं साध्या रीतीनें केलेले कपडेच वापरले पाहिजेत आणि गुंड्या किंवा परदेशी धाटणीची शिलाई वगैरे गोष्टी देखील वर्ज केल्या पाहिजेत. आणि याच मार्गानें जीवनाच्या सर्व क्षेत्रांत स्वदेशीचा अंतर्भाव केला पाहिजे.

८ निर्भयता:— ज्याच्यावर भीतीचा अंमल चालतो तो सत्याचें किंवा अहिंसेचें आचरण क्वचितच करूं शकेल. म्हणून आश्रमवासीय राजे, जनता, जाती, कुटुंब, चोर, दरवडेखोर, वाघासारखे हिंस्र पशु आणि प्रत्यक्ष मृत्यु याच्या भयापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करतील. खराखुरा निर्भय मनुष्य दुसऱ्यापासून सत्यशक्ति आणि आत्मिक शक्ति यांच्या जोरावर स्वतःचा बचाव करूं शकेल.

यानंतर कांहीं महत्त्वाच्या सूचना पुढें दिल्या आहेत.

भाषा :— स्वतःच्या भाषेचा त्याग करून कोणत्याहि राष्ट्राची खरी प्रगति होणें शक्य नाहीं. म्हणून आश्रमवासीय आपापल्या मातृभाषेंतून शिक्षण घेतील आणि हिंदुस्तानच्या सर्व भागांतील बांधवांशीं जिव्हाळ्याचे संबंध असावेत अशी त्यांची इच्छा असल्यामुळें ते हिंदुस्तानची मुख्य भाषा जी हिंदुस्तानी तिचेंहि शिक्षण घेतील.

शारीरिक श्रम :— शारीरिक श्रम हें निसर्गानें मनुष्यावर लादलेलें कर्तव्य आहे. म्हणून आपण आपलें जीवित टिकवण्यापुरता आणि आपल्या मानसिक व आध्यात्मिक शक्ति उपयोगांत आणण्यापुरता सार्वजनिक हिताची दृष्टि ठेवून शारीरिक श्रमांचा अवलंब करावा. लोकसंख्येचें जास्तींत जास्त प्रमाण शेतीवर अवलंबून असल्यामुळें आश्रमवासीय त्यांच्या वेळांतील कांहीं भाग शेतांत काम करण्याकडे खर्च करतील; व ज्या वेळीं हें शक्य नसेल त्या वेळीं दुसरे कसले तरी शारीरिक श्रम करतील.

हातमाग :— आपल्या देशांतील गरिबीचें एक महत्त्वाचें कारण चरखा आणि हातमाग यांचा जवळ जवळ पूर्णपणें झालेला लोप हें आहे. म्हणून स्वतः हातमागावर काम करून या धंद्याचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं ते शक्य तितके प्रयत्न करतील

राजकारण :— राजकारण, आर्थिक सुधारणा वगैरे गोष्टी या ज्ञानाच्या स्वतंत्र शाखा समजल्या जाऊं नयेत. त्या सर्वांचें मूळ धर्मांतच आहे. म्हणून राजकारण, अर्थकारण, सामाजिक सुधारणा इत्यादि विषय धार्मिक भावनेनें शिकण्याचा प्रयत्न केला जाईल आणि यासंबंधींचें कार्य आश्रमवासीयांकडून उत्साहानें व निष्ठेनें करण्यांत येईल.

विख्यात आश्रमवासीय विनोबा भावे यांनीं या व्रतांत महत्त्वाची भर घालून तीं श्लोकबद्ध केलीं आहेत. तो श्लोक असा:—

अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह
शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन
सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्शभावना
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रतनिश्चयें.

परिशिष्ट २

विधायक कार्यक्रम

सत्याग्रहाच्या दृष्टीनें विधायक कार्यक्रमाचें महत्त्व इतकें आहे कीं 'विधायक कार्यक्रम' या आपल्या छोट्याशा पुस्तकांत गांधीजी म्हणतात, विधायक कार्यक्रमांत सबंध राष्ट्राचें सहकार्य मिळविलें तर शुद्ध अहिंसक मार्गांनीं सविनय कायदेभंगाचीच गरज आहे असें नाहीं.

गांधीजींनीं सध्यां देशापुढें ठेवलेल्या पंधराकलमीं विधायक कार्यक्रमांतील कलमें खालीं दिलीं आहेत. निरनिराळ्या संस्थांच्या मार्फत हिंदुस्तानांत तो कार्यक्रम अंमलांत आणण्यांत येत आहे.

१. जातीय ऐक्य.
२. अस्पृश्यतानिवारण.
३. मद्यपानबंदी.
४. खादी.
५. ग्रामोद्योग.
६. खेड्यांतील आरोग्यरक्षण.
७. मूलशिक्षण (वर्धा शिक्षण योजना).
८. प्रौढशिक्षण आणि साक्षरताप्रसार.
९. स्त्रियांची उन्नति.
१०. समग्र गोसंवर्धन.
११. राष्ट्रभाषाप्रचार.
१२. मातृभाषेवरील प्रेम.
१३. आर्थिक समता.
१४. आदिवासींची सेवा.
१५. विद्यार्थी, किसान आणि कामगार यांच्यांतील जागृति व संघटना.

परिशिष्ट ३

सत्याग्रहींसाठीं नियम

१९३० सालीं दांडी मोर्चा काढण्यापूर्वी गांधीजींनीं सत्याग्रहींच्या आचरणासाठीं कांहीं नियम बनवले. २७-२-१९३० च्या 'यंग इंडियां'त प्रसिद्ध झालेले नियम आणि त्यांची प्रस्तावना खालीं देत आहें व शेवटीं गांधीजींनीं उल्लेखिलेले 'अवश्य गुण' दिले आहेत.

" प्रेम दुसऱ्याला जाळीत नाहीं, स्वतः जाळून घेतें, म्हणून सत्याग्रही म्हणजे सविनय प्रतिकारक मरणांतिक क्लेश देखील आनंदानें सोशील. त्यामुळें हें ओघानेंच येतें कीं सविनय प्रतिकारक चालू राजवटीचा अंत घडवून आणण्यासाठीं रक्ताचा थेंब न् थेंब खर्ची घालीत असला तरी एकाहि इंग्रज गृहस्थाला तो विचार, उच्चार किंवा आचार यांच्या द्वारा इजा करणार नाहीं. या अवश्यतया त्रोटक असलेल्या सत्याग्रहीबद्दलचा स्पष्टीकरणाच्या योगानें वाचकांस खालीं दिलेल्या नियमांचा अर्थ व महत्त्व बहुधा लक्षांत येईलः— "

व्यक्तिगत नियमः— १. सत्याग्रही म्हणजेच सविनय प्रतिकारक रागाला आपल्या मनांत स्थान देणार नाहीं.

२. तो विरोधकाचा क्रोध सहन करील.

३. असें करीत असतांना विरोधकानें केलेले आघात तो अंगावर घेईल पण उलटून त्याच्यावर हात उगारणार नाहीं; मात्र रागाच्या भरांत दिलेल्या हुकुमापुढें शिक्षेच्या अथवा तसल्याच दुसऱ्या भयानें तो आपली मान वांकवणार नाहीं.

४. ज्या वेळीं एखादा अधिकारी सविनय प्रतिकारकाला पकडण्यास येईल त्या वेळीं तो आपण होऊन पकडून घेईल आणि मालमत्ता ताब्यांत घेण्यासाठीं अधिकाऱ्यांनीं जप्ती आणल्यास किंवा अधिकारी ती घेऊन जाऊं लागल्यास त्यांना प्रतिकार करणार नाहीं.

५. विश्वस्त म्हणून सत्याग्रहीच्या ताब्यांत कसली मालमत्ता असेल तर ती सरकारच्या ताब्यांत देण्यास तो नकार देईल; मग तिचें रक्षण करतांना

त्याचे प्राण खर्ची पडले तरी बेहत्तर. मात्र तो उलट प्रहार कधींहि करणार नाहीं.

६. उट्टें न काढण्याच्या कल्पनेंत शपथ घालणें किंवा शिव्याशाप देणें बसत नाहीं.

७. म्हणून सविनय प्रतिकारक विरोधकांचा अपमान कधींहि करणार नाहीं आणि अहिंसेच्या कल्पनेशीं विरोधी असलेल्या व नव्यानें बनविलेल्या कोठल्याहि घोषणा उच्चारणार नाहीं.

८. सविनय प्रतिकारक यूनियन जॅकला प्रणाम करणार नाहीं पण तें निशाण अथवा इंग्रज किंवा हिंदी अधिकारी यांचा अपमानहि करणार नाहीं.

९. लढा चालू असतांना जर एखाद्यानें अधिकाऱ्याचा अपमान केला किंवा त्याच्यावर हल्ला चढवला तर सविनय प्रतिकारक त्या अधिकाऱ्याचें अथवा अधिकाऱ्यांचें आपले प्राण संकटांत घालूनहि त्या अपमानापासून अथवा हल्ल्यापासून रक्षण करील.

कैदी म्हणून पाळावयाचे नियम

१०. कैदी म्हणून सविनय प्रतिकाराचें तुरुंगाच्या अधिकाऱ्यांबरोबरचें वर्तन नम्र राहील आणि तो स्वाभिमानाला धक्का न लावणारी तुरुंगाची सगळी शिस्त पाळील. उदाहरणार्थ, तो अधिकाऱ्यांना नेहमींसारखें वंदन करील परंतु तसें करीत असतांना खालीं लवण्यासारखें अपमानास्पद कृत्य तो करणार नाहीं किंवा 'सरकारचा विजय असो' अथवा असल्या दुसऱ्या घोषणा तो उच्चारणार नाहीं. त्याच्या धर्माच्या विरुद्ध नसलेलें, स्वच्छ रीतीनें शिजवलेलें व स्वच्छपणें वाढलेलें जेवण तो घेईल पण अपमानास्पद रीतीनें किंवा गलिच्छ भांड्यांत वाढलेलें अन्न तो स्वीकारणार नाहीं.

११. सामान्य कैदी आणि स्वतः यांत तो कसलाहि भेदाभेद करणार नाहीं, दुसऱ्यापेक्षां तो स्वतःला श्रेष्ठ समजणार नाहीं किंवा त्याचें शरीर सुदृढ आणि सुस्थितींत ठेवण्यासाठीं आवश्यक नसलेल्या कोणताहि सुखसवलतींची मागणी करणार नाहीं. पण त्याच्या शारीरिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्यासाठीं जरूर असलेल्या सुखसवलती मागण्याचा त्याला अधिकार आहे.

१२. ज्या सवलती नाकारण्यांत आल्यानें त्याच्या स्वाभिमानास धक्का लागणार नसेल अशा सवलतींकरतां सविनय प्रतिकारकानें उपवास करतां कामा नये.

घटक म्हणून पाळावयाचे नियम

१३. शिबिराच्या अधिकाऱ्यानें दिलेल्या सर्व आज्ञा पसंत असोत अथवा नसोत सविनय प्रतिकारकानें त्या आनंदानें पाळल्या पाहिजेत.

१४. त्याला फर्मावण्यांत आलेल्या आज्ञा जरी त्याला अपमानास्पद, अपायकारक किंवा मूर्खपणाच्या वाटल्या तरी पहिल्याप्रथम त्यांचें पालन करून मग वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तो त्याबद्दल तक्रार करील. संघटनेंत सामील होण्यापूर्वी तेथील शिस्तीची योग्यायोग्यता पारखण्यास तो मोकळा आहे परंतु एकदा त्यांत सामील झाल्यानंतर तेथील शिस्त कितीहि कंटाळवाणी असली तरी ती पाळणें हें त्याचें कर्तव्य ठरतें. संघटनेचें एकंदर कार्य सैनिकाला अयोग्य अथवा अनैतिक आहे असें वाटल्यास त्याला संघटनेशीं असलेले संबंध तोडून टाकण्याचा अधिकार राहील. पण सैनिक असेपर्यंत मात्र त्याला तेथील शिस्तीचा भंग करण्याचा अधिकार पोहोंचणार नाहीं.

१५. आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांच्या चरितार्थासाठीं सविनय प्रतिकारक कसलीहि अपेक्षा बाळगणार नाहीं. अशा तऱ्हेची कांहीं सोय झाल्यास तो योगायोग समजला पाहिजे. आपल्यावर अवलंबून असणारांचें भवितव्य सविनय प्रतिकारक ईश्वराच्या हातीं सोपवतो. सामान्य युद्धांत देखील ज्या वेळीं शेंकडों आणि हजारों लोक आपले प्राण समर्पण करण्यास तयार होतात त्या वेळीं ते देखील अशा तऱ्हेची कांहीं सोय आधींपासून करूं शकत नाहींत; मग सत्याग्रहाच्या बाबतींत तर अशी परिस्थिति जास्तच तीव्रतेनें निर्माण होणार. पण अशा प्रसंगीं क्वचितच कोणाची उपासमार होते हा नित्याचा अनुभव आहे.

जातीय दंग्याचे वेळीं पाळावयाचे नियम

१६. कोणताहि सविनय प्रतिकारक जाणूनबुजून जातीय भांडणास कारणीभूत होणार नाहीं.

१७. अशा तऱ्हेचा दंगा उद्भवला असतां तो पक्षपात करणार नाहीं. परंतु जी बाजू अगदीं उघड उघड न्याय्य असेल तिलाच तो मदत करील. तो हिंदु असेल तर मुसलमानांशीं आणि इतरधर्मीयांशीं त्याचें वर्तन औदार्याचें असेल आणि अहिंदूंना हिंदूंच्या हल्ल्यापासून बचावण्यासाठीं तो बलिदान करण्यासहि तयार असेल. हल्ला जर दुसऱ्या बाजूकडून झाला असेल तर तो प्रतिहल्ल्यांत भाग घेणार नाहीं परंतु हिंदूंच्या संरक्षणासाठीं तो स्वतःचे प्राण समर्पण करील.

१८. जातीय भांडणें निर्माण होण्याचे प्रसंग टाळण्यासाठीं तो प्रयत्नांची पराकाष्ठा करील.

१९. सत्याग्रहींची मिरवणूक चाललेली असतांना दुसऱ्या जातींच्या धार्मिक भावना दुखवल्या जातील असें कोणतेंहि कृत्य केलें जाणार नाहीं आणि अशा तऱ्हेच्या भावना दुखविल्या जाण्याचा संभव असलेल्या कोठल्याहि मिरवणुकींत तो सामील होणार नाहीं.

गांधीजींनीं सत्याग्रहींसाठीं अत्यावश्यक मानलेले गुण (हरिजन २५-३-१९३९) खालीं दिले आहेत :—

१. त्याची ईश्वरावर जिवंत श्रद्धा असली पाहिजे कारण ईश्वर हाच त्याचा आधार होय.

२. तत्त्व म्हणून सत्य व अहिंसा यांवर आणि त्याचप्रमाणें मानवामधील स्वभावसिद्ध चांगूलपणावर त्याचा विश्वास असला पाहिजे. आत्मक्लेशाच्या द्वारा व्यक्त केलेल्या सत्य आणि प्रेम यांच्या योगानें तो चांगूलपणा जागृत करण्याची त्यानें अपेक्षा बाळगली पाहिजे.

३. त्यानें आपलें जीवन निष्कलंक राखलें पाहिजे व आपल्या ध्येयासाठीं स्वतःचें जीवित आणि वित्त गमावण्याची तयारी ठेवली पाहिजे.

४. त्यानें सतत खादी वापरली पाहिजे व सूत कांतलें पाहिजे. हिंदुस्तानातील परिस्थितींत हें आवश्यक आहे.

५. तो मद्यपानविरोधी असला पाहिजे आणि त्याची बुद्धि नेहमीं साफ रहावी व मन स्थिर रहावें यासाठीं त्यानें इतर मादक पदार्थांपासून अलिप्त राहिलें पाहिजे.

६. वेळोवेळीं घालून देण्यांत येणारे शिस्तीचे सर्व नियम त्यानें बिनतक्रार पाळले पाहिजेत.

७. तुरुंगांतील नियम मुद्दाम त्याच्या स्वाभिमानाला धक्का लावावा याच बुद्धीनें बनविण्यांत आले नसतील तर त्यानें त्यांचें पालन केलें पाहिजे.

ही यादी परिपूर्ण आहे असें समजूं नये. हे नियम केवळ उदाहरणात्मक आहेत.

परिशिष्ट ४

कांहीं प्रतिज्ञा

सात्याग्रहींनीं निरनिराळ्या प्रसंगीं घेतलेल्या महत्त्वाच्या शपथा खालीं दिल्या आहेत :—

कैरा करबंदी सत्याग्रह, १९१८

शेतकऱ्यांची प्रतिज्ञा

"आमच्या खेडेगांवांतील पिकें चार आण्यांहून कमी आल्याचें माहीत असल्यामुळें आम्हीं वसुली पुढल्या वर्षापर्यंत तहकूब करण्यांत यावी अशी सरकारला विनंति केली परंतु सरकारनें आमची विनंति अमान्य केल्यामुळें आम्ही खालीं सह्या करणार गंभीरपणें असें जाहीर करतों कीं आम्ही सबंध अथवा बाकी राहिलेला वसूल भरणार नाहीं. आम्ही सरकारला वसूल गोळा करण्यासाठीं अवश्य वाटेल त्या कायदेशीर उपायांचा अवलंब करूं देऊं आणि वसूल करण्यास दिलेल्या नकाराबद्दल होणारे सर्व परिणाम आम्ही आनंदानें भोगूं. आम्ही आमच्या जमिनी जप्त होऊं देऊं परंतु आपण होऊन कसलाहि भरणा करून आमचा स्वाभिमान गमावेल किंवा आमच्या पदरीं चूक येईल असें कोणतेंहि कृत्य करणार नाहीं. सबंध जिल्ह्यांत सरकारनें वसुलीचा दुसरा हप्ता गोळा करण्याचें तहकूब केलें तर आमच्यापैकीं ज्यांना वसूल भरण्याची ऐपत आहे ते त्यांच्याकडून

येणें असलेला सर्व वसूल मरतील. पैसे असूनहि आमच्यांतील कांहीं लोक सारा भरत नाहींत त्याचें कारण हें आहे कीं त्यांनीं जर भरणा केला तर गरीब लोक घाबरून जाऊन सारा भरण्यासाठीं त्यांची मालमत्ता विकून टाकतील किंवा कर्ज काढतील व त्यामुळें त्यांना हालअपेष्टा सोसाव्या लागतील.

"अशा परिस्थितींत ज्यांना पैसे भरण्याची ऐपत आहे त्यांनीं गरिबांचे रक्षण करणें हें त्यांचें कर्तव्यच होय असा आमचा विश्वास आहे."

टीप:— १९२८ च्या बार्डोलीची करबंदीच्या वेळची प्रतिज्ञा अशाच प्रकारची होती.

१९१९ मधील सत्याग्रह (रौलट बिलांसंबंधीं)

"इंडियन क्रिमिनल लॉ (अमेंडमेंट) बिल नं० १ स० १९१९ आणि क्रिमिनल लॉ (इमर्जेन्सी पॉवर्स) बिल नं० २ स० १९१९ या नांवानें ओळखले जाणारे कायदे अन्याय्य, व्यक्तिगत स्वातंत्र्य व न्याय यांस विघातक व सबंध समाजाची व प्रत्यक्ष सरकारची सुरक्षितता ज्यांवर आधारलेली आहे अशा नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे आहेत असें आमचें प्रामाणिक मत असल्यामुळें आम्ही गंभीरपणें असा निश्चय करतों कीं या बिलांना जर कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें तर ते कायदे परत घेतले जाईपर्यंत आम्ही ते व यानंतर नेमण्यांत येणाऱ्या कमिटीला वाटतील ते कायदे पाळण्याचें सविनयपणें नाकारूं. आम्ही असाहि निश्चय करीत आहोंत कीं या लढ्यांत आम्ही निष्ठापूर्वक सत्यपालन करूं आणि जीविताला अथवा वित्ताला हिंसा करण्यापासून अलिप्त राहूं."

स्वयंसेवकप्रतिज्ञा (अहमदाबाद काँग्रेस) डिसेंबर १९२१

ईश्वराला साक्ष ठेवून मी गंभीरपणें असें जाहीर करतों कीं :—

१. स्वयंसेवकपथकांत सामील होण्याची माझी इच्छा आहे.

२. मी पथकाचा समासद असेपर्यंत माझ्या शब्दांत आणि कृतींत अहिंसक राहीन आणि विचारानेंहि अहिंसक राहण्याचा प्रयत्न करीन कारण माझा असा विश्वास आहे कीं हिंदुस्तानच्या आजच्या परिस्थितींत अहिंसाच फक्त खिलाफत आणि पंजाब (या अन्यायांचें निवारण करण्यास) मदत करूं शकेल; स्वराज्याची प्राप्ति आणि हिंदुस्थानांतील हिंदु, मुसलमान, शीख, पारशी, खिस्ती किंवा ज्यू असल्या सर्व जातीजमातींतील ऐक्यभाव अहिंसेमुळेंच साधूं शकेल.

३. माझा अशा तऱ्हेच्या ऐक्यावर विश्वास असून त्याच्या सिद्धयर्थ मी सतत झटत राहीन.

४. हिंदुस्तानच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक मुक्तीसाठीं स्वदेशी अत्यावश्यक आहे असा माझा विश्वास असून मी इतर कोणतेंहि कापड न वापरतां हातसुताची हातविणीची खादीच वापरीन.

५. हिंदु म्हणून अस्पृश्यतेचा कलंक नाहींसा करणें न्याय्य आणि जरूरीचें आहे असा माझा विश्वास असून मी शक्य त्या सर्व प्रसंगीं दलित वर्गांशीं प्रत्यक्ष संबंध ठेवण्याचा आणि त्याची सेवा करण्याचा प्रयत्न करीन.

६. मी माझ्या वरिष्ठांच्या सूचना आणि स्वयंसेवकमंडळानें किंवा वर्किंग कमिटीनें किंवा काँग्रेसनें स्थापन केलेल्या दुसऱ्या कोणत्याहि मंडळानें घालून दिलेल्या प्रतिज्ञेशीं विसंगत नसतील असे नियम पाळीन.

७. मी कारावास, हल्ला अथवा मरण देखील माझ्या धर्मासाठीं आणि माझ्या देशासाठीं बिनतक्रार सहन करीन.

८. मला कारावासांत रहावें लागल्यास मी माझ्या कुटुंबासाठीं किंवा माझ्यावर अवलंबून असणारांसाठीं काँग्रेसकडून मदतीची अपेक्षा बाळगणार नाहीं.

टीप :— १९४०-४१ मधील वैयक्तिक सत्याग्रहाच्या वेळची शपथ कताईच्या सक्तीचें त्यांत घालण्यांत आलेलें कलम वगळल्यास अशाच तऱ्हेची होती.

खुदा-इ-खिदमतगारांची प्रतिज्ञा

टीप :— खान अबदुल गफारखान यांच्या नेतृत्वाखालील सरहद्द-प्रांतांतील पठाण स्वयंसेवकांना खुदा-ई-खिदमतगार म्हणजे ईश्वराचे सेवक असें म्हणतात.

ईश्वरासमक्ष मी गंभीरपणें असा निश्चय करतों कीं :—

१. मी माझें नांव आजपासून खुदा-ई-खिदमतगार म्हणून प्रामाणिकपणें व कळकळीनें नोंदवून घेत आहें.
२. राष्ट्राची सेवा करण्यासाठीं आणि माझ्या देशाचें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं मी माझें वैयक्तिक सुख, संपत्ति आणि प्रत्यक्ष प्राण यांचा त्याग करण्यास सदैव तयार राहीन.
३. मी कोणत्याहि प्रकारच्या गटबाजीला बळी पडणार नाहीं किंवा कोणाबरोबर भांडण उकरून काढणार नाहीं अगर शत्रुत्व पत्करणार नाहीं. जुलूम करणारांपासून पददलितांचें मी सदैव संरक्षण करीन.
४. मी इतर कोठल्याहि संघटनेचा सभासद होणार नाहीं आणि अहिंसक लढ्याच्या वेळीं मी जामीन भरणार नाहीं किंवा माफी मागणार नाहीं.
५. माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रत्येक न्याय्य आज्ञेचें मी सतत पालन करीन.
६. मी नेहमीं अहिंसातत्त्वानुसार आचरण करीन.
७. सबंध मानवतेची मी सारखीच सेवा करीन. संपूर्ण स्वातंत्र्य व धार्मिक स्वातंत्र्य हें माझ्या आयुष्याचें मुख्य उद्दिष्ट राहील.

८. माझ्या प्रत्येक कृतींत मी सत्य आणि शुचिता यांचें पालन करीन.
९. माझ्या सेवेसाठीं मी कसल्याहि प्रकारच्या मेहनतान्याची अपेक्षा करणार नाहीं.
१०. माझीं सर्व सेवा मी ईश्वरार्पण करीन. माझ्या सेवेचा उद्देश अधिकार मिळवणें अथवा त्याचें प्रदर्शन करणें हा राहणार नाहीं.

परिशिष्ट ५

संदर्भग्रंथांची सूचि

1. Files of Young India from the beginning.
2. Files of Harijan from the beginning.
3. Autobiography by M. K. Gandhi.
4. Satyagraha in South Africa by M. K. Gandhi.
5. Costructive Programme by M. K. Gandhi.
6. Non-violence in Peace and War by M. K. Gandhi.
7. Hind Swaraj by M. K Gandhi.
8. Power of Non-violence by Richard Gregg.
9. A Discipline for Non-violence by Richard Gregg.
10. The Story of Bardoli by Mahadeo Desai.
11. Satyagraha in Gandhiji's Own Words, Congress Brochure No. 1.
12. Kheda Satyagraha by Shankarlal Parikh (in Gujerathi).
13. Akali Struggle by C. F. Andrews.
14. Autobiography by Jawaharlal Nehru.
15. Mahatma Gandhi, the Man and His Mission by Natesan & Co., Madras.
16. M. K. Gandhi by Joseph J. Doke.
17. Mahatma Gandhi by Romain Rolland.
18. Correspondence with Mr. Gandhi by Government of India.

19. History of the Congress by Pattabhi Sitaramayya.
20. War Without Violence by K. Shridharani.
21. The Moral Equivalent of War by William James.
22. Ends and Means by Aldous Huxley.
23. Non-co-operation in Other Lands by Fenner Brockway.
24. Seven Months with Mahatma Gandhi by Krishnadas.
25. Essays and Reflections edited by Sir Radhakrishnan.
26. Gandhiji edited by D. G. Tendulkar and others.
27. The Mind of Mahatma Gandhi by Prabhu and Rao.

टीप :— वरील यादींत फक्त महत्त्वाच्या तेवढ्याच पुस्तकांचा समावेश केला आहे.



REFBK-0006659